# ॥ संत रोहिदास ॥

## चरित्र आणि वाङ्‌मय

लेखक : दलित मित्र श्री. मा. आ. कारंडे



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# संत रोहिदास

## चरित्र आणि वाङ्मय

अनुक्रमणिका

# संत रोहिदास

## चरित्र आणि वाङ्मय

दलितमित्र श्री.मा.आ.कारंडे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

## अनुक्रमणिका

**प्रथमावृत्ती – २२ फेब्रुवारी, १९९७**
**द्वितीय आवृत्ती**
दिनांक २६ जानेवारी, २००३

**प्रकाशक**
सचिव,
म.रा.साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय इमारत, तिसरा मजला,
१७२, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मार्ग, दादर, मुंबई-४०० ०१४

**©प्रकाशकाधीन**

**मुद्रक**
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
नागपूर.

**मुखपृष्ठ**
रचना व संकल्पना :
कला विभाग,
शासकीय मुद्रण,लेखनसामग्री व
प्रकाशन संचालनालय, मुंबई

**मूल्य १५० रुपये**

## अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

## अर्पण पत्रिका

*भारतीय संस्कृतीच्या परंपरेचे*
*थोर उपासक*
*संत शिरोमणी रोहिदास व*
*त्यांची प्रभावळ यांस—*

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

निवेदन ........ ९
लेखकाचे मनोगत ........ १२
दुसऱ्या आवृतीच्या निमित्ताने ........ १४
भाग १ ला संत रोहिदास चरित्र अ विभाग ........ २०
१.माहात्म्य ........ २१
२.पूर्व परंपरा ........ २३
३.कुल वृत्तांत ........ २८
४.बालपण ........ ३६
५.कौटुंबिक जीवन ........ ४५
६.गंगास्नान—ब्राह्मण चर्चा ........ ५१
७.गुरुस्वामी रामानंद ........ ५४
८.काशीतील पंडितांबरोबर चर्चा ........ ६२
९.परीस ........ ६४
१०.सुवर्णमुद्रा व सत्संगभवन ........ ६८
११.सिंहासनावरील ईश्वरमूर्ती ........ ७०
१२.चरणामृत ........ ७३
१३.कंकण (कंगन) ........ ७६
१४.शाळिग्राम ........ ७९
१५.मृत बालकास जीवदान ........ ८२
१६.राणी -झाली॰ शिष्या होते ........ ८३
१७.रोहिदास शिष्या-मीरा ........ ८८
१८.रोहिदास-सदना व सिकंदर लोदी ........ ९४
१९.कन्यारूपी गंगा ........ ९८
२०.तीर्थयात्रा ........ ९९
२१.भगवान नैवेद्य ग्रहण ........ १०१
२२.संत रोहिदासांचे निर्वाण ........ १०३
भाग १ ला संत रोहिदास चरित्र ब विभाग ........ १०८
२३.रोहिदासांचे गुरूबंधु व संतस्नेही ........ १०९

२४.भाव-सुमनावली ........ १२१
२५.संदेश-उपदेश ........ १३१
२६.संत रोहिदासांची भक्तिसाधना ........ १५७
२७.रोहिदासांची विचारधारा ........ १६७
२८.रोहिदासांची काव्यसंपदा ........ १७८
भाग २ रा संत रोहिदास चरित्र काव्य साधना ........ १८२
रोहिदास वाणी ........ १८३
(अ) दोहे ........ १८३
(ब) संत रोहिदासपदे ........ २४९
२.ज्ञान-गोष्टी (पद्यमय) ........ ४०५
३.रोहिदास-कबीर संवाद ........ ४१०
४.प्रल्हाद लीला ........ ४२४
५.श्री भक्त रोहिदासांची आरती ........ ४३०
६.॥श्री रोहिदास वंदना॥ ........ ४३२
७.समालोचन ........ ४४१
भाग ३ रा संत रोहिदास चरित्र परिशिष्टे ........ ४४५
(१) दोहे अनुक्रमणिका ........ ४४६
(२) पदे अनुक्रमणिका ........ ४५५
(३) पारिभाषिक शब्दकोश ........ ४६३
(४) संदर्भ ग्रंथ ........ ४६८

# निवेदन

## संत रोहिदासांचे समग्र दर्शन

**धर्मस्थापनेचे नर। जे ईश्वराचे अवतार ।**
**झाले आहेत, पुढे होणार । देणें ईश्वराचे॥**

असे जे समर्थानी म्हटले आहे, तें काही खोटे नाही.प्रत्येक धर्मग्लानीच्या काळी, ती ग्लानी दूर करुन ‘दुरिताचे तिमिर’ नाहीसे करणारे संत-महात्मे निर्माण झाले आहेत.संत रोहिदास (मूळ नांव रविदास, जे रैदास, रायदास.रुहदास या नावांनीही ओळखले जातात.) अशाच धर्म-संस्थापक महात्म्यामध्ये गणले जातात.इ. स.१४ व्या शतकाच्या उत्तरार्धात, १३७६ सालीं माघ-पोर्णीमेस रविवारी त्यांचा जन्म वारानसी नजीकच्या मांडूर या गांवी एका शुचिर्भूत चर्मकार कुळांत झाला. लहानपणापासूनच ईश्वरभक्तीची आणि मानव-प्रेमाचीओढ असलेला हा संत, जेव्हा जन्मास आला, तेव्हाचा काळ अंधश्रद्धा कर्मठ कर्मकांड, जातीय तथा वर्गीय उच्चनीचभाव यांनी बुजबुजलेला होता.अशा बिकट काळी स्वामी रामानंद यांचे कबीर, सुखानंद, अनंतानंद, सेना इत्यादी जे बारा शिष्य रंजल्या-गांजलेल्या पददलित जनतेला खऱ्या धर्माचा आणि ज्ञानाचा प्रकाश दाखविण्यासाठी पुढे आले.त्यांत संत रोहिदास आपल्या वैशिष्ट्याने चमकले आणि त्यांनी अखिल भारतीय कीर्ती आपल्या त्यागमय कर्तृत्वाने आणि प्रबोधनकारी वाणीने संपादन केली.

त्यांच्याविषयी समकालीनांनी तसेच उत्तरकालीनांनी जे उत्स्फूर्त प्रसंशोद्गार काढले आहेत, त्यावरुन त्यांची महत्ता सहज लक्षात येते.रोहिदासांचे गुरुबंधु संत कबीर म्हणतात—

**“संतनमेरविदास संत है”**,तर भक्तमालेचे लेखक नाभादासम्हणतात— **“संदेह-ग्रंथिखंडननिपुण बाणी विमल रैदासकी”**!संत मीराबाई ही रोहिदासांची शिष्या होती.ती कृतज्ञतेने म्हणते**“गुरु रैदास मिले मोही ... ज्यातिसे ज्योति मिली”**!शीख पंथ-संस्थापक गुरु नानक यांनीही मुक्तकंठाने संत रोहिदासांची प्रशंसा केली आहे आणि एकनाथ, तुकाराम इत्यादी महाराष्ट्रीय संतांनीदेखील त्यांना आदराने मानवंदना दिली आहे.भक्तिविजय-ग्रंथाचे लेखक महिपतीबुवा लिहितात—

**ऐका श्रोते हो सावकाश। परम वैष्णव रोहिदास।**
**हरिभजन रात्रंदिवस । प्रेमेभावे करीतसे।**

आणि संत दासगणू म्हणतात—

**जन्म झालासे चर्मकार-वंशी।**
**ज्ञान पाहतां, लाजवी वसिष्ठाशी॥**

फार काय सांगावें आधुनिक कालखंडात स्वातंत्र्यवीर सावरकरांनी संत रोहिदासांवर एक अप्रतिम गीत लिहिलें आहे.त्या गीतात सावरकर म्हणतात—

अनुक्रमणिका

**संत राहिदास।रोहिदास संत, जयाशी भेटे भगवंत॥ध्रु.॥**
**जातीचा हिंदू। हिंदू चांभार, मनाचा प्रेमळ अनिवार॥**
**नित्य कर्म त्याचे। त्याचे शिवण्याचे, वहाणा जोडहि जोड्यांचे।**
**शिवुनिया देई। देई दान भक्ता, वहाणा अनवाणी त्या त्या॥**

बुद्धिप्रामाण्यवादी, जातपात-उच्छेदक, दुष्टरुढीभंजक तात्याराव सावरकर, संत रोहिदासांची महती गातात यांत नवल ते कसलें?कारण असहिष्णु परकीय आक्रमणांनी जर्जर झालेल्या,अंधश्रद्धा-जातीभेद-चैतन्यहीन कर्मकांड यांनी दुर्बळ बनलेल्या, तत्कालीन समाजाला खरा धर्म केवळ वाणीनेच नव्हे तर करणीनेही शिकविणारे रोहिदास हे त्याकाळचे एक थोर समाजसुधारक होते.त्यांनी त्या काळच्या दंभाचार्यांवर आणि अमंगळ भेदाभेद माजविणाऱ्या क्षुद्रवादी कर्मठांवर कडाडून हल्ला चढविला होता. रोहिदास स्पष्टपणे सांगतात—

**जन्म-जात मत पूछिए, का जात अरु पात?**
**रविदास पूत सभ प्रभू के, कोऊ नहि जात कुजात॥**

(अहो!जन्म, जात विचारुं नका.कसली जात आणि कसली पात!आपण सर्वजण एकाच परमेश्वराची लेकरें आहोंत.म्हणूनच कोणतीही जात ‘कुजात’ नाही, वाईट नाही.)

**जात पात के फेर महि, उरझि रहइ सभ लोग ।**
**मानुषताको खात हइ, “रविदास” जात कर रोग ।**

(अहो, जातपातीच्या चक्रांत सारी माणसें अडकलेली आहेत.जातीयतेच्या रोगाने माणुसकी गिळंकृत केली आहे.)

**रविदास, ब्राह्मण मत पूजिए, जो होवै गुनहीन ।**
**पूजिही चरन चंडाल के जो होवै गुन-परवीन॥**

(जो ब्राह्मण गुणहीन आहे, त्याची पूजा करु नका.पण नीच चांडाल जातीत जन्मलेल्या सद्गुणप्रवीण चांडालाची पूजा करा!)

अशा या मानवतावादी, गुणपूजक, धर्मसुधारक, संत रोहिदासांचे उद्बोधक दर्शन डॉ. आंबेडकर-पुरस्कार विजेते, दलित-मित्र श्री.मा.आ. कारंडेगुरुजी यांनी, अभ्यासपूर्वक लिहिलेल्या“संत रोहिदासः चरित्र आणि वाङ्मय” या ग्रंथात घडविले आहे.

रोहिदासांची रागदारी पदें, आणि आशयघन दोहे यांचे भावार्थ त्यांनी सुबोध भाषेत दिले आहेत.केवळ रोहिदास-साहित्याचेच नव्हे, तर सेहेचाळीस महत्वाच्या संदर्भग्रंथांचेही परिशीलन करुन श्री. कारंडेगुरुजींनी समग्र रोहिदासदर्शन महाराष्ट्राला सादर केले आहे.

## अनुक्रमणिका

असा ग्रंथ‘महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा’ तर्फे प्रकाशित करतांना आम्हांस अत्यंत आनंद होत आहे.आम्ही श्री. मा. आ. कारंडे यांचे मनःपूर्वक आभार मानतो आणि या ग्रंथाची सुबक छपाई व सजावट उत्तमप्रकारे केल्याबद्दल शासकीय मुद्रणालयाचेही आम्ही आभारी आहोंत.

(सुमारे चारशेहून अधिक पानांच्या या ग्रंथात शुद्धलेखनाच्या दृष्टीने काही न्यूनता राहून गेली असेल तर त्याबद्दल वाचकांनी आम्हांस क्षमा करावी, अशी विनंतीही आम्ही करतो.)

दिनांक ३ ऑगस्ट १९९६.


सी-४०२, प्रियदर्शिनी हौसिंग सोसायटी,
भवानी शंकर मार्ग, दादर (प.),
मुंबई ४०० ०२८

**विद्याधर गोखले,**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.


## अनुक्रमणिका

# लेखकाचे मनोगत

भारत सरकारने“संत रोहिदास: चरित्र आणि वाङ्मय” हा ग्रंथ लिहिण्याचा प्रकल्प हाती घेण्याची मला संधी दिली;हे मी माझे भाग्य समजतो.त्याबद्धल मी भारत सरकार (उच्च शिक्षण सल्लागार मानव विकास, मंत्रालय, दिल्ली) यांचे हार्दिक आभार मानत आहे.

हा ग्रंथ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फ प्रसिद्ध केला.त्याबद्दल मंडळाचे माझी अध्यक्ष मा.डॉ.य.दि.फडके व कै.विद्याधर गोखले तसेच विद्यमान अध्यक्ष डॉ.मधुकर आष्टीकर आणि त्यांचे सहकारी सदस्य यांचे, व तज्ज्ञांच्या अभिप्रायानुसार आवश्यक त्या सुधारणा करण्याची संधी मिळाल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.मंडळाचे माजी सचिव कै.पंढरीनाथ पाटील व आजचे सचिव श्री.चंद्रकांत वडे यांचे आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो.

माझा संक्षिप्त परिचय लिहून दिल्याबद्दल ‘विधाता रोहिदास’ पाक्षिकाचे संपादक श्री. विजय साबळे यांचा, पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ व मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय नायगाव आणि दादर विभाग यांचेकडून मला संदर्भ ग्रंथ वाचावयास मिळाले, त्याबद्धल त्यांचा, तसेच मला ज्या ज्या संदर्भ ग्रंथांचे साह्य झाले, त्या त्या ग्रंथ लेखकांचा मी कृतज्ञ आहे.

माझे मित्र कै.डॉ.र.वि.हेरवाडकर, प्रा.डॉ.बापूजी सकपाळ, डॉ.बी.पी.शर्मा, डॉ.सुखदेवसिंग, डॉ.शिवधनी पाण्डे व कै.संतरामसिंग (गुरुजी) यांनी चर्चा करुन साह्य केले.भारताचे माजी उपपंतप्रधान कै.बाबू जगजीवनराम यांची सुकन्या मीराकुमार, बनारसचे श्री. अशोक यादव व त्यांच्या पूज्य मातोश्री, श्री. रामलखन व त्यांचे अनुयायी श्री. दासुराम यांचे सहकार्याबद्दल मी ऋणी आहे.

मा. मुख्य मंत्री श्री.मनोहर जोशी व श्री.प्रमोद नवलकर, श्री.बबनराव घोलप व श्री. दिलीप कांबळे यांनी शुभसंदेश दिल्याबद्धल मी त्यांचे हार्दिक आभार मानीत आहे.महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळाचे अध्यक्ष श्री.रमेश मेढेकर, आमदार श्री.बाबुराव माने, श्री.रवींद्र बागडे यांनी प्रकाशन समारंभाचे दृष्टीने जी आस्था दाखविली याबद्दल मी त्यांचे आभार मानणे कर्तव्य समजतो.

डॉ. जयराम चव्हाण, डॉ.रोहिदास वाघमारे, श्री. हरिश्चंद्र खेडेकर, श्री. रघुवीर धस, श्री.कृष्णाजी घोडके, श्री.रतनलाल सोनग्रा, कै.नामदेव मकरे, मुंबई दूरदर्शन, मुंबई आकाशवाणी व माझी पत्नी सौ.इंदिरा कारंडे इत्यादींनी मला उत्तेजन दिल्याबद्दल त्या सर्वांना धन्यवाद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयाचे संचालक, मा. प्र.शं.मोरे, उप संचालक मा.प्र.ल.पुरकर, माजी व्यवस्थापक श्री.अ. चॉ.सय्यद व विद्यमान व्यवस्थापक, श्री.प.ज.गोसावी आणि त्यांचे सहकारी इत्यादींनी प्रस्तुत प्रकाशनाचे मुद्रण काळजीपूर्वक सुबकपणे केले.चित्रकार श्री.आ.वि.जाधव यांनी सुंदर मुखपृष्ठ तयार करुन दिले.या सर्वाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो.

टॉनिकचे संपादक श्री. कृ.ल.मानकर तसेच ज्ञात अज्ञात व्यक्तींनी प्रत्यक्ष भेटून तर काही व्यक्तींनी पत्रांद्वारे आस्था दाखविली, ह्याबद्दल मी त्यांचा उपकारबद्ध आहे.

## अनुक्रमणिका

संशोधनासाठी मी उत्तर भारताचा दौरा काढून तसेच रात्रंदिवस अत्यंत परिश्रम घेऊन तब्बल तीन वर्षे नऊ महिन्यात हा ग्रंथ लिहिला.तसेच ग्रंथ छापण्यापूर्वी प्रुफे तपासण्याचेही मी बरेच कष्ट घेतले.तरी वाचकवृंद या ग्रंथाचे प्रसन्न मनाने स्वागत करतील ही अपेक्षा.

**मा. आ. कारंडे,**
लेखक

१, सुखशांतीनिवास
निर्मळनगर म्यु. शाळेजवळ,
खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१
दिनांक १० सप्टेंबर १९९६

## अनुक्रमणिका

# दुसऱ्या आवृतीच्या निमित्ताने

मी लिहिलेल्या ‘संत रोहिदास चरित्र आणि वाङ्मय’ या ग्रंथाच्या पहिल्या आवृतीचा प्रकाशन समारंभ पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे शुभहस्ते संपन्न झाला.त्याबद्दल मी त्यांचे हार्दिक आभार मानतो.

महाराष्ट्र शासनाने वाङ्मय स्पर्धेत माझ्या ग्रंथास ‘उत्तम संशोधनपर’ प्रौढ विभाग ‘उत्कृष्ठ वाङ्मय पुरस्कार’ व दहा हजार रुपयांचे पारितोषिक देऊन माझा भव्य सत्कार केला.तसेच या ग्रंथातून ‘संत रोहिदासांची शिकवण’ हा उतारा बालभारती इयत्ता पाचवीच्या पाठ्य पुस्तकात जून १९९९ पासून प्रसिद्ध केला व ग्रंथाची किंमत रुपये १९० ऐवजी फक्त शंभर रुपये ठेवली.त्याबद्दल मी शासनाचा ऋणी आहे.

ग्रंथाच्या सवलतीच्या किंमतीबद्दल पत्रक काढून वर्तमानपत्रात प्रसिद्धी दिल्याबद्दल विजयराव साबळे, महाप्रमुख राष्ट्रीय चर्मकार महासंघ यांचे तसेच दैनिक नवाकाळमध्ये संत रोहिदास ग्रंथाबद्दल प्रसिद्धी दिली.त्याबद्दल यशवंत रामकृष्ण यांचेही आभार मानणे की माझे कर्तव्य समजतो.

माझ्या ग्रंथास ‘संजीवन ग्रंथोत्तेजक पुरस्कार देणाऱ्या नांदेडच्या आविष्कार साहित्य मंडळाचे, मला संत रोहिदास पुरस्कार देऊन सत्कार करणाऱ्या महाराष्ट्रीय चर्मकार संघाचे, ग्रंथावर उत्तम अग्रलेख लिहणाऱ्या दैनिक नवशक्ति संपादकांचे, उत्कृष्ठ अभिप्राय लिहिणाऱ्या नांदेड सायन्स कॉलेजचे प्रा.डॉ.विलास कुमठेकरांचे व त्यास प्रसिद्धी देणाऱ्या ‘श्रमिक एकजूट’ च्या संपादकाचे हार्दिक आभार.

मुंबई दूरदर्शन व ज्ञानदीपचे माजी निर्माते आकाशानंद यांनी या ग्रंथावर माझ्या मुलाखती घेऊन प्रक्षेपित केल्या.त्याबद्दल त्यांचे, तसेच आकाशवाणीचेही आभार.

साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य य.रं.बोराडे व सचिव उ.बा.सुर्यवंशी आणि त्यांचे सहकारी यांच्या सहकार्याबद्दल सर्वांचे आभार.तसेच मुद्रणालयाचे संचालक श्री.प्र.शं.मोरे, व्यवस्थापक श्री.उत्तम सोनवणे व त्यांचे सहकारी यांनी द्वितीय आवृत्तीचे मुद्रण काळजीपूर्वक केले.त्याबद्दल आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो.मुखपृष्ठावरील फोटोबाबत चित्रकाराचेहि आभार मानतो.

ज्यांनी ज्यांनी मला उत्तेजन दिले त्या सर्वांचे तसेच माझी पत्नी सौ. इंदिरा कारंडे, माझे सुपुत्र चि.सुभाष, चि.जवाहर व चि.अशोक या सर्वांनी महा सहकार्य केले, त्याबद्दल सर्वांना धन्यवाद.

या दुसऱ्या सुधारित आवृत्तीमध्ये मी योग्य त्या सुधारणा केल्यामुळे पहिल्या आवृत्ती प्रमाणेच वाचक याही आवृत्तीचे प्रेमाने स्वागत करतील अशी आशा मी व्यक्त करतो.

**मा. आ. कारंडे**
लेखक

सुखशांती ओंकार स. गृ. नि. संस्था,
निर्मलनगर, म्यु. शाळेजवळ, खेरवाडी,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.
दिनांक / / २००२.

अनुक्रमणिका



**संत शिरोमणी रोहिदास**

(इ. स. १३७६ ते १५२७)

## अनुक्रमणिका



दिल्ली-काठियावाडी सराय येथील संत रोहिदासांच्या
मूर्तिसोबत लेखक श्री. मा. आ. कारंडे



दिल्ली-करोलबाग येथील संत रोहिदास मूर्तिस वंदन करताना
लेखक श्री. मा. आ. कारंडे

## अनुक्रमणिका



रोहिदासांचा जन्म झाल्यावर सुवासिनी आनंदाने गाणी गात आहेत (पृष्ठ १८)



भक्त रोहिदासांना देण्यासाठी गंगामाई ब्राह्मणास कंकण देत असताना (पृष्ठ ६०)

# अनुक्रमणिका



कुंडात प्रकट झालेल्या गंगामाईकडून संत रोहिदास कंकण घेऊन ते राजास देत असताना (पृष्ठ ६१)



काशी विद्यापीठाचे हिंदीचे प्रा. डॉ. शुकदेवसिंग यांची मुलाखत घेताना लेखक श्री. मा. आ. कारंडे(पृष्ठ ८९)

## अनुक्रमणिका



चितोडगडावरील संत रोहिदास समाधीवरील पादुका (पृष्ठ ८९)

# अनुक्रमणिका

# भाग १ ला
# संत रोहिदास चरित्र
# अ विभाग

अनुक्रमणिका

# १.माहात्म्य

**श्री.गणेश वंदन**

**विघ्नहर्ता मंगलकर्ता, रिद्धि सिद्धि सदन गणेश ।**
**ज्याचे नाव स्मरण करता, विनाश करी सकल क्लेश॥**

सरस्वती वंदन

**जयती जयती जय जयती जय, वीणा पानि भवानी ।**[प्रयागदत्त शर्मा, रविदास रामायण, तृ.सं.सन १९८०, पृष्ठ ४-५.]
**ज्ञात बुद्धि दायिनी, जगदंबे सुख खाणी॥**

**गुरू वंदन**

**हरि कृपेशिवाय गुरू । गुरुशिवाय ज्ञान ।**[प्रयागदत्त शर्मा, रविदास रामायण, तृ.सं.सन १९८०, पृष्ठ ४-५.]
**ज्ञानाशिवाय मान । होत नाही कल्याण॥**

**गुरू माहात्म्य**

**जो गुरुची करतो सेवा। त्यास मिळतो मुक्तिचा मेवा॥**[प्रयागदत्त शर्मा, रविदास रामायण, तृ.सं.सन १९८०, पृष्ठ ४-५.]

वेद, पुराण, शास्त्र, श्रुति, ज्ञानी यांनी गुरू माहात्म्य वर्णन केलेले आहे.गुरू साक्षात परमेश्वर आहे.गुरू शिष्यांचे कल्याण करतो.गुरूची कृपा होते तेव्हा अज्ञान अंधकार नाहीसा होऊन शिष्यामध्ये ज्ञान ज्योती प्रगट होते.ज्ञान ज्योतिचा ज्ञान प्रकाश होतो.गुरुभक्ती ही हरिभक्तिप्रमाणे आहे.गुरुपदेश हृदयात बाळगून तसे वागल्यास दुःख नाहीसे होऊन सुख मिळते.

गुरू केल्यास मनुष्यास सन्मार्ग मिळतो.म्हणून गुरुवचनास मंत्राप्रमाणे मान दिला पाहिजे.गुरू न केल्यास जीवनमार्गात अनेक अडचणी येतात.दुःख प्राप्त होते.म्हणून गुरू अवश्य करावा.त्यास शरण जावे.म्हणजे दुःख भोगावे लागणार नाही.गुरुची निंदा करणाऱ्यास सुयश लाभत नसते.

मन स्वच्छ करण्यासाठी, तसेच परमेश्वराची जवळीक साधण्यासाठी प्रभूनाम हेच एक साधन आहे.हे साधन सदगुरुपासूनच मिळते.कारण सदगुरू हे परमेश्वराचे प्रतीक आहेत.सदगुरू हे त्या दैवी शक्तिबरोबर गाठ घालून देऊ शकतात.सदगुरू शिष्यांना आध्यात्मिक ज्ञान देतात.मार्गदर्शन करतात.

**संत माहात्म्यः**

अनुक्रमणिका

संत चरणाचे दर्शन घेतल्यास पाप, शाप व ताप नाहीसे होतात.संतांना जगात प्रभुत्व आहे.वेद पुराणामध्ये त्यांचे अनेक प्रकारे महत्त्व वर्णन केलेले आहे.संत परमार्थासाठी आपला देह झिजवितो.जगाच्या कल्याणासाठी नेहमी प्रयत्न करतो.संत अज्ञान, दुखः इत्यादी नाहीसे करून नेहमी सत्त्याने वागतो.परमेश्वराबद्दल प्रेम व भक्ती वाढविण्यासाठी संताचा सहवास करणे फार आवश्यक आहे.सदाचारी पवित्र मनुष्याच्या संगतिवरच आध्यात्मिक क्षेत्रातील प्रगती अवलंबून असते.अशा संतापैकी संत रोहिदास हे सर्वश्रेष्ठ संत होय.त्यांचा महिमा काय वर्णन करावा?

**काशीपुरीचे माहात्म्यः**

पुण्यतीर्थ काशीमध्ये श्री.विश्वनाथ हे प्राचीन शिवलिंग स्थापन झालेले आहे.अशा पुण्यतीर्थामध्ये जो कोणी धर्म करीत राहील, त्यास संसारातून मुक्ती मिळते.काशीत पापी माणसाला कोणत्याही जागी व कसाही मृत्यू आल्यास त्याला मोक्षप्राप्ती होते.मग धर्मात्म्याबद्दल सांगावयासच नको.परंतु काशीमध्ये जो पापकर्म करील, त्यास भैरवयातना भोगावी लागते अशी समजूत आहे.

गंगा, यमुना व सरस्वती ह्या निर्मळ व पवित्र नद्यांचा जेथे त्रिवेणी संगम झाला, ते प्रयाग तीर्थक्षेत्र तर साक्षात स्वर्गच!जगात काशीइतके महत्वाचे दुसरे तीर्थक्षेत्र नाही.येथे ऋषी, ब्राह्मण इत्यादी सर्व पूजा करतात.

एक अशी कथा आहे की, एके काळी काशीपुरीत याज्ञवल्क्य, पिप्पलदासा, भरद्वाज, सनकसनन्दन, लोमीश, राई, मुचकंद, पराशर, विश्वामित्र, वशिष्ट, सुध्यानी, अत्री, वाल्मिकी इत्यादी एकापेक्षा एक श्रेष्ठ ऋषी-मुनी ध्यान लावून बसले असता तेथे नारदमुनी आले.तेव्हा सर्व ऋषी-मुनिंनी त्यांचा सत्कार केला.तेव्हा नारद मुनिनी प्रसन्न होऊन वीणावर विविध राग आळवीत गायन केले.तेव्हा सर्व ऋषिंनी मोठ्या आनंदाने हात जोडून त्यांना विनंती केली की"आपण वीणावादन गायनात सर्वश्रेष्ठ आहात.आपण आम्हां सर्वांना उपदेश करावा."

तेव्हा नारद म्हणाले, "काशीसमान दुसरे तीर्थक्षेत्र नाही.तुम्ही सर्व ऋषी-मुनिंनी काशीमध्ये राहून विद्या शिकवावी.घरांघरांतून वेदाचा प्रचार करावा.ह्या काशीपुरित विश्वनाथ-सदाशिव-शिव-शंकराचा रात्रंदिवस निवास असतो.काशी माहात्म्यास तोड नाही.अंत नाही.

ह्या काशीपुरीला वाराणसी-बनारसही म्हणतात.परमेश्वराचा प्राण किंवा त्याच्या गळ्यातील ताईत जो संतश्रेष्ठ रोहिदास, त्यांचा जन्मही ह्या पवित्र मांडूर काशीपुरीतच झाला.

* * *

अनुक्रमणिका

# २.पूर्व परंपरा

**तत्कालिन परिस्थिती:**

भारताच्या दृष्टिने चौदावे व पंधरावे शतक हे परिवर्तन व सांस्कृतीक क्रांतिच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले आहे.सातव्या आठव्या शतकानंतर संपूर्ण भारत देश छोट्या छोट्या संस्थानांनी व्यापला होता.ही छोटी छोटी राज्ये दुराभिमानाने व खोट्या पराक्रमाच्या प्रदर्शनाने आपसात संघर्ष करीत.तर कधी राजकन्या मिळविण्यासाठी लढाया करीत.कोणताही राजा जनहिताकडे लक्ष देत नव्हता.

अशा परिस्थितीत परकियांची आक्रमणे भारतावर होऊ लागली.ह्या आक्रमणास प्रतिबंध करण्याचे सामर्थ्य कोणत्याही राजामध्ये नव्हते.भारतीय समाज पारंपारिक सामाजिक अन्याय व आपसातील मतभेद यामुळे मेताकुटीस आला होता.विविध राजांचा आपसातील संघर्ष आणि परकियांच्या अत्याचारामध्ये संपूर्ण समाजाची स्थिती चक्कीच्या दोन जात्यामधील परिस्थितिप्रमाणे भरडून निघत होती.भारत भूमिवर मुस्लीम आक्रमणे सातव्या आठव्या शतकात सुरू झाली.दहाव्या शतकापासून ही आक्रमणे जोरात होऊ लागली.सन १२०६ ते १५३६ पर्यंत गुलाम, खिलजी, तुघलक, सय्यद तसेच लोदी वंशाने उत्तर भारत काबीज केला.

हिंदी साहित्याच्या इतिहासामध्ये[डॉ.वी.पी.शर्मा, संत गुरू रविदास, सन १९७२, पृष्ठ १.]संवत १३७५ ते १७०० (इ.स.१३१८ ते १६४३) पर्यंतचा काळ हा भक्तिकाळ म्हणून प्रसिद्ध आहे.सुमारे तीनशे वर्षाचा दीर्घ काळ भारतवासियांच्या दृष्टिने निराशा आणि संकटाने भरलेला आहे.ते मुसलमान व हिंदूधर्म तत्त्वातील संघर्षाचे युग होते.मुस्लीम धर्माचा प्रचार तलवारीच्या जोरावर केला जात होता.भारतीयांची मंदिरे खोलून तसेच घोषणा देऊन धर्मग्रंथाचा विध्वंस केला जात होता.भारतीय.राजे-महाराजांची शक्ती, आपसातील वैर आणि बेकीमुळे नष्ट झाली.परदेशी आक्रमणाबरोबर सामना करण्याची त्यांची ताकद राहिली नव्हती.त्यावेळचे सत्ताधारी मोठे दुराचारी व अत्त्याचारी होते.भारतीयांवर अत्त्याचार करणे आणि बेबंदशाही माजविणे हे त्यांचे महत्त्वाचे कारस्थान होते.भारतीय संस्कृतिची स्मारके-धर्मस्थानांचा नाश करणे, भारतीय सुनांमुलींचे अपहरण करणे, त्यांची संपत्ती लुटणे, झिजिया कर लादणे, भारतीयांना जबरदस्तीने परधर्मी बनविणे इत्यादी ह्या काळातील साधारण घटना होत.भारताच्या मूळ रहिवाशांना सरकारी नोकरीत घेतले जात नव्हते.तसेच व्यापार इत्यादी करण्यासाठी सुखसोयी मिळत नव्हत्या.अशाप्रकारे भारतीय जनतेचे राहणीमान खालावले होते.सरकारी करांचा जास्तीत जास्त भार भारतीयांवरच पडत होता.सर्व प्रथम फिरोज तुघलकने जिझिया कर सुरु केला होता.त्याने बरीचशी धर्मस्थाने विध्वंस केली आणि आपल्या महालासमोर कित्येक भारतीयांना अग्निमध्ये जिवंत जाळावयास लावले.त्याने तर इस्लाम धर्म प्रचारासाठी एक नियम केला होता की, जो भारतीय मूळ रहिवासी मुसलमान बनेल त्याला सरकारी नोकरी दिली जाईल.

सिकंदर लोदीने मंदिरे तोडली.मंदिरातील मूर्ती समुद्रात फेकल्या.एवढेच नव्हे तर भारतीय रहिवाशांना गंगा व यमुना नदीत स्नान करण्यासही मनाई केली होती.तैमूरलंगाने सन १३७८ मध्ये भारतावर आक्रमण करून भारतीय रहिवाशांवर जबरदस्त जुलूम केला आणि दिल्लीच्या आसपास हजारो भारतीयांना ठार केले.याशिवाय भारतातून परत जातेवेळी तैमूरच्या प्रत्येक शिपायाने शंभर शंभर बायका, पुरुष व मुलांना गुलाम बनवून आपल्याबरोबर नेले.

अनुक्रमणिका

भारतीय राजकारणाचा व सामाजिक परंपरेचा पराजय झाल्यामुळे देशात मुस्लीम राज्याची स्थापना झाली, आणि बाराव्या शतकात कुतुबुद्दीनने भारतात मुस्लीम साम्राज्याची स्थापना केली.परकीय मुसलमान सुलतानांनी भीषण सामुदायिक नरसंहार केला.धनाची लूट व स्त्रियांचे अपहरण केले आणि देवस्थानांचा विध्वंस केला.

मुस्लीम आक्रमणापूर्वी भारत भूमिवर यवन, शक, कुशाण तसेच हुणांची आक्रमणे झाली होती.परंतु त्यांचा भारतवासीयांवर काही प्रभाव पडला नव्हता, कारण हिंदू धर्माची उदारता व उदात्तता.

भारतीय समाजाची परिस्थिती फारच निराशाजनक झाली होती.धर्माच्या नावावर अनेक पापे होत होती.ढोंगी, फकीर आणि साधू मनाला वाटेल तसे जनतेला लुटत आणि भ्रष्ट करीत होते.उच्चनीच जातीपातीच्या भेदभावाने भयंकर स्वरुप धारण केले होते.उच्च जातीचे लोक खालच्या जातीच्या लोकांना मोठ्या तिरस्कार दृष्टीने पाहात होते.त्यांचे स्पृश्य-अस्पृश्यतेचे सोवळे ओवळे फारच वाढले होते.

शुद्र किंवा अस्पृश्य यांची परिस्थिती तर फारच कठीण झाली होती.देशातील ब्राह्मणांकडून त्यांना अपमानकारक हीन वागणूक मिळे.तसेच परकियांच्या आक्रमणाबरोबरही सामना करावा लागत असे.अशा प्रकारे अस्पृश्यांना दुहेरी यातना सहन कराव्या लागत होत्या.

**पुनर्व्यवस्थापनेची आवश्यकताः**

मुसलमानांच्या आगमनामुळे नवीन सामाजिक परिस्थती निर्माण झाली होती.देवदेवतांच्या मूर्तिंचा विध्वंस एकसारखा होऊ लागला.तसेच ब्राह्मण आणि पुरोहितांची सामुदायिक हत्त्या व अपमानामुळे मूर्तिमधील देवांच्या शक्तिचे अस्तित्व तसेच ब्राह्मणांचा परंपरागत उच्चपणा यासंबंधी प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.त्यामुळे परंपरागत समाज पुनर्स्थापन तसेच सामाजिक क्रांती करण्याची आवश्यकता निर्माण झाली.अशा अवस्थेत सामान्य जनता एका बाजूस भूतप्रेत, पूजा, शाप, ताप तसेच अंधविश्वासाने वागू लागली.थोडक्यात भारतीय हिंदू जनतेची परिस्थिती निराशाजनक व चिंताजनक होती.तेव्हा विचारवंत सुव्यवस्थित परिवर्तनाचा मार्ग शोधण्यात पुढाकार घेऊ लागला.अशावेळी भारतात अनेक संत माहात्म्यांनी जन्म घेऊन भक्तिरसगंगा सुरू केली आणि संतप्त हिंदू समाजाच्या दुःख संतापास शांत केले.कारण दीन हीन दुःखी हिंदू समाजासाठी परमेश्वरास शरण जाण्याशिवाय गत्यंतर उरले नव्हते.अशा काळात धार्मिक क्रांती झाली म्हणावयास हरकत नाही.कारण रामानुजम यांनी शुद्रास विशिष्ट दिवशी व विशिष्ट मंदिरात जाण्याची परवानगी दिली होती.

**स्वामी रामानंद**

अशावेळी प्रभावशाली समाजसुधारक व रोहिदासांचे गुरू स्वामी रामानंद यांचा जन्म प्रयागमध्ये गौड ब्राह्मण परिवारात संवत १३५६ (सन १२९९) मध्ये माघ कृष्ण सप्तमीस झाला.त्यांच्या मातेचे नाव (अगस्त्य संहितेनुसार) सुशीलादेवी आणि वडिलाचे नाव पुण्यसदन होते.स्वामी राघवानंद हे रामानंदाचे दीक्षा गुरू होते.राघवानंद रामानुज परंपरेतील चौथे आचार्य होते.त्यांचे परंपरेत श्री.नारायणाची भक्ती मान्य होती.रामानंदाचा दृष्टिकोन आपल्या गुरुपेक्षा अधिक उदार होता.रामानंदास रामानुज परंपरेतील पांचवे गुरू समजले जातात.रामानंद स्वभावाने सौम्य, दयासागर, योगी, विद्वान आणि परोपकारी साधू होते.उत्तर

अनुक्रमणिका

भारतात रामानंदाने आध्यात्म रामायणास आपल्या संप्रदायाचा ग्रंथ मानून रामभक्तिचा प्रचार केला.ह्या रामभक्तिमुळेच रामानंदानी समाजाच्या सगळ्या जाती आपल्याशा केल्या.रामानंद त्यावेळी एक मोठे क्रांतीकारक समाजसुधारक, मार्गदर्शक आध्यात्मिक नेते होते.त्यांनी युग परिस्थितिचा अभ्यास करण्यासाठी भारतभरचे विस्तृत भ्रमण केले होते.त्यांनी आपल्या विचाराला कालमानानुसार स्वरूप दिले होते.

असे सांगितले जाते की, रामानंद सबंध भारतवर्षाची यात्रा करून आपल्या मठामध्ये परत आले.तेव्हा त्यांच्या मठवासी शिष्यांनी आपल्याबरोबर पंक्तिमध्ये बसावयास नाराजी व्यक्त केली होती की, रामानंदाने भारत भ्रमणामध्ये खाण्यापिण्याच्या नियमांचे पालन केले नसावे.त्यांचे गुरू राघवानंदांनासुद्धा ही शंका साधार असावी असे वाटले होते.हा अपमान सहन करू न शकल्यामुळे रामानंदांनी एका स्वतंत्र संप्रदायाची स्थापना केली.

**‘जाति पाँति पूछे नहि कोई,**
**हरि को भजै सो हरि का होई ।’**

उत्तर भारतात सर्व प्रथम रामानंद यांनी जातिबंधने ढिली केली आणि सर्व जातितील पुरुषांना एवढेच नव्हे तर स्त्रियांनाही शिष्यत्व दिले.स्वामी रामानंदांनी जातिबंधने शिथिल केल्यामुळे हीन जातितील व्यक्तिनी यांच्या भक्ती संप्रदायाची दीक्षा घेतली.त्यांच्यापैकी काही शिष्य-संत कबीर कोष्टी होते.रविदास उर्फ रोहिदास हे चांभार जातीचे होते.संत सेना न्हावी जातीचे होते.तर धन्ना जाट होते.पीपा क्षत्रिय राजपूत होते.ह्या दृष्टिकोनाने प्रेरित होऊन संत कबीरांनी म्हटले होते की-

**जाति न पूछो संत की, बुझि लेवु तुम ज्ञान ।**
**मोल करो तलवार का, पडी रहन दो म्यान॥**

रामानंदाने अशा प्रकारची उदार नीती स्वीकारली नसती तर विदेशी शासकाच्या हिंदू विरोधी नीतिमुळे हिंदु धर्मियांचे आणखी नुकसान झाले असते.भविष्य पुराणात म्हटल्याप्रमाणे विदेशी शासकांच्या दबाव आणि लालच या दोन्ही कारणांमुळे अवधमध्ये बरेचसे परधर्मी बनले.त्यापैकी अनेक मूळ हिंदूना रामानंदानी पुन्हा हिंदु बनविले.एवढेच नव्हे तर गळ्यात माळा घालून रामभक्त बनविले.रामानंदाने शास्त्रार्थामध्ये अनेक मुल्ला, सिद्ध व योग्यांचा पराभव केला.स्वामी रामानंदाचा भक्तिविषयक दृष्टिकोन एवढा व्यापक होता की, त्यांच्यामुळे निर्गुण आणि सगुण ह्या दोन्ही पंथाचे संमेलन होऊ शकत होते.ह्यामुळेच त्यांच्या निर्गुण परंपरेत कबीर आणि सगुण परंपरेत तुळशीदासासारखे महान कवी आणि संतांचा अंतर्भाव झाला.संत रोहिदास मध्यम मार्गाचे अनुसरण करणारे होते.

**महन्ती आखाड्याची स्थापना:**

हिंदु धर्म रक्षणासाठी स्वामी रामानंदांनी भारतात निरनिराळ्या ठिकाणी महन्ती आखाड्यांची स्थापना केली.ह्या आखाड्यांचे मुख्य कार्य परदेशी शासकांच्या आक्रमणातून हिंदु धर्म व हिंदु मंदिरांचे रक्षण करणे, रामभक्तिचा प्रचार करणे आणि कुंभपर्वासारख्या मोठमोठ्या पर्वाचे प्रसंगी हिंदु धर्माचा प्रचार करणे असे होते.या आखाड्यात राहणाऱ्या साधुसंन्याशांचे ध्येय –‘निस्पृह उपासना आणि समाजसेवा करणे’ हे

होते.अशा आखाड्यात सैनिकी शिक्षणसुद्धा दिले जात होते.हे सैनिक तीन भागात विभागले होते.(१) निर्वाणी अनी.(२) दिगंबर अनी, (३) निर्मोही अनी.अशा प्रकारच्या एका आखाड्याची स्थापना सर्वप्रथम शुजाउदौलाचेवेळी कोटाबुंदीचे साधु पुरुषोत्तमदासने स्वामी रामानंदाच्या प्रेरणेने अयोध्यामध्ये केली होती.

**भक्तिचा अधिकारः**

स्वामी रामानंदांनी समाजातील अस्पृश्यतेला तसेच जातीभेदांना मुळातच उखाडण्याचा प्रयत्न केला.यांचे विचारसरणीप्रमाणे कोणी ब्राह्मण असो की शूद्र, कोष्टी, जाट, न्हावी, क्षत्रिय अथवा चांभार असो, रामभक्तिचा अधिकारी होऊ शकतो.कुळ, वंश, शक्ती अगर धनाची येथे पर्वा नाही.येथे फक्त भगवंताचे चरणी विशुद्ध भावाने आत्मसमर्पण करणारा पाहिजे.भक्तिच्या क्षेत्रात सर्वांचा सारखा अधिकार, परमेश्वरास शरण आलेल्या व्यक्तिस कुळ आणि जातिचे कसले बंधन?भक्ती कोणा एका जातिची अथवा वर्णाची मक्तेदारी नाही.भक्तिचे मंदिर सर्वांसाठी समानतेने खुले आहे.भक्तिमंदिरात प्रवेश करण्यापूर्वी मानवाला आपल्या अंतःकरणात श्रद्धा आणि विश्वासाची ज्योत पेटवावी लागते.

**रामानंदाचे शिष्यः**

धर्मप्रसारासाठी त्यांनी सर्वांना समजावी म्हणून संस्कृत ऐवजी हिंदी भाषा उपयोगात आणली.स्वामी रामानंदांच्या भाषणातून व उपदेशातून प्रेरणा घेऊन मध्ययुगात हरिभक्तांचे तसेच साधु-महात्म्यांचे एक दल तयार झाले होते.ते दल पददलित जातिंना समानतेने भक्तिचा अधिकारी मानत होते.त्यामुळे रामानंदी संप्रदायाचे बहुतेक सर्व शिष्य खालच्या हीन मानलेल्या जातितीलच होते.त्यामध्ये स्पर्शास्पर्श, खाणेपिणे, जातपात किंवा स्त्री-पुरुष यामध्ये कोणताच भेदभाव नव्हता.जन्म, वंश, लिंग व जात यापैकी शिष्यत्व पत्करण्यास काहीच आड येत नसे.स्वामी रामानंदांच्या शिष्यांची संख्या पाचशेहून अधिक होती.त्यांचे प्रमुख बारा शिष्य खालीलप्रमाणे होते.[डॉ.वी.पी.शर्मा संत गुरू रविदास, सन १९७२, पृष्ठ ४३.]

**अनंतानंद कबीर सुखा, सुरसुरा पद्मावती नरहरि ।**
**पीपा भावानन्द रैदास धनी, सेन सुरसुरी की धरहरि॥**
**और शिष्य प्रशिष्य एक से एक उजागर ।**
**विश्वमंगल आधार सर्वानंद दशधा के आगर ।**
**बहुत काल वपु धारि कै प्रगत जनन को पार कियो ।**
**श्री रामानंद रघुनाथ ज्यो दुतिय सेतु जग तरन कियो ।**
**(भक्तमाल)**

अर्थात अनन्तानंद, कबीर, सुखानन्द, सुरसुरानंद सुरसुरी, पद्मावती, नरहर्यानन्द, पीपा, भवानंद, रैदास (रोहिदास), धन्ना आणि सेन.

**नवविधाभक्तिः**

अनुक्रमणिका

स्वामी रामानंद हे 'राम हा विष्णुचा अवतार आहे.'ह्या धर्मतत्वाचे होते.त्यांनी 'वैष्णव मतब्जभास्कर' व 'श्री.रामार्चन पद्धती' नावाचे दोन ग्रंथ लिहिले.स्वामी रामानंदांनी भगवानाचे श्रवण, कीर्तन, संस्मरण, पदस्थिती (चरणसेवा), समर्पण, वंदन, दास्य, सख्य तसेच आत्मसमर्पण यांना 'नवविधाभक्ती' म्हटले आहे.भगवत प्राप्तिचे साधन एकमात्र गुरू आहे.भगवानाला जाणण्यासाठी सर्व शंकांचे निरसन करणारे सदा सदाचारी असे श्रेष्ठ गुरुचा आश्रय घेतला पाहिजे.'अगस्त्य संहिता' मध्ये रोहिदासांचे नाव 'रमादास' दिले आहे.बारा शिष्यांपैकी अनंतानंदाला ब्रह्माचा, सुरसुरानंदाला नारदाचा, सुखानंदास सनत्कुमारचा, नरहर्यानंदास कपिलदेवाचा, पिपाला मनुचा, कबीराला प्रल्हादाचा, भवानंदास जनकाचा, सेनला भीष्माचा,धनाला बळीचा, गालवानंदाला शुकदेवाचा, रमादासला (रोहिदासाला) यमराजाचा (अर्थात मृत्युंजय) आणि पद्मावतीला लक्ष्मीचा अवतार म्हटले आहे.

**स्वामी रामानंदाचे निधनः**

स्वामी रामानंदांनी आपल्या स्वतंत्र संप्रदायाची स्थापना काशीत पंचगंगा घाटावर एक मठ बनवून केली होती.परंतु ते स्वतः येथील एका गुंफेत राहात होते.सकाळ-संध्याकाळी याच गुंफेतून बाहेर येऊन आपल्या शिष्यांना व भक्तजनांना ते दर्शन देत आणि प्रवचन करीत होते.असे सांगतात की, त्यांच्या चरणपादुका अजूनही ह्या गुंफेत आहेत.येथेच त्यांचा मृत्यू वयाच्या १११ व्या वर्षी सन १४१० मध्ये वैशाख शुक्ल त्रयोदशीस झाला.

स्वामी रामानंदांनी 'भारत दिग्विजय' मध्ये लिहिले आहे की, आपला मृत्यु जवळ आल्याचे लक्षात घेऊन धन्ना, कबीर, रोहिदास आणि सेन यांनी काशीत राहून, सुरसुरानंदाने पंजाब, भवानंदाने दक्षिणेत, नरहर्यानंदने उत्कलमध्ये, गालवानंदने काश्मिरात, पीपा आणि योगनंदाने गुर्जर देशात (गुजरात) राहून समाजसेवा करण्याचा, धर्म आणि निर्गुण भक्तीचा प्रचार करण्याचा आदेश दिला होता.

रामानंदांचे हातून गतकाळातील जुनाट धर्म कल्पना नाहीशा करण्याच्यादृष्टिने विशेष कार्य झाले नाही.परंतु त्यांचे शिष्य संत रोहिदास यांनी या बाबतीत अलौकिक कार्य केले.

* * *

अनुक्रमणिका

# ३.कुल वृत्तांत

उत्तर भारतात मध्यमयुगीन संतामध्ये रैदास-रविदास नावाने संत शिरोमणी व समाजसुधारक रोहिदास होऊन गेले.हे संत मीराबाईचे गुरू व भक्त कबीराचे गुरुबंधू होते.ज्यांनी आपल्या चर्मकार तसेच इतर जातीबांधवाचाही उद्धार केला.अशा समाज-सुधारक व महामानव संत रोहिदासांचा कुलवृत्तांत खालीलप्रमाणे—

**संत रोहिदासांचा वंश:**

संत राहिदासांचा जन्म 'रविदास दर्शन[डॉ.बी.पी.शर्मा, रविदास दर्शन, प्र.सं.,सन १९७२, पृष्ठ ६४.]''संत गुरु-रविदास[डॉ.बी.पी.शर्मा, संत गुरू रविदास, प्र.सं.१९७२, पृष्ठ ८.]'व'श्री.संत रोहिदास[सत्यदेव शिंदे, श्री.संत रोहिदास, प्र.आ.सन १९७२, पृष्ठ २.]'मध्ये चंद्रवंशी (चँवर) चांभार जातीत झाल्याचा उल्लेख आहे.तर 'रविदास (रैदास) रामायण[पं.गिरजाशंकर मिश्र, रविदास रामायण, प्र.सं.सन १९८१, पृष्ठ १८.]'मध्ये संत रोहिदासांचा जन्म 'यादव' वंशात झाल्याचा उल्लेख आहे.परंतु संत रोहिदासांचा जन्म सूर्यवंशाच्या द्विज कुळात झाल्याची कथा 'श्री.चँवर पुराण तथा भक्त चेता[माखनदास मु.खुडहुरिया, चँवर पुराण तथा भक्त चेता, पंचमवार पृष्ठ १.]'मध्ये आहे.ह्या महावंशाला लोक 'चांभार' नावाने ओळखतात.वास्तविक चांभार हा सुर्यकुळाचा चँवर अर्थात चर्मवंशच आहे.त्यांचे वर्णन महाभारत अनुशासन पर्वात खालीलप्रमाणे आहे:—

**मेकला द्राविड़ा लाटा, पौंड्रा : कोनव शिरास्तस्था ।**
**सौडिका दरदा दर्वा चँवरा शर्वर बर्वराः॥**
**किराताय वनस्वैव नाश्ताः क्षत्रिय जातयः ।**
**व्रषलत्वं मनु प्राप्तं ब्रह्मणाम दर्शनात॥**

**भावार्थ:**—मेकल, द्रविड, लाट, पौंड्रक, कोनव, शिर, दर्व, चँवर, शर्वर, बर्र, किरात आणि यवन ह्या सर्व क्षत्रिय जाती ब्राह्मणास विसरल्यामुळे पतित झाल्या आहेत.

संत रोहिदासांसारखे महात्मे, ब्रह्मज्ञानी चर्मकारी जातित जन्मले.तेव्हापासून पतित अवस्था दूर झाली असे समजले पाहिजे.कारण महात्मा रोहिदास सूर्यकुल चँवरवंशी आहेत.ते सूर्यवंशाचे भूषण आहेत.संत रोहिदासांच्या कुलवृत्तांताची सुरस कथा चँवरा पुराणात विस्तृतपणे दिली आहे.तिचा सारांश खालीलप्रमाणे—

**चँवरवंशीराजा सूर्यसेन:**

चँवरसेन हा चँवरवंशाचा पहिला चक्रवर्ती राजा झाला.त्याला कमलसेन, ब्रह्मासेन, रतिपेस इ.अनेक पुत्र झाले.ह्या वंशात भद्रसेन नावाचा एक मोठा प्रभावशाली राजा झाला.त्याच्या मोठ्या मुलाचे नाव श्रीयसेन व छोट्या मुलाचे नाव 'स्रालस्य' होते.ह्या दोघांनी वैदिक सभ्यता व शिक्षणाचा प्रचार केला.चँवर वंशात महाप्रतापी तेजस्वी असा 'चामुण्डराय' नावाचा शेवटचा राजा होऊन गेला.तपश्चर्या व तेजाच्या सामर्थ्याने तो हरिभक्त झाला.

अनुक्रमणिका

**योगीराजाचे भविष्य:**

राजा चामुण्डरायच्या वडिलांचे नाव सूर्यसेन होते.त्याच्या राजधानीचे नाव चँवरावती.एके दिवशी राजा सूर्यसेन परमेश्वराच्या स्तुतिमध्ये ध्यानस्थ बसले होते.एवढ्यात एक वृद्ध योगीराज येऊन राजाजवळ बसले.राजा सूर्यसेनने त्यांचा योग्य तो आदर-सत्कार केला व विचारले, "महाराज, आपण कसे काय येणे केले"?

तेव्हा योगीराज राजास आशीर्वाद देऊन म्हणाले. "हे राजा, तू चँवर वंशाचा फार मोठा प्रभावशाली राजा आहेस.तुला लवकरच एक महा प्रतापी बलशाली पुत्र होईल.तो सर्व पूर्वज पुरुषांपेक्षा तेजस्वी व सामर्थ्यवान होईल.पण त्याचे हातून ह्या पराक्रमी चँवर वंशाचा नाश होण्याचा धोका आहे.परंतु आम्ही परमेश्वराची प्रार्थना करू की, "तुझ्या मुलास ह्या कलंकापासून वाचव" एवढे बोलून योगीराज नाहीसे झाले.

**सूर्यसेनची प्रतिज्ञा:**

त्या तपस्वी योगीराजाचे कथन ऐकून सूर्यसेन राजाला भ्रम निर्माण झाला.रात्रंदिवस तो त्या चिंतेत राहू लागला.कालांतराने राजास पुत्र झाला.राजाने ज्यातिषांना व ब्राह्मणांना भोजन देऊन त्या संबंधी विचारले, तेव्हा त्यांनी सांगितले की, "त्या वृद्ध योगीराज तपस्वीने सांगितलेल्या ग्रहातच आपल्या मुलाचा जन्म झाला आहे." हे ऐकून सूर्यसेन राजा मूर्च्छा येऊन खाली पडला.थोड्या वेळाने राजा शुद्धिवर आल्यावर ज्योतिषी म्हणाले, "मुलाने ज्या ग्रहात जन्म घेतला, तो ग्रह तर चांगला आहे.त्या ग्रहात फक्त देवच जन्म घेतात.मनुष्य मात्रास ह्या ग्रहात जन्म घेणे म्हणजे सौभाग्य आहे.राजा, आपण चिंताग्रस्त राहू नका.हा आनंदाचा क्षण आहे.आपण नऊ लक्ष गाईचे दान व एकोणीस लक्ष ब्राह्मणांना भोजन विधिपूर्वक वेदोक्तरीतीने करावे."

हे एकताच सूर्यसेन राजास बरे वाटले व तशी त्याने आज्ञा केली.राजाज्ञा ऐकताच प्रधान मंत्री इंद्रदेवने गाई एकत्र करुन राजा सूर्यसेनचे हस्ते गाईचे दान केले.तसेच एक लक्ष ब्राह्मणांना भोजनही घातले.तरी त्या तपस्वी योगीराजाचे कथनानुसार 'हा पुत्र चँवर वंशाचा नाश करील' म्हणून राजाने मनामध्ये पुत्र घात करण्याचा निश्चय केला व सुमता राणीकडे गेला.वृद्ध तपस्वीचे कथन सांगून, आपल्या एकुलत्या एक मुलास ठार करावे लागणार अशी त्याने इच्छा व्यक्त केली.तेव्हा सुमता राणी म्हणाली,"पुत्रघात केल्याने नरकवास भोगावा लागेल."

तेव्हा राजा म्हणाला, "चँवर वंशाचे रक्षण होणार असेल तर मी आनंदाने नरकवास भोगेन.माझी प्रतिज्ञा आहे की, 'आपल्या मुलास मी स्वहस्ते ठार करीन.'तेव्हा सुमता राणी मोठ्या कष्टानेम्हणाली, "महाराज, आपण आपल्या प्रतिज्ञेपासून ढळणार नाही.परंतु मी आपणांस प्रार्थना करते की, फक्त एक दिवस आपल्या बाळाला जिवदान द्या.मी आपल्या प्रतिज्ञेत अडथळा आणणार नाही." राजाने राणीची प्रार्थना सहर्ष मान्य केली व राजा शांत चित्ताने महालाबाहेर गेला व प्रधानमंत्रिबरोबर राज्य कारभारासंबंधी बोलू लागला.

**राणीचा शोक व दासीची युक्ती:**

अनुक्रमणिका

सुमता राणी शोक सागरात बुडालेली पाहून तिची मुख्य दासी क्षेमकला फारच घाबरली व तिने चिंतेचे कारण विचारले.तेव्हा राणीने सर्व हकीकत सांगितली.तेव्हा क्षेमकला म्हणाली."संकट तर फार मोठं आहे.तुमच्या मुलाचं सौंदर्य पाहून व ही भयंकर बातमी ऐकून कोणालाही दुःख होईल.मग तुम्ही तर मुलाची आई आहांत.काही तरी करून आपल्याला युवराजाचे प्राण वाचवायलाच पाहिजेत."

"पण हे कसं शक्य आहे?" राणीने विचारताच क्षेमकला म्हणाली, "मी तुम्हांला एक युक्ती सांगते की," जिच्यामुळं राजकुमाराचे प्राण वाचले जातील आणि राजाची प्रतिज्ञा मोडली जाणार नाही.

राणी मोठ्या उत्कंठतेने म्हणाली. "क्षेमकले, सांग तुझी युक्ती मला लवकर सांग."

दासी म्हणाली, "मी सांगितल्याप्रमाणे अवश्य करणार असल्याची, परमेश्वराची शपथ घेणार असाल तरच सांगते."

राणीने एका क्षणाचाही उशीर न करता परमेश्वराची शपथ घेतली.तेव्हा क्षेमकला दासी म्हणाली, "महाराणी, राजानं ह्या मुलाचं तोंड अद्याप पाहिलेलं नाही.माझा मुलगा फक्त चार दिवसांचा आहे.त्यांच्यात व राजकुमारात विशेष फरक महाराजास कळणार नाही.माझ्या मुलास राजपुत्राचे जागी झोपवा आणि राजकुमाराला माझ्याकडे द्या.मी यास कोणत्याही प्रकारे येथून घेऊन जाईन आणि जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करीन.राजा स्वतःच्या मुलाचा वध करण्यास येईल, तेव्हा स्वतःचा समजून माझ्या मुलास ठार करील.असे केल्याशिवाय दुसरा इलाज नाही."

हे ऐकूण सुमता राणी म्हणाली, "क्षेमकले, स्वार्थामुळे मी माझ्या मुलास वाचवू आणि तुझ्या मुलाची हत्त्या होऊ देऊ?हे कसं शक्य आहे?माझाच मुलगा स्वर्गलोकी जाऊ दे."

दासी क्षेमकला म्हणाली, "महाराणी, राजकुमार जसा तुम्हांस आवडतो, तसा माझा मुलगा मलाही आवडतो.परंतु वेदात सांगितले आहे की, "जगात कोणताही प्राणी मरत नाही.आत्मा अमर आहे.तो एक शरीर सोडून दुसरे शरीर धारण करतो."

शेवटी शपथ घेतल्याप्रमाणे सुमता राणी क्षेमकला दासीचे ऐकते.दासी स्वतःचे मुलास राणीचे स्वाधीन करते व राजकुमारास घेऊन निघून जाते.

**राजा सूर्यसेनचे निधनः**

दुसऱ्या दिवशी राजा सूर्यसेन स्वतःचा मुलगा समजून दासीच्या मुलास ठार करतो.राणी कष्टी होते.कालातंराने राजा सूर्यसेन आजारी पडतो.त्यातच त्याचा देहांत होतो.प्रधानमंत्री इंद्रदेवने राजदरबारी मंडळींशी विचारविनीमय केला आणि सुमता राणीस गादीवर बसविण्याचा एक दिवस निश्चित केला.ठरविलेल्या दिवशी दरबार भरला.निमंत्रणाप्रमाणे प्रजेचे प्रतिनिधी व अन्य देशांचेराजे आले होते.मुख्यमंत्री इंद्रदेवने आरंभी सर्वांचे स्वागत करून, सुमता महाराणीस गादीवर बसविण्याचा विचार

सांगितला.तेव्हा सुमता राणी म्हणाली की, “मारला गेलेला दासीपुत्र होता आणि राजपुत्र दासी क्षेमकलकडे सुरक्षित आहे.”

**राजपुत्र चामुण्डरायाचे राज्यारोहणः**

हा शुभ समाचार ऐकून सर्वांना आनंद झाला.राणीच्या आज्ञेने क्षेमकलेने राजकुमारास दरबारात आणले.तेव्हा तो साधारण कपडयात होता.तरी तो इतरांपेक्षा तेजस्वी दिसत होता.त्यामुळे तो सुर्यसेन राजाचाच पुत्र आहे याची सर्वांना खात्री झाली व त्यास सिंहासनावर बसविण्याची इच्छा व्यक्त झाली.तेव्हा सुमता महाराणीने राजपुत्रास मांडीवर बसविले.तेव्हा राजकारभार करण्यासाठी नऊ पदाधिकाऱ्यांची एक समिती स्थापन केली.तसेच सुमता राणीने समितीप्रमुख इंद्रदेव यास प्रधानमंत्री म्हणून नियुक्ती केली.त्यावेळी ब्राह्मणांना गाई दान करून, ब्राह्मणभोजन दिले.ब्राह्मणांनी राजकुमाराचे ‘चामुण्डराय’ असे नामकरण संस्कार केले.राजकुमार चामुण्डराय दहा वर्षांचे होईपर्यंत आई सुमताबरोबर राजधानी चँवरातीमध्ये राहिले.पण पुढे ते शिक्षण प्राप्त करण्यासाठी क्षेमकलेबरोबर आरस्य पर्वतावर राजऋषी धर्मेश्वराकडे गेले.वयाच्या अडतीस वर्षांपर्यंत त्यांनी वेदानुकूल ब्रह्मचर्याचे पालन केले व चँवरावती राजधानीस परत आले.चामुण्डरायाने राजगुरू वीर धुरंधरापासून चोवीस वर्षे धनुर्विद्येचे शिक्षण घेतले.तसेच वयाच्या ब्याऐंशीव्या वर्षी प्रधानमंत्री इंद्रदेवाकडून राजकीय शिक्षण घेण्यास सुरूवात केली.चामुण्डराय वयाच्या नव्वदाव्या वर्षी गादीवर बसले.राज्यारोहण समारंभास प्रजेचे प्रतिनिधी व निरनिराळ्या देशांचे राजे हजर होते.त्यांनी नजराणे व शुभेच्छा राजा चामुण्डरायाला दिल्या.तर राजा चामुण्डरायाने त्यांना उत्तमोत्तम रत्ने देऊन निरोप दिला.यावेळी इंद्रदेवाची प्रधानमंत्री म्हणून पुन्हा निवड झाली.अशा प्रकारे राज्यारोहण समारंभ थाटामाटात संपन्न झाला.राजा चामुण्डराय मोठ्या आनंदाने राज्यकारभार करू लागले.

**राजकन्या बिनशियाचे स्वयंवरः**

त्रिकेय देशचा राजा क्लैशल्य यांची तरुण सुस्वरुप कन्या“बिनशिया” नावाची होती.राजाने मोठ्या परिश्रमाने वेदशास्त्र तसेच गांधर्व इत्यादी विद्यांचे शिक्षण निरनिराळ्या देशातील राजगुरुंकडून तिला दिले होते.राजाने तिचे स्वयंवर करण्याचे ठरविले व देशोदेशींच्या राजपुत्रांना राजकन्येचे चित्र व निमंत्रण पाठविले.राजा चामुण्डरायालाही चित्र व स्वयंवराचे निमंत्रण मिळाले.त्याप्रमाणे चामुण्डराय त्रिकेय देशाची राजधानी केशतन्यटोन्यमध्ये उपस्थित झाले.राजा कैशल्यने सर्व राजांचे व प्रतिनिधींचे मोठ्या उत्साहाने स्वागत केले.स्वयंवरभवनमध्ये सर्व राजे स्थानापन्न झाले.पहिले नऊ दिवस लहानमोठ्या राजांच्या गुणांचे वर्णन केले.परंतु राजकुमारीचे मनावर काहीच परिणाम झाला नाही.दहाव्या दिवशी राजा चामुण्डरायचे वर्णन केल्याबरोबर राजकुमारी बिनशियाने जयमाला चामुण्डरायचे गळ्यात घातली.त्याबरोबर चामुण्डरायने आपल्या हातातील आंगठी काढून राजकन्येच्या उजव्या हातात घातली.त्यांचेवर पुष्पवृष्टी झाली.विवाह विधी थाटात पार पडल्यावर राजा चामुण्डराय राणी बिनशियासह राजधानी चँवरावतीस आले व शास्त्रमर्यादानुसार राज्यकारभार करू लागले.

अनुक्रमणिका

**चामुण्डरायचा राजसंन्यासः**

कालांतराने प्रधानमंत्री इंद्रदेव यांचा देहांत झाला.तेव्हा चामुण्डरायने संन्यासाश्रम घेण्याचा निश्चय केला.सर्वांना खेद झाला.इंद्रदेवाचा ज्येष्ठ पुत्र भद्रसेन वडिलाप्रमाणेच राजकारणात चतुर होता.त्यासराजाने प्रधानमंत्री केले.राजगुरुनी वेदोक्तरीतीने चामुण्डरायचा संन्यास संस्कार केला.राजास मूलबाळ नसल्यामुळे राणी बिनशियास चँवरावती नगरीत चँवरवंशाच्या गादीवर बसविले.चामुण्डराय कैलास पर्वताकडे निघून गेले.राणी बिनशिया ही प्रधानमंत्री भद्रसेन व अन्य पदाधिकारी तसेच प्रजेचे प्रतिनिधी यांचे संमतीने राज्यकारभार करू लागली.

राजा चामुण्डराय नव्हे, तर चामुण्डऋषी कैलाश पर्वतावरील गर्गीव ऋषिकडे गेले.तेथे आश्रमाच्या नियमानुसार काही दिवस राहिले.तेथून चामुण्डऋषी देशोदेशी जाऊन वेदविद्येचा प्रचार करू लागले.शेवटी ते हिमालय पर्वतावरील एका गुंफेत परमेश्वर स्तुतिमध्ये लीन झाले.त्यांनी विष्णू भगवानाची योगद्वारे भक्तिपूर्वक तपस्या केली.

**भुरंग राक्षसाचे मनोरथः**

चामुण्डऋषिने एवढी महान तपस्या केली की, देवलोकात मोठा असंतोष निर्माण झाला व सर्व देवदेवता एकत्र जमून विचार करू लागल्या.चामुण्डऋषिच्या तपस्येत विघ्न निर्माण केले नाही तर ते आपल्या तपसामर्थ्यांने सर्व देवामध्ये उच्च स्थान प्राप्त करून घेतील.तेव्हा सिद्धीदेव म्हणाले की, “मी आपणांला एक उपाय सुचवितो.जेव्हा राजपुत्र चामुण्डराय आरण्य पर्वतावर राजगुरू धर्मेश्वराजवळ ब्रह्मचर्याश्रमाचे पालन करीत होता.तेव्हा धुरंग राक्षसाने चँवरावती राजधानीवर हल्ला केला होता.तेव्हा सुमता राणीने मोठ्या पराक्रमाने धुरंग राक्षसाचा व त्याच्या कुटुंबाचा वध केला होता.” तेव्हा धुरंग राक्षसाचा कनिष्ठ पुत्र भुरांगने प्रतिज्ञा केली होती की, “शक्य होईल तेव्हा कोणत्याही प्रकारे मी सुमतास व तिच्या मुलास त्रास देईन.” परंतु आजपर्यंत त्याला सुसंधी प्राप्त झाली नव्हती.कारण राजऋषी चामुण्डरायचे राज्य हे धर्मराज्य होते.सत्त्याचे पालन, वेद भगवानाची पूजा तसेच सर्वजण आपआपले कर्तव्य करीत होते.त्यामुळे कोणीही चामुण्डरायला शत्रू होत नव्हता.परंतु भुरंगचे मनोरथ पूर्ण होण्याची आता वेळ आली आहे.तेव्हा सर्व देवांनी विघ्नदेवास सांगितले की, “भुरंग राक्षसाकडे जाऊन कार्यसिद्धी करावी.”

भुरंग राक्षस अम्बरिक्य देशाच्या निद्यग्रीय नदीजवळ होता.तेथे जाऊन विघ्नदेवाने सर्व हकीगत सांगितली.तेव्हा तो कार्यसिद्धी करण्यास तयार झाला.विघ्नदेव तेथून आनंदाने निघून गेले.

भुरंद राक्षस चामुण्डऋषिकडे गेला.तेव्हा चामुण्डऋषी ध्यानावस्थेत होते.थोड्याच वेळाने चामुण्डऋषिने भुरंगाला तपस्वीच्या रूपात पाहिले.तेव्हा भुरंग म्हणाला, “राजऋषी, तुझे सर्व तप व्यर्थ आहे.कारण तू विष्णुची संपूर्ण भक्ती करू शकत नाहीस.”

तेव्हा चामुण्डऋषिने विचारले, “कोणत्या प्रकारे विष्णू भगवानाची भक्ती पूर्ण होऊ शकेल?”

अनुक्रमणिका

विष्णू भगवानाची मूर्ती देऊन भुरंगने सांगितले, “विष्णू भगवानाची शारीरिक पूजा कर, ह्या विष्णू प्रतिमेची भक्तिपूर्वक पूजा म्हणजेच विष्णुची शारीरिक पूजा होय.”

**विष्णुचा चामुण्डऋषिस शापः**

चामुण्डऋषी वेद शास्त्राचे पूर्ण ज्ञाते होते.भगवानाच्या प्रतिमेची पूजा वेदशास्त्राच्या विरुद्ध होती.परंतु यावेळी चामुण्डऋषिची बुद्धी भ्रष्ट झाल्यामुळे भुरंगचे म्हणणे त्यांनी मान्य केले.तेव्हा भुरंग तेथूनमोठ्या आनंदाने निघून गेला.ब्रह्मज्ञान विसरल्यामुळे चामुण्डऋषिने प्रतिमा-मूर्तिलाच भगवान समजून पूजन केले.

विघ्नदेवाच्या धूर्त कावेबाजीमुळे ‘मृत्युलोकात सर्वत्र खरी भक्ती सोडून लोक दगडाची पूजा करणे संभवनीय आहे.’हे ऐकताच विष्णू भगवान एका शूद्राचे रूप घेऊन चामुण्डऋषीकडे आले.तेव्हा चामुण्डऋषी प्रतिमेची पूजा करणारच होते.एवढ्यात ते म्हणाले, “अरे शूद्रा, तू माझ्या तपस्येत अडथळा करायला का आलास?” त्यावेळी शुद्ररूपी विष्णू भगवान म्हणाले, “मी तुझ्याबरोबर शास्त्रार्थ करण्यास आलो आहे.तू विष्णू भगवानाचा खरा भक्त नाहीस.तू भगवानाच्या प्रतिमेची पूजा करतोस,”हे कथन सत्य असल्याचे ज्ञान चामुण्डऋषीस झाले.परंतु ते रागाने म्हणाले, “अरे शुद्रा, याचे प्रमाण काय?”

तेव्हा शूद्ररूपी विष्णू भगवानाने वेद उघडून वाचून दाखविले.“नतस्य प्रतिमास्ती तस्य नाम महद् यशः” तेव्हा चामुण्डऋषी म्हणाले की, “जो शूद्राचे काम करतो, तो शूद्र होय.कोणी मनुष्य कोणत्या खास कुळात जन्म घेतल्याने शूद्र होऊ शकत नाही.मनुष्याला कोणताच वर्ण नाही.जगातील सर्व मनुष्याची एक जात, एक वर्ण आहे.मनुष्य आपले कर्तव्य सोडून नीच कामे करतो, तेव्हा त्यास शूद्र म्हणावे.तेव्हा शूद्रा, तुला वेद वाचण्याचा अधिकार नाही.तू चालता हो.”

तेव्हा विष्णू भगवानाने शूद्ररूपाचा त्याग करून, आपले मूळ रूप घेतले.तेव्हा चामुण्डऋषिचा मोहांधकार नाहीसा होऊन, त्यांनी भगवानाचे चरण धरले.तेव्हा विष्णू भगवान म्हणाले, “हा तुझा दोष नाही.तुझ्या प्रबळ प्रतापी चँवर वंशाचा लोप तुझ्यामुळे होणार होता.मी तुला शाप देतो की, तुझा सुप्रसिद्ध प्रभावशाली सूर्यकूल श्री.चँवर वंश आजपासून कायमचा नाहीसा होत आहे.आजपासून तुझ्या वंशास ‘चांभार’ म्हटले जाईल.तुझ्या वंशाचा शूद्रात समावेश केला जाईल आणि तुझी मुले नीच कामे करतील.ती नेहमी दगड, झाडे इत्यादी जडास पुजून स्वतः जडतुल्य होतील.”

तेव्हापासून चँवर वंशाचा नाश झाला.चँवर वंशातील सर्वांना ‘चांभार’ म्हणू लागले.विष्णू भगवान चामुण्डऋषिसह विमानात बसून देवलोकी पोहाचले.

**सूर्यदेवाचा संतापः**

चँवर वंशाचा नाश होताच सूर्यदेव दुःखी व संतप्त होऊन पर्वतातील गुंफेत जाऊन बसले.त्यामुळे पृथ्वीवर अंधाराचे राज्य पसरले.त्यामुळे मनुष्यप्राण्यास त्रास होऊन सर्वत्र हाहाकार उडाला.सर्व देव व्याकुळ होऊन विष्णुकडे गेले व म्हणाले की, “सूर्यदेव संतप्त झाल्याने पृथ्वीचा नाश होत आहे.”

अनुक्रमणिका

विष्णू भगवान म्हणाले, “सूर्यदेव रुष्ट होण्याचे कारण स्पष्ट आहे.मी दिलेला श्राप कोणत्याही प्रकारे नाहीसा होऊ शकत नाही.चँवर वंश नाहीसा झालेलाच आहे.परंतु सूर्य भगवानांचा दुसरा वंश निर्माण होऊन, त्याची कीर्ती कायम राहील.”

**विष्णुचे सूर्यदेवास आश्वासनः**

विष्णू भगवानाचे आश्वासन ऐकून सर्व देवांना समाधान वाटले.ते सर्व देव सूर्य भगवानाकडे गेले.त्यांनी विष्णू भगवानाचे कथन सांगितले.तेव्हा सूर्य भगवान सर्व देवांसह विष्णू भगवानाजवळआले व विष्णुच्या चरणास स्पर्श करून सूर्यदेव म्हणाले, “माझा दुसरा वंश पुन्हा व्यवस्थित चालावा आणि माझी कीर्ती चिरस्थायी करावी.”

तेव्हा विष्णू भगवान म्हणाले, “तुझी इच्छा पूर्ण होईल.तुझा दुसरा वंश कलियुगात कीर्तिमान होईल.कलियुगात गौरवर्णी चांभार जातीचे राज्य पृथ्वीच्या मोठ्या भागावर होईल.त्या राज्यात एक ऋषी जन्म पावेल.तो अज्ञान अंधकाराचा नाश करून वेदाचा प्रकाश पाडील.पूर्वजांचा पराक्रम ऐकून चांभार जात शूद्र जातीमध्ये उंच बनेल.त्यावेळी चांभार जात श्राप आणि बंधनापासून मुक्त होईल व आपले कर्तव्य कर्म करण्यास स्वतंत्र होऊन उच्च पदवी प्राप्त करील.”

**संतुष्ट सूर्यदेवः**

विष्णू भगवानाचे आश्वासन ऐकून सूर्यदेव संतुष्ट झाले.विष्णूचे दर्शन घेऊन पुन्हा आपले तेज पृथ्वीवर प्रकाशित केले.हे पाहून ऋषी, मुनी, पशू, पक्षी, जीव-जंतू प्रसन्न होऊन, विष्णू भगवानाचा अपूर्व महिमा गाऊ लागले.

वरीलप्रमाणे संत रोहिदासांचा जन्म सूर्यवंशी द्विज कुळातील चांभार जातीत झाल्याची सुरस कथा चँवर पुराणात आहे.तर कोणी त्यांचा जन्म यादव वंशी चर्मकार जातीत झाल्याचे लिहिले आहे.माझ्या मते संत रोहिदासांचा जन्म चंद्रवंशी[डॉ.बी.पी.शर्मा, डॉ.पितांबर नारायण, रविदास दर्शन, प्र.सं.,सन १९७३, पृष्ठ ६४.]चर्मकार जातीत झाला आहे.ही माहिती संत रोहिदासांनी स्वतःच सांगितली आहे.म्हणून ती माहिती आपण सत्य मानायला हवी.

**हरिनंदन व चित्रकौरः**

त्याच चँवर वंशाचा हरिनंदन नावाचा भक्त काशीशेजारी[मेरी जाति कुटवांढला, ढोर ढुवंता ढिंग ही बनारसी आसपास.।
काशी पुर लीन ग्राम हमारा, चंवर वंश के अरू शुद्र कुमार ।
माडूर नगर लिया औतारा ।
–रैदास रामायण]राहात होता.ब्राम्हण क्षत्रिय, वैश्य असे उच्चवर्णीय हरिनंदन चर्मकारास शूद्र-नीच समजून दूर ठेवीत.त्याच्या पत्नीचे नाव चित्रकौर.ती सुस्वरुप व पतिव्रता होती.पोटी पुत्र नसल्यामुळे दोघेही मनात दुःखी होती.तेव्हा परमेश्वर भक्ती करण्यास पत्नीच्या आग्रहामुळे हरिनंदन घनघोर जंगलात गेला.धौलगिरी पर्वतावरील सनंदन मुनीस भेटून आशीर्वाद मिळाल्यावर हरिनंदन घरी

अनुक्रमणिका

आला.मुनिने सांगितल्याप्रमाणे त्यांने सर्व कामे केली.चित्रकौर गर्भवती राहून दहा महिन्यांनी प्रसुत झाली.तिच्या पोटी सुंदर पुत्र झाला.त्याचे नाव राऊ ठेविले.सर्वांना आनंद झाला.

**राऊ आणि कर्मा:**

हरिनंदन व चित्रकौर ही पतीपत्नी आनंदाने संसार करीत होती.राऊ सोळा वर्षांचा झाल्यावर त्याचे कर्मा' नावाच्या मुलीशी लग्न झाले.

राऊ व कर्मा दोघे आनंदाने संसार करू लागली.राऊचे माता-पिता वृद्धावस्थेमुळे मरण पावले.राऊ वडिलार्जित चांभारकाम करीत हरिनाम घेऊ लागला.राऊचे कामात कर्मादेखील मदत करीत असे.

* * *

अनुक्रमणिका

# ४.बालपण

उत्तरप्रदेश राज्यातील काशी (वाराणसी) जवळ मंडूर अथवा मांडूर नावाचे गाव आहे.ते मुगलसरायपासून दीड-दोन मैल अंतरावर ग्रँडट्रकरोडवर आहे.त्यालाच“मंडु आडिह” म्हणतात.ह्या गावाजवळच ‘लहर तारा’ [ह्या तलावाजवळच संत रोहिदासाचे गुरुबंधु संत कबीराचा जन्म झाला.]नावाचा तलाव आहे.ह्या तलावाच्या आसपास आजसुद्धा चर्मकार सामाजाची मोठी वस्ती आहे.तेथे राऊ ऊर्फ रघु अथवा रघुराम नावाचा एक प्रतिष्ठित चांभार राहात होता.त्याला कोणी ‘राघव’ तर कोणी ‘राघवदास’ तर कोणी ‘संतोषा’ व ‘मानदास[मानदासस्य सनयो रविदास इति विश्रुतः –गुरु रविदास प्र.स.सन १९८३ पृष्ठ १३.]’ही म्हणत.त्याचा चामड्याचा मोठा धंदा होता.तो कच्चे चामडे कमवी व कमवलेल्या चामड्याचे निरनिराळे साहित्य बनवित असे.त्याच्या कारखान्यात जोडे, घोड्याचे चाबूक, लगाम, जीनही बनवून देत असत.कारखाना मोठा असून, तेथे बरेच कामगार काम करीत असत.रघुची आर्थिक परिस्थिती चांगली असल्यामुळे समाजात व सगेसोयऱ्यात त्याला चांगला मान असे.

रघुरामच्या पत्नीचे नाव कर्मादेवी होते.तिला कोणी ‘रघुराणी[रघुराणीचे ‘रघुरनिया’ तर पुढे तिचे ‘घूरवनिया’ असा अपभ्रंश झाला आहे.]’,‘घुरबिनिया’ तर कोणी ‘कौसा’ किंवा ‘कलसी’ म्हटलेले आहे.ती पतिव्रता व साध्वी स्त्री होती.आर्थिक परिस्थिती चांगली.प्रतिष्ठा मोठी असूनही पोटी मूलबाळ नसल्यामुळे दोघे पती-पत्नी दुःखी होते.

**साधुचा राऊ-कर्मास आशीर्वादः**

एके दिवशी रघुरामाला काही कामानिमित्ति दूर गावी जावे लागले व परत येताना त्यास मृगबन ऋषिपतनहून यावे लागले.हे मृगवन प्राचीन तपोभूमी आहे.तेथे बुद्ध विहाराची खिंडारे होती.मनुष्यवस्ती नव्हती.तरी त्या वनात रघुरामला एक ध्यानयोगी महात्मा दिसला.रघुरामने त्या साधुचे दर्शन घेतले.तेव्हा साधुने खीर भोजनाची इच्छा व्यक्त केली.तेव्हा रघुरामने उद्याच खिरीचे भोजन आणून देण्याचे साधुस आश्वासन दिले.

रघुराम घरी आला व पत्नीस सर्व हकीकत सांगितली.ती ऐकून रघुराणीस खूप आनंद झाला.दुसरे दिवशी रघुराणीने पहाटे उठून मोठ्या प्रेमाने खीर बनविली आणि ताटात वाढून ती पतीबरोबर तपोवनात गेली.मोठ्या श्रद्धेने महात्म्यास नमस्कार करून खिरीचे ताट त्यांचेसमोर ठेविले.खिरीचे भोजन केल्यावर महात्मा फार प्रसन्न झाले.त्यांचा निरोप घेताना रघु व रघुराणीने दीनवाणा चेहरा करून प्रार्थना केली की, “महाराज, आम्हांस मूलबाळ नाही.” तेव्हा त्या महात्मा साधुने हात वर करून आर्शीवाद दिला की, “तुमच्या घरी असा पुत्र जन्म घेईल की, त्याच्यामुळे तुमचे नाव अमर होईल.”

**रोहिदासांचा जन्मः**

साधुचा आशीर्वाद मिळताच रघू-रघुराणी मोठ्या आनंदाने घरी आले.त्याच रात्री रघुराणीस गर्भ राहिला.दहा महिने होताच रघुराणी संवत १४३३[चोदह सौ तैतीस की, माघ सुदीपंद्रास।
दुःखियों के कल्याण हित, प्रगटे श्री रविदास॥

अनुक्रमणिका

—संत रविदास की भक्तिसाधना, पृ.१०.]माघ पौर्णिमेस रविवारी[ज्योतिष गणनेप्रमाणे संवत १४३३ ची माघ पौर्णिमा रविवारीच येते.]सकाळी बनारस[नगर वनारसी उत्तम गाऊँ, तहाँ रैदास लिया औतारा।

—भक्त रत्नावली, पृष्ठ ३३.]काशीजवळ मांडूर[कासी ढिग मांडूर स्थाना, शुद्ध वरण करत गुजराना।

—संत रविदास वाणी, पृष्ठ २२.]येथे प्रसुत झाली;असे रोहिदास रामायणात लिहिले आहे.सूर्याप्रमाणे तेजस्वी बालक झाले म्हणून बालकाचे नाव ‘रविदास[मांडूर नगर लीन औतारा, रविदास शुभ नाम हमारा।

—संत गुरु रविदास वाणी, २२.]’ठेविले.त्या रविदासला महाराष्ट्र ‘रोहिदास’ म्हणून ओळखतो.पुत्रजन्मामुळे आई कृतार्थ झाली.एवढेच नव्हे तर मुलाचा हसरा चेहरा पाहून तिचा आनंद द्विगुणीत झाला.रघुरामाला तर खूपच आनंद झाला.ही बातमी बनारस मांडूरमध्ये आसपास कळताच सर्वांना आनंद झाला.अनेकजण आनंदाने थाळ्या, ढोल वाजवू लागले.सर्वजण घरी येऊन मुलास पाहू लागले.शुभेच्छा देऊ लागले.बालवृद्धांनीसुद्धा घरी गर्दी केली.रघुरामने घरी आलेल्या लोकांना पेय दिले.आलेल्या मित्रांचा योग्य तो आदर-सत्कार केला.साधुंना बोलावून रघुरामने त्यांची सेवा पूजा केली.त्यांना व भिक्षूंना दानधर्म देऊन त्यांना प्रसन्न केले.सुहासिनी गीत गाऊ लागल्या.अशा प्रकारे सर्व वातावरण आनंदाने भारले गेले होते.

**जन्मतिथी:**

संत धर्मदास हे शिखांच्या पांच आवडत्या व्यक्तिंपैकी एक होते.त्यांचे शिख नाव ‘धर्मसिंग’ हे गुरु गोविंद सिंह ह्यांनी ठेविले होते.धर्मदास (धर्मासिंग) हे संत रोहिदासाचे पणतू होते.त्यांचे समकालीन संत करमदास होते.त्यांनी धर्मदासकडून संत रोहिदासांच्या साक्या (दोहे) लिहून घेतल्या होत्या.संत करमदासांनी संत रोहिदासांचा जन्म माघ पौर्णिमा संवत १४३३ (सन १३७६) मानला आहे आणि त्या दिवशी रविवार येतो.इतर कोणत्याही जन्मतिथीला रविवार येत नाही.

श्री.रामचंद्र कुरील यांनी संत रोहिदासाचा जन्म संवत १४७१ (इ.स.१४१४) निश्चित केला आहे.[काशिनाथ उपाध्याय, गुरु रविदास, पृष्ठ ८.]कारण त्यावर्षी माघ शुद्ध पौर्णिमेस रविवार आला आहे.रविवारी जन्म झाल्यावरुन ‘रविदास’ नाव ठेवणे संभवनीय वाटते.जानी बरकतसिंह आनंद यांनीसुद्धा ‘जन्मसाखी श्री.रविदास भगतजी’ नावाच्या पोथीमध्ये ह्या तिथिलाच जन्म झाल्याचे मानले आहे.तसेच श्री.दर्शनसिंह यांनीसुद्धा ह्या तिथीचेच समर्थन केले आहे.श्री.बनारस घेरा यांनी ‘सीर गोवर्धनपूर’ मध्ये मिळालेल्या प्राचीन पांडू लिपीमध्ये रोहिदासांचा काळ इ.स.१४१४ ते १५४० दिला आहे.[रोहिदासांच्या जन्ममृत्यू तिथीसंबंधी विद्वान रोहिदासांचा काळ इ.स.१४१४ ते १५३५ तर काही इ.स.१४१४ ते १५५२ मानतात.]

संवत १४७१ (इ.स.१४१४) मानला आहे.परंतु चर्मकार संताच्या सांगण्यानुसार संत रोहिदासांची जन्मतिथी १४३३ माघ पौर्णिमा मानली जाते.ह्या तिथिलाच चर्मकार समाज रोहिदासांची जयंती दरवर्षी साजरी करतो.संत रोहिदास अशा महापुरुषांच्या परंपरेतील आहेत की, त्यांना आपला जीवन परिचय देण्याची आवश्यकता भासली नाही.किंवा त्यांनी तिकडे लक्ष दिले नाही.तरीसुद्धा उपलब्ध साहित्यातील माहितीवरुन कालनिर्णय करता येतो.

अनुक्रमणिका

**जन्मस्थानः**

अनन्तदासवैष्णव यांच्या 'भक्त रत्नावली' मध्ये रोहिदासांचा जन्म बनारसजवळ झाल्याचा उल्लेख आहे.काहीचे म्हणणे आहे की, त्यांचा जन्म मांडूरगढ़ (प्रचलित नाव मंडुवाडोह) येथे झाला होता.हे स्थान रेल्वे स्टेशन बनारस छावणीपासून सुमारे तीन-चार किलोमीटर पश्चिम ग्रँडट्रक रोडवर आहे.येथून थोड्या अंतरावर 'लहरतारा' नावाचा तलाव आहे.ह्याच तलावाशेजारी निरू नावाच्या कोष्ट्यास (विणकरास) नवजात शिशु कबीर मिळाला होता.

मी मार्च १९८७ मध्ये संत रोहिदासांच्या संशोधन कार्यासाठी वाराणसीस गेलो होतो.माझ्यासोबत श्री.हरिश्चंद्रभाई खेडेकर होते.तेव्हा उत्तरप्रदेश राज्याचे माजी मंत्री श्री.रामलखन यांचे देखरेखीखाली गंगा किनारी राजघाटावर संत रोहिदासांचे एक भव्य मंदिर बांधले आहे.(भारताचे माजी उप प्रंतप्रधान कै.बाबू जगजीवनराम यांचे विनंतीवरून).श्री.रामलखन यांनी आपला वृद्ध व माहितगार विश्वासू अनुयायी श्री.दासूराम यास आमच्या सोबत मार्गदर्शनासाठी दिला होता.आम्ही तिघांनी काशीतील संत रोहिदासांच्या अनेक मंदिरांना भेटी दिल्या.त्यावेळी आम्ही लहरतारा तलाव पाहिला.तेव्हा तो तलाव सुकलेला होता.शेजारचा नालासुद्धा कोरडा होता.मध्यभागी उंचवट्यावर विटा-सिमेंटने बांधलेले चारखणी जुने घर होते.ह्या तलावाशेजारीच रोहिदासांचा जन्म झाल्याचे श्री.दासूराम व श्री.रामलखन यांनी सांगितले.तसेच शेजारी रोहिदास भक्त चर्मकारांची बरीच मोठी वस्ती असल्याची दिसली.

रैदास रामायणामध्ये मांडूर हेच रोहिदासाचे जन्मस्थान दाखविले आहे.परशुराम चतुर्वेदी, वेणीप्रसाद शर्मा, आचार्य पृथ्वीसिंह आजाद तसेच बरेचसे विद्वान मांडूर हेच जन्मस्थान मानत आहेत.परंतु आदिशर्मा मिशन मतावलंबी श्री.बंताराम व काही विद्वान बनारस नजिकचे 'सिर गोवर्धनपूर' हे रोहिदासांचे जन्मस्थान मानत आहेत.आम्ही जेव्हा येथील संत रोहिदास मंदिरास भेट दिली.त्यावेळी चारपांच रोहिदास भक्त त्वरित आले व रोहिदासांचे जन्मस्थान हेच सिर गोवर्धनपूर असल्याचे आग्रहाने सांगू लागले होते.काही लोक रोहिदासांचा जन्म गुजरात किंवा राजस्थानमध्ये झाल्याचे सांगतात.परंतु यास विशेष आधार नाही.

माझ्या मते संत रोहिदासांचे जन्मस्थान मांडूर हेच असावे.कारण संत रोहिदासांनी तसे स्वतः सांगितले आहे.[कासी ढिग मांडूर स्थाना, शुद्ध वरण करत गुजराना।
मांडूरनगर लीन औतारा, रविदास सुभ नाम हमारा॥
—गुरु रविदास, पृष्ठ ११.]असे रैदास रामायणात लिहिले आहे.म्हणून जन्मस्थानामध्ये मतभेद असण्याचे कारण नाही.

**स्वामी रामानंदाचा शुभाशीर्वादः**

मुलाची आई रघुराणी ऊर्फ करमादेवी धार्मिक आणि रामभक्त होती.ती नेहमी गंगा स्नान करून देवपूजा करीत असे.पंचगंगा घाटावरील स्वामी रामानंदाच्या सत्संगमध्येही जात होती.स्वामीजींच्या कृपेमुळे आपणांस पुत्रप्राप्ती झाल्याचे ती समजत होती.परंतु पुत्रजन्माच्या आनंदामध्ये एक विघ्न आले.बाळ जन्मल्यापासून आईचे स्तनपान करीनासे झाले.त्यामुळे कुटुंबातील सर्वजण चिंताग्रस्त झाले.पुष्कळ उपचार केले.परंतु उपयोग झाला नाही.आई विचार करू लागली, कोणाची दृष्ट तर लागली नसेल!किंवा कोणी जादूटोणा तरी केला नसेल!अशा अनेक शंका-कुशंका तिच्या मनात येऊ लागल्या.पिता रघुने वैद्य-

अनुक्रमणिका

हकिमांमार्फत बरेच औषधोपचार केले.तसेच संत महात्म्यांच्या मठावर जाऊन नवजात बालकाला आर्शीवाद मागण्यासाठी पुष्कळ धावपळ केली.शेवटी रघू पंचगंगा घाटावरील स्वामी रामानंदांच्या गुंफेवर पोहचला.व्याकूळ झालेल्या रघूस पाहून स्वामी विचार करू लागले.त्यांना अंतर्ज्ञान झाले की, रघुच्या घरी बालकाचा जन्म चर्मकार समाजाच्या उद्धारासाठी झाला आहे.तेव्हा त्याचा प्राण वाचवणे आवश्यक आहे.म्हणून स्वामीजी त्वरित रघूच्या घरी पोहोचले.त्यांनी बाळाच्या डोक्यावर हात ठेविला आणि भगवान रामाचे चरणामृत गुटीत मिसळून प्यायला दिले.ताबडतोब बालकाच्या चेहऱ्यावर फरक जाणवला.तो हसू लागला.त्याने आईचे स्तनपान करण्यास सुरूवात केली.सर्व परिवारात स्वामी रामानंदाचा जयजयकार झाला.सगळे सगेसंबंधी लोक आनंदीत झाले.

पूर्वजन्मात रोहिदास ब्राह्मण होते.परंतु ते मांस[पूरवि जनम विप्रहि होता, मांस न छाड्यो निसदिन श्रोता।
तिही अपराध नीच कुल दीना, पछलाजन्म चीन्ही तीनि लीना।
–गुरु रविदास, पृष्ठ १२.]खात होते.ह्या अपराधामुळे त्यांच्या चर्मकार[जाति चमार पिता अरु माई, सापित के धरि जनम्यौ आई।
–भक्त रत्नावली, पृष्ठ ३३.]कुळात जन्म झाला व पूर्वजन्माच्या स्मृतिमुळे बाळ रोहिदास स्तनपान[दूध न पीवै रूदन कराई, ऐसी देषी कुटुंम्ब डराई।
कुटुम्ब सहित पिता दुप पावै, रैदास हि निज मरिवो भावै।–७
–भक्त, रत्नावली, पृष्ठ ३४.]करीत नव्हता.असे भक्त रत्नावलीमध्ये लिहिले आहे.

सती, साध्वी, पतिव्रता स्त्री तसेच मनुष्याची स्थिर प्रकृती पुढील जन्मातसुद्धा त्याचे अनुकरण करतात.ह्या मनोवैज्ञानिक सिद्धांतानुसार रोहिदास जन्मासंबंधी ‘संत रविदासकी भक्तिसाधना[डॉ.वी.पी.शर्मा, संत रविदासकी भक्तिसाधना, प्र.सं.,पृष्ठ ६.]’मध्ये दिलेली कथा अशी आहे.

**रोहिदास जन्मकथा:**

बनारसमध्ये गंगाकिनारी पंचगंगा घाटावर रामानंदाच्या आश्रमात भोजन व्यवस्था नेहमी भिक्षावृत्तीने चालत होती.एके दिवशी आश्रमात राहणारा ब्रह्मचारी[रामानंद जू कौ शिष्य ब्रह्मचारी रहे एक,
गहे वृत्ति चुटकी की, कहे तासो वानियो।
करो अंगीकार सीधौ, कही दस वीस वार,
वरपे प्रवलाधार, तामे काकि आनियो।
भोग कू लगावे प्रभू, ध्यान नही आवे अरे,
कैसे करि ल्यावै जाई, पूछि नीच जानियो।
दीनौ जाय भारी बात, सुनी न हमारी बात,
घटि कुलमे उतारी देह, सोई याको मानिये.।
–संत गुरु रविदास, पृष्ठ १२.]शिष्य भिक्षेसाठी काशी नगरीत गेला.त्याब्रह्मचारीचे काम घरांघरातून एक एक मूठ पीठ भिक्षा आणून भोजन तयार करावयाचे होते.पण त्या दिवशी मोठा पाऊस पडत होता.आपल्या घराच्या व्हरांड्यामध्ये उभ्या असलेल्या एका प्रौढ दंपत्तीने गल्लीत जात असलेल्या ब्रह्मचाऱ्यास प्रार्थना केली की, “महाराज, आश्रमासाठी आज लागणारी खाद्य सामग्री आमची स्वीकारा.” आणि एका दुकानातून भरपूर शिधा-सामग्री ब्रह्मचारीस द्यावयास लावली.त्या दिवशी सर्व आश्रमवासियांचे पोटभर जेवण ह्या अन्नानेच झाले.त्या दिवशी स्वामी रामानंद हे भगवानाना भोग लावून भोजन करावयास बसले.परंतु त्यांना भोजन खाववले नाही.प्रभु भजनात ध्यान लागेना.मध्यान्ह रात्री गुंफामध्ये समाधिस्थ स्वामी रामानंदाच्या मस्तिष्कमध्ये एका नवजात शिशूची प्रतिछाया घुमत फिरत राहिली.पहाटे स्वामी रामानंदाना भान झाले की,

अनुक्रमणिका

प्रौढ दंपत्तीने पुत्र प्राप्तिच्या इच्छेने आश्रमात भोजन सामग्री पाठविली.स्वामीजीने सकाळी प्रार्थना सभेत त्या ब्रह्मचारी शिष्याची हजेरी घेतली.तेव्हा त्याने आपला अपराध मान्य केला.तेव्हा रामानंदानी शिष्यास आज्ञा दिली की, "तुम्हास पुत्ररुपात त्या शूद्र दंपत्तीच्या घरी जन्म घ्यायला हवा." त्याचा परिणाम कालांतराने त्या ब्रह्माचारीने राऊ-कर्माच्या घरी भक्त रोहिदासाच्या रूपात जन्म घेतला.

भक्तमालचे टीकाकार प्रियादास, रेवा नरेश महाराज, रघुराजसिंहाने तसेच भक्तिसुधा स्वाद तिलक, भक्तमाल हरिभक्ति प्रकाशिका टीकामध्ये रोहिदाससंबंधी नाभादासने वर्णन केलेल्या घटने प्रमाणे उल्लेख केलेला आहे.

स्वामी रामानंदांचे जीवन चरित्र तसेच रामानंदी संप्रदायाची माहिती मिळविण्यासाठी एक प्राचीन ग्रंथ आहे.त्याचे लेखक रामानंदांचे एक शिष्य चेतन दासजी आहेत.त्या ग्रंथाची रचना संवत १५१६ मध्ये मानली आहे.काशीमध्ये उपस्थित शिष्यांनी रामानंदाच्या पुण्यतिथी दिवशी लेखकास हा ग्रंथ लिहण्याची प्रेरणा मिळाली होती.याची भाषा देशवाडी प्राकृत गणभाषा आहे.त्या रचनेत रामानंदजींचे अन्य प्रमुख शिष्यांच्या माहितीबरोबर रोहिदासाचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

स्वामीजीच्या शिष्याने आलस्यवश चामड्याच्या व्यापाऱ्याकडून भिक्षा घेण्याचा अपराध केला.त्या ब्रह्मचाऱ्यास स्वामीजीच्या शापामुळे आपल्या शरीराचा त्याग करावा लागला व एका चांभाराच्या घरी रोहिदासाच्या रूपात जन्म घ्यावा लागला.पूर्व संस्कारामुळे तो स्वामीजींच्या आश्रमात येऊन त्यांचा शिष्य झाला.

अनंतदासाने 'रैदासकी परिचयी' मध्ये एक कल्पना केली आहे की, संत रोहिदास पूर्व जन्मात नारद होते.[और एक रैदास चमारा। जानू नारद लियो औतारा।
शूद्र कहूं तो आवे लाजा। दरसण कारण कता पै राजा॥ १०१॥
—गुरु रविदास, पृष्ठ १६.]त्याविषयी आणखी एक मत असे आहे की, रोहिदास पूर्व जन्मात ब्राह्मण असून रामानंदाच्या शापाने ह्या जन्मात चांभाराच्या घरी जन्मले नाहीत, तर त्यांनी पूर्व जन्मात ब्राह्मण ब्रह्मचारी असूनही मांस खाल्ले होते.म्हणून ह्या जन्मात चांभाराच्या घरी[जाति चमार पिता अरु माई सापित के घरि जनम्यो आई।
—भक्त रत्नावली, पृष्ठ३३.]जन्म घ्यावा लागला होता.अशा दंतकथा विश्वसनीय वाटत नाहीत.तर ब्राह्मण लेखकांनी संत रोहिदासाला उच्चवंशीय सिद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

उतारवयात पुत्र झाल्यामुळे दोघा पतीपत्नीस अत्यानंद झाला होता.परंतु पुत्र जन्मोत्सवात एक विघ्न आले.नवजात शिशूने पूर्वजन्माच्या सर्व स्मृती मनात राहिल्यामुळे आईचे स्तनपान केले नाही.[दूध न पीवै रूदन कराई, ऐसी देषी कुटुंम्ब डराई।
कुटुंम्ब सहित पिता दुष पावै, रैदास हि निज मरिवो भावै।—७
—भक्त रत्नावली, पृष्ठ ३४.]तेव्हा तिने पुन्हा अंगावर दूध पाजण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ.पंचगंगा घाटावरील स्वामी रामानंदास माहित झाल्यावर त्यांनी ओळखले की, माझ्या शिष्याने राघव चांभाराच्या पत्नीच्या पोटी जन्म घेतला.तेव्हा स्वामीजी राघवच्या घरी गेले.तेव्हा बालकाचे दुःखी आई-वडील स्वामीजींच्या पाया पडले.स्वामीजींनी बालकास आर्शीवाद दिला आणि रामनामाबरोबर सुधामुत्ती बुटी चाखावयास दिली.बालक रडावयाचा शांत झाल्यावर आईचे दूध पिऊ लागला.त्यामुळे घरात प्रसन्नतेचे

अनुक्रमणिका

वातावरण पसरले.स्वामीजींचा जयजयकार झाला.भक्त नाभादासने ह्या घटनेचे वर्णन काव्यात[माता-दूध प्यावै,
वाको छुओ नहि भावै,
सुधि आवै सब पाछिली, सुसेवा कौ प्रताप है।
भई नभ वानी, रामानन्द मन जानी,
बड़ो दण्ड दियो मानि, आये चले आप हैं।
दुःखी माता पिता देखी, धाय लिए आप पाय,
किजिए उपाय कियौ, शिष्य गयौ पाप है।
स्तन-पान कियौ जियो, लियो उन्ह ईस जानी,।
निपट अजानि फेरी, भूले भयो ताप है।
—संत गुरु रविदास, पृष्ठ ४८.]केले आहे.तसेच अनंतदास वैष्णवने"भक्त रत्नावली" मध्ये याच घटनेचे वर्णन आपल्या काव्यशैलीमध्ये[अरध राति भई अकासवानी, तव रामानन्दहि मन मंह जानी।१।
चमरा कै घर वेटा जाया, सो मेरा जन औतरि आया।
कृपावंत है दच्छया देहू, बालक मरत राषि तुम लेहूं।२।
तव रामानन्द कियौ विचारा, समझायो सकल परिवारा।
जै तुम भगत होई रे भाई, तौ हरि बालक देइ जिवाई।३।
तव चमरा उहि लागौ पाई, ज्यौ जीवै सो करौ उपाई।
तव रामानंद गहर नहिं कीनू, माथै हाथ चमरा कै दीनूं।४।
—भक्त रत्नावली पृष्ठ ३४.]केले आहे.

रोहिदास पूर्व जन्मात ब्राह्मण होता की नव्हता हे कोणीही खात्रीने सांगू शकणार नाही.एवढेच नव्हे तर जगातील कोणतीही व्यक्ती आपण पूर्व जन्मी कोण होतो हे सांगू शकणार नाही.तसेच पूर्व जन्म असतो की नसतो हेसुद्धा कोणी सप्रमाण सांगू शकणार नाही.म्हणतात ना मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही.परंतु आतापर्यंत कोट्यावधी व्यक्ती मरण पावल्या.परंतु त्यांनी स्वर्ग पाहिला की नरक हे सांगायला आतापर्यंत कोणीच परत आलेला नाही.आपणांला पूर्व जन्माविषयी अथवा पुनर्जन्माविषयी काही कर्तव्य नाही.

रोहिदासांच्या वडिलांची नावे राऊ, राहू, रघु, राघव, राघवदास व मानदास अशी आहेत.तसेच आईची नावे करमा, रघुराणी, रघुबनिया, घूरबनिया व भगवती अशी आहेत.परंतु प्रचारात राऊ व कर्मा अशी आहेत.ती दोघे पती-पत्नी चांभार होती.त्याचे पोटी रोहिदासाचा जन्म झाला.याबाबत कोणाचाही मतभेद नाही.सर्वांचे एकमत आहे.

**नामकरण:**

स्वामी रामानंदानी बालकास आशीर्वाद देऊन रामनामाबरोबर सुधामुत्ती बुटी चोखावयास दिली.तेव्हा बालक रडावयाचा राहिला आणि सर्वांना आनंद झाला.त्यावेळी स्वामीजीने 'रं रामाय नमः[माला तिलक दै नाम कराये, पाछै भजन सर्व डुलाये।
तव ही 'रं राम राम' सब गाए, सबही भाव भगति महं आये।
सवहूं के मनि भयो ल्हासू अस्थनपान करे रैदासू।
देहिं बधाई बाजे बाजै, घरि घरि मंगल कलस विराजै।
जनम कहत रैदास कौ, सुब पावत भगवंत।
करम के बंधन सब कटै, गावै दास अनंत॥
—संत रविदास की भक्तिसाधना, पृष्ठ ८.]'हा षड़ाक्षरी मंत्र उच्चारून नवजात शिशुचे 'रयदास' नावाने नामकरण संस्कार केले.'रयदास[ब्रिटीश शासन काळात भारतीय धनाढ्य लोकांना दिल्या गेलेल्या 'रायसाहेब' चा किताब ह्या अर्थाचा द्योतक आहे.]'नाव एका गंभीर अर्थाचा द्योतक आहे.'रयदास' चा अर्थ झाला 'रं' —संपत्ति ज्यांची दास आहे आणि दिव्य ज्योतिर्मय ब्रह्माचा सेवक आहे.अनंतदास वैष्णवने 'रं' अक्षराची व्याख्या एक दृष्टांत देऊन

चांगल्या प्रकारे केली आहे.तराजुच्या एका पारड्यात तुळशी पानावर 'रं' अक्षर लिहून ठेविले व दुसऱ्या पारड्यात जगातील धनसंपत्ती ठेवली तर तुळशीपानवाल्या पारड्याचे वजन भारी होईल.[तव तुलसी का पात मंगाया, देखन लोग सहर का आया।
पात मांहि लिष्यौ रंकारा, जा मै सकल विस्व कौ भारा।
घालि तराजू तोलन लागा, भयौ अचम्भ सोबत सा जागा।
सोना रूपा आंनि चढावा, मानिक मोती लै लै आवा।
वड़ी तुला मैं ले दल धारिया, तउ न होई पात सम सरिया।
—संत रविदासकी भक्तिसाधना, पृष्ठ ९.]

राघवदास चर्मकाराच्या घरी जन्मलेला 'रैदास' जणु काय दुसरे पिंगला[चर्मकार गृहे जातो द्वितीय इव पिंगलापतिः।
—संत रविदासकी भक्तिसाधना, पृष्ठ १०.]लक्ष्मीचे पती भगवान विष्णु होते.अगस्त्य संहितामध्ये रामानंद स्वामीच्या बारा शिष्यांचे वर्णन करताना ग्रंथकाराने 'रैदास' ['द्वादशादित्येस्तैः रैदास प्रभुति भिरर्क संनिभैः।
—संत रविदासकी भक्तिसाधना, पृष्ठ १०.]नाव दिले आहे.नाभादासजीने 'भक्तमाल' मध्ये शतशः 'रैदास' नाव दिले आहे.हा भक्त शिरोमणी 'रैदास' अथवा 'रविदास' ह्या दोन्ही नावाने प्रसिद्ध झाला."रैदास" नाव धनसंपत्ति देणारा तसेच अग्निस्वरूप ज्यातिर्मय ब्रह्माचा सूचक आहे.तर 'रविदास' शब्द सूर्यासमान तेजस्वी अर्थाचा वाचक आहे.

**बालपणः**

रोहिदासांचे आईवडील तसेच परिवारातील अन्य लोकसुद्धा सात्विक वृत्तीचे तसेच भगवतारायण होते.अशा परिवारात तसेच वातावरणात पालनपोषण होण्यामुळे बालक रोहिदासाचे मन भगवतभक्तिकडे झुकणे स्वाभाविक होते.तसेच रोहिदासास पूर्व जन्माच्या पुण्याईमुळे प्रभुभक्ती जन्मतः प्राप्त होती.रोहिदासाने आपल्या वाणीमध्ये अनेकवेळां भक्तिला 'पुण्य कर्माचे फळ' म्हटले आहे.अशा प्रकारे बाल रोहिदासाला जन्माबरोबर प्रभुभक्तिची प्रेरणा मिळाली होती.

ब्रिग्सचे म्हणणे आहे की, रोहिदास अठरा वर्षांचे असताना राम इत्यादी देवांची पूजा करू लागले होते.परंतु महात्मा अनंतदास लिहितात की, रोहिदासांचे वय जसजसे वाढू लागले तसतसे त्यांचे मनात प्रभुबद्दलचा विश्वास वाढू लागला.सात वर्षांचे वयात ते प्रभुची नवधा (नवविधा)[दिन दिन बड़ो भयो रविदासा,
मन मैं है हरि को विसवासा।
वरस सात कौ भयो है जब ही,
नौधा भगति दिढ़ाई तव ही॥
—रविदास दर्शन, पृष्ठ ६९.]भक्ती करू लागले.असे अनंतदासने 'रैदास की परची' मध्ये लिहिले आहे.तर नऊ वर्षांचे वयात त्यांना परमेश्वर भक्तिचे वेड लागले.त्यामुळे रोहिदासांचे आईवडिल चिंताग्रस्त झाले.तेव्हा त्यांनी त्यास वडिलार्जित जातीवंत चांभार कामात गुंतविला.परंतु रोहिदासांचे परमेश्वर भक्तिचे वेड कमी झाले नाही.साधुसंतांचे बाबतीत रोहिदास उदार होते.ते त्यांना कमी किमतीमध्ये जोडा विकत.तर कधी कधी साधुंना जोडा फुकटही देत.त्यामुळे रोहिदासांचे वडिल नाराज होत.परंतु रोहिदासांचे रामभक्तिचे वेड दिवसेंदिवस वाढतच चालले.

अनुक्रमणिका

**स्वामी रामानंदाचा उपदेशः**

"जो मानव (स्त्री-पुरुष) रामास शरण जात असे, तो दयाळू राम भक्ताचे कुळ-वंश, गरीब-श्रीमंत यांचा विचार न करता त्यांना आपलासा करतो.रामभक्तिमुळे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, चंडाळ तसेच पशू-पक्षी इत्यादी रामरूप होऊन पवित्र तीर्थांनासुद्धा पवित्र करणारे बनत.भक्ती करणे हा कुण्या एका जातीचा मक्ता नाही.भक्ती करण्याचा सर्व प्राणीमात्रांना अधिकार आहे." अशा प्रकारच्या स्वामीजींच्या प्रवचनाचा पंचगंगा घाटावर वसलेले असंख्य स्त्री-पुरुष लाभ घेत व आत्मसंतुष्ट होऊन जात.भक्तांच्या गर्दीत बसलेल्या रोहिदासांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात.रोहिदास 'रामादास' बनला.दहाबारा वर्षांचे वय असताना रोहिदास बहुश्रुत विद्वान बनला.रोहिदास विशेषतः साधूसंतांच्या संगतीमध्ये राहात.कुठेही कीर्तनाचा आवाज ऐकू आला की, ते तेथे जाऊन कीर्तन ऐकत बसत.

**रामभक्त रोहिदासः**

ज्या मानवाने 'राजा-राम' ["राजाराम की सेव न कीन्ही, कही रविदास चमारा"
—संत गुरु रविदास, पृष्ठ १७.]ची सेवा केली नाही.त्याचा मनुष्यजन्म व्यर्थ आहे.अशा प्रकारे काशी नगरीत होणाऱ्या कथा कीर्तनात भाग घेऊन रोहिदास उशिरा घरी पोहचत.तेव्हा त्यांना ऐकून घ्यावे लागत असे, परंतु वडिलांच्या ह्या रागवण्याचा बालक रोहिदासावर काही परिणाम होत नसे.फक्त त्याच्या मनात एक गोष्ट खटकत असे की, हिंदू समाजात एवढी जातपात आणि शिवताशिवत कशी आहे?ईश्वर एक आहे.राम, रहिम, अल्ला, ईश्वर इत्यादी त्या परमेश्वराची नावे आहेत.कोणी ब्राह्मण नाही ना शूद्र, ना हिंदू ना मुसलमान.ह्या सगळ्या स्वार्थी माणसांच्या कल्पना आहेत.जो हरिचा भक्त आहे;तोच खरा मानव.मनुष्य तर एकाच मातीपासून बनवलेली भांडी आहेत.कोणी पाण्डे-ब्राह्मण, वेद वाचतात तर कोणी मौलवी-फकीर कुराण वाचतात.निरनिराळी नावे धारण केली.तरी सगळी एकाच मातीची भांडी आहेत.[वेद कतेव पढे वे कुतवा, वे मुल्ला वे पाण्डे।
विविध विविध के नाम धराए, सब इक मिट्टीके भाण्डे॥
—संत गुरु रविदास, पृष्ठ १७.]उदाहरणार्थ-गाडगी, मडकी, लोटकी, रांजण, डेरा, कुंडी इत्यादी.

स्वामी रामानंदासारख्या खरा गुरु मिळाल्यामुळे संत रोहिदासांना आनंद झाला.चर्मकार जातित जन्म घेतल्यामुळे रोहिदासांच्या मनात निर्माण झालेली सामाजिक घृणा तशीच हीन भावना पेटलेल्या कापराप्रमाणे उडून गेली.नाहीशी झाली.चित्तामध्ये स्थिरता आली आणि ते पक्के रामभक्त बनले.

रामासारखा हिरा प्राप्त झाल्यावर रोहिदासांना आणखी कोणाला भेटण्याची आशा राहणार? ["हरि सा हिरा पाई कर, अरू कौन मिलन की आस"
—संत गुरु रविदास, पृष्ठ १७, १८]अशाप्रकारे रोहिदास बालवयात खरे रामभक्त बनले.श्री.वियोगी हरि यांनी संपादित केलेल्या 'संत सुधासार' ग्रंथात रोहिदासांच्या वाणीचा समावेश केला आहे.त्यात त्यांनी खालीलप्रमाणे परिचय दिला आहे:

| | | |
|---|---|---|
| जन्मसवंत | .. | कबीराकाळचा |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| जन्मस्थान | .. | काशी |
| जात | .. | चांभार |
| पिता | .. | रघू |
| माता | .. | घुरबिनिया |
| गुरू | .. | स्वामी रामानंद |
| आश्रम | .. | गृहस्थाश्रम |

* * *

## अनुक्रमणिका

# ५.कौटुंबिक जीवन

**भक्तिवेडा रोहिदासः**

मुलाचे भक्तिचे वेड वाढत चाललेले पाहून रघुने रोहिदासास वडिलोपार्जित धंद्यात घातले व रोहिदासही दुकानावर बसू लागले.काही दिवसातच रोहिदास चर्मोद्योग शिकले व चामड्यापासून सर्व वस्तु बनविणारे एक चांगले कारागीर बनले.रोहिदास मजबूत व सुंदर जोडे बनवू लागले.कधी कोणा साधुस अनवाणी चालताना पाहिले की, रोहिदास दुकानातील जोडा त्यांच्या पायात फुकट घालीत.रोहिदास रात्रंदिवस भजन, पूजन तसेच साधूसंताची सेवा करण्यात घालवू लागले.तेव्हा रघुला आपल्या मुलाची अशी उदार प्रवृत्ती व भक्तिवेडा स्वभाव पाहून त्यांचे लग्न करणेच योग्य असे वाटू लागले.

**रोहिदासांचा विवाहः**

त्या काळी बालविवाह करण्याची रीत होती.म्हणून त्यांचे आईवडिलाने बारा तेरा वर्षांचे वय असतांना रोहिदासास लग्नाच्या बेडीत अडकविले.[बाल बैस रविदास को, कीनौ पिता विवाह।
बड़ो भयो देखि कर्म नित, कह्यो खाट कर खाह।
कह्यो खाट कर खाहि, रास हमरे गृह जोई।
तांकी पनही बनाई, देई साधन सब खोई॥
—(यशवंत सिंह रोठोड़कृत पद प्रसंगमाल)—गुरु रविदास, पृष्ठ १४.](वधुवर दोघेही चांभार जातीतील चमकटैय्या उपजातीतील होते.) उद्देश असा की, रोहिदासास आपल्या जबाबदारीची जाणीव व्हावी.त्याने सुखाचा संसार करावा म्हणून चांगल्या घराण्यातील एका सुंदर मुलीबरोबर लग्न लावले.परंतु आईवडिलांची निराशा झाली.विवाहबंधनाचा रोहिदासावर काहीच परिणाम झाला नाही.रोहिदासाच्या पत्नीचे नाव लोना (अथवा लोणा) होते.तिला चर्मकार समाजात एका देवीच्या रूपात पूजले जाते.स्त्रिया आजसुद्धा आपल्या बालकाच्या सुरक्षेसाठी लोनास विनंती करतात.बालक आजारी असल्यास लोनाच्या नावाने स्मरण करतात.तसेच जादूटोणा, झाड-फूक इत्यादीचे तिच्या नावाचे मंत्र मिळतात.लोना म्हणजे लावण्यमयी.लोना सुंदर होती.त्यापेक्षा तिचे हृदय अधिक सुंदर होते.त्यामुळे रोहिदासांच्या सत्संगामध्ये दुधात साखर पडली.तिने रोग्याकडे दयाशील हृदयाने पाहताच औषधाशिवाय रोगी बरा होत होता.असंख्य आजारी मुले तिच्या दयाळू दृष्टिचा लाभ घेण्यासाठी तिच्या घरी येत व चांगले होऊन परत जात.मंत्र-प्रयोग करणारे या प्रकारे मंत्र म्हणत—

**"हूं हूं हूं हूं हृदय कमलमे हंसा हंसा हंसा ।**
**दया हुआी लोना माई की, बच्चा तू हो चंगा ।**
**दोहाई लोना माई की—(छूः!)**

लोना लग्नाच्या वेळी लहान होती.ती आपल्या पतीला काय समजवणार होती किंवा आपल्या सौंदर्याने त्यास काय आकृष्ट करणार होती?वैवाहिक बंधनात बांधूनही रोहिदास आपल्या भक्तिमार्गापासून विन्मुख झाले नाहीत.त्यांच्या साधुसेवेत तसेच सत्संग वृत्तिमध्ये काहीच फरक पडला नाही.वैवाहिक बंधनात राहूनही रोहिदासांची प्रवृत्ती भक्तिकडे उत्तरोत्तर वाढतच गेली.

अनुक्रमणिका

**रोहिदासाबद्दल ब्राह्मणांच्या तक्रारी :**

तरुण रोहिदासांने साधू-संताच्या सत्संगामध्ये राहाणे कोणालाच पसंत नव्हते.आईवडिल म्हणत, “अरे रोहिदासा घरचा धंदा बघ.साधुसंगत अन धर्मचर्चा करून फायदा काय?” घराबाहेरचे लोक म्हणत, “साधुसंगत, धर्मचर्चा करून व गुरू बनून सर्वांना उपदेश करणार.हे काम ठीक नाही.” तर काही ब्राह्मणांनी रघूकडे तक्रारी केल्या की, “तुझा मुलगा साधुबरोबर रात्रंदिवस राहून पळून जाऊ इच्छितो.दारोदार भीक मागेल.मग रडूनही उपयोग होणार नाही.” अशा दररोज तक्रारी ऐकून रघू घाबरला.

एके दिवशी संधी साधून रघू म्हणाला, “रोहिदासा, तू आता मोठा झालास.तुझी तरणीताठी बायको घरात बसून हाय.तू नेहमी गोसावड्याच्या संगतीत राहतोस.धंद्यात तुझं मन लागत न्हाय.हे तुझं वागणं बरं नव्हं.तुझ वागणं कुणालाच आवडत न्हाय.लोकांच्या तक्रारी ऐकून मला जीव नकोसा झालाय.तू स्वतः श्रम कर.अन मिळणाऱ्या पैशात तुम्हा नवराबायकोचं पोट भर.आतापर्यंत आम्ही तुला लहानाचं मोठं केल.,पण आता आम्ही तुम्हां दोघांना सांभाळू शकत न्हाय.” परंतु रोहिदास हे एका कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडून देत असे.

रोहिदास रामभक्ति करण्यात दंग असे.ते हाताने जोडे बनवत व तोंडाने रामनामही म्हणत.[जिव्हा सो ओंकार जप, हत्थन सों कर कार ।
राम मिलहि घर आई कर, कह रविदास विचार॥
–संत गुरु रविदास, पृष्ठ १९.]ते साधूसंतांना फुकट जोडा देत.जोडा विकत घेणाऱ्या गिऱ्हाईकाशी ते सौदेबाजी करीत नसत.गिऱ्हाईक जेवढे पैसे देई, तेवढे पैसे ते न मोजता पेटीत टाकीत असत.रघू रोहिदासास पुष्कळ समजावून सांगत असे की, [पिता त्रास दै बहु समझावे। कुल करनी करि कछु न कमावे।
बहु आदर करि संत बोलावै। मिले जो घरमे सब भुगतावे॥
(संत नित्यानंद का भक्तमाल) –गुरु रविदास, पृष्ठ १३.]असा माल लुटल्यावर आपण भाकरी कोठून खाणार?आपलं पोट कसं भरणार?परंतु रामभक्त रोहिदासावर त्याचा काहीच परिणाम होत नसे.रोहिदासाच्या भक्तीवेडामुळे धंदा व संसाराचे नुकसान होऊ लागले.अखेर कंटाळून रघुने आपल्या एकुलत्या एका मुलास त्याचे पत्नीसह वेगळे काढले.

**वेगळा संसार:**

रघुने वडिलोपार्जित संपत्तीचा योग्य हिस्सा दिल्याशिवाय रोहिदासास वेगळे काढले.घरामागील मोकळ्या जागेत राहण्यास व कामधंदा करून पोट भरण्यास सांगितले.रोहिदासाने वडिलाबरोबर वादविवाद न करता सर्व कबूल केले.[बडो भयो तव न्यारौ कीनौ, वांटे आवे सो वांटि न दीनौ।
राष्या वापरी पछिवारे, कछु न कह्यो रैदास बिचारे॥
(अनंतदासकृत रैदास परिचई)–गुरु रविदास, पृष्ठ १४.]आपल्या मनाप्रमाणे झाल्याबद्दल रोहिदासास आनंद वाटला.हाआनंद आपल्या तरुण पत्नीबरोबर मनसोक्त वागता येईल म्हणून झाला नाही.तर हा आनंद एकांतामध्ये परमेश्वराची भक्तिसाधना करण्यात वडिलांचा विरोध होणार नाही म्हणून झाला.

अनुक्रमणिका

घराच्या पाठीमागील मोकळ्या जागेत रोहिदासाने एक साधी झोपडी बांधली.तेथे रोहिदास पत्नी लोनाबरोबर राहू लागला.[वड़ोई रैदास हरी, दरसन सो प्रीति करी।
पिता न सुहाई, दई ठौर पिछवार ही॥
हुतो धनपाल, कन दियो हुन हाल तिया।
पति सुख जाल अहो, कियो जब न्यार ही॥
गांठे पग आसी, कहु वात न प्रकासी।
ल्यावे खाल करे जूती, साधुसंतको समांर ही॥
डारि एक छानि कीयो, सेवा को सुस्थान।
रहे चौडे आप जनि, वांटि पावे धार ही।
रहे चौडे आप जानि, वांटि पावे धार ही।
–संत गुरु रविदास, पृष्ठ ४९.]असा नाभादासकृत भक्तमालमध्ये उल्लेख आहे.घरची श्रीमंती असूनही वडिलाने रोहिदासास आर्थिक मदत केली नाही.रोहिदास चामडे विकत आणून नवीन जोडे बनवित तसेच जुने जोडे दुरुस्त करीत.[सीधे चाम मौली ले आवे, ताकी पन ही अधिक वनावे।
(रैदास परियची)–गुरु रविदास, पृष्ठ १४.]जे पैसे मिळत त्यामध्ये दोघे पतीपत्नी आत्मसंतोषाने उदरनिर्वाह करू लागले.पतीस साथ देताना लोनाने सर्व प्रकारचे कष्ट सहन केले.वडिलापासून आम्ही वेगळे झालो ही गोष्ट रोहिदासांनी कोणालाही सांगितली नाही.सीतारामाची मातीची मूर्ती बनवून ते भजन व पूजन तेथेच करू लागले.जस जसे दिवस जाऊ लागले, तस तसे रोहिदासाचे हृदयात हरिभक्ती वाढत चालली.[दिन दिन वड़ो भयौ रैदास, दिन दिन हिरदे हरि कौ वासु।
–भक्त रत्नावली, पृष्ठ ४१.]

प्रियादासाने भक्तमालेच्या टीकेत लिहिले आहे की, रोहिदासाचा अल्लडपणा व परमेश्वर भक्ति-भाव पाहून, त्याचे आईवडिलाने घरामागे झोपडी बनवून राहण्यास सांगितले.त्याप्रमाणे रोहिदास झोपडी बांधून राहू लागला.आईवडिलाकडून त्यास आर्थिक सहाय्य मिळाले नाही.जुने जोडे सांधून आणि विकत घेतलेल्या नवीन चामड्याची पादत्राणे बनवून तो आपला उदरनिर्वाह करू लागला.उत्साह, बुद्धी व श्रमपूर्वक कामे केल्यावर उन्नती होण्यास उशीर लागत नाही.थोड्याच दिवसात रोहिदासाने धंद्यात जम बसविला.रोहिदास प्रभु भजनात आता अधिक वेळ घालवू लागले.साधु संगतीमध्येही बराच वेळ जाऊ लागला.संध्याकाळी त्यांचे झोपडीवर खूप संत्संग जमू लागला.दिवसेंदिवस सत्संगामध्ये येणारांची गर्दी वाढू लागली.गुरु रामानंदाच्या संपर्कामुळे व दररोज त्यांच्या सत्संगामध्ये सामील होण्यामुळे रोहिदासांचे ज्ञान भांडार एवढे वाढले की, ते प्रत्येक विषयावर प्रवचन देऊ लागले.रोहिदास आपल्या प्रवचनात वेद, उपनिषदे आणि दर्शन शास्त्रांच्या व्याख्या सांगू लागले.विद्वान, साधू महात्मेसुद्धा रोहिदासांचे प्रवचन ऐकण्यात दंग राहात असत.आध्यात्मिक विषयावर शास्त्रार्थ तसेच वादविवादही चालत असे.त्यामुळे त्यांच्या साधुत्वाची भक्तिची ख्याती दूर दूरपर्यंत पसरू लागली.लोकही त्यांचा उपदेश ऐकण्यास येऊ लागले.त्यांना गुरु करून घेऊ लागले.भक्ति आणि सिद्ध भावामुळे गुरु रोहिदासांची प्रसिद्धी खूपच वाढली.त्यामुळे मोठमोठे पंडित त्यांचे चरण वंदू लागले.

संत रोहिदासांना विजयदास नावाचा एक मुलगा होता[आचार्य पृथ्वीसिंह आजाद, गुरु रविदास, पृष्ठ १६.]परंतु तो अप्रसिद्धच राहिला.विजयदासाचे जन्मानंतर रोहिदास व लोना अविरक्तच राहिले.रोहिदासाचे पुत्र विजयदास पूर्ण संतवृत्तिचे होते.त्यांनीसुद्धा धर्मप्रचाराचे तसेच समाजसुधारणेचे कार्य केले.विजयदासला एक मुलगा होता.त्याचे नाव विनयदास होते.विनयदासाचा जन्म अयोध्येमध्ये झाला.विनयदासाला दोन मुले झाली.मोठ्याचे नाव उदयदास आणि छोट्याचे नाव गोपालदास होते.गोपालदासला दोन मुलगे झाले.त्यापैकी एकाचे नाव जोगीदास व दुसऱ्याचे नाव वीरभान होते.वीरभानला दोन मुलगे झाले.त्यापैकी एकाचे नाव धरमदास व दुसऱ्याचे नाव करमदास होते.धरमदास पुढे ‘धरमसिंह’ ह्या नावाने प्रसिद्ध

अनुक्रमणिका

झाले.त्यांना गुरु गोविंदसिंहाच्या पाच प्याद्यामध्ये सामील करून घेतले.धरमदास आणि करमदासने आपल्या वडिलांच्या आज्ञेनुसार दिल्ली, पंजाबला धर्मप्रचाराचे क्षेत्र बनविले होते.त्यात सध्याचा हरियाना तसेच पाकिस्तानसुद्धा सामील आहे.




**उद्योगी रोहिदासः**

रविदास वाणी व अनंतदास यांच्या रचनेवरून स्पष्ट होते की संत रोहिदास उदरनिर्वाहासाठी जोडे बनविण्याचा वडिलार्जित धंदा आयुष्यभर करीत राहिले.['रविदास' हौं निज हत्थहि, राखौ रांवी आहे।
सुकिरित ही मम धरम है, तारेगा भव पार॥
*(दर्शन ११७)*—गुरु रविदास, पृष्ठ २३.]रोहिदासांनी चामड्यासाठी कोणत्याही पशूची हत्त्या केली नाही.फक्त मेलेल्या पशूंचे चामडेच त्यांनी आपल्या धंद्यात वापरले.रोहिदास बाजारातून असे अहिंसक चामडेच खरेदी करून आणीत व त्याचेच नवीन जोडे बनवीत.तसेच जुने जोडेही दुरुस्त करीत.त्यावरच ते आपला उदरनिर्वाह करीत असत.[सीधौ चाम मौलि लै आवै, ताकि पन ही अधिक बनावे।
(अनंतदासकृत रैदास परचई)—गुरु रविदास, पृष्ठ १४.]

संत रोहिदासाच्या परिवाराचे पोत्र आणि प्रपौत्र पर्यंतची माहिती संत करमदासद्वारा लिखित परियचीमध्ये मिळते.परंतु यापुढील परिवारातील लोक कोण कोण आणि कुठे कुठे भारत देशात पसरले याची काही माहिती मिळत नाही.संत करमदासाने संत रोहिदासांच्या पारिवारिक जीवनाची कथा लिहून ठेवली आहे.[रविदास अरधांगी भगवती लूना।
सेवा धरम त्यागै कबहू ना॥
देवी मान सब पूजा करै।
लूना नामु सुनी प्रेतभी डरे॥
लूना नामु लियौ दुःख हरै।
लुना कुंड महं संकट जरै॥
संकट मोचनहारी लूना।
दखिअन करि रखवादी लूना॥
तिस लूना की कूख भई हरि।
पूत रत्न सों हटिनु भरि॥
विजयदास तिस नाम धरायौ।

अनुक्रमणिका

करनी करि कै भगत कहायौ॥
सन्त वृति सुत आगिआ कारी।
तिस करि आगिआ किनहु न टारी॥
विजयदास जु वड प्रतापी।
जाई अजुधिया गद्दी थापी॥
मन्दिर अरु चटसाला उसारे।
आवै उंहांचलि संत पियारे।
रविदास पदे सभै मिली गांवै।
वेदन केरि कथा सुनावै॥
धरम ग्यान करि गंग वटाई।
द्वैत भाओ सव्व दियो मिटाई॥
संगति पंक्ति कै भेद मिटायौ।
नीचन कुंचन संग बैठायौ।
चार वरन कौ रहयौ न शरा।
राम भजै सोई राम को प्यारा॥
**दोहा**—रविदास गुरु कै सन्त सुत, पुरी सब की आस।
सब कै मुख सों निक्सयो, जै जै जै रविदास॥
आचार्य पृथ्वीसिंह आजाद—युग प्रवर्तक संत गुरु रविदास.
संत करमदासजी स्वतः खाली काव्य लिहितात—
विजयदास करि सुत विनै दासा।
सब भगतानि करि पुरी आसा॥
जो कोऊ सत संग भंहि आयो।
राम ब्रह्म को जाप जपाओ॥
विजयदास करि सुत विनयदासा।
रमि जापै जिमि रवि प्रकासा॥
श्री राम जू प्रगटे जहां।
विनयदास जू जनमे तहां॥
राम नाम सबही को जपायो।
रविदास गुरु की कीरती गायौ॥
तिन्ह कै सुत उदैदास कहायो॥
सन्तन्हि माह तिन नाम कमायो॥
उदै दासू जू ग्यान प्रवीना।
गुरु उपदेस चमरन को दीना॥
उदै दास करि भ्रातु गोपाला।
निस दिन फेरे राम करि माला॥
राम रुप तिस की सन्ताना।
जोगीदास अरु वीर भाना॥
**दोहा**—गोपालदास सुत वीरभान साधु सन्तन कै दासु।
देखन पै यूं लागवै जूं दुनिया रविदास॥
वीरभान भगति महं पुरा।
धरम हेतु तस्यो बनि सूरा॥
साधु पन्थ करि सेवा किन्ही।
औरंगजेब सो टकर लीन्ही॥
तिन्ह कै गेह दो सुत जाये।
धरमा करमा नाम धराये॥
साधु भेष जबहि धार यो।
दासु कहि कै सब हिन पुकारयो॥
धरमदास मम ज्येष्ठ भ्राता।
परमसन्त वेदनको ग्याता॥
करमदास रविदासहु चाकर।
जनसेवा तेहि नवसो ठाकूर॥
आग्या गुरु पिताकी पाकर।
वस्यो हस्तिनापूर मे आकर॥

आश्रम अपनो आपु उभारा॥
सन्त पथको कियो पसारा॥
हरियाणा पंच नद को देसा।
गांव गांव दियो धरम संदेस॥
सूने हुए सवै जन जागे।
गुरु मारग पै चालत लागे॥
ऐसो आज गैवी रविदासा।
अंधकार को कियो विनासा॥
रविदास गुरु की जय जयकारा।
धरि धरि लागै करन चमारा॥
**दोहा**—परम पुरुष रविदास कौ जाने सव संसार।
जिहि किरपा सौ उधरे पतित दिनु नर नार॥
—युग प्रवर्तक संतगुरु रविदास.]

संत रोहिदासाचा प्रभु भजनात बराच वेळ जात असे.उरलेल्या वेळात ते धंदा करीत.त्यामुळे त्यांचे उत्पन्न थोडे असे.[प्रभु भगति श्रम साधना, जंग मंह जिन्हहि पास।
तिन्हहिं जीवन सफल भयो, सत्त भाषै 'रविदास' ॥
—(दर्शन ११८)—गुरु रविदास, पृष्ठ १५.]त्यामुळे त्यांना गरिबीत जीवन जगावे लागले.संत रोहिदासांचे नातेवाईकही त्यांचे गरिबीवर हंसत.[दारिदु देखि सभ कौ हंसे, ऐसी दसा हमारी।
(श्री आदिग्रंथ, वाणी ११९)—गुरु रविदास, पृष्ठ १५.]तरीदेखील संत रोहिदास तत्त्व सोडून जगले नाहीत.हिंसा केलेल्या पशुचे कातडे त्यांनी धंद्यासाठी कधी वापरले नाही.श्रम करुन मिळेल त्या उत्पन्नामध्येच ते आपल्या उदरनिर्वाह करीत.

### रोहिदासांचे नामधनः

नामधन हेच खरे धन असे रोहिदास मानीत असे.तसेच ते साधुसंतांची सेवा करण्यात आनंद मानत असत.म्हणून त्यांनी संसारिक सुख व पैसा यांना महत्त्व दिले नाही.भक्ती, सेवा आणि विरक्ती यांचा त्रिवेणी संगम रोहिदासाचे ठायी झाला होता.संत रोहिदास रामभक्तीमध्ये रममाण होत असत.मंदिराच्या पायऱ्यावर कित्येक तास ध्यानस्थ बसत.साधुसंताबरोबर कित्येक दिवस गांवोगाव फिरत.रोहिदासांच्या गैरहजेरीत लोना झोपडीत एकटी राहात असे.घरी इतके द्रारिद्र्य होते की, काही दिवस तिला उपाशी राहावे लागले होते.त्यामुळे पति परत आल्यावर तिला खूप आनंद होई.रोहिदास काम मिळाल्यास धंदा करीत.जोडे शिवत.भजन करीत.यात्रेकरू अथवा गिऱ्हाईकाबरोबर ईश्वरभक्तीवर चर्चा करीत.त्यांचे ज्ञान ऐकून गिऱ्हाईक मोठ्या आदराने रोहिदासांचा निरोप घेऊन जात असत.हे पाहून पत्नी लोनास समाधान वाटे.रोहिदासांची वाणी ऐकून ती स्वतः तहानभूक विसरत असे.रोहिदासाच्या भजनात ती आपली गरिबी विसरून जाई.मिळेल त्या वस्त्रात व उरलेल्या अन्नात ती समाधान मानीत असे.अशा प्रकारे लोनाने रोहिदासाच्या भक्तिला संसारात साथ दिली.त्यातच तिने आपल्या संसाराची इतश्री मानली.

* * *

अनुक्रमणिका

# ६.गंगास्नान—ब्राह्मण चर्चा

ज्येष्ठ पौर्णिमेचा दिवस उगवला.त्या दिवशी गंगास्नान[बख्शीदास कृत 'असली रैदास रामायण' पृष्ठ २१.]करण्यासाठी सर्वजण जाऊ लागले.ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे सर्व गंगा किनाऱ्यास जात असताना दिसत होते.परंतु त्यामध्ये शूद्र वर्णाचा कोणीही दिसत नव्हता.आणि कोणी शुद्राने जाण्याचा प्रयत्न केला तर उच्चवर्णीय त्यास मारहाण करीत.त्रास देत.

अशावेळी रोहिदासाचे मनात गंगा माहात्म्याचे विचार घोळू लागले व मोठ्या आनंदाने गंगा स्नानास चालले.परंतु मनात उच्च वर्णीयांचे भय होतेच.निरनिराळ्या देशाहून स्त्री-पुरुष मोठ्या आनंदाने गंगा स्नानास आले होते.कितीतरी योगी, ज्ञानी, ऋषी-मुनी गंगा स्नानास आले होते.गंगाकिनारी लोकांची खूप गर्दी झाली होती.

भक्त रोहिदास ईश्वराचे स्मरण करीत गंगा किनारी पाण्यात उतरले व मोठ्या आनंदाने गंगास्नान करू लागले.त्यास पाहून आजुबाजूचे उच्चवर्णीय लोक आपसात म्हणू लागले की, "हरिभक्ती करणारा आणि सूर्यासमान तेजस्वी व सुंदर राजकुमार कुठला आला आहे?"

काही ब्राह्मण—पंडीत मोठ्या उत्कंठेने रोहिदासाजवळ गेले.एक ब्राह्मण म्हणाला, "राजकुमार, [पं.गिरजा शंकर मिश्र 'पनम' कृत 'रविदास रामायण' पृष्ठ २१.]आपण आपला परिचय सांगाल कां?" दुसरा ब्राह्मण म्हणाला, "आपला जन्म कोणाच्या घरी झाला?" तिसरा म्हणाला, "आपल्या जातीचे नांव काय?" चौथा ब्राह्मण म्हणाला."आपण कोणत्या गावी राहता?" पांचवा ब्राह्मण म्हणाला, "आपल्या आईवडिलांची, कुटुंबातील सर्वांची माहिती सांगा.आम्ही सर्व ऐकण्यास उत्सुक आहोत." सहावा ब्राह्मण म्हणाला, "आपल्या कुळाचे नाव ऐकून आमचे हृदय प्रसन्न होईल.सत्यासारखे तप नाही.तर असत्य बोलणे म्हणजे नरकाची निशाणी आहे.असे वेदशास्त्रात सांगितले आहे.म्हणून सत्य हाच सत्यनारायण आहे."

ब्राह्मण पंडितांची निर्मळ वचने ऐकून संत रोहिदासांना आनंद झाला व ते त्यांना म्हणाले, "मी तुम्हांला माझा सत्य इतिहास सांगतो.असत्यासारखे दुसरे पाप नाही.म्हणून आम्ही नेहमी सत्याची पूजा करतो.सत्य हाच सत्यनारायण.प्राण गेले तरी चालतील परंतु आम्ही खोटे कधीच बोलत नाही.ऐका, माझे नाव रोहिदास, माझे गाव काशीजवळ मांडूर आहे.माझ्या वडिलांचे नाव राऊ असून, आईचे नाव कर्मा आहे.मी चँवर वंशाचा-विख्यात चांभार[मेरी जाति विख्यात चंमार

—संत रविदास की भक्तिसाधना, पृष्ठ १५.]जातीचा आहे.माझा धंदा चांभारकाम, प्रभु रामचंद्राचीभक्ती करतो.माझे गोत्र विकल असून, माझे कुल अंधकाराचा नाश करणारा सूर्य (उपासक) आहे.माझ्या वंशाची रीत निर्मळ असून, आम्ही सर्व हरिभजन करीत असतो.परमेश्वराची व संतांची सेवा करण्यात आम्ही स्वतःस धन्य समजतो.आम्ही सर्वांना समान मानतो.आम्ही वर्णव्यवस्था विसरून, आम्ही सर्वांचे स्वागत करतो.हे मी तुम्हांस खरं तेच सांगत आहे."

रोहिदासांची हकिगत ऐकून ब्राह्मण संतापाने म्हणाले, "अरे शुद्रा, तू नीच जातीचा असून, तू पवित्र अशा गंगेत स्नान केलेस." दुसरा ब्राह्मण म्हणाला, "तू नीच कृत्य करून, आम्हा सर्व ब्राह्मणांचा अपमान केलास." तिसरा ब्राह्मण म्हणाला, "तू अस्पृश्य आहेस, तू स्वतःच्या वंशास धर्मवान म्हणतोस.तू लहान तोंडी

मोठा घास घेतोस.तुला ब्राह्मणांचे महत्त्व माहीत नाही." चौथा ब्राह्मण म्हणाला, "अरे शुद्रा, तू आमच्या आज्ञेशिवाय गंगास्नान का केलेस?आमचे शरीर अपवित्र होत आहे.वादविवाद करण्याऐवजी तू येथून आपल्या गावी पळून जा." पांचवा ब्राह्मण म्हणाला, "अरे मुर्खा, तुला लाज कशी वाटत नाही?तू गंगेचे पवित्र पाणी घाण केलेस.तुला तीर्थ करण्याचा अधिकार नाही.तुला तुझा प्राण वाचवायचा असेल तर तू येथून तुझ्या मांडूर गावी त्वरित निघून जा."

वरीलप्रमाणे ब्राह्मणाचे बोलणे ऐकून ज्ञानी रोहिदास म्हणाले, "पंडितजी, आता माझं थोडं ऐका.तुम्ही विनाकारण क्रोध कां करता?पांच तत्त्वापासून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र ह्या सर्वांची उत्पत्ती झाली आहे.पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश ह्या पांच तत्त्वापासून शरीर बनले आहे.आत्मा अमर आहे;हे जो मानणार नाही तो एक मूर्ख होय.जात ही जीव-प्राणात नसते.जातीभेद करणे किंवा पाळणे हा मुर्खपणा आहे.मानवाची जात मानव आहे.अन्य जात समजतो, तो पापी मनुष्य होय.ईश्वरानेच सर्व योनी निर्माण केल्या आहेत.पंचमहाभूतापासून शरीरप्रकृती निर्माण झाली आहे.त्यामध्ये वेगळेपणा नाही.मानवाच्या जाती वेगवेगळ्या होऊ शकत नाहीत.जो वेगवेगळ्या जाती मानतो तो धर्मद्रोही होय.आम्ही वेद वाक्य मानतो.प्रेमच आमचा वेद.आम्ही सर्वांना समान मानतो.जन्माने भेद होत नसतो.जो जसे कर्म करील, तसे तो फळ भोगील.जो जसा कामधंदा करतो, तसा तो बनतो.आपण सर्व एकाच जातीचे आहोत.जे वर्णव्यवस्था मानतात, ते मूर्ख होत.जे वर्णव्यवस्था ठरवितात, ते धर्मद्रोही होत.जो ब्रह्म जाणतो, तो ब्राह्मण होय.तुमच्या ब्राह्मणी अभिमानाने तुम्ही विवेक सोडला.खोट्या कर्मामुळे तुम्ही मार्गभ्रष्ट झाला आहांत.हे विश्व ईश्वराने निर्माण केले आहे.त्यामध्ये कोणी भेदभाव करू नये.जो धर्माबाबत द्रोह करतो, त्याच्यासारखा नीच कोणीच नाही.तुम्ही स्वतःला जगात व्यर्थ उंच समजता.परंतु जगात उंच-नीच कोणीच नाही.फक्त अधर्मीच नीच असतो.तुम्ही नेहमी नीच कामे करता.तुम्ही रात्रंदिवस दुसऱ्याडून कपटाने दान घेता पण स्वतः दुसऱ्या कोणासही दान देत नाही.तुम्ही केवळ स्वार्थ जाणता.तुम्ही परमार्थ काय जाणणार?स्वार्थी आणि अभिमानी ब्राह्मणाला पापी प्राणी म्हणतात.जे धर्माचे ढोंग करतात, अंगाला चंदनाचे लेप लावतात, ते धर्मद्रोही होय.ज्यांचे मनात हरिभक्ति आहे त्याच्यासारखा उच्च दुसरा कोणीच नाही.जो पुरुष परोपकारी आहे, त्यांच्यासारखा दुसरा सज्जन नाही.ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य अथवा शुद्र कोणीही असो, हरिभक्तिशिवाय कोणाचेही कल्याण होणार नाही."

रोहिदासाच्या तोंडचे मधूर पांडित्य ऐकताच सगळे ब्राह्मण पंडित आश्चर्यचकित झाले.त्यांचे तोंडून एक शब्दही निघेना.सगळे ब्राह्मण आपसात कुजबुजू लागले की, "ह्यांच्या ज्ञानापुढे आपले काही चालणार नाही." असे पाहून त्यातील एक ब्राह्मण रोहिदासाला म्हणाला, "अरे गरीब बालका, तू बडबडकाय करतोस?आम्ही तुला पुन्हा केव्हातरी पाहून घेऊ." असे म्हणून सगळे ब्राह्मण पराभव वृत्तीने आपआपल्या मार्गाने निघून गेले.

धर्मशास्त्रावर व तत्त्वज्ञानावर रोहिदास चांभार वादविवाद करून ब्राह्मणांना हरवतो;याचे ब्राह्मण पंडितांना तसेच धर्ममार्तंडांना कुतुहल वाटू लागले.काही ब्राह्मण पंडित संत रोहिदासांना भेटून चर्चा करू लागले.रोहिदास शालेय शिक्षण घेऊ शकले नाहीत, परंतु वेद, उपनिषदे, गीता याचे श्रवण करून त्यांनी ज्ञान मिळविले.त्यांचेवरील शास्त्रार्थ आत्मसात केला.रोहिदास शास्त्रार्थ शिकवतो याचे काशीतील पंडितांना वैशम्य वाटू लागले.त्यांचा अहंकार जागृत झाला.त्यांचेकडून रोहिदासांना वादविवादाची आव्हाने येऊ लागली.रोहिदासही त्यांची आव्हाने स्वीकारून शास्त्रार्थ करू लागले.चर्चेतून पूर्णज्ञान प्राप्त होते.अशी

अनुक्रमणिका

रोहिदासांची खात्री झाली.पूर्ण ज्ञानप्राप्तीसाठी ते सर्वत्र फिरू लागले.वादविवादासाठी त्यांना बरेच दूरवर जावे लागले.अशा प्रकारे त्यांचा उत्तर भारतामध्ये सर्वत्र प्रवास घडला.

अनुक्रमणिका

# ७.गुरुस्वामी रामानंद

संत रोहिदासांचा नावलौकिक सर्वत्र पसरू लागला.त्यांचेबरोबर वादविवाद करण्यासाठी भक्त कबीर काशीस आले.रोहिदासांनी त्यांचे स्वागत केले.दोघात शास्त्रार्थावर बराच वादविवाद झाला.परंतु त्यामध्ये भक्त कबीर हरले गेले.भक्त कबीराचा पराभव केल्यावर संत रोहिदासांचा आत्मविश्वास बराच वाढला.मग ते स्वतःहून काशी विद्यापीठाचे शंकराचार्य यांचेकडे गेले.तेथे दोघात एक दिवस व एक रात्र अखंडपणे शास्त्रार्थावर वादविवाद झाला.त्यामध्ये रोहिदास पराभूत झाले.तेव्हा त्यांनी शंकराचार्यास प्रणाम केला.

रोहिदासाचे शास्त्रार्थावरील प्रभुत्त्व पाहून शंकराचार्यांना आश्चर्य वाटू लागले.केवळ श्रवणाने एवढे प्रचंड ज्ञान मिळविले.त्याबद्दल शंकराचार्यांनी रोहिदासांची प्रशंसा केली.'काशीमाहात्म्य' नावाच्या ग्रंथात उल्लेख आहे की, शंकराचार्यांनी एका शुद्राशी शास्त्रार्थ केला.[पुरी काशी समागम्य कबीरं रामतप्तरम ।
जित्वा मत विवादेन शंकराचार्य मागताः॥
तयोविवादममवद हीरान्नं मतांन्तरे ।
पराजितःस रविदासो नत्वा ते दिज सन्तमम ।
रामानंद मुपागभ्य तम्य शिष्यत्व मागतः॥
(भविष्य पुराण), सत्यदेव शिंदे—श्री.संत रोहिदास, पृष्ठ २२.]परंतु त्या शुद्राच्या नावाचा उल्लेख केला नाही.परंतु भविष्यपुराणाच्या चौथ्या खंडात एक प्रसंग आहे.त्यामध्ये सुर्याचा द्वितीय पुत्र पिंगलापतीने मानदास चांभाराच्या घरी जन्म घेतला.त्याचे नाव रैदास ठेविले.रैदासने काशीत कबीराबरोबर वादविवाद केला.त्यांचा पराभव केल्यावर ते शंकराचार्याजवळ आले.दोघात एक दिवस एक रात्र शास्त्रार्थ झाला.शेवटी त्यामध्ये रैदासचा पराभव झाल्यावर त्यांनी शंकराचार्यास प्रणाम केला.हा शास्त्रार्थ काशीच्या पश्चिमेस मण्डूर येथे, ज्याचे प्राचीन नाव 'मडुआडिह' आहे.तेथे झाला.हे शंकराचार्य आदि शंकराचार्य नसून, त्यांचे उत्तराधिकारी होत.

शंकराचार्याकडून हार खावी लागली;याची रोहिदासाच्या मनात खंत लागून राहिली.आपले ज्ञान अपूर्ण असून, ते पूर्ण केले पाहिजे.पण असा ज्ञानी पुरुष कोण, कुठे असणार?आपणांस गुरु करून घेतल्याशिवाय आपल्या ज्ञानाला पुर्णत्व येणार नाही.म्हणून असा ज्ञानी गुरु कुठे मिळणार याची ते संत महंताकडे चौकशी करू लागले.त्यांनी भक्त कबीराची भेट घेतली.त्यांनी कबीरांना झालेला सर्व प्रकार सांगितला.पराभवाची खंत व्यक्त केली.तेव्हा भक्त कबीरांनी खरा ज्ञानी पुरुष स्वामी रामानंद असल्याचे सांगितले.तेव्हा रोहिदासांनी स्वामी रामानंदाची भेट घेण्याचे ठरविले.संत रोहिदास भक्त कबीराचा निरोप घेऊन निघाले.

महाकवि बख्शीदास कृत[बख्शीदास कृत 'असली रैदास रामायण', पृष्ठ २७.]व पं.गिरजाशंकर मिश्र 'पुनम[पं.गिरजाशंकर मिश्र (पूनम), रविदास रामायण, पृष्ठ २५.]'कृत ग्रंथात रोहिदासांनी स्वामी रामानंदास गुरु करण्याबाबत जी कथा दिली आहे तिचा सारांश असा—

संत रोहिदास यांच्या डोक्यात सद्गुरु करण्याचे विचार घोळू लागले.विचाराच्या नादात ते रस्ता सोडून जंगलाच्या रस्त्याने चालले.निबिड अरण्यात गेल्यावर वाटेत त्यांनी एक तपस्वी पाहिला.त्यांच्या चेहऱ्यावर तेज चमकत होते.त्यांची अंगकांतीही सतेज दिसत होती.ते पद्मासन घालून समाधी लावून बसले

अनुक्रमणिका

होते.स्वामी रामानंदाला पाहून संत रोहिदासांना खूप आनंद झाला.त्यांनी जवळ जाऊन वाकून त्यांचे चरणाचे दर्शन घेतले.मनात गुरु करण्याच्या आशेने रोहिदास त्यांचेसमोर उभे राहिले.स्वामी रामानंदाने समाधी सोडून नेत्र उघडले.रोहिदासांची श्रद्धा पाहून ते म्हणाले, "तू कोण, कोठून, कां आलास?" तुझ्या आईवडिलांचे नाव काय?ह्या घनदाट जंगलात वाघ, साप असे हिंस्त्र प्राणी आहेत.तरी उशीर न करता त्वरित घरी जा."

रोहिदास म्हणाले, "महाराज, माझे नाव रोहिदास, माझं गाव काशीजवळचे मांडूर आहे.मी प्रभुचरणाच्या आशेने आलो आहे.माझ्या आईचं नाव करमा व वडिलांच नाव राऊ.आम्ही शूद्र असल्यामुळे सर्वजण आम्हांस त्रास देतात.सद्गुरुच्या कृपेशिवाय संसाररूपी सागर तरता येणार नाही.म्हणून तुम्ही मला शिष्य बनवावे.मी आपली सेवा करीन.आपण माझी इच्छा पूर्ण करावी.मला धनदौलतीची किंवा दुसरी कोणतीही इच्छा नाही."

रोहिदासांची विनंती ऐकून स्वामी रामानंद म्हणाले, "बालका, तुझी बुद्धी फिरली आहे.आम्ही वनवासी असून, सर्व सुखाचा त्याग केला आहे.आम्ही प्रभुभक्ती करीत असतो.आम्हांस धनदौलतीची इच्छा नाही.तेव्हा मी तुला शिष्य का करावे?वना, जंगलात आमचे राहणे.आम्हाला कोणत्याही वस्तूची आशा नाही.आम्ही सर्व परिवार त्याग करुन, आम्ही प्रभुनामाच्या आधाराने जीवन कंठीत आहोत.आम्हांस मान-सन्मान नको.आम्ही कोणाकडून काही मिळेल अशी इच्छा करीत नाही.तेव्हा मी तुला शिष्य कसा बनवू?तेव्हा तू हट्ट न करता परत निघून जा.नाहीतर मी क्षणार्धात तुला भस्म करून टाकीन."

हे ऐकून रोहिदास म्हणाले, "महाराज, आपण असे रागावू नका.मी ज्ञानप्राप्तीच्या आशेने आपल्याकडे आलो आहे.मी बालक असून, तुम्हीच माझे माता-पिता आहांत.तुम्ही पारस आहांत.माझ्यासारख्या लोखंडाचे सोने करा.तुम्ही विद्वान असून मी मूर्ख आहे.तुम्ही सद्गुरु असून, मी तुमचा दास आहे.आपण अमृत असून, मी विषासमान आहे.तुम्ही स्वाती नक्षत्रातील पाऊस असून, मी तहानलेला चातक पक्षी आहे.मी तुम्हांला सोडून कोठे जाऊ?तुम्ही सुवासिक चंदनवृक्ष आहांत, तर मी लहानसे रोपटे आहे.तुम्ही ज्ञानदीप-ज्योत आहात, मी पतंग आहे.मी पतंगाप्रमाणे प्राण घालवीन, परंतु मी तुमची संगत सोडणार नाही.आपण चुंबक आहांत.मी लोखंड आहे.गुरु तारणहार आहे.प्रभुशिवाय अंधःकार असतो.गुरुशिवाय ज्ञानप्रकाश कसा मिळणार?गुरुशिवाय ईश्वर भेटणार नाही.गुरुशिवाय हृदयात भक्ती येणार नाही.गुरुशिवाय जीव दुःखी राहाणार.गुरुशिवाय सन्मार्ग मिळत नाही.गुरुशिवाय मुक्ती मिळत नाही.गुरुशिवाय अज्ञान नाहीसे होत नाही.गुरुशिवाय ज्ञान मिळत नाही.गुरुशिवाय शांति प्राप्त होत नाही.गुरुशिवाय लाज कोणी राखत नाही.गुरुशिवाय साधना मिळत नाही.गुरुशिवाय प्राणास चैतन्य मिळतनाही.गुरुशिवाय प्रार्थना सुचत नाही.गुरुजी, तुम्ही मनात आणल्यास माझी मनोकामना पूर्ण होईल.म्हणून मी तुम्हांस पुन्हा पुन्हा विनंती करतो की, मला तुम्ही आपला शिष्य बनवून घ्या.मुनिनाथ तुम्ही चतुर नावाडी आहांत.संसाररुपी सागरातून माझी नौका पार पाडा.मलियागिरीसमान तुम्ही ज्ञानी गुरु आहांत.माझ्यासारख्या सेवकावर कृपा करा.तुम्ही सुखदायी कल्पवृक्ष आहांत.गुरुजी तुम्ही मला छाया द्या.चंदनाजवळ जे झाड असते, ते चंदना समान सुंगधीत होते.त्याप्रमाणे मी आपल्या सहवासाने निर्मळ होईन.गुरुची पूर्ण प्रीती लाभल्यास दुःख नाहीसे होते.गुरुकृपा लाभल्यास काचदेखील मानकासमान होती.त्याप्रमाणे आपण मला सद्गुरु लाभल्यास माझ्यासारखा सामान्यही चतूर होईल.महाराज, आपण कृतार्थ व्हा.आपण मला आर्शिवाद द्या.आपण मला शिष्य बनवून कल्याण करा.आपला दास बनण्याची माझी

अनुक्रमणिका

आशा पूर्ण करा.गुरुमहाराज, फुलाभोवती भुंगा असतो, त्याप्रमाणे आपण मला बरोबर घ्या.आपण मला सेवक समजा.हा परमार्थ करा.मी आपले आयुष्यभर आभार मानीन.आपण ढाल बनून माझे रक्षण करा.परोपकार करणेही सज्जन माणसाची रीत आहे.आपली महिमा थोर आहे.सद्गुरु जगांचे दुःख नाहिसे करतो.आपण मला शिष्य बनवा व भक्तिमार्ग दाखवा.जर तुम्ही मला शिक्षण, ज्ञान न द्याल तर ते पाप तुम्हांस लागेल.प्राण गेला तरी चालेल, परंतु जोपर्यंत तुम्ही मला शिष्य म्हणणार नाही, तोपर्यंत मी माघारी जाणार नाही.हा माझा निश्चय अटळ आहे.मी प्राण दिल्यास तुमची सर्व तपस्या खंडीत होईल.शिवाय मनुष्य हत्त्येचे पाप तुमच्या शिरावर चढेल.जर तुम्ही मला शिष्य बनविण्याचा परमार्थ करु शकत नाही तर मग जगण्यात पुरुषार्थ काय?मूर्ख ब्राह्मण व हिंसक राजा हे दोघेही पृथ्वीचे भार आहेत.जो मुलगा परोपकारी जन्मत नाही, त्यापेक्षा त्याला जन्म देणारी माता वंध्या होय.जगात जे स्वार्थी जीव आहेत ते संसाररुपी सागरात गोते खाणार." असे म्हणताच रोहिदासाचे अंग थरथर कापू लागले.त्यांचे मुख उदास दिसू लागले.ते धरणीवर पडताच पृथ्वी डळमळू लागली.हे पाहून योगी रामानंद चिंताग्रस्त झाले.रोहिदासाची ती स्थिती पाहून स्वामी रामानंदास दुःख झाले.ते रोहिदासास म्हणाले, "बाळा, तू रडू नकोस.मी तुझे प्रेममय बोलणे ऐकले आहे, तू उदास कशाला होतोस.आपले गुरु-शिष्यांचे नाते आता पक्के झाले.आता तुझी आशा पूर्ण होईल." योगी रामानंदाने रोहिदासाचे तोंडावर प्रेमाणे हात फिरविला.आश्वासन मिळाल्यावर रोहिदासास धैर्य आले.

रामानंद म्हणाले, "बाळा, आता तू उशीर करु नकोस.हे कमंडल घे आणि पाणी भरून आण."

गुरुचे बोलणे ऐकताच रोहिदासाचे मनात आनंद झाला.रोहिदासाने कमंडल घेतले व निर्मळ पाणी भरुन गुरुजवळ आणून ठेविले.नंतर पवित्र चंदनाची लाकडे मिळविली.सुंदर चौक बनविला.अग्नी होमाचा विधी केला.हवनकुंडातील ज्वाला वाऱ्यामुळे प्रचंड भडकू लागल्या.मंत्रोच्चार करीत आहुती दिल्या.अंतःकरणात आत्मप्रभाव वाढू लागला.ओम मंत्राचा जप केला.जमिनीवर पाणी शिंपडले.मातीचा वास चोहोकडे दरवळू लागला.वेदानुसार सर्व रीती केल्यामुळे आनंदीआनंद झाला.वेदासारखा दुसरा धर्म नाही.नेहमी वेदाची पूजा करावी.वेद हा सर्वांचा आधार आहे.वेदाचे अध्ययन—पारायण करावे.स्वामी रामानंदानी गुरुमंत्र दिला.उपदेश केला.ज्ञान व ध्यानाची रीत दाखविली.इंद्रियदमन कसे करावयाचे हे समजावून सांगितले.समता हृदयाची महिमा वर्णन करून दाखविली.जो गुरु ध्यान मनात भरतो त्याला काही कठीण पडत नाही.ज्ञानयोग इत्यादी सर्व क्रिया रामानंदानी सांगितल्या.पंचविकाराची माहिती सांगितली.जपतप क्रिया सर्व समजाविल्या.चोवीस गुणांचा शोध लावणे, ब्रह्मास जाणणे, एकाग्र चित्त लावणे इत्यादी माहिती दिली.पंचविकारावर जो मात करील, तो अमर्याद सुख भोगील.गुरुची कृपा झाल्यामुळे रोहिदासास अत्यानंद झाला.

गुरु रामानंद म्हणाले, "बाळ रोहिदासा, आईवडिलांची सेवा कर.अतिथीचे स्वागत करीत जा.संत—संगती सुखद असते.ती तू नेहमी करीत जा.समतादृष्टिने सर्वांकडे पहात जा.उँच नीच कोणी नसते.जे असा भेदभाव करतात, ते मूर्ख होय.नेहमी भजन केल्यास मुक्ती पावेल.संसारात सर्व मोहाचा त्याग कर.ब्रह्मचाऱ्याने कामवासनेचा त्याग केला पाहिजे.सकाळ, दुपार व संध्याकाळी हरिनामाची माळ फिरवीत जा.मनुष्याने निंद्यगोष्टींचा त्याग केला पाहिजे.त्याशिवाय प्रभूचरणी चित्त लागणार नाही.वैर किंवा प्रीती कोणाबरोबर करू नको.परब्रह्मचे स्मरण करावे.जो मनुष्य कपटी दुर्जनाच्या संगतीचा त्याग करील, त्याला मोक्ष मिळेल."

अनुक्रमणिका

अशा प्रकारचा उपदेश ऐकल्यावर रोहिदासाच्या सर्व शंकाचे समाधान झाले.शरीर उत्साहित झाले.रोहिदासाने दोन्ही हात जोडून गुरु चरणाचे अंतःकरणपूर्वक दर्शन घेतले व मांडूर नगराकडे प्रयाण केले.रोहिदास मोठ्या उत्साहाने व आनंदाने घरी पोहोचले.सर्वांना आनंद झाला.

श्री संत रोहिदास ग्रंथा[श्री.सत्यदेव शिंदे, श्री.संत रोहिदास, पृष्ठ २३.]मध्ये कथन केल्याप्रमाणे जेव्हा कबीराने रामानंदाचे शिष्यत्व स्वीकारण्याचा सल्ला दिला तेव्हा रोहिदास काशीच्या गंगाकिनारी पंचघाटावर जाऊन रामानंदाचे दुरूनच दर्शन घेतले.याचे रामानंदास आश्चर्य वाटले.तेव्हा रोहिदास म्हणाले, "मी शूद्र आहे.माझा जन्म चांभार जातीत झाला आहे."

तेव्हा रामानंद म्हणाले, "अरे कसली जात?तू शूद्र नाहीस.तू चांभार नाहीस, तू माझा बंधू आहेस."

रोहिदास म्हणाले, "नाही महाराज, मी ज्ञानाचा भुकेला आहे.आपण मला शिष्य करावे.आणि ब्रह्मज्ञान द्यावे.कारण काशी विद्यापीठाच्या शंकराचार्यांनी शास्त्रार्थ वादविवादामध्ये मला हरवले आहे.आपणांस गुरु करून घेण्याबद्दल मला कबीरांनी सल्ला दिला आहे.त्याप्रमाणे आपण माझा शिष्य म्हणून स्वीकार करावा."

तेव्हा रामानंदानी त्यास आशीर्वाद देत 'तथास्तु' म्हटले.तेव्हा संत रोहिदासास अत्यानंद झाला.

गुरुकडून रोहिदासांना रामनामरुपी अमृतरसाची प्राप्ती झाली.[रामानंद मोहि गुरु मिल्यो, माया ब्रह्म विसास।
राम नाम अमि रस पियौ, रविदासहि भयौ पलास (साखी १३)
—भक्त रत्नावली, पृष्ठ ४१.]गुरु ज्ञानदीप प्रकाशाने रोहिदासास हरिभक्ति मिळाली.[गुरु ग्यान दीपक दिया, वाती दइ जलाय।
रविदास हरि भक्ति कारनै, जनम मरण विलमाय।
—भक्त रत्नावली, पृष्ठ ४१.]आणि ते जन्म-मरणाच्या बंधनातून मुक्त झाले.[गुरु ग्यान दीपक दिया, वाती दइ जलाय।
रविदास हरि भक्ति कारनै, जनम मरण विलमाय।
—भक्त रत्नावली, पृष्ठ ४१.]म्हणून"ॐ रामय नमः" गुरू दीक्षा मंत्रांचा रोहिदासांनी आत्मनिष्ठेबरोबर आजीवन अनुसरण केले.[रं (ऊं) राम मुहि गुरु रामा दिन्हौ, नहिं इह मंत्र विसराऊ।
—भक्त रत्नावली, पृष्ठ ४१.]म्हणून अनंतदास वैष्णवाने रोहिदासाविषयी म्हटले[अरु भगतन की सेवा करई, सतगुर कही सो सीप न टरई।
—भक्त रत्नावली, पृष्ठ ४१.]ते साधु संत भक्तांची सेवा करीत.

'संत प्रवर रैदास साहब[चंद्रिका प्रसाद जिज्ञासू, संत प्रवर रैदास साहब, पृष्ठ ११.]मध्ये लेखकाने शंका व्यक्त केली आहे की, रोहिदासजी रामानंदाचे शिष्य होते का?कारण संत रोहिदासांनी आपल्या पदामध्ये आपल्या गुरुबद्दल कुठेही उल्लेख केलेला नाही.तसे पाहिले तर रोहिदासांनी आपल्या वेळच्या अनेक संतांची नावे मोठ्या आदराने घेतली आहेत.संतांनी महापुरुषांचे मोठ्या आदराने स्मरण केले आहे.आणि गुरुंना तर ईश्वरापेक्षा श्रेष्ठ मानले आहे.असे असताना रोहिदासांनी आपले गुरू रामानंदाचा एकदा तरी उल्लेख केला नसता का?

अनुक्रमणिका

उदाहरण द्यायचे झाले तर कबीराने आपल्या पदामध्ये लिहिले आहे की, “हम काशीमे प्रकट भये है रामानंद चेताये ।” संत रोहिदासाला शालेय शिक्षण मिळाले नाही म्हणून ते परमेश्वराला गुरु मानून आपल्या मनाचे समाधान करतात[चल मन हरि–चटसाल पढाऊँ ।
गुरु की साटि, ज्ञान का अच्छर, विसरे तो सहज समाधि लखाऊँ ।
प्रेम की पाटी, सुरति की लेखनि, ररौ–ममौ लिखि आँक लखाऊँ॥
येहि विधी मुक्त भये सनकादिक, हृदय विचार प्रकाश दिखाऊँ ।
कागद कँवल मति–मसि कर निर्मल, विन रसना निसदिन गुन गाऊँ॥
कह ‘रैदास’ राम भजु भाई, संत–साखि दै बहुरि न आऊँ॥
–संत प्रवर रैदास साहब, पृष्ठ १३.]की, “हे मना, चल तुला ईश्वराच्या शाळेत शिकवितो.तेथे गुरुची साटि अर्थात शिस्त आणि ज्ञानाचे अक्षर आहे.जर विसरले तर सहज समाधी लावीन.तेथे प्रेमाची पाटी आहे, आणि ईश्वर चिंतनाची पेन्सिल आहे.ज्याच्यापासून र रा-म मा अर्थात ‘राम’ चे अक्षर लिहीन.शिकण्याचाही तोच विधी आहे.ज्या विधीप्रमाणे वागून सनकादि संत मुक्त झाले आहेत.त्यामुळेच हृदयात विचार-विवेकाचा प्रकाश दाखवीन.हृदय कमलरुपी कागदावर बुद्धिरुपी स्वच्छ शाईने लिहीन आणि जिभेशिवाय रात्रंदिवस गुणांचे गायन करीन.रोहिदास म्हणतात, “जो पिंड ब्रह्मांडामध्ये रमत आहे, त्या रामाचे भजन करा.संताची साखी देऊन सांगतो की, अशाप्रकारे दीक्षा घेण्याचे पुन्हा येण्याजाण्याचे बंधन सुटेल.ह्या पदामुळे सिद्ध होत आहे की, संत रोहिदास स्वयं ज्योती, स्वयं प्रकाश आणि स्वयंप्रज्ञ महात्मा होते.उच्च कोटीचे महापुरूष असेच असतात.भगवान गौतमबुद्धाने बोधीवृक्षाखाली सुदृढ समाधी लावून बुद्धत्त्व मिळविले.बाबासाहेब आंबेडकरांनीसुद्धा आपल्या अध्ययन आणि विचारामुळे ज्ञान मिळविले.अशा प्रकारे संत रोहिदासांनीसुद्धा आत्मअनुभवाने ज्ञान मिळविले असेल तर आश्चर्य वाटावयास नको.

संत रैदास[डॉ.योगेन्द्र सिंह–संत रैदास, पृष्ठ १३.]पुस्तकामध्येही बराच ऊहापोह करून रामानंद गुरुबद्दल शंका व्यक्त केली आहे.

भक्तमालकाराच्या छंदात[श्री रामानंद रघुनाथ ज्यो दुतिअ सेतु जगतरण कियो ।
अनंतानंद, कबीर, सुखा, सुरसुरा, पद्मावती, नरहरि ।
पीपा, भवानंद, रैदास, धना, सेन सुरसुरकी धरहरि ।
औरो शिष्य प्रशिष्य एक ते एक उजागर ।
विश्व-मंगल आधार-सर्वानन्ध दशधा के आगर ।
बहुकाल वपु धारि कै प्रनत जनन को पार दियो ।
*(भक्तमाल सर्थक पृष्ठ २८२)*–संत रैदास, पृष्ठ १२.]कबीर, रोहिदास इत्यादी सर्वांना रामानंदाचे शिष्य म्हटले आहे.रैदासाची परिचर्या, कबीर-रैदास संवाद तसेच रैदास रामायण ह्या सर्वात रोहिदासांचे गुरु रामानंद असल्याबद्दल समर्थन केले आहे.

संत रोहिदासांचे गुरु रामानंद असल्याबद्दल संत गुरू रविदास[डॉ.वी.पी.शर्मा–संत गुरु रविदास, पृष्ठ ५७.]पुस्तकामध्ये अगस्त संहितामधील बरेच पुरावे दिले आहेत.

**अगस्त संहिता**–हा एक प्राचीन ग्रंथ आहे.याच्यात रामानंदाच्या शिष्यांना विभिन्न देवतांचा अवतार म्हटले गेले आहे.

कबीरास प्रल्हादचा अवतार मानले आहे.यांचा जन्म चैत्र वद्य अष्टमी, मंगळवार, मार्गशीर्ष नक्षत्र, शोभन योग, सिंह लग्नात दाखविले आहे.ह्या ग्रंथात रोहिदासाचे नाव“रमादास” लिहिले आहे.ते धर्मराजाचा

अवतार होते.यांचा जन्म चैत्र शुद्ध द्वितीया, शुक्रवार, चित्र नक्षत्र हर्षणयोग, मेष लग्नात उत्पन्न तसेच वैष्णवांचे आज्ञापालक, भागवत धर्मसेवी तसेच उदार बुद्धी म्हटले आहे.तसेच स्वामीजींच्या दिग्विजय यात्रेचे वर्णन थोडक्यात दिले आहे.याच्यात रामानंदाच्या प्रमुख शिष्यांची नावेसुद्धा दिलेली आहेत.रोहिदासांना कुठे कुठे 'रामादास' लिहिले आहे.ह्या ग्रंथाचे लेखक अगस्त्य ऋषी यांचा दृष्टिकोन फारच उदार आहे.रोहिदास हे मानदास चांभाराचे पुत्र होते.यांचा एक वेळ काशीमध्ये रामभक्त कबीराबरोबर शास्त्रार्थ झाला.आणि कबीरांना पराजित केले.यानंतर रोहिदास शृंगेरी मठाचे शंकराचार्याकडून भारती तीर्थाजवळ शास्त्रार्थ करण्यासाठी गेले.पूर्ण सात दिवस दोघात शास्त्रार्थ झाला.शेवटी शंकराचार्याकडून पराजित होऊन स्वामी रामानंदाजवळ आले व त्यांचे शिष्य झाले.

अगस्त्य संहिता अध्याय १७ श्लोक ८६-८७ प्रमाणे सदना, कबीर, रंकन, पीपा यांचेशिवाय गुरू नानकसुद्धा रामानंदाचे शिष्य दाखविले आहेत.ह्या ग्रंथाच्या तिसऱ्या सर्गात रोहिदास, शंकराचार्य, रामानंद आणि नानकास समकालिन म्हटले आहे.तसेच गुरू नानकास रामानंदाचे शिष्य म्हटले आहे.

ध्रुवदासकृत (१६ व्या शतकाचे शेवटी लिहिलेले) भक्त नामावली :— व्यासजीच्या वर्णनात रामानंदाबरोबर सेन, धना, रोहिदास, कबीर, पीपा आणि सुरसुरानंदाचे आदराने स्मरण केले आहे.[रामानंद, अंगद.सोभू, हरिव्यास, अरू छीत।
एक एक के नाम ते सब जग होइ पुनीत॥
जिनी जिनी भक्तनि प्रीति की, नाके बस भए आनि।
सैन होई नृप टहल कियो, नामदेव छाई छानि॥
जगत विदित पीपा, धना, अरू, रैदास कबीर।
महाधीर दृढ एक रस, भरे भक्ति गम्भीर॥
—संत गुरु रविदास, पृष्ठ ५९—६०.]

भगवत रसिककृत"भक्त नामावली" मध्ये स्वामी रामानंद तसेच त्यांच्या शिष्य परंपरेत पीपा, सेन, धना, कबीर, रोहिदास, अग्रदास, नाभा, लाखा आणि कुवाचा उल्लेख आहे.

**मलुकदासकृत ज्ञानबोधात**—रामानंद, कबीर, रोहिदास, धना, पीपा, कूवा, जंगी तसेच ज्ञानी इत्यादीचे वर्णन आहे.

नागरिदासचा ग्रंथ 'पद प्रसंग' मध्ये कबीर आणि रोहिदास यांची नांवे मिळतात.ध्रुवदासाच्या भक्त नामावलीमध्ये रोहिदासासंबंधी पदे आहेत.

**रामानंदायन**—हे अवधी भाषेत दोहा—चौपाईत लिहिले गेलेले महाकाव्य आहे.याचे लेखक स्वामी जयराम देव आहेत.लेखकाप्रमाणे रामानंदी संप्रदायाचे भक्तामध्ये तुलसीदास, नाभा, टोला इत्यादी शिवाय रोहिदासांची शिष्या मीरासुद्धा आहे.

**भगवान रामानंदाचार्य** :—ह्या ग्रंथाचे संपादक हरि चरणलाल शास्त्री आहेत.त्या रचनेत अधिक तर नाभादासकृत भक्तमालप्रमाणे रोहिदासांचे विवरण दिले गेले आहे.

अनुक्रमणिका

विल्सनने आपली रचना"ए स्केच ऑफ दी रिलिजस सैक्टस ऑफ हिंदूज" मध्ये रामानंदाचे शिष्य कबीर रोहिदासांना"अवधुत" म्हटले आहे.त्याप्रमाणेच गार्सादलालीने आपले पुस्तक"इख्त्यार द लालित हात्युर ऐन्दुई ए ऐन्दुस्तानी" मध्ये रोहिदासाविषयी भक्तमालचीच कथा गेली आहे.आणि रोहिदास यांना रामानंदजींचे शिष्य मानले आहे.

डॉ.वडखालने जनरल कनिंघाच्या मताचे समर्थन करताना कबीर, पीपा, धना आणि रोहिदासांना स्वामी रामानंदाचे शिष्य मानले आहे.डॉ.वडखाल, डॉ.ग्रियर्सन, डॉ.फर्कुहर इत्यादी सर्व आधुनिक विद्वानांचे हे मत आहे की, स्वामी रामानंदजी एक असे प्रतिभाशाली तसेच प्रभावशाली व्यक्ती होते की, त्यांच्या व्यक्तित्वामुळे प्रभावित होऊन त्या युगाचे सर्व विद्वान, महात्मा, समाजसुधारक लोक त्यांचे शिष्य बनले.रोहिदास, कबीर, पीपा, सेन, धना इत्यादी असेच प्रतिभावान व्यक्ती होते.

अग्रस्वामीने"रहस्यत्रय टीका" मध्ये रामानंदाजीचे कबीर, पीपा तसेच रोहिदास इत्यादी बारा शिष्यांना"द्वादश आदित्य" समान म्हटले आहे.

प्रियादासने भक्तमालमध्ये भक्त पीपासंबंधी लिहिताना वर्णन केले आहे की—पीपाच्या निमंत्रणावरून स्वामी रामानंदजी, कबीर, रोहिदास इत्यादी शिष्यांना बरोबर घेऊन गांगरोनमठास गेले.तेथून सर्व जमात द्वारकेस पोहचली.तेथे काही दिवस राहून ते सर्व पुन्हा काशीस परतले.

श्री गुरु ग्रंथ साहिबमध्ये सम्मिलीत भक्त धनाचे एका पदापासून (गुरू ग्रंथसाहिब, तरणतारण संस्करण, राग आसा, पद २, पृष्ठ ४८७) असे माहित होते की, नामदेव, कबीर, रोहिदास आणि सेना नाव्हीच्या प्रसिद्धीने प्रभावित होऊन धन्नासुद्धा ईश्वरभक्तिमध्ये प्रवृत्त झाला आणि शेवटी तो एक पूर्ण रामभक्त बनला.धन्नानेसुद्धा याच पदामध्ये"रोहिदास" यांना गुराढोरांचा व्यवसायी असून"मायाचा त्यागी" म्हटले आहे.

ह्या उदाहरणावरून स्पष्ट होत आहे की, रोहिदासजी एक त्यागी संत आणि खरे ईश्वरभक्त असून, मध्ययुगीन भक्ती आंदोलनाचे प्रतिभाशाली अग्रेसर नेता होते.आपले गुरू रामानंदाच्या दिग्विजय यात्रेचेवेळी नेहमी त्यांचेबरोबर राहिले आणि त्यांचे मृत्युनंतर आपल्या गुरुच्या आदेशाचे आजीवन पालन केले.

माझ्या मते स्वामी रामानंद हे रोहिदासांचे दीक्षा गुरु होते.कारण रोहिदासांनी संत गुरू रविदास वाणीच्या अनेक पदात निश्चितपणे स्पष्ट झाले आहे.त्यापैकी मी एक पद उदाहरणादाखल खाली देत आहे.[रामानंद मोही गुरू मिल्यों, पाया ब्रह्म विसास।
राम नाम अमी रस पियौ, रविदास हि भयो पलास। (साखी १३)
—गुरु रविदास, पृष्ठ १७.]

तसेच रोहिदासांनी आपले स्वामी रामानंदास लौकिक व अलौकिक दृष्टीने 'पारसमणी' ची संज्ञा देऊन म्हटले आहे की, पूर्व जन्माच्या संचित कर्माच्या सौभाग्याने मला"पारसगुरु" मिळाला आहे.[परम पारस गुरू भेटिए, पूरब लिखत ललाट। (३१)
—संत रविदासकी भक्ति साधना, पृष्ठ १३.]

अनुक्रमणिका

रोहिदास कबीर गोष्टीत जेव्हा कबीराने कृष्णावताराचा निषेध केला तेव्हा रोहिदासांनी त्वरित उत्तर दिले, "माझे गुरू स्वामी रामानंदाने मला विष्णु अवताराच्या रामकृष्णभक्तिची दीक्षा दिली". [रामानंद कै क्रिस्न भगति है। तुम तो और बताया।
कहे रैदास सुनोरे स्वामी, तत कहा तै ल्याला॥ ३१॥
त्रिकुटि संगम रहन दे स्वामी, गावण दे गोपाला।
जाके रूप टगी ब्रज बनिता, मोहन नंद कू लाला॥(१५)
रमिता राम सोइ है स्वामी,हिरदै करौ विचारा।
रावण मारि विभीषण थाप्पा, धरया रामचंद्र औतारा॥(२१)
—संत रविदासकी भक्ति, साझना, पृष्ठ १४.]

संत रोहिदास जेव्हा कधी सांसरिक विघ्न—अडचणीने उद्विघ्न झाले तेव्हा त्यांनी आपले गुरू स्वामी रामानंदांचा धावा केला. [संसार प्रपंच हो व्याकुल रामानंदा।
त्राहि—त्राहि अनाथ नाथ, गोविंदा। (९२)
—संत रविदासकी भक्ति साधना, पृष्ठ १४.]

संत रोहिदासाच्या जीवन नौकेचा नावाडी गुरु स्वामी रामानंद आणि राम नाम आहे. [त्राहि—त्राहि गुरू रामा आलम्बन मोरे।
पतरि नाव खेबटिया गुरू रामा, नाम लेत हि तरि हौ। (१५३)
—संत रविदासकी भक्ति साधना, पृष्ठ १४.]

अशा प्रकारचे दाखले 'संत रविदास की भक्ति साधना' पुस्तकामध्ये दिले आहेत. [डॉ.बी.पी.शर्मा शास्त्री, संत रविदास की भक्ति साधना, पृष्ठ १३.]

* * *

अनुक्रमणिका

# ८.काशीतील पंडितांबरोबर चर्चा

गुरु रामानंद स्वामीच्या सुंदर व निर्मळ उपदेशाने रोहिदासांचे मनातील भ्रमाचे जाळे नाहीसे झाले.त्यांना सत्यज्ञान सर्वत्र जाणवू लागले.सत्कर्मात मन लागले.सुविचार आले.रोहिदास वेद मंत्राचा उच्चार करू लागले.त्यांनी यम नियमांचा स्वीकार केला.त्यांनी काम, क्रोध, लोभ, मोह, मद नाहीसे करून प्रभु नामात ध्यान लावले.ते समभावाने पाहू लागले;आत्मज्ञान चिंतन करू लागले.

काशीतील सर्व लोक संत रोहिदासांस भक्त म्हणून ओळखू लागले.भक्त रोहिदासांचा महिमा सर्वत्र पसरू लागला.तसतसे सगळे ब्राह्मण मनातून घाबरू लागले.परंतु सगळे शूद्र आनंदीत झाले.चँवरवंशी चांभारांचा आनंद तर गगनात मावेना.उच्चवर्णीय निंदक संत रोहिदासांची निंदा करू लागले.रोहिदासास शिष्य करणाऱ्या रामानंदासही ब्राह्मण पंडित निच मानू लागले.ब्राह्मण ज्ञानी रोहिदासास अज्ञानी म्हणू लागले.तर कोणी त्यांची निंदा करून सुखसमाधान मानू लागले.काशीतील सगळ्या ब्राह्मण पंडितांनी एकत्र येऊन विचार केला की, रोहिदासांची कठीणात कठीन परीक्षा घेऊ.त्यादृष्टिने ब्राह्मण पंडितांच्या झुंडीच्या झुंडी संत रोहिदासाकडे वादविवाद करण्यासाठी आल्या.सगळे पंडित आपसात कुजबूज करू लागले.त्यापैकी एक ब्राह्मण पंडित म्हणाला, "अरे रोहिदासा, आम्हांस ऐकावयास मिळाले आहे की, तू फार ज्ञानी आहेस.तू स्वतःला ज्ञानी समजत असशील, तर आम्हांला ज्ञानाचा अर्थ तरी समजावून सांग." त्यानंतर वेगवेगळ्या पंडितांनी वेगवेगळे प्रश्न विचारले.[महाकवि बख्शीदाकृत 'असली रैदास रामायण',पृष्ठ ३५.] [पं.गिरजाशंकर मिश्र 'पूनम','रविदास रामायण',पृष्ठ ३५.]हे जग कसे निर्माण झाले?पहिल्याने सत्य कोठून आले?कोणत्या तत्त्वापासून पिंड बनले?ही सगळी तत्त्वे कोठून आली?आत्मस्वरुप कसे असते?प्राण व शरीर कोठून व कसे आले?शरिरात प्राण कोठे वास करतो?जीव सगुण आहे की निर्गुण?आमच्या एवढ्या प्रश्नांची उत्तरे दे.आमच्या मनातील शंका नाहीशा होतील अशा प्रकारे समजावून सांग."

तेव्हा संत रोहिदास नम्रपणे म्हणाले, "पंडितजी, आता मी जे काय सांगतो ते लक्षपूर्वक ऐका.सृष्टिचा निर्माता अनादी अमर आहे.आत्मा अमर, अविनाशी आहे.जगाची निर्मिती हे श्रेष्ठ कर्म आहे.ते विधिने विधिव्रत केले आहे.ज्याने जसे कर्म केले तशी त्याला योनी धारण करावे लागते.रज, तम, सत हे जगात तीन गुण आहेत.त्यांचा कर्मानुसार संयोग होतो.आत्मा ईश्वराचे रूप आहे.शक्ती अनादी परब्रह्म आहे.ती मायेमुळे प्रगट होते.ज्यांची हरीभक्तिची नाव संसाररूपी सागरात उतरली आहे.ती नाव ईश्वर पार पाडतो.यालाच संसारिक रीती म्हटले आहे.मायेचे भेद अनेक आहेत.तिचा शेवट कोणी पाहिला नाही.जो मनात भेदभाव राखतो, तो नरहानी पावतो.जो आळस, लोभ व चुका करतो, तो मोक्ष पावत नाही.तो संसाररूपी सागरात दुःखी पावतो.ज्यांनादुष्कर्म करणे आवडते, तो ब्रह्म पाहू शकत नाही.जो धर्मद्रोह करतो, त्याची नाव संसाररूपी सागरात बुडते.जो प्राणी ईश्वराला विसरतो, त्याला अज्ञानी म्हणतात.जो प्राणी प्रभुचरणी लीन राहतो त्यालाच ध्यानी म्हटले जाते.ब्रह्मज्ञानाशिवाय खरा आनंद मिळू शकत नाही.शरीरात वसलेल्या प्राणास 'हंस' म्हणतात.जो नेहमी काम वासनेत मग्न असतो, अशा भोगी व्यक्तिला योगी कोण म्हणेल?माया कायेला खारट करते.माया ही जगाची बिमारी आहे.जो मायेत गुरफटला आहे, त्या प्राण्याची खैर नाही.आत्मा ईश्वराचा दास आहे.तो उदास राहात नाही.पृथ्वी, आप, तेज वायु, आकाश ह्या पाच तत्त्वांपासून शरीर बनले आहे.त्यामध्ये प्राणरुपी हंस निवास करतो.संसार मोहधारा आहे.जीव कर्माप्रमाणे फळ भोगत असतो.सद्‌गुरु ज्याचा रोग नाहीसा करतो, त्याचा संशय नाहीसा होतो.जातीयवाद कपटी व मूर्खपणाचा आहे.हे शरीर निष्फळ असून, त्यातील आत्मरुपी हंस सत्य होय.अज्ञानामुळे सर्वजण भयंकर भ्रमात फसले

अनुक्रमणिका

आहेत.जातीयवादी अनेक कुमार्गाने अज्ञान पसरवीत आहेत.जे मायामोहात जीव भुलवितात.त्यांचेवर अनेक संकटे येतात.ज्ञान विसरल्यामुळे भयंकर दुःख भोगावे लागते.जे प्राणी मायेत भुलले आहेत, त्यांना नाना प्रकारचे दुःख भोगावे लागते.जो मायेत मन गुंतवितो, तो भवसागर पार पाडीत नाही.दहा इंद्रिये व दहा प्राण वेदशास्त्राने सांगितले आहेत.पाच कर्मेंद्रिये व पाच ज्ञानेंद्रिये आहेत.अकराव्या इंद्रियास 'विज्ञान' म्हटले जाते.सर्व इंद्रियात प्राण मुख्य आहे.ज्या जातीयवादामुळे सगळे जीवन भ्रमिष्ट झाले आहे, तो जातीयवाद ऐकू नका.ब्राह्मण पंडित हो, मी तुम्हांला सर्व अर्थ सामजावून सांगितला आहे.तुमच्या सर्व शंकांचे समाधान केले आहे.उत्पत्ती व नाश नेहमी होत राहणार आहेत.त्यामध्ये कोणीही प्राणी वाचत नाही.तिन्ही काळात ज्यांचा जन्म होतो, त्या सर्वांचा मृत्यू होत असतो.ज्याला तिघांचा महिमा समजला आहे, त्यास माया भुलवू शकत नाही.ज्याने खरा मार्ग धरला आहे, त्याने मुक्ती मिळविली म्हणून समजा.सुख दुःख व संयोग-वियोग हे सर्व कर्माचे भोग आहेत.देहाचा त्याग करताच हंस (आत्मा) उडून जातो.जन्म असो की मृत्यू असो कर्मभोग नेहमी सोबत करीत असतो." अशा प्रकारे संत रोहिदास त्यांना सत्यवचन सांगू लागले.ते ऐकून काही ब्राह्मण पंडित लाजू लागले.तर काहींचे मनात भयंकर क्रोध आला.रोहिदासांचे ज्ञानभंडार ऐकून काही पंडित बोलू शकले नाहीत.

ब्राह्मण पंडितानी जे जे प्रश्न विचारले, त्या सर्व प्रश्नांची उत्तरं रोहिदासांनी दिली.वेदशास्त्रातही सांगितले आहे की, 'क्रोधी माणसे विजय पावत नसतात.'सूर्यप्रकाश दिसू नये म्हणून काही लोक धूळ उडविण्याचा प्रयत्न करतात.ज्यांचे हृदयात पुष्कळ दया, क्षमा, असते, त्यांचेपुढे सर्व हरतात.सर्वात हरिभक्ती श्रेष्ठ असते.माणसांना गर्व असू नये.कारण त्यांना थोडेसुद्धा सुख मिळत नसते.जे निराभिमानाने नम्र असतात, त्याची नेहमी प्रशंसा होते.भक्तवचनरुपी औषध पाजल्याने संशयरुपी रोग नाहीसा होतो.ब्राह्मण, पंडित मनात विचार करू लागले की, रोहिदासांच्या ज्ञानाचा अंत लागत नाही.रोहिदासाने पूर्ण गुरू केलेला आहे.म्हणूनच तो ज्ञानमार्गाचा अर्थ सांगू शकतो.सगळे ब्राह्मण पंडित वादविवाद करण्यात हरले.रोहिदासाला सर्वज्ञान प्राप्त झाल्याची त्यांची खात्री झाली.म्हणून ते सर्वजण आपआपल्या घरी निघून गेले.

* * *

अनुक्रमणिका

# ९.परीस

घरची गरिबी असूनही संत रोहिदास हे साधु-संतांची आणि गरिबांची सेवा करण्यात नेहमी दक्ष असत.संत रोहिदासांनी नेहमीप्रमाणे एकेदिवशी सकाळी भजन-कीर्तन केले व नंतर जुने जोडे दुरुस्त करीत बसले होते.त्यावेळी एक तेजस्वी महात्मा त्यांचे झोपडीवर येऊन 'नारायण हरि' अलख घोषणा केली.रोहिदास त्वरित उठून पुढे होऊन साधुमहाराजांना प्रणाम केला आणि त्यांना झोपडीत घेऊन आले.झोपडी फार लहान होती.मातीच्या कच्च्या भिंतीवर सुकलेल्या गवताचे छप्पर होते.येथेच त्यांचे दुकान आणि घर होते.झोपडीबाहेर मोकळी जागा होती.तेथे त्यांचा सत्संग भरत होता.अथिति साधु रोहिदासांची नम्रता व स्वागतभाव पाहू न प्रसन्न झाले.[वरस सात ऐसी विधि गईआ, कैसे के मन उपजी देइआ।
तब हरि भगत रुप, धरि आयो जन रैदास बहुत मनि भायो।–२४
सहे अति कष्ट, अंग हिये सुखसील रंग,
आये हरि प्यारे लियो, भगत भेष धारिकै।
कियो बहूमान, खान पान सौं प्रसन्न है कै,
दीनो कह्यो पारस है, राखियो संभारिकै।
मेरे धन राम कहु, पत्थर न सैरे काम,
दाम न चहौ, चाहो डारौ तन वारि कै।
रोंपी एक सोनो कियो, दियो करि क्रिपाराखी,
राखो यह छांनि मांझि, लैटो निकारि कै।
–संत गुरु रविदास, पृष्ठ ५०.]

साधु म्हणाले, "रोहिदासा, तुझा निर्वाह कसा काय चालतो?येथे तुझ्या झोपडीत तर काहीच दिसत नाही."

रोहिदासांनी उत्तर दिले, "महाराज, मी फार सुखी आहे.या निर्धन अवस्थेत भगवत भजन तर होतेच.मायाजाळात फसलो तर प्रभु भक्ती संपून जाईल.राम हीच माझी संपत्ती आहे.[मेरे धन राम कछु पाकर म सरै काम।
दाम मैं चाहौ डारौ तन वारिकौ॥
–श्री संत रोहिदास, पृष्ठ २८.]व ती मला आयुष्यभर पुरी पडणार आहे." रामनाम हाच माझा परीस आहे.[पारस मोरे हरि कौ नामू, पाथर सो मोहि नही कामूं।
अंगीकार रैदास न कीनौ, तव हरि अपनौ पारस लीनो।५३-५४
–भक्त रत्नावली, पृष्ठ ३५.]

साधुने झोळीतून एक दगड काढून रोहिदासास दाखविला व म्हणाले, "रोहिदासा, हा परीस दगड आहे.याच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने बनते.आता तुझी लोखंडाची रापी आहे ना?तिला मीपरीस दगडाचा स्पर्श करतो.बघ तुझी रापी सोन्याची झाली.अशाप्रकारे तू आपला रोजच खर्च चालविण्यासाठी सोने बनवू शकतो."

रोहिदास घाबरून म्हणाले, "महाराज, आपण हे काय केले?आपण माझी लोखंडाची रापी सोन्याची बनविली.परंतु ह्या सोन्याच्या रापीनं मी चामडं कसं कापणार?चामड्याचा धंदा केल्याशिवाय मी पोट कसं भरणार?आपण हा परिस दगड घेऊन जा.मला सोनं नको.[माधवे, पारसमणी लइ जाऊ।
मोहि सोने का नहि चाऊ॥
–श्री संत रोहिदास, पृष्ठ २८.]माझा उपास्य देव राम व गुरु स्वामी रामानंद माझे परीस आहेत.[परचै रामु रमै जो कोई, पारस परसे दुविध न होई।

अनुक्रमणिका

—भक्त रत्नावली, पृष्ठ ४०.]

महात्मा साधुने त्यास पुष्कळ समजाविले, “पैशाशिवाय घरप्रपंच चालत नाही.आता तू ह्या परीस दगडास ठेवून घे[फिरत फिरत तेरे घरि आयो, काल्हि वाटमे पारस पायो।
मेरे कामि न आवे येहु, दया करि हौ तुम कौ देहु।—३०
—भक्त रत्नावली, पृष्ठ ३४.]आणि आवश्यकतेनुसार सोने बनव आणि आपला खर्च चालव.आम्ही संन्यासी आहोत.आम्ही नेहमी फिरणारे साधू.आम्ही आपले पोट भिक्षेन भरतो.”

संत रोहिदासांने विचार केला की, साधू फारच हट्ट करीत आहेत. म्हणून ते साधूंना म्हणाले, “तुम्ही ह्या दगडास येथे कोठेतरी ठेवून द्या.” त्या महात्म्याने तो पारिस दगड झोपडीच्या वरच्या एका कोपऱ्यात ठेवून दिला आणि झोपडीबाहेर जात म्हटले, “रोहिदास, त्या परीस दगडाचा उपयोग जरूर कर बरं का?”

रोहिदास म्हणाले, “मनुष्य जन्म हा कठीण तपस्याने व मोठ्या भाग्याने मिळतो.[मानुषा अवतार दुरलभ, भाग बढ़ सो पावे।
—भक्त रत्नावली, पृष्ठ ४०.]मनुष्य जन्म मिळाला तरी पूर्वजन्मातील शुभ कर्मामुळेच परीस गुरुची प्राप्ती होते.[परम पारस गुरु भेटिये, पूरव लिषत लिलाट।
—भक्त रत्नावली, पृष्ठ ४०.]गुरुरुप या परीस स्पर्शाशिवाय शिष्यरुपी जंग लागलेले तांबे सोन्याप्रमाणे चमकत नाही.[पारसमनि तांबौ छुवै, कनक होत नहि बार।
—भक्त रत्नावली, पृष्ठ ४०.]”

तेरा महिने निघून गेले.एकेदिवशी तेच महात्मा साधु रोहिदासाच्या झोपडीत पुन्हा आले.झोपडीत सर्वत्र पाहिले.झोपडीत खाद्य सामुग्री तर नव्हतीच.पूर्वीप्रमाणेच गरीब परिस्थिती.तेव्हा महात्मा साधूने विचारले, “रोहिदास, मी दिलेल्या त्या परीस दगडाचा तू उपयोग केलेला नाही.तो कुठे आहे?”

रोहिदासानी उत्तर दिले, “मला आपल्या कामधंद्यातून फुरसत मिळत नाही.बाकीचा वेळ पूजापाठ-भजनकीर्तनात जातो.मला त्या परीस दगडाचं ध्यानच राहिलं नाही.आपण कुठे ठेवला असेल तेथे बघा.”

महात्मा साधू हैराण झाले होते.त्यांनी विचार केला की, रोहिदास मोठी विचित्र व्यक्ती आहे.साधुने पाहिले तर तो परीस दगड जशाच्या तसाच त्या कोपऱ्यात पडलेला होता.रोहिदासांची निस्पृहता व आनंदीवृत्ति पाहून साधुस आश्चर्य वाटले.

संत रोहिदासांनी साधुस विनंती केली की, “आपण आपली अनामत घेऊन जा आणि कोणा गरजू व्यक्तिला द्या.मला परिसाची जरुरी नाही.निष्ठेने काम केल्यास रामाची प्राप्ती होते.[जिव्हा सो ओंकार जप, हत्यन सों कर कार।
राम मिहाहिं घर आईकर, कहे ‘रविदास विचार’।—भक्तमाल
—संत गुरु रविदास, पृष्ठ १९.]परीस गुरुची प्राप्ती होते.[परम पारस गुरु भेटिये, पूरव लिखत ललाट।
—संत रविदासकी भक्तिसाधना, पृष्ठ २३.]गुरुरुप परीस स्पर्शाशिवाय शिष्यरुपी जंग लागलेले तांबे सोन्याप्रमाणे चमकत नाही.[पारस मनि तांबौ छुवै, कनक होत नही बार।
—संत गुरु रविदासवाणी, पृष्ठ २८.]मनुष्य जन्म दुर्लभ असतो.तो मोठ्या भाग्याने मिळतो.[मनुषा अवतार दुरलभ, तेरी भगति दुरि है। भाग बढे सो पावै॥

अनुक्रमणिका

—संत रविदासकी भक्तिसाधना, पृष्ठ, १६.]म्हणून त्याचा विचाराने योग्य उपयोग करावयास पाहिजे.

महात्म्याने त्या छपराच्या कोपऱ्यातून काढलेला परीस दगड घेऊन ते साधू पाहता पाहता नाहिसे झाले.

नाभादासाने आपल्या भक्तमाल ग्रंथात लिहिले आहे की, साधूवेशात स्वतः आलेले भगवान श्यामसुंदर होते.प्रियदासांच्या मते स्वतः परमात्मा साधुवेशात आपल्या भक्तास सहाय्य करण्यास किंवा भक्ताची परीक्षा घेण्यास आले होते.रोहिदासांच्या मते राम नाम हाच परीसदगड आहे.[पारस मनि मुहि रतु नहिं भावै,
जग जंजार न थोरा।
कहि 'रविदास' तजि सभ त्रिस्ना, इकु राम चरन चित मोरा॥
—(वाणी ७३)—गुरु रविदास, पृष्ठ २०—२१.
जो कोउ लौरे परम सुख, तउ राखै मन संतोष।
'रविदास' जहां संतोष है, तहा न लागै दोष॥
—(दर्शन १६४)—गुरु रविदास, पृष्ठ २१.
सच्चा सुख सत धरम मंहि, धन संचय सुख नांहि।
धन संचय दुःख खान है, 'रविदास' समुझि मन माहि॥
—(दर्शन १६६)—गुरु रविदास, पृष्ठ २१.]

रोहिदासांना शारीरिकदृष्ट्या अनेक कष्ट करावे लागले.तरीसुद्धा ते मानसिकदृष्ट्या ते अत्यंत संतुष्ट होते.आपल्या भक्ताची ही परिस्थिती पाहून स्वतः भगवान श्यामसुंदर साधुवेशात रोहिदासांचे झोपडीत आले.रोहिदासांनी मोठ्या आदराने साधूची उठबस केली.साधूने पाहुणचार स्वीकारल्यावर मोठ्या आनंदाने एक परीस दगड दाखवित म्हटले, "रोहिदासा, ह्या परीस दगडाचे स्पर्शाने लोखंडाचे सोने बनते.हा परीस दगड घे आणि सांभाळून ठेव."

रोहिदासांनी उत्तर दिले, "महाराज, माझे धन तर फक्त रामनाम आहे.मला धनाची आवश्यकता नाही किंवा परीस दगडाचीसुद्धा.राम भजनाला विसरवणाऱ्या अशा धनाचा मला काय उपयोग?"

साधूने रापीला परीस दगडाचा स्पर्श करुन ती सोन्याची बनवून दाखविली."हा परीस दगड तुझ्या झोपडीत ठेवतो, आवश्यकतेप्रमाणे याचा उपयोग कर." असे सांगून साधू निघून गेला.

तेरा महिन्यानंतर[आए फिर श्याम मास तेरह वितीत भए
प्रीती कर बोले कहो पारस की रीति को।
वाहि ठौर लीजै मेरो मन न पतीजै,
अव चाहे सोई कीजे, मैंतो पावन हो मीत को।
लैके उठि गए, नए कौतुक सो सुनो,
पावे सेवत मुहर पाँच, नित ही प्रतीत को।
सेवहु करत डर लाग्यो, निसी कह्यो हरि,
छोडो अड़ अपनी औ, राखौ मेरी नीति को।
—संत गुरु रविदास, पृष्ठ ५१.]पुन्हा तोच साधू (भगवान श्यामसुंदर) रोहिदासजीचे झोपडीवर आला.परीस दगड त्यांनी जेथे ठेविला होता त्याच छपराच्या कोपऱ्यात तो होता.रोहिदासाची परिस्थिती त्याच निर्धन अवस्थेत होती.रोहिदासांनी उत्तर दिले.

**"पारस तो सोई पार उतारे, हौ तो इक राम नाम अधारे"**

अनुक्रमणिका

साधू वेषधारी भगवान परीस घेऊन गेले.परंतु दुसऱ्या दिवसापासून रोहिदासांना दरदिवशी सकाळी देवपूजा करताना देवाच्या सिंहासनातून पांच सोन्याच्या मोहरा मिळू लागल्या.ह्या मोहरांपासूनही रोहिदासांना भीती वाटू लागली.भगवानाने एका रात्री स्वप्नात रोहिदासांना सांगितले की, “मोहरा न घेण्याचा हा हट्ट सोडून दे.तुला माझी जीत मानलीच पाहिजे.”

रोहिदास समजले की, तो परीसदगडवाला साधू स्वतः भगवान होते.ते रोम रोम रोमांचित होऊन मस्तीमध्ये गाऊ लागले.[आजू के दिवस जाहु बलिहार,
मेरे घर आया राजा रामजी का प्यार।
कर यौ दण्डवत चरन पखारयौ, तन मन धन संतनि पर वारौ।
आंगन भवन भयो अति पावन, हरिजन बैठे हरिजस गावन।
करै दया और अर्थ वियारै, आप तरै औरन कूँ तारे।
कहे रैदास मिले हरि दासा, जनम जनम की पूरी आसा।
—संत गुरु रविदास, पृष्ठ ५२.]तेव्हापासून संत रोहिदास सिंहासनातून दररोज मिळणाऱ्या पाच मोहरांचा सदुपयोग करू लागले.

संत रोहिदास हे आपल्या संत स्वभावामुळे हरिभक्ति तसेच जोडे शिवण्याचे परिश्रम करुन जे पैसे मिळत, ते संतांची सेवा करण्यात खर्च करीत.त्यांच्या ह्या स्वभावामुळे दुःखी होऊन, त्यांच्या वडिलांनी त्यांना वेगळे काढले.त्यामुळे संत रेहिदासावर पुष्कळच आर्थिक संकटे आली.म्हणून त्यांना आर्थिक सहाय्य करण्यास स्वतः भगवान साधू वेषात त्यांचेकडे आले व संत रोहिदासांना परीसदगड (पारसमणी) देण्याचा प्रयत्न केला.साधुने रापीला परीस दगडाचा स्पर्श करून हा परीसच आहे याची खात्री करून दिली.परंतु काही उपयोग झाला नाही.म्हणून भगवानाने रोहिदासांना आर्थिक सहाय्य करण्याची दुसरी युक्ती काढली.

‘संत प्रवर रैदास साहब’ मध्ये[चंदिकाप्रसाद जिज्ञासु, संत प्रवर रैदाससाहेब, संस्करण १९८४, पृष्ठ २२-२३.]असा निष्कर्ष काढला आहे की, संत रोहिदास हे लोभास बळी पडत नाहीत.बुद्ध भगवानाने आपल्या ‘अष्टांगिक मार्ग’ मध्ये याचे नाव ‘सम्यक आजिविका’ सांगितले आहे.धर्माचे हे एक विशेष लक्षण आहे.धार्मिक पुरुष हरामचे खाणे आणि चुकीच्या मार्गाने मिळालेले उत्पन्न खाणे पसंत करीत नाहीत.लोभ आणि हरामचे खाणे हे पापाचे मूळ आहे.त्यामुळे बुद्धी पापमय होऊन स्फूर्तिही नाहीशी होऊन जाते.रोहिदासांनी त्यावर लाथ मारली.त्यांनी आपल्या बाहुबलावर परिश्रम करूल मिळालेले उत्पन्न खाणे चांगले समजले आहे.

सद्‌गुरु कबीर साहेबांनी आपला हातमाग सोडला नाही.संत दादू दयालांनी कापूस पिंजण्याचे आपले धनुष्य सोडले नाही.तसेच संत रोहिदासांनी आपली रापी व आरी सोडली नाही.या महान संतानी ह्या युगात ह्या जगास ‘सम्यक आजीविका’ चा महान आदर्श दाखवून हरामखाऊ व आळशी लोकांच्या मूर्खपणावर कोरडे ओढले आहेत.लोकांना ठकविणारे हरामखोर, ढोंगी आणि बहुरुपी साधु बनतात व पापाने मिळविलेली कमाई खातात.अशांना धर्मोपदेश करण्यास लाजही वाटत नाही.धर्माच्या नावाखाली जनता जनार्दनाला ठकविणारे आणि शिष्यांच्या धनावर चैन करणारे पापी आहेत.अशांना महात्मा, ब्राह्मण किंवा साधू समजणे म्हणजे आपणांला भ्रमात घातल्यासारखे आहे.संत रोहिदासांनी हा पापी मार्ग स्वीकारला नाही.त्यांनी आपल्या कारागिरी व परिश्रमद्वारा मिळणाऱ्या शुद्ध धनापासून उन्नती करणे पसंत केले आणि आपले दोन मजली निवासस्थान, कारखाना आणि सत्संगभवन निर्माण केले.साधू समाजात हीच त्यांची विशेषतः आहे.

अनुक्रमणिका

# १०.सुवर्णमुद्रा व सत्संगभवन

महात्मा साधू पुरूष गेल्यानंतर आणखी एक विचित्र घटना घडली.संत रोहिदास जेथे बसून जोडे शिवत;तेथे चामडे भिजविण्याच्या कुंडाखाली दरदिवशी पाच सुवर्णमुद्रा[सुपिनांतर मैं विनती करई, मुहर पांच संपुट मैं धरई।
लेहु कनक जिनि करै कुभाऊ, पूजौ भगत रिदै धरि भाऊ।
तव तै पांच पांच दिन पावै, ते सब पाक महीच्छै लावै।
-भक्त रत्नावली, पृष्ठ ३५.]मिळू लागल्या.रोहिदासांनी आरंभी दोन तीन दिवस त्या सुवर्णमुद्रांना हातसुद्धा लावाला नाही.परंतु दररोज त्याची संख्या वाढू लागली.तेव्हा ते विचार करू लागले की, ह्या धनाचा सदुपयोग कसा काय करावा?रोहिदास कित्येक दिवस ईश्वरप्रदत्त धनासंबंधी विचार करीत होते.शेवटी त्यांच्या अंतरात्म्याने निर्णय घेतला की, “ह्या धनातून भगवानाचे एक सुंदर मंदिर बनविले तर?त्या सुंदर मंदिराबरोबरच एक मोठी बाग व त्या बागेत एक मोठे सत्संग भवन निर्माण केले तर—आणि त्याप्रमाणे संत रोहिदासांनी त्या धनाचा सदुपयोग करून, एक सुंदर मंदिर[‘न्यारे मंदिर भोग लगावै, तहां न कोउ मधिम आवे।
पूजा अरचा अधिक आचारू, ‘जानै भक्ति रीति व्याहारू।
-भक्त रत्नावली, पृष्ठ ३४.]व सत्संग भवन बांधले.

त्यानंतर संत रोहिदासांना अन्नवस्त्राची चिंता राहिली नाही.सत्संग भवनात भजन-कीर्तन, त्याचप्रमाणे प्रवचने होऊ लागली.शेकडो साधू महात्म्यांसाठी दर दिवशी भोजन तयार केले जात होते.त्यामुळे संत रोहिदासांची कीर्ती दूरवर पसरू लागली.

भक्तमालमध्ये सत्संग भवनासंबंधी असे[मन्दिर महल किया बहुतेरा, जहां तहां भगतनि का डेरां।
करै कथा कीरतन सारू, आन कथा नांहि पै सारू।
तुलसी चंदन अरपै फूला, धूप दीप आरती भावहि भूला।
बाल भीग लै ढारै आंसूं।
(अनंतदास)—संत रविदासकी भक्तीसाधना, पृष्ठ २०.]वर्णन केले आहे की, रोहिदासांनी भगवानाची गोष्ट मानली.ते मोहरा घेऊ लागले.त्यांनी त्या धनापासून एक सत्संग भवन बनविले.साधुसंतांना थांबण्यासाठी एक मोठे भवन आणि भगवानाचे एक सुंदर मंदिर बांधले.रोहिदासाचे दर्शन घेण्यासाठी जनता दूरदूरहून येऊ लागली.सर्व अतिथींची भोजनांचीही सेवा पूर्ण होऊ लागली.

बनारसच्या ब्राह्मणांना ईर्षा झाली की, [मानी लई बात नई, ठौर तै बनाई चाई।
संतनि बसाई हरि, मंदिर चिनायो है।
विविध वितान, तान, मनो जो प्रमान होई।
भई गई भगति पुरी.जग जस गायो है।
दरसन आवै लोग, नाना विध राग भोग।
सोग भयो विप्रन कौ, तब सब छायौ है।
बडई खिलारी यै,छनि डारी करी।
घर पै अंटारा फिर, द्विजन सिखायो है।
—संत गुरू रविदास.पृष्ठ ५२.]एका शूद्राचा मानसन्मान खूप वाढू लागला आहे.

अनुक्रमणिका

नाभादासजी सांगतात की, प्रभूची लीला अपरंपार आहे.प्रभुने प्रथम तर निर्धन रोहिदासांचे झोपडीचे ठिकाणी महाल बनवून दिला आणि पुन्हा ब्राह्मणाच्या मनात ईर्षा निर्माण केली की, जिच्यापासून संत रेहिदासांचा आणखी मान सन्मान वाढावा.

भक्तमालचा टीकाकार प्रियादासने ह्या घटनेचे वर्णन असे केले आहे की." संत रोहिदासांच्या अत्यंत निर्धन व दयनीय परिस्थितीस पाहून स्वतः भगवान साधूवेषात त्यांच्या झोपडीवर पोहोचले आणि त्यास परीस दगड दिला.परंतु रोहिदासांनी त्याचा उपयोग केला नाही.यानंतर भगवानाचे आसन स्वच्छ करताना संत रोहिदासांना दरदिवशी पाच सुवर्णमुद्रा मिळू लागल्या.ह्या घटनेमुळे रोहिदासांना भगवानाची पूजा करण्याचेही भय वाटू लागले." असे सांगतात की, भगवानाने स्वप्नात प्रत्यक्ष भेटून रोहिदासांना ह्या सुवर्णमुद्रांचा सदूपयोग करण्याची आज्ञा केली.[लेहु कनक जिनि करेहु भाव, पूजौ भगत हिरदै धरि भाव।

—(अनंतदास)—संत रविदासकी भक्तिसाधना.पृष्ट १९.]त्यामुळे रोहिदासांनी एक मंदिर, अतिथीभवन तसेच स्वतःस राहण्यास एक घर बनविले.मंदिरास चंदोबा, ध्वजापताकांनी सजविले त्यांच्या कथा-कीर्तनास गर्दी वाढू लागली.[भगति पियारी रामकूं मरम न जानै कोय।

ऊंच-हरि ना गिणै, भगती कियै बस होई।
और येक रैदास चमारा, जानी नारद लीनौ औतारा।
सूद्र कहौ तो आवै लाजा, दरसन कारनि तलफै राजा।

—संत रविदासकी भक्तिसाधना, पृष्ट २०.]त्यांच्या वाढत्या यशामुळे काशीच्या ब्राह्मणांना रोहिदासांचा द्वेष, मत्सर वाटू लागला.

* * *

अनुक्रमणिका

# ११.सिंहासनावरील ईश्वरमूर्ती

संत रोहिदासांची कीर्ती सर्व दूर पसरू लागली.काशीचे रहिवाशी संत रोहिदासांचे कीर्तनात दंग होत.सामान्य लोक आता आपणांला विचारीत नाहीत.याचे शल्य ब्राह्मण पंडितांना लागून राहिले.

संत रोहिदास आतापर्यंत बहुश्रुतपणा व स्वाध्यायामुळे एवढे विद्वान झाले की, ते आध्यात्मिक विषयावर काशीच्या बहुतेक सत्संगामध्ये भाषणे देऊ लागले.काशीचे ब्राह्मण पंडित रोहिदासांच्या ह्या वाढत्या यशामुळे द्वेष, मत्सर व स्पर्धा करू लागले.एक शूद्र वेदांचा उच्चार करतो, ईश्वरपूजा करतो, जानवे वापरतो, गंध-टिळक लावतो, हा अधर्म आहे.काशीचे सर्व ब्राह्मण पंडित काशीच्या राजाकडे तक्रारी घेऊन गेले.

त्यावेळी काशीचा राजा मोठा न्यायप्रिय होता.ब्राह्मणांनी तिखटमीठ लावून राजास भडकाविले की, “आपल्या राज्यात एक शूद्र ईश्वरपूजा करतो;ईश्वराची आरती म्हणतो;उपदेश करीत फिरतो हा आम्हां ब्राह्मणांवर अन्याय आहे.ज्या राज्यात असा अन्याय होतो.तो राजा पापी व नरकाचा अधिकारी होतो.”तेव्हा राजाने रोहिदासास त्वरीत बोलावून घेतले.संत रोहिदासांनी राजाच्या दरबारात विनम्रपणे निवेदनकेले की,“महाराज, मी चांभाराचे घरी जन्मास आलो हे बरोबर आहे.परंतु शूद्र ईश्वराची लेकरे नाहीत कां?सर्व मानवांची शरीरे पांच भौतिक तत्वांपासून बनली आहेत.सूर्य सर्वांना सारखाच प्रकाश देत असतो.वायु सर्वांसाठी वाहत असतो.जो राम भजन करीत नाही तो नीच होय.प्रभुभक्ती ही कोणाही उच्च किंवा नीच जातीच्या व्यक्तिची मक्तेदारी नाही.प्रभुभक्ती करण्यांत राजा भिकारी व सबल-निर्बल असा भेदभाव नाही.माझ्या गुरूने मला शिकविले आहे की, प्रभुचा दरबार सर्वांसाठी मोकळा आहे.ह्या सत्त्याला
[‘हरि को भजे सो हरि काय होय, जात पाँत पूछे नही कोय’ ।
—संत गुरू रविदास, पृष्ठ ४.]हे सगळे ब्राह्मण स्वीकार का करीत नाहीत? जन्माने सगळेच शूद्र आहेत.गुणकर्मानुसार ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे वर्ण सांगितले जातात.शूद्राची उत्पत्ती यजुर्वेदानुसार भगवानाच्या चरणातून झाली आहे.त्याच भगवानाचे चरणोदक नित्य नियमाने आपण घेत असता आणि मीसुध्दा घेत असतो.मग केवळ चर्मकाराच्या घरी जन्म घेतल्यामुळे मी कसा काय अपवित्र झालो?

काशी नरेश वीरसिंह संत रोहिदासाचे प्रवचन ऐकून आश्चर्यचकित झाले.त्यांनी मोठ्या आदराने रोहिदासांना आपल्या आसनावर बसविले.

ब्राह्मणांनी शास्त्रार्थ सुरू केला.आध्यात्मिक कूटप्रश्नांचा रोहिदासावर भडिमार केला.सर्व ब्राह्मण पंडित एका बाजूस तर दुसऱ्या बाजूस संत रोहिदास एकटेच होते.न्यायप्रिय राजा सभेचे नियंत्रण करीत होता.हजारो संतप्रेमी लोक आता काय होणार म्हणून मोठ्या उत्सुकतेने पाहात होते.

संत रोहिदास ब्राह्मण पंडितांना उद्देशून म्हणाले, “ईश्वरभक्ती किंवा ईश्वरपूजा करण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणानांच आहे असे आपण मानता तर समोरच्या मंदिरात सिंहासनावर विराजमान झालेल्या ईश्वरमूर्तिस तुम्ही आपल्या जवळ बोलवा.आपण असे करून दाखविले तर मी ईश्वरपूजा सोडून देईन.आणि मी आपल्या लोकांच्या पालकीस खांदा देऊन सर्व काशी नगरीत फिरवीन.जर मीच मंदिरातील ईश्वरमूर्तिस

अनुक्रमणिका

सिंहासनासह माझ्याजवळ बोलावून घेतले तर तुम्हां सर्वांना मी बसलेल्या पालकीस खांदे देऊन सर्व काशी नगरीत फिरवावे लागेल."

गर्विष्ट पंडित मंडळी फाजील आत्मविश्वासामुळे ह्या शर्तीस सहमत झाले.आपलाच विजय होणार अशी त्यांना घमेंड होती.ईश्वर शुद्राकडे कसा जाईल?सर्व ब्राम्हण भगवानाची विधिपूर्वक पूजा करुन सामुदायिकपणे स्तुतिपूर्वक आवाहन करु लागले.एक प्रहर निघून गेला.परंतु ईश्वरमूर्ती आपल्या ठिकाणापासून हललीसुध्दा नाही.

मग काशी नरेशच्या सूचनेवरून संत रोहिदास एक भक्तिरसपूर्ण पद-प्रार्थना गाऊ लागले.त्यांचेकडे भक्तिभावाचे बळ होते.भगवंत भक्तिभावाचा भुकेला असेल तर संतांचा जय होणार होता.रोहिदास प्रार्थना म्हणत असता लोक भक्तिभावाने डोलू लागले आणि सर्वजण एकसारखे उत्कंठतेने पाहत असता, मंदिरातील ईश्वरमूर्ती सिंहासनासह रोहिदासाजवळ येऊन उभी राहिली.[इत रैदास येक पद लीनौ, सब दिन गयो भोग नही दीनौ।
साढे तीन पहर गये वीति, न काहु की हारि न जीति।
दुइ पद बोल रह्यौ रैदासु, प्रेम मगन जल डारै आंसू।
जै तुम त्रिभुवन कौ राई, जन की गोद बैठि हो आइ।
अति करूना हरि देषि जव ही, सालिगराम गोद गौ तव ही।—९५-९७.
—भक्त रत्नावली, पृष्ठ ३५-३६.]

ब्राह्मण पंडित मंडळी हरल्यामुळे शरमेने माना खाली घातल्या व प्रतिज्ञेप्रमाणे काशी नरेशाच्या सिंहासनावर संत रोहिदासांना बसवून त्यांना खांद्यावरून सर्व काशी नगरीत फिरविले.अशाप्रकारे संत रोहिदासांचा विजय झाला व त्यांचा नावलौकिक वाढू लागला.नाभादासाने भक्तमालेमध्ये ह्या घटनेचे वर्णन असे[प्रीती रस रासि सों, रैदास हरि सेवत है।
घरमें दुराई लोग, रंजन दिय टारी है।
प्रेरि दिए हदै जा, द्विजन चुकारि करि।
भरि सभा नृप आने, कह्यौ मुख नारी है।
जनको बुलाई समुझाई, न्याय प्रभु कीनो।
जग जस साधु, लीला मनुहारी है।
जिते प्रतिकूल, तेतें माने अनुकूल।
याते संतनि प्रभाव मानि, कोठरी की तारी है।
—संत गुरू रविदास, पृष्ठ ५३.]केले आहे.

रोहिदास प्रेमभावाने प्रभुसेवा करतात.संसारिक सुखास पारखे होऊन घरास आपले साधन धाम बनविले.प्रभूने ब्राह्मणांच्या मनात ईर्षा निर्माण केली व ते काशी नरेशाच्या दरबारात पोहचले.रोहिदासांना शिव्यागाळी देत, त्यांची निंदा करू लागले.ब्राह्मणांनी सांगितले की, ज्या राजाच्या राज्यात अपूज्य शूद्राची पूजा होते, आणि पूज्य ब्राह्मणांचा अनादर होतो.तेथे दुर्भिक्ष, पटकी इत्यादी संकटे प्रजेवर येतात.अर्थात असा राजा पापाचा भागीदार होतो.

काशीच्या राजाने रोहिदासांना दरबारामध्ये बोलावून घेतले.रोहिदासांची शास्त्रोक्त वाणी ऐकून त्यांचा सन्मान केला.भगवानाने भक्ताची कीर्ति वाढविली आणि जगात संत रोहिदासांचे यश वाढविले.जेवढे लोक रोहिदासांना प्रतिकूल होते, ते सर्व अनुकूल झाले.ह्या घटनेमुळे संत रोहिदासांचा महिमा वाढला आणि

अनुक्रमणिका

ब्राह्मणांची ईर्षा नाहीशी झाली.अशा प्रकारची माहिती संत गुरू रविदास[डॉ.बी.पी.शर्मा,–संत रविदास, पृष्ठ २६.]मध्ये वर्णन केली आहे.

ज्यावेळी काशी नरेशाच्या सूचनेवरून संत रोहिदास प्रार्थना करू लागले."हे द्वारकाधीश कृष्ण मुरारी, तू इतक्या दूर द्वारकेत बसून माझी कसोटी चूपचापपणे पाहात राहणे योग्य होणार नाही.काशीमध्ये कोलाहल माजला आहे.लोक माझ्या भक्तिची कसोटी पाहण्यास जमले आहेत.प्रभो, तुला माझी लाज राखलीच पाहिजे."[ऐसी जिनि करि हो महाराज।
दूरि मांहि बइठे तुम देखौ विगरत है यौ कात।
खल हल काशी लोग बहु आए देखन भगति समात।
विरद तजौ के विरद संभारी, कहै रैदास चमराज।
–संत रविदासकी भक्तिसाधना, पृष्ठ २०.]

अनंतदासांनी ब्राह्मण पंडितांना सांगितले.[नांहि राम तुम्हारे बांटे, सब कोउ लेत सिर कै साटै।
सालिगराम आनि विराजै, लेहु वुलाइ न काहु लाजै।
–संत रविदासकी भक्तिसाधना, पृष्ठ २१.]

संत रोहिदासांनी काशीच्या नरेश दरबारात आराधना केली.[आयो आयो हाँ देवाधिदेव तुम सरन आयो।
सकल सुख की भूल जाकि नहीं समतूल सो चरन भूल पायो।
लियो विविध जोनि वास जम की अगम त्रास,
मुम्हरे भजन विन भ्रमर फिर यो॥
माया मोह काम विषय लंपट निकाम यह, अति दुस्तर दूर तरयो॥
तुम्हारे नाव विसास छांडिये आन आस।
संसारी धर्म मेरो मन न धीजै।
'रविदास' दास की सेवा मानहु देव।
पतित पावन नाम आजु प्रकर किजै॥
–श्री.संत राहिदास, पृष्ठ ३३.]

संत रोहिदासांची आराधना पूर्ण झाल्यावर मंदिरातील ईश्वरमूर्ती सिंहासनासह जवळ येऊन उभी राहिली.या चमत्काराने संत रोहिदास आश्चर्यचकित झाले.या घटनेने भक्त पलटुदास अत्यंत प्रभावित होऊन म्हणतात की,[नहाते त्रिकाल रोज पंडित अचारी वडे, सदापट वस तर सूत अंग न लगाई है।
पूजा नैवेद आरती करते हमविधि विधान, चंदन और तुलसी भली भांति चढाई है॥
हारे हम कुलीन सव कोटि कोटि के उपाय, कैसे तूम ठाकुर हम अपने है न पाई है।
'पलटुदास' देखो रीझ मेरे साहब की, गये है कहाँ, जब रविदासने बुलाई है॥
–श्री.संत रोहिदास.पृष्ठ ३४.]"दररोज सकाळी, दुपारी व संध्याकाळी स्नान, पूजा, नैवेद्य, आरती करणारे, चंदन आणि तुलस वाहणारे कुलीन ब्राह्मण पंडित येथे हरले व संत रोहिदासांनी आवाहन केल्याबरोबर भगवान आले."

* * *

अनुक्रमणिका

# १२.चरणामृत

संत रोहिदासांची प्रसिद्धी सर्वत्र पसरली.काशी नगरातील तरुण-वृद्ध स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत इत्यादी सर्व लोक संत रोहिदासांच्या सत्संगामध्ये सामील होऊ लागले.संत रोहिदासांनी आत्मचिंतन तसेच हरिभक्तिद्वारे पण्डे-पुजारी, लंपट-साधू, दुसऱ्याच्या अन्नावर पोसणारे महंत यांचे वाभाडे काढले.त्यांनी जातीयवादास विरोध केला.सामाजिक आचारविचारामध्ये परिवर्तन आणून क्रांतीस जन्म दिला.त्यांनी मोंगल अमलातील काफिराविरूद्ध आवाज उठविला.त्यांनी स्वातंत्र्याची महति गाइली तर पारतंत्र्यास पाप म्हटले.[पराधिनता पाप है, जानि लेहु रे मीत।
रविदास दास पराधीन, सों कौन करे प्रीत॥
–संत गुरु रविदास, पृष्ठ २८.]

परमात्म्याचे अमृतपुत्र मानवास मानवमात्राची सेवा तसेच आत्मचिंतनाचा पाठ शिकविला, अधम जातीत जन्म घेतल्याने नीच होत नाही.तर जो कपटी, पाखंडी, ढोंगी आहे व स्वार्थसिद्धीसाठी दुसऱ्यांना फसवितो तो नीच होय.मानसिक गुलामीस तोडून स्वतंत्र आत्मचिंतनद्वाराही खरी ईश्वरभक्ती प्राप्त होऊ शकते.ईश्वर सर्व सर्वव्यापक आहे.तो कोणत्याही वर्गाची अथवा व्यक्तिची मिळकत नव्हे.जोपर्यंत परम वैराग्य उपलब्ध होत नाही, तोपर्यंत भक्तिच्या नावाने केल्या जाणाऱ्या साधना व्यर्थ आहेत.जोपर्यंत जीवरूपी नदी ब्रह्म रूपी समुद्रात विलीन होत नाही.तोपर्यंत ती बेचैन होत असते.त्याच्यात एकाकार होण्यामुळे तिचा आवाज नाहीसा होतो.प्रभुप्राप्तिसाठी आपल्या अहंकारास नष्ट करणे आवश्यक असते.साधना ही जीवनाचे परमलक्ष्य आहे.तसेच भगवान कृपेमुळे जीवन सफल होवू शकते.जो ह्या गोष्टींना समजू शकतो.तो कोणत्याही वर्ण, जाती तसेच वर्गाशी संबंधित असो, तो प्रभुचा खरा सेवक व परमपुरुष होय.

संत रोहिदासांच्या सत्संग भवनात नेहमी कथा-कीर्तनास बरीच गर्दी जमत होती.[डॉ.योगेंद्रसिंह, संत रैदास, पृष्ठ २०८]एके दिवशी एक प्रतिष्ठित श्रीमंत शेटसुद्धा सत्संगमध्ये बसून रोहिदासाचे प्रवचन ऐकत होते.कथा कीर्तन संपल्यावर संत रोहिदास नेहमीप्रमाणे आपल्या मातीच्या भांड्याने (जोडे बनविताना ज्याच्यात चामडे भिजवितात) चरणामृत वाटू लागले.लोकांनी दोष देऊ नये म्हणून शेठ साहेबांनी चरणामृत हातावर घेतले.परंतु रोहिदास शुद्र, चांभार होते.म्हणून शेट त्यांचे हस्ते चरणामृत प्याले नाहीत.परंतु पिण्याचे नाटक करून डोक्यावरून मागे फेकून दिले.मात्र चरणामृत फेकतेवेळी त्याचा सदरा ओला झाला.घरी येताच शेठजीने अंगातील सदरा काढून धोब्याला दिला.त्या दिवसापासून शेठसाहेबांचे शरीरावर कोड फुटू लागले.

तिकडे धोब्याच्या मुलीने चरणामृताचा डाग पडलेला सदरा धुतला.तेव्हापासून तिच्या शरीरावर पूर्वीपासून असलेले कोड नाहीसे झाले.ही बातमी शेठ साहेबांना समजली.त्यामुळे शेठसाहेबांचे मनात कल्पना आली की, संत रोहिदासांच्या सत्संगामध्ये चरणामृत न पिण्याची आपण घोडचूक केली.तेव्हापासून आपणास कोडाचा रोग सुरू झाला.तर त्याच चरणामृताने भिजलेला सदरा धुतल्यामुळे धोबी कन्येचा रोग नाहीसा झाला.खऱ्या भक्ताच्या भक्तिचा आपण अपमान केला म्हणून शेठ साहेबाचे मनास मोठा पश्चाताप वाटला. शेठसाहेब शरमेने चूर झाले.दुसरे दिवशी शेठ साहेब संत रोहिदासांचे सत्संगमध्ये जाऊन बसले.संत रोहिदास शेठ साहेबांचा मानसिक पश्चाताप समजले.कीर्तन संपल्यावर रोहिदास चरणामृत वाटू लागले.तेव्हा शेठ साहेबांनी संत रोहिदासांच्या पाया पडून क्षमा मागितली.रोहिदासांनी क्षमा केल्यावर शेठजी श्रद्धा भक्तीने चरणामृत घेऊन प्याले.तेव्हापासून त्यांचा कोडाचा रोग नाहीसा झाला.

अनुक्रमणिका

शेठसाहेब घरी आल्यावर संत रोहिदासांचा मोठेपणा सर्वांना सांगू लागले.परंतु संत रोहिदास मात्र स्वतःकडे कसलाही मोठेपणा घेत नाहीत.ते म्हणतात.[तुम चंदन हम इरंड बापुरे संगी तुमारे बासा ।
नीच रूख ते उँच भये है गंध सुगंध निवासा ।
माधउ संतसंगति सरनि तुमारी हम अउगन तुम उपकारी ।
तुम मुखतूल सुपेद सपीअल हम बपुरे जस कीरा ।
संत संगति मिली हरिऐ माध माधउ जैस मधुप मखीरा॥
–श्री संत रोहिदास, पृष्ट ६३.]"प्रभो तू चंदन आहेस, आम्ही एरंड आहोत.तुझ्या संगतीमुळेच आम्हाला सुगंध मिळाला.आम्ही नीच असून, तुझ्यामुळेच आम्ही उच्च झालो आणि तुझा गंध, सुगंध आम्हांस मिळाला.संत संगतिमुळे आमचे जीवन उजळून निघाले.तू पांढरा शुभ्र आणि आम्ही काळे परंतु तुझ्या संगतीमुळे आम्ही शुद्ध झालो.ज्याप्रमाणे मधमाशी चिकटून मधास राहते, त्याप्रमाणे आम्हांस संतसंगती लाभो.

ह्या चरणामृताबाबत शेठसाहेबाचे ऐवजी राजा पीपाची गोष्ट सांगतात ती अशी, [श्री.काशीनाथ उपाध्याय, गुरू रविदास, प.आ.सन १९८३, पृष्ट २६ ते २८.] संत रोहिदास फार मोठे ज्ञानी व संत-महात्मे आहेत, असा त्यांचा नावलौकिक सर्वत्र झाला.ही बातमी गांगरोन संस्थानचा राजा पीप यांच्या कानी गेली.तेव्हा त्यास संत रोहिदासांचे दर्शन घेण्याची इच्छा झाली.परंतु संत रोहिदास हे चांभार जातीचे.माझ्यासारख्या क्षत्रिय राजाने संत रोहिदासांच्या झोपडीत जाऊन दर्शन घेतल्याचे लोकांना कळले तर आपली छीथू होईल.म्हणून पीपाराजास लाज वाटत होती.राजा पीपा चिंताग्रस्त होऊन विचार करू लागले.

एकेदिवशी गंगा स्नानाचा मोठा मेळा भरला होता.त्यादिवशी गंगास्नान केल्यास पुण्य प्राप्त होणार म्हणून काशी नगरीतील बहुतेक लोक गंगा किनारी गेले होते.ही संधी साधून राजा पीपा गुपचूपपणे संत रोहिदासांचे घरी गेले.त्यावेळी संत रोहिदास चामडे भिजविण्याच्या कुंडातून भांड्याने पाणी काढीत होते.त्यावेळी राजा म्हणाला, "महाराज, आपण मला दर्शन द्यावे."तेव्हा संत रोहिदासांनी त्यांना दर्शन दिले व त्या भांड्यातील पाणी देत म्हणाले, "राजा हे चरणामृत पी."

राजाच्या मनात तिरस्कार निर्माण झाला की, माझ्यासारख्या क्षत्रिय राजाने चांभाराच्या पायावर सोडलेले चामड्याचे पाणी कसे घ्यायचे?परंतु संत रोहिदासांना नकार देणेही कठीण होते.शेवटी राजानेउजवा हात पुढे करून चुळीत चरणामृत घेतले व संत रोहिदासांची नजर चुकवून सदऱ्याचे बाहीतून ते जमिनीवर सोडून दिले.हे संत रोहिदासांचे लक्षात आले पण ते काहीच बोलले नाहीत.

राजा पीपा त्वरित राजवाड्यात आला.सदरा बदलताना राजाच्या मनात विचार आला की, "आज रोहिदास आपणांस बाटवून चांभार करीत होता.परंतु आपण मोठ्या मुष्किलीने सुटून परत आलो."राजाने धोब्यास बोलावून घेतले व त्यास सांगितले की, "सदऱ्याच्या बाहीचा डाग पूर्णपणे काढून सदरा चांगला धुवून आण."

धोबी धुण्याचा मसाला तयार करू लागला.मुलगी लहान अज्ञान होती.तिने डाग चोखून थुंकण्याऐवजी गिळला.त्यामुळे तिला अंतर्ज्ञान प्राप्त झाले.ती उच्च दर्जाच्या आध्यात्मिक गोष्टी बोलू लागली.ही गोष्ट राजधानीत लोकांच्या व राजा पीपा यांच्या कानी आली.एका अंधाऱ्या रात्री राजा पीपा

अनुक्रमणिका

गुपचूपपणे धोब्याच्या मुलीकडे गेला.राजाला पाहाताच मुलगी हात जोडून उभी राहिली.तेव्हा राजा म्हणाला, “मुली, मी तुझ्याकडे राजा म्हणून आलो नाही, तर एक भिकारी म्हणून आलो आहे.”

तेव्हा मुलगी म्हणाली, “मी तुम्हांला राजा म्हणून उभी राहिले नाही, तर आपल्या कृपेने मला ज्ञान प्राप्त झाले म्हणून मी उभी राहिले.”

राजाने विचारले, “माझ्या कृपेने तुला कसे काय ज्ञान प्राप्त झाले?”तेव्हा मुलीने सांगितले की, “आपल्या सदऱ्याच्या बाहीचा डाग मी तोंडाने चोखून गिळला तेव्हा मला अंतर्ज्ञान प्राप्त झाले.”

हे ऐकून राजास फार दुःख झाले.राजा स्वतःस उद्देशून म्हणाला.“ज्याचेमुळे मी परमार्थाला मुकलो, थूः माझ्या क्षत्रियपणाला!थूः माझ्या राजेपणाला व लोकलाजेला!!थूः जातीपातीच्या भेदभावाला!!!आता कशाचीही पर्वा करायची नाही.असा मनात निश्चय करून तो तसाच संत रोहिदासांचे घरी गेला व राजाने हात जोडून विनंती केली की, “रोहिदास महाराज, आपले चरणामृत मला पुन्हा पिण्यास द्या.”

तेव्हा संत रोहिदास म्हणाले, “राजा, तू माझ्याकडे पहिल्यांदा आलास तेव्हा मी विचार केला होता की, “क्षत्रिय राजा स्वतःहून माझ्यासारख्या चांभाराच्या घरी आला आहे;तेव्हा त्यास कधीही नष्ट न होणारी वस्तु द्यावी.”म्हणून मी दिलेले कुंडाचे पाणी नव्हते.ते तर अमृत होते.मी तर रोज अमृत पितो.परंतु आज राजाला प्यायला देऊ या.तू ते अमृत बाहीतून जमिनीवर सोडून दिले.धोब्याच्या मुलीने त्या सदऱ्याचा डाग चोखला.तेव्हा ती महात्मा बनली.आता मी तुला रामनामाची दीक्षा देतो.तू तपश्चर्या करून त्या नाम दौलतीस प्राप्त करून घे.”

ह्या गोष्टीवरून स्पष्ट होते की, जातीपातीचा व धनदौलतीचा अभिमान नामदौलत व प्रभुभक्ती प्राप्त करण्यास बाधक असतो.यासंबंधी संत रोहिदासांनी आपली भावना काव्यात प्रगट केली.[भगती अैसी सुनहु रे भाई,
आई भगति तउ गई बड़ाई।
.... .... .... ....
कहै रविदास तेरी भगति दूर है, भाग बडे सो पावै।
तजि अभिमान मेटी आपा पर, पिपलक है चूणि खावै॥
—(वाणी १८) गुरू रविदास, पृष्ठ २८.]

उच्च जातीचा तसेच श्रीमंतीचा अभिमान नामदौलत व प्रभुभक्ती मिळविण्यात अडचणीचा होतो.यासंबंधी संत रोहिदासांनी आपली भावना आणखी काही काव्यात प्रगट केली आहे.[तुझाहि सुझंता कछू नाहि,
पहिरावा देखे ऊभि जाहि।
गरबबती का नाही ठांउ, तेरी गरदनि ऊपरि लवै काउ॥
.... .... .... ....
साधू की जउ लेहि ओट, तेरे मिटहि पाप सभ कोटि कोटि।
कहि रविदासु जो जपै नामु, तिसु जाति न जनमु न जोनि कामु॥
—(श्री आदि ग्रंथ, पृष्ठ ११९६ : वाणी १२०)—गुरू रविदास, पृष्ठ २८.]

* * *

अनुक्रमणिका

# १३.कंकण (कंगन)

काशी पुण्य क्षेत्री निवास करणाऱ्या संत रोहिदासांची गंगामाईवर खूप श्रध्दा होती.गंगेच्या निर्मळ जलाचे नेहमी दर्शन घ्यावे व कृतार्थ व्हावे असे त्यांना वाटे.गंगामाईचे गुणगान केल्याने सगळे विविध ताप नाहीसे होतात, अशी त्यांची समजूत होती परंतु पोटापाण्याच्या उद्योगामुळे त्यांना गंगाकिनारी जाऊन दर्शन घेण्यास वेळ मिळत नसे.माघ महिन्यात गंगा स्नान करण्याचे महत्त्वाचे पर्व आले, तेव्हा सर्व हिंदू पाप-क्षालन करण्यासाठी गंगाकिनारी स्नान करण्यासाठी जाऊ लागले.ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, ऋषी, मुनी, संन्यासी, राजा, रंक इत्यादी सर्व प्रजाजन मोठ्या आनंदाने गंगास्नान करू लागले.

त्या दिवशी संत रोहिदास आपल्या घरी जोडे शिवीत बसले होते.अशावेळी एक ब्राम्हण यात्रेकरू जोडा दुरुस्त करण्यासाठी आला.[डॉ.योगेंद्रसिंह, संत रैदास, प.आ.सन १९७२, पृष्ठ २०९.]तो ब्राह्मण एका राजाचा पुरोहित होता.तो आपल्या राजातर्फे गंगामाईस भेट चढविण्यास चालला होता.जोडा दुरूस्त करून दिल्यावर त्या ब्राह्मणाने एक पैसा रोहिदासांस दिला.तोच पैसा राहिदासांनी त्या ब्राह्मणास परत देऊन म्हटले, "ही माझी भेट गंगामाईस द्या.पण जेव्हा गंगामाई स्वतः हात पुढे करून घेईल, तेव्हाच देणे.ही भेट गंगामाईने न घेतल्यास, माझा पैसा मला परत आणून द्या."

रोहिदास चांभाराचे बोलणे ऐकून ब्राह्मण मनात हसला व मनात म्हणाला, "ह्या चांभाराचे डोके बिघडलेसे वाटते.आजपर्यंत गंगामाईनी आपला हात पुढे करून कोणाच्या भेटीचा स्वीकार केला आहे काय?"

तो ब्राह्मण तेथून निघाला व गंगा घाटावर पोहचला.प्रार्थना करून यजमान राजाची भेट गंगा प्रवाहात सोडली.नंतर त्यास रोहिदास चांभाराच्या पैशाची आठवण झाली.तेव्हा तो पैसा गंगाजलात फेकणार, इतक्यात गंगामाईने आपला हात पाण्याबाहेर काढून पैसा प्रवाहात पडण्यापूर्वी घेतला.हे पाहून ब्राह्मण आश्चर्यचकित झाला.क्षणार्धात एक सोन्याचे कंकण (कंगन) घेतलेला हात पाण्याबाहेर आला आणि प्रवाहातून आवाज आला की, "हे कंकण माझा प्रसाद म्हणून माझा आवडता भक्त रोहिदासांचे हातात दे.चूक करू नकोस."

ब्राह्मणाने गंगामातेस दोन्ही हात जोडून नमस्कार केला व तो परत फिरला.रस्त्याने जाता जाता ब्राह्मणाचे मनात लोभ निर्माण झाला.गंगामातेने आपल्या शुभ हस्ते दिलेले बहुमोलाचे सुंदर कंकण मोठ्या मुष्किलीने आपल्या हाती पडले आहे.त्या चांभारास अशा कंकणाची काय जरूर आहे?हे कंकण आपल्या यजमान राजाला गंगाप्रसादाच्या रूपाने दिले, तर राजा खूष होऊन आपणांस बरेच मोठे बक्षीस देईल.त्याप्रमाणे तो ब्राह्मण रोहिदास चांभाराकडे न जाता, आपल्या प्रदेशात परत गेला व ते कंकण आपल्या राजाला दिले.कंकण पाहून राजा खूष झाला.राजाने ते कंकण (कंगन) राणीस दाखविले.ते सुंदर आकर्षक कंकण राणीस खूपच आवडले.ती म्हणाली, "असेच दुसरे कंकण मिळाले तर जोडी होईल."

राणीने या जोडीचे कंकण मिळविण्याचा राजाकडे आग्रह धरला.तेव्हा राजाने एका नामांकित सोनार कारागिरास बोलावून घेतले व या जोडीचे कंकण बनवावयाला सांगितले.त्याने खूप प्रयत्न केला परंतु त्या कंकणासारखे कंकण बनविता येईना.तेव्हा अनेक कारागिरांना बोलावून घेतले.परंतु कोणीही कारागिर तसे

कंकण बनवू शकला नाही.इकडे त्याप्रकारचे दुसरे कंकण मिळविण्याची राणीची इच्छा अधिकाधिक प्रबल होऊ लागली.परंतु तसा जोड मिळेना म्हणून ती दुःखाने चिंताग्रस्त होऊन आजारी पडली.वैद्याकडे औषधोपचार केले.परंतु व्यर्थ.वैद्य म्हणाले, “राणीची इच्छा पूर्ण केल्याशिवाय, त्यांची प्रकृती ठीक होणार नाही.”

शेवटी राजाने ब्राह्मणास बोलावून घेतले व त्यांस सांगितले की, “जेथून हे कंकण आणलेस, तेथून याच्या जोडीचे दुसरे कंकण आणल्यास ठीक, नाहीतर मृत्युदंडाची शिक्षा दिली जाईल.”

प्राणावर संकट बेतल्यावर ब्राह्मणाने राजास सर्व सत्य हकिकत सांगितली.तेव्हा राजास मोठा पश्चाताप झाला.तिकडे राणीची प्रकृति फारच बिघडत चालली.तेव्हा दरबारातील विद्वानांनी सांगितले की, “अशा परिस्थितीत रोहिदासांना शरण गेल्याशिवाय दुसरा उपाय नाही.”

शेवटी हार खाऊन राजा व राणी ब्राह्मणासह संत रोहिदासांचे घरी गेले.तिघांनी रोहिदासांना हात जोडून नमस्कार केला.घडलेली सर्व हकीगत सांगून राजाने रोहिदासांस जोडीचे कंकण देण्याची विनंती केली.ब्राह्मणाने संत रोहिदासांची क्षमा मागितली.तेव्हा रोहिदासांनी क्षमा करीत म्हटले, “ब्राह्मण देवा, घाबरू नका.मी दुसरे कंकण होतो.”

संत रोहिदासांनी घराजवळच्या कुंडाजवळ जाऊन गंगामाईची प्रार्थना केली.तेव्हा असे सांगितले जाते की, कुंडातून गंगामाई प्रकट होऊन तशा प्रकारची अनेक कंकणे दिली.परंतु संत रोहिदासांनी फक्त एकच कंकण घेऊन ते राजास दिले.सर्वांनी हात जोडून नमस्कार केला.गंगा गुप्त झाल्यावर संत रोहिदास म्हणाले, “मन चंगा तो कठोतीमे गंगा!”मनाचे पावित्र्य असेल तर कुंडातसुध्दा गंगाजळ निर्माण होते.भक्तिभावाने प्रसन्न होणारा देव जातीपातीचे बंधन पाळीत नाही.”

जोडीचा कंकण पाहून राणी खूष झाली.तिची प्रकृती चांगली झाली.शेवटी राजा-राणी दोघेही संत रोहिदासांचे शिष्य झाले.

गंगा व कंकण यांचेसंबंधी गढ़वाली लोककथेमध्ये थोडासा फरक आहे तो असा—[डॉ.योगेंद्रसिंह, संत रैदास, पृष्ठ २१०.]

देवांच्या सभेत गप्पागोष्टी चालल्या असता एकदा ब्रह्माने विचारले की, “भक्तांमध्ये सर्वश्रेष्ठ भक्त कोण आहे?”

तेव्हा देवांनी उत्तर दिले की, “कबीर, कमाल व संत रोहिदास.संत रोहिदासांनी बारा वर्षांपर्यंत गंगामाईची सेवा केली आहे.”

शेवटी ब्रह्मानेही गंगेकडे जाण्याचा निश्चय केला.ब्रह्मा गंगाकिनारी जात असता वाटेत रोहिदासांची भेट झाली.तेव्हा रोहिदासांनी ब्रह्मास एक पैसा देऊन सांगितले की, “माझ्यावतीने हा पैसा गंगामाईस अर्पण करा.गंगा प्रकट होऊन माझी भेट ती आपल्या हाताने घेईल.”

अनुक्रमणिका

संत रोहिदास चांभाराच्या हातचा पैसा घेताना ब्रह्माला कसेसेच वाटले.रोहिदास समजून गेले.ब्रह्मा पैसा घेऊन गंगेस गेला.परंतु रोहिदासांचा पैसा गंगेस अर्पण करण्यास विसरला.ह्या अपराधामुळे परत जातेवेळी ब्रह्माचे डोळे अंध झाले.तेव्हा ब्रह्मा परत गंगेकडे गेले व रोहिदासांचा पैसा गंगेस अर्पण करणार इतक्यात गंगामाई प्रगट होऊन रोहिदासाचा पैसा घेतला व ब्रह्मास कंकण (कंगन) देत म्हटले की, "हे कंकण माझा भक्त रोहिदासाला दे."गंगामाई गुप्त झाली.

परत जातेवेळी ब्रह्माचे मनात कपट आले.रोहिदासास चुकविण्यासाठी ब्रह्म ज्या रस्त्याने आला होता, तो रस्ता सोडून दुसऱ्या रस्त्याने जाऊ लागला.परंतु रोहिदास दुसऱ्या रस्त्यावरही असल्याचे ब्रह्मास दिसले.ब्रह्मा ज्या ज्या रस्त्याने जाण्याचा प्रयत्न करी, त्या त्या रस्त्यामध्ये रोहिदास दिसत असे.शेवटी ब्रह्माने हार खाऊन, गंगेने दिलेले कंकण रोहिदासांस देऊन त्यांची क्षमा मागितली.

* * *

अनुक्रमणिका

# १४.शाळिग्राम

एका कुंभमेळ्याच्या वेळची गोष्ट. पवित्र प्रयाग तीर्थावर गंगा स्नान करण्यासाठी राजे लोक तसेच भिकारीसुद्धा आले होते.ऋषी, मुनी, संत, तपस्वी, ज्ञानी, साधू, तसेच ब्रह्मचारीसुद्धा आले होते.लहानमोठे राजे महाराजे निरनिराळ्या प्रकारच्या वाहनावर बसून आले.तसेच क्षत्रियसुद्धा शस्त्रानिशी गंगा घाटावर आले होते.अशा प्रकारे पवित्र अशा त्रिवेणी संगमाच्या किनाऱ्यास सर्व भाविक भक्तांची गर्दी उडाली होती.गंगा, यमुना व सरस्वती ह्या पवित्र तीन नद्यांच्या त्रिवेणी संगमात स्नान करण्यासाठी सर्व भक्तजन एकत्र आले होते.संत रोहिदासहि कबीर व आपल्या संत शिष्यांसह ह्या कुंभमेळ्यास आले होते.तेथील विराट व्यासपीठावर इतर साधुसंतांबरोबर संत रोहिदासांचे कीर्तन व उपदेशपर भाषण झाले.ईश्वर स्मरणात दंग झालेल्या व लोकप्रिय अशा संत रोहिदासाबद्दल खोट्या ज्ञानाच्या गर्वाने पछाडलेल्या पंडितांमध्ये असंतोष निर्माण झाला.त्यांना वाटले, चांभारासारखा एक शुद्र व्यासपीठावर बसून उपदेश करतो, हे पाप आहे.म्हणून त्यांनी आरडाओरड सुरू केली.रोहिदासांचा पाणउतारा कसा करता येईल, त्यांची अपकीर्ति कशी होईल याचीच ब्राह्मण वाट पाहत होते.त्यांनी रोहिदासांची निंदा करण्याचा चंग बांधला.परंतु संत रोहिदास घाबरले नाहीत.स्वतःस ज्ञानी, पंडित म्हणविण्यास सगळा ब्राह्मणवर्ग संत रोहिदासाविरुद्ध पाहून भोळेभाबडे भक्त घाबरून गेले होते.संत रोहिदासांस धर्मशास्त्र माहीत असेल, तर त्यांनी ब्राह्मणांबरोबर वादविवाद करावा.खऱ्याखोट्याची परीक्षा सुरू झाली.

ब्राह्मण पंडितांनी संत रोहिदासांस कठिणात कठीण असे गूढ प्रश्न विचारले.परंतु त्या सर्व प्रश्नांची उत्तरे संत रोहिदासांनी विनम्रपणे दिली.तेव्हा संत रोहिदास मोठ्या आवाजात म्हणाले, “ईश्वर भक्तिवर फक्त ब्राह्मण वर्गाचाच हक्क किंवा अधिकार नाही.ईश्वर फक्त मंदिरात नाही किंवा मशिदीमध्येसुद्धा नाही.तो सर्व व्यापक आहे.प्रभु भजन करण्याचा सर्व प्राणीमात्रांना अधिकार आहे.”

ब्राह्मण पंडित म्हणाले, “मंदिरात प्रस्थापित केलेली भगवानाची मूर्ती साधारण दगड नव्हे.ज्याप्रमाणे गंगा साधारण नदी नाही.तसेच गाय सामान्य पशु नाही.”

“हे बरोबर आहे.”असे म्हणून संत रोहिदास व ब्राह्मण मंडळीत पुढे बराच वादविवाद झाला.ब्राह्मण पंडित संत रोहिदासास म्हणाले,[सुधौ सुमिरत रहो हरि नामूं, तूं जिनि पूजै सालिगरामूं।
–भक्त रत्नावली, पृष्ठ ३५.]तू शाळीग्रामाची पूजा सोडून हरिनामाचे स्मरण कर.तेव्हा संत रोहिदासांनी शाळिग्रामाची पूजा सोडण्यास नकार दिला.[भक्ति पियारी राम कूं मरम न जानै कोय।
ऊंच नीच हरि ना गिणै, भगति किये वस होय।८।
–भक्त रत्नावली, पृष्ठ ३५.]रोहिदास वादविवादात हार जात नाही हे ब्राह्मणांनी ओळखले.रोहिदासाची फजिती करण्यासाठी ब्राह्मणांनी एक युक्ती शोधून काढली.

धूर्त ब्राह्मण पंडितांनी लाकडापासून तयार करून घेतलेले शाळिग्राम जवळ तयार ठेविले होते.म्हणून ब्राह्मणांनी संत रोहिदासास पेच टाकला की, “जर संत रोहिदास खरा भक्त असेल, तर त्यांच्या पूजेतील शाळिग्राम गंगामाई उचलून धरील.”

अनुक्रमणिका

भक्त रोहिदासांचा शाळिग्राम खराच होता.धूर्त ब्राह्मणांचा लाकडाच्या शाळिग्रामाप्रमाणे नव्हता.रोहिदास म्हणाले, "ईश्वराची परीक्षा घेणे योग्य नाही."परंतु त्यांचे कोणी ऐकून घेईना.त्यांना ब्राह्मणांच्या त्या तुफानी वादळाला तोंड द्यायलाच पाहिजे होते.कारण ब्राह्मणांनी संत रोहिदासास पुन्हा पुन्हा आव्हान दिले.कारण ब्राह्मण ईर्षेला पेटले होते.तेव्हा संत रोहिदास ब्राह्मण पंडितांना म्हणाले, "जर तुमचा प्रस्थापित केलेला शाळिग्राम पाण्यात बुडाला तर प्रभू पूजा ब्राह्मणच करू शकतात हा हट्ट तुम्ही लोकांनी सोडला पाहिजे.माझा शाळिग्राम त्रिवेणी संगमात बुडाला तर मी आजपासून व्यासपीठावर बसणार नाही आणि उपदेश करण्याचेहि सोडून देईन."

रोहिदासांची प्रतिज्ञा ऐकूण ब्राह्मणांना आनंद वाटला.शाळिग्राम सोडण्यास सुरुवात झाली.अलोट गर्दी मोठ्या उत्सुकतेने शाळिग्रामकडे पहात होती.बघता बघता ब्राह्मणांच्या लाकडाच्या शाळिग्राम मूर्ती त्रिवेणी संगमात बुडाल्या.भक्ताची लाज राखण्यासाठी भगवंत काय करणार नाही?कपटी आणि ढोंगी माणसांची प्रभुला चीड असतेच.

यानंतर संत रोहिदासांनी आपल्या शाळिग्रामाची पूजा केली.त्याचे दर्शन घेतले व व्याकुळतेने म्हणाले,[सत्य सनातन धर्म है। कहत वेद श्रुति सार।
तौ फिरि तरै शालिग्रामजी। होय धर्म जयकार॥
—कामतकृत श्री संत रोहिदास, पृष्ठ १७.]"हे भगवंता, वेद, श्रूतिचा सार असलेला सत्यधर्म जर खरा असेल, तर हा शाळिग्राम तरला जाऊ दे.सत्य धर्माचा पुन्हा एकदा जयजयकार होऊ दे."

संत रोहिदासांनी आपल्याजवळची सिंहासनासह शाळिग्रामची मूर्ती उपस्थित जनसमूदायाला दाखवून त्रिवेणी संगमात सोडली.भगवंत धाऊन आला.सिंहासनासह शाळिग्रामची मूर्ती पाण्यावर तरंगू लागली.ती अद्भूत लीला पाहून सारा जनसमूदाय म्हणू लागला की,[जनु समुदाय देखिं यह लीला। धन्य भक्त रवि गुणशीला।
तुम्हरो ज्ञान सत्य जगमाई। साक्षी दियो स्वयं प्रभू आई॥
—कामतकृत श्री संत रोहिदास, पृष्ठ १८.]"गुणशीलाने युक्त असलेले संत रोहिदास धन्य होय.त्यांचे ज्ञान सत्य स्वरूपाचे आहे."भक्तजन गाऊ नाचू लागले.[जय रविदास परम शुभ ज्ञानी। तुम सम कोउ नही हम मानी।
—कामतकृत श्री संत रोहिदास, पृष्ठ १८]परमशुभ ज्ञानी अशा संत रोहिदासांचा जयजयकार असो!लोक संत रोहिदासांना म्हणू लागले, "तुमच्यासारखा ज्ञानी संत दुसरा कोणीही नाही असे आम्ही मानतो.तुमचा त्रिवार जयजयकार असो!"

एवढे होऊनही ब्राह्मणांना शंका आली की, आपल्याप्रमाणेच संत रोहिदासाने लाकडाचा तर शाळिग्राम बनविला नसेल?म्हणून त्यांनी खात्री करून घेतली.रोहिदासांचा शाळिग्राम दगडाचाच होता.रोहिदासांना अपमानीत करण्याचा ब्राह्मणांचा डाव फसला.एवढेच नव्हे तर त्यांचा डाव त्यांचेवरच उलटला.रोहिदासासाठी खोदलेल्या खड्ड्यात ब्राह्मण स्वतःच पडले.ब्राह्मणांनी आपल्या हातांनी आपली फंजिती करून घेतली.कारण द्वेष, मत्सरांनी त्यांना पूर्ण ग्रासले होते.

काशिनाथ उपाध्याय यांनी 'गुरु रविदास' पुस्तकामध्ये शाळिग्रामासंबंधी अशी कथा लिहिली आहे की, ब्राह्मणांनी रोहिदासांना आव्हान दिले की, त्यांनी आपल्या शाळिग्रामला गंगेत तरवून आपल्या पूजल्या

जाणाऱ्या मूर्तिचा खरेपणा सिद्ध करावा.तेव्हा संत रोहिदासांनी नम्रपणे सांगितले की, मी कोणत्याही शाळिग्रामाची पूजा करीत नाही.जोडे बनविण्याचे हत्यार हाच माझा शाळिग्राम आहे.कारण मी त्याच्यामुळे श्रम करून साधे आणि सदाचाराचे जीवन जगतो.[(अ) श्रम कउ ईसर जानि कै, जउ पूजहि दिन रैन।
'रविदास' तिन्हहि संसार मंह, सदा मिलहि सुख चैन॥—दर्शन ११६.
(ब) 'रविदास' हौं निज हत्याहिं, राखौ रांवी आर।
सुकिरित ही मम धरम है, तारैगा भवपार॥दर्शन ११७.
(क)प्रभ भगति श्रम साधना, जग महं जिन्हहिं पास।
तिन्हहिं जीवन सफल भयो, सत्त भाषै 'रविदास' ॥दर्शन ११८।
—गुरु रविदास, पृष्ठ २३ व २४.]

ब्राह्मणांनी पुन्हा आग्रह करून संत रोहिदासांना सांगितले की, "हरकत नाही."तुमचा जो शाळिग्राम असेल, त्याचा खरेपणा सिद्ध करावा.पहिल्याने ब्राह्मणांनी आपले (लाकडी) शाळिग्राम गंगा नदीत टाकले.ते सर्व नदीत पडल्याबरोबर बुडाले.

नंतर संत रोहिदासांनी आपल्या जवळचे लोखंडाचे मोठे हत्यार गंगा नदीत फेकले.ते नदीच्या पाण्यावर तरंगू लागले.संत रोहिदासाचे लोखंडाचे हत्यार पाण्यावर तरंगत असलेले पाहून सर्वांनाच नव्हे तर ब्राह्मणांनासुद्धा आश्चर्य वाटले.रोहिदासाला खाली पाहण्यास लावण्याचा प्रयत्न करणाऱ्या ब्राह्मणांनाच लाजेने खाली मान घालावी लागली.संत रोहिदासांनी ब्राह्मणांच्या गर्विष्ठ आव्हानाला काव्यात उत्तर दिले.[(अ) बापु रो सति रैदास कहै रे।
ग्यान विचारि चरण चित्त लावै, हरि कै सरनि रहै रे।
पाती तौडे पूजि रचावै, तारन तिरन कहै रे।
मूरति माहि वसै परमेसुर, तौ पानी मांहि तिरै रे॥
—(वाणी ५५)—गुरु रविदास, पृष्ठ २४.
(ब) आप तिरै औरन कूं तारे।
—संत गुरु रविदासवाणी, पृष्ठ ३३.]"प्रभू ज्याप्रमाणे तुझी मूर्ति माझ्या मांडीवर बसली, त्याप्रमाणे आता माझे हत्यार पाण्यावर तरु दे."

रोहिदासांची प्रार्थना परमेश्वरानी ऐकली व लोखंडाचे हत्यार पाण्यावर तरंगू लागले.जनसागराचा जयघोष होऊ लागला.तो जयघोष ऐकून अपमानीत झालेले ब्राह्मण-पंडितांनी शरमेने माना खाली घातल्या.[मुख नीचा अभिमान का। मिले जगतमें हार।
परम भक्त रविदास की। लाज रखी करतार॥
—कामतकृत श्री संत रोहिदास, पृष्ठ १८.]मनात कपट असल्यावर खरे ज्ञान प्राप्त होत नाही.ते त्यांना कळून चुकले.ब्राह्मणांचा गर्वहरण झाला व परमभक्त संत रोहिदासांची लाज प्रभूने राखली.

काशीनंतर ब्राह्मणांची ही दुसरी हार होती.पूर्वीच्या प्रसंगावरून ब्राह्मणांना शहाणपणा सुचायला पाहिजे होता.पण तसे झाले नाही.काही ब्राह्मण पराजयाने चिडले तर काही बुद्धिमान ब्राह्मण संत रोहिदासांचे शिष्य झाले.

* * *

अनुक्रमणिका

# १५.मृत बालकास जीवदान

काशीमध्ये एक श्रीमंत विधवा बाई राहत होती.तिचा पूर्वी फार मोठा परिवार होता.एकदा हा सारा परिवार तीर्थयात्रेस गेला.दुर्दैवाने नदीत त्यांच्या होडीस अपघात झाला व सगळा परिवार पाण्यात बुडून मरण पावला.फक्त श्रीमंत विधवा बाईची गरोदर सून जिवंत राहिली.ती रडत रखडत व अनेक कष्ट सहन करीत आपल्या घरी कशी तरी आली.ती घरात एकटी राहू लागली.तीच आता त्या श्रीमंत घराची सेठानी झाली.

काही महिन्यांनी तिचे दिवस भरले.ती प्रसूत होऊन मुलगा झाला.मुलाचा चेहरा पाहून तिला अत्यानंद झाला.कारण तोच तिच्या जीवनाचा एकमात्र आधार होता.काही दिवसांनी मुलगा थोडा मोठा झाला.तो खेळू बागडू लागला.तिचा आनंद गगनात मावेना.परंतु दुर्दैवाने तो एकदा बराच आजारी पडला.तेव्हा सेठानीने देवधर्म व औषधपाणी करण्यात बराच पैसा खर्च केला.परंतु काही उपयोग झाला नाही.दिवसेंदिवस मुलगा खंगतच चालला.सेठानी चिंताग्रस्त होऊन रडू लागली.ती कोणालाही रडत रडत विनवणी करी की, "कसेही करून माझ्या मुलाचा जीव वाचवा."तेव्हा कोणीतरी तिला संत रोहिदासांचे नाव सांगितले.

सेठानी आपल्या एकुलत्या एक आजारी मुलास घेऊन संत रोहिदासांचे घरी पोहचली.तोच दुर्दैवाने तिचा मुलगा मरण पावला.तिने हंबरडा फोडला.तिचे करूण रडणे हृदय विदीर्ण करीत होते.कोमल हृदयी संत रोहिदासांना तिचे दुःख पाहवेना.संत रोहिदास आपल्या सत्य प्रभुला प्रार्थना करू लागले.तर त्यांची दयाळू पत्नी लोनाबाई त्या मेलेल्या मुलास मांडीवर घेऊन बसली व त्याच्या डोक्यावर हात फिरवू लागली.रोहिदासांनी जवळ येऊन मुलाचे तोंडात पाणी सोडले.पाणी तोंडात जाताच मुलाचा श्वासोश्वास चालू झाला.थोड्याच वेळात त्याने आपले डोळे उघडले.मुलाचे आईस अत्यानंद झाला.मुलास घेऊन ती आपल्या घरी गेली.मुलगा त्या दिवसापासून चांगला होऊ लगला.

काही दिवसांनी मुलगा खडखडीत चांगला झाला आणि सेठानी संत रोहिदासांची परमभक्त बनली.तिने बरेचसे धन रोहिदासांना देण्याची इच्छा व्यक्त केली.परंतु रोहिदासांनी त्या भेटीचा स्वीकार केला नाही.तर ते धन गोरगरिबांसाठी खर्च करण्याचा त्यांनी उपदेश केला.सेठानीने मोठ्या आग्रहाने रोहिदासांच्या सत्संग भवनामध्ये एक अन्नसत्र चालू केले.त्या अन्नसत्रामध्ये साधू-संत व भुकेकंगाल गरीबांना मोफत भोजन मिळू लागले.अशा प्रकारची कथा[चंद्रिकाप्रसाद जिज्ञासु संत प्रवर रैदास साहब, तृ आ.पृष्ठ ४३.]'संत प्रवर रैदास साहेब' पुस्तकामध्ये आहे.

* * *

अनुक्रमणिका

# १६.राणी ‘झाली’ शिष्या होते

चित्तोडच्या राणा सांगाची पत्नी राणी ‘झाली’ (झालावरची राजकन्या रत्नकुंवरी) एकदा सद्‌गुरुच्या शोधासाठी तीर्थयात्रा करू लागली.ती संवत १५६७-६८ चे सुमारास काशी यात्रेस आली.ती सर्वप्रथम कबीराचे झोपडीवर पोहचली.तिथे तिने संत मंडळीत कबीराचे निर्गुण ब्रह्माचे साधनेवर प्रवचन देताना ऐकले.चित्तोडचा राणा परिवार राज्याच्या स्थापना दिवसापासून वैष्णवभक्त झालेला आहे.तेथे तिने संत रोहिदासांची महिमा ऐकली.काशी नरेशाच्या सिंहासनावरही त्यांना बसविल्याची गोष्ट ऐकली.राणी धार्मिक होती.परंतु तिला कीर्तन ऐकण्याचा योग कधी आला नव्हता.त्यामुळे तिच्या मनात संत रोहिदासांचे दर्शन घेण्याची तसेच त्यांचा सत्संग पाहण्याची तीव्र इच्छा झाली.तेव्हा ‘झाली’ राणी तेथून संत रोहिदासांच्या गोपाळ मंदिरात पोहचली.

‘झाली’ राणीने गोपाळ मंदिरात सेना न्हावी व अन्य हरिभक्तांबरोबर संत रोहिदासांना कीर्तनात दंग असतांना पाहिले.[देखि दिवाले भयो अनन्दा, तहां सदा बैठे गोविंदा।
झालरि झांज पखावज ताला, वरन वरन फूलन की माला।
देखै तव स्वामी रैदासा, बहुत महंत विराजै साथा।
ऊंच बस्तर सुन्दर गाता.मुख तै निकसै सुन्दर बाता।
—संत रविदास की भक्तिसाधना, पृष्ठ, २१.]मध्यरात्रीपर्यंत कीर्तन झाले.[अरध रात्रि सुमिरन जागै, सब बैरागी सेवा लागै।
कीरतन मस्त मह नाचै सब ही, दियो चत्रभुज दरसन तव ही।
नठि रैदास पैर हरि चरना, सैनि कहेहु तुम्हरे सरना।
—संतरविदास की भक्तिसाधना, पृष्ठ, २१.]सत्संग भवनातील वातावरण पाहून व संत रोहिदासांचा पवित्र उपदेश व कीर्तन ऐकून तिला खूपच आध्यात्मिक आनंद झाला व ती इतकी प्रभावित झाली की, तिला संत रोहिदासांना गुरू करावासा वाटला.तेव्हा राणीने रोहिदासांना विनंती केल्यावर रोहिदासांनी राणीला सांगितले की, “पतिची आज्ञा घेऊन यावे.”

तेव्हा ‘झाली’ राणीने आपल्या विश्रांती स्थानी येऊन राणाकडे आपली इच्छा प्रकट केली.एवढेच नव्हे तर महाराणी झालीने हट्टच धरल्यामुळे महाराणा दुसरे दिवशी सकाळी राणीबरोबर संत रोहिदासांचे दर्शन घेण्यास गेले.त्यावेळी संत रोहिदास हातात चिपळ्या (खडताळे) घेऊन मृदुंगाचे तालावर मोठ्या

रंगामध्ये गात होते.[(अ) नरहरि, चंचल है मति मोरी, कैसे भगति करूँ मैं तोरी।
तू मोहि देखे हौं तोहि देखूँ, परीति परस्पर होई।
तू मोहि देखे हौ तोहि न देखूँ, यह मति सव बूधि खोई।
सब घर अन्तर रमसि निरन्तर, हौ देखन नहीं जाना।
गुन सब तोर मोर सभ औगुन, कृत उपकार न माना।
मैं ते तोरि मोरि असमझि सौ, कैसोई करि निस्तारा।
कह रैदास कृष्ण करूनामय, जै जै जगत अधारा।
—संत गुरु रविदास, पृष्ठ ३४.
(ब) एकादसी आहि देवठनी, ता दिन दच्छया लीनी झाली।
—संत रविदास की भक्तिसाधना, पृष्ठ २२.]राणा सांगा संत रोहिदासांच्या भावपूर्ण कीर्तनावर आणि वैष्णवभक्ती पध्दतीवर खूष झाले.एवढेच नव्हे तर त्यांचे हृदयास पाझर फुटला.शेवटी महाराणा सांगाच्या आज्ञेने ‘झाली’ राणीने देवठनी एकादशी दिवशी संत रोहिदासास गुरू करून घेतले.[चंद्रिकाप्रसाद जिज्ञासु, संत प्रवर रैदास साहब, आ.८४, पृष्ठ ३५.]परंतु बरोबर आलेल्या ब्राह्मण मंडळींना हे आवडले नाही. राणीविरुध्द

अनुक्रमणिका

त्यांच्यामध्ये असंतोष निर्माण झाला.राणीच्या जीवाला धोका देण्याच्या धमक्या दिल्या गेल्या.त्या सर्वांनी राणीस वेडी ठरविले.काशीच्या जातीयवादी द्वेषी ब्राह्मणांनी चित्तोडच्या ब्राह्मणांना पाठिंबा दिला.त्यामुळे काशीमध्ये खळबळ माजली.ब्राह्मण म्हणत, "राणी वेडी झाली आहे.स्वतः क्षत्रिय असून, तिने चांभार गुरू केला."

एके दिवशी ब्राह्मण मंडळी राजाचे दरबारात गेली.त्यांनी तेथे राजाच्या उत्तम कुळाची प्रशंसा करून चित्तोडच्या 'झाली' राणीच्या वागणुकीबद्दल तक्रारी केल्या.तसेच रोहिदासांनी भगवंताची मूर्ती आपणांकडे आणली असे आम्हास ऐकावयास मिळाले."आमचा त्यावर विश्वास नाही."

हे ऐकून 'झाली' राणीने राजाच्या आज्ञेने एक सभा आयोजित केली.त्या सभेत ब्राह्मण मंडळींना व आपले गुरू संत रोहिदासांना बोलाविले.त्यावेळी राणी 'झाली' ब्राह्मणांना म्हणाली, "मी संत रोहिदासांना गुरू केले.ह्या माझ्या सत्कर्मास आपण ब्राह्मणमंडळी अनुचित समजता.तरी माझे गुरू महाराजांकडून तुम्ही आपल्या शंका निवारण करून घ्या."

सभेत वादविवाद सुरू झाला.काशी नरेश स्वतः सभेचे नियंत्रण करीत होते.ब्राह्मण-पंडित मंडळी जन्म जातीस श्रेष्ठ ठरवीत होते.तरी रोहिदास जाती आणि वर्णाची हीनता दाखवून सत्यनिष्ठा आणि सदाचरणाचे महत्त्व यावर जोर देत होते.संत रोहिदास म्हणत, "जन्मावरून कोणी श्रेष्ठ ठरत नाही.तर जो राग द्वेष रहित आहे, ज्याची सत्यावर निष्ठा आहे, जो सत्याला ईश्वर समजतो, जो सम्यकदर्शी आहे, ज्याच्यात सम्यक ज्ञान आणि सम्यक चरित्र आहे, जो अभयपदास पोहोचला आहे, ज्याला कोणाचे भय वाटत नाही, ज्याच्यात प्राणीमात्रावर अपार दया आहे.ज्याने काम, क्रोध आणि लोभावर विजय प्राप्त केला आहे, ज्याने अहंभावास नाहीसे केले आहे व जो निष्कामभावाने कर्तव्यकर्म करीत असतो तोच ईश्वराजवळ श्रेष्ठ ठरतो."

ब्राह्मण जातीयवादावर जोर देत होते.ते रोहिदासांना म्हणत, "ही तुझी जादू आम्ही काही समजत नाही.तू अशा काहीतरी गोष्टी सांगून लोकांना वेडे बनवतोस.तू मोठा सत्यवादी संत आहेस तर काही चमत्कार करून दाखव.तेव्हा आम्ही काय ते समजू.ती पहा भगवंताची मूर्ती सिंहासनावर विराजमान आहे.तिला आवाहन करून बोलावून घे.ज्यांचेजवळ ती मूर्ती येईल, त्यांचे म्हणणे बरोबर मानले जाईल."अशी कथा 'संत प्रवर रैदास साहब' पुस्तकामध्ये आहे.[चंद्रिकाप्रसाद जिज्ञासु, संत प्रवर रैदास साहब, आ.८४, पृष्ठ ३५.]परंतु 'भक्तमाल' मध्ये असेम्हटले आहे की, 'मूर्तिस आवाहन करण्यास ब्राह्मणांनी तीन प्रहरपर्यंत पक्का वेद वाचला व मंत्रांचा जप केला.परंतु काही झाले नाही.मूर्ती आपल्या जागेपासून थोडीसुध्दा हलली नाही.

जेव्हा संत रोहिदासांची पाळी आली तेव्हा संत रोहिदासांनी प्रेम आणि दीन भावाने प्रार्थना केली तेव्हा मूर्ती सिंहासन सोडून रोहिदासांचे मांडीवर त्वरित येऊन बसली.[वसत चितौर मांझ, रानी इक झाली नाम।
नाम विन कान खाली, आनि सिष्य भई है।
संग हुते विप्र सुनि, छिप्र तन आगि लागि
भागी मति नृप आगे, भीर सव गई है।
वैसे ही सिंहासन पै, आई कै विराजे प्रभु।
पढ़े वेदवानी पै, न आये यह नई है।
पतित पावन नाम, कीजिए प्रकट आजु।
गायो पद गोद आई, बैठे भक्ति लइ है।

अनुक्रमणिका

–(डॉ.शर्मा)–संत गुरु रविदास, पृष्ठ ५४.]हे पाहून सर्वजण आश्चर्यचकित झाले.आणि ब्राह्मण पंडित मंडळी खाली मान घालून गप्प राहिली.सभा भवन संत रोहिदासांच्या जय जयकारांनी दणाणून गेले.

'श्री संत रोहिदास' ग्रंथामध्ये[श्री.सत्यदेव शिंदे, श्री.संत रोहिदास, प्र.आ.सन १९८३, पृष्ठ ४९-५०.]ह्या घटनेचा सारांश असा आहे की, आरंभी ठरल्याप्रमाणे पराजित ब्राह्मणांनी संत रोहिदासास पालखीत बसवून व डोक्यावर छत्रचामरे धरून सर्व काशीत पालखी खांद्यावर घेऊन त्यांची मिरवणूक काढली.भक्तजन संत रोहिदासांचा जयजयकार करीत होते.ह्या अभूतपूर्व विजयाने संत रोहिदास म्हणतात की,[ऐसी लाल तुझ विनु काउनु करे।
गरीब निवाजु गुसइंआ मेरा माथै छत्र धरै॥
जाकि छोति जगत कर लागै ना पर तुझी ढरै।
नीच ह उँच करै मेरा गोविंदु काहु ते न ढरै॥
नामदेव, कबिरू, तिलोचनु, साधना सैनु तरे।
कहि रविदास सुनहु हरि जीऊ ते सभै सरै॥
–श्री संत रोहिदास, पृष्ठ ४९.]"भगवंता, तुझ्याशिवाय कृपाळू असा कोणा आहे?दीनाचा नाथ आणि सर्वांचा पालनकर्ता असा परमेश्वर माझे शिरावर कृपेचे छत्र धरीत आहे.जग ज्याला अस्पृश्य मानते.पण तू त्याचेवर कृपेचा वर्षाव करतोस.जग मला खाली ढकलीत आहे, परंतु तूच मला खालून वर घेत आहे.तसेच तू माझ्या मनाची भीती नाहिशी केलीस.नामदेव, कबीर, तिलोचना, सधना, सेना न्हावी ह्या सर्वांचा तू उध्दार केलास.लोकहो, ज्यांचेवर हरीची कृपा झाली, त्यांचे सर्व भय नष्ट झाले.त्यांच्या सर्व दुःखांचा नाश झाला."

काही दिवसांनंतर महाराणी 'झाली' ही गुरू रोहिदासांचा निरोप घेऊन चित्तौडला जाऊ लागली.तेव्हा तिने गुरू रोहिदासांना राजधानी चित्तोडला येण्याचे निमंत्रण दिले.यासंबंधी 'संत गुरु रैदासवाणी' पुस्तकामध्ये वर्णन[जिनके द्वारे गुरु न पधारे, ते तौ जनम अवृथा हारे।
झाली कसौ वीनती कीजै, अपना जानि मोहि दरसन दीजै।
ज्यो माली सींचे वन वेली, अपना रोपा तजै न मेली।
ज्यू माता बालक कौ पोषे, यू सत गुरु आतम संतोषे।
–(अनंतदास)–संत रविदास की भक्तिसाधना, पृष्ठे २२.]केले आहे.

त्यावेळी संत रोहिदासांनी राणीच्या विनंतीस नकार देऊन सांगितले की,"पुन्हा कधीतरी तीर्थयात्रेस निघू.त्यावेळी अवश्य आपणांकडे येऊ."निरोप घेतेवेळी महाराणी झालीने बरीच काही भेट देण्याची इच्छा व्यक्त केली.परंतु त्यागी रोहिदासांनी काहीसुध्दा घेण्यास नकार दिला.

पुढे काही दिवसांनी संत रोहिदास कबीराजवळ[आज्ञा लइ कबीर की, पुनि हरि आज्ञा दीन।
रमन मतौ चित्तौर को, जन रैदास तब कीन।
चाले भगत वारन ही लाई, कासी नगरी पहुँता जाई।
–संत गुरु रविदास वाणी, पृष्ठ ३४.]विचारविनिमय करून सेना न्हावी तसेच इतर भक्तंजनांना बरोबर घेऊन तीर्थयात्रा सुरू केली व 'झाली' राणीच्या निमंत्रणानुसार चित्तोडला गेले.यात्रा करताना मार्गात हरिकीर्तन[ग्यांन घ्यांन सुमिरत मत धारै, सबही अन भै सबद उचारै।
ऐसे सषा संगीसब सोहै, मानस नहीं देवाता सोहै।
जहां जहां हरिजन चली आवै, दरसन देखि सकल सुख पावै।
कथा कीरतन हरि जस करही, प्रम सहित सबका मन हरहौ।
ऐसे रमत बहुत दिन लागा, रानी आतुर हैरे मागा।–वही

अनुक्रमणिका

—संत रविदास की भक्तिसाधना, पृष्ठ २२.]चालत असे.गुरू रोहिदास आल्याचे समजताच महाराणी 'झाली' स अत्यानंद झाला व ती प्रसन्नतेने आणि उत्साहाने भावनाप्रधान झाली.[भगतनि जाई सुनाई बानी, अधिक अच्छाह भयौ मनि रानी।
तब रैदास चलि अये नेरू, पहल बाग में दीनू डेरू।—वही
—संत रविदास की भक्तिसाधना, पृष्ठ २२.]राणी झालीने राणा सांगासह राज्याच्या सर्व अधिकाऱ्यांबरोबर संत रोहिदासांचे मोठ्या उत्साहाने स्वागत केले.["मंत्री सवै बुलाए रानी, मुख पठई सकल रजधानी"
—संत रविदास की भक्तिसाधना, पृष्ठ २२.]पान, सुगंध, गुलाल, मिठाईने भक्त मंडळींचे स्वागत केले.स्वागताप्रीत्यर्थ सर्व चित्तोड सजविले.बागेत हरिकीर्तन झाले.सगळे लोक संत रोहिदासांचे दर्शन घेऊन कृतकृत्य झाले.[हरि बोलै हरि होई, बाग बन्यौ वैकुण्ठ हसोई।
कथा कीरतन बहु विधि कीन्हा, वांटि परसाद सब नकौ दीन्हा।
—संत रविदास की भक्तिसाधना, पृष्ठ २२.]राणा सांगापरिवाराचे संत रोहिदास राजगुरू बनले.तेव्हा रोहिदासांचे डोळ्यात कृतज्ञतेचे अश्रू आले.

या प्रथम यात्रेनंतर महान आध्यात्मिक अतिथि रोहिदासांचे चित्तोडमध्ये कायम स्वरूपाचा आश्रम बनला होता.तेथील कुंभश्याम मंदिरात कथाकीर्तन आणि प्रवचने चालत होती.चित्तोड राज्यातील जवळचे तसेच दूरदूरचे भक्तजन संत रोहिदासांचे दर्शनासाठी येत.राणा सांगाची सून मीरानेसुद्धा संत रोहिदासांकडून शिष्यत्वाची दीक्षा घेतली.महाराणी 'झाली' मीराची सासू असल्यामुळे दीक्षा घेण्यात कसलीच अडचण आली नाही.त्यावेळी मीराचे वय पंधरा वर्षांचे असावे.

संत रोहिदासांचे आगमनाप्रीत्यर्थ'झाली' राणीने एक भोजन समारंभ[गई घर झाली पुनि, बोलियो पठायो अहो।
जैसे प्रतिपाली, अब वैसे प्रतिपारिए।
आपहुं पधारे उन, बहु धन पट बारे।
विप्र सुनि पाव धारे, सीधौ दै निवारिये।
करि कै रसोई द्विज, भोजन करन बैठे।
द्वै द्वै मधि एक यों, रैदासको निहारिये।
देखि भई आंखै दीन, भाखै सिस्य लाखो भए।
स्वर्नको जनेऊ काढ्यो, त्वचा कीनी न्यारिये।
—संत गुरु रविदास, पृष्ठ ५५.]ठेवला होता.त्यासाठी सर्व ब्राह्मणांना निमत्रंणे दिली.परंतु त्यांनी चांभार रोहिदासांचे पंक्तिस बसण्यास नकार दिला.तेव्हा महाराणी 'झाली' स फार दुःख झाले.नंतर समझोत्याचा मार्ग म्हणून ब्राह्मणांना शिधा देण्याचे ठरले.त्यांनी स्वतंत्र स्वयंपाक करून, स्वतंत्र पंक्ती बसवून भोजन करण्याचे मान्य केले.त्याप्रमाणे ब्राह्मणांनी स्वतंत्र शिधा घेऊन मोठ्या आनंदाने स्वयंपाक केला.एका बाजूस संत रोहिदास, महाराणी झाली व इतर सर्व पंक्तिस बसले.तर तेथून थोडे दूर दुसऱ्या पंक्तिस फक्त सर्व ब्राह्मण मंडळी जेवायला बसली.वाढपी जेवण वाढू लागले.त्यावेळी प्रत्येक दोन ब्राह्मणांमध्ये संत रोहिदास जेवत असल्याचे दृष्य दिसले.ब्राह्मणांचे मनात शंका आली.ब्राह्मणांनी राणीच्या पंक्तिमध्येपाहिले तर तेथे त्यांना रोहिदास चांभार शांतपणे भोजन करीत असल्याचे दिसले.तेव्हा ब्राह्मण परत भोजन करू लागले.तर परत दोन दोन ब्राह्मणांमध्ये संत रोहिदास भोजन करीत असल्याचे ब्राह्मणांना दिसले.ते बेचैन झाले.अखेर त्यांना मानावे लागले की, संत रोहिदास ही साधारण व्यक्ती नाही.तर ती ईश्वरीय शक्ती आहे.ब्राह्मणांना त्यांच्या सोवळ्या ओवळ्याची लाज वाटली.त्यांनी संत रोहिदासांची व महाराणी 'झाली' यांची पाया पडून क्षमा मागितली.नंतर लाखो लोक त्यांचे शिष्य झाले.

अनुक्रमणिका

प्रभुची अगाध लीला पाहून संत रोहिदास स्मीतपणे हंसू लागले.तर आपणास योग्य गुरु मिळाल्याबद्दल महाराणी ‘झाली’ यांना अत्यानंद व अभिमान वाटला.तिला कृतार्थ वाटले.शेवटी महाराणी ‘झाली’ ने गुरु रोहिदासांना मोठ्या सन्मानाने निरोप दिला.

‘असली रैदास रामायण’ [बख्शीदास, असली रैदास रामायण, प्रेस हाथरस.],‘रविदास रामायण’ [पं.गिरिजाशंकर मिश्र, ‘पूनम’ रविदास रामायण, प.आ.सन.१९८१.],असली रविदास रामायण’ [बख्शी आतमनंद खोधि, असली रविदास रामायण, प.आ.],व‘असली प्राचीन रविदास रामायण’ [प्रयागदत्त शर्मा, ‘विविध’ असली प्राचीन रविदास रामायण, ति.आ.सन १९८०.]पुस्तकांमध्येचित्तोडची राणी ‘झाली’ ऐवजी चित्तोडची राणी ‘योगवती’ असा उल्लेख केला म्हणून दोन्ही राण्या एकच समजावयास हरकत नाही.

* * *

अनुक्रमणिका

# १७.रोहिदास शिष्या-मीरा

मीरा ही मेडताचे राठोड राव दुदा यांचे पुत्र रत्नसिंह यांची एकुलती एक मुलगी.तिचा जन्म संवत १५६१ (इ.स.१५०४) मध्ये झाला.लहाणपणीच मीराची आई मरण पावल्यामुळे तिला आईचे प्रेम मिळाले नाही किंवा बहिणी भावंडांची साथही मिळाली नाही.तिचे वडील राणा सांगाचे बाजूने तत्कालिन राजकारणात तसेच युद्धात गुंतलेले असत.त्यामुळे मीराचे पालनपोषण वैष्णवभक्त राव दुदाचे देखरेखीत झाले.मीरा आजाबरोबर देवपूजा, भजन-कीर्तनात दंग होत असे.

सन १५०९ मध्ये प्रसिध्द योध्दा राणा संग्रामसिंह (प्रचलित नाव-राणा संग) चित्तोडच्या गादीवर बसले.त्यांची पत्नी राणी 'झाली' (झालावरची राजकन्या रत्नकुंवरी) वैष्णवभक्त होती.तिने सन १५१०-११ चे सुमारास काशीस जाऊन संत रोहिदासास गुरु करून घेतले.तेव्हापासून रोहिदासांचा राणा परिवाराशी आध्यात्मिक संबंध आल्यामुळे त्यांचा चित्तोडला आश्रम बनला होता.मेडताचे दुदाजी चित्तोडच्या आश्रमात भजन-कीर्तन तसेच आध्यात्मिक संमेलनात सामील होत असत.त्यामुळे मीरादेखील आपल्या आजाबरोबर चित्तोडला येत असे.एवढ्या लहानपणी मीरेला प्रभुभक्तिचे वेड पाहून संत रोहिदासांनी तिला पूजा अर्चा करण्यासाठी 'ठाकूर सिंहासन' दिले होते.महाराणी 'झाली' चा ज्येष्ठ पुत्र कुंवर भोजराज आपल्या आईसारखा शांत स्वभावाचा व प्रभुभक्त राजकुमार होता.राणी 'झाली' ने आपले पति राणा सांगाचे संमतीने व गुरु रोहिदासांचे आशीर्वाद घेऊन कुंवर भोजचे मीराबरोबर संवत १५७३ (इ.स.१५१६) मध्ये लग्न लावले.त्यावेळी भोजराजचे वय १८ व मीराचे वय १२ वर्षांचे होते.त्यानंतर मीराने आपले पति व सासुचे संमतीने संत रोहिदासांचे शिष्यत्व स्वीकारले.

"मीराने गरीब[हम अपूजि-पूजि भये हरि ते, नाम अनुपम गाया रे।
हम अपराधी नीच घन जनमे, कुटुंब लोग करै हांसी रे।
कह रविदास राम जपि रसना, काटे जम की पांसी रे।
—भक्त रत्नावली, पृष्ठ ३९.]चांभार गुरु केला."अशा प्रकारचे टोमणे राज घराण्यातील लोक मीरास उद्देशून मारीत.तेव्हा एखादा मौल्यवान हिरा भेट देण्यासाठी मीरा काशीस रोहिदासांचे घरी आली व आपल्या गुरुस म्हणाली, "गुरु महाराज, आपण ह्या हिऱ्याचा स्वीकार केल्यास, मला अत्यानंद होईल.तसेच लोकांचे टोमणेही मला सहन करावे लागणार नाहीत."

जोडे शिवण्याचे कामात दंग असलेले संत रोहिदास म्हणाले, "माझ्या प्रिय राजकुमारी मीराबाई, मी आतांपर्यंत जे काही मिळवलं आहे, ते जोडे शिवूनच.माझ्याकडे येण्याने तुझी प्रतिष्ठा कमी होत असेल, व लोक निंदा करतात असं तुला वाटत असेल, तर तू माझ्याकडं येण्याचं टाळू शकतेस.तसेच हिरा किंवा कोणतीही वस्तू मला नको व लोक जिला गरीबी समजतात, तीमध्ये मी प्रसन्न आहे.मी प्रभुस शरण गेलो आहे.ह्या प्रभुच्या मनावर कोणत्याही चिंतेचा भार नको.[जो तेरी सणागता तिन नही भार।
—भक्त रत्नावली, पृष्ठ ३९.]"

एवढे ऐकूनसुध्दा मीराबाईने संत रोहिदासांना मौल्यवान हिरा ठेवून घेण्याबद्दल आग्रह केला.रोहिदासांनी हिरा ठेवून घेण्यास नकार दिला.तरीसुध्दा मीरा झोपडीत वरच्या कोपऱ्यात हिरा ठेवीत म्हणाली की, "पुन्हा केव्हा तरी हा हिरा आपल्या कामास येऊ शकेल."मग ती निघून गेली.काही महिन्यानंतर मीरा गुरु रोहिदासाकडे परत आली.पाहते तर सद्गुरु रोहिदास त्याच गरीबीच्या अवस्थेत जोडे शिवण्याचे

काम करीत आहेत.याचे तिला आश्चर्य वाटले.संत रोहिदासांनी त्या हिऱ्यास शिवलेसुध्दा नव्हते.त्यामुळे मीराबाईने तो हिरा जशाच्या तसा असल्याचे पाहिले.

मीराने विचारले, "गुरु महाराज, आम्ही एवढ्या आग्रहाने व प्रेमभावाने दिलेल्या भेटीचा स्वीकार कां केला नाही?"

तेव्हा गुरु रोहिदास म्हणाले, "माझ्याकडे पहिल्यापासून एवढे अधिक धन भरून पडलेले आहे की, मला कसल्याही भेटीची गरजच पडत नाही."

संत रोहिदासांच्या गरिबीवर जे लोक हंसतात, त्यांच्या स्वभावाबद्दल संत रोहिदास आपल्या वाणी (पदा) मध्ये म्हणतात[दारिदु देखि सभ को हसै ऐसी दसा हमारी।
असट दसा सिधिकर तलै सभ कृपा तुमारी॥—संत रविदास की भक्तिसाधना, पृष्ठ ६१.
जाकै रामजी धनी, वाकै काहि की कमी है।
मनसा को नाथ मनोरथ पुरवै, सुख निंधान की काहगिनी है॥
.... ... ... ...
जाकी प्रीती निरंतर हरि सौं
कहै 'रविदास' ताकी सदा ही वनी है॥-वाणी १२७।
—गुरु रविदास, पृष्ठ २६.]की, "आमचे दारिद्र्य व दशा पाहून लोक हंसतात.प्रभु, ही सगळी तुझीच कृपा आहे.ज्याचा राम धनी आहे त्यास काय कमी आहे?"

चित्तोडगडच्या अठराशे फूट उंच डोंगरावर विजयस्तंभाजवळ सात फूट उंच चबुतऱ्यावर राणा कुंभद्वारानिर्मित कुंभश्याम[राणा कुम्भा (इ.स.१४३१ ते १४६९) ने विजयस्तंभाच्या निर्मितीबरोबरच कुंभश्याम मंदिरही बांधले होते.हे कृष्णमंदिर असून, त्याचे शिखर उंच व भव्य आहे..]मंदिर आहे.त्या मंदिराच्या मोकळ्या मैदानात संत रोहिदास इत्यादि वैष्णव मंडळीचे भजन-कीर्तन तसेच अध्यात्मिक प्रवचन चालत होते.बालिका वधु मीरा आपल्या जन्मजात संस्कारामुळे वैष्णवभक्त सासू व पतिबरोबर कुंभश्याम मंदिराचे मैदानात "पद घुंगरु बांध मीरा नाची रे"प्रमाणे गोपाळांचे प्रेमात रंगून मस्तीमध्ये नाचत गात होती.कृष्णवेडी मीरा कृष्णभजनात दंग होत असे.वैष्णवभक्त परमगुरु संत रोहिदासांचे सन्मानार्थ जेव्हा चित्तोडला भोजन समारंभ आयोजित केला होता तेव्हा रोहिदास चांभाराचे पंक्तित ब्राह्मण मंडळीने बसण्यास नकार दिला.असंतोष माजला.तेव्हा ब्राह्मणांनी शिधा घेऊन स्वतंत्र स्वयंपाक केला व ते भोजनास बसले.संत रोहिदास दुसरीकडे दूर भोजनास बसले.प्रत्यक्ष भोजनास सुरवात झाली.तेव्हा ब्राह्मण पंक्तित दर दोन ब्राह्मणांचे मधील पाटावर संत रोहिदास शांतपणे जेवत असल्याचे दिसले.तेव्हा ब्राह्मणांचा जात्याभिमान गळाला व त्यांना ईश्वराने रोहिदासांचे सत्यस्वरुप दाखविले आणि विजय प्राप्त झाला.त्यावेळी मीरा म्हणते[दासी की विनती सुनी, गुरुवर भये दयाल।
सत्य हेतु चेली करी, मेटे सब भ्रमजाल॥
—कामत श्रीसंत रोहिदास, पृष्ठ १९.]की, —परमेश्वराने दासीची विनंती ऐकली व सद्‌गुरुवर आलेले संकट टळले.तसेच गुरुबद्दल लोकांच्या मनातील संशय नाहीसा झाला.

मीराचा पती कुंवर भोजराज लग्नानंतर सहा सात वर्षांने सन १५२३ (संवत १५८०) मध्ये मरण पावला. मीराचे नशिबात गृहस्थी योग नव्हता.नाहीतर भक्तिक्षेत्रात एवढे यश तिला कसे मिळाले असते?राजस्थानच्या शुन्यावकाशात मीराच्या घुंगरुच्या झंकार आजसुद्धा झंकारत आहे.तिची विरह रसातील मधुर गीते आजसुद्धा राजस्थानच्या घाटात आणि वालुकामय प्रदेशात प्रतिध्वनीत होत आहेत.

अनुक्रमणिका

मीराचे वडिल राजा रत्नसिंह सन १५२७ (सवंत १५८४) मध्ये खानवाच्या लढाईत राणा सांगाच्या बाजूने बाबराविरुद्ध लढताना मारले गेले.तर राणा सांगा त्याच युद्धात भयंकर जखमी झाल्याने त्यांचा सन १५२८ (सवंत १५८५) मध्ये देहांत झाला.वैष्णवभक्त मीरा आणि राणी 'झाली' दोघीही विधवा झाल्या.मीराचा आपल्या प्रियतम गोपाळबरोबर अतूट संबंध जडला होता.चित्तोडगडावर कुंभश्याम मंदिराजवळ मीरामंदिर आहे.ते साध्या दगडावर कोरीवकाम करुन बांधलेले आहे.ह्या मंदिराबरोबरच 'रोहिदास छतरी' ची निर्मिती मीरा आणि राणी 'झाली' च्या प्रयत्नामुळे त्या अशांत परिस्थितीत झाली असावी.ह्या छतरीखाली संत रोहिदासांचे चरणचिन्ह[रोहिदास छतरीचा जिर्णोद्धार राणा फत्तेसिंहाने केला होता.चितोड यात्रेच्यावेळी राजस्थानातील काही उपजाती यज्ञोपवीत व लग्न संस्काराचेवेळी मीरा मंदिर व रोहिदास छतरीवर भेट चढवितात.]आहे.सूमारे तीन फूट लांब व तीन फूट रुंद अशा दगडी चौथऱ्यावर मधोमध संत रोहिदासांच्या दोन पादुका आहेत व चार कोपऱ्यात कोरीव नक्षीकाम केले आहे.रोहिदास छतरीच्या छतावर रोहिदासद्वारा बहुचर्चित पंचविकाराच्या प्रतिमा (चार धड, एक मुख आणि एका हातात कमलपुष्प) प्रस्तर शीलेवर कोरलेल्या आहेत.

मीरा कृष्णभजन भक्तगणात तसेच रस्त्यावरील लोकात मिसळून नाचत गात होती.हे राज घराण्यातील लोकांना आवडेना.तेव्हा राणा सांगाचे मृत्युनंतर मीरेला कुटुंबातील व्यक्तिंनी बराच त्रास दिला.मीराचा सावत्र दीर राणा विक्रमजीतने अनेक प्रकारे तिची हत्त्या करण्याचे प्रयत्न केले.चरणामृताचे नावाने विष व शाळिग्रामचे नावाने काळा नाग पिठाऱ्यात बंद करून पाठविला होता.परंतु त्याचा मीरावर काहीसुध्दा परिणाम झाला नाही.हे 'भक्त मीरा[जी.एस.आचार्य, भक्त मीरा, आवृत्ति १९८३, पृष्ठ २२.]'या पुस्तकातील तिच्या दोन पदांवरून[(अ) मीरा मगन भई हरि के गुण गाय।
साँप पीटरा राणा भेज्या, मीरा हाथ दियो लाय।
न्हाय धोय जव देखण लागी, सालिगराम गई पाय॥
जहर का प्याला राणा भेज्या, अमृतदिन्ह बनाय।
न्हाय धोय जव पिवण लागी, हो अमर अँचाय॥
(ब)मैं गोविंद गुण गाणा।
राजा रूठै नगरी राखै, हरि रूठया कहै जाणा।
राजा भेज्या जहर पियाला, इमरित करि पी जाणा।
डविया मे भेज्या जंग भुजंगम, सालिगराम कर जाणा।
मीरा तो अब प्रेम-दिवानी, सावलिया तर पाणा।]लक्षात येईल.दिराच्या छळास कंटाळून मीराने सन १५३१ (सवंत १५८८) अखेर चितोड कायमचे सोडले.काही दिवस मीरा माहेरास मेडतामध्ये राहिली.परंतु तिथे तिचे कोणी नातेवाईक नसल्यामुळे ती वृंदावनाला गेली.नंतर सन १५४६ (सवंत १६०३) मध्ये द्वारकेस जाऊन रणछोडजीच्या मंदिरात नाचत गात भावविव्हळ मीरा बेशुद्ध होवून पडली ती उठलीच नाही.किती छोटेसे जीवन व अद्भुत देहांत तेव्हा मीरा म्हणाली होती की, "माझे दुःख कोणी ओळखत नाही.["मेरा दरद न जाने कोय"
—संत गुरू रविदास वाणी, पृष्ठ ६३.]

[पुष्कार तीर्थावर भव्य मीरा मंदिर आहे.मंदिरांत मीराची संगमरवरी प्रतिमा आहे.ह्या मुर्तिचे सौंदर्य अनुपम आहे.]चितोड राज्याची राणी अथवा महाराणी होण्याचे तिच्या नशिबात नव्हते.सन १५१६ ते २३ (सवंत १५७३ ते ८०) चे दरम्यान मीराने पति जिवंत असतांना सासू 'झाली' राणीबरोबर काशी, वृंदावन, पुष्कर[पुष्कार तीर्थावर भव्य मीरा मंदिर आहे.मंदिरांत मीराची संगमरवरी प्रतिमा आहे.ह्या मुर्तिचे सौंदर्य अनुपम आहे.]तसेच इतर तीर्थयात्रा केल्या.

संत राहिदासांनी ब्रह्मास राम-कृष्ण, हरि-माधव इत्यादी पर्यायवाची नावात भेदभाव समजला नाही.त्याप्रमाणे मीराने ब्रजवासी कृष्णाची अनन्य उपासिका राहूनसुद्धा आपल्या आराध्य देवाला 'राम[(क) मेरो मन राम नामावासी, तेरे कारण श्याम सुंदर सकल लोगां हांसी।

अनुक्रमणिका

(ख) मैं तो थारी सरण पडी रे, रामा ज्यू तारे त्युं तार।
या जगमें अपना नहीं सुणियो, क्रिसण मुरार।
मीरां दासी राम भरोसे, जम का फंद निवार।

—संत गुरु रविदास वाणी, पृष्ठ ६४.]'नावानेही संबोधित केले आहे.

मीराचा साकार गिरीधर गोपाळ आदि अनादी "साहब"सुद्धा आहे.[साहब पाया आदि अनादि नातर भव मैं जाती।]मीराने निर्गुण ब्रह्मास 'अगम अटारी["दीपक जोऊं ग्यान का चढ अगम अटारी"]'म्हटले आहे.याशिवाय मीराच्या रचनेतून माहित होते की, रोहिदासांचे "पिउ रहस्य"चे सुद्धा हिला ज्ञान होते."सुन मंडल","सुरत निरत"इत्यादी शब्दांचा प्रयोग हिच्या पदात बहुतेक करून दिसून येतो.[सुन्न महलमे सुरत लगाऊं, सुख की सेज बिछाऊं री।
मीरा के प्रभु गिरधर नागर, बार बार बलि जाऊं री।]याप्रमाणे मीराने "रोज सुषमण" "गगन मंडलरी सेज"चे वर्णनसुद्धा केले आहे.[सेज सुषमण मीरा सोवै, सुभ है आज घडी।
गगन मण्डल पै सेज पिया की, किस विध मिलणा होई।]रोहिदासांच्या "अनहद नाद"चासुद्धा मीराने आश्रय घेतला आहे["विन करताल पखावज वाजै, अणहद को झणकार रे"।

—संत गुरु रैदास वाणी, पृष्ठ ६४.]मीराने "सुरतयोग","सुषमण", "अनहद नाद"इत्यादी पारिभाषिक शब्दावलीसुद्धा आपले गुरू रोहिदासापासून ग्रहण केली होती.या कारणामुळे ती "सुरत"ची "कछनी काछनी"होताना दिसते.[प्रेम पीकी बांधी घुंगरू, सुरत की कछनी काछुंगी।

—संत गुरु रैदासवाणी, पृष्ठ ६४.]

संत रोहिदासांची शिष्या झाल्यामुळे मीराने म्हटले आहे.["सुमिरन थाल हाथ मंह लीन्हा, पिआ पिआला अमर रस रे।
चड गई घुम घमाय कै" ।

—संत गंरु रविदास वाणी, पृष्ठ ६४.]गुरु ग्यान "अधगासी"आहे."ग्यानमली"आहे.आणि "दीपक जोऊं ग्यान"आहे."सब का नाव खेयवटिया-""संत गुरू रोहिदास"यानांच म्हटले आहे.[री मेरे पार निकल गया, सत गुरु मारया तीर।
सत गुरु भेद बताइआ, खोलि भरम किवारी हो।

—संत गुरु रविदास वाणी, पृष्ठ ६४.]मीराचे मते गुरुद्वारादीक्षित होऊन साधक परम तत्वास प्राप्त करू शकतो.निगुरा सदा-असफल रस्ता है—"सगुन सुरा अम्रित पावे —निगुरा प्यासा जाती"जेव्हा रोहिदास गुरु मिळाले तेव्हा मीराले म्हटले होते.

याशिवाय मीराने अनेक पदात संत रोहिदासांना आपला गुरू घोषित केले आहे.[रैदास संत मिले मोहि सतगुरू, दीन्ही सुरत सहदानी।
मैं मिली जामा पाय पिय अपना, तब मोरी पीर बुझानी।

—संत गुरु रविदासवाणी, पृष्ठ ६५.]

(क), [सुनो दयाल म्हारी अरजी ।
भव सागर मंह वहि जात हूँकाढो तो थारी मरजी ।
या संसार सगो नहीं कोई, तुम साँचे सतगुरु जी ।
मात पिता सब कुटुम्ब कबीला, सब मतलब के गरजी ।
मीरा के प्रभु तुम ही स्वामी, सिरी रैदास सत गुरु जी ।
(ख्), मेरो मन लागो गुरु सों, अब न रहुँगी अटकी ।
गुरु मिल्या रैदास जी म्हाने, दीनी ग्यान की गुटकी ।
(ग), राणाजी रे दूदा जी नी, बाई मीरा बोलियो रे ।
संतो ने अमरापुर वास, वीजा नरक नी खाणा रे ।

अनुक्रमणिका

झांझ पखावज वेणु वाजियां, झालर नों झंकार।
कासी नगर ना चौक मां मने, गुरु मिल्या रैदास।
—संत गुरु रविदासवाणी, पृष्ठ ६५.]

मीरा आणि संत रोहिदासांच्या भक्तिपद्धतीमध्ये पूर्ण समानता आहे.मीरेचा त्या युगात प्रचलित कोणत्या संप्रदायाशी विशेष संबंध नव्हता.हिची भक्ती अनन्या प्रेमस्वरुपा, रहस्यमय तसेच विरहानुभूति यांनी परिपुर्ण होण्यामुळे मीरा रोहिदासांचा गुरुशिष्य संबंध अवश्य होता.अशा प्रकारचे वर्णन 'संत गुरु रविदास वाणी' मध्ये आहे.

(क), [सुनो दयाल म्हारी अरजी।
भव सागर मंह वहि जात हूँकाढो तो थारी मरजी।
या संसार सगो नहीं कोई, तुम साँचे सतगुरु जी।
मात पिता सब कुटुम्ब कबीला, सब मतलब के गरजी।
मीरा के प्रभु तुम ही स्वामी, सिरी रैदास सत गुरु जी।
(ख), मेरो मन लागो गुरु सों, अब न रहुँगी अटकी।
गुरु मिल्या रैदास जी म्हाने, दीनी ग्यान की गुटकी।
(ग), राणाजी रे दूदा जी नी, बाई मीरा बोलियो रे।
संतो ने अमरापुर वास, वीजा नरक नी खाणा रे।
झांझ पखावज वेणु वाजियां, झालर नों झंकार।
कासी नगर ना चौक मां मने, गुरु मिल्या रैदास।
—संत गुरु रविदासवाणी, पृष्ठ ६५.]

मीरा सगुण ईश्वरास पुजणारी आहे आणि रोहिदास संत मनाचा वारसा सांगतात.म्हणून दोघात गुरूशिष्याचे नाते नसावे हे म्हणणे योग्य नाही.संत रोहिदासांनी निर्गुणाचा पुरस्कार केलेला असला तरी सगुण मतावर बहिष्कार टाकलेला नाही.त्यांची दृष्टी समन्वयाची आहे.त्यांच्या ईश्वर निष्ठेत समतोल आहे.

मीरा व्यक्तिगत जीवनात दुःखीकष्टी होती.तिच्या घराने आणि दरबारानेसुद्धा तिच्यावर सदैव अविश्वास दाखविला म्हणजे तिच्यावर अन्याय केल्यासारखे होत आहे.

बऱ्याच विद्वानांनी मीरा ही संत रोहिदासांची शिष्या कशी असू शकेल अशी शंका उपस्थित केली आहे.मीराने आपल्या पदामध्ये वारंवार रोहिदासांना आपले गुरु म्हटले आहे.

, [डॉ. बी. पी. शर्मा. संतगुरु रविदासवाणी, पृष्ठ ५९ ते ६५.]
(क), मीराने गोविन्द मिल्याजी, गुरु मिलिया रैदास।
—मीरा बृहत्पदावली, भाग १ ला पृष्ठ २०१, पद ४२३.]
(ख), गुरु मिल्या म्हाने रैदास, नाम नही छोडूं
—मीरासिंधु, पृष्ठ २८१, पद ३५.
(ग), झाँझ पवखाज, वेणू बजावत झालर नौ झंकार।
काशी नगरका चौक मा, गुरु मिला रैदास॥
—(मध्यकालीन प्रेमसाधना, पृष्ठ १३५)—श्री संत रोहिदास, पृष्ठ ४१.
(घ), खोजत फिरौ भेद वा घरको कोई न करत वरवानी।
रैदास संत मिले मोहि सतगुरु, दीन्ही सुरत सहदानी॥
—(मीरा बृहत्पदावली, भाग १, पृष्ठ २०७, पद ४३)—श्री संत रोहिदास, पृष्ठ ४२.
(ड), मेरो मन लागो सतगुरु सो अब न रहुंगी अटकी।
गुरु मिलिया रैदासंजी म्हाने, दीन्ही ग्यानकी गुटकी॥

अनुक्रमणिका

—(मीरा सुधासिंधु, पृष्ठ ३७९)—संत प्रवर रैदास साहब, पृष्ठ ३७.

(च), गुरु रैदास मिले मोहि, पुरे धुरसे कलम मिली।
सत् गुरु सैन दई जब आके, ज्योतिसे ज्योति मिली ॥

(छ), मेरे तो गिरिधर गोपाल दुसरा न कोई।
गुरु हमारे रैदासजी सरनन चित सोई।

—(मीराबाई की शब्दावली, पृष्ठ ३१, पद १४)—श्री संत रोहिदास, पृष्ठ ४३.

(ज), वन पर्वत, तीरथ, देवालय, ढूँढा चहूँ दिसि दौर;
'मीरा' श्री रैदास शरण बिन, भगवान और न ठौर।

(झ), माता-पिता और कुटुम-कबीला, सब मतलब के गरजी;
मीरा 'के प्रभु तुम ही स्वामी, श्री रैदास सत गुरुजी।

(ञ), 'मीरा' म्हाने संत है, मैं सन्त री दास;
चेतन सत्ता सैन ये, दीखत गुरु रैदास।

(ट), 'मीरा' सतगुरु देव की करै वंदना आस;
जिन चेतन आतम कहा, धन भगवान रैदास।

(ठ), रोचक अंध भयानक त्यागो, ज्ञान यथारथध्या ओजी;
'मीरा' प्रभु रैदास शरण ले, आतम आप जगा ओजी।

(ड), 'मीरा' म्हाने मारणा, राणा रोप्यो जाल;
विष व्यापे ना बापुरो, है रैदास गुरु ढाल।

—सन्त प्रवर रैदास साहब, पृष्ठ ३७.

## अनुक्रमणिका

# १८.रोहिदास-सदना व सिकंदर लोदी

सदना नावाचा एक मुसलमान साधू होता.संत रोहिदासांची कीर्ति ऐकून त्यांना तो भेटण्यास आला.त्याने मोठ्या आनंदाने रोहिदासास सलाम केला.रोहिदासांनी त्यास नमस्कार करून त्यांचे स्वागत केले.तेव्हा सदना हंसत म्हणाले, “आपली भेट झाल्यामुळे आज मला धन्य वाटत आहे.हिंदू-मुसलमान एक आहेत.परंतु अल्लाने दोन धर्म प्रगट केले आहेत.

तेव्हा रोहिदास म्हणाले, “ईश्वर प्राणीमात्रात सर्व ठिकाणी आहे.तो अमर, अविनाशी आहे.तो लोकांचे दुःख नाहीसे करणारा असून, त्यांना सुख देणारा आहे.जग पाच तत्वांपासून निर्माण झाले आहे.यापासून हिंदू व मुसलमान वेगळे नाहीत.हिंदू-मुसलमानात कोणी भेद दाखवील, त्यास मूर्ख मानले पाहिजे.वेदाचा धर्म हिंदू, वेद प्राचीन असून, मुहम्मद नंतर जन्मला.त्यानेच इस्लाम धर्माचा प्रचार केला.ईश्वराचे कौतुक करतांना मुसलमान त्यास ‘अल्ला’ म्हणाले, तर हिंदूनी त्यास अनेक नावे दिली.”

“जो रात्रंदिवस अल्लाचे स्मरण करील, त्याचे दुःख नाहीसे होऊन तो सुखी होईल.”सदनवीराचे बोलणे ऐकून संत रोहिदास म्हणाले, “ईश्वर-अल्ला एकच आहेत, मूर्तिमुळे वेगवेगळे देव दिसतात.ब्रह्मा, विष्णू व महेश हे तीन देव असले तरी त्यांचे रुप एकच असते.तुम्ही मक्केला अल्ला म्हणता परंतु तो सर्वत्र व्यापलेला आहे.ईश्वर प्रत्येक माणसाच्या मनातही राहतो.तो सर्व ठिकाणी भरून राहिला आहे.तुम्ही खुदाचे नावाने बकऱ्याचे बलिदान का करता?जो नेहमी अहिंसक असतो तोच खरा इस्लाम.जो दुसऱ्यावर उपकार करतो.तोच अल्लास म्हणजे ईश्वरास आवडतो.जो हिंसेला धर्म मानतो, तो नरकात जातो.स्वतःच्या स्वार्थासाठी जो दुसऱ्याचा प्राण घेतो तो मूर्ख नरकात पडून मोठे दुःख भोगतो.जो खुदा हिंसा करायला सांगतो, तो अल्ला मला नको.सदना, तू रोज कुराण वाचतोस, नमाज पडतोस, परंतु बांगेप्रमाणे आरडाओरडा केल्यास व्यर्थ आहे.खुदाच्या घरी दुःख भोगावे लागणार, जो मोहमाया सोडून प्रभुची भक्ती करतो, त्याला स्वर्गात जाण्यास कोणतीही शक्ती रोखू शकणार नाही.”

संत रोहिदासांचे ज्ञान ऐकल्यावर सदना म्हणाले, “तुम्ही माझ्या सर्व शंका-संशय नाहीसे केले व मोक्षमार्ग दाखविला.तुम्ही माझा अज्ञान-अंधःकार नाहीसा केला.त्याबद्दल तुम्ही धन्य आहांत.”असे म्हणून सदनाने संत रोहिदासांचा निरोप घेतला.

सदना काशीहून दिल्लीस गेला.नंतर सदना बादशहा सिकंदर लोदीस भेटण्यास गेला.त्यावेळी बादशहा सदनाचे स्वागत करीत म्हणाले, “आज हज यात्रेपेक्षा तुमच्या दर्शनाने मी धन्य झालो.”

तेव्हा सदना म्हणाले, “बादशहा, खुदाच्या आशीर्वादाने आपले राज्य ठीक चालले दिसते.परंतु आपला सुलतानी हूकुम असूनही इस्लाम धर्माची हानी होत आहे.आपल्या इस्लामी राज्यात इस्लामी होडी गोंते खात आहे.काशी नगरीत रोहिदास नावाचा एक साधू रहात असून, तो इस्लामला हलालहिंसक म्हणतो.तो वेदांचा प्रचार करीत आहे.तो कुराणास अर्वाचीन तर वेदास प्राचीन समजतो.तो असाच प्रचार करू लागला तर माझा आवडता इस्लाम धर्म बुडून जाईल.”

अनुक्रमणिका

हे सदनावीराचे बोलणे ऐकून बादशहा सिकंदर लोदी क्रोधाने लाल झाला व म्हणाला, “इस्लाम धर्म नाहीसा करणाऱ्याचे डोके मी उडवून देईन.थोडीसुद्धा दया न दाखविता, मी माझे कर्तव्य पूर्ण करीन.त्या ढोंगी रोहिदासाला मला पहावयाचे आहे.”

बादशहाने मुन्शीला पत्र लिहिण्याचा हुकूम केला.बादशहा मजकूर सांगू लागला.“संत रोहिदासा, आपले नाव ऐकल्यापासून आपणांस पाहण्याची माझी इच्छा अनावर झाली आहे.आपण उपकारी संत आहांत.तरी भेटीसाठी दिल्लीस येण्याची कृपा करावी.”असे पत्र लिहून कासीदकडे दिले.

कासीद रथ घेऊन काशीस गेला व संत रोहिदासाजवळ जाऊन त्यांच्या चरणाचे दर्शन घेत म्हणाला, “दिल्लीच्या बादशहाने मोठ्या आनंदाने आपल्या चरणी विनंती अर्ज दिला आहे.आपला जगजाहिर महिमा ऐकून, आपल्या दर्शनाची इच्छा बादशहाने व्यक्त केली आहे.त्यासाठी तुम्हास नेण्यास रथ पाठविला आहे.तरी कृपा करून दिल्लीस चला व बादशहास दर्शन द्या.बादशहा आपल्या दर्शनासाठी तळमळत आहेत.त्यांना रात्रंदिवस चैन पडत नाही.”

अशा प्रकारचे कासीदचे बोलणे ऐकून रोहिदासांनी पत्र दुसऱ्याकडून वाचून घेतले.त्यानी अंर्तमनन केले.बादशहा षडयंत्र रचून आपणांस कैद करणार हे त्यांनी ओळखले.परंतु रोहिदासांनी विचार केला की, “आपले जीवन हे परोपकारी आहे.त्यासाठी मला जावेच लागणार.मग त्यासाठी मला विष प्यावे लागले तरी चालेल.”संत रोहिदासांनी दिल्लीस जाण्याचे ठरविले.ते रथामध्ये बसले.कासीदबरोबर मोठ्या आनंदाने निघाले.

दिल्लीस पोहचल्यावर संत रोहिदास बादशहाकडे गेले.तेव्हा बादशहा स्वागत करीत म्हणाले, “रोहिदासजी, आपले सर्वजण गुणवर्णन करतात.आपण मोठे विज्ञानी साधु आहांत.तुम्ही आम्हांस वेदधर्माची माहिती सांगा.आत्मा देह सोडून कोठे जातो?वेदामध्ये अनेक भेद असून, ते सर्व खोटे आहेत.सर्व धर्मात इस्लाम धर्म श्रेष्ठ आहे ना?”

सिकंदर बादशहाचे बोलणे ऐकून संत रोहिदास म्हणाले, “वेद हा पूर्ण धर्म आहे.ईश्वर निराकार आहे.तरी तो भक्तासाठी रुप घेतो.सर्व शक्तिने युक्त असे परब्रह्म आहे.तेच जन्म मरण देणार आहे.त्यांनाच आपण अंतर्यामी म्हणतो.संयोग व वियोग हे कर्माचे फळ आहे.जो ईश्वरावार प्रेम करतो, तोच मुक्ती पावत असतो.त्याला माया व्यापू शकत नाही.वेद धर्म सत्य असून, त्याला मानीत नाहीत ते अज्ञानी होत.”

तेव्हा सिकंदर बादशहा म्हणाले, “वैदिक मतभेद अनेक आहेत.त्यांच्यात ऐक्य नाही.आमचा सितारा मोठ्या आवाजात सर्व बाजूस म्हणत आहे की, आमचा इस्लाम धर्म खरा आहे.जो अधर्मी कुराण मानीत नाही, तो दुःखी पावणार.”

हे ऐकून संत रोहिदास म्हणाले, “बादशहा, तुम्ही अज्ञानी आहांत.तू वेदधर्म खोटा सांगतोस परंतु वेदधर्म सुख देणारा आहे.”

अनुक्रमणिका

अज्ञानी म्हटलेले बादशहाने मनास लागून राहिले.कोल्ह्यास पाहून सिंह जसा क्रोधाने गरजतो.त्याप्रमाणे बादशहा म्हणाले, “वेद प्राचीन असल्याची तू विनाकारण बडबड करतोस.तू लहान तोंडी मोठा घास घेतोस.माझा हुकूम सर्व दिशांना लागू आहे.माझा सितारा सर्व बाजूस गरजत आहे.तुझी आता मरायची वेळ आली आहे.रोहिदासा, मी तुला सांगतो की, तू मुसलमान हो.नाही तर मी तुला कायमची सुखाची झोप देतो.हरीचे ध्यान सोडून कुराण वाच आणि सुखामध्ये लोळ.”

बादशहाचे म्हणणे ऐकून संत रोहिदास म्हणाले, “आत्मा अजर, अमर आहे.तो अविनाशी आहे.तो सत्‌चित्‌ आनंद प्रत्येक घट घटात आहे.”

हे ऐकून सिकंदर बादशहाने हुकूम केला की, “रोहिदासाला बंदीघरात कोंडून ठेवा.त्याचा गर्वहरण करा.त्याला अनेक प्रकारे त्रास द्या.”

बादशाहाचा हुकूम ऐकताच मोठा भाला घेतलेला शिपाई धावतच आला.त्याने रोहिदासांची मुसकी बांधली.हातामध्ये हातकड्या घातल्या व रोहिदासांना अनेक प्रकारे त्रास देऊ लागला.त्यांना कारागृहात घातले.

संत रोहिदासांनी कारागृहात आसन घातले.सर्व जगास विसरून संत रोहिदासांनी समाधी लावली.ईश्वरस्मरण करताच भगवान श्रीकृष्ण कारागृहात प्रगट झाले.भगवानाने संत रोहिदासास अलिंगन दिले व ते म्हणाले, “माझ्या प्राणाप्रिय रोहिदासा, तू त्रास भोगतोस!”

भगवान कृष्णास पाहाताच संत रोहिदासांनी नतमस्तक होऊन नमस्कार केला.तेव्हा भगवान कृष्ण म्हणाले, “रोहिदासा, तू मनातील संशय नाहीशा कर.तुझी आशा पूर्ण होईल.”

दुसरे दिवशी सकाळी सूर्योदय होताच सर्व मुसलमान मशिदीमध्ये आले.मक्केकडे तोंड करून हात बांधून रांगेत बसले.नमाज पढताच सर्वांना संत रोहिदास दिसू लागले.ते सर्व पापण्या, डोळे चोळून पाहू लागले.तर चोहकडे संत रोहिदासच रोहिदास दिसू लागले.बादशाहा सिकंदर लोदी तर फारच घाबरला.हा काय चमत्कार आहे!एवढ्यात आकाशवाणी झाली की, “हे अज्ञानी दुष्ट राजा, माझ्या सर्व श्रेष्ठ भक्त रोहिदासाला तू विनाकारण त्रास देत आहेस, तर तू त्यास त्वरित शरण जा.नाहीतर तू तुझा नाश करून घेशील.”

आता बादशहा सिकंदरास पश्चाताप वाटू लागला.प्रमुख सहकाऱ्यांसह बादशहा कारागृहात जाऊन संत रोहिदासांना म्हणाला, “भक्त रोहिदासजी, आपण खरे पूर्ण भक्त आहांत.आपण आम्हांस क्षमा करावी.”

बादशाहाने संत रोहिदासांना दरबारामध्ये नेऊन सिंहासनावर बसविले.रोहिदासांना शाल देवून त्यांचा सत्कार केला.रथामध्ये बसवून संत रोहिदासांना काशी नगरीत पोहचविले.‘असली रैदास रामायण’ [वख्शीदासकृत ‘असली रैदास रामायण’,पृष्ठ १०२.]व ‘रविदास रामायण[पं.गिरंजासशंकर मिश्र (पूनम), रविदास रामायण, पृष्ठ १०२.]या पुस्तकांमध्ये केलेल्या वर्णनाचा हा सारांश आहे.परंतु श्री संत रोहिदास[सत्यदेव शिंदे, श्री संत रोहिदास, आ.प.सन १९८३, पृष्ठ ७१-७२.]पुस्तकामध्ये थोडा फरक आहे.त्याचा सारांश असा—

अनुक्रमणिका

सिकंदर लोदी १५४५ मध्ये काशीस आला होता.शहरात फिरुन पाहणी करीत असता खूप लोकांकडून त्यांने संत रोहिदासांचा लैकिक ऐकला.तेव्हा त्याचे मनात आकस निर्माण झाला.त्याने रोहिदासांना पकडून आणण्याची सैनिकांना आज्ञा केली.त्याप्रमाणे शिपायांनी रोहिदासास पकडून आणले व बादशाहाचे हुकमाने कारागृहात ठेविले.[बांधि मुश्क रविदास की, बन्दीगृह पहुंचाय।
काल कोठरीमे बंद करी, ताले दिये लगाये॥
श्री.संत रोहिदास, पृष्ठ ७१.]ही बातमी लोकांस समजताच ते शोक करू लागले.लोक सुलतानाला दुष्ट, अविचारी म्हणून हिणवू लागले.

कारागृहात रोहिदासांचे मुखी रामनाम होते.आसनावर बसून त्यानी समाधी लावली.[कारागर भक्तने पाया। पै नही सोच ह्रदय मे आया।
आसन बांधि करे प्रभु ध्याना। लगी समाधी जगत भुलाना॥
–श्री संत रोहिदास, पृष्ठ ७१-७२.]रोहिदासांना भगवंताचे दिव्य दर्शन घडले.दरवाजांची कुलुपे गळाली.दरवाजे आपोआप उघडले.भगवंतानी रोहिदासांना कारागृहातून मुक्त केले पण रोहिदास म्हणाले, “भगवान एवढे दिव्यत्व करू नका.राहु द्या मला येथे.सुलतान काय करतो ते तरी पाहु या.”

दुसऱ्या दिवशी बादशहा मशिदीमध्ये प्रार्थना करू लागला तेव्हा त्यांना सर्वत्र संत रोहिदास दिसू लागले.सुलतान व त्याच्या बरोबरचे लोकही घाबरले.अंगात एखादा भयंकर रोग व्हावा तसा बादशाहा थरथर कापू लागला.[करी प्रतिज्ञा भूपने, अब नही भक्त सताऊँ।
सच्चा बंदा ईशका, भक्त कथा नित गाऊँ॥
–श्री संत रोहिदास, पृष्ठ ७४.]संत रोहिदासांच्या चमत्काराचे माहात्म्य वाटण्याऐवजी सुलतानाचा राग अनावर झाला.त्याने शिपायाला आज्ञा केली की, “रोहिदासाला हत्तीच्या पायी देऊन ठार करा.”

सुलतानाचा हुकूम होताच शिपायांनी चवताळलेल्या मदोन्मत हत्तीसमोर रोहिदासांस ढकलले, परंतु संत रोहिदासांच्या दिव्य तेजापुढे हत्ती मोहित झाला व संत रोहिदासांचे पायावर मस्तक ठेविले.तेव्हा संत रोहिदासांनी हत्तीला कुरवाळले.

हे पाहून सुलतानास आश्चर्य वाटले व त्याने संत रोहिदासांची क्षमा मागितली.त्यांनी संत रोहिदासांना सन्मानपूर्वक परत पाठविले.तेव्हापासून सिकंदर लोदीने प्रतिज्ञा केल्याप्रमाणे संतांना त्रास देण्याचे बंद केले.

* * *

अनुक्रमणिका

# १९.कन्यारूपी गंगा

एकदा संत रोहिदास माण्डोर (माण्डोगढ) येथे गेले.तेथे त्यांनी गंगामाताच्या सन्मानार्थ एक मोठा भंडारा केला.संत रोहिदास गंगा नदीचे परम उपासक होते.रोहिदासांच्या निमंत्रणावरून गंगा स्वतः सुंदर कन्येचा वेष धारण करून प्रसाद घेण्यास आली होती.गंगेचे अलौकिक सौदर्य स्वरूप पाहून माण्डोगढचा राजा तिच्यावर मोहित झाला.

तेव्हा राजाने संत रोहिदासांना संदेश पाठविला की, "ह्या सुस्वरुप मुलीचा विवाह आमच्याबरोबर करावा.नाहीतर तुम्हास देहांताची शिक्षा दिली जाईल."

संत रोहिदास ह्या गोष्टीस कोणत्याही परिस्थितीमध्ये तयार होईनात.जेव्हा राजा जिद्दीस पेटला आणि संत रोहिदासांना मृत्युदंडाची आज्ञा देणार, तेव्हा संत रोहिदासांनी राजाची गोष्ट त्या सुंदर मुलीस सांगितली.तेव्हा मुलीने उत्तर दिले की, "राजाला वरात आणण्यास सांगावी."

गंगा माता स्वतः त्या सुंदर मुलीच्या स्वरूपात राजासमोर येऊन उपस्थित झाली आणि एका अटीवर विवाहास स्वतःची संमती दिली.ती अट म्हणजे वरात शक्यतो लवकर आली पाहिजे.राजाने ती अट तत्काळ मान्य केली.कारण राजा गुडघ्याला बाशिंग बांधून तयारच होता.

राजा शक्यतो लवकर वरात घेऊन धुमधडाक्यात संत रोहिदासांचे आश्रमावर आला.राजाची वरात रोहिदासांच्या कुंडाचे आसपास उभी होती.ती सुंदर मुलगी सोळा शृंगार करून तयार होऊन सर्वांसमोर उपस्थित झाली व राजासमक्ष तिने त्या कुंडात उडी मारली.संत रोहिदासांनी ज्या कुंडातून कंकण काढून दिले होते त्या कुंडात मुलगी गुप्त झाली.

त्याचवेळी त्या कुंडातून पाण्याची एक फार मोठी वेगवती धार निघाली की, तिच्यामध्ये राजासह त्याचे सर्व सहाय्यक बुडून गेले.परंतु राजाचा दुराग्रह ज्यांना पसंत नव्हता असे सर्व लोक वाचले.शेवटी सर्वांना माहित झाले की, संत रोहिदासांचे निमंत्रणावरून आलेली कन्येच्या रुपात गंगाच होती.

अशा प्रकारची कथा 'संत रैदास[डॉ.योगेंद्र सिंह, संत रैदास, प्र.आ.सन १९७२, पृष्ठ २११.]'व 'संत प्रवर रैदास साहब[चंद्रिकाप्रसाद जिज्ञासु, 'संत प्रवर रैदास साहब' प्र.आ.१९८४, पृष्ठ ५२.]'मध्ये आहे.

* * *

# २०.तीर्थयात्रा

राजा पीपाने स्वामी रामानंदास सर्व शिष्यांसह गांगरोनला येण्याचे निमंत्रण दिले होते.म्हणून स्वामी रामानंद दिग्विजय यात्रेच्या वेळी आपल्या कबीर, रोहिदास इत्यादी शिष्यांसह गांगरोनगढास गेले.[डॉ.वी.पी.शर्मा, संत गुरू रविदास, प्र.आ.सन १९७२, पृष्ठ २०.]पीपाने स्वामीजींच्या नेतृत्वाखाली सर्व संत स्नेहींचे अपूर्व स्वागत केले.येथून स्वामीजी सर्व शिष्यांसह द्वारकेस गेले.काही दिवस तेथे राहून काशीस परत आले.

इकडे पतिव्रता लोनी झोपडीत एकटीच राहत असे.घराच्या निर्धनतेमुळे रोहिदासपत्नी लोनीस कित्येक दिवस उपाशी राहवे लागत असे.रोहिदास तीर्थयात्रेहून परत आल्यावर तिची उपासमार थांबे.

एकदा स्वामी रामानंद सर्व शिष्यांसह जगन्नाथ धामला गेले.जगन्नाथाने बटुरुप धारण करून सर्वांचे स्वागत केले.जगन्नाथधामहून रामानंद स्वामी रामेश्वरास गेले.तेथे त्यांनी सर्व शिष्यांसह मंदिर प्रवेश केला व शंकराचे दर्शन घेतले.त्यानंतर स्वामी रामानंद कांचीकडे गेले.अस्पृश्यता व सोवळे ओवळे पाळणाऱ्या ब्राह्मणांनी स्वामींच्या जमातीमध्ये कबीर आणि रोहिदासांना पाहून तिरस्करणीय गोष्टी केल्या;परंतु स्वामी रामानंदाच्या प्रभावामुळे सर्व काही शांत झाले.

संप्रदायाच्या विस्तारासाठी कबीर आणि रोहिदासांची अंत्यजा सारख्या नीच मानलेल्या जातीमध्ये भक्ती प्रचार करण्याचा स्वामी रामानंदाने आदेश दिला होता.रामानंदाचे मृत्युनंतर अनंतानंदाने त्यांच्या दहा शिष्यांना दाही दिशांना नियुक्त करून संप्रदायाचा विस्तार केला.स्वतः अनंतानंद व रोहिदास काशीत राहिले.

संत रोहिदासांनी आपल्या आयुष्यात तीर्थाटन व भक्तांच्या निमंत्रणावरून अनेक यात्रा केल्या होत्या.कुंभमेळ्यावर प्रयागची तसेच मथुरा, वृंदावनच्या यात्रा अनेक प्रसंगी केल्या आहेत.ते दक्षिण भारतामध्ये तिरुपति तसेच उत्तर भारतात मुलतानपर्यंत गेले आहेत.[डॉ.योगेंद्रसिंह, संत रैदास, प्र.आ.सन १९७२, पृष्ठ २७.]मध्यकालिन सर्व संत भ्रमणप्रिय होते.तसेच त्यानी विस्तृत तीर्थयात्रा केल्या.संत रोहिदासांच्या तीर्थयात्रा प्रयाग व हरिद्वारच्या बाजूस विशेष झाल्या आहेत.

गुरू रोहिदास भक्तांकडून अनेकवेळां सन्मानित झाले.त्यांनी निरनिराळ्या ठिकाणी यात्रा केल्या होत्या.तसेच त्यांच्या सन्मानाप्रीत्यर्थ ठिकठिकाणी त्यांचे आश्रम, झोपड्या, त्यांच्या नावाने तलाव आणि मंदिरे बनविली गेली.

संत रोहिदासांच्या रचनेत निरनिराळ्या भाषेतील शब्द मिळतात.तसेच उत्तरप्रदेश, पंजाब, राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र इत्यादी भारताच्या अनेक प्रांतात संत रोहिदासांचे अनुयायी मिळतात.यावरून संतरोहिदासांनी दूरदूरच्या यात्रा केल्या होत्या.[काशिनाथ उपाध्याय, गुरुरविदास, प्र.आ.सन १९८३, पृष्ठ १९.]उत्तर भारताच्या अनेक ठिकाणी रोहिदासांची स्मारके बांधली आहेत.काशीनजिक माण्डूरमध्ये संत रोहिदासांच्या नावाचा तलाव आहे.मी मार्च १९८७ मध्ये ह्या तलावास भेट दिली होती.त्यावेळी हा तलाव संपूर्ण सुकलेला होता.तलावाच्या नाला सुध्दा कोरडा दिसला.तलावाचे बाजूस चार खणांचे घर बांधलेले आहे.आजूबाजूस चर्मकारांची तसेच वीणकाम करणारांची बरीच मोठी वस्ती आहे.

अनुक्रमणिका

मी चितोडगडास भेट दिली.गडावर कुंभश्याम मंदिरानजिक रोहिदास छतरी आहे.ह्या छतरीखाली रोहिदासांचे चरणचिन्ह आहे.सुमारे तीन फूट लांब रुंद अशा दगडी चौथऱ्यावर मधोमध संत रोहिदासांच्या दोन पादुका पाहिल्या.चौथऱ्याच्या चारी कोपऱ्यात कोरीव नक्षीकाम केलेले आहे.हैदराबादनजिक एलोरामध्ये एक रोहिदास कुंड आहे.काठियावाडच्या जुनागढ नगरात एक कुंड आहे.दक्षिण भारतात बालाजी डोंगराचे पायथ्यास तिरुपति मंदिराजवळ रोहिदासांचे एक स्मारक आहे.

गुरू रोहिदास १५१ वर्षांच्या वयापर्यंत उत्तरप्रदेश, बिहार, राजस्थान, पंजाब, हरियाना, दिल्ली, मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात इत्यादि प्रातांत फिरुन आपल्या कल्याणमयी सरस वाणीच्या अमृतसरिता वाहत ठेवल्या होत्या.

* * *

अनुक्रमणिका

# २१.भगवान नैवेद्य ग्रहण

मीराबाई संत रोहिदासांची शिष्या झाल्यावर ब्राह्मणांनी चित्तोडमध्ये बराच गोंधळ माजविला.आरंभी संत रोहिदासांना ऐकू जातील असे कडवट शब्द उच्चारिले.एवढेच नव्हे तर पुन्हा शिव्यागाळी देण्यास कमी केले नाही.शेवटी तर ठार मारण्याच्या धमक्या दिल्या.तेव्हा साधू सैनिजी ब्राह्मणांना समजावू लागले.शेवटी रोहिदासांनी ब्राह्मणांबरोबर शास्त्रार्थ करण्याचा तोडगा काढला.तेव्हा तंग वातावरण शांत होऊ लागले.चित्तोडमध्ये गंभीरी नदीच्या किनाऱ्यास शास्त्रार्थाची तयारी केली.राज कर्मचाऱ्यांची व्यवस्था देखरेख होती.सभेस मोठी गर्दी झाली होती.मोठमोठे पंडित आणि साधूसंत जमा झाले होते.त्यावेळचे राणा विक्रमादित्य सभेचे अध्यक्ष होते.

शास्त्रार्थ सुरू झाला.ब्राह्मण पंडित शास्त्रीय अधिकार भेदाचा पक्ष घेऊन बाजू मांडीत व त्यासाठी प्रमाणे सांगत.परंतु संत रोहिदास म्हणत, “जगात माणसांचे राज्य आहे.म्हणून बलवान माणसे कमजोरावर कुरघोडी करून, त्यांना जशी पाहिजे तशी व्यवस्था व नियम करू शकतात.परंतु परलोकात ईश्वराचे राज्य आहे.ईश्वरासमोर सर्व प्राणीमात्र समान आहेत.ईश्वराची भक्ती व भजन करण्याचा सर्व प्राणीमात्रास अधिकार आहे.”

त्यावर ब्राह्मण पंडित म्हणाले, “चांभाराला देवपूजा करण्याचा आणि गुरू बनण्याचा काहीसुध्दा अधिकार नाही.”

संत रोहिदासांनी सांगितले की, “मी तर निर्गुण ब्रह्माचा उपासक आहे.माझ्यासाठी तर मूर्तिपूजेचा प्रश्नच उद्‌भवत नाही.परंतु माझे म्हणणे असे आहे की, जर कोणाचा मुर्तीवर विश्वास असेल, तर त्याला त्याचा विश्वास व श्रध्दानुसार मूर्ती पुजण्याचा पूर्ण अधिकार आहे.यामध्ये कसलाही अडथळा निर्माण होता कामा नये.आता राहिला गुरु बनण्याचा प्रश्न.ही शिष्य बनणाऱ्यांच्या श्रध्देची गोष्ट आहे.साधुजन परमार्थाची, अध्यात्माची सर्व काही माहिती सांगतात.ती ज्यांना ज्यांना पटते, ते त्या साधुजनांना गुरू मानतात.ही फार पूर्वीपासून चालत आलेली परंपरा आहे.ही गोष्ट मी काही नवीन सांगत नाही.त्यामुळे गुरू-शिष्य बनण्यात कसलीच अडचण निर्माण होऊ शकत नाही.”

संत रोहिदास शास्त्रार्थामध्येहार जात नाहीत.तेव्हा ब्राह्मणांनी विषयांतर करून सांगितले की, “भक्तिची परीक्षा झाली पाहिजे.बरेचसे ढोंगी भक्त बनून जगाला फसवितात व सर्वांचा धर्म बुडवितात.”

तेव्हा संत रोहिदासांनी त्यांना विचारले की, “आपली इच्छा काय आहे?”ब्राह्मणांनी सिंहासनासहित भगवानाची (देवाची) मूर्ती बरोबर आणली होती.तिच्याकडे बोट दाखवून ब्राह्मण म्हणाले, “ती भगवानाची मूर्ती आहे.आज आतापर्यंत तिचे भोजन झाले नाही.ती गंभीरी नदीत फेकून बुडवायची आहे.जर आपण मोठे भक्त आहांत, तर मुर्तिस बोलावून जेवायला लावा.तेव्हा आम्ही तुमची गोष्ट मानू.”

संत रोहिदासांनी सांगितले की, “मला मान्य आहे.पण मी हे काम नंतर करीन.प्रथम आपणांस भगवानास नैवेद्य ग्रहण करावा लागेल.नंतर मी करतो.”

अनुक्रमणिका

राणा विक्रमादित्याने सांगितले की, “ठीक आहे.पहिल्याने ब्राह्मण भगवानास नैवेद्य ग्रहण करतील.नंतर रोहिदासजी करतील.”

सिंहासनासहित भगवान (देव-मूर्ती) गंभीरी नदीत फेकून बुडविला.ब्राह्मण मोठ्या संकटात पडले.साडेतीन प्रहरपर्यंत ब्राह्मण पंडित वेदमंत्र वाचून मूर्तिस येण्याचे आवाहन करू लागले.परंतु मूर्ती नदीबाहेर आली नाही.तेव्हा राणा विक्रमादित्याने सांगितले की, “रोहिदासजी, आता आपण भगवानाच्या मुर्तिस बोलवा.”

संत रोहिदासांनी आपल्या भक्तिपूर्ण वाणीने भगवान मूर्तिस विनविले.तेव्हा ती गंभीरी नदीतून त्वरित निघून संत रोहिदासांसमोर येऊन उभी राहिली आणि सर्वांसमक्ष संत रोहिदासांचा नैवेद्य खाल्ला.

जनता संत रोहिदासांचा जयजयकार करू लागली.ब्राह्मण लज्जीत होऊन पळून गेले.राणाजीने रोहिदासांचे गळ्यात विजयमाला घातली.त्यावेळी गुरुदेवाच्या विजयाने मीराबाईच्या आनंदास पारावार राहिला नाही.[चंद्रिका प्रसाद जिज्ञासु, संत प्रवर रैदास साहब, पृष्ठ ५१.]

* * *

अनुक्रमणिका

# २२.संत रोहिदासांचे निर्वाण

संत रोहिदासांचे संपूर्ण जीवन संघर्षामध्ये व्यतीत झाले.तत्कालीन समाजातील स्पृश्य-अस्पृश्यतेमुळे ते जेथे जेथे गेले, तेथे तेथे त्यांना वादविवाद करावे लागेल.परंतु त्यांचे अदम्य साहस तसेच अटल ईश्वरीय विश्वास नेहमी त्यांना आपल्या आध्यात्मिक मार्गावर चालण्याची प्रेरणा देत आला.[डॉ.बी.पी.शर्मा.संत गुरु रविदास, प्र.आ.सन १९७२, पृष्ठ ४४.]

संत रोहिदासांनी आपल्या आयुष्याची संध्याकाळ महाराणी 'झाली' हिच्या आग्रहावरून चित्तोडमध्ये घालविली.त्यांची पत्नी लोनासुध्दा त्यांचेबरोबर रहात होती.विवाहित असूनही संत रोहिदासांनी संन्याशी जीवन व्यतीत केले.

काही विद्वान म्हणतात की, "काशीमध्येच संत रोहिदास ब्रह्मलीन झाले."परंतु असेही सांगितले जाते की, "चित्तोडच्या कुंभश्याम मंदिराच्या सत्संग भवनामध्ये संत रोहिदासांचा काही विद्वानांबरोबर आध्यात्मिक विषयावर वादविवाद झाला.विषय होता 'ब्रह्माची सत्ता'.रोहिदासांच्या मतानुसार आत्माच परमात्म्याचे उदात्त स्वरूप आहे.आत्म्याची पवित्रता व सरलता ईश्वरीय शक्ती आहे.ह्या शक्तिमुळे कोणीही भक्तजन ईश्वरी सत्तेस आपल्यामध्ये व बाहेरही पाहू शकतो. "असेही सांगितले जाते की, संत रोहिदासांनी ही गोष्ट सिद्ध करण्यासाठी आपल्या शरीरातून सोनेरी जानवे काढून दाखविले आणि लगेच त्यांचे शरीरातून एक असा दिव्य ज्योतीचा प्रकाश चमकला की, सर्वजण चकित झाले.रोहिदास तेथे राहिले नाहीत.फक्त त्यांचे चरणचिन्हच दिसले.नंतर राज्यातर्फे ह्या चरणचिन्हाच्या चारी बाजूस एक सुंदर चबुतरा बनविला.आणि ऊन पावसापासून संरक्षण होण्यासाठी एक गोलाकार छत्री बनविली.हीच 'रोहिदासांची छत्री' म्हणून चित्तोडमध्ये प्रसिध्द आहे.

महात्मा राम चरणजीचे म्हणणे आहे की, "संत रोहिदास आपल्या दीर्घ जीवनाची १०५ वर्षे काशीत राहून ब्राह्मण पंडितांबरोबर संघर्ष करीत मानव धर्माचा प्रचार करीत राहिले.नंतर मीराबाईच्या आग्रहामुळे चित्तोडला गेले.आणि पंधरा वर्षांपर्यंत रोहिदासांनी तेथेही सनातन्यांशी संघर्ष करीत मानव धर्माचा प्रचार केला.शेवटी एका दिवशी मीराबाईने स्थापित केलेल्या 'श्री कुंभश्याम' मंदिरात गेले.तेथे ध्यान केल्यानंतर त्यांनी मोठ्या प्रेमानुरागाने आपले स्वतःचे आरतीचे एक पद गाईले.ही आरती ऐकून ब्राह्मणांचा क्रोध अनावर झाला.संत रोहिदास मंदिराबाहेर पडताच"ब्राह्मणांशिवाय दुसऱ्या कोणालाही ह्या मंदिरात आरती पूजा करण्याचा अधिकार नाही."असे ब्राह्मणांनी रागाने सांगून संत रोहिदासांवर घातक प्रहार केले.त्यावेळी त्यांचे शरीरातून सहस्त्र सूर्यांच्या रश्मीप्रमाणे प्रकाश झाला.आणि क्षणात त्यांचा पार्थिव देह त्याच तेजात विलीन झाला.त्या ठिकाणी फक्त त्यांच्या पादुका राहिल्या.

भक्तजन ही बातमी घेऊन त्यांचे झोपडीवर गेले.तर तेथे त्यांनी पाहिले की, त्यांची धर्मपत्नी लोनासुध्दा अंतर्धान झाली.१२० वर्षांचे आयुष्यात संत रोहिदास सपत्नीक सदेह परधामास गेले.[चंद्रिकाप्रसाद जिज्ञासु, संतप्रवर रैदाससाहब, पृष्ठ ५३.]

'संत गुरु रविदास वाणी' मध्ये [डॉ.बी.पी.शर्मा, संत गुरु रविदासवाणी, प्र.आ.सन १९७८, पृष्ठ ३५.]म्हटले आहे की,— राणा सांगा चित्तोडच्या गादीवर संवत १५६५ (सन १५०९) मध्ये बसला होता.त्यावेळी दिल्लीवर सिकंदर लोदीचे राज्य होते.संवत १५८४ कार्तिक महिन्यात राणाचे बाबराबरोबर युद्ध झाले होते.ह्या युद्धात राणाचा

पराभव झाला आणि तो गंभीररीत्या जखमी झाला होता.त्याचा मृत्यु पौष मास १५८५ काल्पीमध्ये विष दिल्यामुळे झाला.संवत फाल्गुन चैत्रात संत रोहिदास शेवटच्या वेळी चित्तोडला आले होते.त्यावेळी त्यांचे शरीर वृद्धावस्थेमुळे फारच थकले होते.हे त्यांनी त्यांच्या एका पदामध्ये म्हटले आहे[अब मैं हारयो रे भाई।
हलन चलन तै देह थकित भई, लोकन वेद बढ़ाई।
थकित भयो नाचन अरू गावन तै, थाकी पूजा सेवा।
—संत गुरु रविदासवाणी, पृष्ठ ३५.]की, "मी आता थकलो आहे.माझे शरीर थकल्यामुळे मला देवपूजा (सेवाही) करता येत नाही की नाचता गाताही येत नाही.शरीर जीर्ण झाल्यामुळे, ह्या पंचभौतिक शरीराचा आता त्याग करावासा वाटतो."

चित्तोडगडाहून अठराशे फूट खोल गांभीरी नदीच्या किनाऱ्यावर चित्तोड राज्यातर्फे ब्रह्म भोजनाचे आयोजन केले होते.परंतु उच्च जातीचा अभिमान वाटणाऱ्या ब्राह्मणांना वाटले की, रोहिदाससारख्या शुद्राबरोबर भोजन कसे करावयाचे, तेव्हा राणा सांगाने मध्यस्थी केली.तेव्हा त्यांनी म्हटले, "संत रोहिदास मोठे ब्रह्मज्ञानी व श्रेष्ठ हरिभक्त आहेत.त्यांचेसंबंधी क्षूद्र भावना ठेवणे म्हणजे आपणांकडून एक फार मोठा गुन्हा केल्यासारखे होय.[राणा कहे सुनो रे भाई, मेरे तो मन इहै सुहाई।
करणी हीन सु मधिम सोई, करणी करै सो उत्तिम होई।
काम, क्रोध, लालच नौ दबारा, एठौ तन मैं सवै चमारा।
उत्तम भये जिनु ये जिता, ब्राह्मण किनै वाल्मिक जीता।]सगळेब्राह्मण आनंदाने भोजन करू लागले.त्यावेळी सगळ्यांचे ध्यानीमनी रोहिदास.त्याप्रमाणे त्यांना जिकडे तिकडे रोहिदासच रोहिदास दिसू लागले.याचे सर्वांना आश्चर्य वाटू लागले.[हम अपराधी वो है पूरा, वाके साहिब रहत हजूरा।
जाति पांति का नही अधिकारा, भजन कीनै उतरै पारा।
वेद पुरान कहै दूहु वानी, भगति वासि है सारंग पाणी।
—संत गुरु रविदासवाणी, पृष्ठ ३५-३६.]त्यावेळी संत रोहिदास उभे राहून आपल्या पूर्व जन्माची कथा सांगू लागले की, "मी पूर्वजन्मी ब्राह्मण होतो.परंतु मला शुद्र घरी जन्म घ्यावा लागला.मी भक्ती केली.कारण भक्तिशिवाय जग मला शून्य वाटू लागले.[तव रैदास कहै समुझाई, अन जनमकी कथा चलाई।
होता हौ विप्र हरि नहि जान्या, ता ते मोहि सूद्र धरि आन्या।
कीयै भगति मोहि भौ सूधा, भगति बिना सब ही जग सूदा।]नंतर संत रोहिदासांनी आपल्या शरीरातील अंतरात्म्यामधील सुवर्णासमान दैदिप्यमान ब्रह्मप्रकाशी जानवे दाखविले.[तन के मांझ जनेउ काढ़ी, ते सब देषि भये है आढ़ी।
—संत गुरु रविदासवाणी, पृष्ठ ३६.]

अनंतदास वैष्णव म्हणतात की, "हरि सागरात रोहिदास रुपी बिंदु मिळाला.तो कुठे मिळाला हे कोणालाही माहित नाही.["हरि सागरमे बूंद समानी, कोउ न जानै कहाँ समानी।"
—संत गुरु रविदासवाणी, पृष्ठ ३६.]"

अशाप्रकारे संत गुरु रोहिदासांचे जरा जर्जर शरीर १३१ वर्षांने चित्तोड़गढ़ येथे ब्रह्मलीन झाले.["पंद्रह सै चउ असी, भई चित्तौर मंह भीर।
जर जर देह कंचन भई, रवि रवि मिल्यौ सरीर।"
—संत गुरु रविदासवाणी, पृष्ठ ३६.]

रैदास रामायणाचे लेखक म्हणतात की, "संत रोहिदास हे काशीत गंगाकिनारी तपस्या करताना जीवनमुक्त झाले किंवा सदेह गुप्त झाले."

अनुक्रमणिका

दलितांचे पुढारी व केंद्रीय मंत्री कै.बाबू जगजीवनराम यांचे एक स्वप्न होते की, गंगा किनारी राजघाटावर गुरु रविदास मंदिर बांधून लवकर पूर्ण व्हावे.ते काम पूर्ण करीत असलेल्या नवी दिल्लीच्या दि रविदास स्मारक सोसायटीचे महामंत्री श्री.राम लखन यांची मी मार्च १९८७ मध्ये काशीत भेट घेतली.तेव्हा राजघाटावरील ते भव्य मंदिराचे बांधकाम दाखवित असता मला म्हणाले की, “संत रोहिदास याच ठिकाणी सदेह गुप्त झाले.तसेच काशीतील विद्वान लेखक व संत रोहिदासांचे संशोधक डॉ.सुखदेवसिंग यांची मी त्यांचे घरी भेट घेतली असता ते म्हणाले की, “संत रोहिदासांचे मृत्युस्थान काशीत गंगाकिनारी राजघाटावरच होऊ शकते.”

बाबू जगजीवनराम यांची सुकन्या खासदार मीराकुमार यांची मी दिल्लीमध्ये माहे फेब्रुवारी १९८७ मध्ये भेट घेतली.तेव्हा त्यांचे म्हणणेही असेच ऐकावयास मिळाले.

संत रोहिदासांचे मृत्युस्थान चित्तोड़गड व काशी असे दोन्ही विचारधारावाले रोहिदास सदेह गुप्त झाल्याचे मानतात.परंतु रोहिदास निर्वाण झाल्याचे कोणी पाहिले नाही.म्हणून त्यांचे ‘सदेह गुप्त’ अथवा ‘सदेह गुप्त’ म्हटले आहे.कारण रोहिदासांच्या मृत्युस्थळाचा कोणालाच पत्ता नाही.परंतु माझे असे मत आहे की, (संत रोहिदासांचे मृत्युस्थळ चित्तोड़गडच असावे.कारण त्यांच्या सुप्रसिध्द शिष्या महाराणी ‘झाली’ व मीराबाई ह्या दोघींच्या आग्रहावरून संत रोहिदासांची आपल्या आयुष्याची संध्याकाळ पत्नी लोनासह चित्तोड़गड़वरच घालविली.कुंभश्याम मंदिरात स्वरचित आरती म्हणून मंदिराबाहेर पडताच संतप्त ब्राह्मणांनी त्यांचेवर घातक प्रहार केले व त्यांचे प्रेत गंभीरी नदीत फेकून दिलेअसावे.परंतु त्यांची पादत्राणे जेथे मिळाली, त्याच ठिकाणी त्यांची समाधी व छत्री बांधलेली आहे.)

रोहिदासी संप्रदायी व भक्त रोहिदासांची निर्वाण तिथी चैत्र वद्य चतुर्दशी मानतात.भगवान रैदासकी ‘सत्यकथा’ पुस्तकामध्ये रोहिदासांचे मृत्यु वर्ष सन १५४० (संवत १५९७) मानले आहे.तर मीरा स्मृतिग्रंथात त्यांचे मृत्युवर्ष मन १५१९ (संवत १५७६) मानले आहे.

संत रोहिदासांना काही प्रसंगी ब्राह्मण पुजारी वर्गाच्या विरोधात सामना करावा लागला होता.रोहिदासांचा समाजावर चांगलाच प्रभाव पडला होता.मागासवर्गात जन्म घेतल्याने ब्राह्मणवर्ग त्यांचेकडे तिरस्करणीयदृष्टीने पाहात होता.ब्राह्मणवर्ग संत रोहिदासांना ईश्वर पूजा-भक्ती करण्याचा तसेच आध्यात्मिक उपदेश देण्याचा अधिकार मानत नव्हता.त्यांचे दृष्टीने चांभारासारख्या नीच जातीच्या व्यक्तिसाठी परमेश्वराची पूजा-आराधना करणे म्हणजे धर्माचे अपवित्रीकरण वाटत होते.

महात्मा रोहिदास मोठ्या गोड स्वभावाचे भक्त होते.त्यांनी कोणावर कठोर आक्षेप, टीका केलेली नाही.या अर्थाने ते खरे वैष्णव होते.ते अहिंसक, निराभिमानी व मानवतावादी होते.रोहिदासजींच्या अति विनम्र आणि समाधानी जीवनावर प्रकाश पडतो.तसेच खरी भगवत भक्ती आणि भगवत प्रेमासमोर ब्राम्हणांना आपल्या कर्मकांडाची निष्फंलता स्वीकारावी लागली.रोहिदासजींच्या प्रेम भक्तिमार्गाचे महत्व सिद्ध होत आहे.तसेच उच्च जातीमध्ये जन्म घेतल्याचा अभिमान व पूजापाठाचे तसेच अनुष्ठानाचे अवडंबर व्यर्थ शाबीत झाले.अन्य संतांच्या तुलनेत महात्मा रोहिदासांनी अधिक स्पष्ट व जोरदार समर्थन केले की, कर्मच धर्म आहे.त्यांच्या वाणीतून स्पष्ट होते की, भगवत् भजन, सदाचारमय जीवन, निरहंकारवृति व सर्वांच्या हितासाठी केले जाणारे कर्म हाच खरा धर्म आहे.

अनुक्रमणिका

संत रोहिदासांचा जन्म माघ पौर्णिमा सन १३७६ (संवत १४३३) तर त्यांचे निर्वाण सन १५२७ (संवत १५८४) मध्ये झाल्याचे म्हणले जाते.आचार्य पृथ्वीसिंह आजाद यांचे हेच मत आहे आणि माझेही तेच मत आहे.संत रोहिदासांचे आयुष्य १५१ वर्षांचे होते.एवढे आयुष्य सर्वसाधारण मनुष्यास मिळत नसते.परंतु संत रोहिदासांसारख्या परमयोगी, सात्त्विकवृत्ती, इंद्रिय निग्रही सद्गृहस्थाने एवढे आयुष्य भोगणे असंभव किंवा आश्चर्यकारक वाटत नाही.[काशीनाथ उपाध्याय, गुरु रविदास, पृष्ठ १९.]

संकटकाळात जन्म घेऊन ज्या संतांनी हिंदू धर्माचे रक्षण केले.तसेच तिरस्कृत, उत्पीडीत व निराश्रीत लोकांना सांत्वन दिले.त्यामध्ये भक्त महर्षि रोहिदासांचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते.संत रोहिदासांनी चर्मकार जातीत जन्म घेऊन आणि पूरातन संस्कृतीच्या खऱ्या स्वरुपावर प्रकाश टाकून तसेच युग युगांतरापर्यंत ते जिवंत ठेवण्याचे महान कार्य केले.ते कार्य जनकल्याणकारी तसेच अनुपम आहे.

गुरु रोहिदासांनी जेथे विविध धर्म, संप्रदाय व त्यांच्या प्रभावास आत्मसात केले.तेथे त्यांनी धर्मप्रचार करण्याचा प्रकार पूर्णपणे स्वतंत्र ठेवला.रोहिदासांच्या पवित्र वाणीत निर्माणकारी तत्व आहे.त्यात जीवनाची पवित्रता, आचरणाची शुद्धता, वासनामुक्ति, ईश्वरभेटीची तळमळ, मानवप्रेम, उदारता, शील, क्षमा, संतोष, साधुता, विनम्रता, विवेकशीलता इत्यादी विशेषकरून उल्लेखनीय आहेत.ते सत्य सनातन वैदिक चिंतनधारा तसेच भारतीय संस्कृतीमुळे पूर्णपणे प्रभावित होते.त्या काळात सर्व संत भक्तांमध्ये संत रोहिदासात ह्या मूल्ल्याच्या प्रचारासाठी तीव्र तळमळ होती.

संत रोहिदासांनी आपले सर्व काही प्रभुचरणी समर्पित केले होते.त्यांचे जीवन आदर्श होते.साधी राहणी आणि उच्च विचारसरणीची जी कल्पना तत्वज्ञान्यांनी केली, ती त्यांच्यामध्ये साकार झाली होती.ह्या तपोमय जीवनाचा परिणाम वाणीची मधुरता विचाराच्या अभिव्यक्तिरुपात प्रकट होते.

संत रोहिदास शांत, शीतल स्वभावाचे रामभक्त होते.क्रोधादि पंचविकार त्यांचे जवळपासही राहू शकत नव्हते.परनिंदेपासून ते दूर होते.रोहिदास निर्गुण ब्रह्मवादी संत होते.त्यांचे आराध्यदैवत निरंजन आणि निर्विकार ब्रह्म होते.त्यांच्या वाणीमध्ये राम, कृष्ण, हरि, मुरारी, बनवारी, गोविंदा, माधवे इत्यादी विष्णू अवतारांची नावे आली आहेत.रोहिदास समतावादी संत होते.त्यांना जांतीभेद, वर्णभेद, संप्रदायभेद इत्यादी भेदभावांना गाडावयाचे होते.ते हिंदू-मुसलमान, ब्राह्मण-शूद्र इत्यादी सर्वांना समदृष्टीने पाहात होते.संत रोहिदास पोथी-पुराणांवर विश्वास ठेवीत नव्हते.त्यासाठी त्यांना विवेकआवश्यक होता.संत रोहिदास निराभिमानी युगपुरूष होते.त्यांचे ग्रंथ चित्तोडमध्ये नष्ट केले.कारण चित्तोडच्या राजवंशात त्याचा प्रभाव वाढला होता.म्हणून तेथील ब्राह्मण संत रोहिदासांवर नेहमी जळत होते.

संत रोहिदास हे किती वर्षे जगले यापेक्षा ते आपले दीर्घ आयुष्य कशाप्रकारे जगले हे अधिक महत्वाचे आहे.

संत रोहिदासांनी ज्यांचे संगतीमध्ये परम सुखाची देवाणघेवाण केली.त्या कबीरादी गुरुबंधु व संत स्नेहींचा परिचय पुढील प्रकरणात पाहू या.

अनुक्रमणिका

* * *

अनुक्रमणिका

भाग १ ला
संत रोहिदास चरित्र
ब विभाग

अनुक्रमणिका

# २३.रोहिदासांचे गुरूबंधु व संतस्नेही

**रोहिदास गुरू—स्वामी रामानंद**—सन १२९९ ते १४१० (संवत १३५६ ते १४६७) अगस्त्य संहितानुसार आचार्य रामानंदाचा जन्म प्रयाग (अलाहाबाद) ह्या पवित्र तीर्थक्षेत्री माघ कृष्ण सप्तमीस गौड ब्राह्मण परिवारात सन १२९९ (संवत १३५६) मध्ये झाला.ही माहिती रामानंद सांप्रदायिकांनी प्रमाणभूत मानली आहे.ते जातीचे काव्यकुब्ज ब्राह्मण होते.त्यांच्या मातेचे नांव सुशीलादेवी आणि वडिलांचे नाव पुण्यसदन होते.रामानंदाचे दीक्षागुरु स्वामी राधवानंद होते.अकराव्या शतकात आचार्य रामानुजांनी वैष्णव संप्रदायाची स्थापना केली.राघवानंद हे रामानुज शिष्य परंपरेतील चौथे आचार्य होते.ही परंपरा अशी होती.(१) रामानुजाचार्य, (२) गुरू देवाचार्य, (३) स्वामी हर्यानंद, (४) स्वामी राघवानंद, (५) आचार्य रामानंद.स्वामी रामानंदानी वैष्णव मताब्ज भास्कर, श्री रामार्चनपद्धति व सिद्धांतपटल असे तीन ग्रंथ लिहिले आहेत.स्वामी रामानंदानी दक्षिणेतून उत्तर भारतात भक्तिमार्ग आणला.

स्वामी रामानंदाच्या जीवनकाळात दिल्लीच्या सिंहासनावर तुघलकवंश आणि लोदीवंशाचे शासन होते.तुर्काचे शासन मौलवी—मुल्लांचे मार्फत इस्लामी शरियतवर चालत होते.मूर्ती फोडणे, जबरदस्तीने धर्मांतर करणे, हे सुलतानी राज्याचे आदर्श होते.हिंदुंची तीर्थस्थाने तसेच धार्मिक उत्सवावर निषेधाज्ञा होत्या.नवीन मंदिरे बांधणे तसेच जुन्या मंदिरांच्या दुरूस्तीवर बंदी घातली होती.सिकंदर लोदीच्यावेळी हिंदुंवर अत्याचार करण्याचे आंदोलन चालविले होते.उच्चपदी फक्त मुसलमानांच्याच नेमणुका होत.हिंदू शेतकऱ्यांच्या जमिनीसुद्धा ताब्यात घेतल्या होत्या.हिंदूधर्मीय एखाद्या कामगाराप्रमाणे जीवन जगत होते.त्यांचे जीवन संघर्षमय होते.देशात दळणवळणाची साधने नव्हती.सडका नव्हत्या.टपाल व्यवस्था नव्हती.मध्ययुगीन अखंड भारतामध्ये सुमारे पंधरा कोटी लोकसंख्या असावी.गांव-वस्त्या दूरदूर होत्या.तर दूरदूरपर्यंत घनदाट जंगले पसरली होती.पाळीव जनावरांमध्ये गाय, म्हैस, घोडे व हत्ती सर्वांत जास्त होती.सती प्रथा उच्चनीच सर्वजातीमध्ये याच मध्ययुगात चालू झाली.कारण भारतीय नारीस शीलरक्षणार्थ जोहार करणे किंवा सती जाणे याशिवाय मार्ग उरला नव्हता.समरकंद, भजनी व बुखारा येथील बाजारात हिंदू स्त्रियांना मुसलमानांच्या वासनापूर्तीसाठी रखेली म्हणून पाठवीत.देशात चोऱ्या फार होत होत्या.एकटा माणूस कुठे जाऊ शकत नव्हता.सत्ताधाऱ्यांपासून प्राणांचे संरक्षण करण्यासाठी लोक जंगलात किंवा ओसाड प्रदेशात लपून रहात.सारांश मुसलमानी राज्यात सर्वत्र अंधारच अंधार पसरला होता.महमदघोरीपासून औरंगजेबापर्यंत भारतावर एक हजार वर्षे मुस्लीम शासन चालू होते.मध्ययुगात अल्लाउद्दीन खिलजी (इ. स.१२९६ ते १३२०), तुघलक वंश (इ. स.१३२० ते १४२२ पर्यंत) आणि लोदीवंश (इ. स.१४५२ ते १५२६ पर्यंत).शासन अत्याचार, अन्याय करण्यात प्रसिद्ध होते.आपल्या चुलत्यास व सासरा जलालुद्दीनला ठार करणारा अल्लाउद्दीन खिलजी हा संशयी, जिद्दी, कठोर, अडाणी व लहरी सुलतान होता.ग्यासुद्दीन तुघलक आपल्या वडिलांस ठार करुन गादीवर बसला होता.सैय्यद वंशानंतर लोदीवंशाचे शासन दिल्लीच्या गादीवर बसून अन्याय अत्याचार करू लागले.सिकंदर लोदीचे सारे जीवन लूट, बलात्कार, नरसंहार, सामुहिक इस्लामीकरण करण्यात गेले.तसेच त्याने हिंदू मंदिरेव महालांना मस्जीद-मकबरामध्ये रूपांतरीत-परिवर्तीत केले होते.शहरांची नांवे फिरोजपूर, तुगलकाबाद, खिजराबाद, सिकंदराबाद अशी ठेवली.अशा प्रकारामुळे मध्ययुगीन संत तसेच तपस्वी, त्यागी महापुरुषांनी स्वामी रामानंदाच्या नेतृत्वाखाली धार्मिक, सामाजिक तसेच देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्रथम स्वातंत्र्ययुद्धाला प्रारंभ केला होता.

अनुक्रमणिका

त्याकाळी देशात उच्चनीच, जातीपोटीच्या भेदभावाने भयंकर स्वरूप धारण केले होते.देशाची ही परिस्थिती पाहून दिव्यदृष्टा व प्रगतिशील चिंतक स्वामी रामानंदानी वयाच्या १८ व्या वर्षी गुरु राघवानंदाचा प्रयाग येथील आश्रम सोडून, सगळ्या भारताचे भ्रमण केले.त्याच्या ह्या भारत दर्शन यात्रेचे वर्णन'रामानंद दिग्विजय' नावाच्या ग्रंथात भगवदाचार्यांनी केले आहे.अवधूत बैरागी साधूने असे सांगितले आहे की, रामानंदांनी गिरनार पर्वतावर योग साधनाद्वारे अद्भुतसिद्धी प्राप्त केली होती.ती सिद्धी एवढी होती की, मृत्युदेखील त्यांच्या ताब्यात होता.शाप देऊन मारणे किंवा मेलेल्यास जिवंत करण्यापर्यंत शक्ती रामानंदास प्राप्त झाली होती.त्यामुळे बनारसचे मुल्ला-मौलवी त्यांना घाबरुन असत.आपले प्रागतिक विचार कृतीमध्ये आणण्यासाठी बनारसमध्ये पंचगंगा घाटावर आपल्या आश्रमाची स्थापना केली.हाच रामानंद मठ आजही पडक्या अवस्थेत दिसून येतो.याचठिकाणी रोहिदास, कबीर, इत्यादींना गुरुमंत्र मिळाला.काशीशिवाय अयोध्या, अलवर, अहमदाबाद, आबू, इटवा, अलाहाबाद, उज्जैन, करताल, करौती, गांगरौन, ग्वाल्हेर, चित्रकूट, छपरा, जयपूर, जैसलमीर, जोधपूर, पतियाला, बाराबंकी, मथुरा, मिथिला, मिर्जापूर, मेवाड, सागर व हरद्वार या शहरात रामानंद संप्रदायाची केंद्रे आजही आहेत.

महात्म्का तेजःपुंज, योगेश्वर, ब्रह्मनिष्ठ, प्रभावशाली अशा स्वामी रामानंदाची शिष्यसंख्या पांचशेच्यावर होती.तरीपण त्यांचे प्रमुख बारा शिष्य होते.नाभादासाने उल्लेख केलेल्या त्यांच्या बारा शिष्यांची नावे अशी[अनंतानंद कबीर सुखा, सुरसुरा पद्मावती नरहरी।
पीपा भावानंद रैदास धना, सेन सुरसुरी की धरहरि।
औरो शिष्य प्रशिष्य एक से एक उजागर।
विश्वमंगल आधार सर्वानन्द दशधा के आगर।
बहुतकाल वपु धारि कै प्रणत जनन को पार किया।
श्री रामानन्द रघुनाथ ज्यों दुतिय सेतु जग तरन कियो।
–भक्तमाल, श्री संत रोहिदास, पृष्ठ ५०.]–(१) अनंतानंद, (२) कबीर, (३) सुखानंद, (४) सुरसुरानंद, (५) पद्मावती, (६) नरहर्यानंद, (७) पीपा, (८) भावानंद, (९) रविदास (रोहिदास), (१०) धना, (११) सेन, (१२) सुरसुरी.

स्वामी रामानंदाचे बारा शिष्य निर्गुण भक्तिधारेचे तर गोस्वामी तुळसीदास सगुण (राम) भक्तिधारेचे संत कवी होते.स्वामी रामानंदास बारा शिष्यात कोष्ठ्याघरचा कबीर, रोहिदास चांभार, सेना नाव्ही, धन्ना जाठ हे सर्व हिंदू समाजातील नीच मानलेल्या समाजातील शिष्योत्तम लाभले.स्वामी रामानंदानी हिंदू धर्मात समानता आणली.

स्वामी रामानंद वैष्णवभक्त होते.त्यांनी दक्षिण भारतातील भक्तिची ध्वजा हाती घेऊन उत्तर भारतात आणली.[भक्ति द्राविड ऊपजी, लाये रामानंद।
परगट किया कबीरने सप्तदीप नवखंड॥
प्रा.कामत.कदमकृत श्री संत रोहिदास, पृष्ठ ४९.]त्यांच्या प्रभावशाली नेतृत्वामुळे संपूर्ण उत्तर भारतात वैष्णव भक्तिस जनआंदोलनाचेरूप दिले होते.वैष्णव संस्कृती मानवामानवात भेद ठेवीत नाही.त्यांनी रामानुजाच्या लक्ष्मीनारायणाच्या ठिकाणी सीतारामास आराध्य दैवत मानून श्री संप्रदायाची स्थापना केली.त्यांनी भक्तिचा दावाजा हिंदू-मुसलमान, ब्राह्मण-शूद्र, स्त्री-पुरूष या सर्वांस खुला केला.त्याकाळी हे पाऊल क्रांतीकारक होते.वैष्णव जनांचे उपास्य दैवत राम-कृष्ण यांचे व्यक्तित्व, शील, सौंदर्य व शौर्य अप्रतीम आहे.स्वामी रामानंदाचा राम धर्माचा प्रतीक आहे.जीव ब्रह्म आहे.धर्माचे चेतन आणि आनंदीरूप'राम' आहे.राम अव्यक्त ब्रह्माचा वाचक आहे.विशिष्ट-अद्वैत ब्रह्मामध्ये आविर्भाव आणि विरोभाव दोन्ही प्रकारच्या

शक्ती राहिल्याने ब्रह्म सगुण आहे व निर्गुणही.रामापासून नारायण, विष्णु, कृष्ण, दामोदर, माधव, हरि, मुरारी इत्यादी सर्व ईश्वरवाचक नावाचा बोध होत आहे.ब्रह्म, विष्णु, शंकर इत्यादी देवतासुद्धा या 'ब्रह्म' ची राम आणि कृष्णाच्या रूपात उपासना करतात.योगी लोकसुद्धा यांचे ध्यान लावून समाधिस्त होतात.

स्वामी रामानंदाच्या संप्रदायास 'श्री संप्रदाय' म्हणतात.ह्या संप्रदायाने अयोध्येमध्ये कँप लावून मुसलमान बनलेल्या हिंदुंना परत हिंदू धर्मात घेतले.त्यामुळे स्वामी रामानंदास महान समाज सुधारक मानले जाते.आठव्या शतकातील आद्य शंकराचार्यानंतर हिंदू धर्मात कोणी समाजसुधारक झाला असेल तर तो प्रथम स्वामी रामानंद होय.त्यांनी प्रभु रामचंद्राप्रमाणे दुसरा सेतु बांधून जगाचा उद्धार केला.[श्री रामानंद रघुनाथ ज्यों दुतियसेतु जगतरन कियो।]

**स्वामी रामानंदाचे व्यक्तित्व.**—स्वामी रामानंद हे शीलवान, दयासागर, धर्मरक्षक, विद्वान, उदार होते.ते तापत्रयनाश, वेदांचा गुत्यार्थ प्रकाशक, शरदचंद्रवत उज्ज्वल कीर्तीमान होते.त्यांचा दृष्टीकोन उदार, चारी वर्णात अभेददृष्टि, ह्रदयाच्या विशुद्धतेवर जोर, बाह्याचारावर कमीजोर होता.त्यांची भक्ती ही सर्व श्रेष्ठ साधना व रामांस अनन्य शरणागती होती.ते सूर्यासमान तेजस्वी अशा बारा शिष्यांच्या दशधा प्रेमभक्तिच्या अमृतधारेत रामभक्तिचा प्रचार करीत.

रामानंदाचा भक्तीविषयक दृष्टिकोन उदार होता.त्यांच्या मते भक्ती करण्याचा अधिकार सर्वांना आहे.जात, कुळ, वंश इत्यादीचे यामध्ये कसलेही बंधन नाही.स्वामी रामानंद त्याकाळी एक मोठे क्रांतिकारक समाज सुधारक, पथप्रदर्शक, आध्यात्मिक नेता होते.त्यांनी त्या युगातील निराशजनक परिस्थितीचे अध्ययन करून महान क्रांतिकारी पाऊल टाकले.स्वामी रामानंद हे हिंदी भाषेचे पहिले प्रचारक होय.गोस्वामी तुलसीदासाचे स्फूर्तिस्थान रामानंद होय.आपली जीवनयात्रा यशस्वी करून स्वामी रामानंद हे विक्रमसंवत १४६७ वैशाख शुक्ल तृतीयेस (सन १४१०) रामरूपी लीन झाले.

"वैष्णव मताब्ज भास्कर"प्रमाणे रामानुजचार्यांच्या शिष्यगणतीमध्ये स्वामी रामानंदाचे अकरावे स्थान आहे.रामानुजाचार्य — माधवाचार्य — देवाचार्य — पुरूषोत्तम — गंगाधर — रामेश्वर — द्वारानंद — श्रीयानंद — हरियानंद — राधवानंद — रामानंद.

स्वामी रामानंदाच्या दीर्घायुष्यात दिल्लीची सत्ता आततायी सुलतान जलालुद्दीन फिरोज, अल्लाउद्दीन खिलजी, कुतुबद्दीन मुबारिक तसेच सिकंदर लोदीच्या ताब्यात होती.कुराणी शरियतवर देशाचे राज्य चालत होते.भारतीयांवर अत्याचर करणे, भारतीय संस्कृती स्मारके, धर्मस्थानांचा विध्वंस करणे, जिजिया कर लावणे, भारतीयांना जबरदस्तीने मुसलमान बनविणे इत्यादी ह्या युगातील साधारण घटना होत.भारताची सामाजिक स्थितिसुद्धा निराशाजनक होती.धर्माच्या नावावर अनेक अनैतिक कामेकरीत होती.ढोंगी, फकीर, साधु मनाला वाटेल तसे लोकांना लुटून भ्रष्ट करीत होते.अशा दीनहीन समाजाला प्रभुस शरण जाण्याशिवाय इलाज नव्हता.देशातील अशी स्थिती पाहून स्वामी रामनंदाने अठराव्या वर्षी राधवानंदाचा आश्रम सोडून संपूर्ण भारताचे भ्रमण केले व बनारसमध्ये पंचगंगा घाटावर आपल्या आश्रमाची स्थापना केली.त्यांनी घोषणा केली की,—"हरि को भजे सो हरि का होय, जातपात पूछे नही कोय"स्वामी रामानंदाने भारतवासियात रामभक्तिचा प्रचार करण्यासाठी, मंदिरांचे रक्षण करण्यासाठी अयोध्या, कोटा, जयपूर इत्यादी ठिकाणी आखाडे स्थापन केले.या आखाड्यातील साधूंचा बराचसा वेळ गुप्तरूपाने सैनिकी शिक्षणात जात होता.या

सैनिक शिक्षणाचे ५ प्रकार याप्रमाणे होते. (१) निर्वाण अनी (२) निरालम्बी अनी (३) दिगंबर अनी (४) निर्मोही अनी (५) महानिर्माणी अनी.

कुंभपर्वासारख्या महापर्वाच्यावेळी सेना सुरक्षेच्या दृष्टिने सैनिकाप्रमाणे गंगास्नानास जात असत.ह्या आखाड्यांनी भारतीयांची अपूर्व सेवा केली.ते वैष्णव भक्त होते आणि वैष्णव भक्तीसंप्रदायाचे प्रभावशाली नेता होते.स्वामी रामानंदाच्या उदार, सरळ, प्रगतीशील व्यक्तित्वाने संपूर्ण उत्तर भारतात वैष्णव भक्तिस जन आंदोलनाचे रूप दिले होते.काळाच्या आवश्यकतेनुसार जातीभेद नाहीसा करून सर्वसाधारण लोकात वैष्णव भक्तिचा प्रसार, प्रचार झाला.

स्वामी रामानंदाची रचना "वैष्णव मताब्ज भास्कर"अन्वये स्वयं राम विष्णुचा अवतार आहे.दशरथाचा पुत्र आहे.सीता रामाची पत्नी आहे.राम अद्‌भुत सुंदर व स्वभावाने दयाळू आहे.तो लोकोत्तर सामर्थवान व कृपासागर आहे.राम भक्तांच्या हृदयात नेहमी निवास करणारा आहे.तसेच सीतासहित सुशोभित आहे.राम दशरथपुत्र असूनही साक्षात सनातन ब्रह्म आहे.'रा रमाय नमः' तसेच "श्री रामाय नमः" षडक्षरी मूलमंत्र आहे.यानंतर "श्री रामचंद्र चरणौ शरण। प्रपदये"चे आव्हान होते.या षडक्षरी मंत्राचा रामानंदी संप्रदायात मोठे महत्व आहे.वेदमंत्रात जेवढे महत्व "ओ ऽम"चे आहे.त्याच्याहून जास्त महत्व 'रा' ला दिले गेले आहे.याचे कारण कदाचित या संप्रदायावर तांत्रिक विद्येचा प्रभाव असावा.तंत्रविद्येत 'र रंकार' हीन मंत्र जगाचा निषेध आहे.कारण तंत्रशास्त्रात असे लिहिले आहे की, भगवान शंकराने सर्व तांत्रिक वीज मंत्रांना शापित केले होते. म्हणून 'र' युक्त मंत्राचा जपसिद्धीप्रद आहे.अर्थात मंत्राबरोबर 'र' चा योग परमकल्याणकारक आहे आणि यापासून शापरहित फळाची प्राप्ती होते. "ल लक्ष्मणाय नमः"आणि "श्री सीतायै नमः"हे तिन्ही मिळून ब्रह्म-रामाचे पूर्ण रूप बनते.राम ब्रह्म आहे.सीता माया आहे आणि लक्ष्मणाचा 'लं' पृथिव्यात्मक गंधचा संकेत करीत आहे.जो स्थिरता, वीरता तसेच यशाचा द्योतक आहे.स्वामी रामानंदाच्या अशा समाधि स्थितिचा त्या युगात मोठा प्रभाव होता.समाधिस्त योग साधनेच्या सामर्थ्याने यांनी शास्त्रार्थात मुल्लामौलवी, सिद्धयोग्यांचा तसेच अद्वैत वाद्यांचा पराभव केला होता.

स्वामी रामानंदाने भक्ति साधनेस "अगम पंथ"म्हटले आहे.हा तन-मनाचा मार्ग आहे.त्यामुळे परम पदास प्राप्त करता येते.ईश्वर साधना तन-मन या दोन्हीमुळे संभव होऊ शकते.रामानंदाने'ज्ञानतिलक' मध्ये कबीर आणि रोहिदासांना उपदेश करताना सांगितले आहे की, योगयुक्तिस रज्जु बनवा आणि तळीविहिरी आसनांच्या फुल बागेला शिंपडा.प्राणायामामुळे उर्ध्वगामी रेतसला पवन ब्रह्मरंध्रमध्ये शोधून घेतो.असे होण्यामुळे नाद बिंदुच्या ग्रथित मन बांधले जाते.आणि त्याची चंचलता नाहीशी होते.भुंगा गुहाशुन्य मंडलमध्यचे वास करतो.पंचेंद्रिये ताब्यात ठेवता येतात.इडा, पिंगळा सुषुम्नामध्ये चंद्रसूर्यास एका घरात मिळाल्याने मन शांत होते आणि साधक संसारीक कल्पनेवर विजयप्राप्त करुन घेतो.शुन्यमंडलामध्ये शब्द प्रकट होतात, गुप्त बाजा, अनाहत नाद वाजू लागलो, कुणकुणी[कुणकुणी रूणरूणी झुणझुणी नाद नादं, सुषुम्ना काछ के साज साज।]रूणरूणी[रूम रूम र रंकार उच्चरंत वानी, श्रवण सुनता रहे समदृष्टि मुष्ठि मेला।
झिलझिला ज्योति रूणंकार झलकता रहे, नाद विंद मिल गया रंग रेला।
सुनि के नैहरो सूंनि सीझत रहै, आप सूं आपु मिली आपु जाग्या।
सरीर सो सरीर मिली, सरीर निरिषता रहे जीव सों जीव मिली ब्रह्म जाग्या।
-ज्ञानतिलक, संत गुरु रविदास–वाणी, पृ.५०.], झुणझुणी ध्वनी करीत शब्द रोमारोमात व्याप्त होतो.

अनुक्रमणिका

“या अनुभवापासून अमृतपानामुळे साधक अमर होतो.काया गडावर विजय प्राप्त होतो.तर काया अधिनगरात महाशक्तीचा ‘र’ निवास बनतो.निर्मळ मन निरंजन प्रभुच्या रूपात विराजमान होऊन पवनरूपी मुख्य मंत्र्याच्या सहयोगाने न्यायनिष्ठ मन पंचेंद्रियरूपी प्रजेवर शासन करते.”

**संत अनंतानंद :**

स्वामी रामानंदाच्या शिष्यामध्ये अनंतानंद हे वयाने सर्वात ज्येष्ठ शिष्य होते.म्हणून सर्व शिष्य त्यांना मान देत.तसेच ते सर्वप्रथम रामानंदाचे शिष्य झाले होते.म्हणून त्यांची रामनंदाच्या प्रमुख शिष्यात गणना केली आहे.अनंतानंदाचा ‘हरिभक्ति सिंधु-बेला’ नांवाचा ग्रंथ सुपसिद्ध आहे.अनंतानंद हे चारित्र्यवान होते.हल्ह, पयहारी, गयेश, श्रीरंग, नरहरिदास इत्यादि साधुपुरूषांनी अनंतानंदाच्या प्रभावी नेतृत्वाने प्रेरित होऊन जनजाग्रतीचे व्रत घेतले होते.भक्तिच्या माधुर्याचा आस्वाद चाखतांना अनंतानंद देहभान विसरत असत.

**संत कबीर :**

कबीरचा जन्म एका गरीब कोष्टयाच्या परिवारात सन १३९८ मध्ये काशी जवळ मांडूर येथे लहरताला तलावाजवळ झाला.त्यांच्या वडिलांचे नाव निरू व आईचे नाव नीमा होते.लहानपणीच त्यांना भक्ती मार्गाची आवड निर्माण झाली.परंतु त्यांना शालेय शिक्षण मिळाले नाही.ते स्वतः निरक्षर होते.पण त्यांनी साधू-संतांच्या उपदेशाद्वारे खूप ज्ञान प्राप्त करून घेतले.त्यांना काव्य रचनेचा छंद लागला.ते विचारी व तीव्र बुद्धिचे होते.कोष्ट्याघरी वाढणारा कबीर उदात्त विचाराने भारून गेला होता.कबीर वडिलांच्या कामात मदत करीत असे.हळूहळू तो वीणकामात हुषार झाला.शेले विणता विणता तो रामभक्तिवर दोहे रचू लागला.कबीर आपला वेळ आत्मचिंतन व अध्यात्मामध्ये घालवू लागले.कबीरावर रामानंदांचा प्रभाव पडला व त्यांनी आपण होऊन रामानंदांचे शिष्यत्व प्राप्त करून घेतले.तरीपण कबीर निर्गुण मताचे होते.त्यांचा राम अवतारी पुरूष नव्हता.तर तो निर्गुण निराकार होता.त्यांनी म्हटले आहे की,[दशरथ सुत तिहु लोक वखाना।
राम नाम का परम न जाना॥]दशरथ पुत्र रामाचा महिमा तिन्ही लोकात गाईला गेला पण राम नामाचे खरे मर्म कोणीच जाणले नाही.त्यांच्या आत्मचिंतनामुळे त्यांच्या वडिलास चिंता वाटू लागली.कवी, देवमाणूस व समाज सुधारक म्हणून कबीर लोकप्रिय झाला.त्यानी मोठ्या धाडसाने धार्मिक हटवाद नष्ट करण्याचा प्रयत्न केला.तसेच संकुचितपणा व द्वेष घालविण्याचा प्रयत्न केला.

कबीर स्वभावाने दयाळू हृदयाचे होते.त्यांना दुसऱ्याचे दुःख पाहवत नसे.बनारसमध्ये राहत असताना शरियत व कर्मकांडाचा ढोंगीपणा त्यांना आवडेनासा झाला.त्यामुळे सनातनी हिंदू व मुसलमान कबीरावर टीका करू लागले.पण कबीराने तर्कशुद्ध युक्तीवाद करून सगळ्यांना नामोहरण केले.कबीर तपस्वीहोते.तरी त्यांनी विद्वान, शास्त्रज्ञ व धर्मगुरु अशा रामानंदांचा गुरु म्हणून आदर केला.परंतु त्यांचा पूजाविधी त्यास मान्य नव्हता.कबीर मूर्तिपूजक नव्हते.उलट त्यांनी मूर्तिपुजेस विरोध केला.[पत्थर जूजे हरि मिले, तो मैं पूजौं पहाड़।
इनसे चाकी भली, पीस खाय संसार॥]तर स्वामी रामानंद हे वर्णव्यवस्था व पूजापाठाचे समर्थक होते.परंतु कबीरामुळे ते शब्दमार्गी बनले.इतर संताप्रमाणे कबीराने गृहस्थी जीवनाची शिफारस केली आहे.कबीर आयुष्यभर प्रामाणीकपणे व परिश्रमपूर्वक वीणकाम करून आपल्या परिवाराचे उदरनिर्वाह करीत.कबीर संसारी गृहस्थ होते.त्यांनी ईश्वराची अद्वैतवादी कल्पना उपनिषदातून तर एकेश्वरवादाची कल्पना मुसलमानाकडून घेतली.त्यांचा ईश्वर हाच अल्ला होता.त्यांचा परमेश्वर राम हाच अल्ला होता.हिंदू व मुसलमान यांना एकत्र

अनुक्रमणिका

आणण्याचे त्यांनी थोर कार्य केले.कबीरांच्या शिष्यामध्ये राजे, नवाब, शेठ व सावकार होते.परंतु कबीराने त्यांच्याकडून कधी भेट स्वीकारली नाही.कबीर म्हणत, "जे धनाची अपेक्षा करतात, ते संत असू शकत नाहीत,"कबीराचे मोठे धन म्हणजे संतोष होय.कबीर रामानंदाच्या युगावतरी कार्याचा सर्वश्रेष्ठ प्रचारक होय.['काशी में हम प्रगट भए, है रामानंद चेताए'.]

सर्व व्यापी परमात्म्याचा साक्षात्कार आत्म्याच्या साक्षात्कारातच होतो अशी त्यांची दृढ श्रद्धा आहे.आत्मा हाच ईश्वराचे निवासस्थान असे कबीर मानत.त्यांनी ईश्वरोपासनेत हिंदू ज्ञानमार्गाच्या साधनेचे अत्यंत सुंदर विवेचन केलेले आहे.आत्मानुभव हेच सामर्थ्यवान लक्षण आहे.आत्मज्ञानी पुरुषालाच अतिंद्रीय दृष्टिमुळे त्या सुखाचा अनुभव घेता येतो.जीवाशिवाचे एकत्व हे अज्ञानामुळे सामान्य माणूस जाणू शकत नाही.त्याकरिता ज्ञानचक्षू उघडावे लागतात.

कबीराचे व्यक्तित्व, पवित्र जीवन आणि प्रभावशाली वक्तृत्वामुळे गरीब-श्रीमंत, अशिक्षित-सुशिक्षित इत्यादी सर्व लोक त्यांचेकडे येत.कबीर निर्भीड आणि स्पष्टवादी होते.कट्टरता आणि रूढीवाद यांचेशी कबीराने कधीच समझोता केला नाही.कबीर रूपाने सुंदर होते.कबीराने उत्तरप्रदेश, बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश, राजस्थान, पंजाब आणि महाराष्ट्रात भ्रमण केले.एवढेच नव्हे तर बलाख, बुखारा, बगदाद तसेच मध्यपूर्वेतील शहरांकडे ही भ्रमण केले असावे.

कबीराने आपल्या रचनेत ब्रज, अवधी, भोजपुरी, मेथिली, राजस्थानी, बुंदेलखंडी, पंजाबी, मराठी आणि गुजराती शब्दांचा उल्लेख केलेला आहे.एवढेच नव्हे तर संस्कृत, फारशी व अरबी शब्दांचाही उपयोग केलेला आहे.कबीराच्या एका शिष्याने त्यांचे सर्व काव्य लिहून ते एकत्र केले.त्या ग्रंथाचे नाव'बीजक' असे आहे.ह्या ग्रंथात तीन भाग आहेत, रेमेनी, स्मरनी व सबद, कबीरांच्या काव्याने हिंदी साहित्य पुष्ट आणि सृष्ट केले आहे.म्हणून त्यांच्या काव्याला हिंदी साहित्यात अनन्य साधारण स्थान प्राप्त झाले.त्यांची भाषा अति सोपी, अर्थवाही आणि हृदयाला भिडणारी आहे. 'गुरु ग्रंथसाहेब' ह्या शीखांच्या धर्मग्रंथामध्ये कबीराची वचने मोठ्या प्रमाणावर आढळतात.गुजराथमध्ये कबीरांची शंभरहून अधिक स्मृतिचिन्हे आढळतात.

कबीर हे कोणा व्यक्तिचा, जातिचा किंवा धर्माचा द्वेष करीत नव्हते.तसेच त्यांनी इतर संताप्रमाणे जातीभेदाला महत्व दिले नाही.कारण जात ही मनुष्याने बनविली आहे.कबीर म्हणत, आत्म्याची कोणतीच जात नाही.सर्व जीव त्या परम ज्योतीपासून उत्पन्न झाले आहेत.म्हणून कोणी उच्च नाही.कोणी नीच नाही.किंवा कोणी शूद्र नाही.['एक जोति से जउ सभ उपजैं, तउ ऊंच नीच कसमान।
रविदास दर्शन-पृष्ठ ५२.]प्रत्येक मनुष्य पांच तत्वांपासून बनलेला आहे.प्रत्येकाच्या शरीरात मांस, रक्त, हाडे इत्यादी आहे.परंतु हे विसरून प्रत्येक मनुष्य आपण आपल्याला वेगवेगळ्या जातीमध्ये विभागला आहे.एकाच मातीच्या बनलेल्या पुतळ्यात कोणी स्वतःला एका जातीचा तर कोणीदुसऱ्या जातीचा मानतो.['बेगर बेगर नाम धराये एक माटी के भांडे' ।]हिंदू-मुसलमान समाजातील दोषांवर संत कबीरांनी कठोर टीका केली आहे.कबीरवाणी म्हणजे सत्याचा सुंदर आविष्कार आहे.कबीराने नेहमी सत्याचा प्रचार केला.ते अन्यायाविरुद्ध आयुष्यभर झगडले.कोणाचीही भीड न ठेवता कबीर आपल्या फटकळ शब्दांनी राजकीय विषमता, अज्ञान व रूढीवादी यांचेवर तुटून पडत.महाराष्ट्राने तर कबीराला आपलाच संत मानला आहे.कबीर रोहिदासाचे मित्र होते.रोहिदासांनी संत कबीराच्या अलौकिक कर्तृत्वाचा गौरव केला आहे.तसेचकबीरांनाही रोहिदासाविषयी आपुलकी होती.महात्मा कबीरांच्या ठायी एवढी नम्रता होती की, कबीर रोहिदासांचे गुणवर्णन करताना म्हणाले.[संतन मे रविदास संत है, सुपच ऋषी सो मानिया।
हिंदू तुर्क दुई दीन वने है, कुछ नही पहिचानिया॥

अनुक्रमणिका

श्री.संत रोहिदास, पृष्ठ १३२.]"सर्व संतामध्ये संत रोहिदासांचे फार मोठे स्थान आहे.रोहिदासास स्वपच (चांडाळ) समाजात जन्मलेला ऋषीच मानायला हवे.हिंदू व मुसलमान हे एवढे करंटे आहेत की, कोणीही ह्या महात्म्याचा मोठेपणा समजून घेतला नाही."

कबीरांनी कर्मभ्रष्ट मानवाला निर्गुण स्वरूपात भक्तियोगाचे संवर्धन करून त्याच्याकडे आकर्षित करण्याचे महान कार्य केले व जनतेला उपासनेच्या योग्य मार्गाकडे नेले.त्याकाळचे पंडित व सुसंस्कृत लोक हे आपल्याच अध्ययनात दंग होते व सामान्य जनतेला मार्गदर्शन करण्याकडे त्यांचे लक्षच गेले नाही, म्हणून कबीर वगैरे संतांचे लक्ष अज्ञान, सामान्य लोकांकडे अधिक गेले.कबीराच्या परंपरेतील संतगण खालच्या जातीचे होते.

संत कबीर विचारतात की, [दिल मे कपट नमाज पढे का क्या हज कावे जाया?]"अरे तुझ्या मनात कपट भरलेले असतांना, प्रार्थना मंदिरात तुझ्या जाण्याचा उपयोग काय?तसेच तू हज यात्रा करून तरी काय मिळविणार?"संत कबीर आणि रोहिदासांचे विचार आणि भाषा यामध्ये बरेच साम्य आहे.

**संत सुखानंद :**

स्वतः 'सुखसागर' नाव धारण करून ते भक्तिरसाने ओथंबलेली भजने गौरी रागात गात असत.सुखानंद आपल्या ओघवत्या वाणीने कथांचे निरूपण करीत आणि आपल्या रसाळ भाषेत लोकांना सांगत व लोक मोहीत होत.हा कवी साश्रुनयनांनी भक्तिचा पावन राग आळवीत असे.रात्रंदिवस हरिभजनात रंगलेला हा कवी कमलपुष्पास योग्य अशा सुंदर तलावासमान भासत असे.ईश्वरकृपेचे निरूपण करताना त्यांचे तेजस्वी कपाळ प्रकाशमान होई.ते भक्तिभावाने दान करण्यात व प्राणीमात्रांचे कल्याण करण्यात दंग असत.प्रापंचिक मायेत जखडलेल्या जीवसाठी हा संत तर जणू काय पारसमणी होता.[निसिदिन प्रेम प्रवाह भूधर ज्यों निर्झर।
हरिगुण कथा अगाध भाल राजत लीला भर॥
संत-कंज पोषण विमल, अति पियुष सरसी सरस।
भक्तिदान मै हरन भुज, सुखानंद पारस परस॥
'भक्तमाल' पृष्ठ ५२७.]

**संत सुरसुरानंद आणि सुरसुरी :**

संत संरसुरानंद सपत्निक स्वामी रामानंदाच्या शिष्य परिवारात सामील झाले ही घटनाच अद्‌भुत वाटते.पतिपत्नी दोघेही एकाच गुरुचे शिष्य बनून समाज जागृती करू लागले.ही अभिमानास्पद गोष्ट आहे.अध्यात्मिकाच्या ओढीने व समाजजागृती करण्याच्या प्रेरणेने हे दांपत्य आपली सुखाची कल्पना बदलून टाकते.परंतु अशा संन्यासी संसारातही एकेदिवशी सैतानी प्रसंग येतो.भक्त-मालचा लेखक वर्णन करतो की, अत्यंत उदार मनाने घरदार, शेतीवाडी इत्यादी आपल्या धनदौलतीचा त्याग करून ही पतिपत्नी वनात गेली.एकेदिवशी संत सुरसुरानंदाची विरक्ती व त्यांच्या पत्निचे सौंदर्य पाहून यवनाच्या मनात पाप आले.['अति
उदार दम्पती त्यागि गृह वन को गवने।
अचरज भयो तहं एक संत सुन जिन हो विमने॥
बैठे हुए एकांक आय असुरनि दुख दीयो।
सुमिरो सारंगपानि रुप नरहरि की कीयौ॥
सुरसुरानंद की घरनी कौ सत राख्यो नरसिंह जह्यों।
महासती सत उपमा त्यों सत्त सुरसुरी को रह्यों॥

अनुक्रमणिका

—नामाजी (नाभादास-भक्तमाल).]एवढ्यात परमेश्वराने नरसिंहाच्या रूपात प्रगट होऊन यवनास ठार केले व महासती सुसुरीवरील बेअब्रु होण्याचा प्रसंग टळला.

ह्या दांपत्याने गुरु रामानंदाच्या संदेशाचा प्रसार केला.त्यामुळे त्यांची कीर्ति वाढली.सुरसुरानंदाच्या शिष्य परंपरेत संत धरणीदात्याचे नांव सुप्रसिद्ध आहे.

**संत नरहर्यानंद :**

हे संत वृत्तीने फार उदार म्हणून प्रसिद्ध आहेत.त्यांचे साधुसंतांवरील प्रेम अपूर्व होते.साधुसंतांची सेवा करण्यात नरहर्यानंदाना धन्यता वाटे.साधुसंतांचा सहवास लाभावा म्हणून ते प्रयत्न करीत.साधुसंतांची सेवा हीच ईश्वर सेवा असे त्यांना वाटे.भक्तमालचे लेखक नाभादास यांनी त्यांच्या सुस्वभावाचे सुंदर वर्णन करून त्यांना स्थानाधिपती, परमशूर, धीर, भक्तपालक अशा गौरव नामांनी संबोधले आहे.

**संत पीपा :**

हा संत आरंभी गांगरौन संस्थानचा राजा होता.आचार्य रामानंद व भक्त कबीरदासाच्या शिकवणुकीचा त्यांच्यावर एवढा परिणाम झाला की, देश आणि समाजसेवा यासाठी राजसिंहासन व हत्ती, घोडे इत्यादी राजवैभवाचा त्याग केला.[राज पाठ रमणी पहू तेरी, होते घोडा हाथी।
परम हंस जब दिया पयाणा, विघुडी गया सब साथी॥
—पीपावाणी]व त्यांनी स्वामी रामानंदाचे शिष्यत्व स्वीकारले व संत कबीराचा गुरूबंधु होऊन तो भक्तिमार्गावर आला.राजैश्वर्य तुच्छ वाटून संन्यासी जीवन जगण्यात आणि संत सेवा करण्यात त्यास आनंद वाटू लागला.संत चरित्र वर्णनात नाभादास व प्रियादासांनी संत पीपाचा मोठा गुणगौरव केलेला आहे.

द्वारकावती नगरी संत पीपाना खूप आवडे.म्हणून ते तेथेच राहात होते.ते याच नगरीत साधुसंताना पाहुणाचार करीत.एकदा स्वामी रामानंद हे कबीर, रोहिदास इत्यादी आपल्या चाळीस शिष्यांसह पीपाच्या निमंत्रणावरुन आले.पीपाने आपल्या गुरुंचा व गुरुबंधुचा मोठा सत्कार केला.चार दिवस मोठ्या आनंदात गेले.जेव्हा गुरु आणि गुरुबंधु तेथून निघाले तेव्हा पीपा पत्नी सीतादेवीसह सर्वांबरोबर निघाले.रोहिदास व पीपा यांचे मित्रत्व व गुरुबंधुप्रेम फार मोठे होते.

सिंध आणि अहू ह्या नद्यांच्या संगमावर संत पीपाजीचे स्मृतिस्थान दाखविले जाते.तेथे भाविकांची नेहमी गर्दी होते.पीपांच्या शिष्यांनी द्वारकापुरीचा मठ सुप्रसिद्ध केला आहे.तेथे आजतागायत आल्यागेल्यांचे स्वागत केले जाते.संत रोहिदास व राजा पीपा यांची एक गोष्ट सुप्रसिद्ध आहे.ती अशी—

संत रोहितदास फार मोठे ज्ञानी व संत महात्मे आहेत असा त्यांचा नावलौकिक सर्वत्र झाला.ही बातमी गांगरौन संस्थानचा राजा पीपा यांच्या कानी गेली.तेव्हा त्यांना संत रोहितदासांचे दर्शन घेण्याची इच्छा झाली.परंतु संत रोहिदास हे चांभार जातीचे.माझ्यासारख्या क्षत्रिय राजाने रोहिदासांच्या झोपडीत जाऊन दर्शन घेतल्याचे लोकांना कळले तर लोक आपणास नावे ठेवतील.म्हणून चिंताग्रस्त होऊन पीपा राजा विचार करू लागला.

अनुक्रमणिका

एकेदिवशी कुंभमेळा भरला होता.त्यादिवशी गंगास्नान केल्यास पुण्यप्राप्ती होणार म्हणून सगळे लोक गंगाकिनारी गेले होते.ही संधी साधून राजा पीपा गुपचूपपणे संत रोहिदासांच्या झोपडीवर गेले.त्यावेळी संत रोहिदास चामडे भिजविण्याच्या कुंडातून तांब्याने पाणी काढीत होते.त्यावेळी राजा म्हणाला, "रोहिदास महाराज, आपण मला दर्शन द्यावे."तेव्हा रोहिदासांनी पीपाराजास दर्शन दिले व तांब्यातील पाणी देत म्हणाले, "राजा, हे चरणामृत पी."तेव्हा राजाने नाईलाजास्तव उजवा हात पुढे करून चरणामृत चुळीत घेतले व रोहिदासांची नजर चुकवून सदऱ्याच्या बाहितून जमिनीवर सोडून दिले.राजा राजवाड्यात गेल्यावर धोब्यास बोलावून घेतले व सदराच्या बाहीचा डाग पूर्णपणे काढून सदरा स्वच्छ धुवून आणण्याची राजाज्ञा झाली.धोबी घरी गेल्यावर त्याने आपल्या मुलीस सदरा दिला.'सदऱ्याच्या बाहीचा हा डाग संपूर्ण निघेपर्यंत तोंडाने चोख' असे सांगून धोबी कपडे धुण्याचा मसाला तयार करू लागला.मुलगी अज्ञान होती.तिने सदऱ्याचा डाग चोखून थुंकण्याऐवजी गिळला.त्यामुळे तिला अंतर्ज्ञान प्राप्त झाले.ती उच्च दर्जाच्या अध्यात्मिक गोष्टी बोलू लागली.ही बातमी शहरात सर्वत्र पसरली.ही गोष्ट राजा पीपाच्याही कानी आली.तेव्हा एका अंधाऱ्या रात्री पीपा गुपचूपपणे धोब्याच्या घरी गेला.राजाला पाहाताच मुलगी हात जोडून उभी राहिली.तेव्हा राजा म्हणाला,"मुली, मी तुझ्याकडे राजा म्हणून आलो नाही.तर एक भिकारी म्हणून आलो आहे."

तेव्हा मुलगी म्हणाली, "तुम्ही राजा म्हणून मी उभी राहिली नाही, तर आपल्या कृपेने मला अंतर्ज्ञान प्राप्त झाले, म्हणून मी उभी राहिले."हे ऐकून राजाला फार दुःख झाले.राजा स्वःतास म्हणाला, "ज्याच्यामुळे मी परमार्थाला मुकलो, थूः माझ्या क्षत्रियपणाला!थूः माझ्या राजेपदाला!!थूः माझ्या लोक लज्जेला!!!थूः माझ्या जातीपातीच्या भेदभावाला!!!!"

राजा पीपा तेथून निघाला व थेट संत रोहिदासाच्या झोपडीवर गेला व हात जोडून विनंती केली की, "रोहिदास महाराज, आपले चरणामृत मला पुन्हा पिण्यास द्या."तेव्हा संत रोहिदास म्हणाले."धोब्याच्या मुलीने तुझ्या सदऱ्याचा डाग चोखून गिळला.तेव्हा ती महात्मा बनली.आता मी तुला चरणामृत न देता रामनामाची दीक्षा देतो.तू तपश्चर्या करून नामदौलतिस प्राप्त करून घे."

ह्या गोष्टीवरून स्पष्ट होते की, जातीपातिचा व धनदौलतिचा अभिमान नामदौलत व प्रभुभक्ती प्राप्त करण्यास बाधक असतो.

**संत धन्नाः**

राजस्थानातील टाक जिल्ह्यामध्ये धुवात खेड्यात धन्ना जाट भगवत भक्त होऊन गेला.परंतु धुवात ऐवजी षीरापूर गावाचा[सो इनमे परगट परमेसूर, षीरासूर में धना धनेसूर।
डॉ.बी.पी.शर्मा, भक्त रत्नावली, पृष्ठ ३२.]एका काव्यात उल्लेख आहे.संत नामदेव, कबीर, रोहिदास व सेना न्हावी यांची भक्ती प्रचूर भजन-कीर्तने ऐकून धन्ना भक्ती मार्गास लागला.तेव्हा संत रोहिदासांची भक्ती पाहून धन्ना जाट म्हणतात,[रविदास ढुवंता ढोरनी, तितिनी तिआगी माईआ।
परगटु होआ साध संगी, हरिदरसन पाईआ॥
इहि विधि सुनि कै जाटरौ, उठि भगति लागा।
मिले प्रतिसि गुसाईआ, धन्ना बड भागा॥

अनुक्रमणिका

–ग्रंथ साहेब, पद क्र.२ पृ.४८७, संत रैदास ६.]"गुराढोरांची कातडी वाहणाऱ्या संत रोहिदासाने मोहमायेचा त्याग करून हरिदर्शन घेतले. हे ऐकून मी भक्ती करू लागलो."सद्‌गुरूचा कृपाप्रसाद मिळाल्यामुळे धन्ना मोठा भाग्यवान आहे.

संत धन्नाने संत कबीर, रोहिदास व सेना नाव्ही यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे.त्यावरून रोहिदास काळातही संत धन्नाची कीर्ती पसरून साधूसंताच्या लेखी त्यास प्रतिष्ठा लाभली.धन्नाची चार पदे शीखांच्या 'गुरु ग्रंथसाहेब' ग्रंथामध्ये आहेत.धन्नाचा गौरव गाताना नाभादास म्हणतात,[घर आए हरिदास तिनहि गोधूम खवाये।
तात मात डरखेत थोय लांगूल चलाये॥
आसपास कृषिकार खेत की करत बंडाई।
भक्त भजे की रीति प्रगट परमीति जुपाई॥
अचरज मानत जगतमें कहुँ निव ज्यौं कहु वै पयों।
धन्य धना के भजन को बिनहिं बीज अंकुर भयो॥
भक्तमाल, पृष्ट ५२१.]"धन्नाने घरी आलेल्या हरिदासांना शेतात पेरण्यासाठी ठेवलेले गव्हाचे दाणे (बी) खाऊ घातले.आप्तेष्टांच्या समजुतीसाठी पेरण्यास गव्हाचे बी नसतानाही तसेच शेतावर बैल फिरविले.ते पाहून आजूबाजूचे शेतकरी कुत्सितपणे हंसू लागले.परंतु भक्तिचा महिमा असा की, बीजाशिवाय अंकुर फुटले व धन्नाचे शेत पिकाने डोलू लागले.हा भक्तिचा महिमा पाहून सर्वजण आश्चर्यचकित झाले.

स्वामी राघवदास रचित भक्तमाल मध्ये धन्नासंबंधी खालील चार घटनांचे वर्णन मिळते :-

(१)धन्ना जाटाचे शेतात बी पेरल्याशिवाय भरपूर पीक आले.
(२)धन्ना उपाशी राहून भगवानाला भोजन करण्यास भाग पाडले.
(३)भगवान स्वतः धन्ना जाटाच्या गाई चारीत होता.
(४) धन्नाने काशीस जाऊन स्वामी रामानंदाचे शिष्यत्व स्वीकारले.

**संत सेना नाव्ही :**

संत सेना नाव्ही हे रामानंदांच्या मुख्य शिष्यांपैकी एक होता.[उत्तम दियरा निरमन बाती। तुम्ही निरंजनं कमलापती॥
राम भगति रामानंदु जानै। पूरन परमानंद बरवानै॥
मदन मूरति मय तमी गुविंदे। सैन भनय भजु परमानंदे॥
–कामतकृत श्रीसंत रोहिदास, पृष्ठ ५४.] संत सेना नाव्ही यांचे नावावर 'कबीर-रोहिदास संवाद' हे एकच हिंदी काव्य आहे.संत सेना मुळचा महाराष्ट्रात राहणारा.त्यांनी मराठी अभंगकेले आहेत.संत श्रेष्टम्हणुन नांवलौकिक मिळाल्यावर ते उत्तर भारतात गेले व रामानंदाच्या संप्रदायात सामील झाले.त्यांचे निवासस्थान मराठी हिंदी प्रदेशाच्या सीमेवरील बांधवगड येथे होते.संत सेना नाव्ह्याचे जीवन चरित्र संत रोहिदासाप्रमाणे सर्वांना हवे हवेसे वाटत आहे.संत रोहिदासाने उत्तरेत राहून दक्षिणेवर (विशेषतः महाराष्ट्रावर) मोहिनी घातली.तर सेना नाव्ही यांनी दक्षिणेतून उत्तरेत जाऊन तेथील समाज मनावर मोहिनी घातली.संत सेनास संत रोहिदास व संत कबीराबद्दल फार आदर वाटत होता.संत सेना या दोघां संताबद्दल म्हणतात की,[वेदहि झुटा, शास्त्रहि झुटा भक्त कहाँ से पछानी।
ज्या ज्या ब्रह्मा तू हा झूटा, झुटी साके न मानी॥
गरूड चढे जब विष्णू आया, साच भक्त मेरे दोन्ही।
धन्य कबीर धन्य रोहिदासा गावै सेना न्हावी॥

अनुक्रमणिका

—सत्यदेव शिंदे -श्री संत रोहिदास, पृष्ठ ८३.]"संत रोहिदास व कबीर ह्या दोघांनी केलेला अध्यात्मिक-ब्रह्मज्ञानावरील वादविवाद मी ऐकला.या वादात कबीर रोहिदासाकडून हरले.संत रोहिदास सगुण ब्रह्माचे वर्णन करतात तर संत कबीर निर्गुण ब्रह्माचे वर्णन करतात.विष्णु गरुडावर बसून येतात व दोघांनाही दर्शन देतात."हा कबीर-रोहिदास संवाद 'शेणा न्हाऊ' असा अस्सल मराठी नावाने सुप्रसिद्ध आहे.[श्री समर्थ वाग्देवता मंदिर धुळे, बाडांक १० शेणान्हाऊ कृत 'रोहिदास-कबीर स्तवन' आणि बाडांक १४५० सेना नाव्हीकृत 'संवाद'.]

ब्रह्मज्ञान व शास्त्रार्थावर चर्चा करून संत रोहिदासांनी बऱ्याच पंडितांना हरविले.परंतु शंकराचार्यांकडून ते वादविवादात हरले.चित्तोड़ची राणी झालीने संत रोहिदासास गुरू केले.हे तेथील ब्राह्मणांस आवडले नाही.तेव्हा त्यांनी संत रोहिदासांचे दारात धरणे धरले.तेव्हा त्या ब्राह्मणांस समजाविण्यासाठी सेना नाव्ही बांधवगडाहून आले होते.संत सेना मराठी कवी असून, त्यांचे १६५ मराठी अभंग आहेत.

**संत भावानंद व संत पद्मावती :**

संत भावानंद ऊर्फ भवानंद आणि संत पद्मावती ह्या दोघां संताबद्दल अधिक माहिती मिळत नाही.नाभादासाच्या भक्तमालमध्ये तसेच रामानंद संप्रदायाच्या ग्रंथामध्ये ह्या दोघांच्या नांवाचा उल्लेख आहे.परंतु अधिक माहिती उपलब्ध नाही.गालवानंद नावाचा एक रामानंद शिष्य सांगितला जातो.परंतु त्यांचीही अधिक माहिती मिळत नाही.

**गुरु नानक :**

शीख धर्मगुरु नानक हे सन १४४५ मध्ये संत रोहिदासांना भेटले, कारण त्यांची कीर्ती बरीच दूरवर पसरली होती.पंजाब तर भारुन गेला होता.गुरु नानकांनी आपल्या पदामध्ये रोहिदासांचा उल्लेख आदरपूर्वक केलेला आहे.संत रोहिदासांच्या ४० साक्या शीखांच्या 'श्री आदि ग्रंथ' मध्ये समाविष्ट केलेल्या आहेत.गुरू नानक हे त्यांच्या कवनासोबत संत रोहिदास, नामदेव, कबीर, त्रिलोचन, धन्ना, बेनी यांचीही भक्तिगीते गात असत.

शीख संप्रदायाचे संस्थापक गुरू नानक यांचा जन्म लाहोर जिल्ह्यात तलवंडी गावी दिनांक १५ एप्रिल १४६९ रोजी झोपडीत झाला.बालपणापासून नानकाचा कल धर्माकडे होता.त्यांचे अध्यात्मज्ञान पाहून त्यांचे शाळा सोबती व शिक्षक आश्चर्यचकित होत.शिक्षण संपल्यानंतर त्यांनी ईश्वर भक्तिचा प्रसार करण्याचे कार्य सुरू केले.त्यावेळी सुलतान, पंडित व मुल्ला-मौलवीनी त्यांना विरोध केला.परंतु नानकाजवळची अध्यात्मिक भक्ती पाहून सर्वांचा विरोध शांत झाला व ते नानकांचे अनुयायी बनले.

नानकांनी संपूर्ण भारतात प्रवास केला.एवढेच नव्हें तर भारताबाहेर मक्का, मदिना, काबुल इत्यादी ठिकाणी तसेच इराणमध्येही गेले होते व आपल्या संदेशाचा प्रचार केला "ईश्वर एक आहे.तो प्रेमस्वरूप, ऐक्यस्वरूप आहे.तो मंदिर, मशीद व बाहेरही सर्वत्र असतो.माणूस नीच कुळातील किंवा उच्च कुळातील असो, ईश्वराच्या दृष्टिने सगळी माणसे समान.प्रत्येकाने जाति-पंथ-वर्णनिरपेक्ष मानवसेवा व ईश्वरभक्ती करावी."

अनुक्रमणिका

‘गुरू ग्रंथसाहेब’ मध्ये नानकांचा उपदेश आहे.सगळे शीख ह्या ग्रंथास पवित्र मानतात.अविनाशी, सर्व व्यापी, चिरंतन, निर्वैर, निर्मत्सर असा जो एकमात्र परमेश्वरस, त्यालाच शीख धर्म मानतो.या जगात सगळ्या जाती समान आहेत.कोणतीही जात उच्च किंवा नीच नाही.

अनुक्रमणिका

# २४.भाव-सुमनावली

ऐका श्रोते हो सावकाश। परम वैष्णव रोहिदास।
हरिभजन रात्रंदिवस। प्रेमभावें करीतसे॥
मने दुराशा सांडोन। भावें करितसे हरिकीर्तन।
नित्यनेम स्नान करून। विष्णुपूजन करीतसे॥

—**महिपति** (भक्त विजय अध्याय २५·१-३)

जन्म झालासे चर्मकार वंशी।
ज्ञान पाहता लाजवी वसिष्ठासी॥
शांति ज्याची आणि उणे सागराला।
धाम वैराग्य सदय नांदण्याला॥
जड जीव उद्धराया आले भूवरि धरूनि अवतार।
कंठमणी श्री हरिचे हीन कुळी रोहिदास चांभार॥

—**श्री दासगणू महाराज**

संत रोहिदास। रोहिदास संत, जयासी भेटे भगवंत॥ धृ॥
जातिचा हिंदू। हिंदू चांभार, मनाचा प्रेमळ अनिवार।
नित्यकर्म त्याचे। त्याचे शिवण्याचे, वहाणा जोड हि जोड्यांचे॥
त्यावरि चालवितो। चालवि संसारा, मनी दे मत्सरा न थारा।
शिवुनिया देई। देई दान भक्ता, वहाणा अनवाणी त्या त्या॥
स्नान करी घेई। घेई तो वाचे, गोड ते नाम विठोबाचे।
पूजेचा होता। होता जो वाण, शालिग्राम दिव्य जाण॥
त्यासी तो ठेवी। ठेवी कातड्यांच्या, करूनिया संपुष्टासाच्या।
आसन ही त्याचे। त्याचे चर्माचे, बसे बा भक्ती भरे नाचे॥
संत रोहिदास। रोहिदास संत, जयासी भेटे भगवंत॥
त्यासि लोक हंसुनि। हंसुनी बोलती ते, कातडे अशुद्ध त्यामध्ये।
देवमूर्ति कैशी। कैशी ठेवावी, का न ती विटाळली जावी॥
त्यासि संत वदला। वदला प्रिय वाचा, बोलतो अर्थ करा याचा।
कातड्यामध्ये। मध्ये गर्भाच्या, बैसला मनुष्य मातेच्या॥
आई दे दूध। दूध गात गाणीं, स्तनाच्या चर्म कुप्यातूनी।
मुख हे मढवीले। मढवीले देवे, कातड्यानेच काय नोहे॥
मढवीले हात। हात पाय आणी, प्राण ही चर्मे देवांनीं।
ऋषीमुनी बसती। बसति तपस्येसी, घेति मृगचर्म आसनासी॥
आणि व्याघ्रचर्म। चर्म आवडीने, उपरणे केले सांबाने।
सांब सदाशिवजी। शिवजी ज्या शिवती, चर्मे अशुद्ध कैशी तीं॥
अशुद्ध ना चर्म। चर्म न चांभार, तयाचा तोची अधिकार।
अधिकार साचा। साचा जो भक्त, मांग वा महार वा शाक्त॥

अनुक्रमणिका

प्रेमचि अधिकारा। अधिकारा भक्ती, देतसे नाम-भजन मुक्ती।
असे हिंदुधर्म। धर्म विठ्ठलाचा, सनातन सकला कथि साचा॥
चित्ताचा शुद्ध। शुद्ध तोचि होतो, जातिचा असो कुण्याही तो।
अशुद्ध जरि चित्त। चित्त तरी तो तो, ब्राह्मणहि अस्पृश्यचि होतो॥
क्षत्रियहि अस्पृश्यचि होतो॥
महार तो चोखा। चोखा मेळ्याला, आलिंगिता देव झाला।
झाला सजणासी। सजण कसायासी, प्रसन्नचि परमेश्वर त्यासी॥
धंदा हा सारा। सारा उपकारी, त्याविण न चले संसारी।
म्हणूनिया कोणी। कोणी कर्माचा, विटाळ न मानावा साचा॥
कधी हिंदु धर्म। धर्म विठ्ठलाचा, आमुच्या वाडवडीलांचा।
तुम्ही आम्ही हिंदू। हिंदू जातीचे, सर्व ही भक्त विठ्ठलाचे॥
रक्षुं हिंदुधर्म। धर्म विठ्ठलाचा, आमुच्या वाडवडीलांचा।
असे रोहिदास। रोहिदास संत, वदे त्या भेटे भगवंत॥
—स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर

निवृत्ति ज्ञानदेव सोपान चांगाजी। मेरे जी के है जी नामदेव।
नागाजन मित्र नरहरी सुनार रविदास कबीर सगे मेरे॥
—संत तुकाराम

रोहिदास चमार सब कुछ जाने।
कठोर गंगा देख॥
-संत एकनाथ

वेद हि झूटा शास्त्रहि झूटा, भक्त कहां से पछानी।
ज्या ज्या ब्रह्मा तू ही झूटा, झूटी साके न मानी॥
गरूड चढे जब विष्णु आया, साच भक्त मेरे दोही।
धन्य कबीरा धन्य रोहिदासा गावै सेना न्हावी॥
—संत सेना

गुरु रैदास मिले मोहि पूरे, धुरसे कलम मिली।
सत्गुरु सैन दइ जब आके, ज्योति से ज्योति मिली॥
मीरा सत्गुरु देवकी करै वंदना आस।
जिन चेतन आतम कह्या, धन भगवान रैदास॥

मीरा ने गोविंद मिल्या जी, गुरु मिल्या रैदास।
रैदास संत मिले मोहि सत्गुरु, दीन्ही सुरत सहदानी॥
मेरो मन लागो गुरु सो, अब न रहुंगी अटकी।
गुरु मिलिया रैदासजी, दीन्ही जान की गुटकी॥
—संत मीरा

**भावार्थ :**—संत मीरा म्हणते की, "मला संत रोहिदास सत्गुरु लाभले आणि माझे परमेश्वराशी नाते जडले.माझा विरह संपला.संत रोहिदासांनी चैतन्य आणि आत्म्याची गाठ बांधून दिली आहे.मला

अनुक्रमणिका

परमेश्वरासमान रोहिदासजी धन्य आहेत.मला संत रोहिदास सद्‌गुरु लाभले आणि मला ईश्वराचे रहस्य समजल्यामुळे, मी हरिजवळ गेले."

**संतन मे रविदास संत है, सुपच ऋषी सो मानिया।**
**हिंदू तुर्क दुई दीन बने है, कछु नही पहिचानिया॥**
**—संत कबीर**

**भावार्थ :**—संत कबीर म्हणतात की, "संत रोहिदासांनी संत मंडळांमध्ये अत्युच्च स्थान मिळविले आहे.हीन समाजात जन्मलेला तो सर्वश्रेष्ठ ऋषी आहे.हिंदू-मुसलमान हे दोघेही एवढे दुर्दैवी की, त्यांनी ह्या थोर संताचे माहात्म्य ओळखले नाही.

**सदाचार श्रुति शास्त्र वचन अविरूद्ध उचाऱ्यो।**
**नीर क्षीर विवरन परम हंसनि उर धाऱ्यो॥**
**भगवत कृपाप्रसाद परमगति इहि तन पाई।**
**राज सिंहासन बैठि ज्ञाति परतीति दिखाई॥**
**वर्णाश्रम अभिमान तजि पदरज बंदहि जासु की।**
**संदेह ग्रंथि खण्डन निपुन, बानी विमल रैदास की॥**
**—नाभादास** (भक्तमाल, पृष्ठ ४७०)

**भावार्थ :**—नाभादास म्हणतात की, "संत रोहिदासांनी नेहमी वेद, शास्त्रानुसार आचार पद्धतिचे अनुकरण करून उपदेश दिला.त्यांची तर्कयुक्त वाणी परमहंसरुपी महात्म्यांनी व विद्वानांनी नीर-क्षीर विवेकाप्रमाणे सारयुक्त प्रवचने ऐकून स्वीकार केली.हीन चांभार जातीत जन्म घेऊनसुद्धा सशरीर याच जन्मात मोक्षप्राप्ती झाली.आपल्या प्रकांड ज्ञानामुळे त्यांना राजसिंहासनावर बसण्याचा गौरव प्राप्त झाला.मोठ-मोठे साधु महात्मा तसेच विद्वान, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र वर्णांचा तसेच ब्रह्मचर्य, गृहस्थ, संन्यास आणि वानप्रस्थ आश्रमांचा अभिमान सोडून ज्यांच्या चरणांचे वंदन करीत होते.अशा भक्त रोहिदासांची वाणी-सगळ्या प्रकारच्या शंकांचे निवारण करणारी निर्मळ वाणी आहे."

**नफा मिले नामै करे हरि संतन सनमान।**
**परम भागवत जन भयो श्री रविदास सुजान॥**
**—संत नित्यानंद**

**भावार्थ :**—संत नित्यानंद म्हणतात की, "जे संतांचा आदर-सन्मान करतात, त्यांना आध्यात्मिक फायदा मिळतो.त्यांचे महत्त्व, नावलौकिक वाढत असतो.अशा ज्ञानी लोकांना परमेश्वराच्या दृष्टिने संत रोहिदास पवित्र झाले."

**रैदास रंगीला रंग है दिये जनेऊ तोड़।**
**जग्य जोगार चोले, धरे इक रैदास इक गौड॥**
**—गरीबदासजी की वाणी, पृष्ठ ३२.**

अनुक्रमणिका

**भावार्थ :**—संत गरीबदास म्हणतात की, “संत रोहिदासाने मोठी हिंमत करून जानव्याचे आवडंबर मानले नव्हते.परंतु जेव्हा बाह्य आवडंबरावर विश्वास ठेवणाऱ्या पंडितांनी जानव्यावरून त्यांचा अपमान केला तेव्हा तर रोहिदासांनी चमत्कार करून दाखविला.यज्ञानंतर झालेल्या त्या पंक्तिला पहावे तर एक रोहिदास व एक ब्राह्मण असे बसलेले ब्राह्मणांना दिसत होते.”

**जन रविदास नीच कुल उंचा, ताकू तीन लोक सब जाणैरे।**
**जन ‘हरिदास’ वै निरभं देश्या, तातै उलटी ताणै रे॥**
**—हरिदास**

**भावार्थ :**—संत हरिदास म्हणतात की, “संत रोहिदास नीच कुळात जन्म घेऊन, आपल्या प्रभुभक्तिमुळे ते उंच झाले.स्वर्ग, मृत्यु व पाताळ हे तिन्ही लोक त्यांना ओळखतात.परंतु ह्या देशात काही लोक असे आहेत की, जातीपातीसाठी भांडणे, मारामाऱ्याही करतात.”

**अमृत राम रसायण पीया, ताथै अमर कबीरा किया।**
**रांग राम कहि राम समाना, जन रविदास मिले भगवाना॥**
**— दादू**

**भावार्थ :**—संत दादू म्हणतात की, “रामाचे नाव अमृतरूपी रसायनासमान आहे, रामाचे नामस्मरण करून कबीर अमर झाले व रामस्मरण केल्याने संत रोहिदासांना परमेश्वराचे दर्शन झाले.”

**राम रस पीया रे, पीना ही आनंद होय।**
**सौंझे सैन पियो रविदासा, मीरा प्रेम बडाई रे॥**
**—सेवादास**

**भावार्थ :**—सेवादास म्हणतात की, “राम रूपी रस प्याल्याने अर्थात राम नामात तल्लीन झाल्याने आनंद प्राप्त होतो.रोहिदास असो की मीरा असो, त्या प्रभु भक्तांनी नामस्मरण करून ते संपूर्ण देशात अमर झाले.”

**कबीर नामदेव पीया रविदासा भवसागर की काटी पासा॥**
**—कलयाणदास**

**भावार्थ :**—संत कल्याणदास म्हणतात की, “कबीर, नामदेव, रोहिदास हे असे संत झाले की, ते भगवानाचे स्मरण करून, संसाररूपी समुद्र किनाऱ्यास लागले.”

**आदि मिली जयदेव कूँ, रैदास समानी॥**
**—रज्ज़बदास**

अनुक्रमणिका

**भावार्थ :**—संत रज्जबदास म्हणतात की, "ईश्वर स्मरण केल्याने संत जयदेव आणि संत रोहिदासांना ईश्वरानुभूति झाली."

**जगत विदित पीपा धना, अरू रैदास कबीर।**
**महाधीर दृढ एक रस, भरे भक्ति गंभीर॥**
**—भक्त नामावली**

**भावार्थ :**—ह्या काव्यात म्हटले आहे की, "भक्तीरस एक असा दृढ-गंभीर रस आहे.तो प्याल्याने भक्त जगात अमरत्व प्राप्त करतात.त्यामुळेच संत पीपा, संत धन्ना, संत रोहिदास व कबीर जगात अमर झाले."

**जन रविदास साधि सुरा तन, विप्रन मार माचई रे॥**
**—छोट सुंदरदास**

**भावार्थ :**—संत छोटे सुंदरदास म्हणतात की, "संत रोहिदास हे ब्राह्मणामुळे देवपूजाही करू शकत नव्हते.कारण ब्राह्मण लोक शूद्र म्हणून त्यांचा अपमान करीत.ऐवढेच नव्हे तर रोहिदासांना मारहाण करीत होते."

**भेटो जब रविदास कूं, लीन्ही भुजा पसार।**
**हरि लीला रीझे नही, अचरज कहो अपार॥**
**—दयाबाई**

**भावार्थ :**—संत दयाबाई म्हणतात की, "भक्त ईश्वर भजनात तल्लीन होतात.तेव्हा उंच-नीच जातीभेद त्यांच्याकडे रहात नाही.याच कारणामुळे त्यांची भेट संत रोहिदासाबरोबर झाली.यामध्ये आश्चर्य ते काय?"

**पीपा, धना, सैन, रविदासा, सुखदेव पियो अधाई।**
**अमर गुरु पीयो हुए निरभ अगम सुरति ठहराई॥**
**—दरसनदास**

**भावार्थ :**—संत दरसनदास म्हणतात की, "ज्यांनी मनापासून ईश्वर भक्ती केली.त्यांना ईश्वरभक्ती प्राप्त झाली व ते अमर झाले.मग ते संत पीपा असो की धन्ना असो.संत सेना असो की संत रोहिदास असो."

**पीपा जन रविदास पुनि सुमरे सुखदायी रे।**
**पीया पियाला प्रेम का डर तपन बुझाई रे॥**
**—रुपदासजी**

**भावार्थ :**—संत रूपदास म्हणतात की, "प्रेम असे आहे की, ते केल्याने मनातील मळ प्रेमाश्रुप्रमाणे वाहून जातो.अशा प्रेम भक्तिमुळे संत पीपा रोहिदासांना परमानंद प्राप्त झाला."

अनुक्रमणिका

**रविदास चमारू उस्तुति करै, हरि की रीति निमिख इक गाई।**
**पतित जाति उत्तम भया, चारी बरन पए पगे आई॥**
**रविदास ध्याये प्रभु अनूप, गुरुदेव 'नानक' गोविंद रूप।**
**—गुरु नानकदेव**

**भावार्थ :**—गुरु नानक म्हणतात की, "नीच कुळात जन्म घेतलेला रोहिदास चांभार निर्भयपणे उच्च कर्म करीत भक्तिभावनेने सर्वकाही परमेश्वरास अर्पण करून, उच्च स्थान प्राप्त करून घेतले.अर्थात उच्च कुळात जन्म घेतल्यानेच कोणी मोठा होत नाही.तर ईश्वराचा मोठा भक्तच मोठा होऊ शकतो.याच कारणामुळे संत रोहिदास व नानक हे स्वतः ईश्वररूप झाले.म्हणून लोक त्यांना गुरु म्हणून बोलू लागले."

**सुखसागर में आय के, मत जा रे प्यासा।**
**अजहुं समझ नर बावरे, जम करत निरासा॥**
**निरमल नीर भरे तेरे आगे, सीले स्वांसों स्वांसा।**
**मृगतृष्णा जल छांड बावरे, करो सुधारस आसा॥**
**ध्रू प्रहलाद, शुकदेव पिया, और पिया रविदासा॥**
**प्रेमहि संत सदा मतवाला, एक प्रेम की आसा॥**
**कहे 'कबीर' सुनो भाई साधो, मिट गई भय की बासा॥**
**—संत कबीर**

**भावार्थः**— संत कबीर म्हणतात की, "हे मानवा, तू ह्या जगात रामनामरूपी अमृताचे रसापान कर.जर तू आपला जन्म व्यर्थ घालविलास तर यमजराजाकडे तुला पश्चाताप करावा लागेल.तुझे मन निर्मळ पाण्याप्रमाणे आहे.तू ज्ञानसागर आहेत.श्वास असेपर्यंत तू रामनाम घे.हे जीवन मृगजलाप्रमाणे आहे.तुझ्यामध्ये प्रेम, भक्तिभावना असेल तरच तुला सुधा रस मिळेल.ह्या भक्तिमुळेच ध्रुव, प्रल्हाद, सुकदेव आणि रोहिदासाने ईश्वर प्राप्त करून आपले जीवन सफल बनविले.कबीर म्हणतात की, "जेथे ईश्वर आहे, तेथे कोणत्यास प्रकारचे भय नाही.अर्थात भक्तामध्ये स्वयं नारायणाचे निवासस्थान आहे."

**गई घर झाली पुनि बोलि के पठाओ अहो।**
**जैसे प्रतिपाली अब तैसे प्रतिपारिये॥**
**आपहु पधारे उन बहु धन पट वारे।**
**बिप्र सुनि पांव धारे, सीधौ दे निवारिये॥**
**करि के रसाई द्विजे भोजन करन बैठे।**
**द्वै द्वै मधि एक यौं रविदास को निहारिये॥**
**देखि भई आंखें दीन भाखै सिख लाखै भये।**
**स्वर्न को जनोऊ काढयो त्वचा कीनी न्यारियै॥**
**—प्रीयदास**

**भावार्थः**—प्रीयदास म्हणतात की, "निमंत्रणाप्रमाणे संत रोहिदास महाराणी झालीच्या घरी गेले.तेव्हा 'झाली' म्हणाली, "आपण आल्यामुळे माझी सून मीरा व इतर लोक प्रसन्न झाले आहेत.परंतु हे ब्राह्मणांनी

ऐकताच त्यांना वेगळे काढण्याचे सांगितले.ब्राह्मणांनी स्वतंत्र स्वयंपाक करून त्यांची वेगळी पंगत बसली असता, त्यांना दोन ब्राह्मणांमध्ये एक रोहिदास जेवणास बसल्याचे दिसले.तेव्हा ब्राह्मण दीनवाणे त्यांचेकडे पाहू लागले.त्यावेळी संत रोहिदासांनी आपली छाती चिरून आतील सोन्याचे जानवे दाखवून उपदेश केला.त्यावेळी त्यांचे बरेचजण शिष्य झाले."

**गोविंद गोविंद गोविंद संगि नामदेउ मन लीणा।**
**आठ दाम को छीपरो होईओ लाखीण॥**
**बुनना तनना तिआगि प्रीति चरन कबीरा।**
**नीच कुला जोलाहरा भइओ मुनिह गहीरा॥**
**रविदासु ढुंवता ढोर नीति तिन्हि तिआगी माइआ।**
**परगट होइआ साध संगि हरिदरसन पाइआ॥**
**सेनु नाई बुत करिआ ओहु घरि धरि सुनिआ।**
**हिरदे बसिआ पार बरह्म भगतां महि गनिआ॥**
**इह विधि सुनिकै जाटरो उटि भगती लागा।**
**मिले प्रतखि गुसईआ 'धन्ना' बडभागा॥**

**—भक्त धन्ना**

**भावार्थ :**—भक्त धन्ना म्हणतात की, "गोविंद, गोविंद असे हरिस्मरण करून संत नामदेव आठ प्रहर भगवानामध्ये रमले.कोष्ठ्यासारख्या नीच कुळातील कबीर वीणण्याचे काम करीत ईश्वर भक्तिमध्ये दंग झाला होता.गुरांढोरांची कातडी वाहणाऱ्या रोहिदासाने मोहमायेचा त्याग करून हरिदर्शन प्राप्त करून घेतले.सेना नाव्ही, बुत, करिआ इत्यादी नीच कुळात जन्म घेऊनही हरिभक्ती करीत भक्तामध्ये गणले गेले.हे ऐकून धन्नाजाट उठून भक्ती करू लागला आणि प्रतापी सद्गुरूंचा कृपाशिर्वाद लाभल्यामुळे धन्ना मोठा भाग्यशाली आहे."

**द्राविड देस भूप की रानी, सुनी रविदास भक्ति गुन खानी।**
**चेली भई तासु दिग आई, दै रविदास भक्ती समुझाई॥**

**—संत चरणदास**

**भावार्थ :**—संत चरणदास म्हणतात की, "द्राविड देशाच्या राजाची राणी संत रोहिदासाची प्रभुभक्ती ऐकून त्यांची शिष्या झाली.तसेच ती गुरूची भक्ती व गुणगान करू लागली."

**बडो भयौ तब न्यारौ किनौ, बाँटे आवै सो बाटि न दीनौ।**
**राध्या बाबरी के पछिवारे, कछु न कहयौ रैदास विचारे॥**
**सीचो चाम मोलि लै आवै, ताकी पनही अधिक बनावै।**
**टूटे फाटे जरवा जोरे, मसकत करि काहु न निहारै॥**

**—अनंतदास**

**भावार्थ :**—संत अनंतदास म्हणतात की, "वडिलाने रोहिदासास घरातून वेगळे काढले.त्यांच्या वाट्याला येणारी पुरेशी वाटणीदेखील दिली नाही.परंतु त्यांनी कोणाकडेही तक्रार केली नाही.निमूटपणे

अनुक्रमणिका

घरामागे एक झोपडी बांधून पत्नी लोनासह राहू लागले.चामडे विकत आणून त्याचे चपला-जोडे बनवू लागले.तसेच तुटले फाटलेले जोडे दुरूस्तीचे श्रम घेऊन उदरनिर्वाह करू लागले."

"चौदहवी शताब्दी के आसपास संशोधनवादी और सुधारवादी दर्शन के कई व्याख्याता हुए। जिन्होंने जागतिक रूढियो और संस्कारों के संघटित आंदोलन किए। रामानंद के प्रसिद्ध रविदास उन्हीमें थे। जिन्हें चमार जाति के लोग अपना पूर्वगुरु मानते है। यहाँ तक कि रैदास शब्द आगे चलकर चमारों की संमानित उपाधि बन गया।"

**—श्याम तिवारी (हिन्दी विश्वकोष)**

हिंदी विश्वकोशाचे श्याम तिवारी म्हणतात की, "चौदाव्या शतकाच्या आसपास संशोधनवादी आणि सुधारणावादी कित्येक व्याख्याते असे झाले की, ज्यांनी जागतिक रूढ्या आणि संस्काराविरूद्ध संघटीत आंदोलने केली.स्वामी रामानंदाचे सुप्रसिद्ध शिष्य रोहिदास त्याच्यामध्यें होते.चांभार जातीचे लोक अपला पूर्वज म्हणून त्यांना एवढे मानतात की, 'रोहिदास' हा शब्द पुढे कालांतराने चांभारांची सन्मानित पदवी झाली.

"रैदास संत युग के प्रतीक थे। उनकी वाणी में उनके गुरु स्वामी रामानंद के विशिष्ट द्वैतवादका मूल उपदेश बोलता है। परमात्मा का राम, गोविंद आदि नामों से अनुस्मरण है, अंतर्मुखी वृत्ति, वैराग्य और शून्य साधना की झलक है और भक्ति की ललित, दासोचित भाषा है। वे विद्वान न थे, परंतु उनकी वाणी का स्त्रोत उस जगह था, जहाँ साधकही पहुँच सकता है। संतो की रचनाओंमें पांडित्य नही मिलता, परंतु पदे इस बात का परिचय मिलात है की, तत्त्व साक्षात्कार व्यक्त हो रहा है। हिंदू समाज बहुत दिनों से जातपात के बंधनों मे पड़ा हुआ है, परंतु कबीर, सधन, पीपा, रैदास जैसे महापुरूषों के व्यक्तित्वने समय समय पर इस बंधन को तोडा और इस बात को सिद्ध किया की,"'जातपात पूछे नहि कोई। हरि को भजे सो हरिका होई॥'

**—डॉ.सम्पूर्णानंद**

डॉ.सम्पूर्णानंद म्हणतात की, "संत रोहिदास संत युगाचे प्रतीक होते.ते आपल्या पदातून गुरु स्वामी रामानंदाचा विशिष्टाद्वेतवादाचा मूळ उपदेश सांगत होते.परमात्म्याचा राम, गोविंद इत्यादी नामाचे स्मरण करीत ...त्यांच्यामध्ये अंतर्मुखी वृत्ति, वैराग्य शून्य साधनाची झलक, आणि भक्तिची ललित, दासोचित भाषा आहे.ते विद्वान नव्हते.परंतु त्यांच्या भाषेचा प्रवाह असा होता की, तेथे साधकच पोहोचू शकतो.संताच्या रचनेत पांडित्य मिळत नाही.परंतु त्यांच्या पदामध्ये वेळोवेळी तत्त्वांचा साक्षात्कार मिळतो ...हिंदू समाज पुष्कळ दिवसांपासून जातीपातिच्या बंधनात पडलेला आहे.परंतु कबीर, सदन, पीपा, रोहिदाससारख्या महापुरुषांच्या व्यक्तित्वाने वेळोवेळी हे बंधन तोडले आहे, आणि ही गोष्ट सिद्ध केली आहे की, "जात पात कोणी विचारू नये.जो हरिस भजतो तो हरीचा होतो."

"कबीर, रैदास, धर्मदास, नानक, दादू, पलटू आदी की बानी को छूते ही ऐसा लगा की, अलौकिक महारसका पूर्ण परिपाक तो यही पर हुआ है। साहित्य लोचकों के यह कथन अर्थक शून्य से जैसे कि इन संतो की अटपटी रचनाओं मे न तो साहित्यिक सरसता है, न संगीत की लय है और न कला की अभिव्यंजना ही, और भाषा भी उनकी उभडसाबड सी है। मैने देखा कि, रीति ग्रंथो का फीता लेकर वे साहित्यालोचक संत वाणी का असीम क्षेत्रफल निर्धारित करने गये थे — चौकोर बंधे हुए तालाबपर धीरे धीरे सरकती हुई नौका जैसे असीम अनंत सागर के वैभव को मापने पहूँची थी।"

अनुक्रमणिका

—**वियोगी हरि**

वियोगी हरि म्हणतात की, “कबीर, रोहिदास, धर्मदास, नानक, दादू, पलटू इत्यादी संतांच्या भाषेला स्पर्श करताच असे वाटते की, अलौकिक महारसाचा पूर्ण परिपाक तर येथेच झाला आहे.साहित्य आलोचकांचे हे कथन अर्थकशुन्यापासून तपासले तर हा संतांच्या रचनामध्ये साहित्यिक सरसता नाहीकिंवा संगीताची लय नाही आणि कलेची अभिव्यंजनाही नाही.तसेच भाषासुद्धा ओबडधोबडशी आहे, मी असे पाहिले की, रीति ग्रंथाची फीत घेऊन जे साहत्यलोचक संत वाणीचे असीम क्षेत्रफळ निश्चित करण्यास गेले होते.चारी बाजूस बांधलेल्या तलावावर हळूहळू सरकणारी नौका ज्याप्रमाणे असीम, अनंत सागराच्या पसरलेल्या वैभवास मापण्यासाठी पोहोचली होती.”

“महात्मा रैदास की बडे उँचे घाटकी बानी है। प्रेमपराभक्ति का कई शब्दो मे बडाही विशद निरूपण उन्होने किया है। समता और सदाचार पर बहुत बल दिया है। भक्तिरस का ऐसा सुंदर परिपाक अन्यत्र कम देखने मे आता है। सत्य की शुद्ध निर्मल अभिव्यक्ति ही, अपरोनभूति ही उनका परम ध्येय था । भाषाने की भाव का मूक अनुसरण किया है।”

—**वियोगी हरि**

वियोगी हरि म्हणतात की, “महात्मा रोहिदासांची भाषा वरच्या श्रेणीची आहे.त्यांनी प्रेमपराभक्तिचे निरूपण काही शब्दात चांगले केले आहे.त्यांनी समता आणि सदाचारावर बराच जोर दिला आहे.भक्तिरसाचा असा सुंदर परिपाक अन्यत्र कमी पाहावायस मिळतो.सत्याची शुद्ध निर्मळ अभिव्यक्ति, अपरोनभूतिही त्यांचे परम ध्येय होते.त्यांच्या भाषेने भावनेचे मूकपणे अनुसरण केले आहे.”

—**जेलसिंह**

भारताचे माजी राष्ट्रपती जेलसिंह म्हणतात की, “संत गुरू रविदास हमारे देश के उच्चतम धार्मिक नेतोओं में गिने जाते है। भक्तिकाल की परंपरा मे संत रविदास का महत्त्वपूर्ण स्थान रहा है। वे एक उच्च कोटि के त्रिकाल द्रष्टा और विचारक थे। उनके मानवतावाद, मानवसमता और सामाजिक चेतना के विचार भारतीय संतो, विद्वानों और जन मानस के लिए सदा प्रेरणा देते रहेंगे।”

—**हर चरनसिंह अजराला**

हर चरनसिंह अजराला (माजी शिक्षण मंत्री—पंजाब) म्हणतात की, “रविदासजी ने एक अंधकारमय युग के धर्मप्रचार एवं समाज सुधारक का जो कार्य किया है वह आज के युग मे भी हमारे लिए अनुकरणीय है। उन्होंने दूसरे संतो की तरह अपने पैतृक व्यवसाय को उच्च कोटि का संत होते हुए भी जो महत्ता दी है वह उस युग के किसी अन्य संतो ने नही दी। रविदासजी ने अपने व्यवसाय को ईश्वरपूजा समझकर किया और उपदेश देते हुए कहा—

**“श्रम कउ ईश्वर जाति कै, जब पूजाहि दिन रैन,**
**रविदास जिन्ह हि संसार मह सद मिलहि सुख चैन”**

रविदासची उच्च कोटि के संतभक्त थे, वे सच्चे अर्थोमे श्रमसाधक भी थे।

अनुक्रमणिका

* * *

## अनुक्रमणिका

# २५.संदेश-उपदेश

संत रोहिदासांचा संदेश-उपधेश हा त्यांच्या काव्यातून म्हणजे त्यांच्या दोह्यॉंतून व पदांतून मिळत आहे.त्यांचे दोहे-पदे इत्यादी काव्यसाधना भावार्थासह ह्या ग्रंथाच्या दुसऱ्या भागात दिली आहे.त्यामुळे संत रोहिदासांची शिकवण दुसऱ्या भागात आपणांस सविस्तर मिळेल.तरी देखील ह्या प्रकरणात त्यांच्या शिकवणुकीचा सारांश मी येथे थोडक्यात देत आहे.

सत्याचा संदेश देण्यासाठी संत महात्मे विविध देशात प्रयत्नशील असतात.मग ते कोणत्याही जाती-धर्मांचे असोत अथवा कोणत्याही पंथाचे असोत.सत्याचा प्रकाश दाखविण्याचे त्यांचे कार्य चालूच असते.संत महात्मे यांचेकडे जाती, धर्म, पंथ, वंश, वर्ण, रंग, रूप किंवा देश, प्रदेश अशा कृत्रिम भेदभावांना जागा नसते.[काशीनाथ उपाध्याय, गुरू रविदास, प्र.आ.१९८३ पृ.३३.]ते जन्ममृत्युच्या फेऱ्यातून रंजल्या-गांजलेल्या लोकांना मुक्त करण्यासाठी जन्म घेतात व सत्त्याचा संदेश देतात.संत रोहिदासांनीही इतर संत महात्म्याप्रमाणे आपल्या काव्यांतून व पदांतून हाच संदेश दिलेला आहे तो पाहा.

### (१) मानव जन्म

संत रोहिदास आपणांस स्मरण करून देतात की, [भाऊसाहेब चीम, संत रविदास जीवन व संदेश, प.आ.सन १९८५ पृ.४४.]आपल्याला हा मानव जन्म अनेक पूर्व जन्मातील पुण्यकर्मामुळे मिळाला आहे.तसेच हा मानव जन्म अमोल व दुर्लभ असा आहे.मानव जन्माचा उद्देश्य परमेश्वर प्राप्ती करणे हा आहे.

**दुर्लभ जनमु पुन फल पाईओ, बिरथा जात अविवेके।**
**राजे इंद्र समसरि गृह आसन, बिनु हरि भगति कहुहु किह लेखे॥**
—श्री आदि ग्रंथ, पृष्ठ, ६५८, गुरू रविदास, पृष्ठ ६८.

हरिबद्दल श्रद्धा, भक्ती असल्याशिवाय इंद्राच्या दरबाराचा व त्याच्या सिंहासनाचा सुद्धा काही उपयोग नाही.तसेच दुर्लभ असा मिळालेला मानव जन्म अविवेकामुळे फुकट जात आहे.

**नैन उधारि न पेषियो, तुझ मानुष जनम किह लेखा रे।**
**पांउ पसार किमी सोई परयो, तै जनम अकारथ खोया रे॥**
—वाणी १७०

मनुष्य जन्म का दिला हे जरा डोळे उघडून पाहा.तुम्ही झोपण्यामध्ये मौल्यवान आयुष्य निरर्थक वाया घालवीत आहांत.

**ताको जनम अकारथ कहिए ।**
**विषयन रतु संसा भ्रमु अटक्यो, भंवर फंद मंहु रहिए ।**
**कहि रविदास जउ व्यापहि घट घटु तिहि काई बिसरिए॥**
—गुरु रविदास, पृष्ठ ३४

अनुक्रमणिका

जो माणूस संसारिक विषय, भ्रम, शंका, कुशंकांच्या जाळ्यात अडकला आहे.अशा माणसाचे आयुष्य कवडीमोल आहे.

**जा कौ हरि जू आपु निपाजत, तिहि त्रिविध ताप नहीं वाधै ।**
**जम कौ दूत छांडि करि भाजै, सांचा हरि किंधुं न अराधै॥**

—गुरु रविदास, पृष्ठ ३४

ज्याचेवर प्रभुकृपा झाली तो भाग्यवान, त्यास त्रिविध तापांपासून (आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक) त्रास होत नाही.अशा माणसाला सोडून यमदूत पळून जातात.ज्याचेमुळे हे घडते त्या सत्यदेवाला आपण भावभक्ती अर्पण का करीत नाही?

## (२) ऐहिक जीवन

जे लोक संसारिक विषयात व ऐहिक जीवनात तृष्णा, लोभ, मोह इत्यादीमध्ये गुरफटून जातात व परमेश्वर प्राप्ती करण्याच्या अमोलसंधीस गमावून बसतात.अशा माणसांबद्दल संत रोहिदास म्हणतात.

**राखहु कंध उसारहु नीबा, साढे तीनि हाथ तेरी सीबां ।**
**उचे मंदर सुंदर नाही, राम नामबिनु बाजी हारी॥**

—श्री आदि ग्रंथ, पृष्ठ ६५९, गुरु रविदास, पृष्ठ ३५

तुम्ही मोठमोठे पाये खोदून त्यावर मोठमोठ्या भिंती उभारता, परंतु शेवटी तुमच्यासाठी साडेतीन हातांची जागाच लागते.मोठमोठे वाडे, सुंदर रूपवान पत्नी असूनही रामनामाशिवाय तुम्ही जीवनरूपी खेळात हरला असे समजा.

**उचे मंदर साल रसोई, एक घरी फुनि रहनु न होई।**
**कहि रविदास सभै जगु लूटिआ, हम तउ एक राम कहि छुटिआ॥**

—श्री आदि ग्रंथ, पृ.७९४, गुरु रविदास, पृष्ठ ३५

एकाद्याजवळ मोठे वाडे असतील, भोजनगृहे असतील, परंतु जेव्हा मृत्यु झडप घालतो, तेव्हा एक क्षणही तेथे राहत नाही.संत रोहिदास म्हणतात की, "मृत्युने सर्व जगास लुटले आहे.मी मात्र परमेश्वराच्या नामचिंतनामुळे मुक्त आहे."

**हरि सा हीरा छांडि कै, करै आन की आस।**
**ते नर जमपूर जांहिंगे, सत भाषै 'रविदास'॥**

— रविदास दर्शन, दोहा क्रमांक ४१

अनुक्रमणिका

माणसे परमेश्वरूपी हिरा सोडून भलत्याच गोष्टीत आशा ठेवतात.अशी माणसे शेवटी यमलोकात जातात, हे सत्य रोहिदास सांगतात.

### (३) परमेश्वर एक

आम्ही ज्या परमेश्वराच्या शोधात आहे.त्या परमेश्वर प्राप्तीचे ध्येय आमचे आहे.ते ध्येय सर्व जगाचे एकच आहे.निरनिराळ्या जाती व धर्मासाठी परमेश्वर निरनिराळा असू शकत नाही.परमेश्वर (जात, पंथ, रंग, रूप, देश आणि धर्म) ह्या भेदांहून निराळा आहे.परमेश्वर भक्तिचा अधिकार ह्या बाह्य भेदावर अवलंबून नाही.संत रोहिदास आपल्या वाणीत सांगतात.

**जन्म जात मत पूछिए, का जात अरू पात।**
**'रविदास' पूत सभ प्रभ के, कोउ नहिं जात कुजात॥**

—डॉ.शर्मा, रविदास दर्शन दोहा क्रमांक १२०

जन्म, जात विचारू नका, जात किंवा वंशात काय आहे?सर्वजण त्या एकाच प्रभुची लेकरे आहेत.जातीचा किंवा परजातीचा कोणीच माणूस नाही.

**जात पांत के फेर मंहि, उरझि रहइ सभ लोग।**
**मानुषता कूं खात हइ, 'रविदास' जात कर रोग॥**

— रविदास दर्शन दोहा क्रमांक १२१

जात आणि वंशाच्या जाळ्यात सगळी माणसे अडकलेली आहेत.जातीयतेच्या महारोगाने माणुसकी खलास केली जात आहे.

### (४)जन्माने सारे समान

सगळी माणसे एकाच परमेश्वराची लेकरे होण्यामुळे, ती सर्व समान आहेत.आपल्या चांगल्या वाईटकर्मामुळेच आम्ही मोठे किंवा लहान बनत असतो.विशिष्ट जातीत किंवा कुटुंबात जन्म होण्यामुळे मनुष्य उंच किंवा नीच ठरत नसतो.संत रोहिदास हा संदेश आपल्या वाणीत-शब्दात स्पष्ट सांगत आहेत.

**इक जोति ते जउ सभ उपजै, तउ ऊंच नीच कस मान।**
**'रविदास' नाम कत धरै कहुँ को, नाद बिंद**[शब्दधन]**है समान॥**

—रविदास दर्शन दोंहा क्रमांक ४९

जर एकाच ज्योतिपासून सर्व लोक निर्माण झाले असताना त्यांना उंच नीच असा भेदाभेद का करता? सर्व जगाची उत्पत्ती नाद रुपात्मक ब्रह्मदेवापासून झाली आहे.मग त्यांच्यामध्ये उंच-नीच असा भेद का करता?

अनुक्रमणिका

**‘रविदास’ उपजइ सभ इक नूर तें, ब्राह्मण मुल्ला सेख।**[मुसलमानांच्या चार प्रसिद्ध जाती (शेख, सय्यद, मुगल व पठाण) पैकी एक.]
**सभ को करता एक है, सभ कूं एक ही पेख॥**
— रविदास दर्शन १५४

ब्राह्मण, मुल्ला, शेख हे सगळे एकाच ज्योतीपासून उत्पन्न झालेले आहेत, सर्वांचा निर्माता एक आहे.म्हणून सर्वांना समान वागविले पाहिजे.

**‘रविदास’ ब्राह्मन मति पूजिए, जउ होवे गुनहीन।**
**पूजिहि चरन चंडाल के, जउ होवै गुन परवीन॥**
—रविदास दर्शन १२९

जो ब्राम्हण सद्‌गुणी नाही, त्याची पूजा करू नका, त्यापेक्षा नीच जातीत जन्मलेल्या सद्‌गुणी चांडाळाच्या चरणाची पूजा करा.

**पंच दोष**[काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार ह्या पांच दुर्गुणांचा त्याग करून जो संतांच्या चरणी लीन होतो. त्यालाच सद्‌गुणी व उच्च कुळातील समजा.]**तजि जो रहई, संत चरन लव लीन।**
**‘रविदास’ ते ही नर जानई, ऊंचह अरू कुलीन॥**
—रविदास दर्शन दोहा क्रमांक १३३

पांच दुर्गुणांचा (काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार) त्याग करून जो संताच्या चरणी लीन होतो.त्यालाच सद्‌गुणी व उच्च कुळातील समजा.

## (५) परमेश्वराचा शोध

परमेश्वराची प्राप्ती मानवी जीवनात हाऊ शकते हे सत्य सगळ्यांनी मान्य केले आहे.तरीसुद्धा परमेश्वर कोठे आणि कसा पाहावा हे काही लोकांना समजत नाही.त्यामुळे काही अज्ञान लोक अज्ञानी व अहंकारी ब्राह्मण पुजाऱ्याच्या सांगण्यावरून वाट चुकतात.

जो परमेश्वर आपल्या सर्वामध्ये आहे.त्याला आपल्यामध्ये न शोधता हे लोक मंदिरे, मशीदी, गुरूद्वार, तीर्थस्थाने, जंगल, डोंगर, पर्वतामध्ये शोधत फिरत असतात.परमेश्वर प्राप्तिसाठी अनेक प्रकारचे कर्मकांड आणि धार्मिक अनुष्टान इत्यादी बाहेरच्या साधनांचा उपयोग करतात.म्हणून संत रोहिदास समजावून सांगतात की—

**मुकूर मांह परछांइ ज्यों, पुहपु मधे ज्यों बास।**
**तैसउ ही श्रीहरी वसै, हिरदैमधे ‘रविदास’ ॥**
—रविदास दर्शन दोहा क्रमांक ९

अनुक्रमणिका

ज्याप्रमाणे प्रतिबिंब आरशात व सुवास फुलात असतो. त्याप्रमाणे परमेश्वर आपल्यामध्ये आहे.त्याला बाहेर शोधण्याचा सारा प्रयत्न फुकट आहे.

**बन खोजन क जाइ रे, राम तउ अलोपा नांह।**
**सर्व बिआपी राम तौ, 'रविदास' सभन कै मांह॥**

—रविदास दर्शन १९

सर्व व्यापी परमेश्वर तुमच्यापासून स्वतःला लपवीत नाही.मग तुम्ही त्यास अरण्यात कां शोधता?

**काब**[मक्का शहर (मुसलमानांचे पवित्र तीर्थस्थान) हज यात्रेचे ठिकाण]**अरू कैलास**[हिमालय पर्वतावरील शिव-शंकराचे निवास्थान, हिंदुचे पवित्र तीर्थस्थान.]**मंह, जिहकूं ढूढण जांह।**
**'रविदास' पिआस राम तऊ, बइठहिं मन मांह॥**

—रविदास दर्शन १६

ज्याच्या शोधासाठी काबा, कैलास या ठिकाणी जाता.परंतु तो प्रभु तुमच्या मनामध्ये वास करतो.

**गिरि वन काहे खोजन जाई, घट अभिअन्तर खोजहु भाई।**
**पुहुप मधे ज्यूं वास बसत है, त्यूं सब घट रमहि रघुराई॥**

—वाणी १६७, गुरू रविदास, पृष्ठ ३७

या प्रभुला शोधण्यासाठी अरण्यात कशाला जाता?त्याला स्वतःमध्ये शोधा.ज्याप्रमाणे सुवास फुलामध्ये असतो.त्याप्रमाणे प्रभु सर्व प्राण्यामध्ये आहे.

**बाहरि खोजत जनम सिरानों, मिग्र त्रिस्ना रह्यो उरझाई।**
**रामचरन मंह थिर मन राखहु, रिदै कंवल बसै रघुराई॥**

—वाणी १६७

प्रभुला शोधण्यात मृगजळाप्रमाणे सर्व आयुष्य खर्ची पडते.तरी हृदय मंदिरातील प्रभुच्या चरणी तुम्ही आपले चित्त एकाग्र करा.

## (६) अ.आंतरिक पूजा

प्रत्येकात असलेल्या परमेश्वराला बाहेर शोधण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे.परमेश्वराला फक्त अंतर्मुखी (मनातील) अभ्यासानेच प्राप्त करू शकतो.तसेच अंतर्मुखी पूजाच परमेश्वराची खरी पूजा आहे.संत रोहिदास सांगतात की—

**बाहर खोजत का फिरइ, घट भीतर ही खोज।**
**'रविदास' उनमानि साधिकर, देखहु पिया कू ओज॥**

—रविदास दर्शन दोहा क्रमांक १७

अनुक्रमणिका

तुम्ही प्रभुचा शोध बाहेर फिरून का करतां?त्याला तुमच्यामध्येच पाहा.ध्यानधारणेद्वारे त्याचे सौंदर्य आतमध्ये शोधा.

**जा कारनि मैं दौरयौ फिरतौ, सो अब घट मे आई॥५॥**
**पाँच.मेरी सखी सहेली, तिन निधि दई दिखाई।**
**अब मन फुलि[प्रसन्न]भयौ जग महिया[मध्ये.],उलटि आप मंह समाई॥६॥**
—वाणी ३, गुरु रविदास, पृष्ठ ३८

मी ज्या प्रभुचा शोध सर्वत्र फिरून केला.परंतु प्रभु मला माझ्यामध्येच भेटला.माझ्या हृदयातील पांच स्वर माधुर्य माझे मित्र आहेत.तेच मला इश धनाच्या खजिन्याकडे घेऊन जातात.व परमेश्वराची खरी पूजा, आरती करण्यात तल्लीन होतात.

**मन हीपूजा मन ही धूप, मन ही सेऊं सहज सरूप।**
—वाणी ३९, गुरु रविदास, पृष्ठ ३८

मी मनातच प्रभुची पूजा करतो.मनातच धूप जाळतो व मी मनातच प्रभुची प्रार्थना करतो.

## (६) ब.आंतरिक पूजा

संत रोहिदासांनी ध्यान-धारणा-जप यांचे महत्त्व सांगितले आहे.नऊ दरवाजे[दोन डोळे, दोन नाक, दोन कान, एक तोंड आणि खालील दोन्ही इंद्रियांच्या छिद्रांना नऊ दरवाजे म्हणतात.]बंद भृकुटी स्थानावर लक्ष केंद्रित केल्यावर आत्म्याचा आध्यात्मिक प्रवास सुरू होतो.हाच तिसरा डोळा होय.यालाच संतांनी गुह्यद्वार म्हटले आहे.यालाच तीळ-दिव्यदृष्टी-दहावा दरवाजा इत्यादी नावे आहेत.यालाच संत रोहिदासांनी ‘हरिद्वार’ म्हटले आहे.

**पलु पलु छिनु छिनु सिमरिये, जौ लौरे[इच्छा करणे.]हरि दुआर।**
—वाणी (साखी) १८, गुरु रविदास, पृष्ठ ३९

जर तुम्हाला हरिद्वारास जावयाची इच्छा असेल तर क्षणाक्षणाला परमेश्वराचे चिंतन जप करा.

**गगन मंडल मैं आरती कीजै, नाद बिंद इक मेक करीजै।**
**सहस कंवल सिंघासन राजै, अनहद भांजन नित ही बाजै॥३॥**
**इंह विधि आरती सांची सेवा, परम पुरिष अलख अभेवा[भेदरहित]।**
**कहै ‘रविदास’ गुरुदेव बताते, ऐसी आरती पार लंघावै॥४॥**
—वाणी १७६, गुरु रविदास, पृष्ठ ३९-४०

अनुक्रमणिका

हरिद्वारातून प्रवेश केल्यावर आतील आकाशात आरती करा.ह्या आंतरिक मंडलास संत रोहिदासांनीकिंवा अन्य संतांनी “गगन मंडल”म्हटले आहे.ह्या गगन मंडलात पोहचल्यावर साधक शब्द-धून किंवा अनहद-नादात स्वतःला विसरतो.ही परमेश्वराची खरी पूजा.आंतरिक पूजा आणि आरतिमध्ये गुरूकडून पूर्ण ज्ञान प्राप्त होते.परमेश्वराच्या खऱ्या स्वरूपाचा साक्षात्कार झाल्यावर साधक संसाररूपी सागरातून तरून जातो.

## (७) अ.अवडंबर (विधि कर्मकांड)

संत राहिदास म्हणतात की, “पाखंडपूर्ण वेशभूषा करण्यामुळे निरर्थक, दिखाऊ कर्मकांड किंवा पुजापाठ करण्यामुळे परमेश्वरास आपण फसवू शकत नाही किंवा प्रसन्नही करू शकत नाही.उलट परमेश्वर प्राप्तिमध्ये अडचण निर्माण करतात.

**पांडे!हरि बिच अंतर डाढ़ा**[परमेश्वरामध्ये अंतर पाडणे]**,मुंड मुडावै सेवा पूजा,**
**भ्रमर का बंधन गाढ़ा।**
**माला तिलक मनोहर बानौ, लागौ जम की पासी**[फास]**॥**
**जौ हरि सेती जोडया चाहौ, तौ जग सौं रहौ उदासी**[नम्र होणे.]**॥**
—वाणी १६१, गुरु रविदास, पृष्ठ ४०

पुजाऱ्यांनो, मुंडन करून पूजा केल्याने तुम्ही तुमच्यात व परमेश्वरात अंतर पाडीत आहात.बाह्य दिखाऊ पूजा करण्याने देव प्रसन्न होतो हा भ्रम, ही माया तुम्ही नष्ट करा.कपाळास गंध लावून, गळ्यात माळा घालून तुम्ही यमाचा फास गळ्यात अडकवीत आहांत.तुम्ही राम-सीता, विष्णु-लक्ष्मी अशा जोडींना प्रसन्न करण्याचे असेल तर मनापासून त्यांना नम्रपणे भजा.

**अनिक**[अनेक]**कौतगे**[कौतुक]**कल काछै कछैं**[कमर कसणे]**,बहुरि सांग**[सोंगेढोंगे]**दिखावो।**
**मूरिख आपन आपु समुझि नंह**[नारी]**,औरनि का समुझावौ॥**
—गुरु रविदास, पृष्ठ ४०

अनेक प्रकारचे कौतुकपूर्ण सोंगाढोंगाची कला दाखविण्यासाठी तुम्ही कमर कसली तरी मूर्ख लोक स्वतःस समजून घेत नाहीत.ते दुसऱ्यांना काय समजविणार?

**कपट कीया रीझइ नहिं कैसौ, जगु करता**[दुसऱ्यांस.]**नहि कांचा।**
**कहि रविदास भजौ हरि माधौ, सेवग है मन सांचा॥**
—वाणी १५०, गुरु रविदास, पृष्ठ ४०

अनुक्रमणिका

कपटी सोंगे ढोंगे करून केशवास प्रसन्न करावयास तुम्ही जग निर्मात्या प्रभुस कच्चा समजता काय?म्हणून संत रोहिदास म्हणतात की, "सेवकांनी माधवास मनापासून भजले पाहिजे."

### (७) ब.अवडंबर (विधि कर्मकांड)

संत रोहिदास म्हणतात की, "जे अज्ञानामुळे सोंगे ढोंगे करतात, ते मायेचे पाश अधिक मजबूत करतात.अशामुळे प्रभुप्राप्ती होत नाही.

**कहा डिंभ**[अवडंबर]**बाहर कीयै, हरि कनक**[सोने]**कसौटी हार**[परमेश्वर आपले भक्तीरूपी सोने सत्याच्या कसोटीवर पारखतो]**।**
**कहा भयौ**[झाला]**बहु पाखंड**[ढोंगी]**कीयै, हरि हिरदै सुपिन**[स्वप्न]**न जांन।**
**ज्यू**[ज्याप्रमाणे]**दारा बिभचारिनी, मुख पतिव्रता जीय**[जीव, प्राण]**आन॥**
—वाणी ६५, गुरु रविदास, पृष्ठ ४०-४१

अंगात कफनी घालणे, गळ्यात माळा घालणे, कपाळास गंध लावणे इत्यादी बाह्य अवडंबर केल्याने परमेश्वर प्राप्ती होऊ शकत नाही.कारण परमेश्वर आपली भक्तिरूपी सोन्याची खरी कसोटी लावून परीक्षा करीत असतो.दिखाऊ सोंगे ढोंगे केल्याने हरि प्राप्ती होईल हे स्वप्नातही आणू नका.कारण ज्याप्रमाणे व्यभिचारिणी पत्नीने पतिव्रतेचा कितीही आव आणला, तरी ती खरी पतिव्रता होऊ शकत नाही.त्याप्रमाणे बाह्य सोगांढोंगांनी परमेश्वर प्राप्त होऊ शकत नाही.

**अंतर गति रांचै नही**[जो मनापासून प्रभुभक्ती करीत नाही]**,बाहर करे उजास**[दिखाऊपणा]**।**
**ते नर जमपूर**[यमपूरी]**जहिगे, सत भाषै'रविदास' ॥**
—रविदास दर्शन १७९, गुरु रविदास, पृष्ठ ४१

जी माणसे मनापासून प्रभु भक्ती करीत नाहीत.तर ती माणसे प्रभुभक्ती केल्याचा आव आणतात.अशी मनुष्ये नरक प्राप्तिसाठी यमपुरीस जाणार ही सत्य भाषा रोहिदास सांगतात.

**देता रहे हज्ज़ार बरस, मुल्ला चाहे अजान**[बांग]**।**
**'रविदास'खुदा नंह मिल सकइ, जौ लौं मन शैतान॥**
— रविदास दर्शन ७४, गुरु रविदास, पृष्ठ ४१

"मुल्ला-मौलवी मशिदीमध्ये हजार वर्षे मोठमोठ्याने बांग देत प्रार्थना करीत राहिले.तरी ज्यांचे मन कपटी आहे.अशांना परमेश्वर प्राप्ती होऊ शकत नाही."असे संत रोहिदास सांगतात.

**माथै तिलक हाथ जप माला, जग ठगने कूं स्वांग बनाया।**
**मारग छांडि कुमारग डहकै**[फसतात.]**,सांची प्रीत बिनु राम न पाया॥**
—रविदास दर्शन दोहा क्रमांक ६६

अनुक्रमणिका

जे जगाला फसविण्यासाठी कपाळास गंध लावतात.हातामध्ये जपमाळा जपतात.सोंगेढोंगे करतात.ते अशा कुमार्गास फसतात.त्यांनी मनापासून परमेश्वर भक्ती न केल्यास, परमेश्वर प्राप्ती होणार नाही.

## (८) अ.स्वैराचारी मन

परमेश्वर सर्वामध्ये आहे.तरीसुद्धा आम्ही त्याच्यापासून दूर झालो आहे.त्यास प्राप्त करण्यात अडचणी आहेत.कारण आम्ही मनाप्रमाणे वागतो.

**मन मोरा**[माझे]**माया मंह लपटानो।**
**विसासक्त रहियो निसबासर**[रात्रंदिवस]**अजहुं नहिं अधानो॥**
— वाणी १४५

आमचे मन मायेत गुरुफटले आहे आणि हे मन विषयासक्त झाल्यामुळे त्याची भूक अजून संपलेली नाही.

**मै का जानौं देव मै का जानौं, मन माया के हाथि बिकानौ।**
**चंचल मनवां चहुं दिस धावै, पाँचौ इंद्री थिर न रहावै॥**
**इन मिलि मेरौ मन जु बिगारियो, दिन दिन हरि जी सू अंतर पारियौ।**
**जम दूत न बहु विधि करि मारयौ, तउ निलज मन अजहूं नहि हारयौ॥**
—वाणी १०७

हे प्रभु, मी काय जाणू शकतो?मी मन व माया यांना विकलो गेलो आहे.माझे चंचल मन चोहोकडे उधळते.पंचेंद्रिये शांत राहत नाहीत.मन व पंचेंद्रिये यांनी मिळून मला बिघडून टाकले आहे.दर दिवशी त्यांनी माझ्यात आणि परमेश्वरात अडचणीमुळे अंतर पाडले आहे.तसेच यमदूत निरनिराळ्याप्रकारे मला त्रास देत आहे.परंतु माझे निर्लज्ञ मन अजून शांत झाले नाही.

## (८) ब.स्वैराचारी मन

आपले मन हे नेहमी सुखाच्या शोधात असते.त्याची तहान कधी भागत नाही.हे मन मायेच्या जाळ्यात सापडून विषयसुख हेच साधन आहे असे मानत असते.त्यामुळे आपणांस अनेक त्रास भोगावा लागतो.

**बरजि**[सोडवा]**हो बरजि बीठुले**[विठ्ठला]**,माया जग खाया।**
**महा प्रबल सब ही बसि कीये, सुरनर मुनि भरमाया॥**
—वाणी ४०, गुरु रविदास, पृष्ठ ८४

हे विठ्ठला, ही माया जगाचा नाश करीत आहे.ती एवढी महाप्रबल झाली आहे की, तिने देवांना व माणसांना भुलविले आहे.

अनुक्रमणिका

**माइआ दीपकु**[मायारूपी दीपक]**पेषि**[समजून]**करि, नर पतंग अंधियाय**[आंधळे होणें]**।**
**रविदास गुरू रा ग्यान बिनु, विरला कौ बचि जाय॥**
—वाणी (साखी) १६, गुरु रविदास, पृष्ठ ११९

संत रोहिदास म्हणतात की, माणसे मायेच्या ज्योतीवर पतंगाप्रमाणे उडी मारतात.सद्‌गुरूच्या ज्ञानाशिवाय या मायेतून कोणीच सुटका करून घेऊ शकत नाही.

**यहु संसार कजलि कूं कोठर, अरू विष हऊं रा कुवा**[अहंकाररूपी विषाची विहीर]**।**
**कहि रविदास हौमैं जग खाया, ज्यौं नलिनी भू सूवा**[पोपटवाला पोपटाचा आवज काढून पोपटांना पकडतो]**॥**
—वाणी २७४, गुरू रविदास, पृष्ठ २०४

संत रोहिदास म्हणतात की, "हे जग जणू काय अंधार कोठडी आहे.अहंकारुपी विषाने भरलेली विहीर आहे.ज्याप्रमाणे पोपटवाला पोपटाप्रमाणे आवाज काढून पोपटांना पकडतो.त्याप्रमाणे हा अहंकार (मी पणा) जगाला त्रास देत आहे."

## (९) कर्मवाद

कर्माच्या अनुलंधनीय नियमांचे स्पष्टीकरण करतांना संत रोहिदास म्हणतात की, "आपल्या कर्माचे फळ भोगण्यासाठी आपल्याला वरचेवर अनेक योनीमध्ये जन्म घ्यावा लागतो."

**जौ जिहि**[जसे]**करे वैसा ही पावै, करम फल तति**[तसे]**काल निबेरे।**
—वाणी १७४, गुरू रविदास, पृष्ठ ४३

जो जसे कर्म करतो, तो त्याचे तसे फळ भोगतो, कर्माचे फळ कर्त्याचा पाठलाग करीत असते.

**जीअ जंत जहा जहा लगु करम के बसि जाइ।**
**काल फास अवध लागे कछु न चलै उपाइ॥**
—वाणी ४७, गुरू रविदास, पृष्ठ ४३

केलेल्या कर्मानुसार प्राणीमात्र जन्मास घातले जातात व मृत्यूच्या फासात अडकले जातात.येथे मुक्ततेचा कोणताही उपाय चालत नसतो.

**जो कछु बोवा लुनियै**[भोगणे.]**सोई, ता में फेर फार नहिं होई।**
**छाडिअ कूड भजौ हरि चरना, ताका मिटै जनम अरू मरना॥**
—वाणी ८०, गुरू रविदास, पृष्ठ ८४

अनुक्रमणिका

आपण जे पेराल तेच उगवेल.त्यात बदल होणार नाही.वासना सोडून हरिचरणी भजा म्हणजे जन्म मरणाचे फेरे चुकतील.

**लियो विविध योनि बास, जम की अगम त्रास,**
**तुम्हरे भजन बिन भ्रमत फिरयो।**

—वाणी ८०, गुरू रविदास, पृष्ठ ४३

मी निरनिराळ्या योनीत जन्म घेतला आणि मेलो.यमाचा त्रास घेतला.परंतु हे प्रभु, मी तुझे भजन केल्याशिवाय फिरतच राहिलो.

**अनेक बारू जम्म**[जन्म घेतला]**अरू मरिये, फुनि हौं भ्रमरि न परि हैं।**
**पतरि नाव खेवटिया**[वल्हविणे.]**गुरू रामा, नांम लेत ही तरि हैं॥**

—वाणी १५३, गुरू रविदास, पृष्ठ ४३

मी पुष्कळ वेळा जन्मलो आणि मेलो.आता पुन्हा ह्या भोवऱ्यात पडणार नाही.मी माझी कुजकी होडी सदगुरूच्या कृपेने हरिनाम घेत पैलतीरावर तरून जाईन.

## (१०) मनाची एकाग्रता

जोपर्यंत मन स्थिर होत नाही, तोपर्यंत अंतर्मुखी अभ्यासात मन लागत नाही व अंतर्मुखी अभ्यासाशिवाय ईश्वरप्राप्ती आणि जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका होत नाही.

**मन मलीन विषिया**[विषय]**रस लंपट, तौ हरि नांव संभालै॥**

—वाणी ८८, गुरू रविदास, पृष्ठ ४४

**भावार्थ .**—हे प्रभु, विषय वासनेत लंपट झालेल्या माझ्या चंचल मनास स्थिर केल्याशिवाय, त्यास शांत बसविता येणार नाही.तोपर्यंत तूच माझी संसाररूपी होडी वल्हव.

**सु कछु विचार यौ, ताथै मेरो मन स्थिर**[स्थीर]**है रह्यौ॥टेक॥**
**हरि रंग लागौ ताथै, मेरो वरन पलटि भयो॥**

— वाणी ४४, गुरु रविदास, पृष्ठ ४४

**भावार्थ .**—ज्यापासून माझे मन स्थिर होईल, अशा काही साधनांचा विचार करा, रोहिदास म्हणतात की, “प्रभु प्रेमाचा रंग लागल्यामुळे माझा काया पालट झाला.[स्थीर]’

**इक बुंद**[थेंब]**सौं बुझि गई, जनम जनम की प्यास**[तहान]
**जनम मरन बंधन टूटई, भये‘रविदास’ खलास**[समाप्त झाला]**॥**

— रविदास दर्शन ४४, गुरु रविदास, पृष्ठ ४४

अनुक्रमणिका

**भावार्थ .**—त्या विचित्र व अभ्द्रुत थेंबाने माझी जन्म जन्मांतरीची तहान भागविली आहे.त्याने माझ्या जन्म-मरणाची सर्व बंधने तोडली आहेत.त्या एका ब्रह्म थेंबास प्राप्त करून रोहिदास जन्ममरणाच्या फेऱ्यातू मुक्त झाला.

**'रविदास' मदुरा**[दारु]**का पीजियै, जौ चढ़ै चढ़ै उतराय।**
**नांव महारस पीजियै, जौ नाहि उतराय॥**

—रविदास दर्शन ३५, गुरु रविदास पृष्ठ ४४

**भावार्थ .**—संत रोहिदास म्हणतात की, "जी दारू प्याल्याने नशा चढते आणि उतरते.जर नशा येण्यासाठी प्यायची असेल तर नामरुपी महारस प्यायला पाहिजे.प्रभु नाम स्मरणरुपी महारसाची नशा एकदा चढली की पुन्हा ती कधीच उतरत नाही."

## (११) नामभक्ती

नामभक्तिमुळेच परमेश्वराविषयी प्रेम निर्माण होते व प्रभुचा सहवास लाभण्यात यश मिळते.परमेश्वर सर्व व्यापी आहे आणि तो आपल्या सर्वात आहे.परंतु नामाशिवाय प्रभू प्रकट होत नाही.म्हणून संत रोहिदास म्हणतात की, "आपल्यामध्ये गुप्त अथवा अव्यक्त रुपाने असलेल्या परमेश्वरास प्रकट किंवा अव्यक्त करण्याचे एकमात्र साधन नामच आहे."

**सब्ब**[सर्व]**निवासी राम जू, सब घट रह्यो समाई।**
**'रविदास' नाम चकमक बिना, हक**[परमेश्वर]**नूर**[प्रकाश]**आद्रिस्टाइ**[अदृश्य (न दिसणारे)]**॥**

—रविदास दर्शन ४, गुरु रविदास, पृष्ठ ४४

**भावार्थ .**—सर्व प्राण्याच्या हृदयात तो सर्वव्यापी परमेश्वर आहे.तरीसुद्धा नामाच्या चकमकी शिवाय सत्याचा प्रकाश दिसत नाही.

## (१२) (अ) नाम भक्तिचा महिमा

**'रविदास' हमारो बांधला**[आसरा]**हइ**[आहे]**केवल नाम आधार॥**

—रविदास दर्शन १०१, गुरु रविदास, पृष्ठ ४५

**भावार्थ .**—संत रोहिदास नाम भक्तीवर सर्वांत जोर देतात.नाम हेच त्यांच्या आध्यात्मिक भक्तीचा सार आहे.

**मोहि अधारू**[आधार]**नामु नाराईन, जीवन प्रान धन मोरे**[माझा, माझे]**॥**

अनुक्रमणिका

—श्री आदि ग्रंथ, पृ.९७४—वाणी १४, गुरु रविदास, पृष्ठ ४५

**भावार्थ .**—केवळ नामच त्यांच्या जीवनाचा एक मात्र आधार आहे.बाह्यपूजाअर्चाचे प्रकार असत्य व फुकट असल्याचे संत रोहिदासांनी दाखवून, नामभक्ती हीच खरी जीवन सर्वस्व साधना आहे.

## (१२) (ब) नाम भक्तिचा महिमा

**नामु तेरो आरती भजनु**[भजन]**मुरारे। हरि के नाम बिनु**[शिवाय]**झूठे सगल पासारे॥टेक**

—श्री आदि ग्रंथ, पृ.६९४, वाणी ११४, गुरु रविदास, पृष्ठ ४५

**भावार्थ.**—हे प्रभु,तुझे नाव हीच माझी आरती आहे. तीच माझी पूजा आहे. हरीच्या नामाशिवाय सर्व धार्मिक आचार-विधी खोटे आहेत.

**नामु तेरो आसनो नामु तेरो उरसा** [सहाण] **। नामु तेरा केसरो ले छिटकारे ॥**
**नामु तेरा अंभुला** [पाणी] **नामु तेरो चंदनो । घसि जपे नामु ले तुझहि कउ चार** [अर्पण करणे]**॥ १ ॥**

— श्री आदि ग्रंथ, पृ. ६९४, वाणी ११४, गुरु रविदास, पृष्ठ ४५

**भावार्थ .**—तुझे नाव हेच आसन आहे. तुझे नाम हेच माझे केशर आहे.त्या केशराचे पाणी मी तुझ्यावर शिंपडतो.तुझे नाम हेच पाणी आहे.तुझे नाव हेच चंदन आहे.तुझ्या नामाच्या जपाने किंवा स्मरणाने मी नामरुपी चंदन घासून तुला लावतो.

**नामु तेरा दीवा नामु तेरो बाती। नामु तेरो तेलु ले माहि पसारे॥**
**नाम तेरे की जोति लगाई। भईओ उजिआरो भवन सगला रे॥२॥**

—श्री आदि ग्रंथ, पृ.६९४, वाणी ११४, गुरु रविदास, पृष्ठ ४५

**भावार्थ .**—तुझे नाम हाच दिवा आहे.तुझे नाम हीच वात आहे.तुझे नाम हेच तेल मी दिव्यात ओततो.तुझे नाम घेऊनच मी ज्योत लावली.त्या ज्योतिच्या प्रकाशाने सगळे घर प्रकाशमय झालेले आहे.

**नामु तेरो तागा नामु फुल माला। भार अठारह**[अठरा]**सगल जूठा रे॥**
**तेरो कीआ तुझहि किया अरपउ। नामु तेरा तुही चंवर ढोला रे॥**

—श्री आदि ग्रंथ, पृ.६९४, वाणी ११४

**भावार्थ .**—हे प्रभु, तुझे नाव धागा.तुझे नाव म्हणजे पुष्पहार आहे.आम्ही पूजेत वाहात असलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या पानांचे अठरा गठ्ठे अपवित्र झालेले आहेत.तरी तू निर्माण केलेल्या वस्तु मी तुला कशा वाहू?

**दस अठा**[अठरा]**अठसठे**[अडुसष्ठ]**चारे खाणी इहै। वरतणि है सगल संसारे॥**

अनुक्रमणिका

**कहे रविदासु नामु तेरो आरती। सति नामु है हरि भोग तुहारे॥४॥**

—श्री आदि ग्रंथ, पृ.६९४, वाणी ११४, गुरु रविदास, पृष्ठ ४६

**भावार्थ .**—सर्वजण अठरा पुराणे व अडुसष्ट तीर्थक्षेत्रात बुडून गेलेले आहे.चार वर्णात ह्या जगाची परिक्रमा चालू आहे.संत रोहिदास म्हणतात की, "तुझ्या सत्यनामाचा नैवेद्य मी तुला अर्पण करतो."

## (१३) नामाची ओळख

संत रोहिदासांनी स्पष्ट सांगितले आहे की, "ज्या नामाची महिमा आम्ही गातो, तसेच ज्याला आम्ही नाम, राम-नाम, वाणी शब्द किंवा अनहद नाद म्हणून संबोधतो, ते धर्मग्रंथात लिहिलेल्या नामाहून भिन्न व उच्च दर्जाचे आहे.त्याची बरोबरी वर्णात्मक नाम करू शकत नाही."

**नाना खिआन**[आख्यान]**पुरान बेद विधि चउतीस**[चौतीस अक्षरे, वर्णमाला]**अखर मांही।**
**बिआस**[व्यास]**बिचारि कहिओ परमारथु राम नाम सरि नाही**[व्यासाने सांगितल्याप्रमाणे चौतीस अक्षराने बनलेल्या कोणत्याही वर्णनात्मक रामनामाची (अनहद नाम किंवा धुनात्मक नाम) बरोबरी करू शकत नाही.]**॥**

—श्री आदि ग्रंथ, पृ, ६५८, वाणी १२९, गुरु रविदास पृष्ठ ४६

**भावार्थ .**—वेगवेगळ्या शास्त्रग्रंथात, पुराणात, वेदात ईश्वराची जी भिन्न नावे आहेत ती सर्व अक्षरबद्ध आहेत.व्यासानी काळजीपूर्वक परिशीलन करून आध्यात्मिक सत्य सांगितले पण त्यापैकी एकही परमेश्वराच्या खऱ्या नावाच्या बरोबरीला उतरले नाही.असे संत रोहिदासांना अभिप्रेत आहेत.

खालीलप्रमाणे नामाचे दोन प्रकार आहेत :—

**(१) वर्णात्मक नाम.**—लिहिण्याबोलण्यात आलेले नाम होय.यात व सत्यनामात फरक करणे कठीण काम आहे.खरे नाम म्हणजे आध्यात्मिक शक्ती नाही.तसेच अक्षरबद्ध केलेला शब्दही नाही.खऱ्या नामाचे गुढ हे सदगुरूकडूनच समजू शकते.

**(२) धुणात्मक नाम.**—हे नामच संत रोहिदासांना अभिप्रेत आहे.अशा नामाशिवाय अध्यात्मामध्ये प्रगती होऊ शकत नाही.नाम हे एकमेव सत्य आहे.नाम म्हणजे मोक्षाचा दरवाजा आहे.

## (१४) नाम माहात्म्य

ज्यावेळी आम्ही आपले ध्यान तिसऱ्या तिळात एकाग्र करून सदगुरूने प्रेमपूर्वक दिलेल्या वर्णात्मक नामाचे स्मरण करू, तेव्हाच आपल्या आतील शब्द व प्रकाश प्रकट होतात.हे स्पष्ट करताना संत रोहिदास म्हणतात की,—

**'रविदास' सत्त इक नाम है, आदि अंत सचु नाम।**
**हनन**[मारणे.]**करेइ सभ पाप ताप, सत्त सुखन करि खान॥**

अनुक्रमणिका

—रविदास दर्शन दोहा क्रमांक २५

नामाला अनादी आणि अनंत सत्य म्हणतात. नाम हे पापांना नष्ट करण्याचे व संसार रुपी सागर तरून जाण्याचे एक मात्र साधन आहे.

**सत्त ईश कहुं रूप है, सत्त सक्ति अत अपार।**
**'रविदास' सत्त कूं धारणा, देइहिं पाप निबार**[नष्ट होणे]**॥**

—रविदास दर्शन दोहा क्रमांक २३

सत्य ईश्वराचे स्वरूप आहे. सत्यामध्ये प्रबल शक्ती आहे. सत्याने वागल्यास सर्व पापे नाहीशी होतात.

**नाम मूल है ग्यान कौ, नाम मुक्ति कौ दबार।**
**जा हिरदै हरि बसे, परहिं न जग बौपार**[व्यापार]**॥**

—वाणी (साखी) ३९, गुरु रविदास, पृष्ठ १४४

सर्व ज्ञानाचे मूळ नाम आहे. नाम अर्थात मोक्षाचा दरवाजा. एकाद्याचे हृदय हरि भक्तिने भरून गेले तर तो जगाच्या कोणत्याच व्यापार मोहपाशात पडत नाही.

**भौ सागर रा तरन कूं, एकौ नाम अधार।**
**रविदास कभउं नहिं छांडिये, राम नाम पतवार॥**

—वाणी (साखी) १०, गुरु रविदास, पृष्ठ १४३

नाम हेच भवसागर तरून जाण्याचे एकमेव साधन आहे. म्हणून संत रोहिदास सांगतात की, "ईश्वराचे नामरुपी सुकाणू सोडू नका."

## (१५) अ. जपाचे फलित

**साचा सुमिरन नांव विसासा, मन बच कर्म कहै 'रविदासा' ॥**

—वाणी ७३ वानी ५७

संत रोहिदास सांगतात की, "नामस्मरण हेच परमात्म्याची भक्ती करण्याचे साधन आहे. म्हणून आम्हांस याच्या विश्वासाने अखंड चिंतनाने अभ्यास केला पाहिजे."

**अंतर्मुखी भई**[होणे]**जउ करहि, सत्त नाम करि जाप।**
**'रविदास' तिन्ह सौ भजहु हि, जगतह तीन्हहु ताप॥**

—दर्शन ३६, गुरु रविदास पृष्ठ १५६

मनातील स्मरण किंवा जपाच्या अभ्यासामुळेच जगातील आदिभौतिक, आध्यात्मिक व आदिदैविक असे तिन्ही ताप नाहीसे होतात.

अनुक्रमणिका

**सुमिरन कोटि अघन[पाप]को, है हि समन रविदास।**
**ज्यू हि अघ निरमूलिये, परम जोत परगास॥**

—वाणी (साखी) ११, गुरु रविदास, पृष्ठ १५७

स्मरण कोटी पापांना नाहीसे करते आणि प्रकाशाच्या संपर्कात येताच दुखाःपासून आपली सुटका होते.

### (१६ ब.) जपाचे फलित

**संत उतारे आरती देव सिरोमनिऐ।**
**उर अंतरि तहाँ बैसि बिन रसना भजीऐ॥**

—वाणी ११३.

साधु संत परमेश्वराची आरती ओवाळतात व हृदयात परमेश्वराचे नामस्मरण करतात.तेव्हा त्यांच्या सभोवारच दिवे प्रकाशमान होतात.

**रविदास राति न सोविये, दिवस न करिये सुआद।**
**अह निसि हरि जी सिमरिये, छांडि सकल प्रतिवाद॥**

—वाणी (साखी) ७, गुरु रविदास, पृष्ठ १५५.

आपण रात्रंदिवस नामस्मरण केले पाहिजे.मनाशी झगडा करणाऱ्या किंवा मनास मोहीत करणाऱ्या गोष्टींचा त्याग करा.

**'रविदास' अराधहु देवकु इकमन हुइ धरि ध्यान।**
**अजपा जाप जपत रहहु, सत्तनाम सत्तनाम॥**

—दर्शन ३९, गुरु रविदास, पृष्ठ १५७.

चित्त एकाग्र करून नामस्मरण करण्याच्या अभ्यासामुळे स्मरण आपोआप नेहमी होऊ लागते.त्यास संत रोहिदास किंवा इतर संत त्यास 'अजपा जाप' म्हणतात.

**सुरत शब्द जउ एक हों, तउ पाइ[प्राप्त करणे]हि परम आनंद।**
**'रविदास'अंतर दीपक जरई[जळणे]घट उपजई ब्रह्म अनंद॥**

—दर्शन ७७, गुरु रविदास, पृष्ठ १०४.

एकाग्र भावाने केलेल्या स्मरणाने आतील ज्ञानदीप प्रकाशमान होतो व परम सुखाचा आनंद होतो.

अनुक्रमणिका

## (१७ अ.) परमात्म्याची ओळख

**चित सुमिरनु करउ नैन अविलोकनो, श्रवन[ऐकणे.]वानी सुजस पूरि राखउं॥**
—श्री आदी ग्रंथ, पृ.६९४, वाणी १०२.

संत रोहिदास म्हणतात की, "एकाग्र चित्ताने स्मरण केल्याने आतील प्रकाशीत पहाण्याची व अनहद नाद ऐकण्याची शक्ती प्राप्त होते.तेव्हा आमची आध्यात्मिक साधना सफल होते."

**आरती करत हंसै मन मेरो, आवत[येणे]चित्त तुव रूप धनेरो॥टेक॥**
**नाम की बाती घीव[तूप]अखंडा, इक ही जोत जलै ब्रह्मंडा॥२॥**
**मन बच करम 'रविदास' धिआवा[ध्यान],घंटा झालर मनहि बजावा॥**
—वाणी १७७, गुरु रविदास, पृष्ठ ५४.

हे प्रभु, माझे मन आरती करत हसते.मनात केलेल्या आरतीचे महत्त्व अनन्य साधारण आहे.आपल्यातील परमात्म्याचे सहज स्वरूपाचे दर्शनप्राप्त करून घेतो.नामरूपी वातीची ज्योत तुपामध्ये अखंड जळत जगाला प्रकाश देते.संत रोहिदास म्हणतात, "एकाग्रतेने ध्यान केल्यावर आपल्या मनात घंटा वाजते."

**'रविदास' दिआ[दिवा]जगमग जरई[जळणे],बिन वाती बिन तेल।**
**सुरत साधिकर हिय मंहि, देख पिया के खेल॥**
—रविदास दर्शन, दोहा क्रमांक ८०.

संत रोहिदास म्हणतात की, "एकाग्र चित्त केल्यास तेल व वातीशिवाय दिवा झगमग जळत प्रकाशमान होतो व आपणांस परमात्म्याचे दर्शन घडते."

**जा कारनि मैं दौरा फिरतौ, सो अब घट मे आई॥५॥**
**पांचो मेरी सखी सहेली[पांच आंतरिक धुना],तिन निधि दई दिखाई।**
**अब मन फूलि भयो जग महियाँ, उलटी आप मंह समाई[आनंदीत होणे.काशिनाथ उपाध्याय, गुरु रविदास, प्र.सं.१९८३, पृ.५४, ५५.]॥६॥**
—वाणी २, वाणी ३.

अनेक योनीतून फिरून मनुष्य जन्म प्राप्त झाला आहे.पाच सखी सहेली म्हणजे पांच आंतरिक धुना होय.ज्यांना आकृष्ट होऊन आत्मावर चढतो व सर्व आंतरिक खजिन्यास प्राप्त करून घेतो.ध्यान समाप्त होताच मन उदास होते.बेचैन होते.परंतु आता हृदयकमल उमलले आहे.

## (१७ ब.) परमात्म्याची ओळख

अनुक्रमणिका

**सहस्त्रार मंह भंवर गुफा है, भंवरा गुंज करै।**
**दिल दरियाव हीरा लाता है, गुरमुख समझ परै॥**

—वाणी १५८, गुरु रविदास, पृष्ठ ५४.

संत रोहिदास म्हणतात की, "योगी योगावस्थेत असतो, तेव्हा अनहदनादचा आवाज नेहमी होत असतो.परंतु हा आवाज योगी पूर्ण स्थितिस प्राप्त करुन घेतो, तेव्हाच होत असतो.ज्या व्यक्तिवर गुरुची कृपा आहे व तो मोठ्या अंतरकरणाचा आहे, तीच व्यक्ति भगवानाचे रुप पाहू शकते."

**घीव अखंडा सोहै बाती, त्रिकुटी जोत जलै दिन राती।**
**सहस्त्र कंवला**[प्राण गेल्यानंतर ज्या दृदयचक्रात योग्यास 'अनहद नाद' ऐकू येतो.ते ह्रदयचक्र.]**सिंघासन राजै, अनंहद**[योगी जेव्हा अन्तर्मुखी साधनेत लीन होतो, तेव्हा त्याच्या मनस्थितीमध्ये अलौकीक शब्द होतो.]**झांजन नितही बाजै॥**

—वाणी १७६, गुरु रविदास, पृष्ठ ५४.

संत रोहिदास म्हणतात की, "योगी योगाच्या पूर्णस्थितीत असता, त्याच्यात अनहद नाद गुंजत राहतो आणि तो नंदादीपाप्रमाणे नेहमी प्रज्वलित राहतो.सहस्त्र कंवलच्या स्थितिमध्ये अनहद नादाची परम अभिव्यक्ती ऐकू येते आणि तो पूर्ण योगाच्या अवस्थेत संभव आहे.जो विधीची योगाची पूर्ण स्थिती प्राप्त करतो.तोच परमपदास प्राप्त करून घेतो.परंतु हे गुरुशिवाय संभव नाही."

**'रविदास' सब्दह सह जबहि, सुखह इकमिक होई।**
**अनुभूति सत्त नामह, स्वयं देतहीं लोई॥**

—रविदास दर्शन ७८.

जेव्हा प्रभुनामाचा जप आणि स्मरण दोन्ही एक होऊन जातात, तेव्हा त्या ध्यानमग्न अवस्थेत प्रभुच्या सत्त नामाचा अनुभव होऊ लागतो.तेव्हा मन मंदिरात त्याची ज्योत स्वयंमेव प्रकाशित होते.

## (१८) अश्रद्ध माणूस

**ध्रिगु**[धिक्कार.]**धिग्रु जीवंणु राजे राम बिना**[शिवाय]**॥टेक॥**
**देहि नैन**[डोळे]**बिनु, चंद रैन**[रात्र]**विनु, ज्यूं मीना**[मासा]**गहरू जैल बिना।**
**हसती**[हत्ती]**सुंड बिनु, पंषी**[पक्षी]**बिनु, जइसोइ मन्दिर दीप बिना॥१॥**
**जइसे ब्राह्मण वेद बिहूंणा, तैसोइ पाणी तुझ नाम बिना॥**

—वाण १७२, गुरु रविदास, पृष्ठ १६३.

संत रोहिदास अश्रध्द माणसांचा धिक्कार करतांना म्हणतात की, "मानव जन्म घेऊनही रामनामाशिवाय जे लोक जगतात, त्यांचा मी धिक्कार करतो.अशा लोकांना मोक्षाची मुळीच आशा नसते.त्यांचे जीवन व्यर्थ-फुकट आहे.डोळ्याशिवाय प्राणी, रात्रीशिवाय चंद्र, पाण्याशिवाय मासा, सोंडेशिवाय हत्ती, पंखाशिवाय पक्षी, दिव्याशिवाय मंदिर, वेदाशिवाय ब्राह्मण, त्याप्रमाणे परमेश्वराच्या नामाशिवाय मनुष्यप्राणी व्यर्थ आहे."

अनुक्रमणिका

**कोटी जग्य[यज्ञ]जौ कौउ करै, राम नाम बिन तोऊ न निसतरे[मुक्त]।**

—वाणी ५०;बानी ६७.

जरी कोणी कोटी यज्ञ केले तरी रामनामाशिवाय तो मुक्त होऊ शकत नाही.

### (१९ अ.) गुरू माहात्म्य

**संत तुझी तनु संगति प्रान। सतिगुर[सदगुरु]गिआन[ज्ञान]जानै संत देवा देव।**
**'रविदासु' भणै जो जाणै सो जाणु। संत अनंतहि अंतरू[अंतर]नाही॥**

—श्री आदि ग्रंथ, पृ.४८६ वाणी १३२, गुरु रविदास, पृष्ठ १३६.

"हे प्रभु, संत हे तुझे शरीर, त्यांची संगत तुझा प्राण आहे.सदगुरूच्या ज्ञानामुळेच मी त्याना देवांचा देव मानले आहे.संत आणि देवामध्ये काहीच अंतर नाही.असे जो जाणतो, तोच खरा प्रज्ञावान होय."संत रोहिदास म्हणतात की,"दुर्लभ अशा परमेश्वराची भेट करून देणारे गुरू आणि परमेश्वर एकच आहेत."

**हरि गुर[गुरु]साध[साधु]समान चित्त, नित आगम तत्त[तत्त्व]मूल।**
**इन बिच अंतर जिन परौ, करबत सहन कबुला॥**

—दर्शन १८१, गुरु रविदास, पृष्ठ ११६.

देव, गुरु व संत यांचे चित्त (एकसारखे असते) हे एकच आहेत.यांचेमध्ये कोणताही फरक करू नका.करवतीने डोके कापले जात असता, होणाऱ्या असह्य वेदना सहन करा.पण त्या तिघामध्ये फरक-भेद करू नका.

**समाधि थिति[स्थिती]संत जन, अपनहु अप्प[मीपणा (अहंकार)]मिटांहि।**
**जिमि[ज्याप्रमाणे]गंग[गंगानदी]समुंद[समुद्र]मिलि, 'रविदास'समुंदहिं बिलाहि[विलीन होणे]॥**

—वाणी (साखी) २४, गुरु रविदास, पृष्ठ ११६.

संत घ्यानस्थ बसून, आपला मीपणा (घमेंड) नाहीसा करतात.ज्याप्रमाणे गंगानदी समुद्रास मिळून एकरुप होते.त्याप्रमाणे रोहिदास त्या परमेश्वराशी मिळून एकरुप झाला आहे.

### (१९ ब.) गुरू माहात्म्य

प्रापंचिक दुःखातून सुटका होण्यासाठी व परमेश्वर प्राप्तीसाठी गुरुची किती आवश्यकता आहे.याबद्दल संत रोहिदास म्हणतात की .—

**पतरि[कुजकी]नाव[होडी]खेवटिया[वल्हविणे.]गुरु रामा, नाम लेत ही तरी हैं।**

—वाणी १५३.

अनुक्रमणिका

माझी जीवन नौका कुजकी आहे.परंतु सदगुरु कृपेने परमेश्वर नावाडी आहे.अशा सदगुरुकडून मी नामदीक्षा घेऊन पैलतिरावर जाईन.

**भौ सागर दुतर**[दुरूस्त (कठीण-भयंकर)]**अति, किधुं, मूरिष यहु जन।**
**'रविदास' गुरु पतवार**[सुकाणू]**है, नाम नाव करि जान॥**
—वाणी (साखी) १९.

"हे मूर्ख मानवा, संसार रुपी सागर महाभयंकर आहे.याची जाणीव असूदे.नामरुपी नौकेचा सुकाणू गुरु आहे."असे रोहिदास म्हणतो.

**जौ महि भजै भजऊं मैं ताकूं, हरि सिमरन तै पारी परी।**
**कहै 'रविदास' साध**[साधू.]**संगति मिलि, राम भजै तौ विपति टरि॥१॥**
—वाणी १४७.

संत सहवासामुळे जो परमेश्वराचे स्मरण करतो, त्याची सर्व दुःखे नाहीशी होतात.

## (१९ क.) गुरू माहात्म्य

**दिल दरियाव**[समुद्र]**हीरा लाल**[रत्न]**है, गुरमुख समझ परै।**
**मरजी वाकी सैन**[संकेत]**विचारै, तऊ हीरा हाथ परै॥३॥**
—वाणी १५८, गुरु रविदास, पृष्ठ १२०.

संत रोहिदास म्हणतात की .—

"महासागराच्या तळाशी पडलेल्या हिरे-रत्नांजवळ गुरुकृपेमुळे पोहचता येते.ती तुम्हांला हवी असतील तर सदगुरु मार्गदर्शनाचे विचारपूर्वक आचरण केले तरच ती रत्नमाणके हाताशी लागतील.

**पारस मानो ताबो**[तांबे]**छुए, कनक होत नहीबार॥५॥**
**परम पारस गुरु भेटीए, पूरब लिखत लिलाट।**
**उनमन**[अनमन]**मन मन ही मिले, छुटकत बजर**[वज्र]**कपाट॥६॥**
—श्री आदि ग्रंथ, पृष्ठ ३४६, वाणी ३०.

तांब्याने परिसाला स्पर्श केला तर त्याचे सोने होत नाही.पण लोखंडाने स्पर्श केला तर त्याचे सोने होते.तसेच सदगुरुरूपी परीस भेटल्यास सदभाग्य लाभते व आपले मन अंतर्मुख होऊन शांत होते.देहाचे बंद दरवाजे उघडले जातात.

**सतगुर हमहु लषाई बाट।**

अनुक्रमणिका

**जनम पाछले पाप नसाने, मिटिगौ सबु संताप॥**
**बाहरि षोजत जनम गंवाए, उनमनि ध्यांन रहे घट आप।**
**सबद अनाहद बाजत घट मंह, अगम**[अगम्य (असाध्य)]**ग्यान भौ गुरु परताप॥१॥**
—वाणी ५४.

सदगुरुने सन्मार्ग दाखविल्यामुळे गतजन्माची पापे नष्ट केली.सगळ्या वेदना, संताप नाहीसे केले.हृदयात दैवी संगतीचा नाद उमटून असाध्य अशी प्रज्ञा गुरु कृपेमुळे मला प्राप्त झाली आहे.

## (२०) संत संगती

संत संगतीची इच्छा व पापी माणसापासून दूर राहण्याच्या इच्छेबद्दल संत रोहिदास म्हणतात की,-

**संतची संगति संत कथा रसु, संत माझै दीजै देवा देव॥**
**अउर**[आणखी]**इक**[एक]**मांगउ**[मागणे.]**भगति चिंता मणि, जणी लखावहु असंत पापी मणी॥**
—श्री आदि ग्रंथ, पृ.४८६, वाणी १३२.

"हे प्रभु, मला संत संगतीची गोडी आहे.मला संताबद्दल अखंड प्रेम द्या.हे देवा, मी आपणांला आणखी एक मागणे मागतो.मला भक्तिरुपी रत्न द्या व पापी माणसे माझ्या दृष्टिस पडू देऊ नका."

**मिलत पिआरोप्रान नाथु कवन**[कोणत्या]**भगति तै।**
**साध संगति पाई परम गते**[अवस्था]**॥रहाउ॥**
—श्री आदि ग्रंथ, पृ.१२९३;वाणी १०४.

प्राणनाथ, मी तुला कोणत्या भक्तिने प्राप्त करू शकतो.संताच्या संगतीमध्येच अशा परम अवस्थेचीजाणीव होऊ शकते.

**साध संगति बिना भाउ नही उपजै, भाव बिनु भगति नही होई तेरी।**
—श्री आदि ग्रंथ, पृ.६९४;वाणी १०२.

साधुसंतांच्या सहवासाशिवाय स्वर्गीय प्रेम निर्माण करू शकत नाही.अशा प्रेमाशिवाय परमेश्वर भक्ती अशक्य आहे.

**तुम चंदन हम इरंड**[एरंड]**बापुरे, निकट तुम्हारे बासा॥**
**नीच ब्रिंष**[प्रवृत्ती]**ते उंच भए है, तुम्हरी बास निवासा॥३॥**
— वाणी ११६.

हे गुरुदेवा, तुम्ही सवासिक चंदनाचे झाड असून, मी एरंडाचे झाड आहे.तुमच्या सहवासाने मी सुवासिक झालो आहे.

अनुक्रमणिका

**माधउ संगति सरनि तुम्हारी। जगजीवन क्रिस्न मुरारी॥टेक॥**
**तुम मषतूल गुलाब चत्रभुज बपुरो जस कीरा।**
— श्री आदि ग्रंथ, पृ.४८६;वाणी ११६.

हे माधवा, जगजीवन, कृष्णमुरारी, मी तुला शरण आलो आहे.तुम्ही गुलाल, गुलाब, चत्रभुजाप्रमाणे थोर असून, मी किड्यासारखा क्षुद्र आहे.म्हणून मला तुझी संगती मिळत राहू दे.

## (२१) संत संगतीसाठी पथ्ये

प्राण्याची हत्या करून परमेश्वर प्राप्ती होणार नाही.तसेच मद्यमांस व इतर अंमली पदार्थ खाणेही त्याज्य मानले आहे.त्यासाठी संत रोहिदास म्हणतात की–

**'रविदास' जीव कूं मारि कर, कैसो मिलहिं खुदाय।**
**पीर पैगम्बर औलिया**[अवतार.]**,कोउ न कहइ समुझाय॥१॥**
–रविदास दर्शन दोहा क्रमांक १८२.

"देवाच्या नावाने प्राण्यांना मारून परमेश्वर कसा प्राप्त होणार?संत, प्रेशित व सदाचारी माणसांनी मारणाऱ्यास समजावून सांगितले नाही काय?"

**'रविदास' जो आपन हेत ही, पर कू मारन जाई।**
**मालिक के दर जाई करि, भोगहिं कड़ी सजाई॥४॥**
–रविदास दर्शन १८५.

आपल्या हितासाठी आपण दुसऱ्यांना मारू लागलो तर ईश्वर दरबारी पोहचल्यावर तेथे होणारी कडक सजा भोगायला नको का?

**अपनह गीव**[गळा, गर्दन]**कटाइहि, जौ मांस पराया खांय।**
**'रविदास' मांस जौ खात है, ते नर नरकहिं जाय॥१॥**
–रविदास दर्शन दोहा क्रमांक १८९.

"जो दुसऱ्याचे गळे कापून मांस खातो.तो मनुष्य नरकात जाणारच"असे राहिदास म्हणतो.

**'रोहिदास' जिम्भ्या**[जीभ]**स्वाद**[चव]**बस, जउ मांस मछरिया खांय।**
**नाहक**[विनाकारण]**जीव मारन बदल, आपन सीस कटाय**[आपले डोके कापणे]**॥**
–रविदास दर्शन दोहा क्रमांक १८७.

जो आपल्या जिभेचे चोचले पुरविण्यासाठी मांस-मासे खातो.जो दुसऱ्यांचे प्राण मारतो.त्याबद्दल तो एके दिवशी नरकात आपले डोके कापून घेतो.

अनुक्रमणिका

**सुरसरी सलल[पाणी]कृत बारूनी रे संत जन करत नहीं पान[पिणै]॥**

—श्री आदी ग्रंथ, पृ.१२९३;वाणी ५१.

अंमली पदार्थाचे सेवन करणे निरूपयोगी आहे.पवित्र गंगेच्या पाण्यापासून दारू तयार केली तरीसुद्धा संत ती पिणार नाहीत.

## (२२) आत्म शुद्धी

नामभक्तिच परमेश्वर भक्ती आहे.ती अहंकार नाहीसा करून परमेश्वर प्राप्ती करून देते.त्यासंबंधी संत रोहिदास म्हणतात की,—

**ऐसी भगति न होइ, रे भाई।**
**राम नाम बिनु जे कऊ[कोणी]करीए, सो सब भरम[भ्रम]कहाई॥ टेक॥**
**आपो[अभिमान]गयो तब भगति पाई, ऐसीभगति है भाई।**
**राम मिल्यौ अपनौ गुन खोयौ, रिद्धि सिद्धि सबै[त्यावेळी.]जु गंवाई॥**
**कहै'रविदास' छूटी सब आस, तब हरि ताही के पास।**

—वाणी २७.

अरे भाई, अशी भक्ती होऊ शकत नाही.रामनामाशिवाय जो भक्ती करतो, ती भक्ती नसून भ्रांतीआहे.मीपणा नाहीसा होईल, तेव्हाच खरी भक्ती सुरू होईल.गर्वाच्या त्याग करा व स्वतःला समर्पित करा.तेव्हाच हरी प्राप्त होईल.हरिशिवाय माझ्या मनाला शांति मिळणार नाही.

**इक चिंता सत्त नाम की, दरसाइहु परम तत्त।**
**सहज परम भगति भई, 'रविदास' पाईहि ब्रह्म सत्त॥**

—रविदास दर्शन दोहा क्रमांक ३८

मला सत्यनाम स्मरणाची चिंता लागली आहे.ती घेण्यासाठी सहज साधना आहे.सत्यनामाच्या सहज भक्तिमुळेच परम ब्रह्माची प्राप्ती होऊ शकते.

## (२३) अ.ईश्वर प्राप्तीची अभिलाषा

हे प्रभू, तुझ्या भक्तिनेच अहंकार-मीपणा नाहीसा होतो व ईश्वर प्राप्तिची इच्छा अधिकाधिर वाढत जाते.खरा भक्त व प्रेमीचा विरह अवस्थाचे वर्णन करताना संत रोहिदास म्हणतात की—

**चलत-हलत बैठत उठत, धरि हुं तुमरी ध्यांन।**
**रविदास तू मुहि[माझ्या]मन बसई, चरण कंवल[कमल]की आन[शपथ]॥**

अनुक्रमणिका

—वाणी (साखी) ३५

"हे प्रभू, चालता हलताना, बसता उठताना मी तुझेच ध्यान करतो."संत रोहिदास म्हणतात की, "तुला माझ्या पायाची शपथ आहे.तू माझ्या मनात बस."

**कोइल**[कोकिळा]**तरसै अंब**[आंबा]**कूं, चातिग**[चातक]**तरसत नीर**[पाणी]**।**
**रविदास लोच**[अभिलाषा]**दरस कूं, प्राण परत नही धीर॥**
—वाणी (साखी) ३३

कोकीलपक्षी आंब्याची अभिलाषा धरतो.चातक पक्षी पाण्याची अभिलाषा धरतो.संत रोहिदास म्हणतात की, "हे प्रभू, मी तुझ्या दर्शनाची अभिलाषा धरतो.त्याशिवाय मला शांति मिळणार नाही."

**ज्यू**[ज्याप्रमाणे]**सुधि आवत पीव की, विरह तन आगि।**
**ज्यूं चूने की कांकरी**[तुकडा]**,ज्यौं छिरक**[शिंपडणे]**त्यौं आगि॥**
—गुरु रविदास, पृष्ठ १८०

चुनखड्यावर पाणी शिंपडले असता, एकदम दाह निर्माण होतो.त्याप्रमाणे परमेश्वराचे स्मरण झाल्यावर परमेश्वर दर्शनासाठी अभिलाषारूपी अग्निने शरीर पेटल्यासारखे होते.

## (२३) ब.ईश्वर प्राप्तिची अभिलाषा

**'रविदास' मोरे मन लागियो, रामप्रेम को तीर।**
**राम रसायन**[रोग समूळ नष्ट करणारी औषधी.]**जउ मिलहिं, तउ हरै हमारो पीर॥**
—रविदास दर्शन दोहा क्रमांक ७१

संत रोहिदास म्हणतात की, "रामबाणाप्रमाणे माझे मन परमेश्वर चरणी लागेल.रामदर्शन मिळेल.तेव्हाच माझे दुःख नाहीसे होईल."

**दरसन दीजै राम दरसन दीजै।**
**दरसन दीजै हो विलंब न कीजै॥टेक॥**
**दरसन तोरा**[तुझे]**,जीवनि मोरा**[माझे]**,।**
**बिन दरसन क्यूं जीवै हो चकोरा॥**

—वाणी १०९

हे प्रभू, मला दर्शन दे.दर्शन देण्यास उशीर करू नकोस.तुझे दर्शन होणे हेच माझे जीवन होय.चंद्र दर्शनाशिवाय चकोर पक्षी जिवंत कसा राहील?

अनुक्रमणिका

**जो मोहि वेदन का सानि**[तारीफ, स्तुती]**आषौ**[आख्यान करणे, सांगणे]**,हरि बिन जीवन कैसे करि राखौं।**

**जीव तरसै इक दंगि बसेरा, करहु संभाल तुम सिरजन मेरा॥**
**बिरह तपै तन अधिक जरावै**[जळणे]**,नींदडी न आवै भोजन नहीं भावै॥१॥**
**कहैं'रविदास' अंदेसा**[भय, शंका]**ये ही, बिन दरसन क्यों जीवै हो सने ही॥**

— गुरु रविदास, पृष्ठ १८० व १८१

हरिदर्शनाच्या अभिलाषाने मी दुःखी आहे.मी माझे दुःख हरिशिवाय कोणाला सांगू?तुझ्या दर्शनासाठी माझा जीव तडफडतो आहे.हे देवा, तूच माझा सांभाळ कर.तुझ्या विरहभासामुळे माझे शरीर जळत आहे.मला झोप लागत नाही.भोजन खावत नाही.संत रोहिदास म्हणतात की, "हे प्रभू, तुझ्या दर्शनाशिवाय मी जिवंत कसा राहणार?हीच माझी खरी भक्ती आहे."

## (२४) ईश्वर प्राप्तिचा लाभ

जेव्हा प्रेमीची प्रियतम परमात्म्याशी भेट होते, तेव्हा विरह व्यथा शांत होते व प्रेमी आनंदाने नाचत, तसेच परमात्म्याचे प्रेम रूपी अमृत पितो व तो त्यामध्ये मग्न रहातो.ह्या अदभुत आनंदाचे वर्णन संत रोहिदास करताना म्हणतात की—

**प्रेम पंथकी पालकी, 'रविदास' बैठियो आय।**
**सांचे सामी मिलन कूं, आनंद कह्यो न जाय॥**

—रविदास दर्शन, दोहा क्रमांक ७०

खऱ्या स्वामीस भेटण्यासाठी प्रेमाचा मार्ग हीच पालखी आहे.त्या पालखीत संत रोहिदासाने आपली जागा स्वीकारली आहे.त्या आनंदाचे वर्णन करणे अशक्य आहे.कारण त्यास खऱ्यादेवाचे दर्शन घडणार आहे.

**पीतम**[स्वामी]**कूं जौ दरसन पाए, मन मन्दर मंह भयो उजियार।**
**हो मड़इ सैं नो निधि पाई, क्रिपा कीन्ही राम करतार॥२॥**
**बहुत जनम तौ बिछुरे पिव पायो, जनम-जनम की बिलइ**[नष्ट होणे]**रार**[भांडण.]

—वाणी १६८

परमेश्वररूपी प्रीतमच्या दर्शनामुळे माझे मनमंदिर उजाळून गेले आहे.अनेक विरह सहन करून मी प्रभुला मिळवले आहे.त्यामुळे माझे जन्मजन्माचे पाश आता संपले आहेत.

**निहचल आनन्द निधि मिलि, बिलगौ, आधि अपार।**
**रविदास राम सुमरण सार सौं, पायौ दरस मुरार॥**

—वाणी (साखी) १७

अनुक्रमणिका

शाश्वत सुखाचा ठेवा मिळाल्यामुळे माझ्या असंख्य यातना नाहीशा झाल्या आहेत.संत रोहिदास म्हणतात की, “राम नाम स्मरणामुळे मला परमेश्वराचे दर्शन लाभले.”

**पीआ राम रसु पीआ रे॥ टेक॥**
**पीवत पीवतु आपा जग भुला, हरि रस मांहि बौराना**[वेडे होणे,]**रे।**
**दर घरि बिसरि गयौ रविदासा, उनमनि सद मतवारी रे।**
**पलु पलु प्रेम पियाला चालै, छटे नाही खुमारी**[नशा]**रे।**
—वाणी १४४

मी रामनामाचे अमृत प्याल्यामुळे जगमाया बिघडलो.मी रामनामरूपी अमृताचे पेल्यामागून पेले प्याल्यामुळे मला चढलेली नशा मला काही सोडीत नाही.

संत रोहिदासांचा आदेश आहे की, “बंधुंनो, उठा.जागे व्हा.आपण आपल्याला समजा.देशाचा, समाजाचा तसेच रामभक्तिमुळे स्वतःचा उद्धार करा.”

❀❀❀

अनुक्रमणिका

# २६.संत रोहिदासांची भक्तिसाधना

**भक्तिचे स्वरुप.**—संत रोहिदासांची परम व चरम साध्य ‘भक्ती’ आहे.[डॉ.वेणीप्रसाद शर्मा व डॉ.पीतांबर नारायण, रविदासदर्शन प्र.आ.पृ.९५.].त्यांनी आपल्यावाणीत भक्तिसाठी प्रभुचे गुणगान केले आहे.[(१) तुमरे भजन कटही जम फांसा, भगति देत पावै ‘रविदासा’ ।
(२) चारि वेद जाकै सुमृति स्वांसा, भगति हेत गावै ‘रविदासा’ ।—संत गुरू रविदास वाणी, पृष्ठ ५४व १००]ईश्वरावर केलेल्या अनुराग-प्रेमाला ‘भक्ती’ म्हणतात.प्रेमभक्ती होण्यासाठी संत रोहिदास प्रभुला वारंवार विनंती करीत आहेत.[(१) प्रेम भगति कै कारणै कहु ‘रविदास’ चमार॥
(२) भाव भगति ‘रविदास’ दे, प्रतिदाता करि मोहि आज ।]ते प्रत्येक वेळी मन, वचन व कर्माबरोबर प्रभुच्या प्रेमात डुंबत राहण्याची इच्छा व्यक्त करतात.[सब पर हरि तुम्हारी ही आसा, मन क्रम वचन कहे ‘रविदासा’ ।]एक ठिकाणी गुरू रोहिदास प्रभुसंबंधी आपल्या प्रेमाला एक उदाहरणाने स्पष्ट करीत आहेत.पाणी आणि मासा यांची सोबत प्रसिद्धच आहे.मेल्यावरसुद्धा माशाची पाण्याबरोबरची सोबत सुटत नाही.ते म्हणतात की, “माशाला पाण्यातून काढल्यावर त्याचे कापून तुकडे तुकडे करतात.तरीसुद्धा तो पाण्याला विसरत नाही.एवढेच नव्हे तर त्यास खाल्यानंतरही तो पाण्याला विसरत नाही.माशाच्या सर्व प्रक्रिया करताना व खाल्यानंतरही पाण्याची आवश्यकता पडते.अशाप्रकारे माशाचे पाण्याबरोबरचे संबंध नेहमीच असतात.[मीनु पकरि फांकिओ अरू काटिओ, रांधि किओ बहु पानी। खंड खंड करि भोजनु कीनों, तऊं न बिसरिओ पानी।]”

अशाप्रकारे संत रोहिदास प्रभुला आपल्या प्रेम रज्जुने मजबुत बांधीत म्हणतात[प्रेम की जेवरी वांधिऐ तेरो जन, कहि ‘रविदास’ लुटिनो कवन गुन।]की, राम प्रेम रूपी बाणाने स्वतःला घायाळ झालेले दाखवितात.[‘रविदास’ मोरे मन लागियो, राम प्रेम को तीर।
राम रसायन जउ मिलाहिं, तउ हरै हमारो पीर॥ ६॥—दोहा ७१]

संत रोहिदासांच्या मतानुसार दुर्लभ मानवजन्म पुण्यकर्माचे फळ म्हणून प्राप्त होतो.[(१) मानुसां अवतार दुर्लभ।
(२) दुर्लभ जनमु पुंन फल पाइओ।—संत गुरू रविदास वाणी, पृष्ठ १२०]त्याप्रमाणे हा मनुष्य जन्म मिळाल्यावर महतभाग्याने तसेच सत्कर्मानेच भक्तिची प्राप्ती होते.[(१) कहे ‘रविदास’ तेरी भगति दूर है, भाग बड़े सो पावै।—गुरू रविदास, पृष्ठ २२५
(२) दूहि पद कहत सुनत नही आवै, कहै ‘रविदास’ सुक्रितकौ पावै।]त्यासाठी ममत्वास (मीपणास) नाहीसे करावे लागते.रोहिदास म्हणतात, “अहंकार नाहीसा केल्यावरच भक्ती होते.आणि त्या प्रभुभक्तिमध्ये आपण मग्न होतो.[(१) आपा खोयां भगति होत है, तब रुहै अंतरि उरझाई।
(२) आपौ गयौ तव भगति पाई, ऐसी भगति है भाई।]भक्तिमध्ये अभिमानाला बिलकूल स्थान नाही.खरी भक्तीआल्यावर मीपणा स्वतःहून जातो. धुळीत पडलेल्या साखरेला मुंगीच वेगळी काढून खाऊ शकते.त्याप्रमाणे गरीब बनून प्रभुप्रेम प्राप्त करावे लागते.[भगति ऐसी सुनहुरे भाई, आई भगति तब गई बड़ाई।
तजि अभिमान मेटि आपा पर, पिपलक है चुणि खावै॥—गुरु रविदास, पृष्ठ २२५]”

भक्ती ही हंसणे खेळणे नाही.अन्नपाण्याचे दान करणे.ज्ञानाच्या मोठमोठ्या गोष्टी करणे.कोणत्यातरी जंगलात डोंगराच्या गुंफेत जाऊन बसणे इत्यादीस लोक भक्ती म्हणतात.परंतु ही भक्ती नव्हे.वास्तविक पाहता रामनामाशिवाय जी काही कर्म भक्तिच्या नावावर केली जातात.ती भक्तिचे भ्रम मात्र आहेत.ती भक्ती नव्हते.[राम नाम बिन जे कुछ कहीऐ, सो सब भरम कहाई।
भगति न रस दान भगति न कथै ग्यान, भगति न वन मैं भुका खुदाई॥

अनुक्रमणिका

भगति न ऐसी हांसी॥]देवदेवतांसमोर नृत्य-कीर्तन करणे, जप, तप, दान, सेवा, पूजा इत्यादी भक्तिची बाह्य रूपे आहेत.यांची सार्थकता जेव्हा प्रभुबद्दल खरे प्रेम निर्माण हाईल तेव्हाच आहे.[कहा भमउ नाचै अरू गाऐं, काह भयउ तप कीन्हैं।
कहा भयउ जे चरन पखाले, जउं लउं परम तक्ते नहींचीन्है॥]काही लोक भक्तिच्या निमित्ताने वेष धारण करतात.परंतु ते भक्तिच्या अस्सल रहस्याला न समझता हिचा उपयोग विषय उपभोगाची प्राप्ती तसेच इंद्रियांच्या तृप्तिसाठी करतात.[भेष लीयो भेद न जान्यो, इमृत लेइ बीषै सौ सान्यो।—गुरु रविदास, पृष्ठ २२६]

अशाप्रकारे संत रोहिदासांनी पाखंड करणाऱ्यांची तसेच स्वप्नातसुद्धा हृदयात प्रभुनाम धारण न करणाऱ्यांची निर्भत्सना केली आहे.त्यांनी अशा लोकांना व्याभिचारिणी स्त्रीची उपमा दिली आहे.[कहा भयउ बहु पाखंड कीऐं, हरि हिरदै सुपिनै न जान।
ज्यों दारा बिभचारिणी, मुखि प्रतिव्रता जीअ आंन॥]अशा ढोंगी भक्तांना कपाळास गंध लावून, हातामध्ये माळा घेऊन जगाला फसविण्यासाठी सोंगे करणारा तसेच सन्मार्गापासून भटकत कुमार्गाने चालणारा असे म्हटले आहे.[माथै तिलक हाथ जप माला, जग ठगने कूं स्वाँग बनाया।
मारग छांड़ि कुमारग डहकै, सांची प्रीत बिनुराम न पाया॥ १॥—दोहा ६६]

**भक्तिचे अधिकारी.**—रोहिदासांचे मतानुसार भक्तिचे दरवाजे सर्वांना मोकळे आहेत.भक्तिचे सर्व अधिकारी आहेत.वंश, जात इत्यादी सामाजिक भेदभाव त्यास बाधक नाही.त्यासाठी ते वाल्मिकीचे उदाहरण देताना नीच कुळात जन्मलेल्या व नीच कर्म करणाऱ्या लोकांना प्रेरणा देतात की, रामभक्तिनेच अमरपद प्राप्त केले जाऊ शकते.[रे चित! चेति अचेती, काहे न बालमीकू देखिरे।
जाति थै कोउ पारन पहुच्या, राम भगति बिसेष रे ॥ टेक ॥—संत गुरु रविदास वाणी ६१]

याप्रमाणे संत रोहिदास हे गणिका, नामदेव व कबीरांचा रामभक्तिने उद्धार झालेला दाखवून[गनिका थी किस करमा जोग, पर पुरूसन सौं रमती भोग।
निसिबासर दुस्करम कमाई, राम कहत वैकुंठे जाई॥
नामदेव कहीऐ जाति कै ओछ, जा कौ जस गावै लोक।
भगति देत भगतां कौ मिलौ, अंकमाल ल विठल मिले, ॥
निरगुन कौ गुन देखौ आई, देही सहित कबीर सिधाई॥]सर्व सामान्य लोकांना आशा दाखवीत इकडे प्रेरित व आकर्षित करीत आहेत.स्वतःसंबंधी तर ते नीच कुळातजन्मल्यावर रामभक्तिने अपूज्या पासून पूज्यपर्यंत[हम अपूजि पूजि भयै हरि तै, नांव अनूपम गाया रे।]आणि अजामिल, गण, गणिका इत्यादीप्रमाणे संसाररूपी सागरातून[अजामल पिंगुला लुभत कुंचर, गऐ हरि कै पास।
ऐसे दुरमति निस्तरे, तू क्यू न तरहि 'रविदास' ॥]पार झाल्यावर ही गोष्ट वारंवार सांगण्यासाठी कंटाळत नाहीत.अशी भक्ती मिळवून तर ते निर्मुक्ततेचा अनुभव करीत आहेत.

सर्व सामान्य लोकांसाठी भक्ती सोपी व सुगम दाखवीत गुरु रोहिदासांनी भक्तीमार्गाच्या वाटसरूसाठी एक मोठी अट घातली आहे.भक्तीमार्ग ही हंसण्या खेळण्याची गोष्ट नाही.प्रभुप्रेमाचा प्याला मिळवणे मोठे कठीण आहे.अवधूत (साधक योगी) कलवारिन (गुरू अथवा परमात्मा) यांचेपासून प्रभुप्रेमाचा प्याला मागतात.परंतु गुरू जो प्याला देतात, तो प्याला कडू असलेला पाहून साधक नकार देतो.तेव्हा कलवारिन म्हणते की, "मी खरा प्रेमप्याला देते."परंतु पिण्याऱ्याला याच्याबदली डोके द्यावे लागते.याचा विचार करा.[देहु कलाली एक पिआला, ऐसा अवधू हो मतवाला॥टेक॥
कहै कलाली पिआला देऊं, पीवन हारै का सिर लेऊं॥ १॥—गुर रविदास, पृष्ठ १८६]अशाप्रकारे भक्ती जेवढी सहज व सर्वसुलभ आहे.तेवढीच ती कठीणसुद्धा आहे.

अनुक्रमणिका

**भक्तिचे साधन.**—वैदिक ऋषींनी आपल्या ऋचामध्ये वर्णन केले आहे.तसेच परवर्ती आचार्यांनी आपल्या ग्रंथामध्ये सैद्धांतिक समान निरूपण व प्रतिपादन केले आहे.त्याप्रमाणे संत रोहिदासांच्या वाणीमध्ये त्या सर्व साधनांचा उल्लेख आढळतो.त्यामध्ये श्रद्धा, नामजप, सत्संग, गुरुमहिमा, पंचदोषादि निवारण, सदाचार इत्यादीची विशेष गणना केली जाते.

**श्रद्धा.**—भक्तिमध्ये सर्व प्रथम स्थान श्रद्धेचे आहे.ईश्वरावर असीम श्रद्धा तसेच ईश्वराच्या अस्तित्वावर दृढ विश्वास ठेवणारी व्यक्तिच प्रभुभक्तिकडे आकर्षित होते.श्रद्धा व विश्वास नसलेला मनुष्य तर संसारिक भोगात मग्न असतो आणि त्यामध्येच आपल्या जीवनाची सार्थकता व सफलता मानतो.म्हणून संत रोहिदासांचे सांगणे आहे की, "भाव म्हणजेच श्रद्धा-विश्वास.प्रेमाशिवाय प्रभुभक्ती होऊ शकत नाही[भाउ बिनु भगति नही होइ तेरी।]."तसेच संत रोहिदास इच्छा करतात की, "ईश्वरावरील माझी प्रीति कोणत्याही प्रकारे कमी होता कामा नये."[मेरी प्रीति गोविंद सिउं जिवि दाटै।]जणूं काय आपल्या केशवाला साक्षात पाहिल्याप्रमाणे संबोधून म्हणतात की, "माझ्या मनात सर्व काही तुच आहेस.[ज्यू तुम्ह कारनि केसवे, अंतरि लिव लागी।—गुरु रविदास, पृष्ठ १७३]मी तुला विसरू शकत नाही. मला तर तुझ्या नामाचा विश्वास आहे."[तुम्हरे नांव बिसास।]

**सत्संग.**—गुरु रोहिदासांनी अन्य भक्ताप्रमाणे आपल्या वाणीत सत्संग (संत—संगती)चा महिमा गाइलेला आहे.त्योचे म्हणणे आहे की, "भाव-श्रद्धेशिवाय प्रभु-भक्ती होऊ शकत नाही.[साध संगति बिना भाउ नही उपजै, भाउ बिनु भगति नहीं होइ तेरी।]त्यांच्या मतानुसार 'भाव' चा आधार सत्संगती आहे.यासाठी संत रोहिदासांचा स्पष्ट उपदेश आहे की, "जे लोक दुष्ट आणि कुमार्गी आहेत, त्यांच्या जवळ बसता कामा नये.तसेच जो संत आणि सदाचारी आहे, त्याच्या चरणांस वंदन केले पाहिजे.[जो जन दुट्ठ कुमारगी, बइठगी, बइठहि नंहि तिंह पास।
जो जन संत सुमारगी, तिन पांय लागो 'रविदास' ॥ १ ॥—दोहा १७१]संगतीच्या प्रभावाचे उदाहरण देताना ते समजावून सांगतात की,"घाणेरड्या नदी नाल्यांचे पाणी वाहात गंगेस येऊन मिळतेव ते गंगेचे पवित्र जल बनते.हा संगतिचाच प्रभाव आहे.तसे स्वाती नक्षत्रात पडणारे पावसाचे थेंब सापाच्या तोंडात पडल्यास, त्याच्या विषारी प्रभावामुळे त्या थेंबाचे विष बनते.तर तेच पावसाचे थेंब शिंपल्यात पडल्यास त्याचे मोती बनतात.हे सर्व चांगल्यावाईट संगतिचा परिणाम आहे.[गली गली कौ नीर बहि आयी, सुरसरी जाइ समायो।
संगति कै परताप महातम, नांव गंगोदिक पायो॥
स्वांति बूंद व्रखै फनि उपरि, सरपै विष होई जाई।
ताही बूंद कौ मोती निपजै, संगति की अधिकाई॥]संत-साधू कोणास म्हणावे/तर जो संसारापासून निर्लिप्त आहे.परत्म्म्याच्या प्रेमात आहे.प्रभुशिवाय तो अन्य कोणाला ओळखत नाही.तसेच ज्याची वाणी निर्मळ आहे.ज्यांच्या दर्शनाने व स्पर्शाने सुख-शांति मिळते.रात्रंदिवस प्रभु-चिंतन करण्याने मनुष्याच्या काम क्रोधादि भावना नाहीशा होतात.अशा संत-साधुविषयी संत रोहिदास म्हणतात की, "असा भक्त भगवानच होतो. अशा संतास तर त्यांनी अनंतापासून अभिन्न सांगून["रविदासु"भणै जो जाणै सो जाणु, संत अनंतहि अंतरु नांहि।],त्याच्या संगतिपासून परम गती प्राप्त होण्याची गोष्ट मानली आहे.[मिलत पिआरो प्रान नाथु कवन भगति ते। साध संगति पाई परम गते॥—संत गुरु रविदास वाणी, पृष्ठ ११२]

संत रोहिदास स्वतः पूज्य आणि प्रतिष्ठीत होण्याचे सर्व श्रेय सत्संगतीस देतात.[माधउ संगति सरनि तुम्हारी।
हम अउगन तुम उपकारी॥
तुम चंदन हम इरंड बापुरे, संगी तुम्हारे वासा॥
नीच रूख ते ऊंच भए है, गंध सुगंध निवासा॥]म्हणून ते प्रभूस सत्संगती, त्यांची कथा व त्यांच्या प्रेमाचे वरदान मागतात.[संत तुझी तनु संगति प्रान, सति गुर गिआन जानै संत देवादेव।

अनुक्रमणिका

संताची संगती संत कथा रसु, संत माझै दीजै देवादेव ॥—संत गुरु रविदास वाणी, पृष्ठ १२२]यामुळे भक्तांनांही 'सत्संग' करण्याचा उपदेश देतात.[धन हरि भक्ति त्रयलोक जस पावनी। करी सतसंग इति विमल जस गावनी॥—संत गुरु रविदास वाणी, पृष्ठ १२३]

**नामजप.**—प्रभुच्या अनन्य भक्तिचा आधार 'नाम' आहे.अन्य संत भक्ताप्रमाणे संत रोहिदाससुद्धा नामाची माहिमा स्वीकारतात.त्यांचे सांगणे आहे की, "सतयुगात सत्याचा, त्रेतायुगामध्ये यज्ञाचा आणि द्वापारयुगामध्ये पूजाचाराचा आधार होता.परंतु कलियुगात तर फक्त नामाचाच आधार आहे."[सति जुगि सतु तेता जगी दुआपरि पूजाचार।
तीनौ जुग तीनै दिढ़ै कलि केवल नाम अधार॥ १॥—संत गुरु रविदास वाणी, पृष्ठ १४६]ह्या नामाला राम, नारायण, हरि, मुकुंद, माधव, इत्यादी अनेक नावांनी पुकारतांना संत रोहिदास म्हणतात की, "चौतीस अक्षरात रामनामची दोन अक्षरे हीच फक्त वास्तविक पाहता सत्य आहेत."[नाना खिआन पुरान वेद बिधि चउतीस अक्षर माही। बिआस बिचारि कहिओ परमारथु राम नाम सरि नांहि॥]

मी रामाचा व्यापारीआहे.मी तर रामनामाचे धन लादले आहे.जेव्हा लोक माया ममतेचे विष लादू लागलेआहेत.[हौ बनजारो राम कौ। हरि जू कौ टांडो लादौ जाबरे।—संत गुरु रविदास वाणी, पृष्ठ १०८]नारायण नामच माझे जीवन धन आहे.[मोहि अधारू नामु नाराइन जीवन प्रान धन मोरे।]हरिनामच त्या प्रभुची आरती आहे.हीच आरती प्रभुचा भोग आहे.[कहै 'रविदासु' नाम तेरो आरती, अंतरंगाति हरि भोग लगारे।—संत गुरु रविदास वाणी, पृष्ठ १७३]हे जगातील लोकांनो,"मुकुंद मुकुंद नाम जपा.मरतांना-जगतांना त्याचेच नाम जपत राहा.[मुकुंद मुकुंद जपहु संसार। जीवत मुकुंदे मरत मुकुंदे॥—संत गुरु रविदास, वाणी, पृष्ठ १२०]हे जीवा, तू आतां दुसरं बोलणं सोडून जिभेने 'हरि हरि का जपत नाहीस? हरि नामाचे स्मरण करण्याने अनेक लोकांचा उद्धार झाला आहे."

नाम जपाचा सर्वात मोठा लाभ गुरु रोहिदासांनी दाखविला आहे, "जो राम नामाचा जप करीत आहे.तो जन्म मरणाच्या बंधनातून मोकळा होतो.[कहि 'रविदास' जो जप नामु। तिसु जाति न झनमु न जोनि कामु।]प्रभू नामाचे निरंतर स्मरण करणारा भक्त परमात्म्यास प्राप्त करतो.जसे परीस स्पर्शाने लोखंडाचे सोने बनते, त्याप्रमाणे भक्त भगवानात एकाकार होऊन जातो.[ररंकार रहत सवहिन मै, अंतर मेल मिलायेगा। लोहा समकर कंचन समकर भेद अभेद समावेगा॥]म्हणून संत रोहिदासांचा सर्व मनुष्य मात्रासाठी उपदेश आहे की, "रात्र फक्त झोपण्यात व दिवस इंद्रियांची रूची घेण्यातच खर्च केली नाही पाहिजे.सर्व भांडणे सोडून रात्रंदिवस हरि नामाचे स्मरण केले पाहिजे.['रविदास' रात न सोइये, दिवस न करिये स्वाद।
अह निसि हरि जी सुमिरिये, छांडि सकल प्रतिवाद॥१॥—दोहा १७७]"

संत रोहिदासांनी गुरू माहात्म्य सांगितले आहे की, "गुरू एक पारसमणी आहे.ज्याच्या स्पर्शामुळे सामान्य मनुष्यरूपी लोखंड उत्तम सोने अर्थात प्रभुभक्त बनतो.त्याचे बाह्य मन अंतर्मुखी होते आणि हृदय मंदिराचे मोहरुपी वज्रकपाट उघडले जाते.त्याप्रमाणे प्रभुची ज्योत आत प्रकाशित होते.परंतु अशा पारसरूपी गुरूची भेट तर मोठ्या भाग्यानेच होते.[पारस मनि तांवो छुए, कनक होत नहीवार॥
परमपारस गुरू भेंटीए, पूरव लिखत ललाट॥
उनमन मनमनही मिले, छुटकत बजर कपाट॥]गुरूकृपेने तर 'निरंजन' ची प्राप्ती होते.[गुरू परसादिनिरंजनु पावउं।]त्याच्याच दयेने परमानंदाची अनुभूति संभवते.[गुरू प्रसाद भइ अनभै मति।]

आपल्या अनुभवासंबंधी संत रोहिदास म्हणतात की, "गुरुकृपेने मी रामाच्या रंगात रंगलो.रामरंगात रंगलेला मनुष्य नरकास जात नाही.तो तर परमपदास प्राप्त करतो.[जन 'रविदास' राम रंगि राता। इउं गुरू परसादी नरक नही जाता॥]

अनुक्रमणिका

यासाठी तर त्यांनी हरि, गुरु तसेच साधु (संत) यांना समान मानण्याची सूचना दिली आहे.[हरि गुरू साध समान चित्त, नित आगम तत मूल। इन बिच अंतर जिन परौ, करवत सहन कबूल॥५॥–दोहा १८१]आणि म्हटले आहे की, "माधव सतगुरु आहे व सारे जग त्याचे शिष्य आहे.[माधु सतगुरू सब जेता चेला।]

**पंचदोष निवारण.**–मनुष्याला प्रभुभक्तिमध्ये अनेक अडचणी आहेत.गुरु रोहिदास एका ठिकाणी म्हणतात की, "काम, क्रोध, माया, मद आणि मत्सर हे पाच मिळून जगाला लुटतात.[काम क्रोधमाइआ मद मतसर, इन पंचहु मिलि लूटे ।]ह्या संसार सागरात काम, क्रोध, लोभ, मोह इत्यादी असंख्य भोवरे (पाण्यातील) आहेत.ह्या पांचांनी[अतिर संसार अपार भौ सागर।
काम-भ्रम क्रोध-भ्रम लोभ-भ्रम मोह-भ्रम।
पंच संग्या मिलि पीडिओ प्राणियां।]माणसांना दुःखी केले आहे.हरण, मासा, भुंगा, पलंग आणि हत्ती फक्त एकाच दंद्रिय दोषामुळे मारले जातात.तेव्हा ज्याच्यामध्ये पांच दोष आहेत, त्या मनुष्यांना वाचविण्याची काय आशा आहे?[मृग मीन भ्रिंग पतंग कुंजर एक दोष बिनास।
पंच दोष असाध जामहिं ताकी केतक आस॥–गुरू रविदास, पृष्ठ २०६]यामध्ये काम-वासनेचा प्रभाव तर इतका प्रबल आहे की, त्याच्यातून देवदेवतासुद्धा वाचू शकले नाहीत.[गोतम नारि उमापति स्वामी, सिसू घरनि सहस भग गांभी।]

अशा प्रकारे काम प्रबलतेचा विचार करताना संत रोहिदासांनी आपल्या दोह्यातून पंचविकारातून मुक्ती मिळविण्याचा उपदेश केला आहे.आणि ह्या मुक्तितून प्राप्त झालेल्या महत्वांना अनेक प्रकारे प्रगट केले आहे.[सत्त संतोष अरू सदाचर, जीवन को आधार।
'रविदास' भये नर देवते, जिन ति आगे पंच विकार॥१॥–दोहा १५९]

संत रोहिदास हे पंचदोष निवारण्याचा उपायदेखील दाखवीत आहेत.तो उपाय म्हणजे प्रभुला शरण जाणे.[कहि 'रविदास'कल्प कैसे कीजै, विनु रघुनाथ सरनि का की लीजै।]त्यांचा दृढ विश्वास आहे की, सर्व जग मोह इत्यादीने दुःखी होत आहे.परंतु प्रभू भक्तास थोडासुद्धा संताप देत नाहीत.[मोह पटल सभू जगतु निआपिओ, भगत नहीं संतापा।]कारण राजारामाचा आनंद असा आहे की, ज्याच्यासमोर जगाचे जेवढे आनंदोपभोग आहेत, ते सर्व फिके पडले जातात.[न विचारिओ राजा राम को रसु, जिंह रस अनरस वीसरि जाहीं।]रामरंगात रंगून गेल्यावर कोणताहीरंग चांगला वाटत नाही.[जौ तु राम नाम रंग राते, और रंग न सुहैही।]यासाठी तर धन इत्यादी मायामध्ये भक्त मग्न होत नाही.[संपति विपति पटल माया धन, नामहिं मगन न होत तेरो जन।]

**सदाचार.**–प्रभुभक्तिमध्ये सदाचाराचे जास्त महत्व आहे.गुरु रोहिदासांनी आपल्या वाणीमध्ये याच कारणामुळे सदाचारावर जोर दिला आहे.दुष्कर्म व दुर्गुण हे भगवत प्राप्ती आणि सुखी जीवनासाठी मोठे बाधक आहेत.यासाठी संत रोहिदासांचा उपदेश आहे की, "जर सुख पाहिजे असेल तर कुमार्गात पाय कधीच ठेवला नाही पाहिजे.['रविदास' सदा ही रखिए, मन महिं सहज सभाओ।
राखो नहीं कुपंथ पग, जौ नोरौं सुख चाओ॥२॥–दोहा १७०]सत्य, संतोष आणि सदाचार हे जीवनाचे खरे आधार आहेत.काम, क्रोधादि पंचविकारांचा ज्यांनी त्याग केला आहे, ती माणसे, माणसे न राहता देव-देवता बनून जातात.[सन्तसंतोष अरू सदाचार जीवन को आधार।
'रविदास' भये नर देवते, जिन तिआगे पंच विकार॥१॥–दोहा १५९]बुद्धी आणि विवेकाच्या रक्षेसाठी इंद्रियासक्ती सोडून दिली पाहिजे."[बुद्धि अरू विवेकहिं, जड राखन चाहौ पास।

अनुक्रमणिका

इंदिरियां संग तिरत कौ, तजि देहु रविदास॥३॥–दोहा १६१]गुरू रोहिदासांच्या उपदेशाप्रमाणे संतोष आणि त्याग यामध्ये खरे सुख आहे.[जो कोउ लोरै परम सुख, तठ राखै मन संतोष।
'रविदास' जहां संतोष है, तहां न लागै दोष॥ १॥–दोहा १६४]संत रोहिदासांचे स्पष्ट मत आहे की, "इंद्रिय निग्रही तसेच सदाचारी व्यक्तिच अमरपदाचा अधिकारी होत असतो."[जो बस राखे इंद्रिया, सुख दुख समझि समान।
सोउ अमरित पद पाइगो, कहि 'रविदास' बखान॥२॥–दोहा १६०]

**भक्तिचे प्रकार.**–श्रीमद् भागवत महापुराणामध्ये भक्तिचे नऊ प्रकार दाखविले आहेत.व तिला 'नऊ विधा भक्ती' म्हटले आहे.हे नऊ प्रकार असे आहेत–श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवा, अर्चना, वंदना, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन.[श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्।
अर्चनं वंदनं दास्यं सख्य प्राप्त निवेदनम्॥
–भागवत ७, ५, २३.]संत रोहिदासांच्या वाणीमध्ये नव विधा भक्तिची ही सर्व उदाहरणे उपलब्ध होतात.
[उदाहरणार्थ पहा–
(१) **श्रवण**–कीरति तेरी पाप विनासै, लोक वेद यू गावै।
(२) **कीर्तन**–ऐसे जानि जपौ रे जीव जपि ल्यौ राम न भरमौ जीव।
(३) **स्मरण**–ऐसा ध्यान धरौ वनवारी, मन पवन दिढि सुसंगन नारी।
(४) **पादसेवन**–मोरि कूचिल जाति कुटिल में वास, भगति चरण हरि चरन निवास।
(५) **अर्चना**–तन मन नारि सदा हरि गाईऐ। भगत जन'रविदास' तुम सरणां आईऐ॥
(६) **वंदना**–संसार प्रपंच मैं व्याकुल परमानंदा, त्राहि त्राहि अनाथ नाथ गोविंदा।
'रविदास' बिनवै कर जोरी, अविगत नाथ कवन गति मोरी॥
(७) **दास्य**–माया मोहिला कान्हां, मै जन सेवग तेरा।
(८) **सख्य**–माधवे, तुम न तोरहु तौ हम नहिं तोरहि। तुम सौं तोरि कवन सौ जोरहिं॥
(९) **आत्मनिवेदन**–आयो आयो हौ देवाधिदेन, तुम सरन आयो।
सकल सुख की मूल जाकि नांहि संतूल, सो चरन मूल पायो॥]

नारदभक्तीसूत्रामध्ये नवविधा भक्तिस 'आसक्ति' नाव देऊन ११ आसक्ती दाखविल्या आहेत.रोहिदास वाणीमध्ये याची काही उदाहरणे मिळतात.

[उदाहरणार्थ पाहा–
(१) **गुण माहात्म्यासक्ति**–पतित पावन प्रभ विरूद तोहि। जन 'रविदास' पर क्रिया होहि॥
(२) **रूपासक्ति**–प्रभूजी तुम धव वन हम मोरा। जैसे चितवत चंद चकोरा॥
(३) **पूजासक्ति**–तनु मनु अरपउं पुज चरावडं। गुर् परसादि निरंजन पावउं॥
(४) **स्मरणासक्ति**–हरि हरि हरि हरि हरि हरि हरे। हरि सिमरत जन गए निसतरि तरे॥
(५) **दास्यासक्ति**–तूं मेरा दाता रामु मैं तेरा मंगता। जनम जनम मैं तेरी सेवा करता॥
(६) **सख्यासक्ति**–प्रेम की जेवरी वांधिओ तेरो जन, कहि 'रविदास' छूटिओ कवन गुन।
(७) **कांतासक्ति**–भोर भयो मोहिइक टक जोवत, तलफत रजनी जाई।
पीव विन सेजहिं क्यू सुख सोऊं, विरह विधा तन खाई।
मेटि दुहागन सुहागनि कीजै, अपने अंग लगाई॥
(८) **वात्स्ल्यासक्ति**–मेटि दुहागन सुहागनि कीजै अपने अंग लगाई॥
(९) **आत्मनिवेदनासक्ति**–तेरी चरनी सरनी परउ रामु राजा।
(१०) **तन्मयासक्ति**–गाइ गाइ अब का कहि गाऊं। भावना हारा कूं निकट बताऊं॥
(११) **परम विरहासक्ति**–कहै 'रविदास' स्वामी तुम्हरे बिछो है,
येक पलक जुग जाई।]

संत रोहिदासांच्या एका पदामध्ये तर भक्तिचे अनेक प्रकार सहजच मिळतात.जेव्हा ते म्हणतात की, "प्रभुसंबंधी माझे प्रेम कधी कमी होऊ नये.मी फार मोठी किंमत देऊन प्रभुप्रेम मिळविले आहे."माझी इच्छा आहे की,"माझे चित्त नेहमी प्रभुचे ध्यान करीत राहील.माझे नेत्र प्रभु दर्शन करीत राहतील.मी कानाने त्याचे

अनुक्रमणिका

यशोगान ऐकत राहीन.मी आपल्या मनाला भुंगा बनवून प्रभुचरण कमलाचे ध्यानी लावीन आणि आपल्या वाणीने त्याचे अमृतमय नामाचे कीर्तन करीत राहील."[मेरी प्रीति गोविंद सिउं जिनि घटे। मैं तउ मोलि महंगी लई जीवसटै॥
चितु सिमरन करउ नैव अवलोकनी। स्तवन वानी सुजसु पुरि राखउं॥
मनुसु मधुकरू करउं चरन हिरदै धरउं, रसन अमृत राम नाम भाखउ॥]

संत रोहिदास तर शेवटी भक्तिच्या खऱ्या उच्च पातळीवर पोहचले होते की, तेथे सर्व काही एकरुपहोत असते.जेथे विभाजनाच्या सर्व सीमा समाप्त होतात.यासाठी त्यानी म्हटले आहे की, मी जेथे तेथे जातो, तेथे तेथे तुझी पूजा होत असलेली पाहात असतो.तुमच्याप्रमाणे मी दुसऱ्या कोणत्याही देवदेवतांना पाहात नाही.[जहं तहं जाउं तहां तेरी सेवा। तुमसो ठाकुरू अवरू न देवा॥]जर एकच देव आहे तर त्याची पूजा कोठेही केली जाऊ शकते.तो पूर्णब्रह्म आहे.[पूरन ब्रह्म वसै सब ठाई।]म्हणून मी तर त्या प्रभुची पूजा करतो.ज्याला कोणतेही गाव, घर आणि नांव नाही.[कहै 'रविदास' मैं ताही कूं पूजूं।
जाकै गांव न ठाव न नांव नही कोई।]तेव्हा अशा प्रभुभक्तिसाठी कोणत्याही प्रकारच्या विशेष भक्तिची आवश्यकता राहत नाही.तसेच पूजेच्या साहित्याचीही विशेष गरज भासत नाही.

तेव्हा त्या अनुपम देवाच्या[जसं तूं तस तूं ही, कस औपम दीजै।]पूजेस कोणते उपयुक्त फळ आणि फूल नसेल तर रोहिदास आपले तन, मन अर्पण करून त्याची पूजा करण्याची गोष्ट सांगतात.[माई गोविंद पूजा कहा तौ चरावउं।
अवरू न फूलू अनूपम पांउ॥
तनु मनु अरपउं पूज चरावउं॥]तसेच प्रभुनामाचेच आसन, चंदन, चंदन उगळण्याचा दगड, केशर, जल, दीपक बत्ती, तेल, ज्योति, नामाचा धागा, फूलमाळा, नामाची चवरी डोलावून प्रभुची आरती आणि पूजा करतात.[नामु तेरो
आसनो नामु तेरो उरसा, नामु तेरा केसरो ले छिटकारे।
नामु तेरा अंभुला नामु तेरो चंदनो, घसि जपे नामु ले तुझहिं कउ चारे॥१॥
नामु तेरो दीवा नामु तेरो बाती, नामु तेरो तेलु ले माहि पसारे।
नाम तेरे की जोति लगाई, भइओ उजिआरो भवन सगलारे॥२॥
नामु तेरो तागा नामु फूल माला, नाम अठराहसगल जुठारे।
तेरो कीआ तुझंहिं किआ अरपउं, नामु तेरा तूं ही चंवर ढोलारे॥३॥
कहै 'रविदास' नामु तेरो आरती, सति नामु है हरि भोग तुम्हारे॥४॥]यालाच 'अजपा-जप' तसेच 'सहज भक्ती' म्हणतात.संत रोहिदासांनी यास 'अजपाजाप' चा स्पष्ट उपदेश दिला आहे.['रविदास'अरादहु देवकूं, इकमन हुइ धरि ध्यान।
अजपा जाप जपत रहहु, सत्त नाम सत्तनाम॥१९॥—दोहा ३९]

**सिद्धावस्था.**—भक्तिच्या दोन अवस्था दाखविल्या आहेत.गौणी भक्ती तथा पराभक्ती.यात गौणी भक्ती साधनावस्थेच्या अंतर्गत आहे आणि पराभक्ती सिद्धावस्थेची सूचक आहे.[रूप गोस्वामीः भक्ति रसामृत सिंधु, २ य लहरी, ४.]सिद्धावस्था उच्च कोटीची भक्ती आहे.गुरू रोहिदास गौणीभक्तिच्या साधनावस्थेस पार करुन पराभक्तिच्या सिद्धावस्थेत पोहचलेले संत होते.त्यांच्या वाणीत त्यांच्या ह्या सिद्धावस्थेचे भाव अनेक रूपात प्रगट झालेले आहेत.

नारदभक्ती सुत्रानुसार पराभक्तिच्या भूमिकेत पोहचून भक्त प्रभु प्रेमात तिला पाहातो, तिला ऐकतो, तिला सांगतो.आणि तिचे स्मरण करतो.[तत्प्राप्य तदेवाव लोकयति, तदेव श्रृणोति,
तदेव भाषयति, तदेव चिंतयति।
—नारदभक्ति सूत्र, ५५.]जेव्हा रोहिदास प्रभुचे स्मरण करणे, पाहाणे, ऐकणे आणि त्याच्या अमृतमय नामाला वाणीद्वारा उच्चारण करण्याची गोष्ट सांगतात.[चितु
सिमरन करउं नैन अवलोकनो,
श्रवन वानि सुजसु पूरि राखउं।

अनुक्रमणिका

मनसु मधुकरू करउं चरन हिरदै धरउं,
रसन अमृत राम नाम भाखउं॥

—संत गुरु रविदास वाणी, पृष्ठ १११]तर ती त्यांची पराभक्ती होय.

आपल्या अनेक पदात ते परमपदास प्राप्त करण्याची गोष्ट स्पष्टच सांगतात.

[उदाहरणार्थ पाहा—
(१)सांई सहजि मिल्यौ सोई सनमुख,
कहै 'रविदास' बढाई।
(२)जिहिं पद सुर नर प्रेम पिआसा,
सो पद रमि रह्यो जन'रविदासा' ।
(३) सहज सुनि मैं भाठी सखैं,
पीवे 'रविदास' गुरुमुख दखै।
(४) (अ) इक चिंता सत्त नाम की, दरसाइहु परम तत्त।
सहज परम भगति भई, 'रविदास' पाइहि ब्रह्म सत्त॥ १८॥

—रविदास दर्शन, दोहा ३८

(ब) इक बुंद सौं बुझि गई, जनम जनम की प्यास।
जनम मरन बंधन टूटई, भये 'रविदास' खलास॥ २॥

—रविदास दर्शन, दोहा ४४]

संत रोहिदास आपल्या एका पदात रहस्यवादी कविप्रमाणे वर्णन करतात की, "आम्ही संसारिक राज्याच्या बंधनातून व कष्टातून मुक्त होऊन दुःखरहित नगरात राहात आहोत.आमचे एका उत्तमनगरात घर आहे.त्या नगराचे नाव बेगमपुरा आहे.तेथे नेहमी आनंदच आनंद आहे.तेथे भय, दुःख, अथवा चिंता नाही.तेथे निरनिराळ्या प्रकारचे कर द्यावे लागत नाही.तेथे एकच राज्य आहे. ते नेहमी स्थिर आहे.तेथील अन्न, पाणी सुद्धा उत्तम आहे.तेथे सर्व स्वेच्छेनुसार सहल करू शकतात.अशा त्या नगरात मी घर बनविले आहे.

जो अशा नगराचा निवासी असेल, तो आमचा मित्र आहे.[अब रम खूब वतन घर पाई।
ऊँचा खैर सदा मन भाया॥
बेगमपुरा सहर का नाऊ,
दूखु अंदोहु नहीं तिहि हाउं।
ना तसवीस खिराजु न मालु,
खऊफु न खता न तरसु जवालु॥
काइमु दाइमु सदा पातिसाही,
दोम न सेम एक सो आही।
आवादानु सदा मसहूर,
उहां गनी वसहि मामूर॥
तिउं तिउं सैल करहि जिउं भावै,
मरहम महिल न को अटकावै।
कहि 'रविदास' खलस चमारा,
जो हम सहरी सो मीतु हमारा॥

—संत रैदास, पृष्ठ १४४-१४५]

श्री.परशुराम चतुर्वेदीने म्हटले आहे की, "यात त्यावेळचे अस्थिर शासन, कठोर कायदे, भरमसाठ कर व त्यामुळे प्रजेच्या कष्टाची स्पष्ट झलक मिळते."['रविदास' जु है बेगमपुरा, उह पूरन सुख धांम।
दुख अंदोह अरू देधभाव, नांहि वसही तिहिं ठाम॥ १॥

—रविदास दर्शन, दोहा १७२]

## अनुक्रमणिका

गुरू रोहिदासांची भक्ती 'प्रेम भक्ती' च्या नावाने सुद्धा पुकारली जाते.ही प्रेम-लक्षणा अथवा रामानुभक्ती आहे.जेव्हा भक्तास भगवानाबरोबर प्रेम करण्याचे व्यसन जडते.तेव्हा प्रेमभक्ती (अर्थात लक्षणा भक्ती अथवा रामानुगाभक्ती) ची कृतार्थता समजली पाहिजे.

संत रोहिदास रामरंगात पूर्णपणे रंगले होते.[जब 'रविदास' राम रंगी राता।]तेव्हा त्यांना प्रभुचे वेड लागले होते.[ज्यू तुम्ह कारनि केसवे, अंतरि लिव लागी।

—संतगुरु रविदास वाणी, पृष्ठ ७१]त्यांची रामनामाची भक्ती सुटणारी नव्हती[अब कैसे छुटै नाम रट लागी॥ टेक॥

—संत गुरुदास वाणी,पृष्ठ ९६]ते रामप्रेमरुपी बाणाने बरेच घायाळ झाले होते.['रविदास' मोरे मन लागियो, राम प्रेम को तीर।
राम रसायन जउ मिलहि, तउ हरै हमारी पीर॥ ६॥

—रविदास दर्शन, दोहा७१]याची पीडाजन्य आकुलतेची झलक त्यांच्या वाणीत पदापदामध्ये मिळत आहे.

[उदाहरणार्थ पाहा—
(१)राम गुसईआं जीअ के जीवना। मोहि नविसाहु मैं जनु तेरा॥ टेक॥
मेरी संगति सोच मोच दिनु राती, मेरा करमु कुटिलता जनमु कभांती।
मेरी हरहु विपति जन करहु सुभाई। चरन न छांडउ सरीर कल जाई॥
कहु 'रविदास' परउ तेरी साभा। बेगि मिलहु जन करि न बिलंबा]
(२) प्रीति सुधामनि आव।
भोर भयो मोहि इकटक जोवन, तलकत रजनी जाई।
पीय विन सेजहि क्यू सुख सोऊं, विरह विथातन षाई॥
मोटि दुहागन सुहागनि कीजै, अपने अंगि लगाई।
कहै 'रविदास' प्रभु तुम्हारे बिछौहे, येक पलक जुग जाई॥ ३॥

—संत गुरु रविदास वाणी, पृष्ठ १०९.

(३)हउ बलि बलि जाउं रमईया कारने, कारन कवन अबोल।
बहुत जनम बिछुरें ये माथउ, इहु जनमु तुम्हारे लेखै।
कहि 'रविदास' आस लगि जीवउं, चिर भइओ दरसनु देखै॥]

एवढेच नव्हे तर संत रोहिदास उत्कट प्रेमाने प्रभुचे नितांत अंतरंग बनतात व एकाद्या मित्राप्रमाणे प्रभुबरोबर हसणे खेळणे सुद्धा करतात.[पाहा–
(१)जउं पै हम न पाप करतां अहेअनंता।
पतित पावन नामु कैसे हुंता॥
(२)जउ हम पाप करत नहीं मूधर, तौ तूं कहा नसावै।] त्यांची प्रेमपकड इतकी मजबूत आहे की, प्रभू त्यांचेकडून सुटणे कठिण आहे.परमात्म्याने रोहिदासांना संसारिक मोहपाशात बांधले आहे.याचा त्यांचेजवळ तर उपाय आहे.प्रभुच्या आराधनेतून ते सहज सुटून जातील.परंतु प्रभुजवळ याचा कोणताही उपाय नाही की संत रोहिदासांच्या प्रेम पाशातून मुक्त होऊ शकतील.[जउं हम बांधै मोह फास, हम प्रेम बंधानि तुम बांधै।
अपने छूटन कौ जतन करहु, हम छुटै तुम आराधै॥ १॥

—संत गुरु रविदास वाणी, पृष्ठ ९३.] संत रोहिदास प्रभुस निराश पाहून ज्याप्रमाणे त्यांच्याकडून गोड चुटक्या घेत म्हणतात की, "महाराज, आम्ही तुम्हास आपल्या प्रेमपाशात बांधले आहे.आता कसे सुटतात ते पाहतो.[प्रेम की जेवरी बांधिओ तेरो जन, कहि 'रविदास' छूटिओ कवन गुन]

नारद भक्ती सुत्रानुसार प्रेमाचे हे स्वरूप मूक आस्वादनाप्रमाणे आहे.[(अ) 'रविदास' इक ही नूर ते, जिमि उपज्यो संसार।
ऊंच नीच किह विध भये, ब्राह्मन अरू चमार॥ ६॥

अनुक्रमणिका

—रविदास दर्शन, दोहा ५१

(ब) ‘रविदास’ इक ब्रह्म बूंद सों, सगल पसारा जान।
सभ उपज्यो इक बूंद सों, सभ ही एक समान॥ ७॥

—रविदास दर्शन, दोहा ५२]याप्रकारे ‘परमपद’ चा आनंद अनिर्वचनीय म्हटला आहे.संत रोहिदासांचे म्हणणे आहे की, “तो सांगण्या-ऐकण्यात येऊ शकत नाही, तो आनंद पाणी व श्रुतिहून वेगळा आहे.[इहि पद कहत सुनत नही आवै, कहै ‘रविदास’ सुक्रित कौ पावै॥]मी प्रेमपंथाच्या पालखीत बसून प्रभुजवळ पोहचलो आहे.प्रभुमीलनाचा तो आनंद सांगितला जाऊ शकत नाही.[प्रेम पंथ की पालकी, ‘रविदास’ वैटियोआय। सांचे सामी मिलन कूं, आनंद कह्यो न जाय॥ ५॥

—रविदास दर्शनदोहा ७०]

वरील आनंदावस्थेस (प्रेमावस्था अथवा सिद्धावस्था) पोहचलेला साधक ‘जीवनमुक्त’ म्हटला जातो.गुरू रोहिदास सिद्धावस्थेतस पोहचलेले सद्-गृहस्थ होते.

अनुक्रमणिका

# २७.रोहिदासांची विचारधारा

संत रोहिदासांचे दोहे व पदांमध्ये विचारधारांचे जे रूप दिसून येते ते थोडक्यात अशा प्रकारचे आहे.

**दार्शनिक विचार.**—अन्य संत-भक्तांप्रमाणे संत रोहिदासांचेही आपल्या वाणीत दार्शनिक विचारांचे प्रतिपादन करण्याचे ध्येय नव्हते.तरीसुद्धा त्यांच्या यासंबंधीच्या विचारांचा प्रसंगानुसार उल्लेख झाला आहे.

संत रोहिदासांनी सर्वोच्च सत्तेत वेदांतियांच्या भाषेत 'ब्रह्म' म्हटले आहे आणि त्यास पूर्ण तसेच सर्वव्यापक स्वीकारले आहे.[पूरत ब्रम्ह बसै सब ठाई। संत रैदास, पृष्ठ ५०.]ब्रह्म विराट रूप आहे.[चरन पाताल सीस असमाना।—संत रैदास, पृष्ठ ५०.]ते वटबीजाप्रमाणे असून तीन लोकांत पसरलेले आहे.[बटक बजि जैसा ओंकार, पसरयो लोक विस्तार ।—संत रैदास, पृष्ठ ५०.]सर्व जगात एकच ब्रह्म पसरले असून हे संपूर्ण विश्व त्यामध्ये सामावले आहे.[एकै ब्रह्म हइ सकल मंहि, अरू सकल ब्रह्मह मांहि।
'रविदास' ब्रह्म सभ भेष मंहि, ब्रह्म बिना कछु नांहि॥ १॥—रविदास दर्शन दोहा ११]ते अनादि आहे.अनंत आहे.चिर नित्य आहे.याच रूपास प्रगट करीत असतांना संत रोहिदास म्हणतात की, "बंधुंनो, ते ब्रह्म तर जग निर्माण होण्यापूर्वी, त्याच्या मध्यकाळी तसेच प्रलयानंतरही एकरूप आहे.नेहमी एकसारखे राहणारे आहे.ते ब्रह्म चिरनित्य आहे.ते जड़-चेतन पदार्थ तसेच कीटक-पतंगा इत्यादी छोट्या मोठ्या सर्व प्राणीमात्रातसामावलेले आहे.ते ब्रह्म जगाचा स्वामी आहे.जगाचे सर्व पदार्थ व प्राणी त्याचे अंगरूप आहेत.अर्थात हे जगच त्या ब्रह्माचे शरीर आहे.त्याची गती सर्व ठिकाणावर आहे.ब्रह्म सर्व व्यापक आहे.तेच ह्या जगाचा निर्माता आणि नाश करणारे आहे."[आदि अंत औसान एक रस, एक तार ही भाई।
थावर जंगम कीट पतंग, पूरि रहे हरि राई॥—संत रैदास, पृष्ठ ५०.
सर्वेस्वर सर्वगी सरबगति, करता हरता सोई॥—संत रैदास, पृष्ठ ५०.]

संत रोहिदास ब्रह्मास अनिर्वचनीय मानतात.[(क) जस हरि कहऐ तस हरि नहीं, है अस जस कछु तैसा।
(ख) कहै 'रविदास' अकथ कथा, उपनिषत सुनीजै।
जस तू तस तूं संत तुही, कस उपमा दीजै॥—संत रैदास, पृष्ठ १६५.]आणि त्याचे अनेक विशेषणांनी वर्णन करतात की,ब्रह्म नेहमी एकरस आहे.ते निर्गुण, निराकार, उदय अस्तरहित, सर्वव्यापक, निश्चल, अजन्म, अनुपम, निर्भय, अगोचर, अजर, अलक्ष्य, अनदि, अनंत, निर्विकार आणि अविनाशी आहे.[विमल येक रस उपजै न विनसै, उदै अस्त दोउ नांही।
विगता विगत घटै नहि कवहूं, वसत वसै सब मोही॥
निसचल निराकार अज अनूपम, निरभै गति गोविंदा।
अगम अगोचर अछर अतरक, निरगुन अंत अनंदा॥
सदा अतीत ग्यान धन वरजित, निरविकार अविनासी।
कहै 'रविदास' सहज सुंनि सत, जिवन मुक्ति निदिकासी॥]ते ब्रह्म कुरूप नाही तसेच रूपवान नाही.ते चंद्र, सूर्य, रात्र, दिवस, पृथ्वी, आकाश, इत्यादी काहीसुद्धा नाही.त्यात कर्म नाही आणि अकर्म नाही.ते थंड नाही आणि उष्ण नाही, योग नाही आणि भोग नाही.ब्रह्म निरंजन, निराकार, निर्लेप, निर्विकार, तसेच निष्काम आहे.[अबरन वरन रूप नहि जाकै, सुकहां ल्यौ लाई समाई।
चंद सूर नहीं राति दिवस नहिं, धरनि आकास न भाई॥
करम अकरम नहीं सुभ असुभ नहीं, का कहि देहुं बडाई।
सीत न उस्न बाउ नहीं सरवत, काम कुटिन नहि होई॥
जोग न भोग नहीं जाकै, कहौ नांव सत सोई।
निरंजन निराकार निरलोपी, निरभीकार निरासी॥]

अनुक्रमणिका

संत रोहिदास ब्रह्माच्या अद्वैत रूपास स्वीकारतात.ब्रह्म एक आहे.ते अनेक रूपात विस्तार पावलेले आहे.[एक ही एक अनेक होई बिस्थरिओ,
आन रे आन भरपूरि सोई॥]यासाठी ते अनंत आहे.अनेक नावांनी त्यास पुकारले जात आहे.[आदि अंत जिह कर नहीं, जिह कर नाम अनंत।
सभ करि पालन पराइ, 'रविदास' अबिगत भगवंत॥ १॥—रविदास दर्शन, दोहा ५८]संत रोहिदासांनी आपल्या उपास्य देवाला एकाच नावाने 'राम' म्हटले आहे.परंतु त्याबरोबरच हे सुद्धा सांगितले आहे की, माझा राम लोकप्रसिद्ध दशरथपुत्र नव्हे, माझा राम सर्वव्यापक आहे.तो माझ्यातसुद्धा निवास करतो आणि तो ह्या विश्वकुटुंबात आहे.['रविदास' हमारो राम जी, दसरथ करि सुत नांहि।
राम हमउ मंहि रमि रह्यो, विसव कुटंबह मांहि॥ १॥—रामदास दर्शन, दोहा १]लोक त्यास आपआपल्या विश्वासाने व आपआपल्या सोईनुसार निरनिराळ्या नावांनी पुकारतात.संत रोहिदासांनीसुद्धा त्या नावांना स्वीकारले आहे.[जयौ राम गोविंद बहिल, वासुदेव, हरि विष्णु मधुकीट भारी।
क्रिस्न केसो रिसीकेस कंवलाकंत, अहो भगवंत त्रिविध संतवाप हारी॥—संत रविदास, पृष्ठ १६४.]

संतरोहिदासांनीसांगितलेआहेकी."तीसर्वएकाचरामाचीरूपेआहेत.['रविदास' हमारो साइयां, राघव राम रहिम।
सभ ही राम को रूप हैं, केसो क्रिस्न करीम॥ ३॥—रविदास दर्शन, दोहा ६०]जोपर्यंत कृष्ण, करीम, राम, रहीम, हरी, राघव या सर्वांना एक रूपात मानले जात नाही आणि वेद, कुरान, पुराण इत्यादी ग्रंथ वाचूनही जोपर्यंत ब्रह्म तसेच ह्या जगाला एक रूपात पाहिले जात नाही, [क्रिस्न करीम राम हरि राघव, जब लग एकै ऐक नही पेख्या।
वेद कतेन कुरान पुरातनि, सहजि ऐक नहि देख्या॥
जोई जोई करि पूजिऐ सोई सोई कांची, सहजि भाई सति होई॥]तोपर्यंत प्रभुप्राप्तिसाठी ज्यादेव-देवतांची पुजा केली जाते.ती सर्व निष्फळ होत आहे.

संत रोहिदास अद्वैतवादी आहेत.यासाठी ते ब्रह्म तसेच जीवात्मामध्ये कोणताही तात्विक भेद मानीत नाहीत.त्यांचे मतानुसार ब्रह्म आणि जीव यामध्ये, अद्वैत भाव आहे.त्यात काही अंतर नाही.ब्रह्म आणि जीव यामध्ये असा भेद आहे की, सोने आणि सोन्याचे बनविलेले दागिने, पाणी आणि पाण्यात निर्माण झालेली लहरे, तरंगे, लाटा, सूत आणि सुतापासून बनविलेल्या कपड्यात तसेच दगड आणि दगडापासून बनविलेल्या मुर्तिमध्ये मुळात काही फरक नाही.[कनक कुंडल सुत पट जुदा, रजु भुजंग भ्रम ऐसा॥
जल तरंग पाहन प्रतिमा ज्यों ब्रह्म जीव दुति ऐसा॥]म्हणून तर त्यांनी.म्हटले आहे की, "माझा (जीव) आणि तुझे (ब्रह्म) यात अंतर काय आहे?वास्तविक पाहाता, तू आणि मी एकच आहे.अगदी याचप्रकारे सोने आणि त्याचे दागिने, पाणी आणि तरंग[तोहीं मोहीं मोहीं लोहीं अंतरू कैसा, कनक कटिक जल तरंग जैसा॥—संत गुरू रविदास वाणी, पृष्ठ ८३.]म्हणून तर संत कबीरप्रमाणे[जल में कुंभ कुंभ मे जल है, बाहर भीतर पानी।
फूटा कुंभ जल जलहिं समाना, हरि तथ कह्यो ग्यानी॥]संत रोहिदाससुद्धा सांगतात की, "मीपणा नाहीसा झाल्यावर फक्त तूच राहातो.ज्याप्रमाणे तरंग, लाटा समुद्रात मिसळून जलमय होतात.त्यांच्यात द्वैतभाव राहात नाही.[जब हम होते तब तू नांहिं, अब तूं ही मै नाही।
अनल अगम जैसे लहर मइ ओदधि, जल केवल जल मांही॥—संत गुरू रविदास वाणी, पृष्ठ ९७.]

ब्रह्म आणि आत्मा यांचा हा द्वैतभाव भ्रमजन्य आहे.हा द्वैतभाव मायामुळे होतो.अविद्या (माया अथवा अज्ञान) मुळे ज्ञानदीप मलिन होतो.जीव मायेत फसून आपल्या मूलरूप ब्रह्मास विसरतो.आपल्या कर्मबंधनास बांधून जीव अनेक योनीस भटकत फिरत रहातो.त्याला पापपुण्याचे ध्यान रहात नाही.आणि त्याची तू-मी ची भावना उग्र होते.संत रोहिदासांचे स्पष्ट मत आहे की, जेव्हा जीवाचा हा अहंभाव राहात नाही.तर त्याचा द्वैतभाव नष्ट होत जातो आणि तो जीव ब्रह्मरूप होऊन जातो.[(क) माधो अविदिआ हित कीन, ता थै तौर नाम न लीन्ह॥ टेक॥
जल थले जहां जहां लगु, ॥करम करम वा संग जाई।

अनुक्रमणिका

मोह फांस असाध बाध्यो, कछु न चले उपाई॥—संत रैदास पृष्ठ १८५.
त्रिगुण ओनी अचेत संभव, पुनी पुन पाप असोच॥
मानुषा अवतार दुर्लभ, तिहीं संकट पोच।
(ख) मैं तै ममिता देखि सकल जग, मैं तें मूल गवांई॥
जब गऐं ममिता ऐक ऐक मन, तब ही ऐक है भाई॥]

संत रोहिदासांनी मायास मोठी विकट[केसवे विकट माया तोर।—संत रैदास पृष्ठ १५१.]तसेच प्रबल दाखविली आहे.ही खोटी माया सर्वांना धोका देत असते आणि सर्व जगास त्रिविध तापात[(अ) 'रविदास' सत्त इक नाम है, आदि अंत सचु नाम।
हनन करेइ सभ पाप ताप, सत्त सुखन करि खान॥ ५॥—रविदास दर्शन, दोहा २५.
(ब) अंतर्मुखी भइ जउ कराहि, सत्त नाम करि जाप।
'रविदास' तिन्ह सौं भज हुहिं, जगतह तीनहु ताप॥ १६॥—रविदास दर्शन, दोहा ३६.]जाळीत आहे.[झूठी माया जग डहकाया, तीनि ताप दहे रे।]ही माया सर्व जगास खात आहे. ही सर्वांना भ्रमिष्ठ करणारी आहे.देवता, मनुष्य आणि ऋषी मुनींनासुद्धा ही माया नाचवित राहिली आहे.मोठे-मोठेयोगी, यती, तपस्वी, संन्यासी आणि पंडितसुद्धा मायासमोर उभे राहू शकत नाही.[बरजि हो बरजि बीठुले.माया जग खाया।
महा प्रबल सबहि, तसि किये सूर नर मुनि भरमाया॥
जोगी जती तपी संन्यासी, पंडित रहया न पाया।—संत गुरू रविदास वाणी, पृष्ठ ८६.]ह्या प्रबल मायेपासून बचाव होऊ शकणार नाही अशी गोष्ट नाही.राम नावाचे स्मरण केल्याने मायापासून सुटका होते.[कहै 'रविदास' राम जपि रसना, माया कैसे संग रहे रे।]ही माया खोटी आहे.म्हणून सत्यरूप प्रभुभक्तिचे पालन केले पाहिजे.[यह माया सब थोथरी रे, भगति कौं प्रतिपारि।]

ह्या दिसणाऱ्या जगास संत रोहिदासांनी खोटे आणि विनाशशील म्हटले आहे.[(१) जो दीसै सो होइ विनासा।
(२) कहै 'रविदास' निदान दिवाने।
चेतसि नही दुनिया फनखाने।]हा प्रभुचा खेळ (बाजी) आहे.[कह 'रविदास' बाजी जगु भाई। बाजीगर सो मोहि प्रीति नि आई॥ ३॥—संत रविदास, पृष्ठ १८८.]प्रभू बाजीगर (खेळाडू) आहे आणि हे जग त्याची बाजी आहे.[कह 'रविदास' बाजी जगु भाई। बाजीगर सो मोहि प्रीति नि आई॥ ३॥—संत रविदास, पृष्ठ १८८.]बाजीगर खरा आहे व ही बाजी खोटी आहे.जो बाजीगरच्या रंगात रंगलेला आहे, तोच ह्या बाजीच्या मर्मास ओळखू शकतो.[बाजीगर तूं राचि रहीऐ, बाजी कूं मर्म दन जाना॥
बाजी झूंठ सांच बाजीगर, जाना मत पतियाना॥]

संत रोहिदासांच्या विचारानुसार हे जग स्वप्नवत तसेच खोटे (याच रूपात) आहे.ज्याप्रमाणे एक राजा स्वप्नात भिकारी बनतो आणि आपले राज्य गेल्यावर फार दुःख करतो.राजा झोपेतून जागा होताच तो आपल्या पूर्व स्थितिमध्ये येतो आणि त्याचे राज्य गेल्याचे दुःखही स्वप्नासारखेच जाते.संत रोहिदासांचे सांगणे आहे की, "प्रभुस सोडून मनुष्य स्वप्न जगात येऊन दुःख भोगतो, परंतु ज्ञात होताच तो आपल्या मूळ आनंद रूपात मिळतो."तेव्हा तो जगातील दुःख-कष्टापासून मुक्ती मिळवितो.[नरपति एक सिंघासनि सोइआ सुपने भइआ भिकारी।
अछत राज विछुरत दुखु पाइआ, सो गति भई हमारी॥]याच कारणामुळे संत रोहिदासांनी या जगास दुःखाचे घर[जत देखउं तत दुख की रासी।]आणि मानवदेहास दुर्लभ[मानुखा अवतार दुलभ]व अनेक पुण्यकर्मांचे फळ[दुर्लभ जनमु पुंनि फल पाइओ, विरथाजातअविवेकै।—संत रविदास, पृष्ठ १६९.]दाखविले आहे.ह्या सुयोगापासून लाभ घेण्याचा त्यांनी मानवास वारंवार प्रेरणा दिली आहे.[(क) जौ तुम राम नाम रंग राते, और रंग न सुहेही।
कह 'रविदास' भजौ रे क्रिपाविधि, प्रान गए पछितै हौ॥
(ख) (१) जौ लौं घट मंहि पुरान है, तौ लौं जपउ सत्त नाम।
'रविदास' परम पद पाइहि, जिन्ह घटि बसियो राम॥ २॥—रविदास दर्शन, दोहा २२.
(२) हरि सा हीरा छांडि कै, आन की आस।
ते नर जमपुर जाहिंगे, सतभाषै 'रविदास' ॥ २१॥—रविदास दर्शन, दोहा ४१

## अनुक्रमणिका

(३)'रविदास' रात न सोइये, दिवस न करिये स्वाद।
अह निसि हरी जी सुमिरिये, छांडि सकल प्रतिवाद॥ १॥—रविदास दर्शन, दोहा १७७.]याच रूपात संत रोहिदास जगाला कर्मक्षेत्राच्या रूपात स्वीकारतात.त्यांचे स्पष्ट सांगणे आहे की, "यावेळी पुण्य कर्म करून घे.नाही तर हा मानवाचा जन्म पुन्हा मिळणार नाही.[अब की बेर सुकिरत करीजा,
बहुरि न यह गढ पाय, वे।]

**धार्मिक व सामाजिक विचार.**—संत रोहिदास आपल्या पूर्व जन्माच्या कर्मामुळे भवबंधनापासून मुक्ती पावण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची प्रेरणा देतात.यासाठी संत रोहिदासांनी माणसांची करणी, कथन व राहणी याविषयी अनेक गोष्टी आपल्या वाणीत प्रसंगानुसार सांगितलेल्या आहेत.याच कारणामुळे त्यांची धार्मिक, सामाजिक विचारधारांचे आपोआप व्याख्यान झाले आहे.

धर्माच्या क्षेत्रात संत रोहिदासांनी बाह्याचारास त्यांना प्रभुच्या खऱ्या भक्ती भावनाशिवाय व्यर्थ दाखविले आहे.[राम नाम विन जे कुछ करीये, सो सब भरम कहाई।]धर्माचे अनेक प्रकारे वर्णन केले जाते.त्याप्रमाणे लोक आचरण करतांना दिसून येतात.धर्माचे पालनव आचरण करण्यामुळे सिद्धी मिळू शकते, असे धर्म कर्म आहे हे कोणीच समजत नाही[बहु विधि धरम निरूपीऐ, करता दीसै सभ लोई।
कवन करम ते छूटिऐ, जिह साधे सभ सिधि होई॥] काही लोक साधु, संतांचा, भक्तांचा धार्मिक वेश धारण करतात.परंतु यांच्या महत्तेचे रक्षण करीत नाहीत.ते रामाचे नांव तर घेत नाहीत.फक्त कामक्रोधात आपले जीवन व्यर्थ घालवीत राहातात.[भेष लीयो पै भेद न जान्यो, इमृत लेइ विखै सौं सान्यो।
काम क्रोध मैं जनम गवांयो,
साध संगति मिली राम न गायो॥—संत गुरू रविदास वाणी, पृष्ठ १००.]संत रोहिदास राम आणि धर्माचा अतूट संबंध मानत सांगतात की, "जो नेहमी विद्यमान राहणारा आहे.तसेच अनश्वर आहे.त्यात सर्वप्रथम स्थान रामाचे आणि दुसरे स्थान धर्माचे आहे.यासाठी राम व धर्माशिवाय सर्व काही व्यर्थ तसेच असत्य समजले पाहिजे."[कायम दायम राम इक, दोयम सत्त इमान।
'रविदास' राम अरू सत्त विन, बिरया सभ कुछ जान॥ ८॥—रविदास दर्शन, दोहा २८] ह्या कथानाने संत रोहिदासांचे मत स्पष्ट प्रकट झाले आहे की जर माणसात प्रभुविषयी प्रेम व धर्मावर निष्ठा नाही तर त्याच्या इतर संसारिक उपलब्ध गोष्टी खात्रीने व्यर्थ आहेत.

संत रोहिदासांनी धर्म आणि कर्म ह्या दोघांना एकच म्हटले आहे.[धरम करम दुइ एक है, समुझि लेहु मन मांहि।
धरन बिना जौ करम है, 'रविदास' न सुख तिस मांहि॥ ५॥—रविदास दर्शन, दोहा १०२] त्यांनी धर्माचे अर्थ कर्म, सत्कर्म, स्वकर्म व सदाचरण असे मानले आहेत.राम नाम व सत्कर्मास त्यांनी जीवनास सुखी आणि सफल बनविणाऱ्या दोन महाशक्ती दाखविल्या आहेत.त्यांचे म्हणणे आहे की, मनुष्यास फक्त दोघांवर भरोसा केला पाहिजे.एक रामावर आणि दुसरा आपल्या सत्कर्मावर, असे केल्यानेच तो जीवनाची सफलता प्राप्त करून घेईल.[एक भरोसो राम को अरू, भरोसो सचकार।
सफल होइहु जीवना, कहि 'रविदास' विचार॥ ४॥—रविदास दर्शन, दोहा १०२]याबाबत संत रोहिदास एक पैज लावतात व ती म्हणजे निष्काम कर्म भावना.त्यांचे मतानुसार मनुष्य नेहमी कर्म बंधनात बांधून राहातो.कारण तो कर्मफळाच्या आशेचा त्याग करीत नाही.आपण केलेल्या कर्माचे फळ अवश्य मिळण्याची इच्छा करतो आणि याच कारणामुळे मनुष्य आयुष्यापर्यंत दुःख भोगतो.[करम बंधन मंह रमि रह्यो, फल कौं तज्यो न आस।
करम मनुष्य को धरम है, सत भार्षे 'रविदास' ॥ १॥—रविदास दर्शन, दोहा १०३]यासाठी संत रोहिदास उपनिषद तसेच गीताच्या वचनानुरूप उपदेश देतात की, "मनुष्याला शंभर वर्षांच्या संपूर्ण आयुष्यभर धर्मासाठीचकर्म केले

अनुक्रमणिका

पाहिजे.मानवाचा धर्म फक्त कर्म करणे हाच आहे.कर्माच्या फळावर त्याचा काही अधिकार नाही.[धरम हेतहि कीजिऐ, सौ बरस लौं कार।
'रविदास' करमहि धरम है, फल मंहि नंहि अधिकार॥ ३॥–रविदास दर्शन, दोहा १०५]जे कर्म धर्म समजून निष्काम भावाने केले जाते.त्याचे फळ चांगलेच मिळते.असा संत रोहिदासांचा दृढ विश्वास आहे.न केलेले कर्म कधीच फळ देत नाही.[धरम समुझि जो कार होइ, उह कर फल होइ इस्ट।
'रविदास' कोउ भी करम फल, होहि नांहि अनिस्ट॥ ४॥ –रविदास दर्शन, दोहा १०६]निष्काम भावाने केलेले कर्म प्रभुस मिळते.[करमन ही परभाउ तजि निहकरमी होइ कर काम।
'रविदास' निहकरमी करम ही, मेल कराए राम॥ ७॥ –रविदास दर्शन, दोहा १०९]

वरील दृढ विश्वासाचे कारण संत रोहिदासांची स्वानुभूती आहे.ते आपल्या अनुभवाची गोष्ट सांगतात की, "मी जिभेने नेहमी हरिनामाचे स्मरण करतो आणि हाताने नेहमी आपले काम करतो.असे करीत असता, मी आयुष्याच्या चिंतापासून मुक्त झालो आहे.कारण राम स्वतः माझ्या सुखसोइची चिंता करीत आहे."[जिहबा भजै हरि नाम जित, हत्य करहिनित काम।
'रविदास' भए निहचिंत हम, मम चिंत करेंगे राम॥१२ ॥–रविदास दर्शन, दोहा ११४]संत रोहिदास ह्यांचे तत्त्वानुसार स्वकर्मच धर्म आहे.हीच भक्ती आहे.यासाठी फक्त पूजा-पाठ, व्रत-तीर्थ, यज्ञकर्म इत्यादी धार्मिक अनुष्ठानांची काही आवश्यकता नाही.ते सांगतात की, मी प्रत्येक वेळी जोडे बनविण्यासाठीआपल्या हातात आपली रापी आणि आरी ही हत्यारे घेत असतो.खरे काम करणे माझा धर्म आहे.माझा हा धर्म (जोडे बनविण्याच्या व्यवसायामुळे मी आपला उदरनिर्वाह करतो.) माझा संसाररूपी सागर पार करील.['रविदास' हौ निज हत्थहि, राखौ रांवी आर।
सुकिरित ही मम धरम है, तारैगा भव पार॥३ ॥–रविदास दर्शन, दोहा ११७]हीच सहज भक्ती आहे.हिलाच 'अजपाजाप' म्हणतात.['रविदास' अराधहु देवकूं इकमन हुइ धरि ध्यान।
अजपा जाप जपत रहहु, सत्तनाम सत्तनाम॥१९ ॥–रविदास दर्शन, दोहा ३९]हेच कारण आहे की, संत रोहिदास काशी, काबा तसेच मंदिर आणि मशिदी इत्यादी धर्मोपासना करण्याच्या स्थळांना महत्त्व देत नाहीत.एवढेच नव्हे तर यांना त्यांना महत्त्व न देण्याचा तसेच समान मानण्याचा उपदेशसुद्धा देतात.[(अ) 'रविदास' हमारो राम जोई.सोई है रहमान।
कावा कासी जानीयहि, दोउ एक समान॥२ ॥–रविदास दर्शन, दोहा १४५
(ब)'रविदास' उपिजइ सभ इक बुंद ते, का वाह्मन का सुद।
मुरिख जन न जानइ, सभ मंह राम मजूद॥२ ॥–रविदास दर्शन, दोहा ४७]धर्माच्या नावावर जीव हत्या करणारे ढोंगी धर्मांध लोकांना त्यांनी बरेच फटकारले आहे.[(अ)'रविदास' जीव कूं मारि कर, कैसो मिलंहि खुदाय।
पीर पैगंबर औलिया, कोउ ना कहइ समुझाय॥१ ॥–रविदास दर्शन, दोहा १८२
(ब)'रविदास' सोह साधु भलो.जउ जग मंहि लिपत न होय।
गोविंद सों रांचा रहइ.अरू जानंहि नंहि कोय॥१ ॥–रविदास दर्शन, दोहा ८४]

जातपात, उंचनीच भावना, अंधविश्वास (रुढवाद) इत्यादीचा संत रोहिदासांनी निकराचा विरोध केला आहे.याचप्रमाणे मांसाहार, अनैतिकता, धननिष्ठा इत्यादी त्यांनी जाहीर निर्भत्सना केली आहे.यासंबंधी त्यांनी क्रांतिकारी तसेच प्रेरक विचार प्रकट केले आहेत.संत रोहिदास अतिशय मानवतावादी होते.ते मानवांना मानव होण्याच्या नात्याने महत्त्व देतात.धन, मान, मर्यादा, कुल इत्यादी कारणामुळे नाही.यामध्ये सर्वात मोठी अडचण जातीयवादाची, तिचे त्यांनी वारंवार खंडन केले आहे.त्यांचे म्हणणे आहे की, "सगळेच लोक जातीपातीच्या फेऱ्यात पडलेले आहेत.जातीभेदाचा हा महारोग मानवतेस खात आहे."[जात पांत के फेर मंहि.उरझि रहइ सभ लोग।
मानुषता कू खात हइ,'रविदास' जात कर रोग॥ २॥ –रविदास दर्शन, दोहा १२१]

अनुक्रमणिका

मानव समाजात एका जातीत अनेक जाती, पोट जाती पाहिल्या जातात.जोपर्यंत ही जातीभावना दूर होत नाही, तोपर्यंत मानवा-मानवात एकता येऊ शकत नाही.मानव एकतेसाठी जातीवाद दूर करण्याचा जोराचा प्रयत्न केला पाहिजे.[जात जात मे जात है, ज्यो केलन मे पात।
'रविदास' न मानुष जुड.सकैं जौ लौ जात न जात॥ ९॥—रविदास दर्शन, दोहा १२८]संत रोहिदासांचा उपदेश आहे, की, "जन्माच्या आधारावर कोणाचीही जात मानण्याचा सिद्धांत सोडला पाहिजे.व्यक्तिचा व्यवसाय मुख्य आहे.त्याच्या आधारावर त्याच्या जातीची ओळख केली पाहिजे." वैदिक विचारधाराप्रमाणे जातीचा आधार जन्म नाही.तर मनुष्याचे कर्मच (व्यवसाय) आहे.[जन्म जात कूं छांडि करि, करली जात परधान।
इसी वेद कौ धरम है, करै 'रविदास' वखान॥ ३॥—रविदास दर्शन, दोहा १२२]कोणीसुद्धा मनुष्य जन्मापासून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य अथवा क्षुद्र होत नसतो.उच्च कर्मापासून उच्च वर्ण प्राप्त होत असतो.[ब्राह्मण खत्तरी वैस सूद, 'रविदास' जनम ते नाहि।
जौ चाहइ सुबरन कउ, पावई करमन मांहि॥ ४॥—रविदास दर्शन, दोहा १२३]नीच कर्म मनुष्याला नीच बनविते.['रविदास' जन्म के कारनै, होत न कोउ नीच।
नर कूं नीचा करि डारि है, औछे करम कौ कीच॥ ७॥—रविदास दर्शन, दोहा १२६]जेव्हा कोणी व्यक्ति वेद वाचतो, तेव्हां तो पंडित बनतो.जोडे शिवणाऱ्यास चांभार म्हटले जाते.वास्तविक सर्व मनुष्य एकसमान आहेत.त्यांच्यामध्ये जन्मजात काही अंतर नसते.केवळ कर्माप्रमाणे त्यांचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र ही चार निरनिराळी नावे ठेवली आहेत.[वेद पढ़ई पंडित वन्यो, गांठ पन्ही तउ चमार।
'रविदास' मानुष इक हइ, नाम धरै कइं चार॥ ५॥—रविदास दर्शन, दोहा १२४]कर्माप्रमाणे जाती मानून संत रोहिदासांनी ह्या चारी वर्णांची सुस्पष्ट परिभाषा दिली आहे.ह्या परिभाषा यथार्थवादी, क्रांतिकारी तसेच पाळण्यायोग्य आहेत.

संत रोहिदासांचे सांगणे आहे की, फक्त उच्चकुळात जन्म घेतल्याने कोणी ब्राह्मण होत नाही.ब्रह्मवेत्ता किंवा, काम, क्रोध, मद, लोभ इत्यादी विकारांचा परित्याग करून धर्मानुकूल आचरण करणारी व्यक्तीच ब्राह्मण होते.[(अ) ऊंचे कुल के कारणै, ब्राह्मण कोय न होय।
जउ जानहि ब्रह्म आत्मा, 'रविदास' कहि ब्राह्मण सोय॥ १॥रविदास दर्शन, दोहा १३४
(ब) 'रविदास' मदुरा का पीजियै, जौ चढै चढै उतराय।
नाव महारस पीजियै, जौ चढै नांहि उतराय॥ १५॥—रविदास दर्शन, दोहा ३५]जो वीर दीनःदुखी लोकांसाठी त्यांचे दुःख नाहीसे करण्यासाठी धर्माच्या रक्षणासाठी आपल्या प्राणाचे बलिदान करतो.त्यासच खरा क्षत्रिय समजले पाहिजे.[अंग अंग कटवाइहि, जउ दीनन करि हेत।
'रविदास' छत्री सोइ जानिए, जौ छाडे नांहि खेत॥ २॥—रविदास दर्शन, दोहा १३९]तसेच प्रामाणिकपणे आपलाव्यापार धंदा करीत पुण्य मिळवितो, योग्य व्यापार किंवा सर्वांच्या सुखासाठी उत्पन्न मिळवितो, तोच खरा वैश्य होय."['रविदास' वैस सोइ जानिये, जउ सत्त कार कमाय।
पुंन कमाई सदा लहै, लौरे सर्वत्त सुखाय॥ १॥ —रविदास दर्शन, दोहा १४०]संत रोहिदास वैश्याची एक अन्य अध्यात्मीक व्याख्या करतात की, "जो माणूस सत्याच्या दुकानावर सत्याचा व्यापार सत्याच्या तराजूत तोलून विकतो तोच खरा 'वैश्य' होय.[सांची हाटी वैठि कर, सौदा सांचा देइ।
तकड़ी तोलै सांच की, 'रविदास' वैस है सोइ॥ २॥ —रविदास दर्शन, दोहा १४१]संत रोहिदासांची शूद्राची व्याख्यासुद्धा अद्भूत अहे.ते सांगतात की, "जो अति पवित्र आहे.जी व्यक्ती अत्यंत पवित्र जीवन व्यतीत करते.तिलाच 'शूद्र' अर्थात शुद्र-पवित्र (उत्तम) समजले पाहिजे."

कुकर्मी मनुष्य अशुद्ध-अपवित्र (नीच) असतो.त्यास मानले पाहिजे.['रविदास' जउ अति पवित्त है, सोइ सूदर जान।
जउ कुकरमी असुध जन, तिन्ह ही न सूदर मान॥ १॥ —रविदास दर्शन, दोहा १४२]परंपरेप्रमाणे शुद्राचे कर्म सेवावृत्ती मानलेली आहे.संत रोहिदास शूद्राची व्याख्या नितांत भिन्नरूपाने करतात.त्याची व्याख्या अशी आहे.जो मनुष्यमात्राच्या

अनुक्रमणिका

सेवेत राहतो.तरीसुद्धा 'सेवक' होण्याचा अहंकार करीत नाही.जो कधी असत्य बोलत नाही.तोच शूद्र (सेवक) धन्य आहे.त्याचे जीन प्रशंसनीय आहे.[हरिजनन करि सेवा लागै, मन अहंकार न राखै।
'रविदास' सूद सोइ धन है, जउ असत्त वचन न भाखै॥ २॥ –रविदास दर्शन, दोहा १४३]एवढेच नव्हे तर संत रोहिदास 'सेवा' ला'तप' म्हणतात.अग्नितापा करणाऱ्या योग्यास ते 'सेवा अग्नि' चे तप करून मोक्ष प्राप्त करण्यास उपदेश देतात.[धुआं तपन मंहि का ध्रा, धूम तपन ही त्याग।
'रविदास' मिलि है मोहा धाम, सेवा ही तप आग॥ ३॥ –रविदास दर्शन, दोहा १७६]मनुष्य मात्राची सेवा करण्याची प्रेरणा देताना [मन मंहि सत्त संतोष रखहु, सभ करि सेवा लाग।
सेवा सब कछु देत है, 'रविदास' सेवंहि मति त्याग॥ १॥ –रविदास दर्शन, दोहा १७४]संत रोहिदास आपल्या विषयी म्हणतात की, "मी तर दीन-दुःखी लोकांची सेवा करीत असता.रात्रंदिवस सेवा करण्यामुळे मला प्रभू भेटण्याची आशा वाटते."[दीन सुखी करि सेव मंहि, लागि रह्यो 'रविदास'।
निसि वासर की देव सौ, प्रभुमिलन की आस॥ २॥ –रविदास दर्शन, दोहा १७५]

सफल तसेच सुखी जीवनाचा आधार संत रोहिदासांच्या दृष्टिने प्रभू परायणता आहे.ते मुळातच भक्त अहेत.त्यांचा हा दृष्टिकोण त्यांच्या जीवन गौरवास योग्य असाच आहे.याच कारणामुळे ते आपल्या वाणीत प्रभू चिंतनावर जोर देतात.त्यांच्या उपदेशाची परिणती नेहमी प्रभुभक्तित होते.त्यांचा प्रत्येक उपदेश भक्तिकडे आकर्षित करतो.त्यांच्या ह्या उपदेशात नैतिकतेचे बीजसुद्धा आहे.त्यांचे सांगणे आहे की, "सत्य, संतोष आणि सदाचार हे जीवनाचे मूलाधार आहेत."[सत्त संतोष अरू सदाचार, जीवन को आधार।
'रविदास' भये नर देवते, जिन तिआगे पंच विकार॥ १॥ –रविदास दर्शन, दोहा १५९]यांचे पालन करणारेअर्थात काम क्रोधादि पंचविकाराचा परित्याग करणारे लोक देवासमान होतात.[सत्त संतोष अरू सदाचार,जीवन को आधार।
'रविदास' भये नर देवते, जिन तिआगे पंच विकार॥१ ॥–रविदास दर्शन, दोहा १५९]सत्यनाम ईश्वराचे आहे.[सत्त ईश कहुं रूप है, सत्त सक्ति अत अपार।
'रविदास' सत्त कूं धारणा, देइहि पाप निबार॥३ ॥–रविदास दर्शन, दोहा २३]देवत्वप्राप्ती मानवाचा परम पुरुषार्थ आहे.जितेंद्रियता याची प्रथम व अंतिम शर्त आहे.जितेंद्रिय व्यक्तीच परमपद अर्थात देवत्वपद प्राप्तिचा अधिकारी आहे.[जो बस राखे इंद्रिया, सुख दुख समझि समान।
सोउ अमरित पद पाइगो.कहि 'रविदास' बखान॥२ ॥–रविदास दर्शन, दोहा१६०]यामुळे विवेक व सद्बुद्धी बनत राहाते.[बुद्धि अरू विवेक हि, जड राखन चाहौ पास।
इंदिरियां संगनिरत कौ, तजि देहु 'रविदास' ॥३ ॥–रविदास दर्शन, दोहा १६१]

आज भौतिकवादाचा बोलबाला आहे.ही पाश्चात्य सभ्यतेची देणगी आहे.यामध्ये भोग तृप्तीवर जोर दिला जात आहे.भोगमय जीवनातच जीवनाची सफलता आहे.

यामुळे पाश्चात्य देशात जी अशांति आणि संघर्ष पसरला आहे.तो स्पष्ट आहे.आमच्या भारतीय सभ्यतेत जीवनाचे सुख विषयाच्या त्यागात मानले गेले आहे.विषय भोगात नाही.संत रोहिदास सांगतात की, मनुष्यांनी आपल्या कामना व इच्छांना विषय उपभोगापासून दूर ठेवले पाहिजे.यामुळे त्यांचे मन आणि बुद्धि शांत राहील.शांत मन किंवा स्थिर बुद्धि होण्यामुळे मनुष्याचे हृदय प्रभुच्या दिव्य ज्योतिने प्रकाशित होईल.['रविदास' इच्छांए आपुनी, भोगन सेति रख दूर।
मन बुद्धि रहंहि सांत नित.घट मंहि रहिवै नूर॥४ ॥–रविदास दर्शन, दोहा १६२]मन व इंद्रियांना बहिर्मुखी न करता कासवाप्रमाणे संकुचित, संयमित (अंतर्मुखी) ठेवले पाहिजे.यामुळे मनुष्याचे चित्त शांत राहाते आणि त्याचा आत्मविश्वास वाढतो.[कुरमे भांति जड रहहि, मन इंदिरिया 'रविदास'।
सांत रहइ नित आतमा बढहि आतम विसास॥५ ॥–रविदास दर्शन, दोहा १६३]

अनुक्रमणिका

जीवनात परम सुख प्राप्तीसाठी संत रोहिदास संतोष रूपी धन मिळविण्याचा उपदेश देतात.[जो कोउ लोरै परम सुख, तउ राखै मन संतोष।
'रविदास' जहां संतोष है.तहां न लागै दोष॥१ ॥—रविदास दर्शन, दोहा १६४]धन संशयाला ते दुःखाचे कारण मानतात.धनसंग्रह केला नाही पाहिजे.धनोपार्जन करून त्यास सत्कर्म व परोपकार (जनसेवा) मध्ये लावले पाहिजे.[(अ) धन संचय दुख देत है.धन त्यागे सुख होय।
'रविदास' सीख गुरुदेवकी, धन मति जोरे कोय॥ २ ॥—रविदास दर्शन, दोहा १६५
(ब) सच्चा सुख सत धरम मंहि, धन संचेय सुख नांहि।
धन संचय दुख खान है,'रविदास' समुझि मन माहि॥३ ॥—रविदास दर्सन, दोहा १६६]

संत रोहिदासांनी मनुष्याला हर्ष-शोकात समभाव ठेवण्याचा उपदेश केला आहे.त्यांचे म्हणणे आहे की, "मनुष्यास सुखाच्या नदीमध्ये डुंबता कामा नये." त्याचप्रमाणे डोक्यावर संकटाचे ढग पसरलेले पाहून,हताश व निरूत्साहित झाले नाही पाहजे.[सुख सरिता महं बुड़ि करि, सूझ बूझ मति खोय।
दुख की बदरी पेखि कै,'रविदास' नह दीजिये रोय॥१ ॥—रविदास दर्शन, दोहा १६७]सुख दुःखांना समान समजल्यावर दुःखसुद्धासुखाप्रमाणे वाटेल.याउलट जी व्यक्ती सुखास दुःख म्हणते, तिला सुखातही दुःख प्राप्त होते.अशी व्यक्ती जीवनात कधीच सुखी होऊ शकत नाही.[सुख दुख सम करि जानहु, तउ दुखह सुख होय।
'रविदास' जो सुखंहि दुख कहै, तउ सुखभी दुख होय॥ २॥ —रविदास दर्शन, दोहा १६८]

जर मनुष्यस जीवनात सुखाची इच्छा असेल तर त्यास आपल्या मनास सदा सहज-सत्य अवस्थेत ठेवले पाहिजे आणि कधीसुद्धा कुकर्मांचे अनुकरण केले नाही पाहिजे.तसेच दुष्ट, कुमार्गी लोकांची संगत कधीच केली नाही पाहिजे.तसेच संत-सदाचारी लोकांची नेहमी संगत आणि सेवा केली पाहिजे.[(अ) 'रविदास' सदा ही राखिए, मन मंहि सहज सभाओ।
राखो नही कुपंथ पग, जौ लौरो सुख चाओ॥ १॥ —रविदास दर्शन, दोहा १७०
(ब) 'रविदास' मोरे मन लागियो, राम प्रेम को तीर।
राम रमायन जउ मिल हि, तउ हरै हमारो पीर॥ ६॥ —रविदास दर्शन, दोहा ७१]

संत रोहिदास स्वतंत्र जीवनाचे पक्षपाती होते.त्यांनी पारतंत्र्यास 'पाप' म्हटले आहे.त्यास 'कलंक' मानले आहे.पराधिन व्यक्ती एखाद्या दास-गुलामाप्रमाणे जीवन जगतो.तिच्याबरोबर कोणी प्रेम करीत नाही.त्याचा सर्वजण तिरस्कार करतात.त्याला हीन भावनेने पाहिले जाते.त्या दीनहीन व पतित जीवनापासून वाचविण्यासाठी मनुष्याने स्वाधीन-स्वतंत्र राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे.[(अ) 'परिधीनता पाप है, जान लेहु रे मीत।
'रविदास' दास प्राधीन सों, कौन करे है पीत॥ १॥ —रविदास दर्शन, दोहा १९२
(ब) 'रविदास' सोह साधु भलो, जउ हंसा गति होय।
कामकरम सभ छांडि करि, राम भजन मंह खोय॥ १०॥ —रविदास दर्शन, दोहा ९३]ही गुलामगिरी विदेशी राज्याचीसुद्धा असू शकते आणि इंद्रिय सुखाची सुद्धा.संत रोहिदास निसंशय दोन्ही प्रकारच्या गुलामीतून मुक्त होण्याचा इशारा करतात.

संत रोहिदासांची स्वराज्याची कल्पनासुद्धा परमउदात्त आहे.ते रामराज्याचीसुद्धा इच्छा करतात.[ऐसा चाहौं राज मैं, जहां मिलै सवन कौ अन्न।
छोट बडो सभ सम बसै, 'रविदास' रहै प्रसन्न॥ १॥ —रविदास दर्शन, दोहा १९४]स्वराज्यासंबंधीच्या दोह्याप्रमाणे संत रोहिदासांचे अनेक दोहे प्रेरणेचे अक्षय स्त्रोत बनू शकतात.[(अ) 'रविदास' श्रम करि खाइहि, जौ लौ पार वसाय।
नेक कमाई जउ करइ, कबहु न निहफल जाय॥ १॥ —रविदास दर्शन, दोहा ११५
(ब) धरम करम दुइ एक है, समुझि लेहु मन माहि।
धरम बिना जौ करम है, 'रविदास' न सुख तिस मांहि॥ ५॥ —रविदास दर्शन, दोहा ११९

अनुक्रमणिका

(क) 'रविदास' वैस सोइ जानिये, जउ सत्त कार कमाय।
पुन कमाई सदा लहै, लोरे सर्वच सुखाय॥ १॥ —रविदास दर्शन, दोहा १४०]

**संत रोहिदास आणि समाजकल्याण**

संत रोहिदास गुफेत बसून साधना इत्यादी करून केवळ आपल्या मोक्षाची व्यवस्था करणारे एकांगी संत नव्हते.[डॉ.योगेंद्रसिंह, संत रैदास प्र.सं.१९७२ पृष्ठ ११७ ते १२०]त्यांच्या साधनेची मूलभूत मान्यता लोकांचे कल्याण होती.ज्यांच्या कार्यामुळे लोकांचे कल्याण होईल.अशा व्यक्तिसच ते साधु मानत होते.[सब सुख पावै जासु ते, सो हरिज के दास।
कोउ दुःख पावै जासु ते सो न दास हरिदास॥]

ज्यांनी ह्या नवयुगाच्या अनुरूप ग्राह्य विचारधारांस सर्व स्वीकृत रूपामध्ये प्रस्तुत केले.असे संत रोहिदास हे प्रथम संत होते.संत रोहिदासांनी तत्कालिन युगात परंपरेने चालत आलेल्या सामाजिक अन्यायाचे परिणाम स्वरूप उध्वस्त भारतीय समाजासमोर सामाजिक समता ठेवली, धर्म आणि भक्तिच्या क्षेत्रात प्रत्येक व्यक्तिच्या समान अधिकाराची गोष्ट सांगितली.नवयुगात त्यांनी समतेचा उद्‌घोष केला.जन्मजात उच्चता तर त्या युगात आपल्या फार मोठा उपहास पाहून चुकली होती.संत रोहिदासांची युगानुरूप गोष्ट जनतेस त्वरित घेण्यासारखी वाटली.

तत्कालिन समाजात चालत आलेला हिंदू-मुस्लीम सांस्कृतिक संघर्षसुद्धा संत रोहिदासांना आवडत नव्हता.त्यांनी या दोन्ही धर्मांना एक मूलभूत समता मानून पारस्पारिक सौहार्दाचा संदेश दिला.त्यांनीत्या सामाजिक तनावाच्या युगात एकतेचा अभूतपूर्व संदेश दिला होता.[कृष्ण करीम राम हरि राघव जब लगि एक सन पेषा।
वेद कतेव कुरान पुराजन सहज एक करि भेषा॥]

संत रोहिदासांनी तत्कालीन समाजाची परिस्थिति आत्मसात केली आणि आपत्या वाणीत त्या समस्यांचे एक व्यावहारिक समाधान केले.संत रोहिदास एक आदर्श भक्त व विचारक या बरोबरच तत्कालीन समाजाचे एक फार मोठे समाजसुधारक होते.त्यांच्या वाणीने समाजास तत्कालिन युगात एक समाधानपूर्ण विचारधारा दिली होती.

**रोहिदासांची वैचारिक बैठकः**

संत रोहिदासांनी अध्यात्म साधनेतून आपल्या काळात क्रांतीकारी पर्व सुरू केले होते.त्याचा पाठपुरावा आजच्या काळातदेखील पोषक व हितावह ठरणार आहे.त्यांची धार्मिक मते व त्या अनुषंगाने त्यांची वैचारिक बैठक अशी होती.[श्री.भाउसाहेब चीभ, संत रविदास, जीवन व संदेश, प.आ.१९८५.,पृ.४१.]

(१)संत रोहिदासांना परंपरागत हिंदू धर्म मान्य नव्हता.त्याबाबत त्यांची निश्चयात्मक भूमिका होती.

(२)हिंदूधर्म पद्धती नुसार पुजापद्धती, कर्मकांड, आरती, व्रते देवदेवतांचा मान-सन्मान त्यांना मान्य नव्हता.त्याप्रमाणे ते करीत नसत.

(३)अठरा पुराणातील भाकडकथा ऐकण्याचा व ऐकवण्याचा त्यांना तिटकारा होता.

अनुक्रमणिका

(४)अवतारवादावर त्यांचा विश्वास नव्हता.

(५)ते रामभक्त वा कृष्णभक्त नव्हते

(६)ते वैष्णव साधू होते.भक्तीमार्ग त्यांनी स्वीकारला होता.सगुणोपासनेपेक्षा त्यांचा कल निर्गुणोपासनेकडेच होता.

(७)नामभक्तिवर त्यांचा विशेष जोर होता.

(८)तीर्थ यात्रा, पवित्र तीर्थाचे ठिकाणी स्नान, उपवास, व्रतवैकल्ये या गोष्टी त्यांच्या गावीही नव्हत्या.

(९)ते स्वतंत्र असा कोणताही नवीन पंथ स्थापन करण्याच्या विरूद्ध होते.

(१०)त्यांनी ब्रह्म, विष्णू, शिव यांचा एकाच परमात्म्याचे प्रतीक म्हणून उल्लेख केलेला आहे.त्यांनी देव मानलेले नाहीत.

(११)चार वर्णांचा धिक्कार करणारे ते पहिले संत व भक्ती मार्गाचा खऱ्या अर्थाने प्रचार, प्रसार करणारे दुसरे संत होते.

(१२)वेद आणि पुराणे यांचा अभ्यास करण्यापेक्षा त्या 'एकाचे' फक्त नाव घेणे फार महत्त्वाचे, ही त्यांची धारणा होती.

(१३)ते मांसाहार व मद्यपान निषिद्ध मानत असत.

(१४)ते अंधश्रद्धा व असत्य भाषण करणाऱ्या माणसांशी संबंधच ठेवू नये या मताचे होते.

(१५)काम, क्रोध, माया, मद, मत्सर, अहंकार यांचा त्याग करावा.कारण त्यामुळे सद्‌गुण, नीती, सदाचार यांचा नाश होतो अशी त्यांची शिकवण होती.

(१६)ते सामाजिक एकात्मतेचे पुरस्कर्ते होते.

(१७)उपजिविकेकरिता प्रामाणिक साधनांचा उपयोग करावा असे ते सांगत असत.

(१८)देवाच्या दरबारात जात आणि जन्म यांना स्थान नाही असा त्यांचा विश्वास होता.

(१९)हिंदू धर्मात शिरलेले ढोंग व असहिष्णुता यांचा त्यांनी धिक्कार केला.

अनुक्रमणिका

(२०)धर्माच्या बाह्यांगाने प्रदर्शन व सोंगाढोंगाचा त्यांना तिटकारा होता.
(२१)ते मानवतेचा पुरस्कार करणारे होते.

संत रोहिदासांच्या वरील मतांची व सुविचारांची महती काव्य विभागात त्यांच्याच दोहे व पदांचा आधार घेऊन गद्यरूपात मांडलेली आहे.

***

अनुक्रमणिका

## २८.रोहिदासांची काव्यसंपदा

रोहिदासांचा पवित्र वाणीमध्ये जे निर्माणकारी तत्त्व आहे.[संपादक, डॉ.शर्मा, डॉ.पिताम्बर, रविदास दर्शन, जगजीवनराम, आमुख.]त्यात जीवनाची पवित्रता, आचरणाची शुद्धता, उदारता, साधुता, विनम्रता, विवेकशीलता, वासनेपासून मुक्ती, ईश्वरभेटीची तळमळ, मानवप्रेम, शील, क्षमा, संतोष इत्यादी विशेषणे उल्लेखनीय आहेत.संत काव्य मुख्यतःदोहे व शब्द अथवा गेय पदांच्या रूपात पाहावयास मिळतात.गुरू रविदासांची वाणीसुद्धा दोहे आणि पदांच्या रूपात पाहावयास मिळते.सगळ्या पदांना निरनिराळ्या शास्त्रीय रागांची नावे दिली गेली आहेत आणि ती पदे शास्त्रीय ढंगाने गाइली जाऊ शकतात.

संत शिरोमणी महात्मा रोहिदासांच्या अमृत वाणीचा बहुतेक करून प्रत्येक धर्म जिज्ञासू थोडा फार परिचित आहे.[संपादक, डॉ.शर्मा, डॉ.पिताम्बर, रविदास दर्शन.दो शब्द, हजारीप्रसाद द्विवेदी.]परंतु दुर्भाग्याने त्यांची वाणी फारच थोडी उपलब्ध झाली आहे.बहुतेक वाणी (पदे) पाठांतर परंपरेने जिवंत राहिली आणि हळूहळू विसरतही गेली.त्यांची पदे लिहिलेल्या स्वरूपात फारच कमी उपलब्ध आहेत.ती इकडे तिकडे विस्कळीत पडलेली आहेत.प्रसिद्ध समाजसेवक आचार्य पृथ्वीसिंह आजाद यांनी मोठ्या परिश्रमाने अनेक दुर्लभ प्रतीमधुन पाठसंग्रह करून ‘रविदास दर्शन’ नावाचा ग्रंथ प्रकाशित केला.त्याचे संपादन त्यांने दोन सहयोगी विद्वान डॉ.बेनीप्रसाद शर्मा आणि डॉ.पिताम्बर नारायण, यांनी मोठ्या परिश्रमाने ते तळमळीने केले.त्यात बरेच मूल्यवान दोहे आहेत.महात्मा रोहिदासांच्या प्रेरणामयी पदांनी सामाजिक दृष्टिने उपेक्षित.आर्थिक दृष्टिने वंचित आणि राजनैतिक दृष्टीने तिरस्कृत अशा मनुष्यांना मान ताठ करून चालण्याची शक्ती दिली आहे आणि मनुष्य जीवनाचे उत्तम लक्ष्यापर्यंत पोहचण्याची प्रेरणा दिली आहे.म्हणून हे दोहे मानवतेचा मुल्यवान निधी आहे.याच्या चिंतन आणि मननाने अनेक पिढ्यांपर्यंत प्रेरणा मिळाली आहे व मिळत राहील.

चांभार जातीत अनेक विख्यात संत, महात्मा, हुतात्मा, देशभक्त आणि विद्वान झाले आहेत.[संपादक, डॉ.शर्मा, डॉ.पिताम्बर, रविदास दर्शन.भूमिकालेखक-पृथ्वीसिंह आजाद.]हे सर्व संत रोहिदासांच्या दोह्यामुळे तसेच उपदेशामुळे स्वतः प्रभावित तसेच उपकृत झाले आहेत.हे त्यांच्या दोहेपदांचे अमृतपान दुसऱ्यांना करून, त्यांच्यात यांचा प्रचार करीत राहिले.परंतु मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे की, परमपूज्य रोहिदासांचे दोहे-पदे सुरक्षित ठेवण्याचा कोणी प्रयत्न केला नाही.त्यांचा संग्रह करण्याकडे कोणी लक्ष दिले नाही.याचे कारण कदाचित हे होऊ शकते की, त्यांचा जन्म ‘चांभार’ या उपेक्षित जातीत झाला होता.यामुळे रोहिदास उपेक्षित संत राहिले आणि त्यांची अमृतमय वाणीदेखील उपेक्षित राहिली.महाराजांचे दोहे-पदे आणि त्यांच्या जीवनासंबंधी अधिक माहिती उपलब्ध नाही.रोहिदास प्रेमी याचा मोठ्या प्रमाणांत अनुभव घेत आहेत.आजकाल जिकडे तिकडे विखुरलेल्या अवस्थेत असलेले दोहे-पदे वाचन रोहिदासप्रेम आपली जिज्ञासा कशी तरी पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहेत.वास्तविक ही एक मोठी चिंताजनक परिस्थिती आहे.संत कर्मदासजीने गुरू रोहिदासांच्या वाणीचे बाबतीत आपली अनन्य श्रद्धाभक्ती प्रकट करतांना खालील श्लोक लिहिला आहे.

सुमत्र रविदास वचनं, कोटि विनाशनम।
रविदास चरणं ध्यान धरणं, कुल समूह उद्धारणम॥

अनुक्रमणिका

अर्थात रोहिदासांचे 'मंत्ररूप' वचन कोटि कोटि पापांचे विनाश करणारे आहे.रोहिदासांच्या पवित्र चरणांचे स्मरण करण्याने साऱ्या कुळांचा उद्धार होतो.श्लोकानंतर श्री.संत कर्मदासांनी"रविदास महिमा" याप्रमाणे लिहिलेला मिळाला.

चौदहसे तैंतीस की, माघ सुदी पंद्रास।
दुखियो के कल्याणहित, प्रगटे श्री रविदास॥
कासी ढिग मंडुर गाम, सिंह भयों रवि प्रकास।
रविप्रकाश रजनी विगत, भाषि यो आपु रविदास॥
चंद्र कुल मंहि जन्म धरि, भये जगत विख्यात।
जात पांत के दैत पर, कीन्हो कुठाराघात॥
जगत अंधियारा मिहि गयो ज्यों प्रगटे रविदास।
सच्चे प्रभु की जोति नै, कीन्हो तिमर बिनास॥
बानी विमल रविदास की, अमृत की रसधार।
सुख सायर सांतिसुधा, संकट मोचन हार।
रविदास बानी अघनासहइ, जउ पढै सुने मन लाय।
रोग सोग मुकत होइ, मन इच्छित फल पाय॥
बानी सुनंहि सुख उपजै, काया रहइ निरोग।
मन सों सभ मिटि जाइंहि, विषै बासना भोग॥
'कर्मदास' रविदास की, मैहमा कही नंहि जाय।
रविदास क्रिपा ऐसी भई, दीनो राम मिलाय॥

गुरू रोहिदास महाराज १५१ वर्षांच्या आयुष्यात उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, पंजाब, हरीयाना, दिल्ली, मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात इत्यादी प्रांतात फिरून आपल्या कल्याणमय सरस वाणीची अमृत सरिता वहात ठेवली.गुरू रोहिदासांनी उच्चारलेली पवित्र वाणी परमात्म्याने दिलेली अनुपम विभुति आहे.जिला ऐकून मनुष्यच काय परंतु सिंह सुद्धा आपला क्रूर आणि हिंसक स्वभाव बदलण्यास हताश होतात.त्या पवित्र वाणीत एक प्रबल आकर्षण शक्ती असून तीमध्ये जीवनप्रदान करणारी एक जादू भरलेली आहे.जे त्यांची वाणी (दोहे व पदे) वाचतील, त्यांने मन निर्मळ व दोषमुक्त होईल.रोहिदासांची वाणी वाचल्याने आनंद होऊन जीवन सफल होते.त्यांची वाणी अत्यंत प्रिय, मधूर व निर्मळ आहे.

संत रोहिदासांनी सदाचाराच्या ज्या नियमांचे उपदेश केले.ते वेदशास्त्राच्या विरूद्ध नव्हते.[सदाचार श्रुति सास्त्र वचन अविरूद्ध उचारयो।
नीर-क्षीर विवरन परम हंसनि उर धारयो।
भगवत कृपा प्रसाद परम गति इह तनु पाई।
राज सिंहासन बैठ ज्ञाति परतीत दिखाई।
वर्नाश्रम अभिमान ताजि पद रज बंदहि जासु की।
संदेह ग्रंथि खंडन निपुन बानि विमल रैदासकी॥ –नामादास : भक्तमाला, मूलपद ६०, संत गुरु रविदास, पृ.४६]दुधातील पाणी व दूध वेगवेगळे करण्याच्या हंसाच्या गुणाप्रमाणे सत्य-असत्याचा निर्णय करण्याचा गुण संत रोहिदास यांच्याकडे होता.भगवंताच्या कृपाप्रसादामुळे त्यांना (चांभार जातीत जन्म घेऊन) सशरीर याच जन्मी मोक्षप्राप्ती झाली.आपल्या ज्ञानगौरवामुळे राजसिंहासनावर बसण्याचा सन्मान मिळाला अर्थात त्यांच्या चांभार जातीलाही राजसिंहासनी बसण्याचे भाग्य प्राप्त झाले.मोठ मोठे साधुमहात्मे तसेच विद्वान, वर्ण (ब्राह्मण,

अनुक्रमणिका

क्षत्रिय, वैश्य, शूद्र) आणि आश्रम (ब्रह्मचर्य, गृहस्थ, संन्यास व वानप्रस्थ) यांचा अभिमान सोडून संत रोहिदासांच्या चरण धुळीस वंदन करीत होते.संत रोहिदासांची पवित्र, निर्मळ, निर्दोष व अर्थपूर्ण वाणी संदेहरूपी विचारांचे खंडन करण्यात निपुण आहे.आध्यात्मिक क्षेत्रातील शंका कुशंकांचे अडथळे दूर करण्यास ती प्रभावी ठरली आहे.त्यांचे काव्य स्पष्ट, सोपे आणि भावपूर्ण आहे.

संत रोहिदास एक अत्यंत नम्र स्वभावाचे व उच्च कोटीचे संत होते.त्यांची वाणी सरळ, सुबोध असून विचाराने परिपूर्ण आहे.त्यांच्या वाणीत त्यांचे व्यक्तित्व, विचार आणि भक्ति साधनांचे व्यापक दर्शन होते.त्यांच्या धार्मिक व सामाजिक विचारधारांची सर्वांगीण झलक त्यांच्या दोहे व पदांमध्ये मिळते.

संत रोहिदास जन्मजात भक्त असून, एक महान क्रांतिकारी समाजसुधारक होते.त्यांचे हृदय अतिकोमल होते.त्यामुळे लोकांचे दुःख पाहून ते सहजच द्रवित होत असत.त्यांच्या वाणीत दीन, हीन आणि शोषितांच्या समस्याचे बाबतीत एक जागृत दृष्टी होती.पुराणामधून काय घ्यावे, त्यांना कोणत्या स्थानापर्यंत सुरक्षित ठेवले पाहिजे, नवीन परिस्थितिप्रमाणे कोणत्याप्रकारे मार्ग काढला पाहिजे हे ते चांगल्याप्रकारे जाणत होते.त्यांच्या वाणीतील वैशिष्ट्याने त्यांना त्या युगाचाच नव्हे तर वर्तमान व भविष्यकाळाचा एक महान विचारक, चिंतक तसेच समाजसुधारकाच्या रूपात पाहिले पाहिजे.

एका बाजूला समाजात अनुभवलेले उच्चनीचतेचे आघात[सत्यदेव शिंदे, श्री संत रोहिदास, प्र.आ.सन १९८३, पृ.११४.]आणि उपहास व दुसऱ्या बाजूला ईश्वर आणि त्याची भक्ती या अनुभूतिमधून रोहिदासांच्या संवेदनशील हृदयातून जे शब्द बाहेर पडले, ते रोहिदासांचे काव्य होय.रोहिदासांनी ते लिहून ठेवले नाही परंतु ऐकणाऱ्याने ते लिहून ठेवले.उत्तर आयुष्यात रोहिदासांच्या मुखातून जे जे शब्द बाहेर पडत ते काव्यमय होते.उपदेशाचे जे उदात्त विचार बाहेर पडत ते काव्यमय होते.धर्मशास्त्रावर जे बोलत ते काव्यमय होते.ऐकणाऱ्याने थोडे लिहून ठेवले आणि बरेचसे काळाच्या ओघात गडप झाले.जे लिहून ठेवले गेले.त्यापैकी बरेचसे नष्ट झाले.परंतु जे काव्य आज हाती लाभले आहे ते हिंदी सारस्वतात उदात आणि श्रेष्ठदर्जाचे स्थान मिळवून बसले आहे.रोहिदासांचे काव्य भावनेने ओलेचिंब झालेले असून, त्याचे शब्द हृदयस्पर्शी आहेत.वाङ्मयीनदृष्ट्या ते अत्यंत उच्च प्रतिचे, भावपूर्ण आणि अर्थवाही आहे.रोहिदासांची ही काव्य संपदा हिंदी काव्यात आणि विशेषतःसंत काव्यात श्रेष्ठ दर्जाची आहे.गुरु रामानंदांची शिकवण, त्यांचे सानिध्य, संत समागम आणि हिंदू शास्त्रांचे श्रवण हे रोहिदासांच्या ज्ञानाचे आणि काव्याचे स्फूर्तिस्थान आहे.

रोहिदासांना लौकिक अर्थाने शालेय शिक्षण मिळाले नाही.[सत्यदेव शिंदे, श्री संत रोहिदास, प्र.आ.स.१९८३, पृ.११५.]चौदाव्या शतकात शालेय शिक्षण नव्हते.तेव्हा गुरु परंपरेने शिक्षण दिले जात होते.रोहिदासांना ते मिळू शकले नाही.त्या काळीअस्पृश्यांना व महिलांना शिक्षण वर्ज्य होते.तेव्हा रोहिदासांना जवळ शिकविणारा गुरु मिळाला नाही.रोहिदास तसे अशिक्षितच राहिले.परंतु इतर संतजनाप्रमाणे रोहिदासांनी देखील श्रवणाने ज्ञान प्राप्त करून घेतले. रोहिदासांनी मुद्दाम आणि जाणीवपूर्वक काव्यरचना करण्याचा प्रयत्न केला नाही.बहुतेक संतांचे काव्य असेच उस्फूर्त आहे.अनुभूतीतून ते निर्माण झालेले आहे.काव्य करण्यासाठी म्हणून ते कागद पेन्सिल घेऊन बसले नाहीत.हृदयात दाटून आलेल्या भावना चैतन्याच्या स्पर्शाने बाहेर ओसंडून आल्या आणि भावपूर्ण शब्दांचा आकार घेऊन त्या ओसंडू लागल्या.तेच रोहिदासांचे काव्य होऊन बसले.भावनांना ब्रह्माचा स्पर्श झाल्यामुळे ते काव्य हृदयस्पर्शी बनले.विनय आणि आत्म प्रचीतिची खोलवर छाप पडल्यामुळे ते अर्थवाही झाले आहे.रोहिदासांच्या काव्याचा मूलभूत गाभा त्यांची आत्मप्रचिती होय.रोहिदासांच्या काव्याची

श्रेष्ठता चिंतनात आहे.विचारांची प्रगल्भता, उत्कटभाव, संवेदनशील हृदय यांचा रोहिदासांनी जेव्हा ब्रह्माशी संबंध जोडला तेव्हा ते लयबद्ध होऊन शब्दात अवतीर्ण झाले.

संत रोहिदास लौकिकदृष्ट्या अशिक्षित असले तरी चांगल्या जाणत्यांना सज्ञान करण्याची त्यांची काव्यरचना आहे.त्यांचे काव्य, सहज, सुलभ आणि अत्यंत सोपे आहे.म्हणून भावपूर्ण व अर्थवाही आहे.त्यांचे संपूर्ण काव्य भक्तीरसाने ओथंबलेले आहे.अवडंबररहित सहजशैली, आत्मज्ञानाने प्रकट झालेली विचारप्रधान ओघवती भाषा यामुळे त्यांचे काव्य हिंदी साहित्यात श्रेष्ठच ठरले आहे.उत्कट भावगुणामुळे त्यांचे भजन समृद्ध आहे.हिंदी संत काव्यात रोहिदासाबरोबर फार कमी संताची तुलना होऊ शकते.

संत रोहिदासांचे सारे गुणविशेष रोहिदासांच्या काव्यात दिसून येतात.[प्रा,अशोक कामत व एकनाथ कदम, श्री संत रोहिदास, प्र.आ.स.१९६७, पृ.८७.]त्यांनी विवेक निष्ठेची महती केली आहे.अनुभव प्रामाण्याचे महत्व प्रतिपादन केले आहे.सत्य धर्माचे स्वरूप समजावून दिले आहे.शुद्ध भावभक्तिचा मंत्र सांगितला आहे.ब्राह्माचाराची व्यर्थता स्पष्ट करून सदाचाराची शिकवण सांगितली आहे. त्यांच्यापाशी कबीराची प्रखर बुद्धिमत्ता नसली तरी त्यांची कळकळ स्पष्ट आहे.दादू दयाळाची सुगमता त्यानी घेतली आहे.नामदेवाचा शुद्ध भक्तीभावही त्यांना हवासा वाटला आहे.संतसंस्कृतिच्या सर्वसमावेशक उदारतेला साजेशी त्यांची विचारसरणी आहे.अनाग्रहीवृत्ती हा त्यांचा मोठा विशेष आहे.साधेपणा आणि सुबोधता असल्याने त्यांची वाणी जनसामान्यास जवळची वाटते.नाभादासाने तिचा जो गौरव केला आहे तो अत्यंत सार्थ आहे.

संत रोहिदासांचे काव्य (दोहे व पदे) आधुनिक युगाची प्रासंगिक असमानता, भष्टाचार, जातीभेद तसेच सांप्रदायिक कट्टरतारूपी रोग निवारणाचे एकमात्र औषध आहे.या औषधी प्रयोगाने वरील रोगांपासून आपण मुक्त होऊ शकतो.भारताला भावनात्मक ऐक्याच्या सुत्रात बांधण्यासाठी आपण प्रयत्नशील होऊ शकतो.

संत रोहिदासांचे काव्य साखी (दोहे) आणि पदामध्ये उपलब्ध आहे.हिंदीमध्ये साखी हा विशिष्ट काव्यप्रकार आहे.संतगणांमध्ये त्याकाळी अशी धारणा होती की, उपदेश, ज्ञान, भक्तीभाव आणि आध्यात्मिक विचारांची मांडणी साखी (दोहे) मध्ये चांगली मांडता येते.आता आपण संत रोहिदासांचे दोहे पाहू या.

❃❃❃

अनुक्रमणिका

# भाग २ रा
# संत रोहिदास चरित्र
# काव्य साधना

अनुक्रमणिका

## काव्यसाधना

## रोहिदास वाणी

### (अ) दोहे

(१) संत रोहिदास वाणी (दोहे व पदे)

(साखी = दोहा)

१. सर्व व्यापक राम

(१)

**'रविदास' हमारो रामजी, दसरथ करि सुत नांहि।**
**राम हमउ मंहि रमि रह्यो, बिसब कुटंबह मांहि॥ १॥**
—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "आम्ही ज्याची आराधना करतो, तो आमचा राम दशरथ राजाचा पुत्र नव्हे.तो राम तर सर्वव्यापक आहे.तो राम आमच्या हृदयात आहे.तसेच तो विश्वरूपी परिवारात सामावलेला आहे."

**टीप.**—संत रोहिदासांचा राम हा जगाचा स्वामी आहे.तो राजा दशरथाचा पुत्र नसून, परब्रह्म आहे.

(२)

**'रविदास' हमारो राम तो, सकल रह्यो भरपूरि।**
**रोम रोम मंहि रमि रह्यो, राम मसूक न दूरि॥ २॥**
—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "आमचा राम तर सर्व ब्रह्मांडात व्यापलेला आहे.तो तर कणाकणांत आणि रोमरोमात सामावलेला आहे.राम आपल्या प्रियतमा-साधकापासून कधी दूर नसतो."

**टीप.**—संत रोहिदास स्वतःस रामाची म्हणजे ब्रह्माची प्रिया समजत आहेत.

(३)

**सब बिआपक राम हई, नांह कोउ इक ठांव।**
**सत्त गुरु साहिब सखा भयो, 'रविदास' हमारो राम॥ ३॥**
—रविदास दर्शन

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, ‘राम तर सर्व व्यापक आहे.त्याचे राहाण्याचे कोणतेही एक स्थान नाही.सद्‌गुरुच्या कृपेने तो राम मला मिळाला आहे आणि तो माझा मित्र बनला आहे.

**टीप.**—संत रोहिदासांची ब्रह्माशी (रामाशी) इतकी जवळीक झाली आहे की, ब्रह्म त्यांना मित्र वाटत आहे.

(४)

**सब्ब निवासी राम जू, सब घट रह्यो समाइ।**
**‘रविदास’ नाम चकमक बिना, हक नूर अद्रिस्टाइ॥ ४॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “राम तर सर्व ठिकाणी राहतो.तो कणाकणामध्ये व्यापलेला आहे.परंतु जोपर्यंत रामनामरूपी चकमक दगडाबरोबर आपल्या हृदयास घर्षण केले जात नाही तोपर्यंत तो पाहू शकत नाही किंवा अनुभवही केला जाऊ शकत नाही.”

**टीप.**—संत रोहिदास म्हणतात की, राम (ब्रह्म-देव) जगातील कणाकणात असून त्याची मनापासून भक्ती केल्याशिवाय अनूभवास येत नाही.

(५)

**सब्ब घट मेरा सांइयां, जलवा रह्यो दिखाई।**
**‘रविदास’ नगर मंहि रमि रह्यो, नेकहु न इत उत जाइ॥ ५॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, ‘माझा मालक तो परमेश्वर प्रत्येकाच्या शरीरात आहे.तो तर माझ्या शरीररूपी नगरातसुद्धा राहात आहे.तो मला सोडून क्षणभरही कुठे इकडेतिकडे जात नाही.तो नेहमी माझ्यात रोहतो.”

**टीप.**—परमेश्वर सर्व प्राणीमात्राप्रमाणे माझ्या शरीरातही राहातो.तो मला सोडून क्षणभरही कुठे जात नाही.

(६)

**सब घट मंहि रमि रह्यो, ‘रविदास’ हमारो राम।**
**सोई बूझइ राम कूं, जो होइ राम गुलाम॥ ६॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “आमचा राम तर सर्व प्राण्यात राहातो.जो त्याचा गुलाम-सेवक बनतो, तोच त्या रामाला ओळखतो.”

अनुक्रमणिका

(७)

**घट घट बिआपक राम है। रामंहि बूझै कोय।**
**'रविदास' बूझै सोइ राम कूं, जउ रामसनेही होय॥ ७॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "राम तर सर्वव्यापक आहे.पंरतु त्या रामाची ओळख कोणाला तरी होते.जो त्यांचा मित्रप्रेमी होऊन राहातो, तोच त्या रामाला ओळखतो."

(८)

**'रविदास' हौ खालिक देखिआ, सकल रह्या भरपूर।**
**सब दिसि देखहुं बिआपिआ, खालिक का ही नूर॥ ८॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "मी सृष्टिकर्त्यास पाहिलेले आहे.तो तर सर्व जगात व्यापलेला आहे.चारी बाजूस डोळे उघडून मी जेथे जेथे पाहातो, तेथे तेथे त्या सृष्टीकर्त्याचा प्रकाश सर्वत्र पसरलेला दिसून येतो."

(९)

**मुकुर मांह परछांइ ज्यों, पुहुप मधे ज्यों बास।**
**तैसउ ही श्रीहरि बसै, हिरदै मधे 'रविदास' ॥ ९॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "ज्या प्रमाणे दर्पणात (आरशात) फोटो दिसतो, फुलात सुवास असतो, त्याप्रमाणे तो श्रीहरी (ब्रह्म) हृदय मंदिरात राहतो, जर त्यास प्राप्त करावयाचा असेल तर, त्याचा शोध आपल्यामध्येच केला पाहिजे."

(१०)

**'रविदास' पीव इक सकल घट, बाहर भीतर सोइ।**
**सब दिसि देखउं पीव पीव, दूसर नांहि कोइ॥ १०॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "माझा तो एक प्रियकरच सर्व ठिकाणी व्यापलेला आहे.तो आपल्यात सुद्धा दिसत आहे.आणि बाहेरसुद्धा तो माझा प्रियकर मला दिसत आहे.मी जिकडे पाहातो, तिकडे त्या प्रियकरा (परमेश्वर) शिवाय मला काही दिसत नाही."

(११)

**एकै ब्रह्म हइ सकल मंहि, अरू सकल ब्रम्ह मांहि।**
**'रविदास' ब्रह्म सब भेष मंहि, ब्रह्म बिना कछु नांहि॥ ११॥**

अनुक्रमणिका

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “सर्व जगात फक्त एकच ब्रह्म पसरलेले आहे आणि हे सर्व जग त्या एका ब्रह्मात व्यापलेले आहे.जे काही ह्या जगात आहे, ते सर्व काही त्या ब्रह्माचेच रूप आहे.त्या एका ब्रह्माशिवाय येथे काहीसुद्धा नाही.”

**टीप.**—ते ब्रह्म जगात व्याप्त आहे आणि ते ब्रह्म ह्या जगाचा निर्माता, पालक तसेच संहारक आहे म्हणून त्या ब्रह्माची उपासना केली पाहिजे.

(१२)

**गगन मंडल पिअ रूप सों, कोट भान उजियार।**
**‘रविदास’ मगन मनुआ भया, पिआ निहार निहार॥ १२॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “माझ्या प्रियतमाच्या दिव्य रूपाच्या अपार छटाने सर्व गगन मडंळ (माझे हृदयरुपी आकाश) एवढे प्रकाशित झाले आहे की, जणू काय कोटि कोटि सूर्य उगवले आहेत.माझे हृदय आपल्या प्रियकराच्या अनुपम रूपास पाहून मग्न होत आहे.”

(१३)

**‘रविदास’ पिअ बिनु जगत मंह, सुनी सेज न कोइ।**
**जित देखूं तित पिअ कर, प्रगट मोजरा होइ॥ १३॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जेथे माझ्या प्रियकर परमेश्वराची शय्या (सेज) नाही, माझ्या स्वामीच्या विश्रांतीची जागा नाही.असे ह्या जगात (अखिल ब्रह्मांडात) कोणतेही ठिकाण नाही.मी तर जेथे पाहातो.तेथे मला आपल्या प्रियकराचे स्पष्ट दर्शन होते.माझा स्वामी (मालक) मला सर्व ठिकाणी दिसत आहे.”

(१४)

**सभ नुरन कर नूर जउ, सभ तेजन महं तेज।**
**‘रविदास’ हमरे पीव करि, सभ सों अद्‌भुत सेज॥ १४॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “तो माझा प्रियकर प्रकाशाचा प्रकाश आहे.तो महान तेजस्वी आहे.त्या प्रियकराची सेज (शय्या) सुद्धा इतर सर्व सेजेपेक्षा अद्‌भुत निराळी आहे.त्याचे भेटण्याचे ठिकाणसुद्धा सर्वापेक्षा विचित्र व आश्चर्यकारक आहे.”

(१५)

**‘रविदास’ जगत मंह राम सम, कोउ नांहि उदार ।**

अनुक्रमणिका

**गनी गरीब नवाज प्रभ, दीनन के रखवार॥ १५॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “ह्या जगात रामासारखा दुसरा कोणी उदार नाही.तो मोठा दयाळू धनी आहे.तो गरीबांचा पालन करणारा आहे आणि गरीब दुःखी लोकांचा रक्षक आहे.”

## २. मन मंदिर

(१६)

**काबे अरू कैलास मंह, जिह कूं, ढूंढण जांह।**
**‘रविदास’ पिआरा राम तउ, बइठहिं मन मांह॥ १॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “तुम्ही ज्याचा शोध काबा आणि कैलासमध्ये करीत आहांत, तो आवडता राम तर तुमच्या मन रूपी मंदिरातच आहे.त्याला प्राप्त करावयाचा असेल तर तुम्ही त्याचा आपल्यामध्येच शोध करा.”

(१७)

**बाहर खोजत का फिरइ, घट भीतर ही खोज।**
**‘रविदास’ उनमनि साधिकर, देखहु पिआं कूं ओज॥ २॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “तुम्ही बाहेर कुठें शोधत फिरत आहात?तुम्ही ज्याच्या शोधात आहांत, तो बाहेर कुठेही मिळणार नाही.तुम्हास त्याला प्राप्त करावयाचे असेल तर, तुम्ही त्यास आपल्या हृदय मंदिरातच शोधा.समाधी लावा.मनाला प्रापंचिक भोग्य पदार्थातून काढून अंतर्मुख करा, त्याच्या ध्यानात मग्न होऊन, त्याच्या स्मरणात स्वतःला विसरून जा.तसे केल्यास तुम्ही आपल्या हृदय मंदिरात त्याचा दिव्य प्रकाश पाहाल.”

(१८)

**वन खोजइ पिअ न मिलहि, बन मंह प्रीतम नांह।**
**‘रविदास’ पिअ है बसि रह्यो, मानव प्रेमंहि मांह॥ ३॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “वनात शोधल्याने प्रियकर मिळणार नाही.कारण तो वनात नाही.जेथे मानवतेसाठी प्रेम आहे.तेथे तो राहतो.मनुष्य प्राण्याबरोबर प्रेम करणे म्हणजेच त्याची भक्ती आहे.कारण नर-नारायण दोन्ही एकच आहेत.दोघात काही फरक नाही.”

(१९)

**वन खोजन का जाइ रे, राम तउ अलोपा नांह।**

अनुक्रमणिका

**सर्व बिआपी राम तौ, 'रविदास' सभन कै मांह॥ ४॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "अरे रामाला शोधावयास वनात कां जाता?तो गुप्त तर झालेला नाही.आणि कोठे हरवलेला सुद्धा नाही.तो तर सर्वच ठिकाणी आहे.तो सर्वांमध्ये सामावलेला आहे.तुम्ही त्याला जेथे पाहू इच्छिता, तेथे तो तुम्ही पाहू शकाल.तसेच प्राप्त करू शकाल."

(२०)

**राधों क्रिस्न करीम हरि, राम रहीम खुदाय।**
**'रविदास' मोरे मन बसहिं, कहु खोजहूं बन जाय॥ ५॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "तुम्ही त्यास राघव म्हणा अथवा कृष्ण, करीम म्हणा अथवा हरी, राम म्हणा अथवा रहीम.ते सर्व एक रूप आहेत.तो ईश्वर-परमेश्वर.ज्याची अनेक नावे आहेत.तो माझ्या मनात नेहमीच बसलेला आहे.मी त्यास वनात शोधावयास कां जाऊ?

❀❀❀

## ३.ओंकार सतनाम

(२१)

**ओंकार है सत्तनाम, आदि जुगादि सभ सत्त ।**
**'रविदास' सत्त कहि सामुंहे, टिकवै नांहि असत्त॥ १॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "नाम (ईश्वर) सत्य आहे.तोच ओंकार आहे.ओंकार कायम स्वरूपाचे सत्य आहे.ईश्वर सृष्टीचा आदि, मध्य आणि अंत आहे.तो प्रत्येक काळात विद्यमान राहातो.सत्यासमोर मायारूपी असत्य कधीच टिकू शकत नाही."

(२२)

**जौ लौं घट मंहि परान हैं, तौ लौ जपहु सत्त नाम।**
**'रविदास' परम पद पाइहिं, जिन्ह घटि वसियो राम॥ २॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जो पर्यंत शरीरात प्राण आहे.तोपर्यंत फक्त एका सत्य नामाचाच जप करीत रहा आणि ज्यांच्या हृदयात ते सत्यस्वरूप नेहमी राहील, फक्त तेच परमपदास प्राप्त करू शकतील."

(२३)

**सत्त ईश कहुं रूप है, सत्त सक्ति अत अपार।**

अनुक्रमणिका

**'रविदास' सत्त कूं धारणा, देइहि पाप निवार॥ ३॥**
—रविदास दर्शन

संत रविदास म्हणतात की, "सत्य ईश्वराचे स्वरूप आहे.सत्यामध्ये एक फार मोठी शक्ती आहे.सत्य बोलण्याने सगळ्या पापाचा नाश होतो."

**टीप.**—जगात नेहमी सत्याचाच विजय होतो.परमात्मा प्राप्तीचा मार्ग सत्य बोलण्यामुळेच उपलब्ध होतो.

(२४)

**सत्त सक्ति सों होत है, सभ पापन कर नास।**
**बधिरा सत्त सों बोध लेइ, सत्त भाषै 'रविदास' ॥ ४॥**
—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "सत्य एक महान शक्ती आहे.सत्यामुळे सर्व पापांचा नाश होतो.जी व्यक्ती कानाने बहिरी आहे, ती व्यक्तिसुद्धा सत्यामुळे परमसुख-ज्ञान प्राप्त करून घेते.म्हणून परमानंद प्राप्तीसाठी मनुष्याला सत्याचा म्हणजेच परमेश्वराचा आश्रय घेतला पाहिजे."

(२५)

**'रविदास' सत्य इक नाम है, आदि अंत सचु नाम।**
**हनन करेइ सभ पाप ताप, सत्त सुखन करि खान॥ ५॥**
—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "सत्य हे ईश्वराचे एक नाव आहे.ते ईश्वराचे रूप आहे.तो सत्यरूप ईश्वर सृष्टिच्या आदि आणि अंतामध्ये विद्यमान राहतो.सत्य सर्व पापांचे मनुष्याचे (कायिक, वाचिक व मानसिक) विकारांचे, दोषांचे नाश करते.तसेच तापांचे (मनुष्यांचे आधिभौतिक, आदिदैविक व आध्यात्मिक) कष्टांचे नाश करते.अशाप्रकारे सत्य सर्व सुखांची खाण आहे.आनंदाचे अखंड भांडार आहे."

**टीप.**—कायिक-शरीराचे
वाचिक-वाणीचे, बोलण्याचे
मानसिक- मनाचे
आधिभौतिक- प्राण्यापासून मिळणारे दुःख
आधिदैविक ताप- दैवी प्रकोपांचे
आध्यात्मिक- (आधिव्याधि) मानसिक तसेच शारीरिक कष्ट.

(२६)

**जिन्ह नर सत्त तिआगिआ, तिन्ह जीवन मिरत समान।**
**'रविदास' सोई जीवन भला, जहं सभ सत्त परधान॥ ६॥**

अनुक्रमणिका

—रविदास दर्शन

संत रोविदास म्हणतात की, “ज्या मनुष्याने सत्याचा त्याग केला आहे.त्याचे जीवन मेल्यासमान आहे.जेथे सत्य नाही, तेथे जीवनदेखील नाही.जेथे फक्त सत्याला मुख्य अथवा प्रथम स्थान दिले जाते, तेच जीवन चांगले व सफल होय.”

(२७)

**‘रविदास’ सत्त मति तिआगिए, जौ लौ घट मंहि प्रान।**
**सत्त भ्रिस्ट करि जगत मंहि, सदा होत अपमान॥ ७॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जोपर्यंत शरीरात प्राण आहे.तोपर्यंत सत्याचा त्याग कधीच केला नाही पाहिजे.जी व्यक्ती सत्यभ्रष्ट होते, त्या व्यक्तिचा नेहमीच अपमान होतो.सत्यभ्रष्ट मनुष्य नेहमी अपमानीत जीवन जगत असतो.”

(२८)

**कायम दायम राम इक, दोयम सत्त इमान।**
**‘रविदास’ राम अरू सच बिन, बिरथा सब कछु जान॥ ८॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जे नेहमी कायम राहाणारे आहे.त्यामध्ये सर्वप्रथम स्थान ईश्वराचे आहे.दुसरे स्थान सत्य धर्माचे आहे.ते कधी नाश होत नाही.या जगात ईश्वर व सत्याशिवाय बाकी जे काही आहे, ते सर्व व्यर्थ आहे.”

(२९)

**‘रविदास’ सत्त करि आसरे, सदा सत्त सुख पाय।**
**सत्त इमान नहिं छांडिए, जग जाय तउ जाय॥ ९॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “सत्याचा आश्रय घेतल्याने, सत्य व्यवहाराचे आचरण केल्यामुळे नेहमी खरे सुख मिळते.म्हणून सत्याचे इमान समजून, सत्यधर्माचे पालन करा.जग सोडण्याची पाळी आली तरी सोडून द्या परंतु सत्याचा मार्ग सोडू नका.सत्यमार्गापासून दूर जाऊ नका.”

(३०)

**‘रविदास’ सत्त मति छांडिए जौ लौं घट मे प्रान।**
**दूसरो कोउ धरम नांहि, जग मंहि सत्त समान॥ १०॥**

—रविदास दर्शन

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, “जोपर्यंत शरीरात प्राण आहे.तोपर्यंत सत्य सोडू नका.जगात सत्यासारखा दुसरा धर्म नाही.”

(३१)

**अंतहकरन अनमउ करहि, तउ मानहु सत्त ।**
**‘रविदास’ निज अनभउ मंहि, सत्त मंहि जानहि सत्त॥ ११॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जेव्हा तुम्हास आपले अंतःकरणास सत्य (एक शक्ती) असल्याचा अनुभव येईल.तेव्हा सत्याला मानलेच पाहिजे.सत्याचा खरेपणा अनुभवानेच ओळखू शकतो.सत्याची शक्ती तर्क, उपदेश किंवा अन्यप्रकारे ओळखू शकत नाही.”

(३२)

**जहं अंध बिस्वास है, सत्त परख तहं नांहि।**
**‘रविदास’ सत्त सोई जानि है, जौ अनभउ होइ मन मांहि॥ १२॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जेथे अंध विश्वास असतो तेथे सत्याची परीक्षा कशी असणार?अंध विश्वासी व्यक्तिस सत्याची ओळख होऊ शकत नाही.सत्याची परीक्षा तर मनाच्या अनुभवाने होते.”

(३३)

**जो नर सत्य न भाषहिं, अरू करहिं बिसासघात।**
**तिन्हहुं सो कबहुं भुलिहिं, ‘रविदास’ न कीजहि बात॥ १३॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जो मनुष्य सत्य बोलत नाही आणि जो विश्वासघात करतो, अशा व्यक्तिबरोबर चुकूनहि बोलले नाही पाहिजे आणि त्याच्या बरोबर कोणताही व्यवहार ठेवला नाही पाहिजे.”

(३४)

**जउ नाही था सरिस्टि मांहि, सोउ होइहि नाह।**
**‘रविदास’ इस्ट सर्वत्त है, सोइ रहइ सरिस्टिहि मांह॥ १४॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जो ह्या जगाच्या आरंभी नव्हता तो शेवटी असणारच नाही.फक्त तो इस्टदेव राम ह्या जगाच्या आरंभी होता आणि तो ह्या जगात नेहमी असणार.”

(३५)

**‘रविदास’ मदुरा का पीजियै, जौ चढ़ै चढ़ै उतराय।**

अनुक्रमणिका

**नांव महारस पीजियै, जो चढै नांहि उतराय॥ १५॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जिची नशा चढून उतरते ती दारू तुम्ही कां पिता?जर नशेसाठीच काही प्यावयाचे असेल तर महारस प्या.प्रभु नामस्मरण महारसाची नशा जर एकदा चढली तर ती कधीच उतरत नाही.”

(३६)

**अंतर्मुखी भइ जउ करहिं, सत्तनाम करि जाप।**
**‘रविदास’ तिन्ह सौं भजहुहिं, जगतह तीन्हहु ताप॥ १६॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जर मनाला बाहेरच्या विषयातून काढून एकाग्र मन करून, जो प्रभुच्या सत्य नामाचे स्मरण करील, तो तीन प्रकारच्या तापापासून मुक्त होईल.अशा भक्तास आध्यात्मिक कष्ट होणार नाहीत.त्यास आदिदैविक संकटे सहन करावी लागणार नाहीत आणि आदिभौतिक तापसुद्धा त्यास जाळणार नाही.”

**टीप.** —दोहा क्रमांक २५ चा अर्थ पाहा.

(३७)

**इड़ा पिंगला सुसुम्णा, विध चक्र प्रणयाम।**
**‘रविदास’ हौं सबहि छांड़ियो, जबहि पाइहु सत्तनाम॥ १७॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “मी आता इड़ा, पिंगला व सुषुम्ना नाड्या आणि प्राणयामे विधि चक्रांच्या साधनांच्या फेऱ्यातही पडत नाही.मला जेव्हा सत्यनामाची प्राप्ती झाली, तेव्हापासून मी ही सर्व सोडून दिली.”

**टीप.**—(१) इड़ा, पिंगला, सुषुम्ना.—मनुष्याच्या जननेंद्रियाच्या वर व बेबींच्या थोडे खाली सर्व नाड्यांचे उत्पत्ति स्थान आहे.येथून ७२ हजार नाड्या सर्व शरीरात गेल्या आहेत.त्यामध्ये १० मुख्य नाड्या आहेत.त्यात ३ प्रमुख नाड्या आहेत.त्या इड़ा, पिंगळा व सुषुम्ना ह्या नाड्या होत.ह्या नाडीमय चक्रांचे ज्ञान योग्यानी अवश्य करून घेतले पाहिजे.

नाकाच्या डावीकडे इड़ा आणि उजवीकडे पिंगळा नाड़ी आहे.यांच्या मधोमध सुषुम्ना नाड़ी आहे.ह्या नाड्यांची उत्पत्तीमूलाधार-चक्रापासून आहे.यांचा कमल छत्याप्रमाणे त्रिकोण आहे.याच्या डाव्या कोनातून इड़ा, उजव्या कोनातून पिंगला व पश्चिम कोनातून सुषुम्ना नाडी उत्पन्न होऊन मेरु दंडाच्या डावी-उजवीकडे व मध्यातून डोक्यातील ब्रह्मरंध्रापर्यंत गेली आहे.

अनुक्रमणिका

**ऊर्ध्व मेढ्रावधो नाभिः कंत्रयोनिःखंगाडवत्।**
**तत्र नाड्यः समुत्पन्नाः सहस्त्रणां द्विसत्पतिः॥**
**तेषु नाडीसहस्त्रेषु द्विसत्पति रूदाहृताः ।**
**प्रधानाःप्राणवाहिन्यो भूयस्तासु दश स्मृताः॥**
**इडा पिंगला चैव सुषुम्णा च तृतीय का।**

* * * *

**एतन्तीडीमयं चक्रं ज्ञातव्यं योगिभिःसदा।**
**इडा वामे स्थिता भागे पिंगला दक्षिणे स्थिता।**
**सुषुम्णा मध्य देशे तु .........................॥**

—गोरक्ष पद्धति-महीधर शर्मा, शतक १ श्लोक २५-२९, पृ.१८-१९.

(२)**चक्र.**—संत भक्त कवींनी योगसाधनाच्या कमलाकर षट चक्रांचे आपल्या वाणीमध्ये नेहमीच उल्लेख केला आहे.त्यांचा परिचय थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

(१)**मूलाधार चक्र.**—हे योनीमध्ये स्थिर मानले जात आहे.याची चार दले असून, हे रक्तवर्णाचे असते.याचा लोक 'भूः' आहे, याचे स्मरण करण्यामुळे क्रमशः वँ, शँ, षै, सँ प्रमाणे अनहद ध्वनि गुंजत असतो.

(२)**स्वाधिष्ठान चक्र.**—याची स्थिती पेडूमध्ये (पोटात) आहे.याची ६ दले असून वर्ण सिंदूर आणि लोक 'भूवः' आहे.याच्या स्मरणाने क्रमशः भँ, मँ, यँ, रँ, लँ, वँ याप्रमाणे ध्वनि निघतो.याच्या साधनाने मनुष्य निरंकार, निर्विकार आणि गद्यरचनेत प्रवीण असतो.

(३)**मणिपूर चक्र.**—याचे स्थान नाभी, दहा दले, नील वर्ण व स्थान 'स्वः' लोक आहे.याचे स्मरण करण्यामुळे क्रमशः डँ, ढँ, णँ, तँ, थै, दँ, धँ, नँ, पँ, फँ, चा ध्वनी होतो.यांच्या साधनामुळे मनुष्य पालन व संहाराची शक्ती, वचन-रचना इत्यादी गुणांनी युक्त होते.

(४)**अनाहत चक्र.**—याचे स्थान हृदय आहे.यामध्ये १२ दले होतात.वर्ण अरूण व लोक 'महः' आहे.याचे स्मरण करण्यामुळे क्रमशः कँ, खँ, गँ, घँ, ङँ, चँ, छँ, जँ, झँ, ञँ, टँ, ठँ, याप्रमाणे ध्वनि होतो.याच्या साधनेमुळे मनुष्य योगित्व, कवित्व इत्यादी शक्ती प्राप्त करतो.

(५)**विशुद्ध चक्र.**—याची स्थिती कंठात आहे.हे सोळा दलांचे धूम्र वर्णाचे असते.लोक 'जनः' आहे.याच्या स्मरणाने क्रमाने 'अँ' पासून 'अः' पर्यंत सोळा स्वरांचा ध्वनि निघतो.याच्या साधनाने मनुष्य त्रिलोकदर्शी, चिरंजीवी इत्यादी होतो.

(६)**आज्ञा चक्र.**—हे दोन्ही ध्रुवामध्ये स्थिर आहे.याची दोन दले होतात आणि वर्ण श्वेत व लोक 'तपः' आहे.याचे ध्यान करण्यामुळे हँ, शँ, ध्वनीचा झंकार होतो.याच्यामुळे साधक योगी वाक्यसिद्धी प्राप्त करतो.

अनुक्रमणिका

**टीप.**—दोह्याच्या ह्या भावार्थास संत रोहिदासांनी अन्य ठिकाणी व्यक्त केले आहे.

**कहै 'रविदास' प्रकास परम वद, का जप तप विधि पूजा।**

(३८)

**इक चिंता सत्त नाम की, दरसाईहु परम तत्त।**
**सहज परम भगति भई, 'रविदास' पाइहि ब्रह्म सत्त॥ १८॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "माझी चिंता सत्त नाम स्मरणाची आहे.सत्त नाम चिंतनच श्रेष्ठ भक्ती आहे.ही भक्ती सहज साधना आहे.ह्या एका सत्य नामाच्या सहज भक्तिमुळेच त्या परम ब्रह्माची प्राप्ती होऊ शकते."

(३९)

**'रविदास' अराधहु देवकुं, इकमन हुइ धरि ध्यान।**
**अजपा जाप जपत रहहु, सत्तनाम सत्तनाम॥ १९॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "एकाग्रता मनापासून ध्यानावस्थेत येऊन फक्त एक देव-ब्रह्माची आराधना करा आणि नेहमी एकच महामंत्र-सत्त नाम सत्त नामाचा जप करा."

**टीप.** —अजपा जाप-'सो ऽहम्' (मी तोच आहे.)ऽचा जप यालाच 'हंसमंत्र' म्हणतात.ह्या मंत्राचा उच्चार श्वास आत बाहेर येण्याजाण्यामुळेच केला जातो.

**उत्छ्वासैरेव निश्वासैः हंस इत्यक्षरद्वयम।**
**तस्मात् प्राण्यस्य हंसाख्य आत्मकारेण संस्थितः॥**

**विशेष.**—ईश्वरभक्ती व तिच्या प्राप्तीसाठी योग, जप, तप, अनुष्ठान, पूजा-अर्चा, तीर्थ, व्रत इत्यादी साधनांचा निषेध करणारे नाथ-सिद्धसाधकांनी' अजपा जाप' जपल्याचे विधान करताना त्यांनी मुक्त कंठाने महिमा गाइली आहे.याला त्यांनी 'सहजभक्ती' हे नाव दिले आहे.मुसलमान संतांचा 'अनलहक' (मी खुदा आहे) हंस (सो ऽहम्) मंत्रच आहे.

(४०)

**जो देख्या धिन उपजै, नरक कुंड मंहि बास।**
**प्रभ भगति सों ऊधरै, प्रगटन जन 'रविदास' ॥ २०॥**

—रविदास दर्शन

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, “ज्याला पाहिल्यानेच तिरस्कार निर्माण होतो, ज्याचा निवास नरककुंडात आहे व जो दुःखात कष्टमय जीवन घालवीत आहे, अशा नीच व पतित प्राण्यांचे ईश्वरावर प्रेम व भक्ती करण्यामुळे उद्धार व कल्याण होते.त्याचे सर्व दुःख व ताप नाहीसा होतो.तो तिरस्कारीत राहात नाही व त्याचा कोणी तिरस्कार करीत नाही.”

(४१)

**हरि सा हीरा छांड़ि कै। करैं आन की आस।**
**ते नर जमपुर जांहिगे, सत भासै ‘रविदास’ ॥ २१॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जो मनुष्य हरिसारख्या अमूल्य हिऱ्यास म्हणजेच प्रभुच्या अत्युत्तम अशा नामधनास सोडून, कोणत्या तरी दुसऱ्या धनाची व प्रापंचीक सुखसंपत्तीची इच्छा करीत जमवितात.ते अमरत्वाला प्राप्त न करता मृत्युस कवटाळतात.प्रभु नामासारख्या हिऱ्याचा त्याग करणारे नरक प्राप्त होऊन अनेक प्रकारचे दुःख आणि कष्ट सहन करतात.”

(४२)

**‘रविदास’ मानुष जन्म मंह, हौं चिंतउं गुरु एक।**
**आद अंत मेरो सतगुरु, राखै सभन की टेक॥ २२॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “ह्या मनुष्य जन्मात मी फक्त एकाच गुरुची आराधना (भक्ती) केली आहे.जो माझा गुरु आहे तो आदीपासून अंतापर्यंत सर्वांची इज्जत, मान राखणारा आहे.”

**टीप.**—संत रोहिदासांनी ‘गुरू’ शब्दापासून ब्रह्माचाच अर्थ घेतला आहे.गुरू आणि गोविंदमध्ये काही भेद नाही.गुरुस ब्रह्मा, विष्णु, शिव म्हणजेच ‘परब्रह्म’ चा साक्षात अवतार मानला आहे.

**गुरु ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः।**
**गुरुःसाक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः॥**

* * *

## ४.ब्रह्म थेंब

(४३)

**‘रविदास’ लोरै जिस बूंद कूं, सोई बूंद है समुंद समान।**
**अंतर खोजी कूं मिलइ, ब्रह्म बूंद कौ ग्यान॥ १॥**

अनुक्रमणिका

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “तू ज्या ब्रह्मथेंबच्या शोधात आहेस, तो तर भवसागरात सामावलेला आहे.तो समुद्राप्रमाणे असीम, अथांग आहे.तो ब्रह्म-थेंब तुला बाहेर कोठेच मिळणार नाही.आपल्या पिंडात-शरिरातसुद्धा याचा शोध घे.अंतरात शोध केल्यावरच, तुला ह्या ब्रह्मथेंबाची प्राप्ती होऊ शकेल.ज्या ब्रह्मथेंबासाठी तू जगात इकडे तिकडे भटकत राहिला आहेस, तो ब्रह्मथेंब तुला तुझ्या पिंडात-शरिरात मिळणार आहे.दुसरीकडे कुठेही मिळणार नाही.”

(४४)

**इक बूंद सौं बुझि गई, जनम जनम की प्यास।**
**जनम मरन बंधन टूटई, भये ‘रविदास’ खलास॥ २॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “तो थेंब किती विचित्र व अद्‌भुत आहे?त्या एका थेंबाने माझी जन्मजन्मांतरीची सारी तहान भागविली, नाहीशी केली.त्याने माझी जन्म-मरणाची सर्व बंधने तुटली आहेत.त्या एका ब्रह्मथेंबास प्राप्त करून रोहिदास येण्याजाण्याच्या बंधनातून मुक्त झाला आहे.”

(४५)

**अमरित रस कइ बुंद कूं, तलफत हौ दिन रैन ।**
**‘रविदास’ अमीरस बिन पियै, जियरा न पावै चैन॥ ३॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “अमृतरसाच्या त्या एका थेंबासाठी मी दिवसरात्र तडफडत राहातो.जोपर्यंत त्या अमृतरसाचा थेंब मला मिळत नाही.तोपर्यंत माझे हृदय चैन पावणार नाही.ते दिवसरात्र बेचैन राहिल.”

## ५.एकाच मातीची सगळी भांडी

(४६)

**एकै माटी के सभ भांडे, सभ का एकौ सिरजन हारा।**
**‘रविदास’ ब्यापै एकौ घट भीतर, सभकौ एकै घड़ै कुम्हारा॥ १॥**

संत रोहिदास म्हणतात की, “ज्याप्रमाणे एका कुंभार एकाच मातीपासून अनेक भांडी तयार करतो.त्याप्रमाणे हे सर्व प्राणीसुद्धा एकाच मातीपासून बनले आहेत.या सर्वांची रचना करणारासुद्धा एक ईश्वरच आहे.ज्याने या सर्व सृष्टीची रचना केली आहे.तो एक ईश्वर सर्वांमध्ये व्यापलेला आहे.”

(४७)

**‘रविदास’ उपिजइ सभ इक बुंद ते, का बाह्मन का सूद।**
**मूरिख जन न जानइ, सभ मंह राम मजूद॥ २॥**

संत रोहिदास म्हणतात की, “सर्व जगच एका ब्रह्म थेंबापासून उत्पन्न झालेआहे, मग कसला ब्राह्मण आणि कसला शूद्र?सर्व त्या परमेश्वरामार्फतच निर्माण झाले आहे.सगळ्यात एकच राम-ब्रह्म व्यापलेला आहे.हे बुद्धिहीन-अज्ञान माणसे जाणत नाहीत.”

(४८)

**‘रविदास’ इक ही बूंद सों, सभ ही भयो वित्थार।**
**मूरिख है जो करत हैं, बरन अबरन बिचार॥ ३॥**

संत रोहिदास म्हणतात की, “एकच ब्रह्म थेंबापासून सर्व सृष्टिची रचना झाली आहे.हे संपूर्ण ब्रह्मांड त्याच ब्रह्माचा विस्तार आहे.सर्व मनुष्ये त्याच एका ब्रह्माची रूपं आहेत.त्याचाच अंश आहे.जो मनुष्यात सवर्ण-अवर्णाचा विचार करतो.ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व चाडांळ इत्यादींच्या रूपात भेद मानतो व ऊंचनीच, छोट्यामोट्या ज्ञाती अथवा कुळाचा भेद समजून व्यवहार करतो, तो अज्ञानी आहे.”

**टीप.**—स्मृति वचन आहे—

**जन्मना जायते शूद्रःकर्मण द्विज उच्यते।**

अर्थात जन्मापासून सर्वच शूद्र होतात व कर्मापासून ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य आणि शुद्र होतात.

(४९)

**इक जोति से जउ सभ उपजै, तउ ऊंच नीच कस मान।**
**‘रविदास’ नाम कत धरै कहुं को, नाद बिंद है समान॥ ४॥**

संत रोहिदास म्हणतात की, “जर सगळे प्राणी एकाच ब्रह्म ज्योतीपासून उत्पन्न झाले तर मग यांच्यात कोणाला ऊंच व कोणाला नीच कां मानले जावे?जर सगळ्या जगाची उत्पत्ति एकाच नाद बिंदुरूपात्मक ब्रह्मापासून आहे.तर मग कोणाचे नाव असे कां ठेवले जावे की, ‘हा नीच आहे व तो नीच जातीचा आहे.’हे सगळे जग नादात्मक अर्थात ब्रह्ममय आहे.मग त्याच उंच-नीच असा भेद कसा?”

**टीप.—नादबिंदु**—याविषयी सांगितले आहे, “विश्वरूपथेंब आणि बीजरूप शक्ती आहे.या दोघांचा परस्पर जो सबंध आहे त्यास शास्त्रज्ञ ‘नाद’ अर्थात ‘ब्रह्म’ म्हणतात.”

**बिंदुः शिवात्मको बीजं शक्तिनांदसतयोर्मिथः**
**समताय इति ख्यातःसर्वागम विशार दैः॥**

अनुक्रमणिका

(—सिद्धसिद्धांतपद्धति, १ म.उपदेश, ७० पृ. ११३)

(५०)

**‘रविदास’ एकै ब्रह्म का, होइ रह्यो सगल पसार।**
**एकै माटी सब घट स्त्रजै, एकै सभ कूं सरजन हार॥ ५॥**

संत रोहिदास म्हणतात की, “सृष्टिचा सगळा विस्तार एकाच ब्रह्मापासून झाला आहे आणि तेच ब्रह्म सगळ्या जगात पसरलेले आहे.सगळी शरीरे एकाच मातीपासून बनली आहेत आणि सर्वांची रचना करणारा एक ब्रह्मच आहे.”

(५१)

**‘रविदास’ इक ही नूर ते, जिमि उपज्यो संसार।**
**ऊंच नीच किह बिध भये, बाह्मन अरू चमार॥ ६॥**

संत रोहिदास म्हणतात की, “जर हे जग त्या एकाच दिव्य ज्योति ब्रह्मापासून उत्पन्न झाले आहे, जर सगळी माणसे एकाच ब्रह्म-ज्योतिपासून उत्पन्न झाली आहेत तर त्यांच्यात हा ब्राह्मण आणि चांभार, ऊंच आणि नीच याचा भेद कसा झाला?”

(५२)

**‘रविदास’ इक ब्रह्म बूंद सों, सगल पसारा जान।**
**सभ उपज्यो इक बूंद सों, सभ ही एक समान॥ ७॥**

संत रोहिदास म्हणतात की, “हे संपूर्ण जग एका ब्रह्मथेंबापासून निर्माण होऊन प्रसार झाला आहे.सगळ्या प्राण्यांची उत्पत्ती एकाच ब्रह्मथेंबापासून झाली आहे.म्हणून सर्वजण एक समान आहेत.”

(५३)

**बाह्मन अरु चंडाल मंहि, ‘रविदास’ नंह अंतर जान।**
**सभ मंहि एक ही जोति है, सभ घट एक भगवान॥ ८॥**

संत रोहिदास म्हणतात की, “ब्राह्मण असो किंवा चांडाळ असो, त्यांच्यात कांही अंतर समजले नाही पाहिजे.सर्वात एकाच ब्रह्माची ज्योत सामावलेली आहे आणि सर्व प्राणीमात्रात एकाच ईश्वराचा निवास आहे.”

(५४)

**इक नजिर सों सभ कूं देखइ, सरिष्टि का सिरजन हारा।**
**सब घट ब्यापक अलख निरंजन, कहि ‘रविदास’ चमारा॥ ९॥**

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, “सृष्टिची रचना करणारे ब्रह्म सर्वांना एकाच नजरेने पाहाते.ते ब्रह्म अलक्ष-अदृश्य आणि निलिप्त-निष्कलंक आहे.ते ब्रह्म सग्ळ्यात व्यापलेले आहे आणि प्रत्येक मनुष्य प्राण्यात सामावलेले आहे.”

### ६.एकाच प्रभुचा सर्वात प्रकाश

(५५)

**सभ मंहि एकु रामह जोति, सबनंह एकउ सिरजनहारा।**
**‘रविदास’ राम रमंहि सभन मंहि, बाह्मन हुई क चमारा॥ १॥**

संत रोहिदास म्हणतात की, “सर्वांत एकाच रामाच्या ज्योतिचा प्रकाश आहे.तो एक रामच सर्वांची रचना करणारा आहे.ब्राह्मण असो की चांभार.तो राम तर सर्वात सामावलेला आहे.चांभार आणि ब्राह्मण दोघे समान आहेत.त्यांच्यात ऊंच-नीच आणि छोट्या-मोठ्यांचा काही भेद नाही.”

(५६)

**‘रविदास’ जो करता सरिष्टि का, वह तो करता एक।**
**सभ मंहि जोति सरूप इक, काहे कहुं अनेक॥ २॥**

संत रोहिदास म्हणतात की. “या सर्व सृष्टिचा रचना करणारा फक्त एकच आहे.फक्त तोच एक ज्योतिस्वरूप सर्वात व्यापलेला-सामावलेला आहे.जर ते ब्रह्म एक आहे तर मी त्यास अनेक कसे म्हणू?”

(५७)

**‘रविदास’ हौं देख्या सोधि कर, साहिब भेष अनंत।**
**एकै आतम घट घढ रमै, सब दिसि एकउ भगवंत॥ ३॥**

संत रोहिदास म्हणतात की, “मी पूर्ण चौकशी करून पाहिले आहे की, त्यां ब्रह्माचे अनेक वेष आहेत आणि अनेक रूपं आहेत.अनेक रूपं असूनही प्रत्येकाच्या शरिरात ते एकच ब्रह्म आहे.अशाप्रकारे एकच ब्रह्म सर्वत्र व्यापक आहे.ते सगळ्यात सामावलेले आहे.”

❁❁❁

### ७.एकाच प्रभुचीनावे अनेक

(५८)

**आद अंत जिह कर नही, जिह कर नाम अनंत।**
**सभ करि पालन हार हइ, ‘रविदास’ अविगत भगवंत॥ १॥**

—रविदास दर्शन

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, “त्या अव्यक्त प्रभुचा आरंभ नाही आणि अंत नाही.तो तर अनादि व अनंत आहे.त्यांची अनेक नांवे आहेत आणि तो सर्वांचा पालन करणारा आहे.”

(५९)

**‘रविदास’ इक जगदीस कर, धरै अनंतह नाम।**
**मोरे मन मंहि बसि रह्यो अधमन पावन राम॥ २॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “त्या एका जगदीशाची अनेक नांव आहेत.तो जगाचा स्वामी अनेक नांवानी पुकारला जातो.परंतु माझ्या मनात त्या रामाचाच निवास आहे.जो पतिताचा उद्धार करणारा आहे आणि तो सर्वांचा रक्षक आहे.”

(६०)

**‘रविदास’ हमारो साइयां, राघव राम रहीम।**
**सभ ही राम की रूप है, केसो क्रिस्न करीम॥ ३॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “तो जो आमचा स्वामी आहे त्याचे नाव राघव आहे आणि रामदेखील, त्याच मालकाला रहिमसुद्धा म्हणतात.तसेच केशव.कृष्ण आणि करीमही म्हणतात, जो आमचा आवडता आहे, त्या रामाचीच ही सगळी नांव आहेत.”

(६१)

**‘रविदास’ कोउ अल्लह कहइ, कोउ पुकारइ राम।**
**केसउ क्रिस्न करीम सभ, माधव मुकुंदह नाम॥ ४॥**

—रविदास दर्सन

संत रोहिदास म्हणतात की, “त्या ब्रह्माला कोणी‘अल्ला’ नावाने पुकारतो तर कोणी त्यास ‘राम’ या नावाने स्मरण करतो.त्यालाच ‘केशव’ कृष्ण आणि करीमसुद्धा म्हणतात, तोच माधव आणि मुकुंदसुद्धा आहे.ही सर्व नांवे त्या एकाच ब्रह्माची आहेत.”

(६२)

**सामी सिरजन हार है, राम रहीम खुदाय।**
**‘रविदास’ हमारो मोहना पावन केसो राय॥ ५॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “त्या आमच्या मोहनला कोणत्याहि नांवाने पुकारा.त्यास रहीम म्हणा अथवा खुदा.पाहिजे तर त्यास ‘पतित पावन केशवराम’ सुद्धा म्हणा.जो सृष्टीचा कर्ता आणि सर्वांचा स्वामी आहे तो तर आमचा तोच राम आहे.”

अनुक्रमणिका

(६३)

**अलख अलह खालिक खुदा, क्रिस्न करीम करतार।**
**रामह नांउ अनेक हैं, कहै'रविदास' विचार॥ ६॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "मी पुष्कळ विचार केल्यावर ओळखले की, त्या अव्यक्त आणि अदृश्य ब्रह्माची अनेक नांवे आहेत.तो राम अल्ला आहे आणि तोच मालीक आहे.त्याचेच नाव खुदा आहे आणि तोच कर्ता आहे.कृष्ण तोच आहे आणि करीमसुद्धा तोच आहे."

❁❁❁

## ८.संकट निवारक प्रभू

(६४)

**जब जब फैलेइ जगत मंहि कूड पाप अंधिआर।**
**तब तब राखै हत्य देई, 'रविदास' इक राम हमार॥ १॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जेव्हा जेव्हा जगात खोटं, कपट आणि पाप यांचा अंधार पसरतो, तेव्हा तेव्हा खोटं, कपट व पापापासून आमचा एक रामच सूटका करतो आणि तो रामच सर्वांच रक्षण करतो."

टीप.—प्रस्तुत दोह्यात गीता (४-७-८) च्या निम्नलिखित श्लोकाचा भावार्थ अभिव्यक्त आहे.

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदाऽऽत्मानं सृजाम्यहम्॥**
**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम**
**धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे॥**

अर्थात्, जेव्हा जेव्हा धर्माचा नाश होतो.अधर्म व पाप वाढते.तेव्हा तेव्हा मी साधु पुरूषांचे रक्षण, दुष्टांचा नाश तसेच धर्माची स्थापना करण्यासाठी येत असतो.

(६५)

**'रविदास' आस इक राम की, अरू न करहु कोउ आस।**
**राम छांडि अनत रमि हंइ, रहंइ सदा निरास॥ २॥**

—रविदास दर्शन

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, “माझा भरोसा तर फक्त एका रामावरच आहे.मला दुसऱ्या कोणाचीहि आशा नाही.दुसऱ्या देवावर आशा ठेवून काही फायदा नाही.जे रामाला सोडून दुसऱ्या कोणाची उपासना करतात किंवा दुसऱ्या कोणाकडून आपल्या कल्याणाची आशा ठेवतात.त्यांना तर नेहमी निराशच व्हावे लागते.”

## ९.प्रभू भेटण्याची युक्ती

(६६)

**माथै तिलक हाथ जप माला, जग ढगने कूं स्वांग बनाया।**
**मारग छांडि कुमारग डहकै, सांची प्रीत बिनु राम न पाया॥ १॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “कपाळावर लांबसा गंध, हातात धरलेली जप माळ, हा सगळा भक्तिचादेखावा आहे.जगातील लोकांना ठकविण्यासाठी हे एक चांगले सोंगच आहे.हा सगळा देखावा आहे.हा भक्तिचा खरा मार्ग नव्हे.ह्या कुमार्गाने चालत का भटकता?खऱ्याभक्तिमार्गाने चला.देखावा न करता रामावर खरे प्रेम करणे हीच त्याची भक्ती आहे.खरे प्रेम व खऱ्या भक्तिशिवाय प्रभू भेटणे असंभव आहे.”

(६७)

**देहरा अरू मसित मंहि,‘रविदास’ न सीस नवांय।**
**जिह लौं सीस निवावना, सो ठाकुर सभ थांय॥ २॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “प्रभुभक्तिसाठी मंदिर अथवा मशीदमध्ये जाऊन डोके नमविणे आवश्यक नाही.तो परमात्मा अथवा खुदा सर्वव्यापक आहे.तो सर्व ठिकाणी आहे.त्याची भक्ती आणि प्राप्ती कोणत्याही ठिकाणी बसून केली जाऊ शकते.”

(६८)

**‘रविदास’ न पूजइ देहरा, अरू न मसजिद जाय।**
**जंह तंह ईस का बास है, तंह तंह सीस नवाय॥ ३॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “रोहिदास मंदिरात बसून पूजा करीत नाही आणि मशीदीमध्ये जाऊन कोणापुढे मस्तक नमवीत नाही.माझे मस्तक तर तेथे नमते की, जेथे ईश्वराचा निवास आहे आणि त्या ईश्वराचा निवास तर प्रत्येक ठिकाणी आहे.”

(६९)

अनुक्रमणिका

**हिंदू पूजइ देहरा, मुसलमान मसीति।**
**'रविदास' पूजइ उस राम कूं, जिह निरंतर प्रीति॥ ४॥**

संत रोहिदास म्हणतात की, "हिंदू मंदिरात जाऊन पूजा करतात आणि मुसलमान मशिदीमध्ये नमाज पडतात.परंतु रोहिदास मंदिरात जात नाही किंवा मशिदीमध्ये सुद्धा.मी तर त्या रामाची आराधना करतो की, ज्याच्याबरोबर मी नेहमी प्रेम करीत आहे आणि जो प्रत्येकवेळी माझ्याबरोबर राहतो."

(७०)

**प्रेम पंथ की पालकी, 'रविदास' बैठियो आय।**
**सांचे सामी मिलन कूं, आनंद कह्यो न जाय॥ ५॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "मी प्रेममार्गाने चालून प्रेमभक्तिस आपलेसे केले आहे.प्रेम पंथाच्या डोलीत बसून मी आपल्या प्रभुजवळ पोहचलो आहे.आपल्या स्वामीस भेटून मी आनंदीत झालो आहे.तो आनंद कसा आहे हे मी कसा दाखवू.?"

(७१)

**'रविदास' मोरे मन लागियो, राम प्रेम को तीर।**
**राम रसायन जउ मिलहिं, तउ हरै हमारो पीर॥ ६॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "माझ्या मनात रामप्रेमाचा एक फार तिखट बाण रोवला आहे.त्यामुळे असा त्रास होत आहे की, जो अत्यंत अद्‌भुत व अवर्णनीय आहे.हा त्रास तर तेव्हाच नाहीसा होऊ शकतो की, जेव्हा राम रसायन मिळेल आणि ते राम रसायन म्हणजेच त्या प्रिय रामाची भेट."

(७२)

**का मथुरा का द्वारका, का कासी हरिद्वार।**
**'रविदास' खोजा दिल आपना, तउ मिलिया दिलदार॥ ७॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "अरे मथुरा आणि द्वारकेत काय ठेवले आहे?काशी आणि हरिद्वारमध्येही काय आहे?तुमी ज्या दिलदाराच्या शोधात आहे, तो तेथे मिळणार नाही, रोहिदास देखील त्या दिलदाराच्या शोधात फिरत होता परंतु मी आपल्या मनात शोध केला तेव्हा तो दिलदार मला आपले रूप दाखवीत भेटला."

(७३)

**तुरुक मसीति अल्लह ढूंढइ, देहरे हिंदु राम गुसांई।**
**'रविदास' ढूंडिया राम रहिम कूं, जंह मसीत देहरा नांही॥ ८॥**

—रविदास दर्शन

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, “मुसलमान आपल्या अल्लास मशिदीमध्ये शोधतात तर हिंदू आपल्या स्वामी-रामाला मंदिरात शोधतात.परंतु रोहिदासाने राम आणि रहीम ह्या दोघांना अशा जागी शोधले की, जेथे मंदिर व मशीद नाही.कारण ब्रह्म निराकार आहे.तो फक्त मंदिरे व मशिदीत राहात नाही.तो तर सर्व व्यापक आहे.तो सर्वत्र आहे.”

(७४)

**देता रहे हज्जार बरस, मुल्ला चाहे अजान।**
**‘रविदास’ खुदा नंह मिल सकइ, जौ लौ मन शैतान॥ ९॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जो मुल्ला मनाप्रमाणे हजार वर्षे बांग देत राहिला, जर त्याचे मनात सैतान विकार असेल, तर त्याला ईश्वराचे दर्शन कधीच होऊ शकत नाही.”

**टीप.**—संत रोहिदासांनी हाच भावार्थ खालील पदामध्ये प्रगट केला आहे.

**(१)जिसके इश्क आसरा नाही, क्या नमाज क्या पूजा?**
**(२)उजू पाक किया मुंह धोया, क्या मसजिद सिर नाया।**
**दिल मे कपट नमाज पडे क्या, क्या हज काबे जाया?**

(७५)

**जउ रे अल्लाह बसहिं मस्जिद मंह, मंदिर मह काहे नांहि भगवान।**
**‘रविदास’ खोजियो जिन्ह दिलु आनो, तिन्ह ही पायो रहमान॥ १०॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जर मशिदीत अल्ला आहे तर भगवान मंदिरात का नाही?खरे पाहाल तर तो मंदिरात आणि मशिदीतही नाही.तो तर प्रत्येकाच्या हृदयात राहात असतो.ज्याने आपल्या मनात त्याचा शोध केला, त्याला त्याचा तो राम मनातच भेटतो आणि रहिमानसुद्धा मनातच राहात असताना सांपडेल.”

(७६)

**जो खुदा पच्छिम बसै, तौ पूरब बसत है राम।**
**‘रविदास’ सेवौ जिह ठाकुर कूं, तिह का ठांव न नाम॥ ११॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जर मुसलमानांचा खुदा पश्चिमेस अथवा काबामध्ये राहातो तर हिंदूचा राम पूर्व दिशेस आहे.परंतु रोहिदास ज्या ईश्वराची पूजा करतो, त्याचे राहण्याचे कोणतेही ठिकाण नाही आणी त्यास काणतेही नाव नाही.तो तर सर्वव्यापक आहे.सर्वत्र विद्यमान आहे आणि त्याची अनेक नावे आहेत.”

**टीप.**—संत रोहिदास अन्यत्रही म्हणतात—

अनुक्रमणिका

**जोइ जोइ पूजिये सोइ-सोइ कांची, सहज भाव सत होई।**
**कहै 'रविदास' मैं ताहि कू पूजूं, जाकै ढांव नाव नहि कोई॥**

❀❀❀

## १०.शब्द रूप

(७७)

**सुरत शब्द जउ एक हों, तउ पाइहिं परम अनंद।**
**'रविदास' अंतर दीपक जरई, घट उपजई ब्रह्म अनंद॥ १॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जर ध्यानमग्न होऊन प्रभुनामाचे स्मरण केल्यास परमानंदाची प्राप्ती होते.शब्द आणि रूप यांचे ऐक्य झाल्यास, हृदयात ज्ञानदीप (ज्ञानाचा दिवा) जळतो आणि ब्रह्मनंदाचा सागर लहर लाटांनी नृत्य करतो."

(७८)

**'रविदास' सब्दह सह जवहि, सुखह इकमिक होई।**
**अनुभूति सत्तनामह, स्वयं देतहिंलोई॥ २॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जेव्हा प्रभु नामाचा जप आणि ध्यान दोन्ही एक होतात.तेव्हा त्या ध्यानमग्न अवस्थेत प्रभुच्या सत्तनामाचा अनुभव येऊ लागतो.तेव्हा मनमंदिरात त्याची ज्योत स्वयंमेव प्रकाशित होते."

(७९)

**ओंकार को ध्यान मंहि, जौ लौ सुरति न होय।**
**तौ लौ सांचे ब्रह्म कूं, 'रविदास' न बुझइ कोय॥ ३॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जोपर्यंत त्या ओंकार ब्रह्माच्या ध्यानात रूप हरवत नाही, त्यामध्ये एकाग्र मन होत नाही, तोपर्यंत त्या खऱ्या ब्रह्माला तो ओळखू शकत नाही आणि त्यास प्राप्तही करू शकत नाही.तरी ब्रह्मानंद प्राप्तीसाठी मनाची एकाग्रता, तन्मयता नितांत आवश्यक आहे."

(८०)

**'रविदास' दिआ जगमग जरई, बिन बाती बिन तेल।**
**सुरत साधिकर हिय मंहि, देख पिया के खेल॥ ४॥**

—रविदास दर्शन

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, “काय अद्भूत खेळ आहे?तेल व वातीशिवाय दिवा जगमग जळत आहे.जर तुलासुद्धा हा खेळ पाहावयाचा असेल, तर तू आपल्या प्रियकराच्या ध्यानात मग्न हो, तुलासुद्धा आपल्या हृदयामध्ये त्याचा आगळा वेगळा चमत्कार पाहावयास मिळेल.”

(८१)

**‘रविदास’ सुरत कूं साधि कर, मोहन सों कर पिआर।**
**भौ जल कर संकट कटंहि, छुटंहि बिघन बिकार॥ ५॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जर तुम्ही संसारिक संकटातून सुटका करू इच्छिता तर तुमच्या मार्गात अडचणी येऊ नयेत तसेच पंचविकार तुमच्यापासून दूर रहावेत असे वाटत असेल, तर एकाग्र होऊन अनन्य भावाने त्या मोहनवर प्रेम करा.जो ब्रह्म आहे तो सर्वांचा कर्ता, पालक आहे आणि सर्व विघ्नांचा नाश करणारा आहे.”

❀❀❀

## ११.जीवन मरण

(८२)

**जीवन ज्योति कइसंहि जगि, कइसो होईहि अंत।**
**‘रविदास’ मनुष न जानंहि, जानन है भगवंत॥ १॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जीवनाची ही ज्योत कशाप्रकारे जळत जगत आहे आणि ती कशी विझेल, हे कोण जाणतो?कोणीहि मनुष्य जाणत नाही की, ज्याचा कधी, कोठे व कसा जन्म होणार आणि कसा कोठे मृत्यु होणार?मनुष्याचे जन्ममरणाचे हे एक रहस्य आहे.आणि ह्या रहस्याला फक्त भगवानच जाणतो.म्हणून त्यास शरण गेले पाहिजे.तोच ह्या जन्ममरणातून मुक्त करणारा आहे.”

(८३)

**‘रविदास’ जन्मे कउ हरस का, मरने कउ का सोक।**
**बाजीगर के खेल कूं, समझत नाही लोक॥ २॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “कोणाचा जन्म झाल्याने आनंद काय?तसेच कोणाचा मृत्यु झाल्याने शोक कसला?जन्म मरण त्या ईश्वराचा एक खेळ आहे.ज्याच्या रहस्याला अज्ञानी लोक समजत नाहीत आणि व्यर्थ आनंदीत व दुःखी होतात.”

टीप.—गीत (२·२७) मध्ये सांगितले आहे—

**जातस्य हि ध्रुवो मृत्युध्रुवं जन्म मृतस्य च।**

अनुक्रमणिका

**तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि॥**

अर्थात जो जन्मतो, त्याचा मृत्यु निश्चित आहे.तसेच जो मरतो, त्याचा पुनर्जन्म अनिवार्य आहे.कोणाच्या जन्म घेण्याने आनंद आणि कोणाच्या मरणाने शोक झाला नाही पाहिजे.

हे शरिरासाठी आहे.गीता (२·२०) प्रमाणेच आत्मा तर—

**न जायतेम्रियते वा कदाचित्,**
**नायं भूत्वा भविता वा न भूयः ।**
**अजो नित्यःशाश्वतोय पुराणो**
**न हन्यते हन्यमाने शरीरे॥**

अर्थात हा आत्मा जन्म घेत नाही की मरतही नाही.तो तर त्रिकालाबाधित आहे.हा अजन्मा, चिरनित्य तसेच चिरकालिन आहे.शरिरास मारल्यानंतर तो मरत नाही.

संत रोहिदासांच्या प्रस्तुत दोह्यात 'गीता' च्या ह्या भावार्थाची छाया सुस्पष्ट आहे.

❀ ❀ ❀

## १२.चांगला साधू

(८४)

**'रविदास' सोई साधु भलो, जउ जग मंहि लिपत न होय।**
**गोविंद सों रांचा रहइ, अरू जानंहि नंहि कोय॥ १॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जो संसाराच्या मायाजाळात गुंतत नाही, संसारात गुरफटत नाही.त्याला चांगला साधु म्हणावे.खरा साधु तर फक्त ईश्वर भजनात गुंग होतो आणि एका ईश्वराशिवाय तो कोणालाही जाणत नाही.तसेच तो दुसऱ्या कोणत्याही देवाची पूजा करीत नाही.त्यालाच चांगलाभला साधू म्हणावा."

**टीप.**—संत रोहिदासांनी उल्लेखित केलेले साधु संतांचे लक्षण श्रीमत भागवतप्रमाणेच आहे—

**विषय-अलंपट सील गुनाकार, पर दुःख दुःख सुख सुख देखे पर।**
**सभ अभुत रिपु विनद विरागी, लोभा मरष हरष भय त्यागी।**
**कोमल चित्त दीनन्हपर दाया, मन बच क्रम मम भगति अमाया।**
**सभ ही मान प्रद आपु अमानी, भरत प्रानसम मम तेइ प्रानी।**
**विगत काम मम नाम परायन, सांति बिरती बिनती मूदितायन।**
**सीतलता सरलता मयित्री, द्विजपद प्रीति परम जनर्यगी।**
**सम-दम नियम नीति नहि डोलहि, परूष बचन कबहू नहि बोलहि।**

अनुक्रमणिका

**निंदा अस्तुति उभय सम, ममता मम पद कंज।**
**सब्बन मम मान प्रिय, बुनमंदिर सुख पुंज॥**

(८५)

**'रविदास' सोइ साधु भलो, जउ मन अभिमान न लाय।**
**औगुन छांडहि गुन गहइ, सिमरइ गोविंद राय॥ २॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जो आपल्या मनात कधी अभिमान-अहंकार यांचा भाव उत्पन्न होऊ देत नाही.तसेच ज्याने सर्व अवगुणांचा त्याग केला आहे.जो नेहमी फक्त सद्‌गुणांचा स्वीकार करण्यात तत्पर राहातो व जो नेहमी प्रभु भक्तिमध्ये मग्न असतो.त्यालाच चांगला साधू म्हणावा."

(८६)

**'रविदास' सोइ साधु भलो, जउ रहइ सदा निरबैर।**
**सुखदाई समता गहइ, सभनह मांगहि खैर॥ ३॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जो कोणाबद्दल वैर, विरोधाची आणि द्वेषाची भावना मनात ठेवीत नाही.जो दुसऱ्यांना सुख देणारा, सर्वांबरोबर समान व्यवहार करणारा, तसेच सर्वांचे कल्याण चिंतणारा असतो.त्याला चांगला साधू म्हणावा."

(८७)

**'रविदास' सोइ साधु भलो, जउ अपनह अप्पु न जताय।**
**सत्तवादी सांचा रहइ, मन हरि चरनन मंह लाय॥ ४॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जो स्वतःबद्दल काही सांगत नाही.आपण स्वतःकोण काय आहे हे सांगत नाही.तोच खरा साधु-संत आहे.अथवा जो अतिसाधारण मानव आहे.त्यालाच चांगला साधु म्हणावा.जो सत्यवादी असून, सत्यमय जीवन जगतो आणि आपले मन नेहमी प्रभुनाम स्मरणात लावतो.त्यालाच खरा चांगला साधु म्हणावा."

(८८)

**'रविदास' सोइ साधु भलो, जिह मन निर्मल होय।**
**राम भजहि विषया तजहि, मिथ भाषी न होय॥ ५॥**

—रविदास दर्शन

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, “ज्याचे मन निर्मळ आहे.जो नेहमी राम भजनात मग्न असतो, ज्याने सर्व विषय-वासनांचा त्याग केला आहे आणि खोटे बोलणे सोडून दिले आहे.त्यालाच चांगला साधू म्हणावा.”

(८९)

**‘रविदास’ सोइ साधु भलो, जउ जानहि पर पीर।**
**पर पीरा कहुं पेखि के, रहवे सदहि अधीर॥ ६॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जो दुसऱ्यांच्या कष्टांचा अनुभव घेत असतो, दुसऱ्याचे दुःख पाहून जो नेहमी बेचैन होतो.आणि त्यांचे दुःख दूर करण्यासाठी नेहमी तत्पर राहातो.त्यालाच चांगला साधू म्हणावा.”

(९०)

**‘रविदास’ सोइ साधु भलो, जो पर उपकार कमाय।**
**जइ सोइ कहहि वइसोइ करहि, आपा नांहि जताय॥ ७॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जो परोपकार करणारा असतो, ज्याच्या बोलण्यात व वागण्यात अंतर नसते.तसेच जो स्वतःसाधु असल्याचे सांगत नाही.त्यालाच चांगला साधु म्हणावा.”

**टीप.**—प्रसिद्ध म्हण आहे—

**परोपकाराय सत्ता विभूतयः ।**

अर्थात, सत्पुरूषाचे धन व ज्ञान परोपकारासाठी असते.

(९१)

**‘रविदास’ सोइ साधु भलो, जो निहकपट निरपच्छ।**
**छमासील अरू सरल मनह, बाहर भीतर स्वच्छ॥ ८॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जो मनात कपट ठेवीत नाही.जो पक्षपाताच्या भावनेपासून दूर राहतो.जो स्वभावाने क्षमाशील असून, सरळ मनाचा आहे.ज्याच्या अंतरात्म्यात मळ, घाण नाही तसेच जो बाहेरूनही स्वच्छ आहे.त्यालाच चांगला साधु म्हणावा.”

(९२)

**‘रविदास’ सोइ साधु भलो, निर्मल जाके बैन।**
**जिह करि दरस औ परस सो, मन उपजहि सुख चैन॥ ९॥**

—रविदास दर्शन

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, "ज्याचे बोलणे मृदु,गोड असते, ज्याच्या दर्शनाने मनास सुख-शांति मिळते, ज्याच्या चरण स्पर्शाने मनात समाधान मिळते.अशा साधुस खरा चांगला साधु समजावा."

(९३)

**'रविदास' सोइ साधु भलो, जउ हंसा गति होय।**
**काम करम सभ छांडि करि, राम भजन मंह खोय॥ १०॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "ज्याचा हंसाप्रमाणे सर्व व्यवहार होतो.ज्याप्रमाणे हंस मानस सरोवरात मोती वेचून खातो.त्याप्रमाणे ह्या संसाररूपी सरोवरात रामनामाचे मोती वेचून, त्याचे आपले भोजन बनवितो.ज्याप्रमाणे हंस दुधास पाण्यापासून वेगळे करण्याचे जानतो.त्याप्रमाणे खरा साधुसुद्धा जगातील सत्-असत् वस्तुला वेगवेगळे करण्याचे जानतो.असत्य सोडून सत्य स्वीकारतो.कामकर्म सोडून जो नेहमी निष्काम कर्म करीत राम भजनात मग्न राहातो.त्यालाच खरा साधु म्हणावे."

(९४)

**'रविदास' सोइ साधु भलो, जिह मन बसइ जगदीस।**
**रहइ ओट ओंकार करि, बुरी भलो सहइ सीस॥ ११॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "ज्याच्या मनात फक्त एक जगदीश राहतो.ज्याच्या ओठात फक्त ओंकार आहे.जो परमात्म्यालाच आपला एकमेव आधार मानतो.तसेच जगातील वाईट चांगले नतमस्तक होऊन सहन करतो.त्याला खरा साधु समजावा."

(९५)

**'रविदास' सोइ साधु भलो, जौ मनह दोष मिटाय।**
**उर मंह आपा न थापइ, तृस्ना आस जलाय॥ १२॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "ज्याने सर्व मानसिक विकार यांना दूर केले आहे.मनापासून अहंकारांना नष्ट केले आहे.आणि आपल्या सर्व आशा तसेच सर्व प्रकारच्या तृष्णांचा त्याग करून, जाळून टाकल्या असतील, तर त्याला चांगला साधू समजला पाहिजे."

(९६)

**'रविदास' सोइ साधु भलो, जौ साहिब हत्थ बिकाय।**
**साहिब भेंट चढ़ान कउ अपनह सीस कटाय॥ १३॥**

अनुक्रमणिका

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जो स्वतःआपल्याला मालकाचे हाती विकतो आणि आपले जीवन आपल्या प्रभुला अर्पण करतो.त्यास खरा साधुसमजले पाहिजे.जो आपल्या प्रभुचे चरणी भेट देण्यासाठी आपले स्वतःचे शिर कापून देऊ शकतो.त्यालाच खरा साधू समजावा."

(९७)

**'रविदास' सोइ साधु भलो, जिह मन नांहि अभिमान।**
**हरस सोक जानइ नहि, सुख दुख एक समान॥ १४॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "ज्याच्या मनात कोणताही अभिमान नसेल, जो आनंद आणि शोक जानत नसेल सुख व दुःखासुद्धा एकसारखाच समजतो.त्यालाच चांगला साधु समजावा."

(९८)

**'रविदास' कहै जाके रिदै, रहै रैन दिन राम।**
**सो भगता भगवंत सम, क्रोध न व्यापै काम॥ १५॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "ज्याच्या मनात रात्रंदिवस राम राहातो.जो आपल्या मनात नेहमी रामनाम म्हणतो.तो भक्त भगवानाचे रूप बनतो.तो भक्त मग्न होऊन भगवत्स्वरूप बनतो.त्याच्यात व भगवानात काही भेद रहात नाही.त्या भक्तास कधी क्रोध येत नाही तसेच त्याला कामवासना, प्रापंचिक इच्छा सतावत नाहीत.अशाप्रकारे तो भक्त नेहमी शांत व निष्काम राहून सुखी जीवन व्यतीत करतो."

❋❋❋

## १३.हाताने काम, मुखाने नाम

(९९)

**जिहवा सों ओंकार जप, हत्यन सों कर कार।**
**राम मिलहि घर आइ कर, कहि रविदास विचार॥ १॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "तुम्हीजिभेने ओंकार जपा आणि हाताने प्रामाणिक काम करीत राहा.जर तुम्ही जीवनावश्यक काम करीत राम नामाचे ध्यान करीत राहाल, तर तो राम तुम्हास घरात येऊन भेटेल.तुम्हाला रामास भेटण्यासाठी जप, तप, तीर्थ, व्रत इत्यादी काहीसुद्धा विशेष प्रयत्न करावे लागणार नाहीत.तुम्हांला रामाची सहज प्राप्ती होइल."

**टीप.**—प्रस्तुत दोह्यात गीता (१८·५६) च्या निम्नलिखित श्लोकाच्या भावना प्रगट केल्या आहेत.

अनुक्रमणिका

**सर्व कर्माण्यपि सदा कुर्वाणी मद् व्यपाश्रयः ।**
**नत प्रसादाद अवाप्नोति शाश्ववत पदमव्ययम॥**

अर्थात, ईश्वराचा आश्रय घेऊन नेहमी कर्म करतानासुद्धा मनुष्य भगवत्कृपेने अनश्वर परम पदास प्राप्त करतो.

(१००)

**नेक कमाई जउ करहि, ग्रह तजि बन नहि जाय।**
**'रविदास' हमारो राम राय, ग्रह मंहि मिलिहिं आय॥ २॥**

संत रोहिदास म्हणतात की, "जो मनुष्य संसाराचा त्याग करून जंगलात राहात नाही.परंतु घरात राहून प्रभु चिंतनाबरोबर प्रामाणिक काम करीत जीवन निर्वाह करातो.त्यास घरी बसूनच राम भेटतो."

(१०१)

**ग्रहहि रहहु सति करम करहु, हरदम चिंतहु ओंकार।**
**'रविदास' हमारो बांधला, हइ केवल नाम अधार॥ ३॥**

संत रोहिदास म्हणतात की, "संसारात राहून खरे काम करीत जीवन निर्वाह करा आणि प्रत्येक वेळी ओंकारचा जप करीत रहा.संसाररुपी सागर तरण्यास ओंकार नामरूपी जहाजच एकमात्र आधार आहे."

(१०२)

**एक भरोसो राम को, अरू भरोसो सत्तकार।**
**सफल होइहु जीवना, कहि 'रविदास' विचार॥ ४॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "मला या संसारात फक्त दोन शक्तीवर भरोसा आहे.पहिली महाशक्ती जिच्यावर माझा भरोसा आहे ती म्हणजे राम व दुसरी शक्ती जिचा मला आधार आहे ती आहे-माझे सत्कर्म.राम आणि सत्कर्म ह्या दोन शक्तिच जीवन सफल बनविण्यास एकमात्र आधार आहे."

❀❀❀

## १४.निष्काम कर्म भावना

(१०३)

**करम बंधन मंह रमि रह्यो, फल कौ तज्यो न आस।**
**करम मनुष्य कौ धरम है, सत्त भाषै 'रविदास' ॥ १॥**

—रविदास दर्शन

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, "संसारिक प्राणी कर्मबंधनातच फसून राहातात.कारण कर्म केल्यानंतर तो त्याचे फळ त्वरित मिळण्याची इच्छा करतो.परंतु मनुष्यास सत्य समजले पाहिजे की, कर्म करणे हाच त्याचा धर्म आहे.त्याचा कर्म करण्याचा अधिकार आहे.यासाठी हे मनुष्या, तू निःसंगभावाने कर्म करीत चल.कर्मास धर्म समजून काम करीत जा.तू फळाची आशा करू नकोस.फळ देणे तर भगवानाचे हाती आहे.हे त्याच्या जबाबदारीवर सोड.तेव्हाच तू कर्मबंधनातून मुक्त होऊन सुखी होऊ शकशील."

**टीप.**—या दोह्मात गीता (२·४७) च्या ह्मा वचनाचे भाव स्पष्ट प्रगट केले आहेत.

**कर्मण्ये वाधिकारस्थे मा फलेषु कदाचन।**
**मा कर्म फलहेतुर्भूःमा ते संगो स्त्वकर्मणि॥**

अर्थात, मनुष्याचे कर्म करणे हेच कर्तव्य आहे.त्याने स्वतःकेलेल्या कर्माच्या फळाची अपेक्षा करू नये.तसेच त्याने वाईट कर्मही केले नाही पाहिजे.

(१०४)

**सौ बरस लौं जगत मंहि, जीवत रहि करू काम।**
**'रविदास' करम ही धरम है, करम करहु निहकाम॥ २॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "मनुष्यास शंभर वर्षाच्या पूर्ण आयुष्यातपर्यंत संसारात राहून योग्य असे काम केले पाहिजे.कर्म-काम करणे मनुष्याचा धर्म आहे.यासाठी धर्माच्या रूपातच फळाची इच्छा न करता, काम करीत राहिले पाहिजे.जो मनुष्य फळाची इच्छा न करता, काम करीत आहे.तो परम सुखी राहतो."

**टीप.**—या दोह्यात ईशावास्योपनिषद (१·२) च्या या वचनाचे भावच प्रगट झाले आहेत.

**कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषंच्छंत समाः ।**
**एंव त्वयि नान्यथे तोडस्ति न कर्म लिप्पते नरे॥**

अर्थात्, परमेश्वराचे स्मरण करताना, त्याच्या पुजेच्या निमित्ताने शास्त्रोवत्त कर्तव्य कर्माचे आचरण करीत शंभर वर्षापर्यंत जगण्याची इच्छा केली पाहिजे.याप्रकारे कर्म करणारा मनुष्य कर्मबंधनापासून लपून राहात नाही.याशिवाय कर्मबंधनातून सुटका करून घेण्याचा दुसरा कोणताही उपाय नाही.

(१०५)

**धरम हेतहि कीजिये, सौ बरस लौ कार।**
**'रविदास' करमहि धरम हैं, फल मंहि नंहि अधिकार॥ ३॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "शंभर वर्षापर्यंत जिवंत राहात असताना मानव जे काम करील.ते धर्मासाठीच करील.मानवाचा धर्म फक्त कर्म करणे आहे.फळ प्राप्तीवर त्याचा काही अधिकार नाही."

अनुक्रमणिका

(१०६)

**धरम समुझि जो कार होइ, उह कर फल होइ इस्ट।**
**'रविदास' कोउ भी करम फल, होहि नांहि अनिस्ट॥ ४॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जो मनुष्य फक्त धर्म समजून निष्काम भावाने कर्म (काम) करतो.त्यास इच्छिलेले फळच प्राप्त होत असते.निष्काम भावाने काम करणारा जेव्हा हे समजतो की, मिळालेल्या फळावर माझा काही अधिकार नाही.तेव्हा तो फळाबद्दल उदासीन होतो आणि त्याचे साठी कोणतेही कर्म फळ कधी अनिच्छित अनिष्ट होत नाही."

(१०७)

**'रविदास' मनुष्य कर धरम है, करम करहि दिन रात।**
**करमनहि फल पावना, नहीं काहु के हाथ॥ ५॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "दिवस रात्र काम करीत राहणेच मानवाचा एकमात्र धर्म आहे.परंतु कर्म धर्माचे पालन करणाऱ्याला हे चांगल्या प्रकारे समजले पाहिजे की, कर्मफळाची प्राप्ती कर्म साधकाच्या हाती नाही.फळ देणे हे भगवानाचे हाती आहे."

(१०८)

**परकिरती परभाउ बस.मानुष करत है कार।**
**मानुष तउ है निमित्त रूप, कहि 'रविदास' बिचार॥ ६॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "मनुष्य आपल्या स्वभावानुसार जे काही काम करतो, ते सर्व त्याची स्वयं प्रकृति करून घेते.जर सर्व कर्म (काम) प्रकृति द्वारा करून घेतली जातात.तर मग कर्म केल्याचा अभिमान कां?खूप चांगल्याप्रकारे विचार केल्यावर रोहिदास या निर्णयावर आले की, कर्म करण्यास मनुष्य तर फक्त निमित्तमात्रच आहे."

**टीपः**—गीता (३·२७) मध्ये सांगितले आहे की,—

**प्रकृतेःक्रियमाणानि गुणैःकर्माणि सर्वशः ।**
**अहंकारविमुढात्मा कर्ताहमिति मन्यते॥**

अर्थात, मनुष्य दैवी शक्तीमुळे प्रेरित होऊन कार्य करीत आहे.परंतु तो अहंकाराने मूर्ख बनून, तो स्वताला कर्ता समजत आहे.यासाठी भगवान श्रीकृष्ण गीता (११·३३) मध्ये अर्जुनाला सांगतात की—

अनुक्रमणिका

**भयैवंते निहताःपूर्वमेव,**
**निमित्तमात्र भव सव्यसाचिन।**

अर्थात, हे तुझे भाऊ तर माझ्याहातून पूर्वीच मारले गेले आहेत.तू तर यांना मारण्यात निमित्तमात्र बनणार.(याच भावाची छाया संत रोहिदासांच्या ह्या दोह्यात आली आहे.)

(१०९)

**करमन ही परभाऊ तजि, निहकरमी होइ कर काम।**
**'रविदास' निहकरमी करमही, मेल कराए राम॥ ७॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "कर्माच्या प्रभावामुळे निर्लेप राहून आणि कर्मफळाची इच्छा सोडून नेहमी काम केले पाहिजे.निष्काम भावाने केलेले कर्मच ईश्वर प्राप्तिचे साधन बनते."

(११०)

**सुख दुख हानि लाभ कउ, जउ समझहि इक समान।**
**'रविदास' तिन्ह हिं जानिए, जोगी पुरूष सुजान॥ ८॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जो मनुष्य सुख-दुःख व लाभ-हानीमध्ये आपल्या मनास स्थिर ठेवतो.त्यांना एक समान मानतो.अशा मनुष्यास कर्मयोगी व ज्ञानी मानले पाहिजे."

(१११)

**करम जोग की साध सों, आतमराम सुध होय।**
**'रविदास' बिजेता सो भया, करम करै जउ कोय॥ ९॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जो मनुष्य कर्मयोगाची साधना करतो.निष्कामभावाने कर्माचे अनुष्ठान करतो.त्याची आत्मशुदी होते.तो खात्रीने निर्मळबुद्धिचा व शुद्धात्मा होतो.निष्काम कर्मयोगाच्या मार्गाने चालणारी व्यक्ती विजय व विभुती प्राप्त करतो."

**टीप.**—ह्या दोह्याचे प्रेरक भाव गीता (५·११) च्या निम्नलिखित श्लोकात आहे.

**कायेन मनसा बुध्या केवलैरिंद्रियै रपि।**
**योगिनःकर्म कुर्वंति संगं त्यकत्वाऽऽलाशुध्ये॥**

अर्थात योगी लोक भोगासक्ति सोडून फक्त शरीर, मन, बुद्धी आणि इंद्रियाद्वारा आत्मशुद्धिसाठी कर्म करतात.

अनुक्रमणिका

(११२)

**साधक भांति जोग जुकत, करम करहु 'रविदास' ।**
**धरम बोधि कीजहु करम, फलकी त्यागहु आस॥ १०॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "मनुष्यास एकाद्या खऱ्या साधकाप्रमाणे कर्मास आपला धर्म समजून फळाची आशा सोडून कर्म केले पाहिजे."

(११३)

**राग द्वेष कूं छांडि कर, निहकरम करहु रे मीत।**
**सुख दुख सभ महि थिर रहिं, 'रविदास' सदा मन मीत॥ ११॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "अरे मित्रा, तू राग, द्वेष सोडून निष्काम भावाने कर्म करशील तर सुख व दुःखात तुझे मन नेहमी स्थीर राहील."

(११४)

**जिहवा भजै हरि नाम नित, हत्य करहिं नित काम।**
**'रविदास' भए निहचिंत हम, मम चिंत करैंगे राम॥ १२॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जिभेने नेहमी प्रभू भजनकरीत राहिले पाहिजे आणि हाताने नेहमी काम केले पाहिजे.रोहिदास तर नेहमीच प्रभु भजन व परिश्रम (काम) करण्यात दंग असतो.मग त्यास आपल्या जीवन निर्वाहाची चिंता करण्याची गरज काय?त्याची चिंता तर रामच करील."

**टीप.**—प्रभु भक्तांनी निश्चिंत होण्याची गोष्ट संत रोहिदासांनी अन्यत्रहि सांगतली आहे.

**सुत सेवक सदा असोच, ठाकुर पितहिं सब सोच।**

❀❀❀

**१५.श्रम साधना**

(११५)

**'रविदास' श्रम करि खाइहि, जौ लौ पार बसाय।**
**नेक कमाई जउ करइ, कबहुं न निहफल जाय॥ १॥**

अनुक्रमणिका

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जोपर्यंत आपल्या शरिरात शक्ति-सामर्थ्य आहे, तो पर्यंत काम करून आपण आपला उदरनिर्वाह केला पाहिजे.स्वतःच्या परिश्रमाने जी कमाई केली जाते, जे पैसे मिळविले जातात.फक्त तीच खरी कमाई होय.अशी खरी कमाई कधी फुकट जात नाही.खऱ्या कमाईने मनुष्यास लाभच लाभ होतो.नुकसान काहीसुद्धा होत नाही.”

**टीप.**—संत रोहिदासांची ‘श्रमसाधना’ हा आत्मनिर्भरतेस पूरक व प्रेरक अशा उपदेशाचे आजदेखील किती तरी महत्व आहे.

(११६)

**श्रम कउ ईसर जानि कै, जउ पूजहि दिन रैन।**
**‘रविदास’ तिन्हहि संसार मंह, सदा मिलहि सुख चैन॥ २ ॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “ज्या निष्ठेने व श्रद्धेने ईश्वराची पूजा केली जाते.त्याचप्रमाणे परिश्रम ईश्वरपूजा समजून केली तर अशा परिश्रमी स्त्री-पुरूषांस जगात नेहमी सुख व शांती मिळते, कष्ट-काम करणारा मनुष्य नेहमी सुख शांतिचे जीवन जगतो.”

(११७)

**‘रविदास’ हौं निज हत्थ हिं, राखौ रांबी आर।**
**सुकिरित ही मम धरम है, तारैगा भव पार॥ ३॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “मी नेहमी आपल्या हातात जोडे बनविण्यासाठी आपली हत्यारे रापी आणि आरी घेत असतो.खरे कर्म-काम करणे हाच माझा धर्म आहे.मी ज्याच्यावर निर्वाह करतो, तो माझा जोडे बनविण्याचा धंदा माझा संसाररूपी सागर पार करणार.”

**टीप.**—गीता (१८·४५-४८) मध्ये भगवान श्रीकृष्ण अर्जुनास उपदेश देताना म्हणतात की,—

**स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धि लभते नरः॥**
**स्वकर्मणा तमभ्यर्च्ये सिद्धि विंदति मानवः॥**
**श्रेयान स्वधर्मोविगुणःपरधर्मात स्वनुष्ठितात।**
**स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्विषम्॥**
**सहजं कर्म कौंतेय सदोषमपि न त्यजेत॥**

“अर्थात, आपले कर्तव्य पालन करणारा मनुष्य सिद्धी प्राप्त करतो.त्या परमेश्वरास आपल्या स्वाभाविक कर्मद्वारा पूजा करून मनुष्य परमसिद्धिस प्राप्त करतो.दुसऱ्याच्या कर्मव्यवसायापेक्षा आपले कर्म

अनुक्रमणिका

(काम) नेहमी कल्याणकारी असते.आपल्या कार्यास अनासक्तपणे करणारा मनुष्य कर्मबंधनरुपी पापात लपला जात नाही.हे कुंतीपुत्र अर्जुना, लोकांच्या दृष्टिने दोषपूर्ण वाटत असले तरी आपल्या स्वाभविक कर्मास सोडले नाही पाहिजे."

संत भक्तांनी आपल्या व्यवसायास कधी लहान, कमी समजले नाही.त्यांनी निष्कामभावाने धर्म समजून काम केले.संत रोहिदास चांभार, कबीर कोष्ठी, नामदेव शिंपी, सेना नाव्ही, सदना कसाई आणि पलटुदास वाणी होते.या सर्वांनी आपल्या व्यवसायाची जाहीरपणे प्रशंसा केली आहे.त्यांनी आपल्या अभंगात-पदात आपल्या व्यवसायाची व त्या धंद्याच्या हत्यारांचे वेळोवेळी वर्णन केले आहे.उदाहरणार्थ पाहा—रोहिदास (चांभार)

**जाकै कुटुंब कै ढेढ़ सभ ठोर ढुवंत फिरहि अजहु बनारसी आसपासा।**
**आचार सहित विप्र करहि डंडउति तिन तनै 'रविदास' दासानुनासा॥**

(११८)

**प्रभ भगति श्रम साधना, जग मंह जिन्हहिं पास।**
**तिन्हहिं जीवन सफल भयो, सत्त भाषै 'रविदास' ॥ ४॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "प्रभुभक्ती व श्रम साधना ही दोन महान साधने ज्यांच्या जवळ आहेत.त्यांचे जीवन सफल आहे.प्रभुची भक्ती करीत आपले कार्य करणाऱ्या व्यक्ती ह्या जगात सफल व सुखी जीवन जगतात."

(११९)

**धरम करम दुइ एक है, समझि लेहु मन मांहि।**
**धरम बिना जौ करम है, 'रविदास' न सुख तिस मांहि॥ ५॥**

—रविदासदर्शन पृ. १२३/११९

संत रोहिदास म्हणतात की, "मनात हे समजले पाहिजे की, धर्म आणि कर्म दोही समान आहेत.यामध्ये काही अंतर नाही.जो धर्म आहे, तेच कर्म आहे आणि जे कर्म आहे, तोच धर्म आहे.जी व्यक्ती कर्मास धर्म समजून काम करीत नाही आणि कर्म करण्याच्यावेळी धर्माच्या सर्व मर्यादा सोडते, त्यास त्या धर्मभावनारहित कर्म करण्यात कधी सुख मिळत नाही."

**टीप.**—आजच्या अर्थप्रधान जगात श्रमसाधनेस तर महत्व दिले जाते.धर्माच्या शम, दम इत्यादी गुणांची सर्वथा अवहेलना केली जाते.संत रोहिदासांच्या या दोह्यास नेहमी आदर्श म्हणून दृष्टिसमोर ठेवणे योग्य आहे.

❀❀❀

अनुक्रमणिका

## **१६.जात पात विचारू नका**

(१२०)

**जन्म जात मत पूछिऐ, का जात अरू पात।**
**'रविदास' पूत सभ प्रभ के, कोउ नहिं जात कुजात॥ १॥**
—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "कोणाला जन्म व जात विचारू नका.ही जात पात काय आहे?ही काहीच नाही.आणि या जातीभेदाने काही लाभसुद्धा नाही.येथे सर्व माणसे ईश्वराची लेकरं आहेत.म्हणून सर्व समान आहेत.माणसांची काही चांगली वाईट जात नसते.यामध्ये कोणी उंच जातीचा अथवा कोणी नीच जातीचा सुद्धा नसतो."

(१२१)

**जात पांत के फेर मंहि, उरझि रहइ सभ लोग।**
**मानुषता कूं खात हइ, 'रविदास' जात कर रोग॥ २॥**
—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "लोक जातीपातीच्याफेऱ्यात फसले आहेत आणि हा जातीभेदाचा महारोगच मानवतेस खात आहे.ही जन्म-जात-भावना माणसाला माणूस समजू देत नाही.जातीभेदामुळे मनुष्याच्या मानवतेचा नाश होत आहे."

(१२२)

**जन्म जात कूं छांडि करि, करनी जात परधान।**
**इह्यौवेद कौ धरम है, करै 'रविदास' बखान॥ ३॥**
—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जन्माच्या आधारावर कोणाची जात निश्चित करण्याचा सिद्धांत सोडला पाहिजे.व्यक्तिचा व्यवसाय मुख्य असतो.म्हणून व्यवसायाप्रमाणे त्याच्या जातीची ओळख व गणना केली पाहिजे.वेदांच्या विचारधारेप्रमाणे हे खरे आहे की, जातीचा आधार जन्म नाही कर्म आहे.त्यास आपला जीवन निर्वाह चालविण्यासाठी व्यवसाय-धंदा करावा लागतो."

**टीप.**—गीता (१८·४१) मध्ये सांगितले आहे की—

**ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणांच परतंप।**
**कर्माणि प्रतिभक्तानि स्वभावप्रभ वैर्गुणैः॥**

अर्थात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या जाती जन्मापासून नाही.तर त्याचा स्वभाव सत-रज-तम गुणानुसार काम धंद्यामुळे बनलेल्या आहेत.

अनुक्रमणिका

(१२३)

**बाह्मन खत्तरी बैस सूद, 'रविदास' जनम ते नांहि।**
**जौ चाहइ सुबरन कउ, पावई करमन मांहि॥ ४॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जन्मामुळे कोणीही मनुष्य ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र नाही.जर कोणा मनुष्यास उच्च वर्ण पाहिजे असेल, तर त्याला चांगले कर्म केले पाहिजे."

(१२४)

**बेद पढई पंडित बन्यो, गांठ पन्ही तउचमार।**
**'रविदास' मानुष इकहइ नाम धरै हइ चार॥ ५॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जो कोणी वेदपाठी असेल तर त्याला पंडित म्हणतात आणि जो जोडा शिवत असेल तर त्यास चांभार म्हणतात.वास्तविक पाहता सर्व माणसे एक आहेत.त्यांच्यामध्ये जन्मजात काही भेद नाही.फक्त कर्माप्रमाणे त्यांचे वेगवेगळे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशी नावे ठेवली आहेत."

(१२५)

**नीच नीच कह मारहिं, जानत नांहि नदान।**
**सभ का सिरजनहार है, 'रविदास'[१]एकै भगवान॥ ६॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "शुद्रांना नीच समजून लोक त्यांना 'नीच नीच' म्हणत मारतात, अपमान करतात, हे सगळे अज्ञानी आहेत.हे लोक हे समजत नाहीत की, सर्वांचा निर्माता फक्त एकच भगवान आहे.ज्याअर्थी सर्वांचा निर्माता एकच भगवान आहे तर त्यांच्यात ऊंच-नीच हा भेद कसा?"

(१२६)

**'रविदास' जन्म के कारनै, होत न कोउ नीच।**
**नरकूं नीच करि डारि है, ओछे करम कौ कीच॥ ७॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "फक्त जन्मानेच कोणीमनुष्य नीच होत नाही.नीच कर्म केल्यामुळेच मनुष्य नीच होतो.मनुष्य जेव्हा स्वतः नीच काम करुन निंद्य होतो.तेव्हाच तो नीच होतो."

(१२७)

**'रविदास' जाति मत पूछइ, का जात का पात**
**बाह्मनखत्री बैस सूद, सभन की इक जात॥ ८॥**

—रविदास दर्शन

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, “कोणाचीही जात विचारू नका ह्याजातीपाती काहीच नाहीत.ब्राह्मन, क्षत्रिय, वैश्य आणि श्रुद्र हे सर्व एकाच जातीचे आहेत.आणि ती जात म्हणजे—मानव.”

(१२८)

**जात जात में जात है, ज्यों केलनमे पात।**
**‘रविदास’ न मानुष जुड सकें, जौं लौ जात न जात॥ ९॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “ज्याप्रमाणे केळीच्या खुंटावर सालीवर साली असतात, त्याचप्रमाणे एकाच जातीमध्ये अनेक जाती आहेत.जोपर्यंत या जातीपाती संपत नाहीत तो पर्यंत भेदभाव दूर होत नाही.तोपर्यंत मानव-मानव एक होऊ शकत नाही.यासाठी जातीपातीचा रोग दूर करण्यासाठी एकजुटीने मोठ्या प्रमाणात प्रयत्न केला पाहिजे.”

(१२९)

**‘रविदास’ बाह्मन मति पूजिए, जउ होवै गुनहीन।**
**पूजिहिं चरन चंडाल कें, जउ होवै गुन परवीन॥ १०॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “ज्या ब्राह्मणात पांडित्याचे गुण नाहीत, त्या ब्राह्मणाची पूजा करू नका.जर एकादा शूद्र (चांडाळ) गुणाने पंडित असेल तर त्याच्या चरणाची पूजा करा.”

**टीप.**—एक प्रसिद्ध म्हण आहे की—

**गुणाः पुजास्थानं गुणिषु न लिंग च वयः।**

अर्थात, गुणी जनांच्या गुणांची पूजा होत असते.त्यांच्या जातीची किंवा आयुष्याची नाही.

❀❀❀

## **१७.ऊंच आणि नीच कोण?**

(१३०)

**‘रविदास, सुकरमन करन सों नीच ऊंच हो जाय।**
**करइ कुकरम जौ ऊंच भी, तौ महा नीच कहलाय॥ १॥**

—रविदास दर्शन

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, “नीच समजल्या जाणाऱ्या जातीत जन्मलेला कोणीही मनुष्य चांगले पवित्र कार्य (काम) करण्यामुळे ऊंच होतो.तसेच ऊंच समजल्या जाणाऱ्या जातीमध्ये जन्म घेऊन जो मनुष्य वाईट कर्म करतो.तो ऊंच नसून, त्यास महानीच म्हणावा.”

(१३१)

**दया धर्म जिन्ह में नहिं, हिरदै पाप को कीच।**
**‘रविदास’ तिन्हहि जानि हो, महापातकी नीच॥ २॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “ज्या लोकांच्या हृदयात दया धर्म नाही, तर उलट पापांचा चिखल आहे.ते लोक महापापी व नीच आहेत.”

(१३२)

**जिन्ह करि हिरदै सत बसई, पंच दोष बसि नांहि।**
**‘रविदास’ तौ नर ऊंच भये, समुझि लेहु मन मांहि॥ ३॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “ज्याच्या हृदयात सत्याचा निवास आहे व जो काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार या पंचविकारापासून मुक्त आहे.तोच मनुष्य उच्च आणि महापुरुष आहे.ही गोष्ट चांगल्याप्रकारे समजून घेतली पाहिजे.”

(१३३)

**पंच दोष तजि जो रहई, संत चरन लव लीन।**
**‘रविदास’ ते ही नर जानई, ऊंचह अरू कुलीन॥ ४॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “ज्यांनी काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार या पंचविकारांचा सर्वप्रकारे त्याग केला आहे आणि जे नेहमी संताची सेवा करण्यात मग्न असतात.अशा पुरुषांनाच उच्च आणि कुलीन मानले पाहिजे.”

❀❀❀

## १८.ब्राह्मण कोण?

(१३४)

**ऊंचे कुल के कारणै, ब्राह्मन कोय न होय।**
**जउ जानहि ब्रह्म आत्मा, ‘रविदास’ कहि ब्राह्मन सोय॥ १-॥**

—रविदास दर्शन

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, “फक्त उच्च कुळात जन्म घेण्याच्या कारणामुळे कोणी ब्राह्मण म्हणू शकत नाही.तर जो ब्रह्मास जानतो, ज्याने परब्रह्म-परमात्म्यास ओळखले आहे, ज्याने ब्रह्माचा साक्षात्कार करून घेतला आहे तेच ब्राह्मण होत.”

(१३५)

**काम क्रोध मद लोभ तजि, जउ करइ धरम कर कार।**
**सोइ बाह्मन जानीहि, कहि ‘रविदास’ बिचार**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “ज्यांनी काम, क्रोध, अहंकार आणि लोभाचा त्याग केला आहे आणि जे धर्माप्रमाणे कार्य करून आपला जीवन निर्वाह करतात.तसेच ज्यांचे जीवन परोपकारमय असते;अशा व्यक्तींनाच ब्राह्मण म्हणू शकतात.”

(१३६)

**‘रविदास’ जोउ वेत्ता ब्रह्मकर, सोइ ब्राह्मन जान।**
**ब्रह्म न जउ जानिहि, तउ न ब्राह्मन मान॥ ३॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जो ब्रह्माला जानतो त्यालाच बाह्मण मानले पाहिजे.जो ब्रह्मवेत्ता नाही;तो ब्राह्मण नव्हे.”

(१३७)

**धरम करम जाने नही, मन मंह जाति अभिमान।**
**ऐसउ ब्राह्मन सों भलो, ‘रविदास’ स्त्रमक हुं जान॥ ४॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जो ब्राह्मण आपल्या धर्मास ओळखत नाही.धर्माप्रमाणे व्यवहार करीत नाही, तरीसुद्धा जो उच्च जातीबरोबर संबंध असल्याचा मनात अभिमान बाळगतो.त्यास चांगला समजू नका.तर जो श्रमसाधनेत मग्न असतो, जो आपल्या धर्माचे पालन करतो व निराभिमानी जीवन जगतो.त्यास पहिल्यापेक्षा चांगले समजावे.”

❀❀❀

## १९.क्षत्रिय कोण?

(१३८)

**दीन दुखी के हेत जउ, बारै अपने प्रान**

अनुक्रमणिका

**'रविदास' उह नर सूर कौं, सांचा छत्री जान॥ १॥**
—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जो दीन-दुखी लोकांसाठी, त्यांचा त्रास नाहीसा करण्यासाठी आपले प्राणही अर्पण करतो.अशा शूर वीराला खरा क्षत्रिय समाजावे."

(१३९)
**अंग अंग कटवाइहि, जउ दीनत करि हेत।**
**'रविदास' छत्री सोइ जानिए, जौ छाडै नांहि खेत॥ २॥**
—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जो दीन-दुखी लोकांसाठी अंग झाडून काम करतो, शरीर थकले तरी, त्यांची सेवा करतो.अशा समाजसेवकास खरे पाहता क्षत्रिय म्हटले पाहिजे."

❀❀❀

## २०.वैश्य कोण?

(१४०)
**'रविदास' वैस सोइ जानिये, जउ सत्त कार कमाय।**
**पुंन कमाई सदा लहै, लौरे सर्वत्त सुखाय॥ १॥**
—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जो प्रामाणिकपणे आपला व्यापार-धंदा करतो, नेहमी प्रामाणिकपणे कमाई करतो आणि सर्वांच्या सुखाची इच्छा करतो, अशा व्यक्तिस वैश्य जानले पाहिजे."

(१४१)
**सांची हाटी बैठि कर, सौदा सांचा देइ।**
**तकडी तोलै सांच की, 'रविदास' बैस है सोइ॥ २॥**
—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जो मनुष्य खऱ्या दुकानात बसून खरा व्यवहार खऱ्या तराजूत तोलून विकतो.तोच खरा 'वैश्य' आहे."

संत रोहिदासांनीअन्यत्र स्वतःम्हटले आहे की—

**मैं बनिजारो राम कौ, हरिजू कौ टांडो लादे जांव रे।**
**रामनाम धन पायो, त्या तै सहज करौ व्यौहार रे॥**

अनुक्रमणिका

❀❀❀

**२१.शूद्र कोण?**

(१४२)

**'रविदास' जउ अति पवित्त है, सोई सुदूर जान।**
**जउ कुकरमी असूध जन, तिन्ह ही न सुदेर मान॥ १॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जी व्यक्ती फारच पवित्र जीवन जगत आहे.त्यालाच शुद्र अर्थात शुद्ध समजले पाहिजे.ज्याचे कर्म वाईट आहे व जीवनही अशुद्ध व अपवित्र आहे.त्यास 'शुद्र' मानले नाही पाहिजे."

टीप.—या दोह्यात संत रोहिदास 'शुद्र' शब्दाची नवीन व्याख्या करीत आहेत.'शुद्र' शब्दाचा परंपरागत अर्थ 'शोचनीय' मानला जातो (ज्याचे जीवन शोचनीय तो शूद्र) शूद्र शब्द 'शुच' धातूपासून बनतो.ज्याचा अर्थ शोक मानला जातो.परंतु संत रोहिदास 'शुच' चा अर्थ येथे 'पवित्र' करतात.हे त्यांच्या सामाजिक क्रांतिकारी विचाराचे एक अनुपम उदाहरण आहे आणि विशेषतःविचार करण्यासारखे आहे.

(१४३)

**हरिजनना। करि सेवा लागै, मन अहंकार न राखै।**
**'रविदास' सूद सोइ धन है, जउ असत्त वचन न भाखै॥ २॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जो मनुष्य प्राण्यांच्या सेवेत असतो आणि सेवा धर्माचे पालन करीत असता आपल्या मनात अहंकार भाव कधीच उत्पन्न करू देत नाही की, 'मी फार मोठा सेवक आहे.'जो आपल्या तोंडाने कधी खोटे बोलत नाही, तोच शूद्र धन्य होय.तसेच त्याचे जीवन प्रशंसनीय आहे."

**टीप.**—या दोह्यात शूद्राची 'मनुष्यमात्राचा सेवक' या रुपात केलेली व्याख्यासुद्धा नवीन व अत्यंत विचार करण्यासारखी आहे.

❀❀❀

**२२.मंदिर-मशीद एक**

(१४४)

**मंदिर कसजिद दोउ एकं है, इन मंह अंतर नांहि।**
**'रविदास' राम रहमान का, झगडउ कोउ नांहि॥ १॥**

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, “मंदिर आणि मशीद दोन्ही एकच आहेत.यांच्यात काही अंतर नाही.यामध्ये फक्त नावाचाच फरक आहे.यासाठी राम आणि रहिमानमध्ये काही भांडण नाही.ज्याप्रमाणे मंदिर आणि मशीद एकाच ईश्वराची दोन पूजा स्थाने आहेत.त्याप्रमाणे राम आणि रहिमान त्या एका ब्रह्माचीच दोन नावे आहेत.याच्यामध्ये काहीही अंतर नाही.”

(१४५)

**‘रविदास’ हमारो राम जोई, सोई है रहमान।**
**काबा कासी जानीयहि, दोउ एक समान॥ २॥**

संत रोहिदास म्हणतात की, “आमचा राम आणि तुमचा रहिमान दोघे एकच आहेत.जर राम व रहिमान दोन्ही एक आहेत, तर मग काबा आणि काशीसुद्धा एकसमान समजा.”

(१४६)

**मसजिद सों कछु घिन नहीं, मंदिर सों नही पिआर।**
**दोउ मंह अल्लाह राम नहीं, कह ‘रविदास’ चमार॥ ३॥**
—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “मला तर मशिदीबद्दल घृणा नाही आणि मंदिराबद्दलही विशेष प्रेम नाही.कारण मशीदच फक्त खुदाचे एक मात्र घर नाही.तसेच फक्त मंदिरच रामाचे निवास नाही.खुदा आणि राम सर्वव्यापक आहेत.मी त्यांची उपासना कुठेही करू शकतो.”

❁❁❁

## २३.हिंदू-मुसलमान एक

(१४७)

**मुसलमान सों दोसती, हिंदुअन सों कर प्रीत।**
**‘रविदास’ ज्योति सभ राम की, सभ है अपने मीत॥ १॥**
—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “मुसलमान असो अथवा हिंदू असो, सर्वांत एकाच ब्रह्माची ज्योत प्रकाशित होत असते, सर्वात एकच आत्मा आहे.म्हणून सर्वच आमचे मित्र आहेत.ज्याअर्थी सर्वच आमचे मित्र आहेत, तर मग मुसलमान व हिंदू ह्या दोघांबरोबर आम्हांस प्रेम आणि मित्रत्वाचा व्यवहार केला पाहिजे.”

(१४८)

**जब सभ करि दोउ हाथ पग, दोउ नैन दोउ कान।**
**‘रविदास’ पृथक कैसे भये, हिंदू मुसलमान॥ २॥**

अनुक्रमणिका

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जर हिंदू-मुसलमान या दोघांचे सर्व शरीर सारखे आहे.दोन हात, दोन पाय, दोन डोळे, दोन कान तर मग ते दोघे एक दुसऱ्याहून वेगवेगळे कसे?वास्तविक पाहता हे दोघे एकरूप व एकसमान आहेत.”

(१४९)

**‘रविदास’ पेखिया सोध करि, आदमी सभी समान।**
**हिंदू मूसलमान कउ, स्रिष्ठा इक भगवान॥ ३॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “मी चांगल्याप्रकारे शोध करून व पारखून पाहिले आहे की जेवढी माणसे आहेत ती सर्व सारखी आहेत.हिंदू असो वा मुसलमान.या सर्वांचा निर्माता एकच भगवान आहे.यासाठी त्यांच्यात काही भेद नाही.ते सर्व एकसमान आहेत.

(१५०)

**कहन सुनन कूं दुइ करि थापे, खालिक कीन्हो अजब तमासा।**
**हिंदु तुरक दोउ एक है भाई, सत्त भाषै ‘रविदासा’ ॥ ४॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “ही तर सांगण्याऐकण्याची गोष्ट आहे की, सगळे बनले बनविलेले विचार आहेत.जगाचा निर्माता परमात्म्याने हिंदू आणि मुसलमान ह्या वेगवेगळ्या जाती बनविल्या आहेत.हे जग त्या प्रभुची एक अद्भूत लीला आहे.हा एक आश्चर्यकारक खेळ आहे की, जो आमच्या समजण्याच्या बाहेर आहे परंतु खरी गोष्ट तर ही आहे की, हिंदू आणि मुसलमान दोघे एकच आहेत.दोघात काही अंतर-भेद नाही.”

(१५१)

**‘रविदास’ कंगन अरू कनक मंहि, जिमि अंतर कछु नांहि।**
**तैसउ ही अंतर नही, हिंदुअन तुरकन मांहि॥ ५॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “ज्याप्रमाणे सोने आणि सोन्याचे बनविलेले कंगन यामध्ये कांही अंतर नाही.त्याप्रमाणे हिंदू आणि मुसलमान यामध्येसुद्धा कांही भेद नाही.कारण दोघेही समान पाच तत्वांपासून बनले आहेत.यांचा निर्मातासुद्धा एक आहे आणि यांच्यात एकच आत्मा निवास करतो.”

(१५२)

**हिंदु तुरक मंहि नहीं कछु भेदा, सभ मंह एक रत्त अरू मासा।**
**दोउ एकह दूजा कोउ नांही, पेख्यो सोध ‘रविदासा’ ॥ ६॥**

—रविदास दर्शन

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, “हिंदू आणि मुसलमान यांचेमध्ये कांहीसुद्धा अंतर नाही.जसे रक्त आणि मांस हिंदूंचे आहे.तसेच रक्त आणि मांस मुसलमानांचे आहे.दोघेही एकसारख्या रक्त आणि मांसांचे बनलेले आहेत.म्हणून दोघे एकच आहेत.दोघांमध्ये कांही भिन्नता नाही.”

(१५३)

**हिंदू तुरक मंहि नहीं कछु भेदा, हुद आयहु इक द्वार।**
**प्राण पिंड लोहु मांस एकइ, कहि ‘रविदास’ बिचार॥ ७॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “हिंदू आणि मुसलमान यांचेमध्ये काही भेद नाही.दोघांचा जन्म एकाच प्रकारे झाला आहे.दोघांचा आत्मा, दोघांचे शरीर आणि त्या शरिराचे रक्त व मांस सगळे सारखे आहे.”

(१५४)

**‘रविदास’ उपजइ सभ इक नूर तें, ब्राह्मन मुल्ला सेख ।**
**सभ को करता एक है, सभ कूं एक ही पेख॥ ८॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “कोणी ब्राह्मण असो अथवा मौलवी व शेख असो, सर्वजण एकाच ब्रह्माच्या प्रकाशापासून उत्पन्न झाले आहेत.सर्वांना एकाच ईश्वराने निर्माण केले आहे.जर सर्वांचा निर्माता एक आहे, सर्वांमध्ये एकच प्रकाश आहे.सर्वांत एकच ज्योती प्रकाशित होत आहे, तर मग तूं त्यांना भिन्न का पाहतो व समजतो?तुला सर्वांना एकच जानले आणि मानले पाहिजे.”

## २४.खऱ्या शूर वीराची ओळख

(१५५)

**‘रविदास’ सोइ सूरा भला, जउ लरै धरम के हेत।**
**अंग अंग कटि भुइं गिरै, तउ न छांडै खेत॥ १॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जो धर्म रक्षणासाठी लढतो, त्याचे शरिरावर अनेक जखमा होऊन तो रणभूमीवर पडला.परंतु तरीसुद्धा तो वीर मैदान सोडत नाही आणि शेवटपर्यंत लढत राहातो.तोच खरा शूर वीर आहे.”

(१५६)

**धर्म हेत संग्राम मंह, जौ कउ कटाए सीस।**
**सो जिवन सफल भया, ‘रविदास’ मिलंहि जगदीस॥ २॥**

—रविदास दर्शन

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, "जो धर्म रक्षणासाठी लढाईत लढत लढत आपले शिर कापले जाऊन प्राण अर्पण करतो, त्याचेच जीवन सफल होते आणि अशा वीर पुरूषांना ईश्वरप्राप्तिसुद्धा होत असते."

❁❁❁

## २५.प्राण आणि वचन

(१५७)

**बचन गयो नंह आवर्त है, सीस कटा फिर आय।**
**'रविदास' बचन कूं राखिए, सिर जाइहि तउ जाय॥ १॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "एखाद्या वेळी डोके कापले तरी चालेल.कारण कापलेले डोके पुन्हा जोडले जाऊ शकते.परंतु एकदा जे वचन मुखातून निघाले, ते पुन्हा परत येऊ शकत नाही.यासाठी डोके कापले जात असेल तर कापले जावो.परंतु जे वचन एक वेळ दिले आहे.त्याचे पालन अवश्य केले पाहिजे."

(१५८)

**'रविदास' वचन जौ दे दियौ, उह न जाने पाय ।**
**वचन हरै कउ जगत मंहि, कछु न सेस रहाय॥ २॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जे वचन एकवेळ कोणाला दिले तर ते खंबीरपणे पाळले पाहिजे.जो मनुष्य वचन देऊन त्याचे पालन करीत नाही, तो आपले यश, मान सर्व गमावून बसतो.जगात त्याच्याजवळ अभिमान बाळगण्यासारखे काहीच शिल्लक राहात नाही."

❁❁❁

## २६.वासनांचा त्याग

(१५९)

**सत्त संतोष अरू सदाचार, जीवन को आधार।**
**'रविदास' भये नर देवते.जिन तिआगे पंचविकार॥ १॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "नेहमी खरे बोलणे, आयुष्यात उपलब्ध साधनांत संतुष्ट राहाणे आणि सदाचाराचे जीवन जगणे हे सर्व जीवनाचे खरे आधार आहेत.जर जीवनात प्रामाणिकपणा, संतोष आणि सदाचार नेसल तर जीवन बनूच शकत नाही.जो मनुष्य सत्य, संतोष व सदाचाराने वागतो आणि काम, क्रोध,

मोह, व अहंकार ह्या पांच मानसिक विकारांना सोडून देतो.हे पुरुष न राहता देवता बनतात.अशा पुरुषांचे जीवन नेहमी सुखी, समृद्ध व आनंदी होते.”

(१६०)

**जो बस राखे इंद्रियां, सुख दुख समझि समान।**
**सोड अमरित पद पाइगो, कहि ‘रविदास’ बखान॥ २॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जो मनुष्य आपल्या दहा इंद्रियांना ताब्यात ठेवतो व जीतेंद्र राहून जीवन जगतो आणि सुख, दुःखांना समान समजतो.तो मनुष्य मोक्षपद प्राप्त करतो.”

**टीप.**—संत रोहिदासांच्या ह्या दोह्यात गीता (१८, ५१, ५३) च्या या वचनाचे भावच व्यक्त होतात.

**शब्दादीन विषयात त्यक्त्वावा रागद्वेषौ व्युदस्य च॥**
**अहंकारं बलं दर्प कामं क्रोध परिग्रहम्।**
**विमुच्य निर्ममःशांतो ब्रह्म भूयाय कल्पते॥**

अर्थात, विषयांचे आधिन न होता, राग, द्वेष सोडून अहंकार, बळ, घमेंड, काम, क्रोध तसेच पदार्थावरील ममत्वाचा त्याग करून, शांत मनुष्य ब्रह्मरूप होऊन जातो.

(१६१)

**बुद्धि अरू विवेकहिं, जउ राखन चाहौ पास।**
**इंदिरियां संग निरत कौ, तजि देहु ‘रविदास’ ॥ ३॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जर मनुष्य बुद्धिमान आणि विवेकशील बनू इच्छित असेल तर त्याला नेहमी जितेंद्रिय राहिले पाहिजे.इंद्रियांच्या ताब्यात जाऊन, त्यास त्यांचे बरोबर नाचत राहिले नाही पाहिजे.जो मनुष्य इंद्रियांच्या इशाऱ्यावर नाचतो, तो आपली बुद्धी आणि विवेकच गमवीत नाही तर सर्वकाही गमवून बसतो.”

**टीप.**—गीता (२·६१) मध्ये सांगितले गेले आहे की—

**वशे हि यश्येंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।**

अर्थात् ज्या मनुष्याची इंद्रिये त्याच्या ताब्यात आहेत, तीच स्थिरबुद्धी व्यक्ती होय.

(१६२)

**‘रविदास’ इच्छाएं आपुनी, भोगन सेति रख दूर।**

अनुक्रमणिका

**मन बुद्धि रहं हि सांत नित, घट मंहि रहिवै नूर॥ ४॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “मनुष्यास सर्व इच्छा आणि वासना आपल्यापासून दूर ठेविल्या पाहिजेत.आपल्या इंद्रियांना भोगात फसू देता कामा नये.जो मनुष्य भोगावादापासून दूर राहातो.त्याच्या मनात व बुद्धिमध्ये चंचलता येत नाही.तो नेहमी शांतचित्त राहातो.शांतचित्त व स्थीरबुद्धी होण्यामुळे त्याच्या हृदयात ईश्वर निवास करतो.त्याचे हृदय परमेश्वराच्या दिव्य ज्योतीने होऊन जाते.”

**टीप.**—गीता (२·६७·७१) चा आदेश आहे—

**‘इंद्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते।**
**तदस्य हरति प्रज्ञां वायुनविमिवांभसि॥**
**विहाय कामान् यज्ञ सर्वायःपुमान चरति निस्पृहः ।**
**निर्ममो निरहंकारःसःशांतिमधिगच्छति॥**

अर्थात् ज्याप्रमाणे पाण्यामध्ये तरणाऱ्या नौकेस वारा आपल्या इच्छेनुसार नेतो त्याप्रमाणे विषयवासनेस चटावलेली इंद्रिये मनुष्याच्या मनास आपल्या मनामध्ये फसवून ठेवतात.इंद्रियामध्ये फसलेल्या पुरूषांची बुद्धि नष्ट होऊन जाते.जो पुरूष सर्व इच्छांना त्याग करून ममता, अहंकार व कामवासनारहित राहातो तोच शांति प्राप्त करतो.

(१६३)

**कुरमे भांति जउ रहाहिं, मन इंदिरिया ‘रविदास’ ।**
**सांत रहइ नित आतमा, बढहि आतम बिसास॥ ५॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जो मनुष्य आपल्या मनास आणि इंद्रियांना बहिर्मुखी न करता कासवाप्रमाणे संकुचित करूनसंयमित अथवा अंतर्मुखी ठेवतो.त्याचा आत्मा नेहमी शांत राहातो आणि त्याचा आत्मविश्वास कधी कमी होत नाही, तर त्याचा आत्मविश्वास वाढतच राहतो.”

**टीप.**—गीता (२·५८) चा उपदेश आहे—

**यदा संहरते चायं कूमोङगानी य सर्वशः ।**
**इंद्रियाणींद्रिवात्ते भ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता॥**

अर्थात, ज्याप्रमाणे कासव आपल्या शरिरास संकुचित करते त्याप्रमाणे जो पुरुष सर्व बाजुने आपल्या इंद्रियांना संयमित ठेवतो, त्या पुरूषाची बुद्धी स्थिर व शांत होऊ शकते.

***

अनुक्रमणिका

## २७.संतोष आणि त्यागातच सुख

(१६४)

**जो कोउ लौरे परम सुख, तउ राखै मन संतोष।**
**'रविदास' जहाँ संतोष है, तहां न लागै दोष॥ १॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "आपल्या जीवनात परमसुख प्राप्त करावे, अशी इच्छा जो मनुष्य करतो त्यास आपल्या मनात नेहमी संतोष ठेवला पाहिजे.जे काही त्याच्या जवळ आहे त्यातच त्याने संतुष्ट राहिले पाहिजे.जेथे संतोष आहे तेथे दोष टिकू शकत नाही.संतुष्ट व निर्दोषी मनुष्यच परमानंद प्राप्त करतो."

(१६५)

**धन संचय दुख देत है, धन त्यागे सुख होय।**
**'रविदास' सीख गुरूदेव की, धन मति जोरे कोय॥ २॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "दुःखाचे एक मोठे कारण, जास्त धन (पैसा) मिळविणे हे होय.परंतु धन त्यागातच सुख असते.सीख गुरू नानकाचा उपदेश आहे की, 'धन जमवू नका, धन कमवा व जनसेवेत खर्च करा.त्यातच धन कमविण्याची सार्थकता आहे."

(१६६)

**सद्या सुख सत धरम मंहि, धन संचय सुख नांहि।**
**धन संचय दुख खान है, 'रविदास' समुझि मन मंहि॥ ३॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "धन संचय करणे म्हणजे दुःखाची खाण आहे.हे मनुष्याला समजले पाहिजे.खरे सुख धन संग्रह करण्यात नाही तर हे सुख सत्य धर्माचे पालन करण्यात आहे.सत्यधर्माचे सार त्याग करण्यात आहे."

❀❀❀

## २८.सुख-दुःख

(१६७)

**सुख सरिता मंह बुड़ि करि, सुझ बूझ मति खोय।**
**दुख की बदरी पेखि कै, 'रविदास' नंह दीजिये रोय॥ १॥**

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, “सुखाच्या नदीत डुंबून एवढे मस्त होऊ नका की, आपला विवेक (विचार) गमावून बसु नका.तसेच दुःखाचे ढग डोक्यावर फिरत असल्याचे पाहून रडूसुद्धा नका.सुखदुःखाच्या दोन्ही अवस्थेत समभाव राखुन व्यवहार करण्यास शिका.”

**टीप.**—अत्याधिक सुख प्राप्त करून उन्मत्त व संकटे पाहून निरुत्साहित होणाऱ्या मनुष्यास संत रोहिदासांचा प्रस्तुत उपदेश आदर्श वाक्याप्रमाणे उपयुक्त आहे.

(१६८)

**सुख दुख सम करि जानहु, तउ दुखह सुख होय।**
**‘रविदास’ जो सुखंहि दुख कहै, तउ सुख भी दुख होय॥ २॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “सुख व दुःखास एक समान माना, जर तुम्ही सुख-दुःखास समान समजाल तर दुःखसुद्धा सुखात बदलून जाईल.तसेच दुःखातही सुखाचा अनुभव येईल.भगवानाच्या कृपेने जो मनुष्य संतुष्ट होत नाही आणि त्यास तो दुःख समजतो त्याला मिळालेले सुखही दुःखात बदली होईल.सुखास दुःख म्हणणारा मनुष्य आयुष्यात कधीच सुखाचा अनुभव करू शकणार नाही.तो कधीच सुखी होऊ शकणार नाही.”

❀❀❀

## २९.प्रेम लपत नाही

(१६९)

**‘रविदास’ प्रेम नहिं छिप सकई, लाख छिपाए कोय।**
**प्रेम न मुख खोलै कभउं, नैन देत है रोय॥ १॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “प्रेमास कोणी लपविण्याचा लाख प्रयत्न केला, तरी ते लपू शकत नाही.प्रेम तोंडाने कधी बोलत नाही.ते तर मुके असते.प्रेम व्यक्त करण्यास तोंड कधी उघडत नाही.परंतु डोळ्यांचे अश्रु आत लपलेल्या प्रेमास प्रगट करतात.”

❀❀❀

## ३०.कुमार्गावर पाय ठेवू नका

(१७०)

**‘रविदास’ सदाही राखिए, मन मंहि सहज सभाओ।**
**राखो नहीं कुपंथ पग, जौ लौरों सुख चाओ॥ १॥**

अनुक्रमणिका

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जर कोणाच्या मनात सुखाची इच्छा असल्यास, आपले जीवन सुखात घालवायची इच्छा असल्यास, तर त्याने चुकूनदेखील कुमार्गावर आपला पाय ठेवला नाही पाहिजे.त्याला तर नेहमी सन्मार्गानेच चालले पाहिजे व मनास नेहमी सहज-सत्य अवस्थेत (स्थितीमध्ये) ठेवले पाहिजे.

(१७१)

**जो जन दुइ कुमारगी, बइठहि नंहि तिंह पास।**
**जो जन संत सुमारगी, तिन पाय लागो 'रविदास' ॥ २॥**

संत रोहिदास म्हणतात की, “जे लोक दुष्ट, वाईट व कुमार्गी आहेत व त्यामार्गाने चालणारे आहेत, जो धर्माप्रमाणे वागत नाही, त्याचेजवळ बसले नाही पाहिजे, जे लोक सन्मार्गाने चालणारे आहेत, साधु आणि संत आहेत, त्यांच्या तर नेहमी चरणाशी राहिले पाहिजे.त्यांच्या चरणाशी राहिल्याने खरे सुख प्राप्त होईल.”

❊❊❊

## ३१.सुख धाम

(१७२)

**'रविदास' जु है बेगमपुरा, उह पूरन सुख धांम।**
**दुख अंदोह अरू देषभाव, नांहि बसहिं तिहिं ठाम॥ १॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जेथे रोहिदासांच्या प्रभु प्रीतमचा निवास आहे.परमेश्वराच्या त्या वैकुंठधामास 'बेगमपुरा' म्हणतात.ते खरे सुखाचे घर आहे.फक्त तेच एक स्थान आहे की, जेथे कोणतेही दुःख व शोक नाही.जेथे कोणाबद्दल द्वेषभाव ठेवीत नाही.अशाप्रकारे ते 'बेगमपुरा' स्थान आहे.”

**टीप.**—बेगमपुराचे विस्तृत वर्णन संत रोहिदासांनी आपल्या एका अन्य पदात याप्रकारे केले आहे—

**अब मोहि खुब वतन गह पाई।**
**ऊहां खैरि सदा मेरे भाई॥टेक॥**
**बेगमपुरा सहर को नाउं,**
**दूख अंदोह नहीं तिहिं ठाउं।**
**ना तसवीस खिराजु न मालु,**
**खुउफु न खता त तरसु जवालु॥**
**काइमु दाइमु सदा पातिसाही,**
**दोम न सेम एक सो आही।**
**आबादानु सदा मसहूर,**
**ऊहां ग्यानी बसहि मामूर॥**

अनुक्रमणिका

**तिउं तिउं सैल करहि जिउं भावै।**
**महरम महिल न कौ अटकावै॥**
**कहि 'रविदास' खलास चमारा।**
**जो हम सहरी सो मीतु हमारा॥**

(१७३)

**'रविदास' मनुष करि बसन कूं सुख कर हैं दुइ ठांव।**
**इक सुख है स्वराज मंहि, दूसर मरघट गांव॥ २॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जे लोक सुख भोगण्याची इच्छा करतात त्यांना राहाण्यासाठी फक्त दोनच ठिकाणे आहेत.एक स्थान आहे स्वराज्य अथवा मोक्ष आणि दुसरे स्थान आहे स्मशान, ह्या जगातील स्वराज्यात गुलामीच्या दुःखापासून सुटका होते.स्वराज्य मिळाले तर मोक्षप्राप्ती होते.मेल्यानंतर स्मशानात गेले तर जगातील दुःखापासून सुटका होते."

❀❀❀

## ३२.सेवा केल्यास मेवा

(१७४)

**मन मंहि सत्त संतोष रखहु, सभ करि सेवा लाग।**
**सेवा सब कुछ देत है, 'रविदास' सेवंहि मति त्याग॥ १॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "मनात प्रामाणिकपणा व संतोष ठेवून सर्वांची सेवा करीत चला.अशी सेवा केल्यास या जीवनात सर्व काही प्राप्त होते.जो सेवा धर्म नेहमी सुख देणारा आणि जीवन सफल बनविणारा आहे.त्याचा त्याग कधीच केला नाही पाहिजे."

(१७५)

**दीन दुखी करि सेव मंहि, लागि रह्यो 'रविदास' ।**
**निसि बासर की सेव सौं, प्रभु मिलन की आस॥ २॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "रोहिदास तर दिवसरात्र गरीब आणि दुःखी लोकांच्या सेवेत गुंतलेले आहेत.रात्रंदिवस जनसेवा केल्याने त्यांची प्रभुभेटीची आशा नक्की आहे."

(१७६)

**धुआँ तपन मंहि का धरा, धूम तपन ही त्याग।**
**'रविदास मिलि है मोष धाम, सेवा ही तप आग॥ ३॥**

अनुक्रमणिका

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “अरे, धुनीत गुंग होऊन तपस्या करण्यात काय अर्थ आहे?धूर तापल्याने काही लाभ नाही.ही तर फक्त दिखाऊ तपस्या आहे, हिचा त्याग कर, हिच्यामुळे तुला मोक्षाचे परमानंद पद प्राप्त होणार नाही.जर तू गरीब दुःखी लोकांची सेवा केल्यास, सेवा यज्ञाच्या अग्नीत आपल्या शरिरास तापविल्यास, तुला मोक्षाची प्राप्ती होईल.”

❀❀❀

## ३३.उपदेश

(१७७)

**‘रविदास’ रात न सोइये, दिवस न करिये स्वाद।**
**अह निसि हरि जी सुमिरिये, छांडि सकल प्रतिवाद॥ १॥**

संत रोहिदास म्हणतात की, “मनुष्यास रात्र फक्त झोपण्यातच घालवली नाही पाहिजे.तसेच दिवस आपली इंद्रिये भोग्य पदार्थांची रूचि घेण्यातच, आनंदाचा उपभोग करण्यातच खर्च केली नाही पाहिजे.मनुष्यांनी सर्व भांडणे व व्यर्थ कामे सोडून रात्रंदिवस प्रभुचिंतनात घालविली पाहिजेत व हरिस्मरण करीत आपल्या आयुष्याचा सदुपयोग केला पाहिजे.”

**टीप.**—गीता (२ ।६९) चे वचन आहे—

**या निशा सर्व भूतानां तस्यां जगाति संयमी।**
**यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः॥**

अर्थात् सर्व मनुष्यांची जी रात्र आहे, तीमध्ये संत (स्थितप्रज्ञ) जागत असतो.जेथे सर्व लोक जागतात.ती ज्ञानी लोकांसाठी रात्र आहे म्हणजेच जेथे अज्ञानी लोक इंद्रियांची रूचि घेण्यात सुख समजतात तेथे ज्ञानी लोक इंद्रिय निग्रह करण्यात सुख व कल्याण मानतात.

(१७८)

**‘रविदास’ तू कांवच फली, तुझे न छीवै कोय।**
**तै निज नांव न जानियां, भला कहां ते होय॥ २॥**

संत रोहिदास म्हणतात की, “हे मनुष्या, तुझे जीवन कौंचफलीप्रमाणे आहे.ज्याप्रमाणे कौंचफली शिवल्याने शरिरात उष्णता वाढते व शरिरावर फोड येतात.अगदी त्याप्रमाणेच तुझा स्पर्श करण्यामुळे दुसऱ्याचे शरीर व मन दूषित आणि विकारग्रस्त होतात.ज्याप्रमाणे कौंचफलीना शिवणे कोणाला पसंत पडत नाही.त्याचप्रमाणे तुझ्या स्पर्शामुळे लोक तिरस्कार करतात.तू अज्ञान अंधःकारामध्ये भटकत आहेस.तुला हे माहित नाही की, तू शुद्ध-बुद्ध ब्रह्मरूप आहेस.जर तू स्वतःला ओळखत नाहीस आणि आपल्या सत्यस्वरुप परमेश्वरास ओळखत नाहीस तर मग तुझे कल्याण कसे होणार?

अनुक्रमणिका

(१७९)

**अंतर गति रांचै नही, बाहर करै उजास।**
**ते नर जमपुर जाहिंगे, सत भाषै 'रविदास' ॥ ३॥**

संत रोहिदास म्हणतात की, "जी माणसे हृदयापासून प्रभुप्रेम करीत नाही, परंतु बाहेरून प्रभु प्रेमाचे प्रदर्शन करतात, अशी माणसे खात्रीने यमलोकास जातात.त्यांना नरकात पडून अनेक प्रकारचे दुःख व त्रास भोगावा लागेल."

**टीप.**—हाच भावार्थ संत रोहिदासांनी दुसऱ्या एका पदात प्रगट केला आहे.

**बाहर उदिक पखारिये, घट भितरी विविध विकार।**
**सुद्ध कवनपर होइबो, सुच कुंचर विधि ब्यौहार॥**

(१८०)

**सब सुख पावैं जासु तैं, सो हरि जू को दास।**
**कोउ दुख पावैं जासू तें सो न दास 'रविदास' ॥ ४॥**

संत रोहिदास म्हणतात की, "ज्याच्याकडून सर्वांना सुख मिळते, तोच हरिचा भक्त आहे.ज्याच्याकडून कोणाला दुःख मिळत असेल, तो प्रभुभक्त कसा असेल?"

(१८१)

**हरि गुर साध समान चित्त, नित आगम तत मूल।**
**इन बिच अंतर जिन परौं, करवत सहन कबूल॥ ५॥**

संत रोहिदास म्हणतात की, "परमात्मा गुरू आणि संत भक्तामध्ये काही अंतर नाही.या सर्वांना एक समान समजले पाहिजे.हे मूळ तत्व वेदशास्त्रात सांगितले आहे.हे मूळ तत्व व्यवहारात आणताना, धारदार हत्याराने कापतानां जशा यातना होतात, तशा यातना आनंदाने सहन करावयास पाहिजेत."

***

## ३४.हिंसेने प्रभुभेट होत नाही

(१८२)

**'रविदास' जीव कू मारिकर, कैसी मिलंहि खुदाय।**
**पीर पैगंबर औलिया, कोउ न कहइ समुझाय॥ १॥**

—रविदास दर्शन

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, "देवाच्या नावावर प्राण्यांची हिंसा करून, देव कसा भेटेल?आश्चर्य आहे.पीर पैंगबर आणि औलिया (ईश्वर) कोणीसुद्धा ही गोष्ट हिंसा करणाऱ्यास समजावीत नाहीत."

(१८३)

**'रविदास' जउ पोषणह हेत, गउ बकरी नित खाय।**
**पढई नमाजैं रातदिन, तबहुं भिस्त न पाय॥ २॥**

संत रोहिदास म्हणतात की, "जो मुसलमान आपल्या शरीर पोषणासाठी दररोज गाय आणि बकरीचे मांस खातो तो रात्रंदिवस कितीही नमाज (प्रार्थना) पडला तरी, त्याला स्वर्गाची प्राप्ती कधीच होऊ शकणार नाही."

(१८४)

**'रविदास' मूंडह काटि करि, मूरख कहत हलाल।**
**गला कटाबहु आपना, तउ का होईलहाल॥ ३॥**

संत रोहिदास म्हणतात की, "जो मुसलमान खुदाचा कलमा वाचून हळूहळू सुरी चालवून प्राण्यांचा गळा कापतात.त्यास हलाल म्हणतात.त्याप्रमाणे जरा आपला गळा कापून पहा (खुदाचे नाव घेऊन) गळा कापल्याने काय हाल होतात, काय त्रास होतो ते स्वतः पहा."

(१८५)

**'रविदास' जो आपन हेत ही, पर कूं मारन जाई।**
**मालिक के दर जाइ करि, भोग हि कड़ी सजाई॥ ४॥**

संत रोहिदास म्हणतात की, जे आपल्यासाठी दुसऱ्याची हत्या-हिंसा करतात ते (मेल्यानंतर) जेव्हा (आपला मालक) ईश्वराच्या दरवाजावर जातील.तेव्हा त्यांना मोठी कठिण शिक्षा भोगावी लागेल."

(१८६)

**प्रानी बध नहिं कीजियहि, जीवह ब्रह्म समान।**
**"रविदास" पाप नंह छूटइ, करोर गउन करि दान॥ ५॥**

संत रोहिदास म्हणतात की, "प्रत्येक जीव ब्रह्मसमान आहे.म्हणून प्राण्यांचा वध केला नाही पाहिजे.जीव हत्या केल्याने जे पाप होते.ते करोड (कोटी) गाई दान केल्यानेही कमी होणार नाही."

(१८७)

**'रविदास' जिभ्या स्वाद बस, जउ मांस मछरिया खाय।**
**नाहक जीव मारन बदल, आपन सीस कटाय॥ ६॥**

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, “जे लोक फक्त आपल्या जीभेचे चोंचले पूर्ण करण्यासाठी मांस, मासे खातात;ते लोक विनाकारण जीवहत्या करतात.ह्या जीवहत्याच्या बदली त्यांनासुद्धा एक दिवस शिक्षा मिळेल.त्यामध्ये त्यांचे स्वतःचे डोके कापले जाईल.”

(१८८)

**‘रविदास’ जीव मत मारहिं, इक साहिब सभ मांहि।**
**सभ मांहि एकउ आतमा, दूसरंह कोउ नांहिं॥ ७॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, “जीव हत्या करू नकोस.सर्व जीवांमध्ये एकच ब्रह्म वास करीत आहे त्यांच्यामध्ये एकच आत्मा आहे.दोन आत्मे नाहीत.”

❁❁❁

## ३५.मांसाहारी-नरक अधिकारी

(१८९)

**अपनह गीव कटाइहिं, जौ मांस पराया खाय।**
**‘रविदास’ मांस जौ खात हैं, ते नर नरकहिं जांय॥ १॥**

संत रोहिदास म्हणतात की, “जे लोक दुसऱ्यांचे मांस खातात.ते तर अप्रत्यक्ष आपलाच गळा कापून घेतात.एक प्रकारे ते आपल्या स्वतःचाच नाश करून घेतात.जेवढे मांसाहारी लोक आहेत, ते सर्व नरकाचे भागीदार होतील.”

(१९०)

**दया भाव हिरदै नहीं, भखहिं पराया मास।**
**ते नर नरक मंह जाईहिं, सत्त भाषै ‘रविदास’ ॥ २॥**

संत रोहिदास म्हणतात की, “ज्यांच्या हृदयात दया भाव नाही.वास्तविक तेच लोक परक्यांचे मांस खातात.दुसऱ्यांचे मांस खाणारे निसंशय नरकाचे भागीदार होतील.”

(१९१)

**जीवत कूं मुरदा करहिं, अरु खाइहिं मुरदार।**
**मुरदा सम सभ होइहिं, कहि ‘रविदास’ विचार॥ ३॥**

संत रोहिदास म्हणतात की, “जे लोक जिवंत प्राण्यांना मारून हत्या करून त्यांचे मांस खातात, ते स्वतःसुद्धा मुर्दाड खाण्यामुळे मृतासमान होतात, ही समजण्याची गोष्ट आहे की, अशा व्यक्ती मेल्याप्रमाणे जीवन जगतात.”

अनुक्रमणिका

✽✽✽

### ३६.पारतंत्र्य-पाप

(१९२)

**पराधीनता पा है, जान लेहु रे मीत।**
**'रविदास' दास प्राधीन सों, कौन करै है पीत॥ १॥**

संत रोहिदास म्हणतात की, "हे मित्रा, पारतंत्र्य हे फार मोठे पाप आहे.एक मोठा अभिशाप आहे.ही गोष्ट चांगल्या प्रकारे समजून घे.जी व्यक्ती पराधीन आहे, कोणाची तरी गुलाम आहे.त्याच्याबरोबर कोणीसुद्धा प्रेम करीत नाही.त्याचा सर्वजण तिरस्कार-अपमान करतात आणि त्याला ठोकरतात." (म्हणून गुलामी-पारतंत्र्य जीवनाचा त्याग करून, स्वतंत्र राहून जीवन जग).

(१९३)

**पराधीन कौ दीन क्या, पराधीन बेदीन।**
**'रविदास' दास प्राधीन कौ, सबहि समझै हीन॥ २॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "जी व्यक्ती पराधीन आहे, तिला स्वतःलाधर्मचकायआहे?जो गुलाम असेल.त्याला कोणताच धर्म नसतो, गुलाम व्यक्तिस स्वतंत्रपणे वागण्यास काही सोय-सवलत नसते.त्याचे काम तर दुसऱ्यांच्या आज्ञांचे पालन करणेच असते.गुलामांना सर्वजण नीच समजतात आणि सर्वजण त्याचा निरादर-अपमान करतात.(जर त्यास पराधीनता व हीनता यांच्यातून सुटका करून घ्यायची असेल तर स्वाधीनतेचे पुजारी बना आणि सर्वप्रकारे स्वतंत्र राहण्याचा नेहमी प्रयत्न करीत रहा)."

✽✽✽

### ३७.राम-राज्य

(१९४)

**ऐसा चाहौं राज मैं, जहां मिलै सबन कौ अन्न।**
**छोट बड़ो सभ सम बसैं, 'रविदास' रहै प्रसन्न॥ १॥**

—रविदास दर्शन

संत रोहिदास म्हणतात की, "मी तर असे राज्य इच्छितो की, जेथे सर्वांना खाण्यासाठी अन्न मिळू शकेल.जेथे कोणीही रहिवाशी उपाशी राहाणार नाही आणि जेथे छोटे मोठे समजणारे सर्व लोक एकसारखे सुखी जीवन जगू शकतील.सर्वजण सुखात राहतील.सर्वजण सारखेच राहू शकतील.(हेच राम राज्य होय.)"

अनुक्रमणिका

(१९५)

**तसवी फेरो प्रेम की, दिलमे करो तिमाज।**
**फिरो सगल दीदार को, उसी सनमके काज॥ २॥**

—श्री.संत रोहिदास (कामत) ५/१०८

संत रोहिदास म्हणतात की, "प्रेमाची जपमाळ जपावी.मनात नमाज (प्रार्थना) करावा, परमेश्वररूपी प्रियकरास मिळविण्यासाठी सर्व प्रकारे उपयोग करावा."

(१९६)

**रविदास संसा जीव मंह, साषी सौं बिलगाय।**
**जीवन मरन रहस कू, साषी कहै समुझाय॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.बी.पी.शर्मा) १/१३९

संत रोहिदास म्हणतात की, "ह्या जगात माझा जीव सत्यास बिलगलेला आहे, जो सत्यास जाणतो.तो जीवन-मरण जाणतो.हा जीव आणि माया वेगळी नाही, एकच आहेत."

❀❀❀

(१९७)

**साधसंगति पूंजी भइ, हौ बस्त लई निरमोल।**
**सहज बल दिया लादि करि, चल्यौ लहन पिव मोल॥ ३॥**

—वाणी (डॉ.शर्मा) ८/१४०

संत रोहिदास म्हणतात की, "साधु संगती हेच माझे धन आहे.तसेच ते अनमोल आहे.असे अनमोल वस्त्र घालून मी ईश्वरास भेटण्यास जात आहे."

(१९८)

**जैसा रंग सैबल करि, है तैसा यहु संसार।**
**हौं रंग रंगौ राम मंह, भणै रविदास विचार॥ ४॥**

—वाणी (डॉ.शर्मा) ९/१४०

संत रोहिदास म्हणतात की, "पाण्यात जसा रंग मिसळवा, तसा पाण्याचा रंग बनतो.त्याप्रमाणे ह्या संसार (प्रपंच) रुपी जगाचे आहे.राम भक्तिमध्ये तुम्ही जसे रंगाल त्याप्रमाणे प्रभुचे विचार येतील."

(१९९)

**भौसागर रा तारना कूं, एकौ नाम अधार।**
**रविदास कभउं नंहि छांडिये, राम नाम पतवार॥ ५॥**

—वाणी (डॉ.शर्मा) १०/१४०.

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, “संसार रुपी समुद्र पार पाडण्यास प्रभुनामच एक आधार आहे.म्हणून राम नाम कधीही सोडू नये.”

(२००)

**सुमिरन कोटि अघन को, है समन रविदास।**
**ज्यूं हि अघ निरमूलिये, परम जोत परगास॥ ६॥**

—वाणी (डॉ.शर्मा) ११/१४०.

संत रोहिदास म्हणतात की, “राम स्मरण केल्याने करोडो पापांचे क्षालन होऊन, पुण्य पदरी पडते.अशाप्रकारे पाप नाहीसे झाल्याने आपली पुण्याई प्रकाशाप्रमाणे आत्मशक्ति वाढते.”

(२०१)

**राम नाम जिह तन रम्यौ, सोइ तनु आपु उजास।**
**अन्त छार है जाइहि, वेगि चेतु रविदास॥ ७॥**

—वाणी (डॉ.शर्मा) १२/१४०.

संत रोहिदास म्हणतात की, “ज्याच्या शरीरात रामनाम रमले, रंगले आहे, ते शरीर आपोआप प्रकाशमान कीर्तिवान होते.”

(२०२)

**रामानंद मोहि गुरु मित्यौ, पाया ब्रह्म बिसास।**
**राम नाम अमीरस पियौ, रविदास हि भयौ षलास॥ ८॥**

—वाणी (डॉ.शर्मा) १३/१४०.

संत रोहिदास म्हणतात की, “स्वामी रामानंद मला गुरु मिळाले व मी ब्रह्माचा विश्वास प्राप्त केला.मी रामनाम रुपी अमृत प्यालो.त्यामुळे मला मोक्षप्राप्ती मिळाल्याचे सुख लाभले.”

(२०३)

**गुरू ग्यांन दीपक दिया, बाती दई जलाय।**
**रविदास हरि भगति कारनै, जनम मरन विलमाय॥ ९॥**

—वणी (डॉ.शर्मा) १४/१४०.

संत रोहिदास म्हणतात की, “गुरू ज्ञान हाच ज्ञानदीप आहे.त्या ज्ञानदीपाच्या वाती जळत राहातात.मला रोहिदासास हरिभक्तिच्या कारणामुळे जीवन मरणाच्या फेऱ्यातून मुक्ती मिळाली आहे.”

(२०४)

**अंधला जौ पाइहि, तौ सिष भयौ निरंध।**
**रविदास गुरू ग्यान चाषुविना, किमी मिठइ भ्रम फंद॥ १०॥**

अनुक्रमणिका

वाणी (डॉ.शर्मा) १५/१४०.

संत रोहिदास म्हणतात की, “गुरूचे माहात्म्य फार मोठे आहे.गुरू ज्ञान नसल्यामुळे कोणीही शिष्य नेहमी भ्रमात राहतो.अर्थात त्याच्या मनात नेहमीच अज्ञानरूपी अंधकार असतो.ज्यास चांगला गुरू मिळतो, त्याचे अज्ञान, मायारूपी जंजाळाचा फास नाहीसा होतो.”

(२०५)

**माइआ दीपकु पेषि करि, नर पतंग अंधियाय।**
**रविदास गुरू रा म्यांन विनु, विरला कौन बचि जाय॥ ११॥**

—वाणी (डॉ.शर्मा) १६/१४०.

संत रोहिदास चांभार म्हणतात की, “मायारूपी पतंग दिव्यावर झेप घेऊन जळून जातो.त्याप्रमाणे जो ईश्वर भक्तिमध्ये लीन होतो, तो स्वतःस विसरून जातो.हे ज्ञान एखादी व्यक्तिच जाणते.”

(२०६)

**निहचल आनन्द निध मिलि, विलगौ आधि अपार।**
**रविदास राम सुमिरण सार सौं, पायो दरस मुरार॥ १२॥**

—वाणी (डॉ.शर्मा) १७/१४०.

संत रोहिदास म्हणतात की, “रामभक्ती केल्याने निर्मळ आनंदाची साक्ष मिळते.तो आनंद आदि अपार असतो.राम स्मरणाने प्रभू रामकृष्णाचे जणू काय दर्शन घडते.”

(२०७)

**पलु पलु छिनु छिनु सिमरिये, जौ लौरे हरि दुआर।**
**हरि भजनु विन सिव नहीं, भणै रविदास चमार॥ १३॥**

—वाणी (डॉ.शर्मा) १८/१४०.

संत रोहिदास म्हणतात की, “जो हरिभक्त क्षणोक्षणी पळापळास हरिस्मरण करीत असतो.हरि भजनाशिवाय शिवशंकराचे दर्शन लाभत नाही.”

(२०८)

**भौ सागर दुतर अति, किधुं मूरिष यहु जान।**
**रविदास गुरू पतवार है, नाम नाव करि जान॥ १४॥**

—वाणी (डॉ.शर्मा) १९/१४०.

संत रोहिदास म्हणतात की, “संसारूपी सागर तरण्यास फार कठीण आहे.हे मूर्ख लोक कधी जाणणार?म्हणून गुरूच्या मार्गदर्शनासाठी नामस्मरणरूपी होडीच पाहिजे.हे जाणून घे.जे गुरू माहात्म्य व रामनाम माहात्म्य जाणतात.ते लोक ह्या प्रपंचातून यशस्वीपणे तरले जातात.”

अनुक्रमणिका

(२०९)

**सोइ तन कंचन जानइ, जिह तन नाम परगास।**
**रविदास राम च्यंतामणी, चहुं दिस ओज उजास॥ १५॥**

—वाणी (डॉ.शर्मा) २१/१४१.

संत रोहिदास म्हणतात की, “ज्याच्यामध्ये रामनामाचा निवास आहे, त्याचे शरीर सोन्याप्रमाणे कांतिमान होते.त्याच्या दिव्य प्रकाशामुळे सर्व चिंताचा नाश होतो.”

(२१०)

**निस दिन हरि जु सिमरिये, त्यागि जगत करि धंद।**
**रविदास संत सहेलडा, विचरित है निरदंद॥ १६॥**

—वाणी (डॉ.शर्मा) २२/१४०.

संत रोहिदास म्हणतात की, “रात्रंदिवस हरिचे स्मरण केल्याने, त्या धुंदिमध्ये आपण जगाला विसरून जातो.संत सहवासात विचारपूस केल्याने ईश्वर भेटल्याचा आनंद होतो.”

(२११)

**लोहा पारस मणी, हिरन किरन दमकाय।**
**रविदास राम पारस मणि, उहु दरस मंह बौराय॥ १७॥**

—वाणी (डॉ.शर्मा) २३/१४१.

संत रोहिदास म्हणतात की, “भगवानाचे दर्शन घडल्यावर त्याबद्दल गर्व करता कामा नये, रामनामरूपी परिसास स्पर्श केल्यानेही गर्व केला नाही पाहिजे.”

(२१२)

**समाधि थिति संत जन, अपनहु अप्प मिटांहि।**
**जिमि गंग समुंद मिलि, रविदास समुंदहि पिलाहि॥ १८॥**

—वाणी (डॉ.शर्मा) २४/१४१.

संत रोहिदास म्हणतात की, “ज्याप्रमाणे गंगा नदी समुद्रास मिळाल्याने स्वतःस धन्य समजते, त्याप्रमाणे योगी, संतजन परमात्म्यामध्ये एकाकार (एक) होतात, तेव्हा ते स्वतःस धन्य समजतात.”

(२१३)

**अन भावत नियरा बसै, मन भावतां परदेस।**
**अन देषै उन दरस विन, है दुष बढत घनेस॥ १९॥**

—वाणी (डॉ.शर्मा) २५/१४१.

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, “जो माझ्याजवळ आहे, तो मला आवडत नाही, तसेच मी जोपर्यंत त्यास पाहू शकत नाही तो पर्यंत माझे दुःख वाढत राहाते.”

(२१४)

**ज्युं सुधि आवत पीव की, विरह उठन तन आगि।**
**ज्यूं चूनेकी कांकरी, ज्यौ छिरके त्यौं आगि॥ २०॥**

—वाणी (डॉ.शर्मा) २६/१४१.

संत रोहिदास म्हणतात की, “भट्टीतील चुन्यावर पाण्याचा छिडका मारताच ज्याप्रमाणे त्या चुन्याची आग भडकते, त्याप्रमाणे जे प्रभुदर्शनाच्या आशेने येतात, त्यांच्या शरीराची प्रभु विरहाने आग आग होते.”

(२१५)

**जिह नित देषन चाहि हौं, तें नैनन ते दूरि।**
**रविदास कहि अनभावते, रहहिं निकट भर पूरि॥ २१॥**

—वाणी (डॉ.शर्मा) २७/१४१.

संत रोहिदास म्हणतात की, “जो नेहमी आपल्या दृष्टिपथात पाहिजे, तो प्रभू डोळ्याइतकाच दूर असतो.संत रोहिदास अनुभवाने सांगतात की, तो प्रभू आपल्या जवळ असतो.”

(२१६)

**काम धेनी पारस पोलि, केलप रूष रा वाड़ि।**
**रविदास हरि रा भगती विन, ग्रिह तैं भलि उजाड़ि॥ २२॥**

—वाणी (डॉ.शर्मा) २८/१४१.

संत रोहिदास म्हणतात की, “जेथे परमेश्वर भक्ती आहे.ते घर संपन्न होय.तेथे कामधेनू व कल्पवृक्ष आहे म्हणावयास हरकत नाही.परंतु जेथे भगवद् भक्ती नाही, ते घर ओसाड असल्याप्रमाणे समजावे.तेथे माया जंजाळ आहे असे मानावे.”

(२१७)

**तुहि मुहि हमु एक हैं, तुझ लौ मोहि दौर।**
**रविदास पंषी जिहाज कौ, नहिं आनत कोड ठौर॥ २३॥**

—वाणी (डॉ.शर्मा) २९/१४१.

संत रोहिदास म्हणतात की, “हे प्रभू, तू आणि मी आपण दोघे एकच आहोत.माझी तुझ्यापर्यंत धाव आहे.पक्षी जहाजरुपी घरट्यापासून दूर जात नाही, त्याप्रमाणे मी तुला सोडून दूर जाऊ शकत नाही, कारण तुला सोडल्यास मला कुठेही थारा मिळणार नाही.”

(२१८)

**रविदास पीतम इक तुहि, तुमरे मिंत अनेक।**

अनुक्रमणिका

**ससि कौ कमोद हैं बहु, कुमोद कौ ससि एक॥ २४॥**

—वाणी (डॉ.शर्मा) ३०/१४१.

संत रोहिदास म्हणतात की, “तुम्हास प्रीतम (प्रीयकर) एक आहे.परंतु मित्र अनेक असतात.चंद्रास चांदण्या पुष्कळ असतात.पण त्या सर्व चांदण्यांना चंद्र एकच असतो.त्याप्रमाणे आत्माराम एकच आहे.परंतु प्राणी-जीव जंतू अनेक अनेक आहेत.”

(२१९)

**कोटि कलप जीवन अलप, विच हरि भगति विलास।**
**हरि सिमरण सफल जनम, दुह फल लहि रविदास॥ २५॥**

—वाणी (डॉ.शर्मा) ३१/१४१.

संत रोहिदास म्हणतात की, “हे जग कोटि कल्प आहे.तर त्या मानाने आपले जीवन अल्पसे आहे.तरीदेखील मानव हरिभक्ती न करता विलासामध्ये जीवन जगत असतो.हरिस्मरण केल्याने जीवन सफल होत असते.नाही तर हे जीवन निष्फल होणार आहे.”

(२२०)

**आनंद मूरत मिंत की, रहइ सदा चित्त पूरी।**
**नैनन ही समूहे रहत, रविदास नियरे का दूरि॥ २६॥**

—वाणी (डॉ.शर्मा) ३२/१४१.

संत रोहिदास म्हणतात की, “ज्याचे चित्त-मन नेहमी प्रभुमध्ये लीन राहाते, ते परम आनंद प्राप्त करतो.मग परमात्मा दूर असो की जवळ असो.”

(२२१)

**कोइल तरसै अंब कूं, चातिग तरसत नीर।**
**रविदास लौचै दरस कूं, प्राण परत नहिं धीर॥ २७॥**

—वाणी (डॉ.शर्मा) ३३/१४२.

संत रोहिदास म्हणतात की, “आम्रवृक्ष नसल्यास कोकिळ पक्षी त्रासतो.तर चातक पक्षी पावसाच्या पाण्यावाचून तडफडत असतो.हा रोहिदास लोचनांनी हरिदर्शन घेण्यासाठी तळमळतो.कारण प्राण गेल्यास तो परत येणार नाही व हरिदर्शन घडणार नाही.”

(२२२)

**ससि चकोर सूरज कंवल, चात्रिग धन की रीति।**
**रविदास इवि मुहि राषिओ, हित चित पूरण परीती॥ २८॥**

—वाणी (डॉ.शर्मा) ३४/१४२.

अनुक्रमणिका

संत रोहिदास म्हणतात की, “ज्याप्रमाणे चंद्र-चकोर, सूर्य-कमळ व चातक-ढग यांचे ज्याप्रमाणे संबंध आहेत, त्याप्रमाणे ईश्वराशी संबंध जडल्यास मी स्वतःस धन्य समजेन.”

(२२३)

**चलत हलत बैठत उठत, धरि हुं तुमरो ध्यांन।**
**रविदास तू मुहि मन बसइ, चरण कंवल की आंन॥ २९॥**

—वाणी (डॉ.शर्मा) ३५/१४२.

संत रोहिदास म्हणतात की, “हे प्रभू, मी तुझे ध्यान चालता, हलता, बसता, उठता करीत असतो.मी तुझ्या पायाजवळ आलो आहे.तू माझ्या मनात निवास कर.”

(२२४)

**मूरिष मुष कमान है, कटुक वचन भये तीर।**
**सांचरी मारे कांन मंहि, साले सगल सरीर॥ ३०॥**

—वाणी (डॉ.शर्मा) ३६/१४२.

संत रोहिदास म्हणतात की, “मुर्खाचे मुर्खपण हेच धनुष्य आहे व त्याचे कडवट शब्द हाच बाण आहे.मूर्ख लोक शहाण्या माणसावर शाब्दिक प्रहार करून, त्याच्या हृदयास दुःख देतात.”

(२२५)

**रविदास मूरिष समुझइ नहिं, उचरे विना विचार।**
**हने पराइ आतमा, जीभ लियां तरवार॥ ३१॥**

—वाणी (डॉ.शर्मा) ३७/१४२.

संत रोहिदास म्हणतात की, “विचार व्यक्त केल्याशिवाय मुर्खास समजावता येत नाही.आपली जीभ तरवारीप्रमाणे आहे.परंतु तिने दुसऱ्याचा आत्मा जिंकता येत नाही.मूर्ख लोक विचार करून बोलत नाहीत.ते दुसऱ्याच्या आत्म्यास त्रास देतात.”

(२२६)

**राम प्रेम हौं बरजि किमि, अब बरजत नहिं काज।**
**रोम राम अमी रमि गयौ, ताहि न होत इलाज॥ ३२॥**

—वाणी (डॉ.शर्मा) ३८/१४२.

संत रोहिदास म्हणतात की, “मी पूर्वी रामप्रेम वर्ज केले होते.परंतु मी आता त्यास सोडू शकत नाही, कारण राम आता माझ्या रोमरोमात रमला आहे.”

(२२७)

**नाम मूल है ग्यांन कौ, नाम मुत्ति कौ द्वार।**

अनुक्रमणिका

**जा हिरदै हरि बसे, परहिं न जग वौपार॥ ३३॥**

—वाणी (डॉ.शर्मा) ३९/१४२.

संत रोहिदास म्हणतात की, “नाम हेच ज्ञानाचे मूळ व मोक्षाचा दरवाजा आहे.ज्याच्या हृदयात (नाम अभ्यासाने) हरिचे-परमात्म्याचे प्रकट निवास होते, तो पुन्हा कधीच प्रपंचरूपी जाळ्यात पडत नाही.”

(२२८)

**इहु जग दुख की खेतरी, इहु जानत सब कोय।**
**ग्यांनी काटहि हरि नाम सों, मुरिष काटहिं रोय॥ ३४॥**

—वाणी (डॉ.शर्मा) ४०/१४२.

संत रोहिदास म्हणतात की, “हे जग दुःखाचे आगर आहे.हे सर्व काही जाणतात परंतु ज्ञानी माणसं हरिनाम घेत जीवन जगतात.तर मूर्ख माणसं रडत रखडत कसेंतरी जीवन जगतात.”

(२२९)

**कटुक वचन नहि बोलिए, सब घट हरि कौ बास।**
**इहु ग्यांन कौ दवार है, कहै रविदास विचार॥ ३५॥**

—वाणी (डॉ.शर्मा) ४१/१४२.

संत रोहिदास म्हणतात की, “कोणास वाईट वाटेल असे कडवट कोणी बोलू नये.कारण सर्व वस्तु प्राण्यांमध्ये हरिचा निवास असतो, हा विचारच ज्ञान प्राप्तिचा दरवाजा आहे.”

(२३०)

**रविदास तनु पियरौ पातरा, भरत न लागइ वार।**
**जरा मीचु ज्यौं आवई, जात न लागहि वार॥ ३६॥**

—वाणी (डॉ.शर्मा) २०/१४१.

संत रोहिदास म्हणतात की, “हे प्रभू, तू आवडत्या भक्तास त्वरित प्रेम देतोस.उशीर लावीत नाहीस.तसेच तुझे ध्यान लावण्यास भक्ताने डोळे बंद करताच, त्याचे प्रेम तुला मिळते.त्यासही उशीर लागत नाही.”

❀❀❀

अनुक्रमणिका

## (ब) संत रोहिदासपदे

### १. मानवी जीवनाचा उद्देश्य

### (अ) परमात्मा-प्राप्तीः

मानवी जीवन हे परमेश्वराची एक दुर्लभ देणगी आहे.[काशिनाथ उपाध्याय.'गुरु रविदास' प्र.सं.१९८३ पृ.६५.]अनेक पूर्व जन्मांच्या पुण्याईमुळे ही प्राप्त होते.परमेश्वरास भेटण्याची ही एकमात्र संधी आहे आणि परमेश्वराचा साक्षात्कार करणे हाच मनुष्य जीवनाचा मूळ उद्देश्य आहे.

हे मानवी जीवन थोड्या अवधीसाठी प्राप्त होते आणि हे अत्यंत क्षणभंगूर आहे.परंतु परमात्म्यास भेटण्याचे कार्य अत्यंत आवश्यक व कठिण आहे.म्हणून आपणांस मानवी आयुष्याच्या ह्या अल्पकाळाचा आणि शक्तिचा अपव्यय निरर्थक कामात केला नाही पाहिजे.तसेच आपल्या जीवनाचा मूळ उद्देश्य परमात्म्याच्या प्राप्तिमध्ये थोडीही ढिलाई केली नाही पाहिजे.

यासंबंधी ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, गुरुकृपेशिवाय आणि त्यांच्या सहकार्याशिवाय परमात्म्यास कोणी भेटू शकत नाही.कारण गुरु हा मनुष्यरुपी परमात्मा असतो आणि तो आपणांस मदत करण्यासाठी जगात येतो.म्हणून आपणांस गुरुपुढे समर्पित केले पाहिजे.व त्यांच्या कृपेने परमात्म्यामध्ये लीन होण्याचा भरपूर प्रयत्न केला पाहिजे.याप्रमाणे जर आम्ही आपल्या जीवनास गुरु व परमेश्वरास समर्पित करु, सत्कर्म करू लागलो तर आपले मानवी जीवन सार्थक होईल.परंतु याविरूध्द आम्ही आपले जीवन जगातील तुच्छ विषयवासनामध्ये घालविले तर आपले हे अमूल्य मानवी जीवन फुकट जाईल.

जगाचा मानपान, धनदौलत आणि विषय वासनेची तहान यांस परमेश्वराच्या प्रेमभक्तिमध्ये स्थान नाही.ते या दृष्टिने तुच्छ आणि व्यर्थ आहे.मानवी जीवनात परमेश्वराच्या प्रेमभक्तिचे एकमात्र महत्व आहे.

### (१) राग सूही चौपदा

**दुखियारी**[अरे दुःखी]**दुखियारा**[दुःखी]**जग मंह, मन जप लै राम पियारा रे॥ ध्रु॥**
**गढ़ कांचा**[कच्चा]**तस्कर**[चोर]**तिह लागा, तूं काहे न जाग अभागा रे।**
**नैन उधारि न पेषियो**[पाहाणे.]**तुझ मानुष जनम किह लेखा रे॥**
**पांउ पसार किमि सोई पर् यौ, तै जनम अकारथ खोया रे।**
**जन रविदास राम नित भेंट हि, रहि संजम जागति पहारा रे॥ १॥**

संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) पद क्र.१७०.

**भावार्थः**—हे माझ्या दुःखी मना, दुःखाने भरलेल्या या जगात तू राम नामाचा जप कर.

शरिराच्या या कच्च्या किल्ल्यामध्ये काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार यांचे चोर लागले आहेत.हे अभाग्या, तू जागत कां नाहीस?हे मनुष्यजीवन तुला कशासाठी मिळाले आहे, हे तू डोळे उघडून पाहात का नाहीस?

अनुक्रमणिका

तू पाय पसरून कां झोपून राहिलास?तू आपले आयुष्य फुकट घालवीत आहेस.रोहिदास म्हणतात की, “जर तू जागलास आणि दक्षतेने संयमपूर्वक आयुष्य खर्च केले तर, तुझी नेहमीसाठी राम भेट होईल.”

### (२) राग सोरठी

**दुर्लभ जनमु पुन फल पाइओ, बिरथा जात अबिबेके।**
**राजे इंद्र समसरि**[समान]**ग्रिह**[घर, महाल]**आसन**[गादी]**,बिनु हरि भगति कहहु किह लेखे॥ १॥**
**न बिचारिओ राजा राम को रसु, जिह रस अनरस**[अन्य रस]**बिसरि जांहि॥ २॥रहाउ॥**
**जानि अजान भए**[समजून उमजून]**हम बावर**[वेडा]**सोच असोच**[अयोग्य विषयाच्या विचारात]**दिवस जाही॥**
**इंद्रि सबल निबल बिबेक, बुधि परमारथ परवेस**[प्रवेश]**नही॥ ३॥**
**कहीअत आन अचरीअत आन कछु, समझ न परै अपर**[भिन्न]**माइआ**[माया]**।**
**कहि ‘रविदास’ उदास दास मति, परिहरि कोपु करहु जीअ दइआ**[दया करणे.]**॥ ४॥**
—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) १२६.

**भावार्थः**—मागील जन्मातील पुण्याईचे फळ म्हणून हे दुर्लभ मानव जीवन प्राप्त झाले.परंतु अविवेक व अज्ञानामुळे हे आयुष्य फुकट जात आहे.

जर आम्हास राजा इंद्राप्रमाणे महाल व गादी मिळाल्यास परमात्म्याच्या भक्तिशिवाय ती कोणत्या कामास येऊ शकते?

आम्ही आपल्या प्रभु रामचंद्राच्या रसात डुंबलो नाही, जो रस प्याल्यावर अन्य रसांची आठवणसुध्दा होत नाही तर आम्ही जरूर वेडे आहोत.

आम्ही समजुन उमजून अज्ञानी बनलो आहोत आणि अशा वस्तुच्या (विषयाच्या) विचारात पडलो आहे की, ज्याचा विचारच केला नाही पाहिजे.आमची इंद्रिये बलवान झाली आहेत.आणि विवेक शक्ती कमी पडली आहे.जिच्यामुळे आमच्या बुध्दिमध्ये परमार्थी भावाचा प्रवेश होत नाही.

आम्ही सांगतो एक आणि करतो दुसरेच काही.आम्ही हे समजत नाही की, माया आमच्याहून भिन्न आहे.म्हणजे आपणांस मायेत गुरुफटले नाही पाहिजे.

रोहिदास म्हणतात की, “हे प्रभु, आपल्या या दासाच्या बुध्दिमध्ये उदासी पसरली आहे.तरी नाराजी सोडून आता ह्या जीवावर दया कर.”

### (३) राग केदारो

**घट अवघट**[त्या पलिकडे जाण्याची मनाची वाट]**डूंगर**[उंच-नीच]**घणा**[कठिन]**,इकु निरगुण**[गुणरहित]**बैलु हमार।**

अनुक्रमणिका

**रमईए सिउ**[परमेश्वरास]**इक बेनती, मेरी पूंजी राखु मुरारि॥ १॥**
**को बनजारो**[व्यापारी]**राम को, मेरा टांडा**[धंद्याचा माल]**लादिआ जाइ रे॥ रहाउ॥**
**हउ बनजारो राम को, सहज**[सोपा]**करउं व्यापारु।**
**मैं राम नाम धन लादिआ, विखू**[विषयवासनारूपी]**लादी संसारि॥ २॥**
**उरवार पार के दानीआ**[देवदूत]**,लिखि लेहु आल पतालु**[वरूनखालपर्यंत (आरंभापासून शेवटापर्यंत).]**।**
**मोहि जम डंडु न लागई, तजीले सरब जंजाल॥ ३॥**
**जैसा रंगु कसुंभ का, तैसा इहु संसारू।**
**मेरे रमईए रंगु मजीठ का, कहु रविदास चमार॥ ४॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) ९६.

**भावार्थः**—परमात्म्यास भेटण्याची आंतरिक वाट मोठी ऊंचनीच व कठिण अडचणीने भरलेली आहे.माझा जीवनरुपी बैल (ज्याच्यावर रामाचा व्यापार-धंदा घेउन जाण्याचा आहे.) अगदीच निर्गुणी आहे.परमेश्वरास माझी हीच एक विनंती आहे की. "हे परमेश्वरा, माझी पूंजी कशी तरी वाचव.

माझ्याबरोबर चालू शकेल असा कोणी रामाचा व्यापारी आहे का?

मी परमात्म्याशी एकरूप होण्याचा धंदा करतो.जेव्हा जगातील लोक विषय वासनेचा धंदा लादतात.तेव्हा मी रामनामाचे धन लादतो.

जगाचा व परलोकाचा लेख लिहिणाऱ्यांनो!तुम्हास येथे व तेथे जो लेख लिहावयाचा तो लिहा.परंतु मला यमराजाचा दंड लागू शकत नाही.कारण मी संसारिक कर्मातून मुक्त झालो आहे.

ह्या जगाचा रंग कुसुंभाप्रमाणे फिक्का असतो.परंतु रोहिदासांचे सांगणे आहे की, 'माझ्या परमेश्वराचा रंग मजिठाप्रमाणे पक्का असतो.तो रंग कधीच फिक्का पडत नाही.'

(४)

**ताकौ जनम अकारथ**[व्यर्थ]**कहिए॥ टेक॥**
**विषयन रतु**[रत, लीन आसक्त]**संसा**[संशय]**भ्रमु**[संशय]**अटक्यौ भंवर**[भुंगा]**फंद मुहुं रहिए।**
**जग मंह रहहु कंवल**[कमल]**जल जइसे गुर चरनां चित्त रहिए॥ १॥**
**आसनु छांडि द्रिढु**[दृढ]**आसन बैइठि, राम नांव लिव**[नम्र]**लइए।**
**पुजा भजनु कीरतन सब कछु, दसधा**[अवर्णनीय]**हु महि समइए॥ २॥**
**नेत नेत**[प्रशंसा]**जिहिं वेद वषानहिं, रामरुव**[रूप.]**तेहि कहिए।**
**कहि रविदास जड व्यापहि घट घटु, तिहि कांई विसरिए॥ ३॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) १६५.

**भावार्थः**—जर आमचे जीवन विषय वासनेत आसक्त राहिले आणि भुंग्याप्रमाणे (जो भुंगा कमळाच्या सुवासास भुलून तो सूर्यास्ताचेवेळी कमळाच्या पाकळ्या मिटल्यावर आत अडकतो.) आडकून राहिल्यास त्या

अनुक्रमणिका

जीवनाला व्यर्थच म्हटले पाहिजे.जगात आम्हांला कमळाप्रमाणे (कमळाची पाने पाण्यात राहूनही त्यास पाण्याचा स्पर्श होत नाही.) अनासक्त भावाने राहिले पाहिजे.

श्रीमंती आसन सोडून दृढ आसन लावून भजनास बसले पाहिजे व परमेश्वराचे नाव (अनाहद शब्द) घेण्यास नम्र राहिले पाहिजे.आम्ही सर्व पूजापाठ आणि भजन कीर्तनास राहून नऊ दरवाजे रिकामे करून दहाव्या दरवाजात (तिसरा तीळ किंवा शिव-नेत्र) प्रवेश केला पाहिजे.

वेद ज्यांना अनंत म्हणून प्रशंसा करतात, त्यांना रामाचे अस्सल रुप म्हटले पाहिजे.रोहिदास विचारात की, 'घटघटात रमलेल्या अशा रामाला आम्ही कां विसरतो'?

**(५) राग रामकली, चउपदा**

**ध्रिगु**[धिक्कार]**ध्रिगु जीवणु**[जीवन]**राजे राम विना॥ टेक॥**
**देहि**[शरिराला]**नैन बिनु**[शिवाय]**,चंद रैन**[रात्र]**विनु, ज्यूं मीनां**[मासा]**गहरू जले विना।**
**हसती**[हत्ती]**सुंडविनु पंषी पंष विनु, जइसोइ**[ज्याप्रमाणे]**मन्दिर दीप विना॥ १॥**
**जइसे बाह्मन वेद विहुंणा**[शिवाय]**,तैसोइ**[त्याप्रमाणे]**प्राणी तुझ नाम विना।**
**वेसवा कूं सुत काकौ**[कोणाचा]**कहिए, तैसोइ भगत जन राम विना॥ २॥**
**मंत्र सुरति**[आत्म्याची एकाग्रता]**विनु, नारी कंत**[पती]**विनु, जइंसोई धरती इन्द्र विना।**
**ज्यूं व्रिछा**[वृक्ष.]**फलहि विहूणां, त्यों प्राणी तूझ प्रेम विना॥ ३॥**
**काम क्रोध हंकार निवारउ, त्रिस्ना त्याग हु संत जना।**
**कहि रविदास भइ सीतल काया, ज्यो हौ लागौ गुरु चरना॥ ४॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) १७२.

**भावार्थः**—परमप्रभू परमात्म्याशिवाय ह्या जिवनाचा धिक्कार आहे.ज्याप्रमाणे डोळ्याशिवाय जिवंत शरिराची स्थिती होते, रात्रीशिवाय चंद्राची, खोल पाण्याशिवाय माशांची, सोंडेशिवाय हत्तीची, पंखाशिवाय पक्षाची, दिव्याशिवाय मंदिराची स्थिती होते.

वेद जाणण्याशिवाय ब्राह्मणाची स्थिती होते.त्याप्रमाणे प्रभुनामाशिवाय ह्या जिवाची स्थिती होते.वेश्येचा मुलगा कोणाला पिता म्हणेल?भगवानाशिवाय भक्ताची अनाथाप्रमाणे स्थिती होते.

ज्याप्रमाणे ध्यानपूर्वक जपाशिवाय मंत्र निष्फळ आहे.पतिशिवाय पत्निचे जीवन निष्फळ आहे.इंद्राच्या वृष्टिशिवाय पृथ्वी निष्फळ आहे.फळाशिवाय वृक्ष निष्फळ आहे.त्याप्रमाणे परमात्म्याच्या प्रेमाशिवाय मनुष्याचे जीवन निष्फळ आहे.

हे संत जनांनो, काम, क्रोध व अहंकारास आवर घालून आशारूपी तृष्णेचा त्याग करा व गुरुचरणास शरण जा.रोहिदास म्हणतात की, "जेव्हापासून मी गुरुचरणास लागलो तेव्हा पासून माझ्या शरिरास शीतलता प्राप्त झाली."

**मानव-जीवनाची क्षण-भंगुरता**

अनुक्रमणिका

आमचे जीवन मृत्युकडे वेगाने जात आहे.शरीर आणि इंद्रियांची शक्ती क्रमाक्रमाने क्षीण होत जात आहे आणि प्रत्येक क्षणी जीवन मृत्युमुखात अधिकाधिक खेचले जात आहे.आम्ही ज्यांना आपले मानले आहेत असे सर्व मित्र, सगेसोयरे लवकरच कायमचे निरोप घेणार आहेत.आपल्या जीवनाची चंचलता आणि क्षणभंगुरता यांचे ज्ञान आम्हांस नाही आणि आपल्या महान कर्तव्याबद्दल आम्ही उदासिन होत आहे.जगाचा दिखाऊ तात्पुरता मान-पान पाहून आम्ही इतके आनंदीत होतो की, त्या आनंदाने आपले जीवन गफलतीमध्ये घालवून बसतो.आम्ही आतासुद्धा आपले डोळे उघडणे अत्यावश्यक आहे.

जर आम्ही लवकरच कोणा पूर्ण संतास शरण गेलो नाही आणि परमेश्वराच्या प्रेमभक्तित आपले जीवन अर्पण केले नाही, तर शेवटी आम्हांस कष्ट भोगावे लागतील.संकटाच्यावेळी पुन्हा कोणी आमच्या उपयोगी पडणार नाही आणि शेवटी दुःख करण्यानेही काही फायदा होणार नाही.

### (६) राग कान्हडो

**जनम अमोल अकारथ**[विनाकारण, व्यर्थ]**जात रे।**
**सुमरण करौ कभउं नहि हरि कौ, ज्यौ लौ नहि छरत**[छळत]**गात रे॥टके॥**
**ऐ सबु**[सर्व]**संगी दिवस च्यार**[चार]**के, धन दारा**[स्त्री]**सुत**[पुत्र]**पित**[पिता]**मात**[माता]**रे।**
**विछुरे**[ताटातूट]**मिलन बहुरी नह है हो, ज्यौं तरवर**[वृक्ष]**छिन**[तुटणे]**पात रे॥१॥**
**तो कैसे हरि नाम लहुगे**[घ्याल]**गर अटकै कफ-सित बात**[वात]**रे।**
**काल कराल**[भयंकर]**भ्रमत फंदक**[फसविणारा]**ज्यू**[शिकारी]**,करत अचानौ**[अचानक]**घात रे॥ २॥**
**चेते नहि अलपु**[अल्प]**मति मुरखि, छांडि अम्रित विषु खात रे।**
**कहि"रविदास" आस**[आशा]**तज**[त्यांग]**औरे**[अन्य.]**,स्त्री गोपालह रंग राच रै॥ ३॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) पद क्र.६७

**भावार्थः**—तुमचे हे अमुल्य जीवन व्यर्थ जात आहे.आपले शरीर अशक्त होइपर्यंत तुम्ही कधीच परमेश्वराचे स्मरण केले नाही.

धन, स्त्री, पुत्र, पिता आणि माता हे सर्व फक्त चार दिवसांचे सोबती आहेत.ज्याप्रमाणे झाडाचे तुटलेले पान पुन्हा झाडास जोडले जात नाही त्याचप्रमाणे एकदा ताटातूट झाल्यावर ह्या सर्वांची भेट होण्याची शक्यता नाही.

जर परमेश्वराचे नाव घेण्यात तुम्ही उशीर केला तर पुन्हा शेंवटी जेव्हा तुम्हास कफ, पित व वाताचा प्रकोप झाला तर तुम्ही परमेश्वराचे नाव कसे घ्याल?काळ भयंकर विकराळ आहे.शिकाऱ्याप्रमाणे तो फिरत असतो आणि अचानक प्रहार करून बसतो.

तू मूर्ख असल्यामुळे सावध होत नाही.नामरुपी अमृत सोडून विषय वासनारुपी विष खात आहेस.

रोहिदास म्हणतात की, "इतर सर्वांची आशा सोडून परमेश्वराच्या नामस्मरणात रंगून जा."

### (७) राग सोरठि

अनुक्रमणिका

**रे मन!चेत मीचु[मृत्यु]दिन आया, तौ जग जाल न भया पराया॥टेक॥**
**कानि सुनै न नजरि[डोळे]दीसै[पाहाणे]जीहा[जीभ]थिरु[स्थिर]न रहाई।**
**मूण्ड[डोके]रु तन थर थर कम्पई, अंतहु बिरिया[समय]पहुंतौ आई॥ १॥**
**केसौ[केस]सेतह[शुभ्र]पिंकु[पिवळे]भये सबु, तन मनु बल बिलमाया[अशक्त]।**
**मध्यांन गयौ तुरा[चोथा]चलि आई, अजहू[ह्या]जग रह्यौ भरमाया[भ्रमात]॥ २॥**
**पाणी[ओज तेज]गयो पलु छीजै[क्षीण होणे]काया, यहु तन जरा[म्हातारपण]जराना।**
**पांचौ थाके जरा[ज्याप्रमाणे]जरू सानै, तौ रामह मरमु[मर्म]न जाना॥ ३॥**
**हंस पखेरु[पाखरू]चंचलु भाई, समुझि पेषि[पाहणे]मन मांहि।**
**प्रति पलु मीचु गरासै[ग्रस्त]देही, फुनि[पुन्हा पुन्हा.]रैदास चेतहु नांहि॥ ४॥**
—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) पद क्र.७४.

**भावार्थः**—अरे मना, हुशार रहा.मृत्यूची वेळ येऊन ठेपली.तू अजूनसुद्धा जग रुपी जाळ्यास समजत नाहीस.

आता तुला कानाने ऐकू येत नाही. डोळ्याने दिसत नाही व जिभेने ठीक बोलता येत नाही. तुझे डोके व शरीर थरथर कांपत आहे. तेव्हा शेवटची वेळ येऊन ठेपली आहे.

तुझे सर्व केस पांढरे पिवळे झाले आहेत.तसेच शरीर व मनाची शक्तीजात आहे.तुझी प्रौढावस्था जात आहे.व चोथ्यासारखे म्हातारपण आले आहे.

तुझे शरीर घडोघडी क्षीण होत चालले आहे.म्हातारपणाने ह्या शरिरास जर्जर केले आहे.पांच इंद्रिये थकली आहेत.तरीसुद्धा तू परमेश्वराच्या रहस्याची माहिती मिळवली नाहीस.

अरे बंधु, हा आत्मारुपी हंसपक्षी लवकरच उडून जाणार आहे.मृत्यु प्रत्येक क्षणास शरीरग्रस्त करीत आहे.

रोहिदास म्हणतात की, “तू सावध होत नाहीस.”

### (८) रीग सोरठा

**जल की भीती[भिंत]पवन का थंभा[खांब],रकत बूंद का गारा[गिलावा]।**
**हाड मांस[मांस]नाडी कौ पिंजरू[पिंजरा],पंखी बसै बिचारा॥ १॥रहाउ॥**
**प्रानी किआ मेरा किआ तेरा, ‘जैसे तरवर पंखी[पाखरू]बसेरा।**
**राखहु कंध एसारहु[खोदणे]नीवां, साडे तीनि हाथ तेरी सीवां[सीमा]॥ २॥**
**ब्रकै बाल पाग[पगडी, फेटा]सिर ढेरी[वाकडी]इहु तनु होइगो भसम की ढेरी[ढीग]।**
**उंचे मंदर[महाल.]सुंदर नारी, राम नाम बिनु बाजी हारी॥ ३॥**
**मेरी जाति कमीनी पांति कमीनी, ओछां जनमु हमारा**
**तुम सरनागति राजा राम चंद, कहि ‘रविदास’ चमारा॥ ४॥**
—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) पद क्र.१२२

अनुक्रमणिका

**भावार्थः**—पाण्याची भिंत, हवेचा खांब, रक्त आणि वीर्याचा गिलावा याप्रमाणे हाड.मांस व नाड्याच्या शरीर रुपी पिंजऱ्यात आत्मारुपी पांखरु निवास करते.(पंचतत्वाने बनलेल्या शरीररुपी पिंजऱ्यात आत्मा कैदी)

हे जीवा, ह्या जगात काय आमचे आणि काय तुमचे?ज्याप्रमाणे पक्षी रात्री कोणत्या तरी झाडावर वस्ती करतात, त्याप्रमाणे आम्ही काही वेळासाठी ह्या जगात एकत्र आलो आहो.आम्ही महाल बांधण्यासाठी पाया खोदतो आणि ऊंच भिंती उभ्या करतो.परंतु शेवटी आपल्या शरिरास साडेतीन हातच लागतात.(प्रेत पुरण्यास साडेतीन हात लांबीचा खड्डा लागतो.)

आम्ही ऐटीने केसाचा भांग पाडतो व डोक्यास तिरपा फेटा (पागोटे) बांधतो.परंतु शेवटी हे शरीर जळून राखेचा ढीग बनतो.आम्ही उत्तम महाल सुंदर पत्नीसह राहिलो तरी परमेश्वराच्या नामस्मरणाशिवाय आमचे आयुष्य व्यर्थ आहे.

रोहिदास म्हणतात की, "माझी जातपात नीच व मी हलकया कुळात जन्म घेतला.परंतु मी प्रभुची शरणांगती प्रप्त करुन घेतली अर्थात मी आपले जीवन सफल करुन घेतले.

### (९) राग सूही

**जौ दिन आवहि सौ दिन जांही, करना कूचु**[जाणे]**रहनु थिरु**[स्थिर]**नांही।**
**संग चलत है हमभी चलना, दूरी गवनु**[जाणे]**सिर उपरि मरना।**
**किआ तू सोइआ जागु इआना**[अज्ञानी, मूर्ख]**,तै जीवनु जगि सचु करि जाना॥ १॥रहाउ॥**
**जिनी जीउ दीआ सु रिजकु**[रोजगार]**अंबारावै**[पूर्ण करणे]**,सभ घट भीतंरि हाटु**[बाजार]**चलावै।**
**करि बंदगी छांडि मैं मेरा, हिरदै**[हृदय]**नामु सम्हारि सवेरा॥ २॥**
**जनमु सिरानौ पंथु न संवारा, सांझ परी दहं दिस अंधियारा।**
**कह 'रविदास' निदानि**[निधन]**दिवाने, चेतसि नांही दुनिआ फन खाने**[नष्ट होणारी जागा.]**॥ ३॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) पद क्र.७९

**भावार्थः**—जे दिवस येतात ते निघून जातात.ह्या जगातून सर्वांना एक दिवस जावयाचे आहे.नेहमीसाठी येथे कोणीच राहणार नाही.आमचे सोबती जात आहेत व आम्हासही जावयाचे आहे.आमची परमार्थी यात्रा बरीच दूरची आहे.मृत्यु डोक्यावर घिरट्या घालत आहे.अशा परिस्थितीमध्ये तू मूर्खासारखा झोपून कां राहिलास?जागा हो, तू ह्या जीवनालाच (जगाला) सत्य समजतोस काय?

ज्या परमेश्वराने यतुला जीवन दिले, तो तुझ्या जगण्याचीही व्यवस्था करतो.सगळ्यामध्ये असलेल्या परमात्म्याने आपणास आवश्यक अशा साहित्यांचा बाजार मांडला आहे.त्या परमेश्वराची भक्ती कर.व"हा मी आहे, हे माझे आहे." अशा प्रकारचा अभिमान सोडून दे.लवकरात लवकर परमेश्वराचे नाम घे

तुझे आयुष्य संपत चालले आहे.तू अजून परमेश्वर भक्तिमार्गावर आला नाहीस.आयुष्याची संध्याकाळ येताच दाही दिशा अंधकारमय होतात.

अनुक्रमणिका

रोहिदास म्हणतात की, “हे वेड्या, हे जग अखेर नाश पावणारे आहे.तू चैनत्यशील का होत नाहीस?

### (१०) राग सूही

**ऊंचे मंदर[महाल]साल[उत्तम]रसाई[स्वयंपाक घर],एक घरी फुनि[पुन्हा]रहतु न होई॥**
**इह तनु ऐसा जैसे घास की टाटी,**
**जलि गइओ घासु रलि[मिळणे],गइओ माटी[माती] ।१॥रहाउ॥**
**भाई बंध कुटुंब सहेरा[सोबती],ओइ भी लाग काढु सवेरा॥ २॥**
**घर की नारि उरहि[छाती.]तन लागी, उह तउ भूतभूतु करि भागी॥ ३॥**
**कहि ‘रविदास’ सभै जगु लूटिआ, हम तउ एक राम कहि छूछिआ॥ ४॥**
—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) पद क्र.१२३.

**भावार्थ**—जरी आमचा बंगला चांगला व स्वयंपाक घर उत्तम असले तरी, त्यामध्ये मृत्यु आम्हास एक पळभरसुद्धा अधिक राहु देत नाही.हे शरीर वाळलेल्या गवताप्रमाणे जळून मातीत मिळते.भाऊबंद, कुटुंबातील सर्व आणि मित्रसुद्धा त्वरित निरोप देतात.

एवढेच नव्हें तर आपले शरीर छातीला लावून बसणारी पत्नीसुद्धा प्रेतास ‘भूत भूत’ म्हणून पळून जाते.

रोहिदास म्हणतात की, “काळाने या सर्व जगास लुटले आहे.परंतु मी प्रभु नामाचे स्मरण करुन, काळाच्या पंजातून सुटलो आहे.”

### (११) राग जंगली गौडी

**पहलै पहरै रैणि[रात्र]दै बणिजारिया[व्यापारी],तै जनम लीया संसार बे।**
**सेवा चूकौ राम की बणिजारिया, तेरी बालकबुधि गंवार[मूर्ख, अज्ञान]बे॥ टेक॥**
**बालक बुधी गंवार न चेत्यो, भुला माया जाल बे।**
**कहा होई पीछै पछितायै, जल पहली न बांधी पाल बे॥**
**बीस बरस का भया अयांना[मूर्ख, अजान],थंभि[धांवणे]न सक्या पाल बे।**
**जन ‘रविदास’ कहै बणिजारिया, तै जनम लीया संसार बे॥ १॥**
**दूजै पहरै रैणि दै बणिजारिया, तू निरषत[पाहणे]चाल्या[मजा]छांह[छाया, सावली]बे।**
**हरि न दामोदर घ्याइया बणिजारिया, तै लेइ न सक्या[शकणे]नांव बे॥**
**नांव न लीया औगुन कीया, इस जोबन के तांण[तरंग, जोर.]बे।**
**अपनी पराई गिनि न काई, मंदे करम कमांण बे।**
**साहिब लेषा लेसी, तूं भरि देसी, भीर परै तुझ तांह बे।**
**जन ‘रविदास’ कहै बणिजारिया, तूं निरषन चाल्या छांह बे॥ २॥**
**तीजे पहरै रैणि बणिजारिया, तेरे ढिलरै परै पिरांन बे।**

**काया रु वानी का करै बाणिजारिया, घट भितरि बसै कुजांण बे॥**
**ऐक बसै कुजाण काया गढ़ भीतरी, पहला जनम गंवाय बे।**
**अबकी बेर**[बार, वेळ]**न सुक्रित**[सत्कर्म]**कीयो, बहुरि न यह गढ**[शरीर]**पाय बे॥**
**कंपी देह काया गढ़ छीना, फिरि लागा पछितांण बे।**
**जन 'रविदास' कहै बाणिजारिया, तेरे ढिलरै परै पिरान बे॥ ३॥**
**चौथे पहरै रैणि दै बणिजारिया, तेरी कंपन लागी देह बे।**
**साहिब लेखा मांगिया बणिजारिया, तूं छांडि पुराणी थेह बे॥**
**छांडि पुरानी जिद**[प्रेत]**अयाना, बालदि लादि**[बैल]**सबेरियां बे।**
**जम कै आयै बाँधि चलाये, बारी पूगी**[पूर्णपणे]**तेरियां बे।**
**पंथि चलै अकेला होय दुहेला**[दुःखी, कठीण.]**,का स्यौ करै सनेह बे।**
**जन 'रविदास' कहे बणिजारिया, तेरी कंपन लागी देह बे॥ ४॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) पद क्र.३१

**भावार्थः**— (ह्या अज्ञानमय जीवनाच्या चार अवस्था—१.बालावस्था २.युवावस्था ३.प्रौढावस्था ४ वृद्धावस्था यांची तुलना रात्रीच्या चार प्रहराबरोबर केली आहे.आणि मनुष्याची तुलना व्यापाऱ्याशी केली आहे.

हे व्यापाऱ्या, रात्रीच्या पहिल्या प्रहरी (बालावस्था) तू ह्या जगात जन्म घेतलास.तुझी बालपणी बुद्धी अज्ञान म्हणून प्रभुसेवा केली नाहीस.

तू पहिल्याने आपल्या जीवन होडीस पाल बांधली नाहीस.नंतर पश्चाताप करून काय होणार?जेव्हा तू वीस वर्षाचा झालास, तेव्हा तू आपल्या वाढत्या जवानीचा जोर सांभाळू शकला नाहीस.रोहिदास म्हणतात की, "अरे मनुष्यरुपी व्यापाऱ्या, तू अशाप्रकारे जगात जन्म धारण केलास."

हे व्यापाऱ्या, रात्रीच्या दुसऱ्या प्रहरात (युवावस्थामध्ये) तू जीवनात वाढणाऱ्या उष्णते (अडचणी) पासून वाचण्यासाठी छाया शोधू लागला.पण तू प्रभुनाम घेतले नाहीस.आपला कोण आणि परका कोण याचा विचार न करता वाईट कर्मे केलीस.यमराज जेव्हा तुझ्या कर्माचा झाडा घेईल तेव्हा तू तेथे भयंकर संकटात पडशील.रोहिदास म्हणतात की, "हे व्यापाऱ्या, संसारिक छाया (मजामौज) घेण्याचा हा परिणाम."

हे व्यापाऱ्या, रात्रीच्या तिसऱ्या प्रहरी (प्रौढावस्था) तुझी प्राणशक्ति ढिली पडू लागली.मनातील वाईट विचारामुळे व बोलण्याने काय होणार?यामुळेच तू पूर्वीसुद्धा एक मनुष्य जीवन गमावले होते.तू जर यावेळी सत्कर्म केले नाहीस तर हा शरीररुपी किल्ला प्राप्त होणार नाही.शरीर कांपणे सुरु होईल व शेवटी शरीररुपी किल्ला ढासळून जाईल.रोहिदास इशारा देतात की, "प्राणशक्ति ढिली पडल्यावर अशीच स्थिति होते."

हे व्यापाऱ्या, रात्रीच्या चौथ्या प्रहरी (वृद्धावस्था) तुझे शरीर कापू लागले.झाडा घेण्यासाठी यमराजाने परत बोलावले तर तुला हे जुने शरीर (प्रेत) सोडून जावे लागणार, अरे अज्ञानी,तुला आपल्या कर्माचा व्यापार बैलावर लादून निघावयाचे आहे.आता तुला फार कष्ट होत आहेत.तेथे तुला कोणी सोबत देणार नाही.रोहिदास म्हणतात की, "हे व्यापाऱ्या, या अवस्थेचा विचार करता शरीर कापत राहते."

अनुक्रमणिका

(१२)

**बीती आउ**[आयुष्य]**भजनु नहीं किन्हा**[केले]**॥ टेक॥**
**सेत**[श्वेत, शुभ्र]**भ्राउ**[झाले]**तन थर थर कंपहि, हरि सिमरनु**[स्मरण]**नही किन्हा।**
**सत संगत नहि गुर पद सेओ**[सेवा]**प्रभ**[प्रभू]**कीरती नहि गाई।**
**नहिं मनु**[मन]**रमयो प्रभ चरनन महि, तन स्यों परीत**[उलट]**द्रिढाई॥**
**कह रविदास चलन की बिरिया**[समय]**कोउ न होऊ सहाई**[सहाय्य.]**॥ १॥**

—संत गुरु रविदास, वाणि (डॉ.शर्मा) पद क्र.१४९

**भावार्थः**—तुझे आयुष्य संपले आणि तू अजून भजन केले नाहीस.

तुझे केस पांढरे शुभ्र झाले.शरीर थरथर कापत आहे.तू आतापर्यंत हरि स्मरण केले नाहीस.तू सत्संग केला नाही.तू गुरु चरणाची सेवा केली नाहीस.किंवा प्रभुचे गुणगान केले नाहीस.तुझे मन प्रभुचरणी लीन झाले नाही.उलट तुझे प्रेम शरिरावर आहे.

रोहिदास म्हणतात की, "मरतेवेळी तुला कोणीही सहाय्य करणार नाही."

### प्रापंचिक माया-जाल

हा संसार-प्रपंच एक स्वप्न आहे.एक भ्रम आहे.ह्या स्वपनात अथवा भ्रमात पडलेल्या व्यक्तिस कळत नाही, की ज्या शरिरास आम्ही इतके संभाळतो.त्याचेवर प्रेम करतो.हा केवळ पांच तत्वांचा बनलेला शरीररुपी पिंजरा आहे.ह्या पिंजऱ्यांत आत्मरुपी पक्षी कैद आहे.जेव्हा आत्मा ह्या शरिरास सोडून जातो, तेव्हा हे रक्त, मांस, मज्ञा आणि हाडांचा सापळा (पिंजरा) मातीत मिळून जातो.

अज्ञानरूपी अंधारात पडलेला मनुष्य भ्रमास खरे मानतो.विहिरीतील बेडकास त्याला दिसणाऱ्या भ्रमिष्ट संकुचित जगाशिवाय दुसरे काही सुचत नाही.शेवटी अशा मनुष्यास ह्या जगातून रिकामे हात हलवीत जावे लागते.

परमेश्वराची कृपा झाल्यास मनुष्य सदगुरूस शरण जातो व त्यांचे आज्ञेनुसार प्रेम आणि भक्ति बरोबर नामाची कमाई करतो.मायेच्या कठिण जाळ्यातून मोकळे होण्याचा एकमात्र हाच मार्ग आहे.

(१३)

**माधौ, का कहीऐ भ्रम ऐसा, तुम कहीयत होहु न जैसा॥ टेक॥**
**त्रिपति**[राजा]**ऐक सेज सुख सूता**[झोपलेला]**,सुपिनै भया**[झाला]**भिखारी।**
**अच्छित राज बहोत दुख पायौ, सौ**[त्याप्रमाणे]**गति भाई हमारी॥ १॥**
**जब हम हुते तब तुम नाही, अब तुम हो हम नांही।**
**सलिता**[नदी]**गवन कीऔ महोदधि**[समुद्र]**,जल केवल जल मांही॥ २॥**
**रजु**[रस्सी, दोरी]**भुवंग**[सर्प]**रजानी**[रात्र]**परगासा, अस कछु मरम जनावा।**

अनुक्रमणिका

**समझि परी मोहिं कनक**[सोने]**अलंक्रित**[रत्नजडित]**ज्यूं, अब कुछ कहत न आवा॥ ३॥**
**करता ऐक भाई जग भुगता**[भरलेला]**,सब घटि सब विधि सोई।**
**कहै 'रविदास' भगति इक उपजी**[उत्पन्न होणे.]**,सहजै होई सू होई॥ ४॥**
—संत गुरु रविदास, वाणी (डॉ शर्मा) पद क्र.६९

**भावार्थः**—हे प्रभू, ह्या जगाचा असा भ्रम आहे की, काही सांगून जमत नाही.जगासंबंधी जसे सांगितले जाते, तसे हे नाही.

ज्याप्रमाणे कोणी राजा सुखाने झोपला असता स्वप्नात भिखारी बनतो व तो राजा असून सुद्धा दुःखी बनतो.याप्रमाणेच आमची स्थिती आहे.

जोपर्यंत आमची अहंकार वृत्ती आहे, तोपर्यंत देव भेटत नाही.व देव भेटल्यास आमची अहंकार वृत्ती (ही नदी समुद्रात विलीन होऊन एकमात्र होते.त्याप्रमाणे) विलीन होते.

रात्री दोरांना पाहून सापाचा भ्रम होतो.त्याप्रमाणे भ्रमवश दुःखी जग आम्हांस रत्नजडित सोन्याप्रमाणे भासते.

हे सर्व सांगून बनत नाही.वास्तविक पाहता जगाचा कर्ता एक आहे.तोच एक परमात्मा सर्व प्रकारे सर्वात भरलेला आहे.रोहिदास म्हणतात की, "भक्ति निर्माण झाल्यावर सर्व काही सहज पूर्ण होते."

(१४)

**किही मन टेढ़ो जात॥ टेक॥**
**जाकूं पेषि**[पाहून]**बहु गरिवानो, हाड मांसु कौ गात।**
**थूक लार**[लाळ]**विस्टा कौ बेढौ**[टोपली]**,अन्त छांर**[राख]**हे जात॥ १॥**
**राम नाम इक छिनू न सूमरियौ विषियन सू बहु घात।**
**ज्यूं खग पेषि दरपन मंह तन कूं, बेरि बेरि**[वरचेवर]**चूंभियात**[चोच मारणे]**॥ २॥**
**अजहूं चेति गहु**[गुरू]**सिष**[शिष्य]**मूरिख, जनम आकारथ जात ।**
**जल थल**[पृथ्वी]**बाउ**[वायु]**अगन**[अग्नी]**कौ पुत्तरा, छिन**[क्षणभरात]**मेहि होहि भसमात॥ ३॥**
**कोटि जतन करि जोगि तपि हारै, निहचय हंसा उडि जात।**
**कहि 'रविदास' राम भजि वाव रे**[अज्ञान.]**,वय वीते पछितात॥ ४॥**
—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) पद क्र.१४८

**भावार्थः**—काय हे मन उलटया ढंगाने चालते.

जे पाहून हे मन इतके आकडते.शरीर केवळ हाडामासांचे बनलेले आहे.हे शरीर थुंकी, लाळ आणि विष्ठेने भरलेल्या टोपलीप्रमाणे आहे.ते शेवटी जळून राख बनते.

हे मन प्रभुनामाचे स्मरण क्षणभरही करीत नाही.तर ते प्रापंचिक विषयामागे धावते.ज्याप्रमाणे पक्षी आरशामध्ये स्वतःस दुसरा पक्षी समजून एकसारखा चोंची मारतो, त्याप्रमाणे मनसुद्धा या मायेच्या जगास खरे समजून एकसारखे झुंजत राहते व नुकसान करून घेते.

अरे मूर्ख मना, अजून शुद्धीवर ये, तुझा मनुष्यजन्म फुकट जात आहे.तुझे शरीर हे पृथ्वी, पाणी, वायु आणि अग्नि यांचा पुतळा आहे.तो एका क्षणात जळून राख होतो.

योगी आणि तपस्वी कोटी उपाय करून हारले आहेत.हा आत्मारुपी हंस एका दिवशी निश्चित उडून जाणार आहे.

रोहिदास म्हणतात की, “अरे वेड्या, तू रामनामाचे भजन कर.नाही तर आयुष्य संपल्यावर तुला दुःख करावे लागेल.”

### (१५) राग आसा

**माटी को पुतरा कैसे नचतु है।**
**देखै देखै सुने बोले दऊरिउ**[धावत]**फिरतु है॥ टेक॥**
**जब कछु पावै तब गरबु**[गर्व]**करतु है। माइआ गई तव रोवनु लगतु है॥ १॥**
**मन बच**[वचन]**क्रमरस**[कर्म]**कसहि लुभाना**[आसक्त होणे]**। विनसि, गइआ जाइ कहूं समाना॥**
**२॥**
**कहि ‘रविदास’ बाजी**[जादू]**जगु**[जग]**भाई। बाजीगर**[जादूगार]**सउं मोहि**[माझी.]**प्रीती बनिआई॥**
**३॥**

—श्री आदि ग्रंथ, पृ.४८७, वाणी पद क्र.१२१

**भावार्थः**—हा मनुष्यरुपी मातीचा पुतळा कशाप्रकारे जगाचया अनेक कार्यक्रमांत नाचत फिरत आहे.बघा तरी खरे, हा कशाप्रकारे बघतो ऐकतो आणि धांवत फिरत आहे.

जेव्हा यास कोणतीही वस्तु मिळते, तेव्हा तो अभिमान करतो आणि ती आवडती वस्तु जाते, तेव्हा तो रडू लागतो.

प्रापंचिक विषय वासना रुपी रसात, लोभात पडून हा त्यामध्ये मन, वचन व कर्माचे आसक्त होतो.आणि मेल्यानंतर कोणत्यातरी योनीत जन्म घेतो.अशाप्रकारे हा नेहमी येण्याजाण्याच्या (जन्ममृत्यूच्या) चक्रात गुरफटलेला असतो.

रोहिदास म्हणतात की, “हे जग ही एक जादू आहे.परंतु माझी प्रीती ही जादू बनविणाऱ्या जादूगारावर अर्थात परमेश्वरावर जडली आहे.(त्यामुळे मी ह्या संसाररुपी चक्रातून सुटका करून घेतली आहे.)

### (१६) गउडी पूरवी रविदास जीउ

अनुक्रमणिका

**कूपु[विहीर]भरिओ[पडलेल्या]जैसा दादिरा[बेडूक],कछु देसु[देश]विदेसु न बूझ।**
**ऐसे मेरा मनु[मन]बिखिआ[विषय, विषासमान]बिमोहिआ[मोहात],कछु आरा पारू[आरपार]न सूझ।**
**सगल[सर्व]भवन[विश्व, जग]के नाइका[नायक, मालक],इकु[एक]छिनु[क्षण]दरसू[दर्शन.]दिखाइ जी॥ १॥रहाउ॥**
**मलिन भई मति माधवा, तेरो गति लखी न जाई।**
**करहु कृपा प्रभु चूकई मै, सुमति देहु समझाई**
**जोगीसर पावहि नही, तुअ गुण कथनु अपार।**
**प्रेम भगति के कारणै, कहु रविदास चमार॥ ३॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ शर्मा) पद क्र.१२४

**भावार्थः**—ज्याप्रमाणे विहिरीत पडलेल्या बेडकास विहिरीशिवाय कोणत्याही बाहेरच्या जगाचे ज्ञान होत नाही.त्याप्रमाणे विषय वासनेच्या मोहात पडलेल्या मला ह्या जगाचे ज्ञान नाही किंवा दुसऱ्या जगाचेही ज्ञान नाही.

हे सर्व जगाच्या मालका, अशा स्थितित पडलेल्या मला तू कशाप्रकारे एका क्षणासाठी दर्शन देउन जा.हे परमेश्वरा, माझी बुद्धी मलिन झाली आहे.मी गति समजू शकत नाही.मी भुललेला आहे.तरी तू कृपा करून मला समजेल अशी सद्‌बुद्धी दे.

योगेश्वरसुद्धा तुला पाहू शकत नाही.तुझ्या गुणाचे वर्णन करू शकत नाहीत.चांभार जातीत जन्मलेला रोहिदास फक्त प्रेम आणि भक्तिमुळे तुझे गुणगाण करीत आहे.

(१७)

**बरजि[वाचन]हो बरजि बीठुले[विट्ठल],माया जग खाया।**
**महा प्रबल सब ही बसि[वश],कीये, सुरनर मुनि भरमाया[भुलविले]॥ टेक॥**
**बालक बिरध[वृद्ध]तरून अति सुंदरि, नाना भेष बनाया।**
**जोगी[योगी]जती[यती]तपी[तपस्वी]संन्यासी, पंडित रहया न पाया॥ १॥**
**बाजीगर की बाजी कारनि, सब को कोतिग[कौतुक]आवै।**
**जो देखे सो भुलि रहे, वाका[खरा]चेला मरम जु पावै॥ २॥**
**खं[आकाश (स्वर्ग)]ब्रह्मांड लोक सब जीतै, इहि विधि तेज जनावै।**
**सयूंभू[स्वयंभू, विष्णू]कौ चित्त चोरि लियौ है, वाकै पाछै लागा धावै॥ ३॥**
**इन वातनि सुख चैनु मरियतु[विनाश]है, सबकौ रहै उझारी[उध्वस्त करणे]।**
**नेकू[कृपा]द्रिष्टि किन राखहु कैसो, मेटहु[मिटवा]विपति हमारी॥ ४॥**
**कहै 'रविदास' उदास भयौ मन, भाजि[पळणे]कहा अब जईऐ।**
**इत[येथे]उत तुम गोविंद गुसाई, तुम हीं मांहि[मी]समई ऐ[विलीन.]॥ ५॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ शर्मा) पद क्र.४०

**भावार्थः**—हे परमेश्वरा वाचवा, माया ह्या जगास खात आहे.या प्रबल मायेने सर्वास वश केले आहे.हिने देव, मनुष्य तसेच ऋषी, मुनी, या सर्वांना भुलविले आहे.

अनुक्रमणिका

हिने बालक, वृद्ध व सुंदर युवतीप्रमाणे अनेक वेश धारण केले.योगी, मुनी, तपस्वी, संन्यासी आणि विद्वान कोणीसुद्धा हिच्यापासून वाचला नाही.

ह्या जादूगारिणीमुळे सर्व आश्चर्यचकित होतात.जो हिला पाहातो, तो स्वतःस विसरतो.खरा शिष्यच हिचे मर्म समजतो.

ह्या मायेने स्वर्ग ब्रह्मांड इत्यादी सर्वांना जिंकून आपला पराक्रम दाखविला आहे.हिने विष्णुचे मन चोरून त्यास आपल्या मागे धावण्यास लावले.(सुवर्णमृग-रामायण)

यामुळे सुख, शांती नाहीशी होऊन मायेने सर्वास उध्वस्त केले.हे प्रभू, आपली कृपादृष्टी मजवर ठेवून माझी संकटे नाहीशी कर.

रोहिदास म्हणतात की, "मी उदास झालो.आता मी ह्या मायेपासून कुठे पळून जाऊ?हे प्रभू, तू सर्व ठिकाणी आहेस.म्हणजे मी आपणांस विलीन आहे.

### (१८) राग केदार/केदारी

**रे मन राम नाम संभारि**[सांभळणे]**।**
**माया कै भ्रमि कहां भूल्यौ, जाहिगौ कर**[हात]**झारि**[झाडणे]**॥टेक॥**
**दैखि धा**[नर]**इहां कौन तेरौ, सगौ सुत**[पुत्र]**नही सारि।**
**तोरि**[तुझा]**तंग सब दूरि करि है, दैहिये तनु जारि**[जाळणे.]**॥ १॥**
**प्राण गये कहु कौन तेरो, देखि सोचि विचारि।**
**बहोरि इहिं कलिकाल माही, जीति भावै हारि॥ २॥**
**यहु माया सब थोथरी रे, भगति कौ प्रतिपारि।**
**कहै 'रविदास' सति वचन गुर कै, सोन जीअ तै टारि॥ ३॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ शर्मा) पद क्र.९५

**भावार्थः**—अरे मना, राम नामाची प्राप्ती कर.मायेच्या भ्रमात तू कसा भुललास?शेवटी एक दिवस तुला रिकाम्या हाताने जावे लागेल.

मुलगे, सगे सोयरे किंवा मेहुणा या सर्वांपैकी तुझा कोण आहे?विचार करून बघ, शेवटी सर्व जण तुझी सोबत सोडणार आहेत व तुझ्या शरीरास जाळणार आहेत.

तू विचार करून बघ.मेल्यानंतर तुझा कोण?मग ह्या कलीकाळात तू तुझ्या इच्छेप्रमाणे जिंक किंवा हार.

हे सर्व मायेचे जग खोटे, विरस आहे.येथे फक्त भक्तच वाचतो.रोहिदास म्हणतात की, "गुरुचे वचन खरे आहे.त्यास आपल्या हृदयात अशा तऱ्हेने जप की, कधीही त्याचे उल्लंघन होणारनाही."

अनुक्रमणिका

## मानवी जीवनाची सार्थकता

ज्याने परमात्म्याच्या प्रेमाचे अमृतपान केले आहे, त्या मनुष्याचे जीवन धन्य होय.परमात्मा आनंदरूप आहे.यासाठी त्याचा भक्त ह्या आयुष्यात व नंतरसुद्धा नेहमी आनंदात निमग्न असतो.परमात्म्याचा दयाळूपणा आणि त्याने करावयाच्या संरक्षणास कोणती मर्यादा नाही आणि त्यास कोणतीही उपमा दिली जाऊ शकत नाही.ज्याप्रमाणे भगवान आपल्या भक्ताचे रक्षण करतो, त्याप्रमाणे दुसरा कोणी करू शकणार नाही.तो नीचातील नीच व अत्यंत गरीब-हीन माणसावरसुद्धा आपल्या अपार दयेची वृष्टी करतो.त्याच्या कृपेने पापी मनुष्य पुण्यात्मा बनतो आणि नीच मनुष्य उच्च बनतो.

सर्व शक्तीमान परमात्म्यास शरण गेल्यावर भक्तास कोणाचेही भय राहात नाही.आणि तो नेहमी संतुष्ट राहतो.त्याचे त्रिविध[त्रिविध (तीन प्रकारचे) दुःख खालीलप्रमाणे आहे.
(१) ताप किंवा क्रोध-आध्यात्मिक दुःख.
(२) आघातापासून होणारे-भौतिक दुःख.
(३) देव-देवता अथवा भूताद्वारा दिले जाणारे-दैविक दुःख.]दुःख नेहमीसाठीच नाहीसे होते.

(१९)

**रं पायो रं राम अभी रस॥ टेक॥**
**रस जिनी[ज्यात]मगन[मग्न]है रहिया, र रंकार[रामनाम]राषे[रातदिन]नित[नित्य]रसना[जीभ]॥**
**इहु रस पीव राम रस बूडौ, अप्पू[आपण]मगन रहि है दिन रैना[रात]॥ १॥**
**लोक रस लागि विषै विष देहि, भणो राम भौजल नही वहना॥**
**अभि अंतर भजौ नित अविगत[अविनासी],इहि उपाई[उपाय]अतिर[अपार]भौ तरना॥ २॥**
**चिन्तामणि लाल हाथै जै चढियौ, हुवौ[झाला]उजास[प्रकाश]तिमिर[अंधार]नही रहना॥**
**भजै रविदास राम नित रसना, दुलभ जनम बिरथ[व्यर्थ.]नहीं गवना॥ ३॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) पद क्र.१४१

**भावार्थः**—मी राम नामाचा अमृत रस मिळविला आहे.

मी ज्या रसाच्या रुचीस चाखून मग्न झालो आणि माझी जीभ नेहमी त्या रामनामाचे अमृत चाखू लागली आहे.हा रस पिऊन मी रामनामाच्या रसात बुडतो आणि रात्रंदिवस आपण त्यात निमग्न राहतो.

संसारिक विषयातील विषामुळे जीव आक्रांत होऊन जातो.परंतु रामनामाचे स्मरण केल्यामुळे जीव भवसागरात वाहून जात नाही.नेहमी त्या अविनाशी अशा रामाचे मनात भजन करा.अपार असा भवसागर पार करण्याचा हाच एक उपाय आहे.

जेव्हा राम नाम रुपी चिंतामणीरत्न (मनोरथ पूर्ण करणारे) हातात येते.तेव्हा मनात प्रकाश पसरतो आणि अंधार नाहीसा होऊन जातो.आंतरिक जीभ नेहमी रामनामाच्या भजन स्मरणात लागते आणि रोहिदास म्हणतात की, "अशा प्रकारे मानव जीवन व्यर्थ जातनाही."

## (२०) राग बिलावल

अनुक्रमणिका

**दारिदु**[दारिद्रय]**देखि सभ कौ हंसे, ऐसी दसा**[दशा]**हमारी।**
**असट दसा**[अठरा]**विधि करतलै**[हातामध्ये]**,सभ कृपा तुम्हारी॥**
**तू जानत मैं विछु नहि, भवखंडन राम।**
**सगल जीअ सरनागती, प्रभ पूरन काम॥ १॥रहाउ॥**
**जौ तेरी सरनागता, तिन नाही भारू**[भार, वजन]**।**
**ऊंच नीच तुम ते तरे, आलजु**[निर्लज्ज]**संसारू॥ २॥**
**कहि रविदास अकथ कथा, बहु काइ**[काय]**करीजै**[सांगणे.]**।**
**जैसा तू तैसा तुही, किआ उपमा दीजै॥ ३॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) पद क्र.११९

**भावार्थः**—(बाह्यदृष्टिने) हे प्रभू, माझी दशा असी आहे की, सर्व लोक माझी दरिद्रता पाहून हसतात.परंतु (आंतरिक दृष्टीने) अठरा प्रकारच्या सिद्धी माझ्या हातामध्ये आहेत.ही सर्व तुझीच कृपा आहे.

प्रभू, तू जाणतोस की, मी काहीसुद्धा नाही.तुच संसारिक बंधने कापणारा आहेस.सर्व प्राणीमात्र तुलाच शरण येतात.सर्वांचे कार्य पूर्ण करणारा तुच आहेस.

जे तुला शरण येतात, ते कर्माच्या बोझ्यातून मुक्त होतात.ह्या निर्लज्ज जगात सर्व ऊंच नीच लोक तुझ्याच कृपेने मुक्त होतात.

रोहिदास म्हणतात की, “तुझी कथा अकथनीय आहे.फार काय सांगावे?तुझी उपमा दिली जावी असा तू जसा आहे तसाच तू फक्त आहेस.दुसरा कोणीही तसा नाही.”

(२१)

**ऐसी लाज तुझ बिनु कौन**[कोण]**करै**
**गरीब निवाज**[दीनपालक]**गुसाईया**[प्रभू]**मेरा माथै छत्र**[छत्री (मुकुट)]**धरै॥ टेक॥**
**जा की**[ज्याची]**छोति**[स्पर्श]**जगत कउ लागै, वा पर तुहीं ढरै**[प्रेम करणे]**।**
**नीच हं ऊंच करै मेरा गोविंदु**[प्रभू]**काहु**[कोणाचे]**तै न डरै॥**
**नामदेव कबीरू तिलोचनु, सधनां सैनु तरै।**
**कहि ‘रविदास’ सुनहु रे संतहु, हरि जीउ तै सभै सरै**[पूर्ण करणारा.]**॥ २॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ शर्मा) ११८

**भावार्थः**—हे प्रभू, तुझ्याशिवाय असे कोण करू शकतो?माझा प्रभू गरिबावर कृपा करणारा आहे.त्याने माझ्या डोक्यावर छत्र धरले आहे.

जगाला ज्याचा स्पर्श (विटाळ) होतो.अशा अस्पृश्यावर तुच प्रेम करू शकतोस.माझा प्रभू नीचासही उच्च करणारा आहे आणि त्यास कोणाचेही भय नाही.

नामदेव, कबीर, त्रिलोचना, सधना आणि सेन हे सर्व संत तुझ्या कृपेनेच तरले आहेत.

अनुक्रमणिका

रोहिदास म्हणतात की, “हे संतानो, ऐका.माझा प्रभुच सर्व कार्य पूर्ण करणारा आहे.”

### (२२) राग षट-दुपदा

**जो जन ऊधौ**[उद्धव (वसुदेवचा भाऊ देवनाथचा पुत्र-कृष्णाचा चुलत भाऊ)] **!मोहि न विसारे, हौ न विसारौं आध**[अर्धी]**घरी**[घडी (वेळ)]**॥टेक॥**

**जइसे आंडे**[अंडे]**पडइ भारथ**[म्हणून भारतयुद्ध सुरू होण्यापूर्वी युद्ध क्षेत्रात टिटवीने अंडें ठेविले होते.ते वाचविण्यासाठी तिने प्रभूस प्रार्थना केली होती.तेव्हा कोणा योद्धाच्या बाणाने हत्तीच्या गळ्यातील घंटा तुटून ती झांकणाप्रमाणे त्या अंड्यावर पडली.अठरा दिवसांनी युद्ध संपल्यावर ते अंडे सुरक्षित राहिले होते.]**मंह, लै गज घंट उतार घरी।**
**तइसे**[तसे]**राषौ**[रक्षण]**आपन सेवक कूं, विषियन**[विषय]**व्याधि**[रोग]**अभै**[अभय]**करी।**
**जौ मुहि**[मला]**भजै भजऊं मैं ताकू**[त्याचे]**,हरि सिमरन तै पारी परी।**
**कहै रविदास साघ**[साधू]**संगति मिलि, राम भजै तौ वियति टरी**[दूर करणे.]**॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) १४७

**भावार्थः**—हे उद्धवा, जी व्यक्ती मला विसरत नाही त्या व्यक्तिस मी अर्धी घडीसुद्धा विसरत नाही.ज्याप्रमाणे महाभारताच्या युद्धाक्षेत्रात पडलेल्या अंड्याचे रक्षण त्यावर मी हत्तीची घंटा ठेवून केले.त्याप्रमाणे मी माझ्या सेवकाचे रक्षण करतो आणि मी त्याच्या विषय रोगाचे भय दूर करतो.

जो माझ्या स्मरणास लागतो, त्याच्या स्मरणास मी लागतो.जणू काय परमात्मा व त्याचे स्मरण करणारा भक्त या दोघात स्पर्धा लागली आहे की कोण कोणाचे अधिक स्मरण करतो.

रोहिदास म्हणतात की, “संत महात्म्याच्या सत्संगात येऊन, त्यांचे द्वारा दिलेल्या परमात्म्याच्या नामस्मरणात भजन करतो.त्याची विपत्ती दूर होते.

### (२३) राग कान्हडा (दोपद)

**जाकै**[ज्याचा]**राम जी धनीं, ताकै**[त्यांस]**काहिं की**[कशाची]**कमी है॥टेक॥**
**मनसा**[इच्छा(अभिलाषा)]**को नाथ मनोरथ पुरवै, सुख निधान**[खजिना]**की काहा गिनी है॥ १॥**
**कवन काज किरपन**[कृपण]**की माया, करत फिरत अपनीं अपनी है।**
**खाई न सकै खरच नहिं जानै, जयौ भवँग**[सर्प]**सिर रहत मनी है॥ २॥**
**जाकि रासि**[ढीग]**थावर**[स्थावर]**नहिं आवै, राहा**[रस्त्यात]**केत की**[कितीतरी]**मुचत**[लुटणे]**अनी**[समूह]**है।**
**रखवारे कौ चक्र सुदरसन, बिघ**[विघ्न]**न व्यापै रोक छिनी है॥ ३॥**
**सिब सनकादिक पार न पावै, मों बपरे**[बिचारे.]**की कौन गिनी है।**
**जाकी प्रीति निरंतरहरि सौं, कहै ‘रविदास’ ताकी सदा ही बनी है॥ ४॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) १२१

**भावार्थः**—परमात्मा स्वतःच ज्यांची इच्छा पूर्ण करू लागला आहे त्यांचे सुख रुपी खजिन्याची काय गणती आहे?

अनुक्रमणिका

मालक धनसंचयास आपले म्हणत फिरत आहेत.ते स्वधनास स्वतःही खात नाहीत आणि योग्य खर्चही करीत नाहीत.मणियार सर्पाच्या डोक्यावरील मण्याप्रमाणे त्यांचे धन बेकार असते.

त्यांच्या धनाचे ढीग लुटारुंच्या टोळ्या लुटतील पण रामनाम रुपी धनाचे संरक्षण स्वतःभगवान करतात.त्यास कोणी विघ्न आणू शकत नाही.

राम नामाचा अपार महिमा शिव सनक इत्यादि ऋषिंनासुद्धा मिळविता आला नाही.

रोहिदास म्हणतात की, त्यांचेपुढे माझ्या बिचाऱ्याची काय किमत आहे?जो नेहमी परमात्माच्या प्रेमात पडला आहे त्यास नेहमी शांती आहे.

## २.घट-घटवासी परमात्मा

**बहिर्मुखी साधनांची व्यर्थताः—**

ज्याच्यात परमात्मा निवास करतो, ते मनुष्याचे शरीर हरिमंदिर आहे.तो आपल्या सर्वामध्ये विराजमान आहे.मृगाच्या बेंबीत कस्तुरी असते.परंतु मृग मूर्खपणे त्या कस्तुरीच्या शोधात विनाकारण इकडे तिकडे फिरत असतो.परमात्मा कोणत्या जंगलात अथवा डोंगरात लपलेला नाही.म्हणून जंगल, पर्वत, समाधी, तीर्थक्षेत्रे, मंदिरे किंवा मशिदीमध्ये त्याचा शोध करणे व्यर्थ आहे.परमात्म्यासाठी केलेली दिखाऊ शोधाशोध आणि आमची सर्व बहिर्मुखी पूजापाठ किंवा धार्मिक अनुष्ठाने निष्फळ सिद्ध होत आहेत.

खऱ्या परमार्थी रत्नाची प्राप्ती आंतरिक समुद्रात होत असते.साधक आंतरिक समुद्रात डुबकी मारूनच रत्नास प्राप्त करतो.आत गेल्यावरच अभ्यास करणाऱ्यास अनहद नाद ऐकू येतो.तसेच सहस्रदल कमळ आणि भँवर गुंफा इत्यादी पवित्र ठिकाणी दिसतात.अशाप्रकारे ते आपली यात्रा पार पाडीत साधक परमात्म्याचा साक्षात्कार करून घेतो.

(२४)

**अब मैं हारयो**[थकलो]**रे भाई।**
**थकित भयौ सब हाल चाल**[येणे जाणे (यात्रा)]**तै, लोगनि वेद बडाई**[मोठेपणा]**॥टेक॥**
**थकित भयौ**[झालो]**गायन अरू नाचन, थाकी सेवा पूजा।**
**काम क्रोध तै देह थकित भई, कहौ कहाँ लौ दूजा**[दुसरा]**॥ १॥**
**राम जन होऊ न भगत कहाँऊ, चरन पषालु**[धुणे]**न देवा।**
**जोई जोई यकरौं उलटि मोहि बांधे, यतातै निकट न भेवा**[भेद]**॥ २॥**
**पहले ग्यांन का किया चांदिना**[दिवा लावणे]**,पीछे दीया बुझाई।**
**सूंनि सहज मैं दोऊ त्यागै, राम कहौं न खुदाई॥ ३॥**
**दूरि बसै षट क्रम सकल, अरु दुरिउ कीन्नहैं सेऊ।**
**ग्यांन ध्यांन दोऊ दुरिउ कीन्हैं, दुरिउ छांडे तेउ॥ ४॥**

अनुक्रमणिका

**पांचू**[पंचेंद्रिय]**थकित भयै जहां तहां, जहां तहां थिति**[स्थिर]**पाई।**
**जा कारनि मैं दौरयौ फिरतो, सो अब घट मे आई॥ ५॥**
**पांच**[आतील पांच धुन]**मेरी सखी सहेली, तिन निधि दई दिखाई।**
**अब मन फूलि भयौ जग महियां**[मध्ये]**,उलटि आप मंह समाई॥ ६॥**
**चलत चलत मेरो निज मन थाक्यो, अब मो पै चल्यौ न जाई।**
**सोई सहजि जमल्यौ सोई सनमुख**[साक्षात्कार.]**कहै, 'रविदास' बडाई॥ ७॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) ३

**भावार्थः**—अरे भाऊ, जागतिक आणि धार्मिक मोठेपणा प्राप्त करण्यासाठी सर्व ठिकाणी जाण्यामुळे आतामी थकलो आहे.

अनेक प्रकारच्या नृत्यगान आणि सेवा करण्यासाठी मी थकलो आहे.तसेच दुसरी गोष्ट काम क्रोधाने ग्रस्त झाल्यामुळे माझे शरीर आता थकले आहे.

मी रामाचा सेवक किंवा भक्त होण्याचा दावा करीत नाही.तसेच देवमूर्तिचे पाय धूत नाही.अखेर जेवढे कर्मकांड केले ते उलट मला कर्मबंधात बांधत आहेत.त्यांच्या करणीमुळे परमात्म्याचा भेद उघड होत नाही.

ज्ञानमार्गाचे अनुसरण करून प्रथम मी ज्ञानदीप लावला परंतु मी त्यास व्यर्थ समजून नंतर सोडून दिला.क्रमशः सून्न (तिसरे सहानी मंडल ज्यास दहावा दरवाजा म्हणतात.) आणि सहज अवस्था (जो पारब्रह्मातून प्रारंभ होऊन सत्त खंडापर्यंत जातो.) मध्ये पोहचून मी राम किंवा खुदा (वर्णनात्मक नाम) चे स्मरणसुद्धा सोडून दिले.

सर्वप्रकारची षटकर्म तसेच देवमूर्तिची सेवा मी सोडून दिली तसेच शास्त्रीय ज्ञान व योगीद्वारा केलेल्या ध्यानास मी सोडून दिले.

पांच इंद्रिये आता थकून स्थिर झाली आहेत.ज्या प्रभुच्या शोधात मी इकडे तिकडे धांवत फिरत होतो.तो आता आपल्या शरिरातच प्रगट झाला आहे.

पांच आंतरिक धुनांनी मला सोबत दिली.त्यामुळे मला आंतरिक खजिना दिसू लागला.आता मी ह्या जगात आपला वास्तविक आनंद प्राप्त करून घेतला व प्रसन्नता मिळविली.याची गती आता उलटी झाली आहे.

बाहेरची धावाधाव सोडून आता मी आतच प्रविष्ठ झालो.आत वर चढत चढत माझे मन (ब्रह्मांडीमन) सुद्धा थकले.आता ते वर जाऊ शकत नाही.रोहिदास म्हणतात की, "सहज अवस्था प्राप्त करून परमात्म्याचा साक्षात्कार करून घेतला.आता मी त्याचे गुणगान करण्यात मग्न आहे."

**खोजत किधु**[कोठे]**फिरै, तेरे घट**[चैतन्य शक्तिचे केंद्र तसेच चैतन्यस्वरुप परमेश्वराचे पिवास असे डोके.]**मंह सिरजन हार॥ टेक॥**

**किस्तुरी म्रिग पास है रे, ढूंढत घास फिरै।**
**पाछै**[मागे]**लागौ काल**[कापणारा]**पारधी**[शिकारी]**,छिन मंह प्रांन हरै॥ १॥**
**इला पिंगला सुषमण नारी**[नाडी]**,जा मैं चित्त न धरै।**
**सहस्त्रार**[हजार पाखळ्याचे कमळ]**मंह भंवर गुफा है, भंवरा**[भुंगा]**गुंज करै॥ २॥**
**दिल दारियाब**[दिलरूपी समुद्र]**हीरा लाल है, गुरमुख**[ज्याचे तोंड गुरुकडे आहे (ज्याने स्वतःस संपूर्ण गुरूस अर्पण केले आहे.]**समझ परै॥**
**मरजी बाकी सैन**[संकेत]**विचारै, तउ हीरा हाथ परै॥ ३॥**
**कहि रविदास समुझि रे संतो, इहु पद है नि खान**[निर्वाण (मुक्ती)]**।**
**इहु रहसि**[रहस्य]**कोउ खोजै बूझै, सोउ है संत सुजांन**[सुविज्ञ, पूर्ण ज्ञानी.]**॥ ४॥**

—संत गुरू रविदास, वाणी (डॉ.शर्मा) १५८

**भावार्थः**—तू परमेश्वराच्या शोधासाठी इकडे तिकडे कां फिरतोस?ज्याने तुला बनविले, तो परमेश्वर तुझ्या शरीरात विराजमान आहे.हरणाच्या बेंबीत कस्तुरी असते.पण तोच तिला इकडे तिकडे शोधतो.परंतु त्याच्यामागे लागणारा पारधी क्षणभरात त्याचा प्राण घेतो.

आम्ही आमच्या शरीरातील इडा, पिंगळा व सुषुम्ना नाड्यांचे ठिकाणी चित्त एकाग्र करीत नाही.आमच्या शरीरातच सहस्त्रार (हजार पाखळ्यांचे कमळ) व भँवर गुंफातील कमळावर भुंगे गुणगुण करीत आहेत.

हृदय रूपी समुद्रात भरपूर असलेले हीरे, लाल यांची माहिती गुरुमुख महात्म्यांकडून मिळते.त्यांच्या मर्जी संकेतानुसार विचाराने चालल्यास ते हिरे, लाल हाती पडू शकतील.

रोहिदास म्हणतात की, “हे समजून घे.निर्वाणपदाच्या रहस्याचा शोध जो करून ज्ञान प्राप्त करील, त्यासच पूर्ण ज्ञानी संत म्हटले जाते.”

(२६)

**गिरी वन काहे**[का?]**खोजन**[शोधणे]**जाई, घट अभिअंतर**[शरिरात]**खोजहु भाई॥टेक॥**
**पुहुप**[फूल]**मधे**[मध्ये]**ज्यू**[ज्याप्रमाणे]**वास वसत है त्यूं**[त्याप्रमाणे]**सब घट रमहि रघुराई।**
**बाहरि खोजत जनम सिरानो**[घालविला]**,म्रिग**[मृग]**त्रिरना**[तहाण]**रह्यौ उरझाई**[संपणे, भागणे]**।**
**राम चरन मंह**[आपले]**थिर**[स्थिर]**मन राखहु, रिदै**[हृदय]**कंवल**[कमळ]**बसै रघुराई**
**कहि रविदास सुनहु रे संतो, यराम भजन विनु किन**[कोणाची?]**गति पाई॥ १॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) १६७

**भावार्थः**—अरे भाऊ, परमेश्वर शोधण्यास पर्वत आणि जंगलात कां जातोस?आपल्या शरीरातच त्यास शोध.

अनुक्रमणिका

ज्याप्रमाणे फुलात सुवास असतो त्याप्रमाणे प्रत्येकाच्या शरिरात परमात्मा असतो.आपल्या शरीराबाहेर (जंगल, पर्वत, मंदिरे, मशिदी, गुरुद्वारे आणि तीर्थस्थानामध्ये) परमेश्वर शोधण्यात तुम्ही सर्व आयुष्य घालविले, तहानलेला मृग पाण्यासाठी मृगजळमागे धावतो पण त्या दिखाऊ पाण्यामुळे त्याची तहान भागते कां?ती तर एक फसवणूक आहे.

परमेश्वर प्राप्तीसाठी बाहेरची स्थळे शोधणाऱ्यांची तीच स्थिती होते.रोहिदास समजावतात की, परमेश्वर आपल्या हृदयरूपी कमलात राहतो.तेव्हा आपल्याला आपल्या हृदयात (तिसरा तीळ) परमेश्वर चरणी मन स्थीर केले पाहिजे.

रोहिदास म्हणतात की, "परमेश्वर भजनाशिवाय कोणासही गती प्राप्त होत नाही.अर्थात एका योनितून दुसऱ्या योनित जाण्यापासून मुक्त होत नाही."

## परमेश्वराचे खरे स्वरुप

परमात्मा खरे पाहता सर्वत्र आणि सर्वांच्या शरिरात निवास करणारा आहे.परंतु आमच्यावर अज्ञान रूपी अहंकाराचा पडदा पडलेला आहे.त्यामुळे आम्ही त्याच्या खऱ्या स्वरुपात समजू शकत नाही.साधारणपणे लोक प्रचलित देवी देवतांस किंवा त्यांच्या अवतारास परमेश्वर मानण्याची चूककरीत असतात.उदाहरणार्थ—लोक साधारणपणे दशरथपुत्र श्रीरामास परमेश्वराचे रूप मानतात.परंतु संतांची दृष्टी ह्या अज्ञान लोकांपेक्षा नेहमी वरची आहे.हे सर्वसाधारण राम किंवा कृष्ण इत्यादी नांमांचा उल्लेख करतात.परंतु हे लोक व्यावहारिक नामाद्वारे ते त्या परमतत्व परमेश्वरास सुचवितात.

वास्तविक पाहता आत्मा हापरमात्मारुपी समुद्राचा एक थेंब आहे.आंतरिक (मनाच्या) अभ्यासानेच जेव्हा त्यांना खऱ्या स्वरुपाचे ज्ञान होते, तेव्हा तो आत्मारुपी थेंब परमेश्वर रुपी समुद्रास विलीन होऊन एकाकार होतो.या अवस्थेत प्राप्त केलेल्या संत किंवा ज्ञानी लोकास हा अनुभव होतो.वास्तविक पाहाता परमेश्वर काय आहे, कशाप्रकारे तो सर्वांचा शरिरात वास करतो आणि कशाप्रकारे तो सर्व विश्वात आहे?

(२७)

**नरहरि !चंचल है मति मोरी**[माझी]**,कंसे भगती करू राम तोरी**[तुझी]**॥ टेक॥**
**तू मोहि**[मला]**देखै हौं तोहिं**[तुला]**देखू, प्रीति परसपर होई।**
**तू मोहि देखै हौं तोहिं न देखूं, इह मति सब बुधि खोई॥ १॥**
**सब घटि अंतरि समसि**[निवास करणे, व्याप्त होणे]**निरंतरि**[नेहमी]**हौ देखत हूँ नही जाना।**
**गुन सब तोर मोर सब औगुन**[अवगुण]**,क्रित**[केलेले]**उपकारन मांना॥ २॥**
**मैं तै, तोरि मोरि असमझि**[अज्ञान]**सों कैसे करि निसतारा**[सुटका]**।**
**कहै रविदास' क्रिस्न**[कृष्ण(रोहिदासचा मनोदय अवतारी राम किंवा कृष्ण नसून दयामय परमात्म्यास उद्देशून आहे.)]**करूनामै, जै जै जगत अधारा॥ ३॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) १३

अनुक्रमणिका

**भावार्थः**—हे (नरहरी) प्रभु, माझी बुध्दीचंचल आहे.तुझी भक्ती कशी करू?

जर तू मला पाहिले आणि मी तुला पाहिले, तेव्हा आपल्या दोघात परस्पर प्रेम होऊ शकते.तू तर मला पाहतोस परंतु मी तुला पाहू शकत नाही.याचा विचार करून माझी सगळी बुध्दी भ्रष्ट झाली आहे.

तूतर सर्वांच्याशरिरात निवास करतोस परंतु मी तुला पाहाण्याचे जाणत नाही.तू सर्व गुण संपन्न आहेस.(माझ्यासाठी माझ्या शरिरात निवास करतोस) परंतु माझ्यात सर्व अवगुण आहेत.मी कृतघ्न (अज्ञान व अहंकारामुळे) तुझे उपकारही मानत नाही.

"तू" आणि"मी" तसेच"तुझा" आणि"माझा" अशा प्रकारच्या भेदामध्ये मी विसरलो आहे.ह्या अज्ञानातून माझी सुटका कशी होईल?

रोहिदास म्हणतात की, "हे जगाच्या आधारा, दयामय परमात्मा, आपला जप हो.(मला तुझ्या दयेचा आधार प्राप्त हो.)

(२८)

**भाईरे!राम कहां है मोहि बताओ ।**
**सति**[सत्य]**राम ताकै**[त्याचे]**निकट न आयो॥ टेक॥**
**राम कहत सब जगत भुलाना**[विसरणे]**सो यहु**[हा]**राम न होई।**
**करम अकरम करूनामै**[दयामय]**कैसो**[केशव (परमात्मा)]**करता नांव सु कोई॥ १॥**
**जा रामहि सब जग जानै, भ्रम भूले रे भाई।**
**आप आप थैं कोई न जाने, कहें कौन सू जाई॥ २॥**
**सतत**[नेहमी]**न लोभ परसि**[शिवणे]**जीय तनमन गुन परसत**[स्पर्श]**नहिं जाई।**
**अलख**[न दिसणारा]**नांव जाकौ**[कोणत्या]**ठौर**[जागा]**न कतहूँ**[कोठेही]**क्यूं न कह्यो समुझाई॥ ३॥**
**भणै**[म्हणतात]**,'रविदास' उदास ताही**[तेथे]**यै, कर्ता को है भाई।**
**केवल कर्ता ऐक**[एक]**सही करि, सति राम तिही ठांई**[ठिकाणी.]**॥ ४॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) १०

**भावार्थः**—हे भाऊ, राम कोठे आहे?मला दाखव.जो खरा परमात्मा आहे, त्याच्याजवळ तर तुम्ही आलाच नाही.

"राम राम" म्हणणारे सर्व जग विसरले गेले आहे.चांगल्या वाईट कर्मात पडलेल्या प्राण्यांसाठी परमात्मा नेहमी दयाळू आहे.ज्यास नाम म्हटले जाते, जो सृष्टिचा कर्ता आहे, तोच खरा परमात्मा.

हे भाऊ, ज्याला सर्व जग राम समजत आहे, तो राम स्वतःच भ्रमाचा शिकारी बनला आहे.आपण स्वतःह्या तथ्याला कोणी समजत नाही.हे कोणी जाऊन सांगावे?

अनुक्रमणिका

ज्याचे तनमन आणि चित्त लोभाला शिवत नाही आणि ज्याला गुण (सत्व, रजस् व तमस्) कधी स्पर्श करीत नाही.तो अलख नाम कोणत्या एका ठिकाणी मर्यादित नाही, हे समजावून कां सांगत नाही?

रोहिदास म्हणतात की, "आम्ही सर्व यासाठी उदास आहे की, ह्या जगाचा कर्ता एक आहे, जो सत्य नाम परमात्मा आहे, त्यासच ओळखा."

(२९)

**काल हु**[काळ]**नाइ ताहि पद**[पाय]**सीसा**[डोके]**। नहिं बिसरऊं षिन**[क्षण]**एकहु ईसा॥टेक॥**
**जनम मरनु अरूजग जाला**[संसारिक मायाजाळ]**। नाम परताप**[प्रताप]**न बिआपहिं**[व्याप]**ब्याला।**
**अगत**[येणे]**विगत**[जाणे]**अनादि अनूपा। विस्व विआपक ब्रम्ह अरूपा**[रूपरहित]**॥**
**घट-घट तिह पेषियत**[दिसणे]**अइसे। जल मंहि लहिर जल जइसे।**
**कहि रविदास हरि सरब**[सर्व.]**बिआपक। सरब च्यंतामणि सरब प्रतिपालक॥ १॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) १६९

**भावार्थः**—ज्याच्या चरणावर काळदेखील डोके वाकवितो त्या प्रभूस एक क्षणभरही विसरू शकत नाही.

त्या प्रभु नामाच्या प्रतापाने जन्म मरण व संसारिक मायाजाळरूपी सर्पाचा परिणाम होऊ शकत नाही.तो परमेश्वर कधी नाहीसा होणारा नाही.तो पुरातन पुरूष आहे.तो अनादी, अनुप (उपमारहित) विश्वव्यापक आणि रूपरहित ब्रम्ह्म आहे.

तो सर्वांच्या शरिरात त्याप्रमाणे दिसतो.ज्याप्रमाणे पाण्यात लहर आणि लहरीत पाणी दिसते.अर्थात हे जग आत व बाहेर परमात्म्याचेही रूप आहे.

रोहिदास म्हणतात की, "तो परमात्मा सर्वव्यापी आहे.सर्व काही देणारा तसेच सर्वांचे पालन करणारा आहे."

**परमात्म्याची खरी पूजा**

देवाच्या मूर्तिना फळे, फुले देणे अथवा भेट चढविणे, आरती उतरणे तसेच त्यांच्यापुढे करमणूक करण्यासाठी अनेक कार्यक्रम करणे इत्यादी सर्व प्रकारच्या बहिर्मुखी दिखाऊ पूजा करणे हे भ्रामक आणि व्यर्थ आहे.

अंतर्मुखी पूजाच परमात्म्याची वास्तविक पूजा आहे.जेव्हा आम्ही आपले ध्यान मनात एकत्र करून आंतील तेजपुंज प्रकाशाला पाहू आणि दिव्य ऐकू;तेव्हा आम्ही अनुपम शांति आणि आनंदाच्या खुशीने नाचतो आणि शेवटी परमात्मा भेटीचे अमर सुख प्राप्त करतो.

(३०)

अनुक्रमणिका

**रूपांतर**

**रामहि पूजा कहा चढाऊँ।**
**फलु अरू फूल अनुपम**[उपमारहित, अत्यंत पवित्र]**न पाऊँ॥ टेक॥**
**थनहर**[स्तन]**दूध ज्यु बछरू**[वासरू]**जुठारयो**[उष्टे]**।**
**पुहूप**[फूल]**भँवर**[भुंगा]**जल मीन**[मासा]**बिगारियो**[खराब]**॥ १॥**
**मलयागिर**[चंदन]**बेढियो**[ग्रासणे, वेढणे]**भुवंगा**[सर्प]**।**
**विष अमृत होऊ एके संगा।**
**धूप दीप नइवेदहि वासा, कइसै पूज करहिं तेरी दासा॥ २॥**
**मन ही पूजा मन ही धूप।**
**मनही सेऊँ सहज**[सहज अवस्था (पारब्रह्म ते सचखंडपर्यंत)]**सरुप।**
**पूजा अरचा न जानौ राम तेरी।**
**कहै रविदास कवन गति मोरी॥ ३॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) ३९

**भावार्थः**—हे प्रभू, मी तुला काय पूजा चढवू?तुझ्यावर पूजा चढविल्यास योग्य असे कोणतेही पवित्र फळ किंवा फूल मला मिळत नाही.

वासराने दुधास गाईच्या स्तनामध्ये उष्टे केले, भुंग्याने फुलास व माशाने पाण्यास खराब केले आहे.

सापाने चंदनवृक्षास वेढले आहे.विष व अमृत या दोघांचे बरोबर निवास आहे.(सामान्यरूपसमुद्रात एकच) ह्या उष्ट्या व अपवित्र वस्तुंनी आपली पूजा करण्यापेक्षा मी मनात पूजा करून धूप दाखवितो.मनातच सहज अवस्थेत प्राप्त करून आपली सेवा करतो.अर्थात माझी सर्व अंतर्मुखी पूजा आहे.

रोहिदास म्हणतात की, “मी बाहेरची दिखाऊ पूजा करीत नाही.हे प्रभू, माझी काय गती आहे, हे आता तूच जाणत असणार.”

## (३१) आरती

**संत उतारै आरती देव सिरोमणीऐ**[देवाधिदेव परमेश्वरासाठी]**।**
**उर**[हृदय तिसरा तीळ, शिसनेत्र]**अंतरि तहाँ बसि**[बसले]**बिन रसना**[जीभ]**भजीऐ**[जप करणे]**॥ टेक॥**
**मनसा मंदिर माहिं धूप धूपाइऐ।**
**प्रेम प्रीती की माल**[माळ]**राम चढाइये॥ १॥**
**चहुँ दिसी दिवला**[दिवा]**बालि, जगिमगि हो रहियो।**
**जोति जोति सम जोति, जोतिहि मिलि रहयो॥ २॥**
**तन मन आतम**[आत्मा]**वारि**[समर्पित करणे]**सदा हरि गाइ ऐ**[आंतरिक शब्द धून किंवा अनहद नादात विलिन करणे]**।**
**भनत**[म्हणतात.]**जन रविदास तुम सरणा आइ ऐ॥ ३॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) ११३

अनुक्रमणिका

**भावार्थः**—संत जन देवाधिदेव खऱ्या परमात्म्याची आरती उतरतात.(देवांच्या मूर्तिची बहिर्मुखी दिसणारी आरती करीत नाहीत) आपल्या हृदयात (तिसरा तीळ) आसन घालतात व जीभेशिवाय (मनापासून) पवित्र नामांचा जप किंवा स्मरण करतात.

मनाच्या मंदिरात दिवे जाळतात.त्यामुळे चारी बाजूस प्रकाशाचा जगमगाट पसरतो.

त्याच्या आत्म्याची ज्योति परमात्म्याच्या ज्योतिमध्ये विलिन होऊन ती अत्यंत ज्योतिर्मय (प्रज्वलित प्रकाशमान) होते.अशाप्रकारे ज्योतिमध्ये ज्योतिचे मिलन होते.

तन मन आणि आत्म्यास समर्पित करून परमात्म्याची दिव्य धुन किंवा अनहद नादात निमग्न होतात.रोहिदास म्हणतात की, "हे परमात्मा, मी देखील अशाप्रकारे तुला शरण आलो आहे."

## (३२) आरती

**गगन**[संतांच्या भाषेत दुसऱ्या आंतरिक मंडलास 'त्रिकुटी' म्हणतात व या मंडलाच्या आकाशाला"गगन मंडल" म्हणतात.]**मंडल में आरती कीजै, नाद बिंद**[अंतर गगनात गुंजणाऱ्या शब्दास"अनहद नाद" किंवा"नाद बिंदु" म्हणतात.]**इक मेक करीजै।**

**सुसमन**[सुषुम्ना नाडी]**इंदु**[चंद्र]**अमृत कुंभ धरावे, मनसा माला फूल चढावे॥ १॥**
**धीव**[तूप]**अखंडा सोहे बाती, त्रिकुटी**[संतांचे दुसरे आंतरिक मंडल]**जोत जलै दिन राती।**
**पवन साधना**[मन स्थिर करण्याचा अभ्यास]**थाल सजीजै, तामैं चौमुष**[चार बाजू]**मन धरि लीजै॥ २॥**
**रवि ससि**[चंद्र]**हाय गहौ तिंह माहीं, षिन**[क्षण]**दहिने षिन बामै**[डावा]**लाहीं।**
**सहस कंवल**[सहस्त्रदली कमळ]**सिंघासन**[सिंहासन]**राजै, अनहद झांजन**[झांज]**नित ही बाजै॥ ३॥**
**इंह**[ह्या]**विध आरती सांची**[खरी]**,सेवा, परम पुरिष**[परमात्मा]**अलख अभेवा**[भेदरहित]**।**
**कहै 'रविदास' गुरुदेव बतावे, ऐसी आरती पार लंघावै**[पार.]**॥ ४॥**

—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) १७६

**भावार्थः**—गगनमंडलात प्रवेश करून आरती करा.आपल्या आत्म्यास शब्द धुनाने एकाकार करा.सुषुम्ना नाडीरुपी चंद्रामध्ये आपला अमृतकलष स्थापून मनापासून भक्तिची माला, फुले अर्पण करा.

नेहमी वाहाणाऱ्या प्रेमरुपी तुपापासून ध्यानाच्या वाती सुशोभित करून आपला आंतरिक दिवा रात्रंदिवस ब्रह्ममंडळात जळत ठेवा.विषयवासनेच्या चंचल हवेस थांबवून आपल्या आरतीच्या ताटास सजवा व त्या एकाग्रतेच्या थाळीत मनात चारीबाजूने स्थापन करा.

एकाग्रतेच्या अवस्थेस सूर्यचंद्रास आपल्या हाताने पकडा व क्षणभरात त्यांना उजवा डावा करीत त्यांच्यापलिकडे जा.पुढे सहस्त्र कमळाचे सिंहासन आहे.तेथे नेहमी अनहद धुनाचा आवाज गुंजत असतो.

खरी आरती अशाप्रकारे होते व भेदरहित परमेश्वराची हीच खरी सेवा आहे.रोहिदास म्हणतात की, "हिचा भेद सद्गुरुच दाखवू शकतात.अशी आरतीच संसाररुपी सागरापलीकडे घेऊन जाऊ शकते."

अनुक्रमणिका

(३३) आरती

**आरती करत हंसै**[प्रसन्न होणे]**मन मेरो, आवत चित तुव**[तुझे]**रूप घनेरो**[अत्यंत स्पष्ट]**॥ टेक॥**
**अजर अमर अडोल**[अटल]**अभेष**[निराकार]**,निरगुन रहित रुप नहि रेषा।**
**चेतन**[ज्ञानमय]**सत चित घन आनंदा, निरविकार तेज अमित**[असीम]**अभेदा**[भेदरहित, अखंड]**॥१॥**
**अनुप अजन्मा सखय**[सर्वज्ञ]**अनंता, अभेद अदेश**[न दिसणारे]**अविगत**[माहित न होणारे]**सुछंदा**[स्वतंत्र]**।**
**नाम की बाती घीव अखंडा, इक ही जोत जलै ब्रहमंडा॥ २॥**
**अनत**[अनेक]**बार तोहि धिआन लगावा, सुनि जन पै वार नहि पावा।**
**मन वच करम 'रविदास' धिआवा**[स्मरण करणे.]**,घंटा झालर मनहिं बजावा॥ ३॥**
—संत गुरु रविदास, वाणी (डॉ.शर्मा) १७७

**भावार्थः**—हे प्रभू तुझी आरती करताना माझे मन आनंदित होते व अंतःकरणात तुझे रुप स्पष्ट उतरते.

तू अजर, अमर, अटल, निराकार, निर्गुन, रुपरेखा नसलेला, ज्ञानमय, सतचित, आनंदी, निर्विकार, असीम, तेजपुंज, भेदरहित आहेत्स.तसेच तू अजन्मा, सर्वज्ञ, अखंड, अदृश्य, शाश्वत आणि सर्वत्र आहेस.

प्रेमरुपी तुपाच्या ओघवत्या धारेत नामरुपी वाती जाळून तुझी आरती केली जाते व एका नामाच्या ज्योतिने सर्व ब्रह्मांड प्रकाशित होते.

मुनीजनांनी अनेक वेळा तुझे ध्यान केले.परंतु ते तुला पाहू शकले नाहीत.अर्थात तुझ्या अनंत स्वरुपात त्यांना थांगपत्ता लागू शकलेला नाही.

रोहिदास म्हणतात की, "मी मन, वचन व कर्मापासून ध्यान केले आहे आणि फलस्वरुप आपल्या मनातच घंटा व मंजिऱ्याचा अनहद नाद वाजवला आहे.अर्थात शब्दस्वरुप परमात्म्याचा साक्षत्कार करून घेतला आहे."

## सत्याचा अंतर्मुखी अनुभव

सत्याची वास्तविक पारख आपल्या अंतर्मुखी अनुभवाने येत असते.ही एक अद्भुत आणि अवर्णनीय आन्तरिक अनुभूति आहे.ही अनुभूति वाचणे, लिहिणे व चिंतन करणे किंवा बाह्य नाम कीर्तन अथवा संगीत ऐकण्याने प्राप्त होऊ शकत नाही.वेदाध्ययन करण्यानेसुद्धा अनुभूतीच्या प्राप्तिचा संभव नाही.अंतर्मुखी अभ्यासानेच ती प्राप्त होते.जेव्हा आम्ही एकाग्रतेची स्थिती प्राप्त करून आपण आपल्याला आंतरिक अनहद नादात विलिन करू.याप्रकारे काम, क्रोध, लोभ, मोह, आणि अहंकाराच्या विकारापेक्षा वर उठतील तेव्हा आम्हांस स्वतःहून आपल्या आत त्या खऱ्या नामाची अनुभूती होऊ लागते.संत आणि महात्म्यांचा आंतरिक अनुभव सत्य न कापणे हे प्रमाण आहे.

(३४) राग रामकली

अनुक्रमणिका

**पढीऐ गुनीऐ[चिंतन करणे]नामु सभु सुनीऐ, अनभउ भाउ[अनुभव भाव, आंतरिक अनुभूतीची स्थिती]न दरसै॥**
**लोहा कंचन[सोने]हिरनु[हरण]होइ कैसे, जउ पारस[परीस]हि न परसै[स्पर्श करणे]॥ १॥**
**देव संसै[संशय]गांठित न छुटे॥**
**काम क्रोध माइआ[माया]मद मतसर[मत्सर, इर्षा],इन पंचहु मिलि लूटे॥ रहाउ॥**
**हम बड[मोठा]कवि कुलीन हम पंडित, हम जोगी संनियासी॥**
**गियाणी मुनी सूर[शूर]हम दात[दाता]इह बुधि कबहि न नासी[नष्ट]॥ २॥**
**कहु रविदास सभै नहीं समझसि, भुलि परे जैसे बउ रे[वेडे]।**
**मोहि[माझा]अधारु[आधार]नामु नाराइन जीवन प्रान धन मोरे[माझे.]॥ ३॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) १४

**भावार्थः**—वाचणे, लिहिणे, चिंतन करणे, बाह्य नाम कीर्तन करणे जोपर्यंत आंतरिक अनुभव मिळत नाही.आतील परमात्म्याचे दर्शन होत नाही.जोपर्यंत परीस स्पर्श करीत नाही, तोपर्यंत लोखंड निर्मळ सोने कसे बनू शकते?

हे प्रभू, आमच्या संशयाची गाठ सुटत नाही.आत्म्यास काम, क्रोध, लोभ, मोह, आणि अहंकार हे पाच विकार मिळून लुटतात.

आपल्याला मोठा कवि, कुलीन पंडित, योगी, संन्यासी, ज्ञानी, गुनी, शूर, वीर किंवा दाता मानण्याची आमची भ्रमिष्ठ बुद्धी कधी नाहीशी होत नाही.

रोहिदास म्हणतात की, "आपल्या अहंकारामुळे सर्व समजत नाही आणि आपण वेड्याप्रमाणे हिंडत फिरत असतो.माझा तर एकमात्र आधार परमात्म्याचे नाम आहे.तेच माझे जीवन, प्राण आणि धन आहे."

### (३५) राग सारंग

**जगमे वेद[वेद]बैद[वैद्य]मानी जै।**
**इन मंहि अवरु[आणि]अगम[अगम्य]कछु औरे, कहौ[म्हणणे]कवन[कोण]परि कीजै॥ टेक ॥**
**भौजल[संसारसागर]ब्याधी असाधि[असाध्य]प्रवास अति, परम[उच्चतम]पंथ न गहीजे[स्वीकारणे]।**
**पढै सुनै कछु समुझि न परई[होणे]अनभै[अनुभव]पदु[स्थिती]न लहीजै[प्राप्त]॥**
**चषि[चक्षु दृष्टी]बिहुन[शिवाय]कतार चलत हैं, तिनहू अंश भुज[हात]दीजै।**
**कहै 'रविदास' बमेक[विवेक]तत[तत्त्व]बिनु, सब मिलि गरत परीजै[खड्डा.]॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) ९१

**भावार्थः**—जगात वेदाला वैद्य अर्थात सर्व रोगांना औषध देणारा असे मानले जाते.परंतु या वेदात आणखी काही गोष्टी सांगितल्या आहेत आणि आमचा अगम्य अनुभव आणखी काही दाखवित आहे.यामध्ये कोणाचे म्हणणे मानले पाहिजे?

अनुक्रमणिका

संसार सागराचा रोग अत्यंत प्रबल आणि असाध्य आहे.उच्चतम मार्ग स्वीकारल्याशिवाय यातून सुटका होणे संभव नाही.फक्त वाचणे, लिहिणे आणि शास्त्र किंवा कथा, बातम्या ऐकल्याने आम्हांस काही समजत नाही.जोपर्यंत आम्हास आंतरिक अनुभवाची स्थिती प्राप्त होत नाही.

आंतरिक दृष्टिशिवाय जगातील लोक एक दुसऱ्याचे हात पकडून एकामागे एक आंधळ्यांच्या रांगे प्रमाणे चालतात.रोहिदास म्हणतात की, "तत्त्व विवेका (सत्याची पारख) शिवाय सगळे संसारी लोक अंगाररुपी खड्ड्यात पडतात."

(३६)

**ऐसो कछु अनभउ, कहत न आवे।**
**साहिब**[प्रियतम]**मेरो मिले, तउ को बिलगावे**[अंतर]**॥ टेक॥**
**सब मे हरि है हरि मे सब है, हरि अपनौ जनि**[जन]**जाना।**
**आपनि आपि साषी**[साक्षी]**नहिं दूसर, जाननहार सयाना**[बुध्दिमान, ज्ञानी]**॥ १॥**
**बाजीगर सूं रांचि**[प्रेम करणे, अनुरक्त होणे]**रहीऐ, बाजी**[जादू]**कूं मरम**[मर्म]**इनि**[यानी]**जाना।**
**बाजी झूंठ साँच बाजीगर, जाना मन पतिआना**[विश्वास करणे]**॥ २॥**
**तन थिर**[स्थिर]**होइ तो काइ न सूझै, जानै जानन हारा**[जाणणारा]**।**
**कहै 'रविदास' विमल बमेक**[विवेक]**सुख, सहज सरुप**[स्वरूप.]**संभारा॥ ३॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) ११

**भावार्थ.**—परमात्म्याच्या आंतरिक अनुभवाची स्थिती सांगता येत नाही.जेव्हा आमचा प्रियकर (प्रभू) आम्हांला भेटून एकाकार होतो तेव्हा त्यामध्ये अंतर दूजेपणा) कोण निर्माण करू शकतो?

परमात्मा सर्वामध्ये आहे.परमात्म्याचे ज्ञान आपोआप होते यास दुसरा कोणी साक्षी होऊ शकत नाही.हे ज्ञान प्राप्त करणारा खरा ज्ञानी आहे.

जगाच्या जादूची रचना करणाऱ्या जादूगार परमात्म्याबरोबर प्रेम करा.ह्या जादूचे रहस्य त्यास माहित आहे.जगाचा हा जादू खोटा आहे.फक्त जादूगारच (परमात्मा) खरा आहे.

ध्यानावस्थेत जेव्हा शरीर स्थिर होते तेव्हा बाहेरच्या खोट्या जग-जादूचे ध्यान राहात नाही.रोहिदास म्हणतात की, "ह्या अवस्थेमध्ये निर्मल विकारयुक्त आनंद निर्माण होतो आणि साधक सहज अवस्था मिळवून परमात्म्याच्या खऱ्या स्वरुपाचे दर्शन करतो."

## ३.जीवीत गुरुची आवश्यकता

### गुरु आणि परमात्म्याची एकता

परमात्म्याचा साक्षात्कार करण्यासाठी पूर्ण संत किंवा खरे गुरु परमात्म्याचे व्यक्त रुप होते.खरे गुरू व परमात्म्यामध्ये काही अंतर नसते.अहंकार हाच मनुष्य आणि परमात्मा यांचे मधील एकमात्र पडदा आहे.खरे

संत ह्या पडद्यास काढून आपण आपल्याला परमेश्वराशी (नदी समुद्रास एकरुप होते त्याप्रमाणे) एकरुप होतात.

परमात्मा मनुष्याच्या उद्धारासाठी मानवीरुप धारण करून जगात येतात आणि त्यांच्या ह्या मानवी रूपास"गुरू" नाव दिले जाते.अर्थात गुरू मनुष्यरुपात परमात्मा आहे.गुरू आपल्या मानवी रुपाच्या माध्यमाने मनुष्य प्राण्यास चैतन्य देतात आणि त्यांना योग्य मार्ग दाखवून आपल्या कृपेने परमात्म्याची भेट घडवितात.

संत-सतगुरु हे उच्च किंवा नीच कोणत्याही कुळात जन्म घेतात तसेच गरीब किंवा श्रीमंतीमध्येही राहातात.ह्या संसारिक परिस्थितिमुळे त्यांच्या आध्यात्मिक ज्ञानावर काही परिणाम होत नाही.त्यांच्या भगवत प्रेमाची निर्मळ धारा त्यांच्या संपर्कात येणाऱ्या लहान मोठ्यांना एकसारखे पवित्र करते.पाण्यात राहून पाण्यापासून दूर राहाणाऱ्या कमळाप्रमाणे संत सतगुरु संसारात राहून न रहिल्याप्रमाणे ते आपल्या आध्यात्मिक कीर्तिचा सुगंध पसरवितात.

### (३७) राग आसा

**संत तुझी तनु**[शरीर]**संगति प्रान, सति गुर गिआन जानै संत देवादेव**[देवाधिदेव (सर्वश्रेष्ठ देव)]**।**
**संत ची संगति संत कथा रसु, संत माझे दीजै देवादेव॥ रहाउ॥**
**संत आचरण संत चो मारगु, संतच ओल्हग**[सेवक]**ओल्हगणी**[सेवा]**।**
**अउर इक मांगऊ भगति चिंतामणि**[सर्व इच्छा पूर्ण करणारा मणी]**,जणी लखावहू**[दिसणे]**असंत पापी सणी**[संभव]**।**
**रविदास भणै**[म्हणतात]**जोजाणै**[जाणकार]**सो जाणु, संत अनंत हि**[परमात्मा.]**अंतरू नाहि॥**
—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) १३२

**भावार्थः**—हे प्रभू, संत जनच तुझे शरीर (साकाररुप) आहे आणि त्यांची संगतच तुझे प्राण आहेत.हे देवाधिदेवा, (परमात्मा) संतांची ओळख सतगुरुने दिलेल्या ज्ञानानेच होऊ शकते.हे देवाधिदेवा, कृपा करुन मला संतांची संगत, संत कथांचा रस, संताशी शरण आणि प्रेम द्या.

संताप्रमाणे आचरण, संताचा मार्ग आणि संताची सेवा मला दे.मी आणखी एक वस्तु मागतो.मला भक्तिरुपी चिंतामणी (सर्व इच्छा पूर्ण करणारा मणी) तसेच असंत व पापी लोकांची संगती कधी देऊ नको.

रोहिदास म्हणतात की, "संत आणि परमात्मा यामध्ये काही अंतर नाही.हे जो जाणतो, तोच खरा जाणकार आहे."

### (३८) राग बिलावल

**जिहि**[ज्या]**कुल साधु बैसनो**[विष्णुभक्त]**होइ।**
**बरण अवरण**[नीच जात]**रंकु**[गरीब]**नहीं इसुरू,**[मालक, राजा]**,विमल**[पावन]**बास**[सुवास]**जानीऐ जगि सोई**[पसरणे]**॥ टेक॥**
**ब्रहमन बैस सूद अरु ख्यत्री, डोम चंडार**[चंडाळ]**मलेछ**[म्लेच्छ]**मन सोई।**
**होइ पुनीत**[पवित्र]**भगवंत भजन ते, आपु**[आपण]**तारि तारे कुल दोइ॥ १॥**

अनुक्रमणिका

**धनि[धन्य]सु गाऊं[गाव]धनि सो ठाऊ[ठिकाण],धंनि पुनीत कुटंब सभ लोइ[लोक]।**
**जिनी पीआ सार रसु तजे आन रस, होइ रस मगन डारे बिषु[विष (दुर्गुण इ.)]खोइ॥ २॥**
**पंडित सूर[शूर]छत्रपति राजा, भगत बराबरि अउरू[आणि]न कोइ।**
**जैसे पुरैन[कमळ]पात रहै जल समीप, भनि 'रविदास' जनमे जगि ओइ[तोच.]॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) १२८

**भावार्थः**—ज्या कुळात कोणी खरा साधु किंवा प्रभुभक्त जन्मला.तो उच्च असो की, नीच राजा असोकी गरीब, त्याचा पवित्र कीर्ती सुगंध सर्व जगात पसरतो.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र, डोम, चंडाळ किंवा म्लेच्छ (अपवित्र) कोणीही व्यक्ती परमात्म्याच्या भजनाने पवित्र होते.ती व्यक्ती दोन्ही वंशाचासुद्धा (मातृवंश व पितृवंश) उद्धार करते.

त्या गावाचे, त्या ठिकाणाचे व त्या पवित्र परिवारातील सर्व लोक धन्य होत.ती व्यक्ती सर्व अन्य रसांचा त्याग करून प्रभुनामाचा रस पिते आणि त्यात निमग्न होऊन संसाराच्या सर्व विषारी दुर्गुणांचा (काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार) विसर पाडते.

कोणी पंडित असो, शूरवीर किंवा छत्रपती राजा असो.परंतु भक्ताची कोणीही बरोबरी करू शकत नाही.ज्याप्रमाणे कमळाचे पान पाण्याजवळ असूनही अस्पृश्य असते त्याप्रमाणे भक्तजन संसारात राहूनही नेहमी विरक्त राहतात.रोहिदास म्हणतात की, "अशा भक्ताचा जन्म जगात सफल आहे."

## ईश्वर साक्षात्कारासाठी गुरुची आवश्यकता

आपल्या भौतिक सीमामुळे आपण आपल्या परमात्म्याच्या अलौकिक रुपाचे दर्शन घेण्यास असमर्थ आहे.परंतु मनुष्य पूर्ण गुरूच्या संपर्कात येतो.जे परमात्म्याचे साकार रुप आहे.तेव्हा गुरुमार्फत परमात्म्याशी संपर्क स्थापन करून घेतो.गुरुच्या कृपेने परमात्म्याबरोबर त्याचा मिलाप होतो.एकमात्रगुरुच आम्हांस मार्ग दाखवू शकतो.आमचे पाप नाहीसे करून पवित्र करू शकतो.आणि आतील शब्द धुनने जोडून आम्हांस अदृश्य, अगम्यापर्यंत पोहचवू शकतो.अन्य सर्व प्रकारच्या बहिर्मुखी धार्मिक क्रिया व्यर्थ आहेत.त्या क्रिया आमची केवळ फसवणूक करतात.

प्रभुनामच परमात्मा प्राप्त करण्याचे एकमात्र साधन आहे.ते नाम फक्त गुरुमार्फतच मिळू शकते.फक्त गुरुच आम्हांस खऱ्या प्रेमाची दीक्षा देऊन अर्थात खऱ्या नामाशी जोडून परमात्म्याजवळ जाण्याचा दरवाजा उघडतो.तो ज्ञानदीप प्रज्वलित करतो.आमचा आंतरिक डोळा व कान उघडतो.तसेच जगातील मायाजाळ व संकटे दूर करून संसाररुपी समुद्र पार करतो.

गुरु सभु[सर्व]रहसि अगमहि जानै।
ढूंढै कोउ षट सास्त्रन[सहा शास्त्र (न्याय, वैशेषिक, सांख्य, योग्य, मिमांसा, वेदांत]मंह, किघु[आणि]कोउ वेद वषनै[व्याख्यान करणे, प्रशंसा करणे]॥ टेक॥
सांस उसांस[उच्छवास]चढावे बहुविध, बैठहिं सूंनि[शुन्य]समाधि[दहाव्या दरवाजाचा अंधार गुरुशिवाय पार करू नाही.]।
फांट्यो[फाडणे]कानू भभूत[भस्म]तनु लाई, अनिक[अनेक]भरमत[भटकणे]वैरागी॥ १॥
तीरथ बरत[व्रत]करई बहु तेरे, कषा[भगवे]बस्त[वस्त्र]बहु सानै[गुंडाळणे]।
कहि"रविदास" मिल्यौ गुर पूरो[पूर्ण]जिहि[ज्यांनी]अंतर[आत.]हरि मिलानै॥ २॥

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) ७८

**भावार्थः**—गुरू अगम्य परमात्म्याच्या सर्व रस्त्यांना जाणतो.परंतु गुरुस शरण न जाता, कोणी षट दशर्नामधे परमात्म्याचा शोध करतो आणि वेदाचे वर्णन करतो.

काही लोक अनेक प्रकारचे श्वास-उश्वास करण्यात लागले आहेत.काही लोक शुन्य समाधी लावून बसले आहेत.काही लोक कान फाडतात आणि काही लोक शरिरास भस्म लावतात.काही लोक वैरागी बनून भटकत फिरत असतात.

बरेच लोक तीर्थ-व्रत करण्यास लागले आहेत.आणि बरेचसे भगवे वस्त्र गुंडाळून फिरत आहेत.परंतु रोहिदास म्हणतात की, "ज्यांनी त्यांना आतील परमात्म्याबरोबर भेटविले आहे.त्यांना पूर्ण गुरू मिळाले आहेत."

(४०)

सत गुर हमहु लषाई[दाखविणे]बाट[वाट, रस्ता]।
जनम पाछले पाप नसाने[नष्ट झाले],मिटियौ सनु संताप॥ टेक॥
बाहरि षोजत[शोध करीत]जनम गंवाए, उनमनि[आंतरिक ध्यान स्थितितून जेव्हा मन आत जाऊन वरच्या केंद्रात टिकते तेव्हा तिला 'उन्मनि ध्यान'म्हणतात]ध्यान रहे घट आप[ईश्वर]॥
सबब अनाहद बाजत घट मंह, अगम ग्यांन भौ[झाले]गुर परताप॥ १॥
धन दारा मंह रहियो मगन[विचारकरणे]नित, गुन्यौ न मिचु[मृत्यु]कौ ताप।
कहि 'रविदास' गुरु रह दिषावइ[दाखविली],त्रिषा[तृषा (तहान)]बुझि मिटि मन संताप[दुःख]॥ २॥

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) ५४

**भावार्थः**—सत्गुरुने आम्हास मार्ग दाखविला आहे.आमच्या पूर्व जन्मातील सगळी पापे नष्ट झाली आणि आमचे सगळे दुःख नाहीसे झाले.

बाहेर परमात्म्याचा शोध करीत आम्ही आपला जन्म फुकट घालविला परंतु तो परमात्मा तर आमच्या अंतर्मुखी ध्यानामध्ये निवास करतो.आमच्या आत आता अनहद शब्द वाजत आहे.हे अगम्य ज्ञान आम्हांस गुरुकृपेने प्राप्त झाले.

अनुक्रमणिका

आम्ही अज्ञानामुळे धन, दौलत व स्त्रीमध्ये नेहमी मग्न राहिलो होतो आणि मृत्युच्या त्रासाची चिंता करीत नव्हतो.

रोहिदास म्हणतात की, “आता गुरुने आम्हांस मार्ग दाखविला आहे.त्यामुळे आमची संसारिक विषयाची तृष्णा नाहीशी झाली आणि मनाचे क्लेश नाहीसे झाले आहेत.”

### खऱ्या गुरुचे लक्षण

वास्तविक पाहाता खऱ्या गुरुची ओळख कोणत्याही बाहेरच्या चिन्हांनी केली जात नाही.खरा गुरू (सतगुरू) वास्तविक परमात्म्याचे रुप असते.त्याची आंतरिक वृत्ती नेहमी परमात्म्यामध्ये लीन असते.त्याचा नामच आधार असतो.बाहेरून दिसावयास तो गृहस्थी जीवन जगतो आणि खऱ्या कमाईने आपले जीवन चालवितो, तो कधीसुद्धा दुसऱ्याचा भार बनत नाही.

संसारिक सुख-दुःख, जन्म-मरण, लाभ-हानी तसेच जीत-हार इत्यादीमुळे त्यास आनंद किंवा दुःख होत नाही.तो कधीसुद्धा अकर्मन्यता किंवा निष्क्रियतेचे जीवन घालवित नाही.तो कोणत्याही फळाची अपेक्षा न करता नेहमी आपल्या कर्तव्य पालनात गुंतलेला असतो.तो संसारात राहूनसुद्धा नसल्याप्रमाणे राहातो.त्याच्यात थोडाही अहंकार (घमेंड, गर्व) नसतो.तसेच कोणाबद्दल द्वेषभाव नसतो.तो सर्वांच्या कल्याणाची कामे करीत राहतो.दुसऱ्यांना दुःखी पाहून तो दुःखी बनतो. तो नेहमी परोपकार करतो पण त्याचा देखावा करीत नाही. तो स्वतःला गुरु म्हणण्याची इच्छा ठेवीत नाही.तो नेहमी सत्यव्रताचे पालन करतो.तसेच तो खोटे, कपट व पक्षपातापासून नेहमी दूर राहतो.तो नेहमी गोड बोलतो.तो आतून बाहेरून निर्मळ आणि पवित्र असतो.तसेच विषयाचे प्रलोभन त्यास शिवतसुद्धा नाही.

मनाच्या सर्व विकारास दूर करून तसेच संसाराच्या सर्व आशा आणि तृष्णांचा त्याग करून तो आपले संपूर्ण जीवन परमेश्वरास समर्पित करतो.तसेच आपण आपल्यास परमेश्वरात पूर्ण विलिन करून परमात्म्याचे खरे रूप बनतो.

### (४१) राग सारंग

**हरि सुमिरे सोइ**[समजणे]**संत बिचारौ।**
**अवरू**[अन्य]**जनम बेकाम**[व्यर्थ]**राम बिन, कोटि जनम सौ उपरि**[वर]**बारौ**[अर्पण करणे]**॥ टेक॥**
**हरि पद विमुख कुटिल मायारत, राम चरण चितहु न सानै।**
**जिन मन मानु हउमै**[अहंकार]**बसहि, तिह जन संत कहौ किम मानै**[अर्थ]**॥ १॥**
**कपट ज्यूंभ**[पाखंड, दंभ]**पर निंदा बूडौ, संत जनम भौ किलविष कारी**[पाप निर्माण करणारा]**।**
**ज्यौ बरिषा रुत**[ऋतु]**बूंद उदधि**[समुद्र]**मंह, आई मिलै सोई जल खारौ॥ २॥**
**ना परसंगि सीप स्वाति नछत्र, मोती निपजत**[उत्पन्न होणे.]**नीर तै न्यारौ।**
**कहि ‘रविदास’ मोह मद त्यागै, राम चरण मन संत विचारौ॥ ३॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) १७५

अनुक्रमणिका

**भावार्थः**—जो परमात्म्याचे स्मरण करतो, त्यासच संत समजले पाहिजे.अशा संतावर कोटी जन्म ओवाळून टाकावेत.परमात्मा भक्तिशिवाय इतर सर्व जन्म व्यर्थ आहेत.

जे कुटिल कारस्थाने करून जनतेचा पैसा जमविण्यात निमग्न असतो व परमेश्वर भक्ती करीत नाही.ज्याचे मनात प्रतिष्ठा प्राप्त करण्याची भावना व अहंकार आहे, अशा व्यक्तिस संत कोणत्या अर्थाने म्हटले जाऊ शकते?

त्याप्रकारच्या व्यक्ती संत बनण्याचे ढोंग करून, रचून दंभ, कपट आणि परनिंदेत निमग्न होऊन आपला जन्म पापमय बनवितात.उदाहरणार्थ—वर्षाऋतुत पाण्याचे थेंब समुद्रात पडतात व त्याचे खारेपाणी बनते.

पण तेच पाण्याचे थेंब स्वाती नक्षत्रात शिंपल्यात पडल्यास मोती निर्माण करतात.जे लोक शुद्ध निष्कपटमनाने स्मरण, भजन करून परमेश्वर भक्ती करतात त्यांचे जीवन धन्य होते.त्यांना रामनामाचा मोती प्राप्त होतो.रोहिदास म्हणतात की, “जे मोह व अहंकाराचा त्याग करून आपल्या मनास परमेश्वरचरणी लावतात.त्यांनाच संत समजले पाहिजे.”

## खऱ्या गुरू भेटीचे सुख

ज्या दिवशी परमात्म्याचे आवडते भक्त संत सत्गुरू भेटतात, तो दिवस अत्यंत सौभाग्याचा होय.परमेश्वराचे आवडते संत जन जेथे पाय ठेवतात, बसतात, ते ठिकाण पवित्र होते.संत जन ह्या जगात केवळ दयेनेच परोपकारासाठी येतात.तसेच जे प्राणी त्यांच्या संपर्कात येतात, त्यांच्याकडून दीक्षा घेतात, त्यांना ते संसाररुपी सागरातून पैलतीरावर घेऊन जातात.

शिष्यांना आपल्या सत्गुरुच्या दर्शनाने जो आनंद प्राप्त होतो तो अवर्णनीय असतो.माया मोहाच्या अंधारात विषय वासनेत आसक्त झालेल्या प्राण्यांना त्या अलौकिक आनंदाचा आभाससुद्धा होऊ शकत नाही.त्या खऱ्या संतांच्या अद्भुत महिमाची आणि निराळ्या शान शोभेची कल्पनासुद्धा करू शकत नाही.

### (४२) राग-गौड़ी गोंड

**आज दिवस लेउं बलिहारा**[धन्य, आनंदी],
**मेरे ग्रिह आया राजा राम जी का प्यारा॥ टेक॥**
**आंगन बगड़**[बैठकीची जागा]**भुवन भयौ पावन, हरिजन**[प्रभुभक्त]**बैठे हरि जस गावन**[यशगान]**।**
**करौं डंडौत**[दंडवत]**अरू चरन पषारौ**[धुणे]**,तन मन धन संतन पर वारौ**[ओवाळणे]**॥**
**कथा करै अरू अरथ विचारै**[दाखविणेसांगणे]**,आप तरै**[मुक्त होणे]**औरनि कौ तारे।**
**कहै ‘रविदास’ मिलै निज दास, जनम जनम कै काटै पास**[पाश, फांस, बंधन.]**॥ १॥**
—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) ८९

**भावार्थः**—आजचा दिवस धन्य आहे.कारण माझ्या घरी प्रभु परमात्म्याचे आवडते भक्त संत सत्गुरु आले आहेत.

अनुक्रमणिका

माझे घर, बैठकीच्या जागा व अंगण पवित्र झाले.प्रभुभक्त बसून परमात्म्याचे यशगान करीत आहेत.मी आपल्या सत्गुरुच्या चरणी डोके वाकवितो.त्यांचे पाय धुतो.तसेच त्यांचेवर आपले तन, मन व धन ओवाळून टाकतो.

ते हरिकथा सांगतात.संताच्या वाणीचा (पदांचा) अर्थ सांगतात, ते स्वतः मुक्त आहेत व इतरांनाही मुक्त करतात.रोहीदास म्हणतात की, "जर परमात्म्याचा आवडता सेवक भेटतो अर्थात सत्गुरुचीभेट होते.तेव्हा तो जन्म जन्मांच्या कर्मातून मुक्त होतो".

### (४३) राग बिलावल, दुपदा

**जौ सुख होत साध**[साधुसंत]**कूं भेटे, गावत**[यशोगान]**स्याम**[प्रभु]**सकल दुख मेटे**[नाहीसे होणे]**॥ टेक॥**

**ते किम**[सकना]**जांनहि संतन महमा, जौ माया जंजाल लपेटे।**

**अठट पहरि तिन्हि कछु नहिं सूझई**[सुचणे]**,ज्यू**[ज्याप्रमाणे]**तेली कूं व्रिषभ**[बैल]**संकटे**[संकटात पडणे]**॥ १॥**

**जौ जन राम नाम नहि उचरै**[उच्चार]**,उदर भरइ ज्यूं गरदभ**[गाढव]**लेटे।**

**जन रविदास रामु बल गरजति, मनहुँ च्यारि पदारथ**[चार पदार्थ (अर्थ, काम, धर्म व मोक्ष).]**भेटे॥ २॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) पद क्र.१७१

**भावार्थः**—साधु संत भेटल्याने जे सुख प्राप्त होते.ते कसे सांगता येईल?त्यांच्या उपस्थितीमध्ये प्रभुचे यशोगान करताना सर्व दुःख नाहीसे होते.

जे लोक माया जंजाळात गुरफटलेले आहेत ते लोक संतांची महिमा कसे जाणू शकतील?ज्याप्रमाणे तेल्याचा बैल डोळ्यावर ढापण असल्यामुळे न पाहाता नेहमी चालतो; त्याप्रमाणे अज्ञान लोक मायेने आंधळे झाल्यामुळे संसाराशी झुंजत असतात.त्यामुळे त्यांना आठ प्रहर काही सूचत नाही.

जी मनुष्ये परमात्म्याचे नाम उच्चारित नाहीत, प्रभुचा जप करीत नाहीत, ते जणू काय गाढवाप्रमाणे पडून पोट भरतात.रोहिदास म्हणतात की, "जे परमात्म्याच्या भक्तिमध्ये लीन आहेत.ते लोक जणू काय अर्थ, काम, धर्म व मोक्ष ह्या चारी पदार्थांची प्राप्ती झाल्याप्रमाणे परमात्म्याच्या बळावर आनंदाने सिंहनाद करतात.

## ४.सत्संगाचे महत्त्व
### संगतीचा प्रभाव

मनुष्य इतर प्राण्यांपेक्षा अधिक संवेदनाशील व गुणग्राही असतो.यासाठी मनुष्यावर संगतीचा प्रभाव सर्वांपेक्षा अधिक पडतो.मनुष्य संतांची संगत किंवा संत्संगतीमध्ये येऊन हळूहळू आध्यात्मिक गुणांना ग्रहण करतो किंवा परमात्मा प्राप्तिच्या प्रयत्नात लागतो.परंतु वाईट माणसांच्या संगतीमध्ये पडून तो वाईट व्यसनांच्या आहारी जातो.

अनुक्रमणिका

संत्संगाशिवाय आध्यात्मिक भावाची उत्पत्ती होत नाही आणि आध्यात्मिक भावाशिवाय परमात्म्याची भक्ती निर्माण होत नाही.यासाठी संत रोहिदास दुष्टांच्या संगतीचा त्याग करणे आणि संतांची संगत धरण्यांवर विशेष जोर देतात.कारण संत हे परमात्म्याचे व्यक्त किंवा साकार रूप असते.परमात्म्याची प्राप्ती संतांच्या कृपेनेच संभव असते.संत्संग ईश्वर साक्षात्काराचे एक जरूरीचे साधन मानले जाते.मनाच्या विकारांना दूर करणे आणि परमात्म्यासंबंधी भक्ती आणि प्रेम वाढविण्यासाठी सत्संगापेक्षा मोठे दुसरे कोणतेच साधन नाही.

### (४४) राग आसा

**प्रभुजी संगति सरनि तिहारी**[तुमच्या]**।**
**जग जीवन राम**[परमात्मा]**मुरारी॥टेक॥**
**गली गली कौ नीर**[पाणी]**बहि आयो, सुरसरी**[सरस्वती गंगाजल]**जाइ समायो।**
**संगती कै परताप महातम, नांव गंगोदिक पायो॥ १॥**
**स्वांति बूंद बरषै फनि**[सर्पफणा]**ऊपर सीस**[डोके]**विषै विष होई।**
**वाही बूंद को मोती निपजै**[उत्पन्न होणे]**संगति की अधिकाई॥ २॥**
**तुम चंदन हम इरंड**[एरंडाचे झाड]**,बापुरे, निकटि तुम्हारे बासा**[निवास]
**नीच व्रिष तै ऊँच भए है, तुम्हारी बास सुबासा**[सुवास]**॥ ३॥**
**जाति भी ओछी**[नीच]**पांति भीओछी, ओछा कसब**[व्यवसाय.]**हमारा।**
**तुम्हारी क्रिपा तै ऊंच भए है, कहै 'रविदास'चमारा॥ ४॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) ११६

**भावार्थः**—हे जगाच्या जीवन रुपी रामा, हे परमेश्वरा, मी तुझ्या संगतीस शरण आलो आहे.

गलोगलीचे पाणी वाहून जेव्हा ते गंगा नदीच्या पाण्यात मिळते, तेव्हा त्यास 'गंगाजल' म्हणतात.हे चांगल्या संगतीचा प्रताप व महात्म्य आहे.

स्वाती नक्षत्राच्या पावसाचे थेंब जेव्हा सर्पाच्या (डोक्यावर) पडतात.तेव्हा त्या थेंबाचे सापाच्या डोक्यात विषात रुपांतर होते.परंतु तेच स्वातीचे थेंब जेव्हा शिंपल्यात पडतात तेव्हा शिंपल्यात मोती उत्पन्न होतात.वाईट किंवा चांगल्या संगतीचा हा परिणाम आहे.

हे सद्‌गुरु, तू चंदनाचा (सुगंधीत) वृक्ष आहे आणि मी बिचारा एरंडाचे (सुवासहिन) झाड आहे.परंतु तुझ्या सहवासामुळे मी सुवासिक वृक्ष झालो आहे.

संत रोहिदास म्हणतात की, "हे प्रभु, माझी जातपात नीच आहे, माझा व्यवसायसुद्धा नीच आहे, परंतु तुझ्या कृपेमुळे मी ऊंच बनलो."

### (४५) राग मल्हार

**नागर जना**[नागरिक]**मेरी जाति बिखिआत**[विख्खात, प्रसिद्ध]**चमारं ।**
**रिदै**[ह्रदय]**राम गोविंद गुन सारं॥ रहाउ॥**
**सुरसरी सलल**[पाणी]**कृत बारूनी**[दारू]**रे, सन्त जन करत नही पान**[पिणे]**।**
**सुरा**[दारू]**अपवित्र नत अवर जल रे, सुरसरि मिलत होइ नहि आनं॥ १॥**

अनुक्रमणिका

**तर तार[ताड]अपवित्र करि मानीऐ रे, जैसे कागरा[कागद]करत बीचारं।**
**भगति भागउतु[ज्ञान]लिखीऐ तिह ऊपरे, पूजीऐ करि नमस्कारं॥ २॥**
**मेरी जाति कुटबांढला[चांभाराची पोट जात]ढोर[जनावर]दुबंता[वाहाणे],नितहि बनारसी आसपासा।**
**अब विप्र परधान[प्रमुख]तिहि करहि डंडउति[दंडवत.],तेरे नाम सरणाई रविदास दासा॥ ३॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) ९१

**भावार्थः**—हे नागरिकांनो, मी, सुप्रसिद्ध चांभार जातीचा आहे.परंतु माझ्या ह्रदयात प्रभू परमात्म्याच्या गुणांचे रहस्य प्रगट झाले आहे.

अपवित्र दारू गंगाजळ घालून तयार केली तरीसुद्धा संतमंडळी ती पिऊ शकत नाही.परंतु तीच अपवित्र दारू किंवा दुसरे घाण पाणी गंगेच्या प्रवाहात सोडल्यास गंगाजल होते.दुसरे काही होत नाही.

ताडीचा वृक्ष अपवित्र मानला जातो.परंतु त्याची पाने कागदरुपात विचाराधिन होतात.त्यावर भक्ती व ज्ञानाच्या गोष्टी लिहिल्या तर त्यास आदरपूर्वक नमस्कार केले जातात.

माझी जात कुटबांढला (चांभार जातीची पोटशाखा) व माझ्या जातीचे लोक दररोज बनारसच्या आसपास मेलेली जनावरे वाहतात.परंतु हे प्रभू, तुझ्या ह्याभक्त रोहिदासाला आता प्रमुख ब्राह्मण दंडवत, प्रणाम करतात.हे तुझ्या नामाला शरण आल्याचे फळ आहे.

## (४६) राग धनाश्री

**चित सिमरनु करउं नैन अविलोकनो, श्रवन बानी सुजसु[सुयश]पूरि राखउं।**
**मनु सु मधुकर[भुंगा]करउं चरन हिरदे धरउं,**
**रसन[जीभ]अमृत राम नाम भाखउं[उच्चारणे]॥ १॥**
**मेरी प्रीती गोविंदु[प्रभूला]सिउ जिनि घटै,**
**मै तउ मोलि[मूलय]महंगी लई जीअ सटै[अर्पण करणे]॥ रहाउ॥**
**साध संगति बिना भाउ[भाव]नहीं उपजै,**
**भाव बिनु भगति नहीं होई तेरी॥**
**कहै रविदास इक बानी[विनंती]हरि सिउ,**
**पैज[लाज.]राखउ राजा राम मेरी॥ २॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) १०२

**भावार्थः**—हे प्रभू, मी तुला मनात स्मरण करीत राहू.मी आपल्या आंतरिक नेत्राने तुझे दर्शन व ध्यान करीत राहू.आंतरिक कानास तुझी सुमधूर वाणी किंवा अनहद नाद (आवाज) पूर्ण ऐकू येवो.तुझ्या चरण कमळास ह्रदयात स्थापन करून आपल्या मनास भँवरा बनवून त्यात गुंतवून ठेवू आणि आंतरिक जिव्हेने प्रभुच्या अमृताने भरलेल्या नामाचे उच्चार करीत राहू.

अनुक्रमणिका

प्रभूसंबंधी माझी प्रीती कधी कमी न होवो.मोठ्या महाग किंमतीवर मी त्या प्रीतीस प्राप्त केले आहे.आपल्या जीवनाचे बलिदान चढवून त्याच्या बदली मी प्रभू प्रीतिचा सौदा केला आहे.

साधुसंतांच्या संगतीशीवाय प्रभूभक्ती उत्पन्न होऊ शकत नाही.रोहिदास म्हणतात की, "प्रभूला माझी एक विनंती आहे की, हे प्रभु परमात्मा, माझी लाज राख, माझी लाज सांभाळून घे."

## ५.नाम भक्ती
## नामाची सर्वोच्चता

नामच परम सत्य आहे, ते आदिपासून अंतापर्यंत नेहमी विद्यमान राहणारे आहे.नाम ही अशी शक्ती आहे की, तिच्यामुळेच परमात्मा आपल्याला अभिव्यक्त करता येतो.परमात्मा सर्वांमध्ये आहे. आम्ही जोपर्यंत नामभक्तिचा अभ्यास करीत नाही, तोपर्यंत परमात्मा प्रगट होत नाही.परमात्म्याने स्वतःआपल्या प्राप्तीचा मार्ग आमच्यासाठी बनवून ठेवला आहे. दुसरे कोणतेही साधन नामभक्तिपुढे फिके आहे.विशेषकरून कलियुगात परमात्मा भेटण्याचा नामभक्तिशिवाय अन्य कोणतेही साधन नाही.रोहिदासांनी स्पष्ट शब्दात सांगितले आहे की, ह्या कठीण संसार सागराला नामरुपी नौकाच पार करू शकते.जो नामाऐवजी दुसऱ्या कोणत्याही लहान मोठ्यासाधनांचा प्रयत्न करील, तो मोठ्या मजबूत नावेऐवजी लहान कमजोर होडीने भयंकर संसार सागर पार करण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे.तो स्वतःस भयंकर कष्टात व संकटात टाकण्यासारखे आहे.

नामाची एक छोटीशी ठिणगी आपल्या पापाच्या मोठमोठ्या ढिगांना जाळून नष्ट करते.नामरुपी अमृताचा एक थेंब आमची तहान भागवतो.नाम हे समस्त ज्ञान व आनंदाचे भांडार आहे.तसेच ते मुक्ती मिळण्याचे एक द्वार आहे.

### (४७) राग सोरठि

**सुख सागरू**[सुखाचा समुद्र]**सुरतर**[तोंडाने मागील ती वस्तु देणारा वृक्ष]**चिंतामनि**[सर्व इच्छा पूर्ण करणारेरत्न]**,कामधेनु**[सर्व इच्छा पूर्ण करणारी स्वर्गाची गाय]**बसि जाके।**
**चारि पदारथ**[चार पदार्थ]**असट दसा सिधि**[अठरा सिद्धी]**नवनिधि**[नऊ निधी]**करतल**[हातात]**ताके।**
**हरि हरि हरि न जप**[तप]**रसना, अबर तिआगो**[सोडणे]**वचन रसना**[कृत्रिम-बनावटी]**॥१॥**
**नाना खिआन**[आख्यान, कथा]**पुरान वेद विधि, चउतीस अंखर**[चौतीस अक्षरे]**मांही।**
**बिआस**[व्यास]**बिचारी कहिओ परमारथु, राम नाम सरि**[बरोबरी]**नांही॥२॥**
**सहज समाधि उपाधि रहत**[रहित]**फुनि**[पुन्हा]**,बडै भागि**[मोठा भाग्यवान]**लिव**[स्थान]**लागी।**
**कहि 'रविदास' प्रगासु**[प्रकाश]**रिदै**[हृदय]**धरि, जनम मरण भै**[भय]**भागी॥३॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) १२९

**भावार्थ :**—हे जीवा, जो परमात्मा सुखाचा समुद्र आहे.ज्याच्या ताब्यात कल्पवृक्ष, चिंतामणि व कामधेनु आहे.तसेचज्याचे हातात धर्म, अर्थ, काम, मोक्ष, हे चार पदार्थ, अठरा सिद्धी व नऊ निधी आहेत.त्या प्रभुचे नाम तू आंतरिक जिभेने कां जपत नाहीस? तू सर्व व्यर्थ बनावटी गोष्टींना सोडून दे.

अनुक्रमणिका

पुराण कथा आणि वेद-विधि वर्णमालेच्या चौथीस अक्षरांचे वाग्विस्तार आहेत.वेदाचा लेखक व्यासांनी विचार करून हे परमार्थी तत्व सांगितले आहे की, वर्णात्मक शब्द जंजाळ हे परमात्म्यांचे निःअक्षर किंवा धुनात्मक खऱ्या नामाची बरोबरी करू शकत नाही.

मोठ्या भाग्याने जेव्हा कोणा प्राण्याचे ध्यान संसारिक त्रासाशिवाय सहज अवस्थेत समाधीत निमग्न होते.तेव्हा त्या खऱ्या नामाची अनुभूति होते.रोहिदास म्हणतात की, “त्या अवस्थेच्या प्रकाशाला हृदयात धारण केल्याने जन्म-मरणाचे भय नेहमीसाठी दूर होते.

(४८)

**थोथौ**[खोटे निसत्व, निस्सार]**जिनि सोई पछोरी**[पाखडून टाकणे]**रे कोई, पछोरो जा मे निज कन**[अन्नाचादाणा सारतत्व]**होई॥टेक॥**
**थोथी**[खोटी]**काया थोथी माया, थौथा हरि बिन जनम गवाया।**
**थोथा पंडित थोथी बानी, थोथी हरि बिन सबै कहानी।**
**थोथा मंदिर भोग**[नैवेद्य]**बिलासा**[सजावट]**,थोथी आन देवकी आसा**[आशा]**॥**
**साचा सुमिरन नांव बिसासा**[विश्वास]**,मन बच**[वचन]**कर्म कहे ‘रविदासा’ ॥ १॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ शर्मा) ७२

**भावार्थः**—संत रोहिदास सूचना देतात की, कोणताही निसत्व भुसा पाखडण्याचे व्यर्थ कष्ट घेऊ नका.ज्यामध्ये अन्नाचा दाणा किंवा सारतत्व निघू शकेल असेच पाखडले पाहिजे.

हे शरीर (ज्यास आपण सजवितो) खोटे आहे.जगाची माया किंवा धन दौलत (ज्याचा आपण अभिमान धरतो) खोटी आहे.तसेच परमात्म्याच्या भक्तिशिवाय हा मानवजन्म जगणे खोटे आहे.

केवळ पुस्तके वाचून पंडित होणे खोटे आहे.पंडिताचे बोलणे खोटे, तसेच परमात्म्याशिवाय शास्त्रपुराणाच्या कथा-गोष्टी खोट्या आहेत.

मंदिर खोटे आहे.मंदिराचा नैवेद्य खोटा, सजावट खोटी आहे.

संत रोहिदास मन, वचन व कर्मावर जोर देऊन सांगतात की, “फक्तनामस्मरण करणे व नामावर विश्वास ठेवणे हेच खरे आहे.”

(४९) **गउड़ी बैरागणि**

**सत जुगि**[सत्ययुग]**सतु**[सत्य]**तेता**[त्रेतायुग]**जुगी**[यज्ञ]**दुआपरि**[द्वापार युग]**पूजाचार।**
**तीनौ जुग तीनौ दिढे**[प्रधान, जोर]**कलि केवल नाम अधार॥१॥**
**पार कैसे पाइवो**[मिळविणे, पोहचणे]**रे॥मो सउ कोऊ न कहै समझाई।**
**जा ते आवागवनु बिलाइ**[दिसणे]**॥रहाउ॥**
**बहु बिधि धरम निरुपीऐ, करता दीसै**[दिसणे]**सभलोइ**[लोक]**।**
**कवन करम ते छूटीऐ, जिह**[ज्या]**साधे**[साधना]**सभ सिधि होइ॥२॥**

अनुक्रमणिका

**करम अकरम बीचारिऐ, संका[शंका]सुनि वेद पुरान।**
**संसा[शंका]सद[नेहमी]हिरदै बसै, कउनु[कोणत्या]हिरै[नाहीशी होणे]अभिमानु॥३॥**
**बाहार उदकिं पषारिऐ[धुणे],घट भीतरी बिविध बिकार।**
**सुध कवन पर होइवो[होणे],सुच[पवित्र]कुंचर[हत्ती]बिधि बिउहार॥४॥**
**रवि प्रगास[प्रकाश]रजनी जथा[अंधार],गति जानत सभ संसार।**
**पारस मानो तांबे छुए, कनक होत नही बार[उशीर]॥५॥**
**परम पारस गुरू भेटीए, पुरहा लिखत लिलाट।**
**उनमन[अंतर्मुखी]मन मन ही मिले, छुटकत बजर[वज्र]कपाट॥६॥**
**भगति जुगति[युक्ति]मति सति करी, भ्रम बंधन काटि बिकार।**
**सोई रसि बसि मन मिले, गुन निरगुन एक विचार॥७॥**
**अनिक जतन निग्रह कीए, टारी[टाळणे]न टरे[टळत]भ्रम फांस॥**
**प्रेम भगति नही ऊपजै[उत्पन्न.],ता ते 'रविदास' उदास॥८॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉशर्मा) ३०

**भावार्थः**—सत्य युगात सत्यव्रत पालन करणे, त्रेतायुगात यज्ञ करणे व द्वापार युगात पूजापाठ व सदाचार करणे यावर जोर होता.पण ह्या कलियुगात फक्तनामाचाच आधार आहे.

रोहिदास म्हणतात की, "आता ह्या संसार रुपी सागराला कसे पार केले जाऊ शकते?कोणत्या साधनाने आवागमनाचे चक्र समाप्त होऊ शकते?हे मला कोणी समजावून सांगत नाही."

धर्म शास्त्रात अनेक प्रकारे अर्थ सांगितले आहेत.त्याप्रमाणे सर्व लोक अनेक प्रकारचे कर्म करतांना दिसतात. परंतु ह्या संसारातून सुटका होऊ शकेल असे कोणते कर्म आहे आणि ज्या साधनेने सर्व कार्ये सिद्ध होऊ शकतील अशी कोणती साधना आहे?

कर्म अकर्माचा विचार करतांना वेद-पुराणांचे अनेक मत-मतांतरे ऐकून शंका निर्माण होतात व त्या नेहमी हृदयात घर करून राहतात व मनाचा अभिमान कोणत्या साधनाने दूर होऊ शकतो हे समजत नाही.

तीर्थस्नानाने फक्त शरिराचा बाह्य भागच धुतला जातो.परंतु हृदयात अनेक विकार भरले असता पवित्रता कशी येऊ शकते?आमचे तीर्थस्नान हत्तीच्या स्नानाप्रमाणे आहे.(हत्ती स्नानानंतर आपल्या सवयीप्रमाणे धूळ स्वतःचे अंगावर फेकतो.)

रोहिदास म्हणतातकी, "सूर्योदय होताच रात्रीचा अंधार नाहीसा होतो. तांब्याला पारसमणी शिवताच त्याचे सोने बनण्यास उशीर लागत नाही.हे सर्व जग जाणते."

कपाळावरील पूर्वलेखात कर्माप्रमाणे जेव्हा पारसरुपी गुरुची भेट होते, तेव्हा तो मनास अंतर्मुखी बनवून मनातल्या मनात परमात्म्याबरोबर भेट करून देतो व वज्र कपाट उघडतो.

अनुक्रमणिका

भक्तिची बुद्धी युक्तिने खरी किंवा शुद्ध होते व भ्रमाचे बंधन तुटले जाते.त्या भक्तिच्या रसात बसलेले निर्गुणमत परमात्म्याच्या विचारात निमग्न होते.

मनानिग्रहाचे अनेक प्रयत्न करूनसुद्धा मन ताब्यात राहात नाही.रोहिदास म्हणतात, "जोपर्यंत प्रेम आणि भक्ती निर्माण होत नाही, तोपर्यंत मन उदास बनत असते".

(५०)

**बापुरौ**[विचारे]**सति**[सत्यवचन]**रैदास कहै रे।**
**ग्यान बिचारि चरन चित लावै, हरि के सरनि**[शरण]**रहै रे॥टेक॥**
**पाती**[पाने]**तोड़ै पूजि रचावै, तारन तिरन**[तरणे]**कहै रे।**
**मुरति मांहि**[मध्ये]**बसै परमेसुर, तौ पानी मांहि तिरै, रे॥१॥**
**त्रिविध संसार कवन बिधि तिरबौ**[तरणे]**,जे दिढ़ नाम न गहै रे।**
**नाव छांढ़िजे डांडै**[डेंगी(लहान होडी)]**बैसे, तौ दुणा**[दुप्पट]**दुख सहैंरे॥२॥**
**गुरु कौ सबद अरू सुरति**[ईश्वरचिंतन]**कुदाली, खोदत कोउ लहै रे।**
**राम काहु के बांटे न आयौ**[येणे]**,सो नेकु**[थोडक्यात]**लाभ है**[प्राप्त करणे]**रे॥३॥**
**झूटी माया जग डहकाया**[फसविले]**,तौ तीनि ताप दहै**[जळणे]**,रे।**
**कहै 'रैदास' राम जपि रसना, माया काहू**[कोणाबरोबर.]**कै संग न नहै रे॥४॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) ५५

**भावार्थः**—बिचारे रोहिदास सत्यवचन सांगतात की, ज्ञानाचा विचार करून प्रभुचरणी आपले चित्त लावले पाहिजे व प्रभुला शरण गेले पाहिजे.

तोडलेल्या पानांनी मूर्तीची पूजा करतात.ती संसार सागरास पार करणारी म्हणतात.परमेश्वर असलेली मूर्ती पाण्यावर तरली पाहिजे.

शारीरिक, दैविक व भौतिक ह्या तीन प्रकारच्या दुःखाने भरलेल्या संसार सागराला नाम रुपी मजबूत नाव सोडून दुसऱ्या छोट्या कमजोर होडीने कसे पार करणार?उलट दुप्पट त्रास होईल.

गुरुकडून शब्द किंवा नाम प्राप्त करून ईश्वरचिंतन किंवा आत्मारुपी कुदळीने जमीन खोदून कोणी परमेश्वर प्राप्ती करू शकतात.हे कसे शक्य आहे?नाम कमईने प्रभु सहज प्राप्त होतो.

खोट्यामायेने जगाला धोक्यात ठेवले आहे.तीन प्रकारच्या दुःखात जळत पडावे लागते.रोहिदास म्हणतात की, "आपल्या अंतरिक जीभेने प्रभुनामाचा जप किंवा स्मरण करा.कारण ही क्षणभंगूर माया कोणाबरोबर राहात नाही."

(५१) राग टोड़ी

**पावन**[पवित्र करणारा]**जस**[यज्ञ]**माधो तेरा, तुम दारन**[घोर, कठिण, भयंकर]**अधमोचन**[पापापासून सोडविणारा]**मोरा॥टेक॥**

अनुक्रमणिका

**कीरति तेरी पाप बिनासै**[विनाश]**,लोक बेद यू गावै।**
**जौ हम पाप करत नही भूधर**[डोंगर]**,तौ तूकहा नसावै॥१॥**
**जब लगि अंगि पंक**[चिखल]**नही परसै, तौ जल कहा पषालै।**
**मन मलीन बिषया रस लंपट**[विषयासक्त]**,तौ हरि नाव सँभाले॥२॥**
**जो हम बिमल रिदै चित अंतरि दोस कवन परि धरि हौं**[धरणार?]**।**
**कह रैदास प्रभु तुम दयाल हौ, अबध**[बंधन रहित]**मुक्ति का करि हौ॥३॥**
—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) ८८

**भावार्थः**—हे प्रभू, तू पतितपावन म्हणून प्रसिद्धी आहेस.म्हणून तू मला कठिण भयंकर पापातून सोडव.

पापाचा नाश करणारा म्हणून तुझी प्रसिद्धी आहे.अशाप्रकारे लोक व वेद तुझी महिमा गातात.जर आम्ही दुष्कर्म करून पापाचा डोंगर उभा केला नाही, तर मग तू कशाचा नाश करणार?

जोपर्यंत शरिराला चिखल लागला नाही.तर पाणी कशाला स्वच्छ करील?याप्रमाणे जेव्हा मन विषयासक्त होऊन घाणेरडे होते.तेव्हाच तुझे नाम त्याचा सांभाळ करते.

जर आमचे हृदय व चित्त पवित्र असते तर अखेर दोष किंवा विकार राहाण्याचे स्थान कुठे असणार?रोहिदास म्हणतात की, “प्रभू, तू दयाळू आहेस (माझ्यासारख्या बंधनग्रस्तावर दया कर.) जो बंधनरहित (मुक्त) आहे.त्याला मुक्तिची आवश्यकता काय?माझ्यासारख्यास मुक्ती देऊन तुझी‘पतित पावन’ ही कीर्ती वाढव.”

(५२)

**आयो आयो हो देवाधिदेव!तुम सरन आयौ,**
**जानि किरपा कीजौअपनौजना॥टेक॥**
**सकल सुख की मूल जाकी**[ज्याची]**नाहीं समतूल**[समता, तुल्यता, बरोबरी]**,सो चरन मूल पायौ।**
**लियो विविध जोनि**[योनी]**बास, जम की अगम त्रास, तुम्हारे भजन बिन भ्रमन फिरयौ।**
**ममता**[माया]**अहं विषै**[विषय]**मद मातो**[मदमस्त]**,इह दुख कबहूँ न दुतर** [दुस्तर]**तिरयौ॥१॥**
**तुम्हरे नांव बिसास**[विश्वास]**छॉडि आन**[अन्य, दुसरा.]**आस, संसारी धरम मेरो मन न धरीजै।**
**‘रविदास’ दास की सेवा मानहु देवा। पतित पावन नाम परगट करीजै॥२॥**
—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) ९

**भावार्थः**—हे देवाधिदेवा, मी तुम्हाला शरण आलो.आपला सेवक समजून माझ्यावर कृपा करा.

जे सर्व सुखाचे मूळ आहे व ज्याची कोणी बरोबरी करू शकत नाही अशा आपल्या आदी चरणाचे मी ग्रहण केले आहे.मी अनेक योनीत जन्म घेतला.यमराजाची भयंकर भीति मला सतावीत होती.तुमचे भजन न करण्यामुळे मी जन्म-मरणाच्या चक्रात भटकत राहिलो.आपुलकीच्या मायेत, अहंकार व विषय वासनेच्या नशेत मी मतलबी बनत फिरत राहिलो.ह्या दुःखामुळे कठिण संसार सागराला मी पार करू शकलो नाही.

अनुक्रमणिका

मी तुमच्या नावावर विश्वास ठेवून, इतर सर्वांची आशा सोडली.संसारी धर्म-कर्मात किंवा दिखाऊ पूजापाठात माझ्या मनाची आस्था नाही.

संत रोहिदास म्हणतात, "हे प्रभु, तुमच्या सेवक रोहिदासाची सेवा स्वीकारून आता आपल्या 'पतित-पावन' नावाला प्रकट करा."

### (५३) राग धनासरी

**नामु तेरो आरती भजनु**[तीर्थस्थान]**मुरारे। हरि के नाम बिनु झुठे सगल**[सर्व]**पासारे**[ढोंगे]**॥रहाउ॥**

**नामु तेरो आसनों नामु तेरो उरसा**[केशर, चंदन घासण्याची सहाण]**,नामु तेरा केसरो तो छिटका रे।**
**नामु तेरा अंभुला**[पाणी]**नामु तेरो चंदनो, घसि जपै नामु लै तुझहि कउ चारे**[लावणे]**॥१॥**
**नामु तेरो दीवा नामु तेरो वाती**[बत्ती, ज्योत]**नामु तेरो तेलु हो लैमाहि पसारे।**
**नाम तेरे की जोति लगाई, भइयो उजिआरो**[प्रकाश]**भवन सगला रे॥२॥**
**नाम तेरो तागा नामु फूल माला, भार अठारह**[अठरा भार(एक भार= ५ मण. सर्वप्रकारच्या वनस्पतीच्या एकेका पानाच्या जुडीचे अठरा भार होतात.)]**सगल जूठारे।**
**तेरो कीआ तुझहिं किआ**[काय]**अरपऊ, नामु तेरा तूही चवर ढोला**[ढाळणे]**रे॥३॥**
**दस अठा**[अठरा (पुराणे)]**अठसठे**[अडुसष्ट (तीर्थस्थाने)]**चारे खाणी**[चार प्रकारच्या खाणी किंवा योनी]**,**
**इहै वरतणि**[फिरणे, चकरा मारणे.]**है सगल संसारे।**
**कहै 'रविदास' नामु तेरो आरती, सतिनामु है हरि भोग तुम्हारे॥४॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) ११५

**भावार्थः**—हे प्रभु, तुझे नामच माझ्यासाठी आरती व तीर्थस्थान आहे.प्रभु नामाशिवाय पुजेचे बाह्य दिखाऊ विधि ही खोटी सोंगे ढोंगे आहेत.

तुझे नामच माझे आसन आहे.तुझे नामच सहाण आहे.तुझे नामरुपी केशरच मी तुझ्यावर शिंपडतो.तुझे नाम पाणी, चंदन आहे .तुझ्या नामाचा जप, स्मरण करून मी तुझे नामरुपी चंदन घासून तुला लावतो.

तुझे नामच दिवा, ज्योत आहे.त्यातील नामरूपी तेल जाळून संपूर्ण घरात प्रकाश पसरला.

तुझे नाम धागा व त्याचीच फुलमाळ बनविली.शिवाय अन्य वनस्पतीच्या अठरा भार माळा बनविल्या.तू निर्माण केलेले पूजासाहित्य मी तुला कसे अर्पण करू?तुझी नामरुपी चवरी मी तुझ्यावर ढाळीत आहे.

अठरा पुराणे व अडुसष्ट तीर्थामध्ये गुरुटलेले जग चार योनीत फिरत आहे.रोहिदास म्हणतात की, "तुझे नाम आरती व नैवेद्य मी तुला अर्पण करीत आहे."

अनुक्रमणिका

**नामाचे स्मरण**

ज्या पवित्र नामाचे स्मरण केले जाते ते वर्णनात्मक (वर्ण किंवा अक्षरांनी बनलेले) असते.शिष्य आपल्या सद्गुरुकडून पवित्र नामास प्राप्त करतो.ह्या पवित्र वर्णनात्मक नामातसद्गुरुची शक्ती सामावलेली असते.त्यामुळे शिष्य स्मरण करुन खरे धुनात्मक नाम किंवा अनहदनादाशी संपर्क साधतो.

जेव्हा पवित्र नामाचे स्मरण शक्य होईल, तेव्हा ते करीत राहिले पाहिजे.रोजच्या अभ्यासाचा कालखंड सोडल्यास चालता फिरता किंवा शारीरिक कार्य करीत असतांना नामस्मरण केले पाहिजे.मन कधी रिकामे ठेवता कामा नये.स्मरणाचा अभ्यास पक्का होतो.तेव्हा नामस्मरणाची क्रिया रात्रंदिवस आपोआप चालत राहते.ह्या स्वयंचलित स्मरणास संत रोहिदास"अजपा जाप" म्हणतात.स्मरणाचा अभ्यास मन एकाग्र करुन केला पाहिजे.आपल्या मनास पवित्र व एकाग्र करण्याचे सर्वाधिक प्रभावी व सुलभ साधन म्हणजे नामस्मरणच आहे.जेव्हा मन पवित्र व एकाग्र होते तेव्हा आतून प्रकाश आणि शब्द (अनहदनाद) प्रकट होतात.शब्द धुनाने आकृष्ट होऊन साधक प्रकाश आणि शब्दधुनाच्या मूलस्रोतात परमानंद स्वरुप परमात्म्यापर्यंत पोहचला जातो

म्हणून प्रभुची भक्ती साधना करा.सत्यनामाबद्दल आदरभाव व श्रद्धा बाळगा.आतल्याआत"आजपा जाप" करा.त्यामुळे आदिभौतिक, आध्यात्मिक व आदिदैविक अशी तिन्ही तापं नाहीशीहोतात व त्याठिकाणी शाश्वताचा उदय होतो.

**(५४) राग भैरव**

'बिजु देखे उपजे नही आसा, जो दीखै सो होइ बिनासा ।

**बिनु देखेउपजे नही आसा, जी दीसै होई विनासा।**
**बरण सहित जो जापै नामु, सो जोगी केवल**[कैवल्य]**निह कामु**[निष्काम (कामना रहित)]**॥**
**परचै रामु रवै**[रमणे]**जउ कोई, पारसू परसै दुविधा न होई॥१॥रहाउ॥**
**सो मुनि मन की दुविधा खाइ, विनु दुआरै**[शरिराचे नऊ दरवाजे (दोन डोळे, दोन कान, नाकाची दोन भोके, एक तोंड आणि खालील दोन भोके-गुदद्वार व जननेंद्रिय.]**त्रै लोक समाइ॥**
**मन का सुभाउ सभु कोइ क रै, ।करता होई सु अनभै रहै॥२॥**
**फल कारन फुली बनराई। फल नागा तब फुलु बिलाई॥**
**गिआने कारण करम अभिआसु। गिआन भईआ तह करमह नासु॥३॥**
**घ्रित कारन दधि मथै सयान। जीवन मुकत सदा निरबान॥**
**कहि रविदास परम बैराग, रिदै रामु की न जपसि अभाग॥४॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉशर्मा) १

**भावार्थः**—मूर्ती पाहिल्याशिवाय आमच्या हृदयात ईश्वर भक्ती होत नाही.परंतु अंतःकरणात भक्ती नसतांना मूर्तीपूजेचे अवडंबर दाखविणाऱ्या ढोंगी भक्ताचा नाश होणार, जो वर्णनात्मक नामाचे स्मरण करतो, तोच निष्काम कर्म करणारा आणि कैवल्यावस्था (मुक्तावस्था) प्राप्त करणारा योगी असतो.जो गुरुमार्फत परिचय करून राम नामाच्या स्मरणात तल्लीन होतो, त्याच्या सर्व द्विधा (शंका) परिसरुपी गुरुच्या सहवासाने नाहीशा होतात.

अनुक्रमणिका

आपल्या मनातील शंका नाहीशा करुन, तो खरा मुनि (ऋषि) बनतो व आपल्या शरिराचे सर्व (बाहेरचे) दरवाजे बंदकरून तो आतल्याआंत तिन्ही लोकात प्रविष्ट करतो.मन कल्पना विश्वात, भावविश्वात मग्न राहते.साधक नेहमी निर्भय हवा.जो निडर साधक मनाने अचल असतो.तो खरा पंडित-ज्ञानी होय.

फल धारणा व्हावी म्हणून बागेत फुलांचा सुवास दरवळतो व वृक्ष वेलीवर फळे जेव्हा येऊ लागतात. तेव्हा फुले त्यांना जागा देतात व स्वतःगळून पडतात.कर्म व ज्ञान यांचे असेच नाते आहे.खरे पाहता ज्ञान लाभावे म्हणून कर्मरत राहयचे व जेव्हा ज्ञान प्राप्त होते तेव्हा कर्म नाश पावतो.

म्हणून संत रोहिदास म्हणतात की, "हे अभाग्य, तू आपल्या हृदयात रामनामाचा जप किंवा स्मरण कां करीत नाहीस?परमवैराग्य यातच सामावलेले आहे."

(५५)

**अब कैसे छुटै नाम रट**[तोंडपाठ करणे]**लागी॥टेक॥**
**प्रभुजी तुम चंदन हम पाणी। जाकी**[जयाचे]**अँग अँग बास समानी**[मिळणे]**॥१॥**
**प्रभुजी तुम घन**[ढग]**बन हम मोरा। जैसे चितवत**[टकमक पाहाणे]**चंद चकोरा॥२॥**
**प्रभुजी तुम दीपक हम बाती। जाकी जोति जरै**[जळणे]**दिन राती॥३॥**
**प्रभुजी तुम मोती हम धागा। जैसे सोनहिं मिलन सोहागा**[सोन्याला चकाकी आणणारा धातू सुहाग]**॥४॥**
**प्रभुजी तुम स्वामी हम दासा। ऐसी भगति करै रैदासा॥५॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉशर्मा) ६६

**भावार्थः**—हे प्रभू, आता तर मला नाम स्मरणाची सवय लागली आहे.ही सवय आता कशी सुटू शकते?

हे प्रभू, जर तू चंदनस्वरुप आहेस, तर मी पाण्याप्रमाणे आहे.तुझ्या माझ्या मिलनाने जीवन जल सुवासिक झाले आहे.

हे प्रभू, तू ढग आहेस, तर मी तुझा प्रेमी मोर आहे आणि जर तू चंद्र असशील, तर मी चातकाप्रमाणे तुझ्याकडे टकमका पाहात आहे.

हे प्रभू, जर तू दिवा आहेस, तर मी त्याची वात आहे.ही अलौकिक स्नेहाची ज्योत रात्रंदिवस जळत राहणार आहे.

हे प्रभू, जर तू मोती आहेस, तर मी त्याचा धागा आहे आणि जर तू सोने आहेस, तर मी त्यात मिसळणारा सुहाग आहे.

रोहिदास म्हणतात की, "हे प्रभू, तू स्वामी आहेस, तर मी तुझा सेवक आहे.तुझ्या ठायी माझी अनन्य भक्ती आहे.(कोणत्याही प्रकारे मी तुझ्याहून वेगळा होऊ शकत नाही.)

(५६)

अनुक्रमणिका

**जब राम नाम कहि गावैगा,**
**तब भेद अभेद**[एकत्र होणे]**समावैगा**[मिळणे, मिसळणे, प्राप्त होणे]**॥टेक॥**
**जे सुख है या रसके परसे**
**जो सुख का कहि गावैगा॥१॥**
**गुरु परसाद भई अनुभौ**[अनुभव]**मति,**
**विष अम्रित सम धावैगा**[समजणे]**॥२॥**
**कहै रैदास मेटि**[मिटविणे]**आपा**[आपला]**पर,**[परका (दुसरा)]
**तब वा ठौरै**[पद.]**हि पावैगा॥३॥**

—(कामत) श्री.संत रोहिदास पद क्र. १९

**भावार्थः**—जेव्हा प्रभु नामाच्या स्मरणाने शब्दधुनचे संगीत प्रकट होईल, तेव्हा आत्मा आणि परमात्मा यातील भेद नाहीसा होईल व आत्मा परमात्म्यामध्ये मिसळून एक होऊन जाईल.

या एक होण्याच्या रस प्राप्तीमध्ये जे सुख आहे, त्याचे वर्णन मी काय करू शकणार?

गुरुकृपेने जेव्हा या आंतरिक अनुभवाचे ज्ञान होईल तेव्हा विष व अमृत एक समजण्याची क्षमता येईल.

रोहिदासजी म्हणतात की, "आपला आणि परका हा भेद नाहीसा करा.तेव्हा त्या पदाची प्राप्ती होईल.

(५७)

**ऐसे जानि जपो रे जीव। जपि ल्यो राम न भरमो**[भ्रम]**जीव॥टेक॥**
**गनिका**[वेश्या]**थी किस करमा**[कर्म]**जोग**[योग्य]**। पर पुरसन सा**[ती]**रमती भोग॥**
**निसि**[रात]**बासर**[दिन]**दुस्करम कमाई। राम कहत बैकुंठे जाई॥१॥**
**नामदेव किह जाति कै ओछ**[हलकी नीच]**। जाको जस**[यश]**गाईए लोक॥**
**भगति हेत भगता के चले। अंक माल**[हार]**ले बीठल मिले**[भेटणे]**॥२॥**
**कोटि जग्य**[यज्ञ]**जो कोउ करै। राम नाम बिन तोउ न निस्तरे**[सुटका]**॥**
**निरगुन को गुन**[महिमा]**देखो आई। देही सहित कबीर सिधाई**[जगातून गेले]**॥३॥**
**मोरी**[मी]**कुचिल**[नीच, घाणेरडा]**जाति कुचीला में बास। भगति हेत हरिचरन निवास॥**
**चारिउ बेद किया संजौति**[खंडन]**। जन रविदास करै दंडौति**[दडंवत.]**॥४॥**

—वाणी ९०

**भावार्थः**—हे जीवा, तू संसाराच्या भ्रमात पडू नकोस व परमात्म्याच्या नामाचा जप किंवा स्मरण कर.

वेश्येचे कर्म अखेर कोणत्या योग्यतेचे होते?ती तर पर पुरुषाबरोबर भोग-विलास करीत होती.ती रात्रंदिवस वाईट कामे करीत होती.तरीसुद्धा प्रभुनाम स्मरण केल्यामुळे, ती वैकुंठास गेली.

अनुक्रमणिका

नामदेव हलक्या, नीच जातीचे होते. परंतु(नामस्मरण व नामभक्ती करीत) त्यांचे यश जगात लोकगात असतात.भक्ताच्या भक्तिमुळे भगवान स्वतःत्याचे रूप घेऊन राजाला भेटले.

जर कोणी करोडो यज्ञ केले तरी परमात्म्याच्या नामाशिवाय त्याचा जगात काही उपयोग नाही.

निर्गुणाचा महिमा पाहा.भक्त कबीर सदेह जगातून गेले.

मी नीच जातीचा आहे व नीच जातीबरोबरच राहाणार आहे.भक्तिचे आचरणाने मी हरिचरणी निवास प्राप्त केला.रोहिदास म्हणतात की, “मी चारी वेदांचे खंडन करून प्रभु चरणी दंडवत करतो.”

**नामाशिवाय जीवांचे हाल**

नामस्मरण न करणारे जीव जिवंत असून, ते मेल्यासमान आहेत. त्यांना लोक व परलोक या दोन्ही ठिकाणी अपमाणित व्हावे लागते.ते इतके अपवित्र व घाणेरडे मानले जातात की, त्यांना कोणी शिऊनसुद्धा घेऊ इच्छित नाहीत.त्यांना धनदौलतीशिवाय रिकाम्या हाताने ह्या जगातून जावे लागते.नामस्मरण न केल्यामुळे परमात्म्याची प्राप्ती होण्यात ते अपयशी होतात व त्यांचे मानवी जीवन व्यर्थ निघून जाते.

एकमात्र नामच परमतत्त्व आहे.नामामुळे सर्व पापांचा व दुःखांचा नाश होऊन, सर्व सुखांची प्राप्ती होते.ज्यास नामरुपी अमृताची प्राप्ती नाही त्यांची स्थिती पाण्यावाचून तडफडणाऱ्या माशासारखी व पंख नसलेल्या पक्षासारखी होत असते.अशा व्यक्तिंचे मानवी जीवन फळ नसलेल्या वृक्षासमान निघून जाते.शेवटी अशा व्यक्ती रडत रखडत व भयंकर पश्चाताप करीत असतात.

(५८)

**जौ तुम गोपालहिं नहीं गैहौ**[ग्रहण करणे] **।**
**तौ तुमकूं सुख मे दुःख उपजै, सु खहिं कहां तैं पेहो**[प्राप्त करणे]**॥टेक॥**
**माला नाम सबै जग डहको**[ठकविणे, भुलविणे, धोका देणे]**झूठो भेष बनै हो।**
**झूठे तै सांचि तब होइ हौ, हरि की सरनि जब ऐहो॥१॥**
**कनरस बतरस और सबै रस, झूठहिं मूंड**[डोके]**मूंडै**[मुंडन करणे]**ही।**
**जब लगि तेल दिया मे बाती, देखत ही बुझिं जैहौ॥२॥**
**जौ जन राम नाम रंग राते, औरे नंग न सुहै हौ**[आवडणे]**।**
**कह ‘रविदास’ भजौ रे क्रिपा निधि, प्रान गये पछित**[पश्चाताप करणे.]**हौ॥३॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) ११५

**भावार्थः**—जर तुम्ही प्रभुनामाचे स्मरण, भजन करणार नाही, तर तुम्हास संसारिक सुखाऐवजी दुःख मिळेल.मग सुख तुम्हांस कोठून प्राप्त होऊ शकेल?

अनुक्रमणिका

माळा फिरवून नाम जपण्याच्या ढोंगात सर्व जग भुलले आहे.(नामस्मरण किंवा जप आपल्या मनातच केले जाते.) बाहेरचा वेश बनवून ढोंगबाजी करणे खोटे आहे.तुम्ही जेव्हा परमात्म्यास शरण जाल, तेव्हाच तुमचे खोट्याचे खरे बनेल.

कानानेगाणे व गप्पागोष्टी ऐकण्यात दंग होणे तसेच अन्य सर्व सुखात बुडल्याने काम भागणार नाही.डोक्याचे मुंडन करणेही ढोंग आहे.जोपर्यंत जीवनरुपी दिव्यात तेल आणि ज्योत (जीवनशक्ती व प्राण) आहे.तोपर्यंत आम्ही जिवंत आहोत व बघता बघता हा जीवनरुपी दिवा विझून जाईल.

जो जीव प्रभुनामाचे रंगात रंगून जाईल.त्यास दुसरा कोणताही रंग येणार नाही.यासाठी रोहिदास म्हणतात की, "तुम्ही दयाळू प्रभुचे भजन करा;नाहीतर प्राण गेल्यावर तुम्हास पश्चाताप करावा लागेल."

## ६.खरे प्रेम

### खऱ्या प्रेमाचे स्वरुप

जेव्हा भक्तास परमेश्वराबद्दल एवढी गाढी भक्ती होते की, तो परमेश्वरासाठी आपण आपल्याला विसरून जातो व त्यास परमेश्वराशिवाय दुसरी कसलीही शुद्ध राहात नाही.तेव्हा अशा भक्तिस 'अनन्या भक्ती' म्हणतात.ही अनन्य भक्तिच खऱ्या प्रेमाचे लक्षण आहे.अशाप्रकारच्या प्रेमावस्थेत द्वैतभाव नाहीसा होतो.असे प्रेम नामभक्तिनेच प्रकट होते.

अनन्या भक्तित लीन भक्त सत्व, रज व तमस या तीन गुणांवर आणि काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार ह्या पंच विकारावर नियंत्रण ठेवून संसारिक बंधनातून मुक्त होतो.अन्यप्रकारे पूजाविधी किंवा दिखाऊ कर्मकांड बंधनातून मुक्त करीत नाहीत.तर ते कर्मानुसार फळ देऊन कर्मातच गुंथवून ठेवतात.एकमात्र परमात्माच ह्या तीन गुणांपासून तसेच पंचविकारापासून वेगळा आहे.परमात्म्याची भक्ती आणि प्रेम करण्यानेच आपण यांच्या कठिण जाळ्यातून मुक्त होऊ शकतो.

जेव्हा भक्त किंवा प्रेमिचा आपलेपणा किंवा अभिमान नाहीसा होतो.तेव्हाच अनन्यभक्ती किंवा खऱ्या प्रेमाची अनुभूति होते.आपल्या मी पणाच्या अहंकारी भावनेस प्रभुचरणावर सोडल्यास प्रेमी आपल्या प्रियतमेच्या रंगात रंगून जातो व त्यांचे स्वरुपही बनले जाते.

(५९)

**संतो। अनिन**[अन्यय]**भक्ति यहु नांही।**
**जब लागि सत रज तम तीन्यो गुन, व्यापत है या मांही॥टेक॥**
**सोई आन**[अन्य]**अन्तर करै हरि सूं, अपमारग कौ आनैं।**
**काम क्रोध मद लोभ मोह की, पल पल पूजा ठानें॥१॥**
**सक्ति सनेह**[स्नेह, आकर्षण, प्रलोभन]**इष्ट अंगि लावै, अस्थलि**[ठिकठिकाणी]**अस्थलि खेलै।**
**जे कुछ मिलै आन अखर**[कच्चा सीधा (दाळ, तांदूळ, इ.), अन्न]**सौ, सुत दारा सिर मेलै॥२॥**
**हरिजन**[प्रभुचे लोक]**हरि बिजू और न जानै, तजे आन**[प्रतिज्ञा]**तनु त्यागी।**

अनुक्रमणिका

**कहे 'रविदास' सोई जनु निरमल, निसदिन निजु अनुरागी[प्रेमी.]॥३॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) १७.

**भावार्थः**—संत मंडळीनो, जोपर्यंत ह्या जीवात सत्व, रजस् आणि तमस् ह्या तीन गुणांचा प्रभाव पडतो, तोपर्यंत त्यांच्या भक्तिस 'अनन्या भक्ती'म्हटली जाऊ शकत नाही.

असा जीव आपणांस परमात्म्याहून भिन्न मानून, आपल्याला व परमेश्वरात भेद निर्माण करतो व कुमार्गास लागला जातो.असा जीव हळू हळू काम, क्रोध, मोह व अहंकाराचे आधीन होतो.

तो आपली शक्ती किंवा सामर्थ्य दाखविण्याच्या मोहात कोण्या इष्ट देवतेस प्राप्त करून ठिकठिकाणी आपले खेळ करून दाखवितो.यामुळे त्यास (अन्न) सीधा मिळतो व तो आपल्या बायको मुलांना देतो.

प्रभुभक्त परमेश्वरास सोडून दुसऱ्या कोणत्याही देव देवतांना मानीत नाही.त्यास एकमात्र परमात्म्याचाच आधार असतो.आपला हा आधार सोडण्याऐवजी तो मरण्यास तयार होतो.

रोहिदास म्हणतात की, "जो रात्रंदिवस परमात्म्यामध्ये लीन आहे, तोच निर्मळ भक्त किंवा प्रेमी आहे."

(६०)

**ऐसीभगति न होइ, रे भाई।**
**राम नाम बिनु[शिवाय]जे कऊ[काय]करीऐ। सो सब भरम[भ्रम]कहाई॥टेक॥**
**भगति न रसदान[स्वादिष्ट भोजन],भगति न कथै ग्यॉंन[ज्ञान],**
**भगति न बन मैं गुहा[गुंफा],खुदाई।**
**भगति न ऐसी हाँसी[हंसणे-खेळणे, मजा],भगति न आसा पासी[आसपास],**
**भगति न कुल कानि[मर्यादा, लोकलाज]गवाई[सोडणे]॥१॥**
**भगति न इंद्री बांधै, भगति न जोग[योगमुद्रा]साधै।**
**भगति न अहार घटाई[कमी करणे],ऐ सब करम कहाई॥**
**भगति न निद्रा साधैं, भगति न बैराग बांधे।**
**भगति न ऐ सब वेद बड़ाई[मोठेपणा, महत्त्व]॥२॥**
**भगति न मुंड[डोके]मुंडाऐ[मुंडन करणे],भगति न माला दिखाई।**
**भगति न चरन धोवाऐ, ऐ सब गुनी जन गाई॥**
**भगति न तौ लौ जानी, जौ लौं आप कूं आप वषानी[आत्मप्रौढी]।**
**जोई जोई करै, सोई सोई करम बडाई॥३॥**
**आपौ[अहंभाव]गयौ तब भगति पाई[प्राप्त होणे],ऐसी भगति है, भाई।**
**राम मिल्यो अपनौ गुन खोयौ[त्याग करणे]रिद्धि सिद्धि सबै जु गंवाई॥**
**कहै"रविदास" छूटी सब आस, [आशा]तब हरि ताही[त्याचा]कै पास।**
**आतमा[आत्मा]थिर[स्थिर, शांत]भई तब, सब ही निधि[खजिना.]पाई॥४॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) २७.

अनुक्रमणिका

**भावार्थः**—अरे भाऊ, भक्ती अशा प्रकारे होत नसते.प्रभुनामाशिवाय जे काही केले जाते, ते सर्व भ्रममात्र आहे.

स्वादिष्ट भोजन दान करणे, पांडित्यपूर्ण ज्ञानाच्या गोष्टी सांगणे आणि वनात गुंफा खोदून राहिल्याने भक्ती होत नाही.भक्ती हंसी मजाक नाही, ती सहज जवळ येईल.कुलमर्यादा किंवा लोकल्लजा सोडल्यानेही भक्ती प्राप्त होत नसते.

केवळ इंद्रियावर बंधन घातल्याने, हट्टिपणाने योगमुद्रा साधल्याने व भोजन कमी करण्याने भक्ती होत नाही.ही सर्व कर्मांची फळे आहेत.ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणे फळ मिळते.परंतु कर्मापासून सुटका होत नसते.आपल्या निद्रेवर नियंत्रण ठेवणे, घरदार सोडून वैरागी बनणे, तसेच वेदात ज्याचे महत्त्व सांगितले आहे.त्याप्रमाणे इतर सर्व कर्मकांड करण्याने भक्ती होत नसते.

डोक्याचे मुंडन करण्याने, माळा गळ्यात घालून साधूसंतांचे ढोंग करण्याने आणि सेवकांकडून आपले पाय धुऊन घेण्याने भक्ती होत नसते.असे विद्वान गुणी महापुरुषांचे म्हणणे आहे.जोपर्यत तू आत्मप्रौढी करतोस, अर्थात आपसात अहंभाव राखून आत्मप्रशंसा करतो, तोपर्यंत भक्तीतुझ्याजवळ येत नाही.अशा स्थितीमध्ये तू जे काही करतोस त्यामुळे तुझे कर्म वाढत राहते.

अरे भाऊ, भक्तिचा स्वभाव असा काही आहे की, जेव्हा आपला-परका असा भेदभाव नाहीसा होतो तेव्हाच भक्ती प्राप्त होते.तेव्हा आपल्या अहंभावी स्वरुपाचे तसेच रिद्धीसिद्धिचा त्याग करून भक्त परमात्म्यामध्ये रंगून जातो.

रोहिदास म्हणतात की, "जेव्हा भक्तांच्या हृदयातून सर्व आशा दूर होतात, तेव्हा भगवान त्याच्याजवळ येतो, तेव्हाच आत्म्यामध्ये स्थिरता व शांती येते आणि सर्व सुखांचे भंडार प्राप्त होते.

(६१)

**बौरी**[वेडी]**करिलै राम सनेहा**[स्नेह] **।**
**संग सहेली ब्याह चली सब, छांडि नेहीर रा**[माहेरचा]**गेहा**[घर]**॥टेक॥**
**खेली खिलार**[खेळ खेळण्यात]**बइस**[वय, आयुष्य]**सब, बीती, मनचित भइ न पिउ**[प्रियकर]**परतीती**[प्रीती] **।**
**मैं मैं जौ लौं गरब बैरानी**[वेडी]**,तौ लौं पियारा**[प्रियकर]**मनु नहिं आनी॥ १॥**
**आपा**[अभिमान]**मेटि मै-मेरी खोही, गरब तियागी अरपिहि**[अर्पण]**निज देही।**
**पिउ कौ नारी उहि मन आई,**
**जिहि अभि अंतर**[अंतः करणात, हृदयात]**अवरु**[दुसऱ्याचा]**नहिं काई॥ २॥**
**जों लौं पिउ रा मन नहिं आइ, का सोरह**[सोळा]**स्यंगार बनाई।**
**सोइ सती**[पतिव्रता]**रविदास वषानी**[वर्णन]**,तन मन स्यू**[पासून.]**पिउ रंग समानी॥ ३॥**
—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा) ५७.

अनुक्रमणिका

**भावार्थः**—अग वेडे, तू परमात्म्याबरोबर प्रेम कर, तुझ्या बरोबरच्या सर्व मैत्रिणी लग्न करून (माहेरचे घर सोडून) आपल्या पति परमेश्वराच्या घरी निघून गेल्या.

तूं आपले सर्व आयुष्य विनाकारण खेळ खेळण्यात घालविलेस, आणि त्यामुळे हृदयात व मनात प्रियकराबद्दल विश्वास उत्पन्न झाला नाही.जोपर्यंत तू मी पणाच्या अभिमानात वेडी बनून फिरत राहशील, तोपर्यंत तू प्रियकराच्या मनास आवडणार नाहीस.

तू मी पणाची भावाना सोडून प्रियकरासमोर आपल्या शरीरास अर्पण कर.जिच्या मनात इतर दुसऱ्या कोणाचा विचार येत नाही.अशी पत्नीच प्रियकराच्या मनास आवडते.

जोपर्यंत प्रियकराचे मन तुझ्याकडे आकर्षित होत नाही, तोपर्यंत तू सोळाशृंगार केलेस तरी व्यर्थ आहेत.

रोहिदास म्हणतात की, "जी मनापासून आपल्या पतिपरमेश्वराच्या प्रेमरंगात रंगून लीन झाली आहे.तीच खरी पतिव्रता."

### प्रेमविव्हळ प्रेमीची स्थिती

खऱ्या प्रेमीचे ध्यान नेहमी आपल्या प्रियतमेतच लागलेले असते.ज्याप्रमाणे चातक पक्षी स्वाती नक्षत्रातील पावसाच्या थेंबाची मार्गप्रतिक्षा करीत असतो, चकोर पक्षी चंद्राकडे टकमक पाहात राहातो आणि कमळ पुष्प फक्त सूर्याला पाहूनच विकास पावत असते.त्याप्रमाणे खऱ्या प्रेमीचे लक्ष नेहमी आपल्या प्रियतमेतच लागून राहाते.फक्त प्रेयसी ही त्याच्या जीवनाचा आधार आहे.याप्रमाणे मासा पाण्याशिवाय जिवंत राहू शकत नाही.त्याप्रमाणे खरा प्रेमीसुद्धा प्रियतमेच्या दर्शनाशिवाय जिवंत राहू शकत नाही.आपल्या प्रियतमेच्या दर्शनासाठी तो वारंवार करुण पुकार करीत असतो.प्रियतमेचे चरणकमलच त्याच्यासाठी समस्त सुख आणि शांतीचा सागर आहे.

(६२)

**जौ तुम तोरो**[तोडा (मोडा)]**राम मैं नहिं तोरों।**
**तुम सों तोरि कवनि सौं जोरौं**[जोडणे]**॥ टेक॥**

—गुरु रविदास, पृ.१७१

**भावार्थः**—हे प्रभू, कदाचित तू माझे प्रेमसंबंध तोडून देशील, परंतु मी हे तोडून देऊ शकत नाही.कारण तुझ्याशी तोडून पुन्हा मी कोणाचे प्रेम जोडू शकतो?(तुझ्याशिवाय मला कोण आहे?)

**तीरथ**[तीर्थ]**बरत**[व्रत]**न करौ अंदेसा**[चिंता, प्रार्थना]**तुम्हरे चरन कंवल**[कमळ]**भरोसा।**
**जहां जहां जाऊँ तुम्हारी पूजा, तुमसा देव अवर नहिं पूजा॥ १॥**

—गुरु रविदास, पृ.१७१.

अनुक्रमणिका

मी काही तीर्थ व्रत करीत नाही किंवा अन्य कोणाचे चिंतन किंवा प्रार्थनाही करीत नाही.मला तर फक्त तुझ्या चरण कमलाचाच विश्वास आहे.जेथे कोठेही मी जातो, तेथे मी तुझीच पूजा करतो.तुझ्यासारखा देव किंवा स्वामी आणखी कोणीही नाही.

**मैं अपनौ मन हरि जोरयौं, हरि सौं जोरि**[जोडणे]**सबनि सौ तोर्ओ।**
**सब परहरि**[त्याग करणे]**तुम्हरी ही आसा, मन क्रम**[कर्म.] **. बचन कहै 'रविदास'॥ २॥**
—गुरु रविदास, पृ १७१.

मी आपले मन तुझ्याशी (हरिशी) जोडले आहे आणि इतर सर्वांशी तोडले आहे.रोहिदास म्हणतात की, "मी सर्वांची आशा तोडून दिली आहे.मला मन, वचन आणि कर्म यांचेपासून मला फक्त तुझीच आशा आहे.

(६३)

**त्यों तुम्ह कारनि केसवै, लालचि जिउ लगा।**
**निकटि**[जवळ]**नाथ प्रापति**[प्राप्ती]**नहीं, मन मंद**[मूर्ख]**अभागा॥ टेक॥**
—गुरु रविदास, पृ.१७२.

**भावार्थः**—हे प्रभू, तुझ्यासाठी माझा जीव अभिलाषी राहिला आहे.माझ्या प्राणनाथा, परमात्मा माझ्या जवळच आहे.तरीसुद्धा त्याची प्राप्ती मला होत नाही. मी मूर्ख खरोखरच दुर्दैवी आहे.

**साइर**[समुद्र]**सलिल सरोदिका**[तलाव]**जल थल**[पृथ्वी]**अधिकाई।**
**स्वाँति बूंद की आस है, पिउ पिआसा न जाई॥ १॥**
—गुरु रविदास, पृ.१७२.

समुद्रात पाणी आहे, तलावातसुद्धा पाणी आहे आणि पृथ्वीवरसुद्धा अधिक पाणी आहे.परंतु मला चातकास परमात्मारूपी स्वातीच्या थेंबाची तहान आहे.त्या आवडत्या परमात्म्यास प्राप्त केल्याशिवाय माझी तहान भागत नाही.

**जै रे सनेही**[स्नेही, प्रेमी, आवडता,]**चाहिए, चिंतवत**[पाहाणे]**हौं दूरी।**
**प्यूंगल**[पांगळा, लंगडा]**फलि न पहुंचई, कछु साध न पूरी॥ २॥**
—गुरु रविदास, पृ.१७२.

मला प्रेयसीला माझ्या प्रीतम प्राप्तिची इच्छा आहे.परंतु जेव्हा मी माझ्यापासून प्रीतमचे अंतर पाहावे तेव्हा मला वाटते की, मी त्या लंगड्याप्रमाणे आहे.जो त्या झाडाच्या उंचीवरील फळ पाहातो, परंतु तेथपर्यंत तो जाऊ शकत नसल्यामुळे, त्याची फळ प्राप्तिची इच्छा पूर्ण होत नाही.

**कहै 'रविदास' अकथ**[अवर्णनीय, वर्णन]**कथा, उपनिषद सुनीजै।**
**जस तूं तस तूं ही, कस औपम**[उपमा]**दीजै॥ ३॥**

अनुक्रमणिका

—गुरु रविदास, पृ.१७२.

रोहिदास त्या अवर्णनीय प्रीतम परमात्म्याचे वर्णन करतात की, ज्याच्यासंबंधी आम्ही उपनिषदापासून ऐकत आलो आहे की, "तो परमात्मा त्याच्याप्रमाणे आहे.त्याची उपमा कोणाबरोबर केली जाऊ शकते?.

(६४)

**त्यो तुम्ह कारनि केसबे, अन्तिरि लिव**[ध्यान,]**लागी।**
**ऐक अनुपम अनभवै, किमि**[कसे]**होइ विभागी**[वेगळे होणे.]**॥ टेक॥**

—गुरु रविदास, पृ.१७३.

**भावार्थः**—हे प्रभू, मी तुझ्या प्रेमात निमग्न आहे, जेव्हा माझे ध्यान तुझ्यातच लागले, तेव्हा मला तुझ्याशी एकरूप होण्याचा एक अनुपम प्राप्त झाला.आता मी तुझ्यापासून वेगळा होणे कसे शक्य आहे?

**ऐक अभिमानी**[आपल्या हेतुसाठी हट्ट धरणारा]**चात्रिगा**[चातकपक्षी]**बिचरत**[भ्रमण]**जग मांही।**
**जदपि**[यद्यपि]**जल पूरण मही**[पृथ्वी]**,कहुं वा रूचि नाही॥ १॥**

—गुरु रविदास, पृ.१७३.

स्वाती नक्षत्रातील पावसाचे थेंब पिण्याच्या हट्टास पेटलेला जगात भ्रमण करणारा एकच चातक पक्षी आहे.पृथ्वी पाण्याने भरली आहे परंतु त्या चातक पक्षास त्या पाण्याची आवड नसते.

**जैसे कामी**[प्रियकर]**देषै कामिनी**[प्रेयसी]**,रिदै**[हृदय]**सुल**[प्रेमपीडा]**उपाइ**[उत्पन्न होणे]**।**
**कोटि बैद विध उपचरै, बाकी बिथा**[व्यथा]**न जाई॥२॥**

—गुरु रविदास, पृ.१७३.

ज्याप्रमाणे आसक्त प्रीतमच्या हृदयात आसक्त प्रेयसीला पाहून जी प्रेमपीडा उत्पन्न होते, ती प्रेमपीडा करोडो वैद्य-डॉक्टरांना अनेक उपचार करूनसुद्धा नाहीशी करता येत नाही.

**जो जिहि चाहे सो मिलै आरति**[प्राप्त करणे]**गति**[अत्यंत करुण अवस्था]**होई।**
**कहै 'रविदासज' यहु गोपी**[गुप्त]**नाही, जानै सब कोई॥ ३॥**

—गुरु रविदास, पृ.१७३.

रोहिदास म्हणतात की, "ही गोष्ट गुप्त नाही की, जेव्हा प्रेमीची अशा प्रकारे करूण अवस्था होते, तेव्हा तो त्या प्रेयसीला प्राप्त केल्याशिवाय राहात नाही, हे सर्व जाणतात."

(६५)

**जउ**[जो]**हम बांधे मोह फांस**[जाळे]**हम प्रेम बंधनि तुम बंधे।**
**अपने छुटन को जतनु**[प्रयत्न]**करहु, हम छूटे तुम आराधे**[भजन]**॥ १॥**

अनुक्रमणिका

—गुरु रविदास, पृ.१७४.

**भावार्थः**—हे प्रभू, जर तू मला मोहाच्या जाळ्यात बांधून ठेवले आहेस, तर मी आता तुला प्रेमबंधनात बांधून ठेवले आहे.आता सुटण्याचा प्रयत्न कर.मी तर तुझे स्मरण, भजन केले आहे.

**माधवै जानत हहु जैसी तेसी अब कहा करहुगे ऐसी॥ रहाऊ॥**
**मीनु पकरि फांकिऔ अरु काटिओ, रांधि कीओ बहु बानी**[प्रकार] **।**
**खण्ड**[तुकडा.]**खण्ड करि भोजनु कीनो, तऊ न बिसरिऔ पानी॥ २॥**
—गुरु रविदास, पृ.१७४.

हे प्रभू, तुझ्याबद्दल माझे प्रेम, प्रीति किती आहे ते तू जाणतोस, मग तू त्या प्रेमातून सुटण्याचा व्यर्थ प्रयत्न का करतोस?(ज्याप्रमाणे माशाला पाणी आवडते, त्याप्रमाणे तू मला आवडतोस.)

लोक मासा पकडून चिरतात.त्याचे कापून तुकडे करतात आणि अनेक प्रकारे आलटून पालटून तळतात शिजवितात.पुन्हा त्याचे तुकडे करून चावून खातात.तरीसुद्धा तो मासा पाण्यास विसरत नाही.(मासा खाल्ला तरी पाण्याची तहान लागतेच).

**आपण बापै नाहि किसी को, भावन को हरि राजा।**
**मोह पटल**[आवरण, पडदा]**सभु जगतु बिआपिओ, भगत नही संतापा॥ ३॥**
—गुरु रविदास, पृ.१७४

परमात्मा कोणाची वडिलार्जित संपत्ती नाही. सर्वांचा स्वामी तो परमात्मा फक्त प्रेमालाच वश होतो.प्रभुभक्तालाच मोह सतावीत नाही.

**कहि रविदास भगति इक वाढी**[पूर]**,अब इह कासिउ**[कोणाला]**कहिए।**
**जा कारनि हम तुम आराधे**[आराधना]**,सो दुखु अजहू सहीऐ॥ ४॥**
—गुरु रविदास, पृ.१७४.

रोहिदास म्हणतात की, "माझ्यात तुझ्या भक्तिप्रेमाचा पूर आला आहे.तेव्हा ही आंतरिक गोष्ट कोणाला सांगू? मी तुझी आराधना केली.तरी मोहाचे दुः ख मला सहन करावे लागणार काय?

(६६)

**कहा भइओ जउ तनु, भइओ छिनु छिनु**[छिन्नभिन्न]**,**
**प्रेम जाइ तउ डरपै तेरौ जनु।**
—गुरु रविदास, पृ.१७५.

अनुक्रमणिका

**भावार्थ**—जरी शरीराचे छिन्नभिन्न तुकडे झाले, तरी प्रेम कमी झाले नाही पाहिजे.त्याचे प्रेम हिसकावून घेण्याची शंका आल्यासच तुझ्या सेवकास भीती वाटण्याची शंका येईल (शरीराचे तुकडे तुकडे होऊन जावो, परंतु प्रेमात विघ्न न येवो, हीच खऱ्या प्रेमीची इच्छा).

**तुझही चरन अरविंद**[कमळ]**भवन**[निवास घर]**मनु**[मन.],
**पान करत पाइओ रामईआ**[रामनाम]**धनु**[धन]**॥ १॥**

—गुरु रविदास, पृ.१७५.

हे प्रभू, "तुझ्या चरण कमळातच माझ्या मनरूपी भुंग्याचा निवास आहे.त्या कमल रसास पित मी रामनामाचे धन प्राप्त केले आहे."

**संपति बिपति**[विपत्ती]**पटल**[आवरण]**माइआ**[माया.]**धनु,**
**ता महि मगन होत न तेरो जनु।**

—गुरु रविदास, पृ.१७५.

जणू काय सांसारिक संपत्ती ही विपत्ती आहे आणि धनदौलत हा मायेचा पडदा आहे.तरी तुझा भक्त यामध्ये आसक्त होत नाही.

**प्रेम की जेवरी**[दोरी]**बाधिओ तेरी जन,**
**कहि 'रविदास' छूटिबो कवन गुन**[चांगुलपणा, प्रेमबंधन]**॥ २॥**

—गुरु रविदास, पृ.१७५.

संत रोहिदास म्हणतात की, "तुझा भक्त प्रेमरूपी रस्सीने बांधलेला आहे.आता तो कोणत्या गुणामुळे सुटू शकेल?प्रेमापेक्षा श्रेष्ठ दुसरे कोणतेच गुण नाहीत.जे प्रेमबंधनातून सोडवू शकतील.प्रेमबंधनाची अवस्था सर्वांत श्रेष्ठ आहे आणि यात पडून राहिल्यास सर्वाधिक आनंद आहे.)

(६७)

**माधौ!मुहि**[मला]**इकु सहारौ तोरा**[तुझा]**॥ ४॥**
**तुम्ह हि मात पित प्रभु मेरो, हौ मसकीन**[गरीब]**अति भोरा**[भोळा]**।**
**तुम जउ तजौ कवन मोहि राखे, सहिहै**[ऐकेल]**,कौनु निहोरा**[प्रार्थना]**॥ १॥**

—गुरु रविदास, पृ.१७६.

**भावार्थ**—हे प्रभु, मला फक्त तुझाच आधार आहे.

तूच माझा माता-पिता आहेस आणि मी तुझा एक गरीब, अडाणी बालक आहे.जर तू मला सोडून दिलेस, तर मग मला कोण ठेवणार?माझी प्रार्थना कोण ऐकणार?

**बाहाडंबर**[बाह्यअवडंबर]**हौं**[मी]**कबहु न जान्यौ, तुम चरनन चित्त मोरा**[माझे]**।**

अनुक्रमणिका

**अगुन[निर्गुण]रत्रगुन[सगुण]दौ समकरी जान्यौ, चहु दिस दरसन तोरा॥ २॥**
—गुरु रविदास, पृ.१७६.

मी कधीही बाह्य अवडंबर किंवा नुसता देखावा करण्यास शिकलो नाही.फक्त तुझ्या चरणावरच माझे चित्त लागून राहिले आहे.परमात्म्याचे सगुण व निर्गुण स्वरूपासंबंधी वादविवाद न करता दोघांनाही समान भावाने मानतो.कारण मला चारी बाजूस तुझ्या स्वरूपाचे दर्शन होत असते.

**पारस मनी मुहि रतु[रतीभर, थोडासुद्धा]नहि भावै, जग जंजार[जंजाळ]न थोरा[थोडा]।**
**कहि 'रविदास' नजि सभ त्रिस्ना, [तृष्णा, तहान.]**
**इकू राम चरन चित्त मोरा॥ ३॥**
—गुरु रविदास, पृ.१७६.

पारस मण्याची मला थोडीसुद्धा आवड नाही पण त्याच्यामुळे मिळालेल्या धनदौलतीने काय थोडा जंजाळ उभा राहातो.(अर्थात धनदौलतीने मनुष्यासाठी एक मोठा माया जंजाळ निर्माण होतो.) संत रोहिदास म्हणतात की, "माझे मन सर्वांची तृष्णा (तहान) सोडून फक्त परमात्म्याच्या चरणाचीच तहान लागली आहे."

(६८)

**दरसन दीजै राम दरसन दीजै।**
**दरसन दीजै हो विलंब न कीजै॥ टेक॥**
—गुरु रविदास, पृ.१७७.

**भावार्थः**—प्रभु दर्शन दे, मला दर्शन दे, लवकर दर्शन दे.उशीर करू नकोस.

**दरसन जोरा जीविन मोरा, बिन दरसन क्यू जीवै हो चकोरा।**
**माधउ सतगुंर सब जग चेला, अब कै बिछुरै[दूर होणे]मिलन दुहेला[कठिण]।**
**धन जोबन[जवानी]की झूठी आसा, सति[सत्य]सति भाषै[वचन]जन 'रविदासा' ॥ १॥**
—गुरु रविदास, पृ. १७७.

तुझे दर्शनच माझ्यासाठी जीवन आहे.तूझे दर्शन केल्याशिवाय मी कसा जिवंत राहू शकतो?चंद्राला पाहिल्याशिवाय चकोर (चातक) कसा जिवंत राहू शकतो?माधवा, सदगुरूच परमात्म्याचे स्वरूप आहे.सर्व जगाला त्याचे शिष्य बनले पाहिजे.कारण हे मानवी जीवनच परमात्म्यास भेटण्याची एकच संधी आहे.ह्या मानवी जीवनात जर प्रभुची भेट झाली नाही आणि प्रभुपासून दूर राहिला तर प्रभुची भेट होणेच कठिण.मनुष्य धन आणि जवानीच्या घमेंडीत-नशेत हिंडत फिरत असतो आणि प्रभुचा शोध करीत नाही.यासाठी रोहिदासजी सत्यवचन सांगतात की, "धन आणि जवानीची आशा खोटी आहे." (हिची आशा सोडून प्रभुबरोबर प्रेम केले पाहिजे.)

(६९)

**तुम्ह करहु क्रिपा मुहि सांई[स्वामी]॥ टेक॥**

अनुक्रमणिका

—गुरु रविदास, पृ.१७७.

**भावार्थ**—हे स्वामी, तू माझ्यावर कृपा कर.

**स्वांस-स्वांस तुझ नाम संभारउ**[स्मरण]**,तुम्हहि भेंट ममु मन हरसाई**[आनंद]**।**
**तुमहु दयाल क्रिपाल करुणानिधि, तुम्हहि दीनबंधु रघुराई॥ १॥**
—गुरु रविदास, पृ.१७७.

मी प्रत्येक श्वासाला (पळा-पळास) तुझ्या नावाचे स्मरण करीत असतो.तुझ्या भेटण्यानेच माझे मन आनंदित होते.हे स्वामी, तू दयाळू आहेस.कृपाळू आहेस.तू दयासागर आणि गरिबांना बदत करणारा आहेस.

**तुम्हरी सरन रहौ निसवासर**[रात्रंदिवस]**,भरमत फिरौ न हौ**[मी]**राई**[राया, राजा]**।**
**तुमरी अनुकंप मान मदु छूटे, राम रसाइन**[औषध]**अम्रितु पाई॥ २॥**
—गुरु रविदास, पृ.१७७.

हे स्वामी, मी रात्रंदिवस तुलाच शरण राहातो. इकडे तिकडे भटकत फिरत राहणे मला आवडत नाही.तुझ्या सहानुभूतीमुळेच माझा अभिमान व अहंकार नाहीसा होत आहे.तसेच कायाकल्प करणाऱ्या प्रभुनामाचे अमृत प्राप्त होते.

**ऐसो बुध**[बुद्धी]**जाचिहुं करुना मैं तुझं चरन तजि कितहु**[कुठेही]**न जाई।**
**चरन सरन 'रविदास' रावरी,** [प्रभू]**अपनी जान लेहु उर**[हृदय]**लाई**[लागणे]**॥ ३॥**
—गुरु रविदास, पृ. १७७.

हे दयाळू प्रभु, माजी तुला विनंती आहे की मी तुझे चरण सोडून दुसरीकडे कुठेही जाऊ नये.संत रोहिदास म्हणतात की, "हे प्रभु, मी फक्त तुझ्या चरणीच शरण आहे.मला आपला समजून आलिंगन दे).

(७०)

**प्रभु जी तुम औगन**[अवगुण, दोष, अपराध]**बकसन हार**[क्षमाशील]**।**
**हऊ**[मी]**बहु नीच उधरो**[उद्धार]**पातकी, मूरिष**[मूर्ख]**निपट**[बिलकुल, एकदम]**अंवार**[अडाणी]**॥ टेक॥**
—गुरु रविदास, पृ.१७८.

**भावार्थ**—हे प्रभु, "तू अपराध्यांना क्षमा करणारा आहेस. मी फार नीच आहे. मी मूर्ख आणि अडाणी आहे. माझ्यासारख्या पापीचा उद्धार कर."

**मो सम**[माझ्यासारखा]**पतीत अधम नहीं कोउ, षीन**[क्षीण, अशक्त]**दुषी विसयार**[विषयासक्त]**।**
**नांम सुनहि नरकु भजै ड़ै**[पळतो]**,तुम बिन कवन**[कोण?]**हमार॥ १॥**
—गुरु रविदास, पृ.१७८.

अनुक्रमणिका

माझ्यासारख्या पतित, अधम, भ्रष्ट, दुःखी आणि विषयासक्त दुसरा कोणी नाही.माझे पाप्याचे नाव ऐकून नरकही पळून जातो.तुझ्याशिवाय मला कोण आहे?

**पतित पावन विड़द**[यश, कीर्ती, प्रसिद्धी]**तिहारौ, आई परो**[पडणे]**तोहि दुवार।**
**कहि रविदास इहु मन आसा, निज कर लेहु उबार**[उद्धार, मुक्त करणे.]**॥ २॥**
—गुरु रविदास, पृ.१७८.

हे प्रभु, तू पतितांचा उद्धार करणारा पतितपावन म्हणून प्रसिद्ध आहेस. म्हणून मी तुझ्या दारावर येऊन पडलो आहे.रोहिदास म्हणतात की, "हे प्रभु, माझ्या मनात आशा आहे की, तू आपल्या हाताने मला जवळ घेशील.तू माझा उद्धार करशील."

## प्रेमाचा विरहाग्नी

ज्या प्रेमीच्या हृदयात प्रेमाचा तीर टोचतो तो विरहव्यथेने व्याकूळ होतो.परमात्म्याचा वियोग त्याच्याकडून सहन केला जात नाही.तो अगदी अधीर होऊन उठतो.वास्तविक पाहाता हा विरहच खऱ्या प्रेमाची ओळख आहे आणि या विरहाशिवाय कोणीही प्रभुस भेटू शकत नाही.

प्रेमीच्या हृदयात रात्रंदिवस विरहाची आग पेटत राहाते व प्रीतमचा विचार मनात येताच विरहाची ज्वाला भडकून उठते.प्रीतमच्या दर्शनाशिवाय जगणे असह्य होऊन जाते आणि एक दिवस एका युगासारखा जातो. अशा प्रेमीच्या विरहव्यथा प्रीतमच्या भेटीनेच दूर होऊ शकतात.

(७१)

**जो मोहि वेदन**[वेदना, त्रास]**का सनि**[कोणाला]**आषौ**[वर्णन करणे, सांगणे]**,हरि बीन जीवन कैसे करि राखो॥ टेक॥**
**जीव तरसै दंगि बसेरा**[नाशाची काळजी]**,करहु संभाल तुम सिरजन मेरा।**
**बिरह तपै तन अधिक जरावै**[जळत]**,नींदडी**[झोप]**न आवै भोजन न भावै**[आवडणे]**॥ १॥**
—गुरु रविदास, पृ.१८०.

**भावार्थ**—माझ्या मनात ज्या वेदना होतात, त्या कोणाला सांगू?प्रभुशिवाय स्वतःला जिवंत कसे ठेवू?

माझा प्राण कासाविस झाला आहे आणि नाश होणार त्या काळजीने मनात घर केले आहे.हे प्रभु, तू माझा सांभाळ कर.विरहाने शरीर तापत आहे आणि विरहाग्नीच्या ज्वाला भडकत आहेत.झोप लागत नाही.भोजन गोड लागत नाही.

**सखी सहेली गरब**[गर्व]**गहेली**[वेडी]**,पीऊ**[प्रीतम]**की बात न सुनहु सहेली।**
**रे दुहागिनी**[अभागिन (नवऱ्याने टाकलेली)]**अधि**[पाप]**कर जानी, गयौ सु जोबन**[सुंदर जवानी]**साध**[इच्छा.]**न मांनी॥ २॥**

अनुक्रमणिका

—गुरु रविदास, पृ.१८०.

मैत्रिणी आपल्याच नादात निष्काळजी किंवा वेडया झाल्या आहेत.मैत्रिणींनो, तुम्ही माझ्या प्रीतमची गोष्ट ऐकणार ना का?मी दुर्दैवी फक्त पाप करणेच जाणते.माझे सुंदर तारुण्य निघून गेले आहे आणि माझ्या मनाची इच्छा पूर्ण झाली नाही.

**तूं दानां**[दाता, उदार]**सांई साहिब मेरा, खिज मतिगार**[सेवक]**बंदा**[दास]**मैं तेरा।**
**कहै 'रविदास'अंदेसा**[भय]**ये ही, बिन दरसन क्यों जीवै हो सनेही**[प्रेमी]**॥ ३॥**
—गुरु रविदास, पृ.१८०/१८१.

हेप्रीतम, स्वामी, तू उदार आहेस.मी तुझी सेवा करणारा दास आहे.रोहिदास म्हणतात की, "मला ही भिती आहे की, तुझ्या दर्शनाशिवाय तुझा हा प्रेमी जगेल कसा?"

(७२)
**राग केदार**

**परीति**[प्रेम]**सुधामनि**[अमृताचे सर्व श्रेष्ठ रत्न]**आव।**
**तेज सरूपी सकल सिरोमनी**[शिरत्न]**,अलख निरंजन**[अंजन (मायारहित प्रभुचे नांव)]**राव॥ टेक॥**
**पीव**[प्रियकर]**संगि प्रेम कबहुं नहिं पायौ, कारनि कवन विसारी।**
**चक**[चकोरी]**कौ ध्यानं दधि सुत**[उदधीसुत, चंद्रमा]**सौहोत है, यों तुम तै मैं न्यारी**[अलग, निराळी]**॥ १॥**
—गुरु रविदास, पृ.१८१.

**भावार्थ**—प्रेमरूपी अमृताने भरलेल्या सतेज तेजस्वी सुंदर प्रियकरा, ये.हे शिरोरत्न, अलखनिरंजन स्वामी, ये.

तुझ्या प्रेमाची चवमी कधी घेऊ शकली नाही.कशामुळे तू मला विसरलास?ज्याप्रमाणे दूर बसलेल्या चकोरीचे ध्यान चंद्रातच लागून राहाते, त्याचप्रमाणे मी तुझ्या ध्यानात वेगळी पडली आहे.

**भोर**[सळ]**भयौ**[झाली]**मोहि इक टग जोवत**[प्रतीक्षा]**,तलफल**[तडफडत]**रजनी**[रात्र]**जाई।**
**पीव बिन सेजहि का सुख सोऊं, विरह बिथा**[व्यथा]**तन षाई**[खाणे]**॥ २॥**
—गुरु रविदास, पृ.१८१.

एकसारखी तुझ्या वाट पाहाण्यात सकाळ झाली आणि रात्र तडफडत निघून गेली.मी प्रियतमाशिवाय सेजेवरसुखाने कशी झोपू?विरहाच्या त्रासाने शरीर तडफडत आहे.

**मेटि दुहाग**[अभागिनी, पतित्यागाची अवस्था]**सुहागिनी कीजै, अपने अंग लगाई।**
**कहे 'रविदास'प्रभू तुम्ह रे बिछौ**[योग]**है, ऐकु पलक**[पळ, क्षण]**जुग**[युग.]**जाई॥ ३॥**
—गुरु रविदास, पृ.१८१.

अनुक्रमणिका

हे प्रभु, त्याग नाहीसा कर.आपले अंग मला लावून सुहासिन बनव.संत रोहिदास म्हणतात की, “तुझ्या वियोगामुळे मला एकेक पळ युगासारखा जात आहे.”

(७३)

**राग गौरी**

**मेरी संगति पोच**[नीच]**सोच दिनु राती।**
**मेरा करमु कुटिलता**[खोटे]**,जनमु कुभांती**[नीच जातीचा]**,**
**राम गुसईआ**[मालक, स्वामी]**जीअ के जवनो,**[जीवन]
**मोहि न बिसारहु मैं जनु**[दास]**तेरा॥ १॥रहाउ॥**

—गुरु रविदास, पृ.१८२.

**भावार्थ**—हे प्रभू, माझी सोबत संगत नीच लोकांबरोबर आहे.ही मला रात्रंदिवस चिंता लागून राहिली आहे.माझे कर्म खोटे आहे आणि माझा जन्मसुद्धा नीच जातीमध्ये झाला.हे स्वामी, प्रभु, माझ्या जिवाच्या जीवना, मला विसरू नकोस.मी तुझा दास आहे.

**मेरी हरहु**[दूर करणे, नाहिशी करणे]**बिपति जन करहु सुभाई**[सुंदर, पवित्र]**,**
**चरण न छांडउ सरीर कल**[बळ, शक्ती]**जाई॥ २॥**

—गुरु रविदास, पृ.१८२.

माझ्यावर कृपा कर.माझी विपत्ती दूर कर, माझे शरीर सोडून गेले तरीही मी तुझे चरण सोडणार नाही.

**कहु ‘रविदास’परउ तेरी साभा**[सभा, दरबार]
**बेगि**[त्वरेने]**मिलहु जन करि न बिलांबा**[विलंब, उशीर]**॥ २॥**

—गुरु रविदास, पृ.१८२.

रोहिदास म्हणतात की, “हे प्रभू, मी तुझ्या दरबारात शरण आलोआहे.माझ्यासारख्या सामान्य जनास भेटण्यास उशीर करू नकोस.मला लवकर दर्शन दे.”

(७४)

**सह**[स्वामी]**की सार**[मर्म, रहस्य]**सुहागनि**[पतिव्रता]**जानै, तजि अभिमानु सुख रलीआ**[शरीर सुख]**मानै।**
**तनु मनु देइ न अंतरू राखै, अवरा**[दुसऱ्याचा]**देखि न सुनै अभाखै**[न बोलणे]**॥**
**सो कत जानै पीर**[पीडा]**पराई**[दुसऱ्याची]**,जाके अंतरी दरदु न पाई॥ १॥**

अनुक्रमणिका

—गुरु रविदास, पृ.१८३.

**भावार्थ**—पतिमिलनाचे रहस्य पतिव्रताच जाणते.आपला मीपणा, घमेंड सोडून पतिव्रता आपल्या पतीबरोबर एकरूप होते.ती आपले तन, मन प्रीतमला समर्पित करते.त्यामुळे ती त्यांच्याबरोबर कसलेच अंतर राखत नाही.ती दुसऱ्यास कधी पहात नाही.ती इतरांचे ऐकत नाही.तसेच ती इतरांबरोबर बोलतही नाही.ज्या प्रियतमेने प्रीतमच्या विरहव्यथेचा अनुभव घेतला नाही.तिला दुसऱ्याची विरहव्यथा कशी समजू शकणार?

**दुखी दुहागनि**[अभागिणी]**दुई पख हीनी**[दोन्ही पक्षांकडून दुःखी]**,जिनिनाहि**[पति]**निरंतरि भगति न कीनी॥**
**पुलसरात**[यमलोकाचा मार्ग]**का पंथ दुहेला**[दुष्कर, कष्टाचा]**,संगि न साथी गवनु**[गमन, जाणे]**इकेला**[एकटे]**॥ २॥**

—गुरु रविदास, पृ.१८३.

जी दुर्दैवी प्रियतमा आपल्या प्रितम परमात्म्याची निरंतर सेवा करीत नाही.ती आपल्या लोक-परलोकास नष्ट करते.दोनही ठिकाणी त्रास भोगते.यम लोकांचा मार्ग अत्यंत कष्टाचा आहे.त्या मार्गात संगत सोबत नसते.एकट्यालाच जावे लागते.

**दुखीआ दरदुवंदु**[पीडित]**दरि आइआ**[दारी आला]**,बहुत पिआस जबाबु न पाइआ॥**
**कहि रविदास सरनि**[शरण]**प्रभु तेरी, जिऊ**[जे]**जानहू तिउ**[ते]**करू गति मेरी॥ ३॥**

—गुरु रविदास, पृ.१८३.

रोहिदास म्हणतात की, “हे प्रभु, हा दुःखी जीव तुझ्या दारावार आला आहे.त्याला तुझ्या दर्शनाची तहान लागली आहे.परंतु तहान अजून भागली नाही.हे प्रभू, मी तुला शरण आलो आहे.तुला माझे जे चांगले वाईट करावयाचे असेल ते कर.”

(७५)

**हम सरि**[समान, बरोबरीचा]**दीनु दइआलु न तुम सरि, अब पतीआरु**[विश्वास]**किआ कीजै।**
**वचनी**[शब्द]**तोर**[तुझे]**मोर**[माझे]**मनु मानै, जन कउ पूरनु**[व्यवहार]**दीजै।**
**हउं बलि बलि जाउं रमइआ**[आराध्यदेवा]**कारेने, कारन कवन अबोल**[न बोलणे]**॥ १॥राहाउ॥**

—गुरु रविदास, पृ.१८४.

**भावार्थ**—हे प्रभु, माझ्यासारखा कोणी दीनदुखी व तुझ्यासारखा दयाळू कोणी नाही.आता हया विश्वासाचे, व्यवहाराचे वर्णन मी कसा करू?तुझे शब्द माझे मन नेहमी ऐकत असते.जगाच्या व्यवहाराशी माझे नाते कुठे राहिले आहे?हे आराध्यदेवा, तुझ्या कृपेसाठी मी नेहमी तुला वेळोवेळी शरण येत राहील.तरी तू माझ्याशी बोलत का नाहीस?

**बहुत जनम बिछुरे थे माधउ, इहु**[हया]**जनमु**[जन्मी]**तुम्हारे लेख**[सेवेत]**।**

अनुक्रमणिका

**कहि रविदास आस लगि जीवउ, चिर[सदैव.]भइओ दरसनु देखे॥ २॥**

—गुरु रविदास, पृ.१८४.

हे प्रभु, आपली दीर्घकाळापासून ताटातूट झाली आहे.आता हा जन्म तुझ्या सेवेत अर्पण केला आहे.रोहिदास म्हणतात की, "माझ्या जिवास तुझ्या भेटीची खूप दिवसांपासून ओढ लागली आहे.मी तुझ्या दर्शनासाठीच जिवंत राहिलो आहे."

**खऱ्या प्रेमाचे फळ**

प्रेम हे परमेश्वराबरोबर भेट मिळविण्याचे एकच साधन आहे.प्रेम आणि भक्तिने मोठयात मोठया पाप्यांचा उद्धार होतो.प्रभुच्या प्रेमामृताचा एक थेंब जन्मजन्मांतराची तहान भागवितो आणि जन्म मरणाच्या चक्रास समाप्त करतो.जो जिवंतपणीमरणास तयार होतो.तोच प्रेमप्याल्याचा अमृतरस पिऊ शकतो.जो प्रेमी प्रेमाची हीकिंमत द्यावयास तयार होतो, त्यास बदल्यामध्ये अमरजीवन प्राप्त होते व तो नेहमीसाठी मृत्युच्या भीतीपासून सुटतो.अनेक जन्मोजन्मी ताटातूट झालेल्या प्रितमला पाहून प्रेमी अनंत आनंदात मग्न होऊन जातो आणि त्याचे मानवजीवन सार्थक होऊन जाते.

(७६)

**देहु कलाली[मद्य (मदिरा-दारू) विकणारी]येक पिआला, ऐसा अवधू[अवधूत, योगी, संन्यासी]होई मतवाला[मस्त]॥ टेक॥**

**कहै कलाली पियाला देऊं, पीवनहारे[पिणारा]का सिर लेऊ॥ १॥**

—गुरु रविदास, पृ.१८६.

**भावार्थ**—योगी महणतो, "अरे (दारू विकणारी) कलाली, दारूचा (ज्ञानाचा) एक असा प्याला दे की, ज्याच्यामुळे हा योगी मस्त होइल." कलाली म्हणते की, "मी असा प्याला देईन, परंतु त्याच्याबदली पिणाऱ्याचे डोके (अहंकार) घेईन."

**ऐरी[अरे]कलाली तै क्या कीया, सिर कै साटै[बदल्यात]पिआला दीआ॥**

**सिर कै साटै महंगा भारी, पीवैगा अपना सिर डारी[देणे, मानणे]॥ २॥**

—गुरु रविदास, पृ.१८६.

योगी महणतो, "अरे कलाली, तू हे काय केलेस?माझ्या डोक्याबदली हा प्याला दिलास!कलाली म्हणते, होय.हा प्याला फार महाग आहे.तो डोक्याबदलीच मिळतो"."आपल्या डोक्याचा त्याग करूनच कोणीही यास पिऊ शकतो."

**चन्द सुर दोउ सनमुख[समोर]होइ, पीवै पीआला मरै न कोई॥ टेक॥**

**सहज[सहजमंडल]सुनि[सुन्नमंडल]में भाठी[भट्टी]स्त्रवै[गळणे],पीवै 'रविदास'गुरुमुखि द्रव्ये[कृपा करणे.]॥ ३॥**

अनुक्रमणिका

—गुरु रविदास, पृ.१८६.

हा प्याला प्याल्यावर चंद्र व सूर्य (आपल्या आंतरिक आध्यात्मिक यात्रेत चंद्र आणि सूर्यास ओलांडून उंच मंडलात जातो.) समोर येताच हा प्याला प्याल्यावर मग कोणी मरत नाही.सहज आणि सुन्न मंडलात ही दारू तयार करण्याची भट्टी आहे.तेथून रस गळतो.रोहिदास म्हणतात की, "गुरुमुख महात्मा किंवा संताच्या कृपेनेच यास कोणीही पिऊ शकतो."

**राग मारू (चउपदा)**

(७७)

**पीआ राम रसु पीआ रे॥ टेक॥**

**भरी भरी देवै सुरति**[आत्म्याच्या पाहाण्या व ऐकण्याच्या शक्तीस क्रमशः'निरत' आणि 'सुरत' म्हणतात.सुरत द्वारा अनहदनादाचा अतिमधुर संगीतरस पिऊन आत्मा आनंदमग्न होतो.]**कलाली, दरिआ**[नदी]**दरिआ पीना रे।**

**पीवत पीवतु आपा**[अहंकार]**जग भूला, हरि रस मांहि वौराना**[वेडा]**रे।**

**दर धरि विसरि गयौ रविदासा, उनमनि**[अंतर्मुखी मन (आंतरिक ध्यानमग्न मन)]**सद**[सदा, नेहमी]**मनतारो रे।**

**पल**[पळ, क्षण]**पलु प्रेम पिआला चालै, छुटे नांहि खुमारी**[नशा, मस्ती]**रे॥ १॥**

—गुरु रविदास, पृ.१८७.

**भावार्थ**—होय.मी परमात्म्याचा प्रेमरस प्यालो आहे.

सुरत रूपी कलाली प्रेमरसाचा प्याला भरभरून देत आहे.मी जणू काय प्रेमरसाच्या संपूर्ण नदीस पित चाललो आहे.हिला पिता पिता मी स्वतःआपल्याला (भेदभाव, अहंभाव, अहंकार) आणि जगाला विसरून बसलो आणि प्रेमरसात वेडा झालो आहे.रोहिदास म्हणतात की, "मी आपल्या घरादारास विसरलो आणि नेहमी अंतर्मुखी ध्यानात मस्त राहातो.क्षणाक्षणाला प्रेमरसाचा प्याला पित राहातो आणि माझी मस्ती कधी सुटत नाही."

(७८)

**हम घर आयहु राम भतारे**[भ्रतार, पति, स्वामी]**,गावहु सखि मिल मंगलाचार।**

**तन मन रत**[लीन]**करहि आपुनो, तौ कहुं पाइहिं पीव पिआर**[प्रेम]**॥ १॥**

—गुरु रविदास, पृ.१८७.

**भावार्थ**—माझ्या घरी माझे स्वामी परमात्मा आले आहेत.सखिनो, सगळ्या मिळून मंगल गीत गा.आपल्या तनमनास प्रितममध्ये नम्र केल्यानेच प्रियतमेचे प्रेम मिळते.

**पीतम कूं जौ दरसन पाए, मंन मंदर मंह भयो उजियार**[प्रकाश]**।**

**हौ मडई**[झोपडी]**तै नौ निधी पाई, क्रिपा किन्ही राम करतार**[कर्ता]**॥ २॥**

—गुरु रविदास, पृ.१८७.

अनुक्रमणिका

जेव्हा मी प्रितमचे दर्शन घेतले, तेव्हा माझ्या मनरूपी महालात प्रकाश पसरला.प्रभु परमात्म्याने माझ्यावर कृपा केली.तेव्हा हया झोपडीत राहणारी मी नवनिधी प्राप्त केल्या.

**बहुत जनम तै बिछुरे पिव पायो, जनम जनम बिलइ रार[भांडण]री।**
**कहि रविदास हौ कछु नहिं जानौ, चरन कंवल मंह तुव मुरार[प्रभु.]॥ ३॥**
—गुरु रविदास, पृ.१८७.

अनेक जन्मांपासून ताटातूट झालेल्या माझ्या प्रितमास मी प्राप्त केले.आता माझे जन्मजन्मांतरीचे भांडण नाहीसे झाले.रोहिदास म्हणतात की, "हे प्रभु, मी काहीसुद्धा समजत नाही.मी फक्त तुझ्या चरणकमलावर पडलो आहे."

## ७.मन
## मनाची उच्छृंखलता

मनाने पथभ्रष्ट होण्यानेच आपली सर्व दुःखे उत्पन्न होतात.परमात्मा सर्व सुखाचे भांडार आहे.परंतु आत्मा जेव्हा परमात्म्याऐवजी मनाप्रमाणे इंद्रियाच्या इच्छेनुसार सांसारिक विषयामागे धावत राहतो, तेव्हा मनाबरोबर आत्म्याससुद्धा अनेक कष्ट पडतात.सांसरिक मायेत गुरफटलेले मन हे समजत नाही की, जे जग केवळ वरून सुंदर दिसणाऱ्या विषयुक्त विषयांचे एक दाट वन आहे.हे मन मूर्खपणे त्या विषयाने आकर्षित होते आणि आपली तहान भागविण्यासाठी एका विषवृक्षावरून दुसऱ्या विषवृक्षावर नेहमी उड्या मारीत असते.परंतु विषयभोगाने कधीसुद्धा मनाची इच्छा शांत होत नाही आणि यास फक्त दुःख आणि निराशाच हाती लागते.जोपर्यंत आत्मा, मन व माया यांच्या तडाख्यातून सुटून परमात्म्याकडे वळत नाही, तोपर्यंत मनाच्या दुःखाचा शेवट होऊ शकत नाही.

आत्म्यास मन आणि माया यातून सुटका होण्यासाठी सर्व प्रथम मनास पवित्र करण्याची आवश्यकता आहे.जेव्हा यास कोणत्या तरी संत किंवा महात्म्याचा सत्संग प्राप्त झाल्यास (ज्याने ह्या अनियंत्रित धावणाऱ्या उच्छृंखल मनास जिंकले असल्यास) ते आपल्या विकारांना सोडून पवित्र होऊ शकते.संतसद्‌गुरु विषय-विकारांचा वाईटपणा दाखवून (यांच्या विषारी प्रभावाकडे लक्ष देऊन) मनास रोखण्यासाठी उत्तेजन देतात व योग्य साधन दाखवितात.सद्‌गुरुच्या मार्गदर्शनानुसार अभ्यास केल्यास मन हळूहळू आपली धावपळ कमी करते आणि शेवटी पूर्ण शांत व एकाग्र होऊन जाते.आत्मा मनाच्या जाळ्यातून सुटतो व परमात्म्याकडे वळतो.शेवटी आत्मा आनंदस्वरूप परमात्म्याचा साक्षात्कार करून घेतो.तेव्हा याच्या दुःखाचा नेहमीसाठी अंत होतो.

(७९)

**मैं का जानौं[समजू]देव मैं का जानौं,**
**मन माया के हाथि बिकानौं॥ टेक॥**
**चंचल मनवा चहु दिस धावै,**
**पांचो इंद्री थिर न रहावै।**

अनुक्रमणिका

**इन मिली मेरौ मन जु बिगारियौ,**
**दिन दिन हरि जी सू अंतर पारियौ**[वाढविले.]**॥ १॥**

—गुरु रविदास, पृ.१९०.

**भावार्थ**—हे प्रभु, मी तुला कुठे समजू शकलो?मी तर मन आणि मायेच्या जंजाळात गुरफटलो आहे.माझे चंचल, ओढाळ मन चारी दिशांना धावत फिरत आहे आणि पंचेद्रिये स्थिर न राहाता चंचल बनली आहेत.या सर्वांनी मिळून माझ्या मनास बिघडविले आहे व दिवसेंदिवस माझ्यातील व परमात्म्यातील अंतर वाढविले आहे.

**तुम तौ आहि**[आहे]**जगत गुर स्वामी,**
**हम कहीयत कल जुग के कामी**[विषयासक्त]**।**
**कहा कहौ मेरीसुक्रित**[सत्कर्म]**बडाई,**
**लोक लीक**[चालरीत]**मो पै तजी न जाई॥ २॥**

—गुरु रविदास, पृ.१९०.

तू तर जगद्गुरू स्वामी आहेस आणि मी तर ह्या कलियुगातील विषयासक्त पुरुष आहे.मी आपल्या सत्कर्मांचे काय वर्णन करू?मी लोकरूढी व वेदप्रामाण्य यांच्यामागे लागलो.अंध परंपरेप्रमाणे वागून मी जगातील त्या लोकरूढ्याही सोडू शकलो नाही.

**सनक सनंदन महामुनि, ग्यानी,**
**सुक नारद अरू व्यास इहै**[आहे.]**वषानी**[वर्णण करणे]**।**
**गावत निगम**[वेद]**उमापति स्वामी,**
**सेस**[शेषनाग]**सहसमुख**[सहस्त्रमुख]**कीरति गामी॥ ३॥**

—गुरु रविदास, पृ.१९०.

हे स्वामी!सनक, सनंदनसारखे महाऋषी, मुनी आणि ज्ञानी जनांनी व शुकदेव, नारद आणि व्यास इत्यादी थोर पुरुषांनी तुझे वर्णन केलेले आहे.वेद, उमापती शिव आणि हजार मुखांचे शेषनागसुद्धा तुझे गुणगान करतात.

**जहां जहां जाउँ तहां दूख की रासी,** [ढीग]
**जौ न पत्यावहु साध हैं साषी**[साक्ष]**।**
**जम दुतन**[यमदूत.]**बहु विधि करि मारयौ,**
**तउ निलज मन अजहूं नहि हारयौ॥ ४॥**

—गुरु रविदास, पृ.१९०.

जगात जेथे जेथे मी जातो तेथे दुःखांचे ढीग पाहातो.त्यांचे वर्णन कसे करू?साधु संतजन साक्षी आहेत. यमदूतांनी मला अनेक प्रकारे मारले आहे.तरीसुद्धा माझे हे निर्लज्ज मन कुकर्म करण्यात अजूनसुद्धा मागे राहात नाही.

अनुक्रमणिका

**हरिपद विमुख आस नहि छूटै,**
**ताथै त्रिस्ना दिन दिन लुटै।**
**बहु विधि करम लियें भटकावै,**
**तुमहि दोस हरि कौन लगावै॥ ५॥**

—गुरु रविदास, पृ. १९०/१९१

मी अजूनसुद्धा ईश्वरस्वरूपापासून विन्मुखच आहे.अजूनही माझी आशा, तृष्णा नाहीशी झाली नाही, तर मला सतत लुटत आहे.पथ भ्रष्ट करीत आहे.हे मन अनेक प्रकारच्या कर्माचे ओझे घेऊन भटकत असते.हरी, याचा दोष तुम्हाला कोण लावील?

**केवल राम नाम नहि लीया,**
**सतित**[सतत]**बिषै**[विषयवासना]**स्वाद चित्त दीया।**
**कहै 'रविदास'कहा लग**[पर्यंत]**कहियै,**
**बिन रघुनाथ बहुत दुःख सहिये॥ ६॥**

—गुरु रविदास, पृ.१९१.

"हे प्रभु, मी तर परमात्म्याचेच नाव कधी घेतलेले नाही व आपले चित्त नेहमी विषय वासनेत लावले." संत रोहिदास म्हणतात की, "मी कुठवर सांगू?प्रभु नामाशिवाय मी पुष्कळ दुःख सहन केले आहे."

(८०)

**देषि** [पाहा]**मूरिषता** [मूर्खपणा]**यहु** [ह्या]**मन की,**
**राम नाम कूँ छांडि अधारौ**[आधार]**गहि**[धरणे]**ओट**[आधार]**छुद**[क्षूद्र]**त्रिन की**[तृण, सुकलेले गवत]**॥ टेक॥**

—गुरु रविदास, पृ.१९२.

**भावार्थ**—ह्या मनाचा मूर्खपणा तरी पाहा.रामनामाचा आधार सोडून नश्वर प्रापंचिक विषयरूपी शुद्र गवताचा आधार घेतला.

**अभि अंतर रामु**[अंतरात्मा]**नहिं जान्यौ, छानहु**[शोधणे]**धूरि**[धूळ]**बनबन की।**
**जा**[ज्या]**दिन इह हंसा उरि जई है, छोरि**[सोडणे]**ठठरिया**[गठडी]**तन की।**
**धनु**[धन]**दारा**[स्त्री]**मंह रहहु लपटानो, आपहु नहिं सुधि**[शुद्ध]**वा छन की॥ १॥**

—गुरु रविदास, पृ.१९२.

शरीरातील अंतरात्म्यास न जाणता बाहेर जंगलात प्रभुचा शोध करीत भटकत आहे.ज्या दिवशी आत्मारूपी हंस ही शरीराची गठडी सोडून निघून जाईल, त्या दिवसाची याला माहितीच नाही.हा तर कनक व कामिनी (धनदौलत व स्त्री) मध्येच गुंडाळलेला आहे.

अनुक्रमणिका

**जन रविदास तियागी जग आसा, लहहु**[घेणे, प्राप्त करणे]**ओट हरि चरनन की॥ २॥**
—गुरु रविदास, पृ.१९२.

रोहिदास म्हणतात की, "अरे भक्ता, ह्या जगाची आशा सोडून परमात्म्याच्या चरणी शरण जा."

(८१)

**मन मोरा माया मंह लपटानो॥ टेक॥**
**विसा सक्त**[विषयासक्त]**रहियो निसवासर**[रात्रंदिवस]**अज हु**[आजसुद्धा]**नहिं अघानो [तृप्त]।**
**कामि कुटिल**[कपटी]**लवार**[लबाड]**कुचाली, समजइ नही समझानो॥ १॥**
—गुरू रविदास, पृ.१९२.

**भावार्थ**—माझे हे मन मायेमध्ये गुंतलेले आहे.मन रात्रंदिवस विषयासक्त राहते.तरीसुद्धा आजपर्यंत हे कधी तृप्त झाले नाही.हे विषयासक्त, लबाड व दुराचारी मन समजावूनही समजत नाही.

**सति संगत पलु नहीं कीन्ही, मन मुरिख बहु गरबानो।**
**सोत खात दिन रैन**[रात्र]**बिताइ, ताहि मै**[त्यामध्ये]**रसना सुख मानो॥ १॥**
—गुरू रविदास, पृ.१९२.

हे मन क्षणभरही सत्संग करीत नाही.हे मूर्ख मन घमेंड, अभिमानाने भरलेले आहे.हे मन रात्रंदिवस खाणे व झोपण्यात घालवीत आहे.त्यातच हे मन सुख मानते.

**माया मंहि हिल मिली रहियौ, फोकट साटे**[बदली, ऐवजी]**जनम गंवाने।**
**कहि रविदास कछु**[काही]**चेत**[सावधान]**बावरे**[वेड्या]**,राम नाम बिननहि उवरानो**[उद्धार]**॥ ३॥**
—गुरू रविदास, पृ.१९२.

हे मन प्रापंचिक मायेतच मग्न राहाते.अशा प्रकारे या मनाने आपला जन्म (आयुष्य) विनाकारण फुकट घालविले आहे.संत रोहिदास म्हणतात की, "हे वेड्या, थोडातरी सावधान हो.रामनामाशिवाय तुझा उद्धार होणार नाही.

(८२)

**राग बिलावलु**

**ऐसोई हरि क्युं पाइबो**[प्राप्त करणे]**,मन चंचलु रे भाई।**
**चपल**[चपळ, चंचल]**भयो चहूं दिस धावइ, राष्यौ**[थांबवून]**न रहाई॥ टेक॥**
—गुरू रविदास, पृ.१९३.

**भावार्थ**—अरे भाऊ, तुझे मन चंचल आहे.अशा परिस्थितीमध्ये तू परमात्म्यास कसा प्राप्त करू शकणार?हे मन चंचल झाले आहे.ते चारी बाजूंस धावत आहे.थांबवूनही ते थांबत नाही.

अनुक्रमणिका

**मै मेरीछूटइ नहि कबहू**[कधी]**,मैंमंता मदु**[मद, नशा, अभिमान]**बींध्यो**[गुंतलेला, अडकलेला] **।**
**लोभ मोह मंह**[मीपणा, अहंकार]**रहौ रूझानौ**[मुग्ध होणे, फसणे]**,नित विषया रस रीझौ**[मुग्ध होणे]**॥ १॥**

—गुरू रविदास, पृ.१९३.

या मनाची मीपणाची भावना सुटत नाही.कारण ते मी, माझ्याच अभिमानात गुंतलेले आहे.ते लोभ, मोह आणि अहंकारामध्ये गुरफटले असून, नेहमी विषयवासनेत दंग राहाते.

**डयंभ**[दंभ, अभिमान]**कौह**[क्रोध]**मोह माया बसु, कपटु कुड**[कचरा, निरुपयोगी वस्तू]**हूं बंधायौ।**
**काम लुबधु**[लुब्ध]**कौ बसि परयौ, कुलकानि**[लोकलाज]**छाड़ि बिकायो॥ २॥**
—गुरू रविदास, पृ.१९३.

अभिमान, क्रोध, मोह आणि मायेच्या ताब्यात राहून कपटरूपी कचऱ्यात फसलेले आहे.तसेच कामवासनेच्या मोहात पडून लोकलाज सोडून, त्यांच्या हस्ते विकला जातो.

**छापा**[गोंदने]**तिलक छपौ नहि सोभइ, जौ लौं केसो नहि गायो।**
**संजमि**[संयम]**रह्यो न हरि हूं सिमरियौ, बिरथा भ्रम्यौ**[भटकणे]**रू भ्रमायौ॥ ३॥**
—गुरू रविदास, पृ.१९३.

जोपर्यंत प्रभुनामाचे गायन केले जात नाही, अर्थात जोपर्यंत अंतःकरणात अनहद नाद ऐकू येत नाही.तोपर्यंत शरीरावर (शंख, चक्र इत्यादी चिन्हे गोंदून) चित्रे कोरून आणि गंध लावून मनुष्याची शोभा होत नाही.जर आम्ही संयमाने राहून प्रभुनामाचे स्मरण केले नाही तर आम्ही व्यर्थ भटकत आहोत व दुसऱ्यांनाही विनाकारण भटकावयास लावीत आहोत असे समजले पाहिजे.

**अनिक**[अनेक]**कौतग**[खेळ, तमाशा]**कला काछै कछे, बहुरि सांग**[सोंग]**दिषावौ।**
**मुरिष**[मूर्ख]**आपन आपु समझि नंह, औरनि**[दुसऱ्यास]**का समुझावौ॥ ४॥**
—गुरू रविदास, पृ.१९३.

पाखंडी लोक अनेक खेळ, तमाशे करून दाखवितात आणि हरतऱ्हेचे पोशाख घालून वेशभुषेचे प्रदर्शन करतात.हे मुर्ख स्वतःस समजत नाहीत तर दुसऱ्यास उपदेश काय करणार?

**आस**[आशा]**करै वैकुण्ठ गवन**[जाणे]**कउ, चल मन कभउ न थिरायौ।**
**जौ लौ मन वसि**[वश]**नंह हूंतौ, तौ लगि सभु जुठरायौ**[बेकार]**॥ ५॥**
—गुरू रविदास, पृ.१९३.

यांचे चंचल मन कधी स्थिर राहात नाही.तरीसुद्धा हे वैकुंठाला जाण्याची आशा बाळगून असतात.जोपर्यंत त्यांचे मन ताब्यात राहात नाही, तोपर्यंत त्यांचे हे सर्व क्रियाकर्म फुकट आहे.

अनुक्रमणिका

**कपट कीयां रीझई**[प्रसन्न]**नहिं केसौ, जगू करता नहि कांचा**[कच्चा]**।**
**कहि रविदास भजौ हरि माधौ, सेवग है मन सांचा**[खरा]**॥ ६॥**
—गुरू रविदास, पृ.१९३.

कपटी करणीने परमात्मा प्रसन्न होत नाही.विश्वनिर्माता अर्धा, कच्चा किंवा अडाणी नाही.म्हणून संत रोहिदास म्हणतात की, "प्रभु परमात्म्याचे सेवक बनून खऱ्या अंतःकरणाने भजन करा."

(८३)

**रे मन माछला**[मासा]**संसार समुदे, तू चित्र विचित्र विचारि रे।**
**जेही गाले**[तोंडात घालताच]**गलिये**[गळा घोटून मारणे.]**ही मरिये, सो संग दूरि निवारि रे॥ टेक॥**
—गुरू रविदास, पृ.१९५.

**भावार्थ**—अरे मनरूपी माशा, तू ह्या संसाररूपी समुद्राचे रंगबिरंगी दृश्याबद्दल चांगला विचार कर.जो पदार्थ तोंडात घालताच गळा घोटून मारणारा आहे, त्याची संगत न करता दूर राहा.

**जम छै**[आहे]**डिगन**[मासे मारणारा (कोळी)]**डोरि छै कंकन**[कंगन]**,पर तिया**[परस्त्री]**लागो**[सुके गवत]**जानि रे ।**
**होइ रस लुबुध**[लुब्ध]**रमै यों मूरख, मन पछितावै अजानि**[अडाणी]**रे॥ १॥**
—गुरू रविदास, पृ.१९५.

यमराज मासे पकडण्याचा गळ लावणारा आहे.परस्त्री ही गळाच्या टोकास लावलेला खाद्यपदार्थ आहे आणि तिचे दागदागिने व साजशृंगार ही त्या गळाची दोरी आहे.मासारूपी मूर्ख मन परस्त्रीरूपी पदार्थाची चव घेण्याच्या लोभात पडून तिच्याबरोबर विलास करते.परंतु नंतर अडाणी मनास पश्चाताप करावा लागतो.

**पाप गूर्लीचा**[हे फळाचे नांव]**धरम निबोली**[निंबोळी]**,देखि देखि फल चीख**[चव]**रे।**
**परतिरिया**[परस्त्री]**सँग भंलो जौ होवै, तौ राजा रावन देख रे॥ २॥**
—गुरू रविदास, पृ.१९५.

पापगुलीचाचे फळ जसे गोड व लिंबाच्या झाडाची निंबोळी कडू असते.तू बाह्यरंग, रूप, वासावरून शिकार होऊ नकोस.तर तू फळाची चव घेऊन मगच खा.जर परस्त्रीसंगाने कल्याण होणार असते तर लंकेचा राजा रावणच बघ.(श्रीरामाची सीता बरोबर नेल्यामुळे रावणाचा सत्यानाश झाला.)

**कह रैदास रतनफल**[मूल्यवान फळ]**कारन, गोविंद का गुज गाइ रे।**
**काँचे**[कच्चे]**कुंभ**[घडा]**भरो जल जैसे, दिन दिन घटतो जाई रे॥ ३॥**
—गुरू रविदास, पृ.१९५.

अनुक्रमणिका

रोहिदास म्हणतात की, "मनुष्य देह धारण करण्याचे किमती फळ हवे तर प्रभुचे गुणगान कर, "कच्च्या भांड्यात भरलेले पाणी क्षणोक्षणी कमी होते.त्याप्रमाणे तुझ्या ह्या नाशिवंत देहाची शक्ती दिवसें-दिवस क्षीण होत जाणार.म्हणून तू प्रभुभक्ती कर."

(८४)
(राग केदार)

**समुझि मन नित निरमल जस गाई।**
**रघुपति प्रभु के चरण सरण तजि, अनत**[अन्यत्र, दुसरीकडे]**किहुं**[कुठे]**जिनि**[जाऊ नका]**जाई॥ टेक॥**

—गुरू रविदास, पृ.१९६.

**भावार्थ**—अरे मना, तू प्रभुच्या निर्मळ यशाचे गुणगान कर.प्रभु परमात्म्याचे चरण सोडून तू दुसरीकडे कुठे ही जाऊनकोस.

**यह संसार सधन बन विषकौ, ता मैं बहु दुष**[दुःखे]**दन्द**[द्वंद्व, भांडण]**व्यालाई**[संकट]**।**
**रूप रावण**[रमण, विलास]**के उनमुषि**[उन्मुख]**मानुषा, पतंग पड़े जिमि**[ज्योत.]**आई॥ १॥**
—गुरू रविदास, पृ.१९६.

हे जग विषयवासनारूपी विषवृक्षांचे घनदाट जंगल आहे.त्यात त्रास, दुःख व संकटे भरलेली आहेत.ज्याप्रमाणे दिव्यास पाहून पतंग त्यावर धावतात व जळून मरतात, त्याप्रमाणे सौंदर्याशी रमण्याच्या इच्छेने माणसे स्त्रीकडे धावतात व आपला सर्वनाश करून घेतात.

**काम कलेस**[क्लेश]**प्रथमि जग पासि**[पाश, जाळे]**,कोऊ न गयौ सचु**[सत्य]**पाई**[प्राप्ती]**।**
**ता मैं चैन किमी तू हुलसै**[सुखानुभव]**,सुणि मुरिष सति भाई॥ २॥**
—गुरू रविदास, पृ.१९६.

जगात कामवासनेच्या दुःखरूपी जाळ्यात फसलेली कोणतीही व्यक्ती सत्यप्राप्ती करू शकली नाही.हे मूर्खा, तू माझा खरा उपदेश ऐक.तू ह्या कामवासनेत आरामाने कसा हंसत खेळत राहणार?

**सदा संताप, नहि नर निहचल किमि छुटिहि इहु**[या पक्रारे]**काई।**
**कहै रविदास भजौहरि चरणा, तज चग फंद अभी**[अमृत]**रसपाई॥ ३॥**
—गुरू रविदास, पृ.१९६.

ह्या जगात दुःखे व मानवी जीवन नेहमीकायम राहात नाहीत.ह्या दुःखाच्या खाईतून अल्पशा मानवी जीवनाची कशी सुटका होऊ शकते?संत रोहिदास म्हणतात की, "तू प्रभुचरणाची सेवा कर.म्हणजे जगातील दुःखाच्या खाईतून सुटून, प्रभुप्रेमामृताचा रस मिळेल.

अनुक्रमणिका

**मनाच्या नियंत्रणाचे साधन**

मन स्वाभाविकच रसप्राप्तीसाठी धडपडणारे असते.जोपर्यंत मनास प्रापंचिक विषयवासनेतून चांगले, पवित्र, गोड आणि मोहक स्वाद-रस मिळत नाही, तोपर्यंत मनाची धावपळ थांबू शकत नाही.जेव्हा हे मन सद्‌गुरूस शरण जाते व त्याच्या प्रेमपूर्ण ध्यानात बाहेरून आत घेऊन जाते, तेव्हा यास आपल्यामध्ये दिव्य प्रकाशाचे दर्शन होते.तसेच अद्‌भूत शब्द-धूनद्वारे अपूर्व गोडी आकर्षित करते.यावर प्रभुभक्ती व नामाचा रंग चढतो आणि प्रभुकृपेने याचे स्वरूप बदलून जाते.अनेक पापी माणसांनी प्रभुभक्तिने उद्धार करून घेतला आहे.

(८५)

**मनु मेरो थिरू न रहाई,**
**कोटि कौतिग**[कौतुक, कुतुहलता, चलाखी]**करि दिषरावै**[दाखविणे]**,इत**[इकडे]**उत**[तिकडे]**जग मंहि धाई॥ टेक॥**

—गुरू रविदास, पृ.१९८.

**भावार्थ**—माझे मन स्थिर राहात नाही.ते कोटी बनेलपणा, खोडसाळपणा करून दाखविते व जगात इकडे तिकडे धावत राहाते.

**माया ममिता मोह लपटानो, दिन दिन उरझत**[फसणे]**जाई।**
**सुआन**[श्वान, कुत्रा]**पुच्छ कभु होइ न सूधो, कजहु**[कुबुद्धी.]**लाख उपाई॥ १॥**
—गुरू रविदास, पृ.१९८.

हे मन माया, ममता आणि मोहात गुरफटून दिवसेंदिवस त्यामध्ये अधिक गुंडाळले जाते.ज्याप्रमाणे कुत्र्याचे शेपूट लाख उपाय करूनसुद्धा सरळ होत नाही, त्याप्रमाणे मनाचा वाकडेपणा व चंचलता अनेक प्रयत्न करूनसुद्धा नाहीसा होत नाही.

**गुरुं कौ ग्यांन प्रेम की सांटी**[छडी]**,कुबुध**[कुबुद्धी]**कुकरम**[कुकर्म]**छुडाई।**
**कहि रविदास मन थिरू**[स्थिर, शांत]**हैसी**[होते]**,चलि सब छांडी**[सोडून]**गुर सरणाई॥ २॥**
—गुरू रविदास, पृ.१९८.

गुरुपासून मिळालेले ज्ञान आणि त्यांच्या प्रेमछडीचे नियंत्रणच मनाची कुबुद्धी व कुकर्म सोडू शकते.संत रोहिदास म्हणतात की, "गुरुस शरण आल्यावर मन सर्व वाईट गोष्टी आणि चंचलता सोडून शांत होते."

(८६)

**सु कछु विचारयौ, ताथै**[ज्यापासून]**मेरो मन थिरू**[स्थिर]**डै रह्यो**[होऊन जाईल]**॥ टेक॥**
**हरि रंग लागौ तायै, मेरो वरन पलटि**[कायापालट]**भयौ।**

अनुक्रमणिका

**धनि**[धन्य]**सो पंथी जिन यहु पंथ चलावा,**
**अगम-गवन**[येणे जाणे]**मैं गमि**[पोहचविणे]**दिखलावा॥ १॥**

—गुरू रविदास, पृ.१९९.

**भावार्थ**—ज्यापासून मन स्थिर होईल, अशा काही साधनांचा विचार करा.रोहिदास म्हणतात की, प्रभुप्रेमाचा रंग लागल्यामुळे माझा कायापालट झाला.ज्यांनी हा पंथ चालविला आणि यामुळे अगम्य अशा आध्यात्मिक मंडळात येणे जाणे असंभव, तेथे आम्हांस पोहचवून दाखविले.तो प्रेम-पथ प्रसारक (सदगुरु) धन्य होय.

**अवरन बरन**[रूपरंग]**कथै जिनि कोई,**
**घटि घटि**[प्रत्येकाच्या ह्रदयात]**व्यापि रह्यौ हरि सोई।**
**जिहिं पद सुरनर प्रेम पियासा,**
**सो पद रमि**[विलास करणे]**रह्यौ'रविदास' ॥ २॥**

—गुरू रविदास, पृ.१९९.

ज्या प्रभुसंबंधी कोणी सांगू शकत नाही, तो रंगरूपाने युक्त आहे किंवा रंगरूपरहित.तो परमात्मा आम्हा सर्वांच्या आत विराजमान आहे.देवता आणि मनुष्य ज्यांच्या चरणाच्या प्रेमाचे तहानलेले आहेत, त्यांच्या चरणात रोहिदास आता विलास करीत आहे.

**राग केदार**

(८७)

**खटु करम**[षटकर्म]**कुल संजुगतु**[संयुक्त]**है, हरि भगति हिरदै नांहि।**
**चरणारविंद**[चरण कमल]**न कथा भावै**[आवडणे]**,सुपच**[चांडाळ (कुत्र्याचे मांस शिजविणारा किंवा खाणारा)]**तूलि**[तुल्य.]**समान॥ १॥**

—गुरू रविदास, पृ.१९९.

**भावार्थ**—जर कोणीषटकर्म करणारी उच्च कुळाशी संबंधित व्यक्ती असेल, परंतु त्याच्या ह्रदयात प्रभुभक्ती नसेल, त्यास प्रभुचरण कमळाची कथा आवडत नसेल, तर त्यास चांडाळासमान मानले पाहिले.

**रे चित्त**[मन] **!चेति चेत**[शुद्धीत येणे, सावधान होणे, चैतन्य]**अचेत, काहे न बालमीक हिं देख।**
**किसु जाति ते किंह पदहिं अमरिओ, राम भगति बिसेख॥ २॥**

—गुरू रविदास, पृ.१९९.

अरे अडाणी मना, तू लवकर शुद्धीमध्ये ये.तू वाल्मिकी ऋषिस बघ.ते आपल्या रामभक्तिमुळे नीच जातीतून उंच अमरपदास पोहचले.

**सुआन सत्रु** [कुत्र्यास मारणारा]**अजातु**[नीचजात]**सभ ते, कृस्न लावै**[प्रेम करण्यामुळे]**हेतु।**

अनुक्रमणिका

**लोग बपुरा[विचारा]किया सराहै, तीनि लोक प्रवेस॥ ३॥**

—गुरू रविदास, पृ.१९९.

तसेच कुत्र्यास मारणारा नीच जातीचा भंगी कृष्णप्रेमामुळे तो एवढा मोठा झाला की, लोक त्याची वाहवा करू लागले.त्याचे महत्त्व तिन्ही लोकी झाले.

**अजामलु[वेश्या प्रेमी]पिंगुला[वेश्या]लुमतु[शिकारी]कुंचरू[अभिराम गंधर्व.]गए हरि के पास।**
**ऐसे दुरमति निसतरे, तू किउं न तरहि 'रविदास'॥ ४ ॥**

—गुरू रविदास, पृ.१९९.

अजामिल (वेश्या), पिंगला (वेश्या), लुधिया (शिकारी) व कुंचर (गंधर्व) या सर्वांनी परमात्म्यास प्राप्त केले.रोहिदास म्हणतात की, "जर अशा वाईट लोकांच्या उद्धार झाला तर मग प्रभुभक्ती व प्रेमामुळे तू का नाही तरणार?"

## ८.कर्म
## कर्माच्या कठीण बंधनात बांधलेले जीव

"करावे तसेभरावे" हा कर्माचा अटळ नियम आहे.ह्या नियमानुसार आम्हांला वेळोवेळी अनेक प्रकारच्या योनींत जन्म घ्यावा लागतो.कर्माचे कठीण बंधन आम्हांस लागू पडते.कर्मामुळे जन्म-मरणाचे हे चक्र कधी समाप्त होत नाही.जन्म-मरणाच्या एकसारख्या चालणाऱ्या चक्रामुळेच ह्या लोकांस जग म्हटले जाते.ह्या जगात जन्म घेऊन आम्ही आपल्या मागील कर्माचे फळ भोगत आहोत व नवीन कर्माचे बी पेरत आहोत.अशा प्रकारे जन्म-मरणाचे हे चक्र एकसारखे चालत राहाते.

परमात्मा दयाळू आहे व सगळ्या जगाचे पालन करणारा आहे.ह्या जगातील प्रत्येक जिवाचे पालनपोषण करण्याची व्यवस्था तो करीत असतो;परंतु त्याच्या दयाळुपणावर व सामर्थ्यावर विश्वास न ठेवता आम्ही आपला सर्व वेळ व शक्ती पोट भरण्याच्या उघोगात घालवितो.एवढेच नव्हे तर अनावश्यक धन एकत्र करण्यासाठी आम्ही अनुचित व निषिद्ध कर्मांचा आधार घेतो.जगातील अनेक वस्तुंच्या प्रलोभनात पडून आम्ही हे विसरतो की, ह्या सर्व वस्तू नश्वर व क्षणभंगूर आहेत.तसेच यांच्या प्राप्तीसाठी केलेल्या दुष्कर्माचे फळ आम्हांला भोगावे लागेल. जगात थोडासा मान-सन्मान मिळताच आम्ही अहंकारी बनतो;पण आम्हांला विचार राहात नाही की, अहंकार आमचा सर्वात मोठा शत्रू आहे.अहंकारी, घमेंडी माणसाचा विनाश अवश्य होतो.कोणीही व्यक्ती कितीही पराक्रमी असो, परंतु आपल्या कर्माच्या फळातून वाचू शकत नाही.

चैतन्यस्वरूप आत्माच्या विचाराचा ऱ्हास होण्याचे मूळ कारण अविद्या म्हणजेच अज्ञान आहे.अज्ञानामुळेच आम्ही अहंकारी होतो आणि जेथे कर्माचा अटळ नियम लागू आहे, तेथे आपल्या परमात्म्यास विसरून जन्म-मरणाच्या भीषण चक्रात पडतो.मानवी जीवनच कर्माचे कठीण बंधन आणि आगमनगमनाच्या भीषण चक्रातून सुटका होण्याची एकच संधी आहे.परंतु ह्या मानवी जीवनात काळाने अनेक प्रकारच्या प्रलोभनाने भरलेले कठीण जाळे लावून ठेवले आहे.त्यातून कोणताही प्राणी ह्या जगातून सुटणार नाही.कर्माचा नियम प्राण्यांना काळाच्या ह्या कठीण जाळ्यात गुरुटून ठेवण्यात व आगमनगमनाच्या चक्रात

अनुक्रमणिका

फसवून ठेवण्यात सर्वांत सूक्ष्म व बलवान साधन आहे.जेव्हा आम्ही कोणत्या तरी पूर्ण गुरुकडून नाम प्राप्त करून, त्यांच्या आदेशानुसार त्यांच्या शिक्षणाचे अनुसरण करतो.तेव्हा आम्ही परमात्म्याच्या कृपेने काळाच्या ह्या कठीण जाळ्यातून निघतो व जन्म-मरणाच्या चक्रातून मुक्त होतो.

(८८)

**का तूं सोवै जागि दिवाना**[वेडा]**,झूटा जीवन सांचि करि जाना॥**
**जो दिन आवै सो दुःख मैं जाही, की जै कूंच रह्या सचु नाहीं।**
**संगी**[सोबती]**चल्यौ है हम भी चलना, दूरि गवन**[जाणे]**सिर ऊपरि मरना॥**

—गुरू रविदास, पृ.२०२.

**भावार्थ**—अरे वेड्या, तू कां निजत पडलास?जागा हो.ह्या खोट्या जीवनाला तू काय खरे समजलास काय?जे दिवस येतात, ते दुःखातच निघून जातात.ह्या जगातून आम्हांला जावयाचे आहे.येथील राहणेही खरे नाही.आपले सोबती जात आहेत आणि आपणांससुद्धा दूर जावयाचे आहे.आम्हांला दूरची यात्रा करावयाची आहे.मृत्यू आमच्या डोक्यावर घिरट्या घालत आहे.

**जो कछु बोवा**[पेरणे]**लुनियै**[कापणे]**सौंईःता मैं फेरफार नहि होई।**
**छाडिअ कूर**[कचरा, निरुपयोगी वस्तू]**भजौहरि चरना, काका**[त्यांचे]**मिटै जनम अरु मरना॥**

—गुरू रविदास, पृ.२०२.

आम्ही ज्या काही कर्मांची बिजे पेरीत आहोत, ते आपणांसच कापावी (भोगावी) लागतात.त्यात फरक पडत नाही.तू निरर्थक कर्मांना सोडून परमात्म्याच्या चरणांची उपासना कर.असे केल्याने जन्म-मरणाचे चक्र समाप्त होते.

**जिनि जीव दिया सो रिजक** [जीविका (जीवन),]**उमगाव**[उत्पन्न केले]**घट घट भीतरि रहट**[रहाट]**चलावै।**
**करि बंदिनी**[सेवा]**छांडि मै मेरा, हिरदै करीम**[परमात्मा.]**संभारि संवेरा॥**

—गुरू रविदास, पृ.२०२.

ज्या परमात्म्याने तुला जीवन दिले आहे, तोच तुझ्या जीवनांची व्यवस्था करतो.ज्याप्रमाणे शेतकरी रहाटाने पाणी काढून पिकांना भिजवितो, त्याचप्रमाणे परमात्मा प्रत्येक प्राण्याच्या भरणपोषणाची काळजी घेतो.तू 'मी, माझा' चा अहंकार सोडून उशीर न करता परमेश्वराची हृदयापासून भक्ती कर.

**आगै पथं खरा**[तीक्ष्ण]**है झीना**[बारीक, सूक्ष्म]**,खांडै**[तलवार]**धार जिसा हे पैना**[तेज, धार]**॥**
**तिस उपरि मारग है तेरा, पंथी पंथ संतारि सबेरा॥**

—गुरू रविदास, पृ.२०२.

(मृत्युनंतरचा) पुढील मार्ग तीक्ष्ण, बारीक व तलवारीच्या धारेप्रमाणे आहे.त्यावरून तुला जावयाचे आहे.तरी प्रवाशा, तू सकाळीच लवकर नीघ.

अनुक्रमणिका

**क्या तें खरच्या क्या तें खाया, चलि दरि हाल**[त्वरित]**दिवानि**[ईश्वर]**बुलाया॥**
**साहिब तो पै लेखा लेसी**[हिशेब]**,भीरि परया**[एकेक पै.]**भरि भरि देसी॥**
—गुरू रविदास, पृ.२०३.

तू आपले आयुष्य कशा प्रकारे खर्च केलेस, काय काय खाल्लेस?तुझ्याकडून केलेल्या कर्माचा हिशेब घेतला जाईल व तुला तो द्यावा लागेल.तेव्हा तू संकटात पडशील.

**जनम सिराना**[शिरणे]**किया पसारा, सांझ परि चहूं दिसि अंधियारा॥**
**कहै 'रविदास' नादानि**[अज्ञान]**दिवाना**[वेडा]**,अजहुं न चैतै**[सावध]**दुनी**[जग]**फंद खाना**[मायाजाळाचे घर, खोली]**॥**
—गुरू रविदास, पृ.२०३.

आपण आपले आयुष्य निरर्थक सांसारिक गोष्टीत घालविले.आता जीवनाची संध्याकाळ आली आहे.चोहोकडे अंधार पसरला आहे.रोहिदास म्हणतात की, "अरे वेड्या, तू अजूनही सावध होत नाहीस की, हे जग तुला फसवून ठेवण्यासाठी मायाजाळाची अंधार कोठडी आहे."

**राग सोरठि**

(८९)

**मन रे हरि भज साम सबेरे।**
**जौजिहि करै वैसा पावै, करम फल तति काल**[त्याचवेळी]**निवेरे**[निर्णय करणे]**॥ टेक॥**
—गुरू रविदास, पृ.२०४.

**भावार्थ**—अरे मना, सकाळ-संध्याकाळी परमात्म्याचे भजन कर, जो जसा करतो, तसेच त्याला तत्काळ फळ मिळते.

**बहुलै**[बहुत (पुष्कळ)]**जगि**[यज्ञ]**करै नहु राजा, मन मंह भई बड़ाई**[मोठा होण्याचाअभिमान]**।**
**करि हंकार सत्त रिषि**[सप्तर्षी]**रथ जोये**[जुंपणे]**,जोनि**[योनी]**सरपहु**[सर्प]**पाई॥ १॥**
—गुरू रविदास, पृ.२०४.

नहुष राजाने बरेचसे यज्ञ केल्यामुळे त्यांचे मनात मोठा होण्याचा अभिमान आला व त्यांनी सप्तर्षींना आपल्या रथाला जुंपले.त्यामुळे त्यास सर्पाच्या योनीत जन्म घ्यावा लागला.

**मन मंह दरप कियो थौ रावणि, निज बल देषि धिकाई**[अधिक]**।**
**दसरथ नंदन सर**[वाण]**संहारयौ, लंक बभीषण पाई॥ २॥**
—गुरू रविदास, पृ.२०४.

याप्रमाणे अधिक सामर्थ्यामुळे रावणाच्या मनात गर्व आला.त्यामुळे दशरथपुत्र रामाच्या बाणाने त्याचा नाश होऊन, लंकेचे राज्य बिभिषणाला मिळाले.

अनुक्रमणिका

**कियौ ठिठौली**[थट्टामस्करी]**जादव कपिल सौ, मन मंह कपट रचाया।**
**करि न्यंदा**[निंदा]**साधु हरि जन**[प्रभुभक्त]**की, अप्पहु**[आपल्या]**बंस**[वंश]**नसाया**[नाश]**॥ ३॥**
—गुरू रविदास, पृ.२०४.

यादवांनी मनातील कपटभावामुळे साधु, प्रभुभक्त कपिल मुनीची थट्टामस्करी-निंदा केली.त्यामुळे त्यांच्या वंशाचा नाश झाला.

**यहु संसार कजलि**[काजळ]**कूं कोठर, अरू विष-हऊं**[विषरुपी अहंकार]**रा कुवा।**
**कहि रविदास हौमे जग खाया, ज्यौ नलिनी**[पोपट पकडणारे]**भू सूवा**[पोपटाचा आवाज काढून]**॥ ४॥**
—गुरू रविदास, पृ.२०४.

जग काजळाची अंधारकोठडी व अहंकाररूपी विषाची विहीर आहे.रोहिदास म्हणतात की, “पोपट पकडणारे पोपटांचा आवाज काढून फसवून त्यांना पकडतात.त्याचप्रमाणे अहंकार सर्व जगाचा नाश करतो.”

(९०)

**मिग्र**[कस्तुरी असलेला हरण]**मीन**[मासा]**भ्रिंग**[भुंगा]**पतंग कुंजर**[हत्ती]**,एक दोष बिनास।**
**पंच दोष**[पंचविकार]**असाध**[असाध्य]**जामहि**[असाध्य]**ता कि केतक**[किती]**आस॥ १॥**
**माधो अविदिअ**[अविधा, अज्ञान]**हित कीन विवेक दीप मलीन॥रहाउ॥**
—गुरू रविदास, पृ.२०६.

**भावार्थ**—हरण,मासा, भुंगा, पतंग व हत्ती हे एकेका विकार-दोषामुळे नष्ट होतात.परंतु मनुष्यात महाभयंकर असे पंचविकार आहेत.तेव्हा त्यांची नाशातून वाचण्याची काय आशा केली जाऊ शकते?हे प्रभु, अज्ञानामुळे प्राण्याचा विवेक (ज्ञान) रूपी दीपक मंद पडतो व त्यास पाप-पुण्य, चांगल्या वाईटाचा विचार राहात नाही.

**त्रिगद जोनि**[तिर्यक्योनी (पशुपक्षांची योनी)]**अचेत**[वेडा]**सम्भव**[उत्पन्न होणे]**पुंन**[पुण्य]**पाप असोच**[विचाररहित]**।**
**मानुषा अवतार दुलभ तिहि**[तिच्यात]**संगति पोच**[नीच, वाईट.]**॥ २॥**
—गुरू रविदास, पृ.२०६.

ज्यांना पाप-पुण्याचा व चांगल्या वाईटाचा विचार नाही अशा अज्ञान पशु-पक्षांच्या योनीत जन्म घ्यावा लागतो.मनुष्ययोनीत जन्म मिळविणे कठिण, दुर्लभ आहे.परंतु मनुष्य काम, क्रोधाच्या वाईट संगतीमध्ये पडतो.

**जीअ जंत**[जिवजंतू]**जहां जहां लगु, करम के बसि जाई।**
**काल फास अबध**[अवध्य]**लागे, कछु न चलै उपाइ॥ ३॥**
—गुरू रविदास, पृ.२०६.

अनुक्रमणिका

जेथे जिवजंतू किंवा मनुष्य जन्म घेतात, ते कर्माच्या अधीन होऊन ह्या योनीत जातात व त्यास काळाच्या अवध्य बंधनात राहावे लागते.यातून वाचण्याचा काही उपाय त्यांना दिसत नाही.

**'रविदास' दास उदास तजु भ्रमु, तपन तपु गुर गिआन**[गुरुज्ञान] **।**
**भगत जन भै**[भय]**हरन परमानंद**[परमआनंद]**,करहु निदान**[अखेर]**॥ ४॥**
—गुरू रविदास, पृ.२०६.

रोहिदास म्हणतात की, "अरे उदास प्राण्या, भ्रम सोडून गुरूने दिलेल्या ज्ञानरूपी तपस्या (साधन) चा अभ्यास कर, भक्ताची भीति दूर करणारा परमात्मा आपल्या भक्तास परम आनंद देणार."

(९१)

**अमर भये हम काहे कू**[कां?कसे?कशासाठी?]**मरि है॥ टेक॥**
**मिथ्या जग माया तजि दीनी, सत्त रूप मनु धरि हैं**
**जौ दीस**[दिसणे]**सभु माया फंदा, ताकि जेवरि**[दोरी]**कतरि हैं॥ १॥**
—गुरू रविदास, पृ.२०७.

**भावार्थ**—मी आता अमर झालो आहे.मी आता कसा मरू शकतो?

मी खोट्या संसाराचा व मायेचा त्याग केला आहे आणि आपल्या मनात सत्य स्वरूप परमात्म्यास धारण केले आहे.ह्या जगात जे काही दिसत आहे, ते सर्व मायेचे जाळे आहे.त्या जाळ्याची दोरी मी कापली आहे.

**अनिक बारू जम्मे अरू मरिये, फुनि**[पुन्हा]**हो**[मी, मीपणा, (अहंकार)]**भमरि**[पाण्यातील भोवरा]**न परि हैं ।**
**पतरि**[अशक्त, कमजोर]**नाव खेवटिया**[नावाडी]**गुरू रामा, नांम लेत ही तरि**[तरणे, पार करणे]**हैं॥ २॥**
—गुरू रविदास, पृ.२०७.

मी अनेक वेळां जन्म घेतला व मृत्यू पावलो.आता मी ह्या जन्म-मरणाच्या भोवऱ्यात पडणार नाही.माझी जीवनरूपी नौका कमजोर आहे;परंतु परमात्मारूपी गुरु हिचा नावाडी आहे.त्याचे नाव घेऊन मी ह्या संसाररूपी सागरावर तरणार व पलिकडे जाणार.

**पर जनम मंह पातक बहुर्ले**[बहुत, पुष्कळ]**,हौ पाछे**[मागील जन्मी]**ही बिछुरि हैं।**
**कहि रविदास अब बनी कछु ऐसी, फुनि औसर किहिं परि**[कसा मिळू शकेल?]**है॥ ३॥**
—गुरू रविदास, पृ.२०७.

अनुक्रमणिका

मी मागील जन्मी फार पाप केले होते.म्हणून मी प्रभुपासून दूर गेलो होतो.रोहिदास म्हणतात की, “आता ह्या मानवी जीवनात प्रभू मिलन प्राप्त झाले आहे.अशी संधी पुन्हा कशी मिळू शकते?

**निष्काम कर्म**

जोपर्यंत आपण ह्या जगात आहोत, तोपर्यंत आपणांला काही ना काही कर्म करावेच लागते.माणसाचा स्वभाव असा आहे की, तो काही ना काही काम केल्याशिवाय राहू शकत नाही.कर्म केल्याने आपण बंधनात पडतो.परंतु संतांची कर्म करण्याची पद्धत अशी आहे की, ते नेहमी कर्म करीत असता कर्मबंधनातून मुक्त राहतात.संतांनी केलेल्या अशा प्रकारच्या कर्मास ‘निष्काम कर्म’ म्हणतात.

आपण कोणतेही कर्म आपल्या इच्छापूर्तीसाठी करतो.परंतु संत सर्व प्रकारे परिपूर्ण असतात.त्यांना कोणत्याही वस्तूंचा अभाव नसतो व त्यांच्या मनात कोणाबद्दल राग-द्वेषही असत नाही.ते सुख-दुःख, जय-पराजय, लाभ-हानी इत्यादी स्वार्थमूलक भावनांपासून सर्व प्रकारे दूरवर असतात.ते कोणत्याही फळाची इंच्छा किंवा कामना न करता परमार्थ किंवा परोपकार आपला धर्म समजून फक्त सेवाभावाने काम करतात.अशा कामनारहित अथवा निष्काम कर्मद्वारा ते सर्व काही करीत असतानासुद्धा ते सर्वांपासून अलिप्त राहतात.

संतच खरे परमार्थी किंवा परोपकारी असतात.ते परोपकारासाठीच ह्या जगात येतात.ते स्वतःस परमात्म्याचे केवळ एक साधन किंवा निमित्तमात्र मानून नेहमी निष्कामभावाने कार्य करतात.नेहमी मनात संतोष बाळगून ते दयाभावाने सर्वांचे कल्याण आणि सर्वांची सेवा करतात.संत संतोषाची किंवा सेवेची सत्कार मूर्ती असतात.आणि त्यांचे जीवन सर्वांसाठी आदर्श आणि अनुकरणीय असते.

**९.शाकाहार**

**(१) जीवहत्त्याचे पाप–**

आपल्या आहार किंवा क्रीडासाठी जिवांची हत्या करणे हे एक भयंकर पाप आहे.कोटी दान पुण्यानेसुद्धा हे पाप नाहीसे होऊ शकत नाही.जीवहत्त्या करणारांना यासाठी भयंकर शिक्षा भोगावी लागते.परमात्म्याने निर्माण केलेल्या प्राण्यांना मारून परमात्म्यास भेटण्याची अभिलाषा बाळगणे अगदी हास्यास्पद आहे.

**(२) मांसाहार आणि मद्यपानाचा निषेध–**

संतांचे म्हणणे आहे की, मांस खाणारे नरकाचे भागीदार होतात.दुसऱ्या प्राण्यांचे मांस खाणाऱ्यांच्या हृदयात दयाभाव राहात नाही.त्यांचे हृदय पापरूपी चिखलाने भरलेले असते.जिवंत प्राण्यांना मुडदा बनवून त्या मुडद्यांना खाण्याने ते जिवंतपणी मुडद्याप्रमाणे होतात.

धर्माच्या नावावर जीवहत्त्या करणे, त्यास खाणे हे इतरांना फार मोठा धोका दिल्याप्रमाणे आहे.ते रात्रंदिवस प्रार्थना करीत राहिले किंवा दान-पुण्य करीत राहिले, तरीसुद्धा मांस खाणारे स्वर्गास जाऊ शकत नाही.

मदिरा तसेच मादक पदार्थाचे सेवन करणे संतांना निषिद्ध आहे.संत केवळ नामाची मदिरा पिण्यासाठी प्रेरित होतात.ज्याची नशा एकवेळ चढल्यानंतर पुन्हा कधीही उतरत नाही.

## १०.कर्मकांडाचे खंडन

**बाह्य वेशभूषा आणि बहिर्मुखी पूजापाठाची व्यर्थता—**

परमात्मा आपल्या सर्वांच्या आत आहे आणि त्याची प्राप्ती फक्त अंतर्मुखी अभ्यासानेच होऊ शकते.अनेक प्रकारच्या धार्मिक वेशभूषा बनविणे. उदा:—भगवे वस्त्र नेसणे, मुंडन करणे, चंदनाचा गंध लावणे, माळा घालणे, भस्म लावणे इत्यादी.प्रापंचिक ढोंगबाजी बाह्य प्रदर्शन आहे.अशा प्रकारे सर्व बहिर्मुखी धार्मिक क्रिया किंवा कर्मकांड.उदा:—नाचणे, गाणे, पूजापाठ किंवा तीर्थव्रत करणे, दान-पुण्य किंवा अग्नी होम करणे, जंगलात किंवा पर्वतांमध्ये भटकत फिरणे, मंदिर-मशिदीमध्ये जाणे इत्यादी व्यर्थ आणि भ्रामक आहे.खरे संत ह्या बाह्य वेशभूषा आणि बहिर्मुखी क्रिया करीत नाहीत.

आपल्या ध्यानास बाहेरून काढून, आत घेऊन जाणे, आपला आप-भाव किंवा अभिमान सोडणे आणि आपणांस परमात्म्यामध्ये विलीन करण्यातच खरी भक्ती आणि खरे प्रेम आहे.ढोंगबाजी किंवा बाह्य प्रदर्शन न करणे हिच खरी भक्ती आणि खऱ्या प्रेमाच्या पराकाष्ठेचे सूचक असते.

(९२)

**किहिं विधी अनसरौ**[मागोमाग चालणे, अनुकुल आचार करणे]**रे, अति दुलभ दीन दयाल।**
**मैं महा विषई, अधिक आतुर, कामना की झाल**[ज्वाला]**॥ टेक॥**
—गुरु रविदास, पृ.२२३.

**भावार्थ**—मी आपल्या प्रभुच्या मागे कसा लागू?(मी त्याची भक्ती कशी करू?)त्या दीनदयाळास प्राप्त करणे महाकठीण आहे.मी विषयासक्त, अत्यंत अधीर आणि कामनांची ज्वाला आहे.

**कहा डिंभ**[दंभ, पाखंड]**बाहरि कीये, हरि कनक कसौटी हार।**
**बाहरी भीतरि, साषि**[साक्ष, पाहणारा]**तूं, हौ कीयौ सु सौ**[सर्व]**अंधियार॥ १॥**
—गुरु रविदास, पृ.२२३.

अनुक्रमणिका

बाहेरून पाखंड-ढोंगबाजी करण्याचे काय फायदा?परमात्मा भक्तिरूपी सोन्यास कसोटीवर कसणारे आहेत. हे प्रभू, तू तर माझ्या आतील व बाहेरचा साक्षीदार आहेस.मी जे काही केले आहे ते सर्व अंधकारमय (अज्ञानमय) कर्म केले.

**कहा भयौ बहु पाखंड कीयै, हरि हिरदै सुपिने न जांन।**
**न्यूं दारा विभचारिनी, मुखि पतिव्रता जीय आन**[दुसरा.]**॥ २॥**

—गुरु रविदास, पृ.२२३.

प्रभूचे नाव स्वप्नातसुद्धा हृदयात येत नाही.अशांना फार पाखंड करण्याने काय फायदा?माझी स्थिती व्यभिचारिणीप्रमाणे आहे, तोंडाने पतिव्रता असल्याचे सांगते व हृदयात दुसऱ्याचे स्मरण करते.

**मैं हिरदै हारि बैठ्यो हरि, मोपै**[माझ्याकडून]**सरयौ रयो**[सिद्ध होणे, पूर्ण होणे]**न एकौ काज।**
**भाव भगति 'रविदास' दे, प्रतिपाल करि मोहि आज॥ ३॥**

—गुरु रविदास, पृ.२२३.

हे प्रभु, आता मी खरोखरच मनापासून हार मानून बसलो.माझ्याकडून एकही काम पूर्ण झाले नाही.मला रोहिदासास (रविदासला) प्रेमभाव आणि भक्ती दे आणि माझा सांभाळ कर.

(९३)

**भाई रे !भ्रम भगति सूं**[ती]**जांनि।**
**जौ लों नहिं सांच सुं**[पासून]**पहिचानि॥ टेक॥**

—गुरु रविदास, पृ.२२४.

**भावार्थ**—अरे भाई, आम्ही जोपर्यंत सत्य ओळखत नाही, तोपर्यंत आमची भक्ती ही एक भ्रम आहे.

**भ्रम नाचण भ्रम गाईण, जम जप तप दानि**[दान]**।**
**भ्रम सेवा भ्रम पूजा, अरू भ्रम सूं पहिचानि॥ १॥**

—गुरु रविदास, पृ.२२४.

नाचणे, गाणे भ्रम आहे, जप, तप व दान भ्रम आहे.सेवा आणि पुजासुद्धा भ्रम आहे.भ्रमामध्येच सर्वांचा परिचय होत आहे.

**भ्रम षट करम**[षटकर्म]**सकल संहिता, भ्रम ग्रेह**[घर]**वन जानि।**
**भ्रम करि करि करम कीऐ, भ्रम की यहुं वानि**[सवय]**॥ २॥**

—गुरु रविदास, पृ.२२४.

षटकर्म भ्रम आहे तसेच सर्व वेदांचे कर्मकांडही भ्रम आहे.अशा प्रकारे घर किंवा वन्यजीवनालाही भ्रमच समजला पाहिजे.भ्रमाच्या अवस्थेत कर्म केले जाते.तसेच भ्रमात कर्म करण्याची सवय जडते.

अनुक्रमणिका

**भ्रम इंदी निग्रह[नियंत्रण]कीयां, भ्रम गुहा मैं बास।**
**भ्रम तो लौं जाणिए, सूंनि[शून्य, असार]की करे आस॥ ३॥**
—गुरु रविदास, पृ.२२४.

इंद्रियावर नियंत्रण ठेवणे भ्रम आहे. गुंफा-गुहामध्ये राहणेही भ्रम आहे.जोपर्यंत आम्ही ह्या शून्य (असार) जगातील वस्तुंची आशा ठेवतो, तोपर्यंत भ्रम लागला आहे असे समजले पाहिजे.

**भ्रम सुध सरीर जौ लौं, भ्रम नांव विनांव[शिवाय]।**
**भ्रम भणि 'रविदास' तो लौ, जौलौ चाहे ठांव[जागा.]॥ ४॥**
—गुरु रविदास, पृ.२२४.

जोपर्यंत शरीराचा विचार राहातो तोपर्यंत भ्रम राहातो.जोपर्यंत नामाची प्राप्ती होत नाही, तोपर्यंत सर्व काही भ्रम आहे.रोहिदास म्हणतात की, "जोपर्यंत आम्हाला या जगात कोणत्याही जागेची इच्छा आहे, तोपर्यंत आम्हाला भ्रम लागलेला आहे असे समजले पाहिजे."

(९४)

**भगती ऐसी सुनहु रे भाई। आई भगति तउ गई बड़ाई[मोठेपणाची भावना, अभिमान]॥ टेक॥**
**कहा भयौ नाचै अरू गायै, कहा भयौ तप कीन्हें।**
**कहा भयौ जै चरन पषालैं[धुणे],जो लौ परम तत्त[तत्त्व]नही चौन्हे[ओळखणे]॥ १॥**
—गुरु रविदास, पृ.२२५.

**भावार्थ**—अरे भाऊ, ऐक, भक्ती ही अशी वस्तू आहे की, ती जेव्हा मोठे होण्याची भावना नाहीशी होते.

जोपर्यंत आम्ही परमतत्त्वास ओळखत नाही, तोपर्यंत नाचणे, गाणे, तपस्या करणे आणि आपले पाय धुऊन घेण्यात काय फायदा?

**कहा भयौ जे भूंड[डोके]मुंडायो, बहु तीरथ व्रत कीन्हें।**
**स्वामी दास भगत अरू सेवग[सेवक],जौ परम तत्त नहीं चीन्हें॥ २॥**
—गुरु रविदास, पृ.२२५.

परमतत्त्व ओळखल्याशिवाय मुंडन करून घेणे, अनेक तीर्थव्रत करणे व आपल्याला स्वामी, दास, भक्त किंवा सेवक म्हणवून घेण्याने काय फायदा होऊ शकतो?

**कहै 'रविदास' तेरी भगति दूर है, भाग बड़े सो पावै।**
**तजि अभिमान मेटि आपा पर[आपला-परका भेद],पिपलक[मुंगी]डै चुणि[निवडून]खावै॥ ३॥**
—गुरु रविदास, पृ.२२५.

अनुक्रमणिका

रोहिदास म्हणतात की, “हे प्रभु, तुझी भक्ती ह्या बहिर्मुखी साधनेपासून दूर आहे.जे मोठे भाग्यशाली असतात, त्यांनाच तुझी भक्ती प्राप्त होते.जे आपला अभिमान सोडून आपला परका भेदभाव नाहीसा करून तसेच मुंगीप्रमाणे लहान बनतात, तेच जगातील साखररूपी भक्ती वेचून तिची चव घेतात.”

(९५)

**भेष लीयौ भेद**[रहस्य, मर्म]**न जान्यौ, इमृत लेइ विषै सौं सान्यौ**[मिसळणे.]**॥ टेक॥**
**काम क्रोध मैं जनम गंवायौ, साध संगति मिली राम न गायो।**

—गुरु रविदास, पृ.२२६.

**भावार्थ**—तू धार्मिक वेश तर धारण केला, परंतु प्रभुचे मर्म, रहस्य ओळखले नाहीस, धार्मिकतेच्या अमृतास घेऊन तू प्रपंचाच्या विषात मिसळले.तू काम आणि क्रोधामध्ये आपले आयुष्य घालविले आणि साधुसंतांच्या संगतीमध्ये सामील होऊनही प्रभुचे यशगान कुठे केलेस?

**तिलक दियौ पै तपनि**[प्रापंचिक अग्नीचा ताप]**न जाई, माला पहरि घणेरी**[माया, धन वाढविणे]**लाई॥**
**कहै ‘रविदास’मरम जु पाऔ, देव निरंजन**[अंजन, मायारहित परमात्मा]**सतिकरि**[खरे रूप]**ध्याऔ॥ १॥**

—गुरु रविदास, पृ.२२६.

टिळा, गंध लावून हृदयाचा ताप नाहीसा होत नाही.माळा घालून, तू आपल्या धन दौलतीच्या लोभास आणखी वाढवितोस.रोहिदास म्हणतात, “जेव्हा तू प्रभूच्या रहस्यास समजशील, तेव्हा तू माया सोडून प्रभुच्या खऱ्या रूपाची (आंतरिक अभ्यास द्वारा) आराधना करशील.”

(९६)

**पांडे!हरि विचि**[मध्ये]**अंतर**[पडदा]**डाढ़ा**[घालून ठेवला]**,मुंड मुडावै सेवा पूजा, भ्रम का बंधन गाढा**[दृढ]**॥ टेक॥**
**माला तिलक मनोहर बानौ**[वेशभूषा]**,लागौ जम की पासी**[फास]**।**
**जौ हरि सेती**[पासून]**जोड्या चाहौ, तौ जग सौं रहौ उदासी॥ १॥**

—गुरु रविदास, पृ.२२६.

**भावार्थ**—पुजाऱ्यांनी आपल्या व परमात्मा यांच्यामध्ये एक पडदा घालून ठेवला आहे.ते मुंडन करून मूर्तिची सेवापूजा करतात.खरोखरच ते भ्रमाच्या दृढबंधनात पडले आहेत.

माळा घालून व टिळा लावून पुजाऱ्यांनी मनमोहक वेशभूषा बनविली, परंतु त्यांचेसाठी हे जणू काय यमराजाचा फासच लागलेला आहे.जर कोणाला प्रभुशी प्रेम जोडावयाचे आहे, तरं त्याला जगात अनासक्त (प्रापंचिक ढोंगबाजीपासून दूर) राहिले पाहिजे.

**भूष**[भूख]**न भाजै**[पळणे]**त्रिस्ना न जाई, कहौ कौन कवन गुण होई।**
**जौ दधि**[दही]**मैं काँजी**[फाटलेल्या दुधाचे पाणी]**को जांवण**[विरजण]**,तो धृत**[तूप]**न काढे कोई॥ २॥**

अनुक्रमणिका

—गुरु रविदास, पृ.२२६.

जर विषय वासनेची भूख नाहीशी झाली नाही आणि प्रापंचिक तहान भागली नाही तर माळा, टिळा इत्यादी दिखाऊ साधनांपासून कोणता गुण प्राप्त होणार?फाटलेल्या दुधाचे विरजण घालून जर कोणी दही बनवू लागला, तर तो कधी त्यापासून तूप काढू शकत नाही (नकली किंवा पाखंडी साधनांनी प्रभुप्राप्ती कराविशी वाटली तरी तो कधी करू शकत नाही.)

**कहनी कथनी ग्यांन अचारा, भगति इनहू**[यापेक्षा]**सौ न्यारी**[निराळी, वेगळी]**॥**
**दोइ**[दोन्ही.]**घोडा चढि कौन न पहुंतौ, सतगुर कहै पुकारी॥ ३॥**

—गुरु रविदास, पृ.२२६.

फक्त कथा, गोष्टी सांगणे, व्याख्यान देणे, शास्त्रीय ज्ञान प्राप्त करणे आणि नियम आचाराचे पालन करून कोणी भक्त बनत नाही.भक्ती या सर्वांहून निराळी वस्तू आहे.सद्‌गुरु उंच मोठ्या आवाजात सांगतात की, "बाह्य देखावा आणि खरी (आंतरिक) भक्ती या दोन घोड्यावर चढून आजपर्यंत कोणीही आपल्या ध्येयरूपी मजल्यावर पोहचलेला नाही.

**जौ दासा तण**[शरीर]**कीयौ चाहौ, आस भगति की होई॥**
**तौ निरमल सांग**[रूप]**मगन है नाचौ, लाज सरम सब खोई॥ ४॥**

—गुरु रविदास, पृ.२२६.

आपल्या ह्या मानव शरीराला जर कोणी प्रभुचा दास बनवू इच्छितो, अर्थात यास प्रभुसेवेत अर्पण करू इच्छितो, तेव्हा तो स्वतःहून पवित्र रूप धारण करून लोकलाज सोडून प्रभुभक्तिमध्ये मग्न होऊन नाचू लागतो.

**कोई दाधौ**[त्रास देणे]**कोई सीधौ**[सज्जनतेने वागविणे]**,सांची कूड**[दूषित मनोवृत्तीचे लोक]**निति मारया।**
**कहै 'रविदास' हौ न कहत हौ, येकादसह**[अकरा (रामानंदांच्या बारा प्रमुख शिष्यांपैकी रोहिदाससोडून बाकी अकरा शिष्य मंडळी).]**पुकारया॥ ५॥**

—गुरु रविदास, पृ.२२६.

त्यास कोणी सतावू लागला किंवा त्याच्याशी आदराने वागू लागला तर तो याची पर्वा करीत नाही.कारण खऱ्या भक्तास दूषित विचार करणारे लोक नेहमी मारतात किंवा सतावीत राहतात.रोहिदास म्हणतात की, "ही गोष्ट फक्त मीच सांगत नाही तर अन्य संतांनीसुद्धा अशीच घोषणा केली आहे."

### जाती, धर्म आणि संप्रदायाच्या भेद-भावाचे खंडन

सर्वांचे पालन करणारा परमात्मा एकच आहे आणि त्याने सर्व मानवजातीस एकसारखे बनविले आहे.तसेच तो सर्वांत एकसारखाच निवास करतो.तरी सर्व मनुष्यांना एकसारखेच समान समजले पाहिजे.

अनुक्रमणिका

आरंभी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्राचे विभाजन लोकांच्याजन्मावर अवलंबून न राहाता, व्यवसायावर अवलंबून होते.परंतु नंतर याचे रूप विकृत झाले व यास वंशगत मानू लागले.या प्रकारे समाज जातीवादाच्या रोगाने पछाडला गेला.मानव समाजाचे निरनिराळ्या धर्मांत आणि संप्रदायांतविभाजनसुद्धा पाद्री व पुजाऱ्यांच्या धर्मांधता व अंधविश्वासाचा परिणाम आहे.म्हणून जाती, धर्म आणि संप्रदायांचा भेदभाव निरर्थक आहे.

कोणत्याही जाती, धर्म किंवा संप्रदायात जन्म घेण्यामुळे कोणी उच्च किंवा नीच होत नाही.आपल्या चांगल्या अथवा वाईट कर्मामुळेच मनुष्य उच्च किंवा नीच होतो.जर ब्राह्मण जातीत जन्म घेणारा कुमार्गी अथवा दुराचारी असेल, तर त्याच्यापुढे आपण डोके नमविता कामा नये.परंतु चांडाळ (नीच) जातीत जन्म घेणारा महात्मा किंवा सदाचारी असल्यास, आपणाला मोठ्या आनंदाने त्याच्या चरणावर डोके नमविले पाहिजे.

वास्तविक पाहाता उच्च आणि कुलीन व्यक्ती ती आहे की जी काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार या पंचविकारांचा त्याग करून खऱ्या संत किंवा महात्म्याच्या चरणांची सेवा करते.

**राग जैतिश्री**

(९७)

**नाथ कछु**[काही]**अनजानो**[समजेनासे]**मन**[मी]**माया के हाथ बिकानो**[विकला जाणे]**॥ टेक॥**
**चंचल मनुआ चहुं दिसि ध्यावै, पाँचो इंद्री थिर न रहावे।**
**तुम कहियत**[म्हणविणे]**हो जगतगुरु** [जगद्गुरु]**स्वामी, हम कहियत कलिजुग के कामी**[विषयासक्त]**॥ १॥**

संत प्रवर रैदाससाहेब (चंद्रिकाप्रसाद जिज्ञासु), पृ २३०.

**भावार्थ**—हे नाथ मला काही समजेनासे झाले आहे.मी मायेच्या हाती विकलो आहे.
माझे चंचल मन चोहोकडे धावत आहे.माझी पंचेंद्रिये स्थिर राहात नाहीत.
तू स्वतःला जगाचा स्वामी म्हणवितोस व आम्ही ह्या कलियुगाचे विषयासक्त आहोत.

**लोक वेद तेरी सुकृत बड़ाई, लोक-लीक मो पै तजी न जाई।**
**इन पंचन**[पंचेंद्रिय]**मेरो मन जू बिगार यो**[बिघडले]**,पल पल**[क्षणोक्षणी]**हरिजी सूँ अंतर**[अंतर]**पारयो**[वाढणे.]**॥ २॥**

संत प्रवर रैदाससाहेब (चंद्रिकाप्रसाद जिज्ञासु), पृ २३०.

वेददेखील तुझ्या सत्कृत्याचे गुणगान गातात.परंतु आम्ही लोक परंपरेस सोडून जात नाही.पंचेंद्रियांमुळे माझे मन बिघडले आहे.त्यामुळे क्षणोक्षणी हरि आणि माझ्यातील अंतर वाढत आहे.

**सनक सनंदन महामुनि ज्ञानी, शुक नारद औ व्यास वखानी।**
**गौतम नारि ऊमापति स्वामी, शेष सहस्त्र मुख कीरती गामी॥ ३॥**

संत प्रवर रैदाससाहेब (चंद्रिकाप्रसाद जिज्ञासु).पृ २३०.

अनुक्रमणिका

सनक, सनंदन हे ज्ञानी महामुनि, शुक, नारद मुनी आणि व्यासांनीसुद्धा तुझे गुणवर्णन केले आहे.गौतम ऋषिची पत्नी अहिल्या, उमापति शंकर, हजारो शेष (नाग) आपल्या तोंडाने तुझी कीर्ती गात असतात.

**जत**[जेथे]**देखौ तत**[तेथे]**दुख की राशी, अजौ**[अजून]**न पतियाय**[विश्वास]**निगम**[साक्ष]**भये साखी।**
**यम दूतन्ह**[पंचेंद्रियांवर]**खलु बहु विधि मारयो**[मारणे]**,तऊ निलज्ञ**[निर्लज्ञ.]**अजहूँ नहि हारयो॥ ४॥**

संत प्रवर रैदाससाहेब (चंद्रिकाप्रसाद जिज्ञासु), पृ २३०.

जेथे पाहावे तेथे दुःखच दुःखदिसत आहे.प्रत्यक्ष वेदही तुझे स्वरूप अद्याप जाणू शकले नाहीत. पंचेद्रिय विकारांनी मला लक्ष्य करून मारले आहे.परंतु मी निर्लज्ञपणे हार खाल्ली नाही.

**हरि पद विमुख आस नहि छुटै, ताते तृष्णा दिन-दिन लूटै।**
**बहुविधि करम लिये भटकावे, तुम्ह दोष हरि कौन लगावे॥ ५॥**

संत प्रवर रैदाससाहेब (चंद्रिकाप्रसाद जिज्ञासु), पृ २३०.

हरिचरणापासून दूर होण्याची आशा सुटत नाही.आमची तहान दिवसेंदिवस वाढत आहे.आम्ही अनेक प्रकारची कर्म करीत भटकतो.परंतु हरि, तुला दोष कोण लावणार?

**केवल राम-नाम नहिं लीया, सतत विषय-स्वाद चित दीया।**
**कह 'रैदास' कहा कस कीजै, बिन रघुनाथ शरण का की**[कोणास]**लीजै॥ ६॥**

संत प्रवर रैदाससाहेब (चंद्रिकाप्रसाद जिज्ञासु), पृ २३०.

तुझे फक्त रामनाम घेतले नाही व नेहमी विषयवासनेत मन घातले.संत रोहिदास म्हणतात की, "कोठे कसे करू?आम्ही कोठे जाऊ?रघुनाथाशिवाय दुसऱ्या कोणास शरण जाऊ?"

(९८)

**ज्यांहा**[जेथे]**देखो वांहा**[तेथे]**चामही चाम**[चामडे]**।**
**चामके मंदिर बोलत राम॥ १॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ ९१.

**भावार्थ**—चर्मकाराचा व्यवसाय नेहमी करीत राहून ईश्वरार्पणबुद्धीने कर्तव्य करणारे संत रोहिदास म्हणतात की, "जेथे पाहावे तेथे चामडेच चामडे, चर्माच्या शरीररूपी मंदिरात राम बोलत आहे."

**चाम की गऊ**[गाय]**चामका बचड़ा**[वासरू]**।**
**चाम ही धुनै**[कुटणे]**चामही ठाड़ा**[तयार, पूर्ण]**॥ २॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ ९१.

अनुक्रमणिका

चामड्याची गाय, चामड्याचेच वासरू, चामडेच सर्वत्र व्यापून राहिले आहे.

**चाम का हाती चाम का राजा।**
**चाम के ऊँटपर चाम का बाजा॥ ३॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ ९१.

चामड्याचा हत्ती व चामड्याचाच राजा, चामड्याच्या उंटावर ठेवलेले वाद्यही चामड्याचेच मढविले आहे.

**कहत रोहिदास सुनो कबीर भाई।**
**चाम बिना देह किनकी**[कशाचा]**बनाई॥ ४॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ ९१.

संत रोहिदास म्हणतात की, “कबीरभाई, ऐक.शरीर चामड्याशिवाय अन्य कशाचे बनविले आहे?”

(९९)

**राम बिन संसय गाँठि**[दूर होणे.]**न छुटै।**
**काम किरोध लोभ दया माया,**
**इन पंचन मिली लूटै॥टेक॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १२६.

**भावार्थ**—रामनामाशिवाय जिवाचा संशय दूर होत नाही.काम, क्रोध, लोभ, मद, माया ह्या पंचेद्रियरूपी लुटारूंनी मला सतावून सोडले आहे.

**हम बड़**[मोठे]**कवि कुलीन हम पंडित, हम जोगी संन्यासी।**
**ज्ञानी गुनी सुर**[शूर]**हम दाता, याहु कहे मति नासी॥ १॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १२६.

आम्ही मोठे कवि, कुलीन, पंडित, थोर योगी, संन्यासी आहोत.आम्ही ज्ञानी, गुणी, शुर, आहोत.आम्ही दाते आहोत.असे घमेंडपणाने म्हटल्याने मती भ्रष्ट होते.

**पढे गुने कछु समुझि न परई, जौं लौ भाव न दरसै।**
**लोहा हिरन**[लोखंडपण]**होई धौं कैसे, जौं पारस नहिं परसै॥ २॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १२६.

अनुक्रमणिका

केवळ पुस्तकी शिक्षण घेतल्याने काही समजते असे नाही.जोपर्यंत भक्तिभाव निर्माण होत नाही तोपर्यंत विद्वता व्यर्थ आहे.लोखंडाचे लोखंडपण परिस स्पर्शाशिवाय नष्ट होत नाही.

**कह रैदास और असमुझ सी, चलि परे भ्रम भोरे।**
**एक अधार नाम नरहरि को, जिवन प्रान धन मोरे**[माझे]**॥ ३॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १२६.

संत रोहिदास म्हणतात की, "सत्यामुळे मनाचा भ्रम, संशय नाहीसा होतो.मला नरहरि नामाचाच आधार आहे.नाम हेच माझे जीवन व नाम हेच माझे धन आहे."

(१००)

**रामा हो जगजीवन मोरा**[माझे] **।**
**तून बिसारि राम मैं जन तोरा**[तुझा]**॥टेक॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १३१.

**भावार्थ**—हे प्रभु रामराया, ह्या जगातील माझे जीवन तुला समर्पित असो, हे रामा, मी तुझा सेवक आहे.हे तू विसरू नकोस.

**सकट सोच पोच**[चिंता, पीडा]**दिन राती।**
**करम कठिण मोरि जाति कुजाती**[हीन, हलकी]**॥ १॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १३१.

मी संकटात सापडल्यामुळे दिवसरात्र काळजीत आहे.त्यातच मी हीन, हलक्या जातीत जन्म घेतल्यामुळे माझे कर्मही हीन बनले आहे.

**हरहु**[दूर करणे]**बिपति भावै करहु सो भाव।**
**चरन न छाडौ**[सोडणे]**जाव सो जाव॥ २॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १३१.

मी तुला शरण आलो आहे.तु माझे संकट दूर कर.मी तुझे चरण सोडणार नाही.एवढे करुनही तू मला सोडून जाणार असशील तर जा.

**कह रैदास कछु देहु अलंबन**[आश्रय] **।**
**वेगी मिलौ जीन करौ विलंबन**[उशीर, विलंब]**॥ ३॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १३१.

रोहिदास म्हणतात की, "तू मला थोडासा आश्रय दे.मला लवकर दर्शन दे.आता उशीर करू नकोस."

अनुक्रमणिका

(१०१)

**मिलन पीयारौ प्राननाथ कवनि**[कोणती]**भगति।**
**साध-संगति पाइ**[प्राप्त झाली]**परम गति॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १३६.

**भावार्थ**—आवडता प्राणनाथ ईश्वर भेटल्यावर त्याची वेगळी कोणती भक्ती करावी?साधु-संताच्या संगतिने मला परमगती मिळाली आहे.

**मैले कपरे**[कपडे]**कहाँ लउ धोवउ**[धुणे]**।**
**आवैगी नींद**[निद्रा]**कहाँ लउ सोवउँ**[झोपणे]**॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १३६.

मळकट झालेले कपडे मी आता कुठे आणि कसे स्वच्छ करू?झोप आल्यास मी कुठे झोपू?नित्याचे व्यवहारही करायचे मला भानच राहिले नाही.

**जोइ**[जेव्हा जेव्हा]**-जोई जोऱ्यो**[जोडणे, जमविणे]**सोई-सोई**[तेव्हा तेव्हा]**पाटयो**[काढणे, जाणे]**।**
**झूठै बनजि उठि ही गई हाटयो**[बाजार]**॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १३६.

ह्या संसारात मी जे जे जोडतो, ते ते फाटते, खर्च होते.हा सांसारिक सारा व्यापारच खोटा आहे आणि बाजारसुद्धा खोटा आहे.

**कहि रविदास भयो जब लेख्यो**[हिशेब]**।**
**जोई-जोई कीन्यो**[करतो.]**सोई-सोई देख्यो॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १३६.

रोहिदास म्हणतात की, “जेव्हापासून मला प्रभुचा साक्षात्कार झाला, तेव्हापासून मी जे जे करतो, ते ते सर्व दिव्य अनुभवाने भारले गेले आहे.”

(१०२)

**राग केदार**

**कहु मन राम नाम सँभारि**[सांभाळ]**।**
**माया के भ्रम कहाँ भूल्यो, जाहुगे कर झारि**[हात झाडीत]**॥टेक॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १३७.

अनुक्रमणिका

**भावार्थ**—हे मना, रामनामाचा जप कर.मायेच्या मोहपाशात असा भुलून राहिलास तर हात झाडीत, अर्थात पुण्यसंचय न करताच जाण्याचा प्रसंग येईल.

**देखि धौ इहाँ कौन तेरो, सगा[सखा]सुत नहि नारि।**
**तोरि उतँग सब दूरि करि है, दैहिंगे तन जारि[जाळणे]॥ १॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १३७.

जरा विचार करून बघ.येथे तुझे कोण आहे?सखा, पुत्र व पत्नीही तुझी नाही.तुझी येथून जाण्याची वेळ झाली की, तुझ्याबरोबर कोणी येणार नाही.तुझे शरीर जाळण्यात येईल.

**प्राण गये कहों कौन तेरा, देखि सोच बिचारि।**
**बहुरि येहि कलीं काल नही, जीति भावै हारि॥ २॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १३७.

तुझे एकदा प्राण गेले की, मग तुझे कोण राहिले?बघ.विचार कर.कलियुगातील तुझा जन्म तुला पुन्हा मिळणार नाही.म्हणून भक्तिमार्ग स्वीकारून जीवनाचे सार्थक कर.

**यहु माया सब थोथरी[खोटी]रे, भगति दिस प्रतिहारि।**
**कह रैदास सत वचन गुरुके, सों जिव ते न बिसारि[विसरणे]॥ ३॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १३७.

ही सगळी माया खोटी आहे.ती सोडून दे व रामाची भक्ती कर.रोहिदास म्हणतात की, “मी सद्‌गुरुचे सत्यवचन सांगतो की, हे जिवा, ते कथन विसरू नकोस.”

(१०३)

**चल मन हरि चटसाल[पाठशाला]पढाऊ॥टेक॥**
**गुरु की साटि[शिस्त]ज्ञान का अच्छर। बिसरे तो सहज समाधि लगाऊँ॥ १॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १३८.

**भावार्थ**—हे मना, चल, आपण ईश्वराच्या पाठशाळेत शिकण्यासाठी जाऊ.सद्‌गुरुची शिस्त पाळू म्हणजे ज्ञानाची अक्षरे आपोआप समजू लागतील.ती विसरल्यास आपण सहज समाधी लावू.

**प्रेम की पाटी सुरति[स्मृति (स्मरण)]की लेखनि। र रौ म मौ लिखि आँक[अंक]लखाऊ[दाखवू]॥ २॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १३८.

प्रेमाच्या पाटीवर स्मरणाची लेखणी करू, अक्षर व अंक गिरवून घटवून लिहून दाखवू.

अनुक्रमणिका

**येहि विधि[अशाच पद्धतीने]मुक्त भये[झाले]सनकादिक। हृदय बिचार प्रकास दिखाऊ॥ ३॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १३८.

अशा प्रकारे सनकादिक ऋषीमुनी मुक्त झाले.आपणही हृदयात ज्ञानाचा प्रकाश दाखवू या.

**कागद कंवल मति मसि[मी]करि निर्मल। बिन रसना निसदिन गुन गाऊँ॥ ४॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १३८.

हृदयकमलाच्या कागदावर बुद्धीच्या निर्मल शाईने रात्रंदिवस हरिगुण गीते लिहू, गाऊ या.

**कह रैदास राम भजु भाई। संत साखि[साक्ष]दे बाहुरि[पुन्हा]न आऊँ॥ ५॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १३८.

रोहिदास म्हणतात की, अरे भाई, रामास भज, संत तुला अनुभवाने सांगत आहे की, पुन्हा तुला कोणी सांगावयास येणार नाही.

(१०४)

**राग कानड़ा**

**माया मोहिला[मोहाने]कान्हा,**
**मैं जन सेवक तेरा॥टेक॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १३९.

**भावार्थ**—हे कान्हा, माया मोहाने संत्रस्त झालेला मी तुझा साधारण सेवक आहे.

**संसार प्रपंच मैं व्याकुल परमानंदा।**
**त्राहि त्राहि अनाथ गोविंदा॥ १॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १३९.

परमेश्वरा, सांसारिक आणि प्रापंचिक अडचणीने मी व्याकूळ झालो आहे.हे गोविंदा, तू ह्या त्रासलेल्या अनाथाचे रक्षण कर.

**रैदास विनवै कर जोरी[जोडून]**
**अविगत नाथ कवन[कोणती]गति मोरी[माझी.]॥ १२॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १३९.

रोहिदास तुला दोन्ही हात जोडून विनवीत आहे की, "हे अविगतिनाथा, माझी कोणती गती होणार?माझे काय होणार?"

(१०५)

अनुक्रमणिका

**सो कहा जानै पीर**[दुःख]**पराई**[दुसऱ्याचे] **। जाके दिलमे दरद**[दुःख, करुणा]**न आई॥टेक॥**
**दुःखी दुहागिनि**[विरहिणी]**होई पियहीना**[प्रियकराशिवाय]**,नेह**[निरंतर]**निरति करि सेव**[सेवा]**न कीना।**
**स्याम प्रेमका पंथ दुहेला**[दुर्धर]**,चलन अकेला कोई संग न हेला॥ १॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४२.

**भावार्थ**—ज्याचे मनात करुणाच नाही, तो दुसऱ्याचे दुःख कसा जाणू शकेल?

प्रियकराच्या विरहाने दुःखी झालेली विरहिणी नेहमी प्रेमच करीत असते पण तिला प्रियकराची सेवा करण्याची संधीच मिळत नाही.ईश्वर प्राप्तीचा मार्ग असाच दुर्धर आहे.ह्या मार्गावर एकाकीच वाटचाल करावी लागते.तेथे कोणाची संगत लाभत नाही.

**सुख की सार सुहागिनी जानै, तन मन देय अंतर नहि आनै।**
**आन सुनाय और नहि भाषै, राम रसायन**[रामरूपी रसायन]**रसना**[जीभ, स्वाद]**चाखै॥ २॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४२.

तनमनासह सर्वस्व अर्पण करणारी पतिव्रताच सर्व सुखाचे सार समजू शकते.सांगता येत नाही.बोलता येत नाही.रसना रामनामरूपी रसायनाचा स्वाद चाखत आहे.

**खालिक**[ईश्वर]**दरदमंद**[दुःखी]**दर आया, बहुत उमेद**[आशा,अपेक्षा]**जवाब न पाया।**
**कह रैदास कवन गति मेरी, सेवा बंदगी**[वंदना, प्रार्थना]**न जानु तेरी॥ ३॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४२.

ईश्वर अचानक समोर आला तर, त्याचेपासून आपणांस खूप अपेक्षा असतात.रोहिदास म्हणतात की, “देवा, तुझी सेवा कशी करावी हे कळत नाही.” आता माझे कसे काय होणार?”

(१०६)

**गोविंदे**[शंभो]**तुम्हारे से समाधि लागी।**
**उर भुअंग**[भुजंग]**भस्म अंग संतत बैरागी॥टेक॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४३.

भावार्थ—शंकर महादेवाचे वर्णन करताना संत रोहिदास म्हणतात की, “हे शंभो, तुला समाधी लागली आहे.गळ्यात भुजंग-सर्प आहे.साऱ्या अंगास भस्म लावलेला असा तू वैराग्याचा अवतार आहेस.

**जाके तीन नैन**[नेत्र]**अमृत बैन**[वाणी (भाषण)]**सीस**[डोके]**जटाधारी।**
**कोटिकलप**[कोटिकल्प]**ध्यान अलप, मदन अंतकारी**[विनाश करणे.]**॥ १॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४३.

अनुक्रमणिका

तीन नेत्र असून, तुझी वाणी अमृतमय आहे.डोके जटाधारी आहे.कोटिकल्प ध्यान लावले असून, मदनाचा नाश केला आहे.

**जाके नील बरन अकल**[निष्कलंक]**ब्रम्ह, गले रुंड माला।**
**प्रेम मगन फिरत नगन संग सखा बाला**[सखी]**॥ २॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४३.

कंठाचा वर्ण निळा असून निष्कलंक ब्रह्म आहे.गळ्यात रूंडमाला आहेत.भक्ति प्रेममग्न होऊन नग्न फिरत आहे व सोबत सखी आहे.

**अस महेस**[महादेव]**बिकट भेस अजहू दरस आसा।**
**कैसे राम मिलै तोहि, गावे रैदासा॥ ३॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४३.

असा तो बिकट वेषधारी महादेव आज मला दिसला.रोहिदास गात आहेत की, तुला तो राम कसा भेटणार?

(१०७)

**हरि विन नहि कोई पतित पावन, आनहि**[अन्य]**ध्याव रे।**
**हम अपूज्य पूज्य भये हरि ते, नाम अनूपम गावे रे॥टेक॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४६.

**भावार्थ**—पतितांना पावन करणारा हरिशिवाय दुसरा कोणी नाही.आम्ही हीन जातीत जन्मूनही हरिकृपेने धन्य बनलो.आम्ही त्या अनुपम हरिचे नामस्मरण केले.

**अष्टादस**[अठरा]**व्याकरण न बखानें, तीन काल षट**[शट दर्शन]**जीता रे।**
**प्रेम भगति अंतर गति नाहीं, ता ते धानुक**[भक्तिहीन, धानुकजात]**नीका रे॥ १॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४६.

अठरा व्याकरणे त्याचे वर्णन करतात.तिन्ही काळी शट्दर्शने त्याचे वर्णन करताना थकतात.प्रेमभक्तिशिवाय दुसरा उपाय नाही.ह्या प्रेमभक्तिने हीन धानुक जातसुद्धा श्रेष्ठ पावते.

**ता ते भलो स्वान**[कुत्रा]**को सत्रू हरि चरनन चित लावै रे।**
**मूआ मुकत बैकुंठवास, जिवत यहाँ जस**[यश]**पावै रे॥ २॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४६.

अनुक्रमणिका

स्वतःस कुत्र्याचे शत्रु म्हणविणारे डोमसुद्धा हरिचरणी चित्त राखल्यास पवित्र होतात.मुक्ती प्राप्त करून वैकुंठवास मिळवायचा म्हणजे मरावे लागते.जिवंतपणी यश मिळवायचे असेल.आत्मसुख मिळवायचे असेल तर भक्ती केली पाहिजे.

**हम अपराधी नीच घर जनमे, कुटुंब लोक करै हाँसी रे।**
**कह रैदास राम जपु रसना**[जिव्हा (जीभ)]**,कटै जनम की फाँसी**[फेरा.]**रे॥ ३॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४६.

रोहिदास म्हणतात की, "आम्ही नीच जातीत जन्म घेऊन अपराधी ठरलो.आमचे व कुटुंबियांचे जगात हसे झाले.परंतु जिव्हेने रामनामाचा जप केल्याने, आम्ही जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून मुक्त झालो."

(१०८)

**राग आसा**

**हरि हरि हरि हरि हरि हरे।**
**हरि सुमिरत जन निस्तरे**[उद्धरणे]**॥टेक॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४७.

**भावार्थ**—हरिस्मरणाचे माहात्म्य अवर्णनीय आहे.हरिचे नित्य स्मरण करण्याने सर्वसाधारण लोकही जगात उद्धरून जातात.

**हरि के नाम कबीर उजागर**[स्वर्गसुख लाभ]**।**
**जनम जनम के काटे कागर**[फेऱ्यातून मुक्त]**॥ १॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४७.

हरिस्मरणाने संत कबीरास स्वर्गीय सुखाचा लाभ झाला.त्यांची जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून मुक्ती झाली.

**नमत नामदेव दूध पिआया।**
**तो जगजन्म संकट नहि आया॥ २॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४७.

नामदेवाच्या भक्तिपुढे ईश्वर नम्र झाला आणि त्याच्या आग्रहावरून त्याने दिलेले दूध प्याला.नामदेव ह्या जगात संकटमुक्त झाला.

**जन-रविदास राम रंग राता**[रंगणे]**।**
**गुरु प्रसादि नरक नहिं जाता॥ ३॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४७.

अनुक्रमणिका

लोकांचा रोहिदास रामभक्तिमध्ये रंगून गेला.त्यामुळे तो नरकास न जाता गुरुकृपा प्रसादाने निश्चिंत झाला.

(१०९)

**भाई रे सहज वंदो**[वंदन, आराधना]**लोइ, बिन सहज सिद्धि न होई।**
**लौ**[एकाकर, एकरूप]**लीन मन जो जानिये, तब कीट**[कीटक]**भृंगी**[शिवशंकर.]**होई॥टेक॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४८.

**भावार्थ**—सहज साधनेचे महत्त्व प्रतिपादन करताना संत रोहिदास म्हणतात की, "अरे बंधू, तू सहज मार्गाने परज्योतीची आराधना कर.सहज साधनेशिवाय सिद्धी मिळत नाही.ईश्वरी ज्योतीशी तू एकरूप झाल्यास सफल होशील.ज्योतीशी प्रेमाने एकरूप होणारा कीटक शिवाचा प्रिय होऊ शकतो."

**आपा**[आपले]**पर**[दुसऱ्याचे]**चीन्हे नही रे, और को उपदेस।**
**कहाँ तुम आयो रे भाई, जाहुगे किस देश॥ १॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४८.

हे आपले, हे दुसऱ्याचे असा भेदभाव करू नकोस.मानापमान सोडून दे.तुला दुसरा काय उपदेश करावा?तू कोठून आलास?कोणत्या दिशेला जाणार?

**कहिये तो कहिये काहि कहिये, कहाँ कौन पतियाइ**[विश्वास]**।**
**रैदास दास अजान**[अज्ञान]**है करि, रह्यो सहज समाई॥ २॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४८.

तुला सांगावयाचे झाले तर कसे काय सांगावे?तुला विश्वासाने कोणी कोठे सांगावे?संत रोहिदास स्वतःस अज्ञान समजून म्हणतात की, "परमेश्वर सहज साधनेने सहजभक्तिभावाने प्रसन्न होतो."

(११०)

**इह अँदेस**[संदेह, शंका]**सोच जिय**[मन]**मेरे।**
**निसिबासर**[रात्रंदिवस]**गुन गाऊँ तोरे॥टेक॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४९.

**भावार्थ**—हे ईश्वरा, तू माझा उद्धार करशील की नाही अशी शंका माझ्या मनात आली आहे.म्हणून मी रात्रंदिवस तुझे गुणगायन करीत आहे.

**तुम चिंतत मेरी चिंतहु**[चिंता]**जाई।**
**तुम चिंतामनि हो इक साई॥ १॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४९.

अनुक्रमणिका

मनात आणशील तर तू माझी सर्व चिंता नाहीशी करशील.कारण तू साक्षात चिंतामणी आहेस.

**भगति हेत**[हित]**का का नहि कीन्हा**[केले]**।**
**हमरी बेर भये बलहीना॥ २॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४९.

भक्ताच्या हितासाठी तू काय बरे केले नाहीस.मग आमच्या उद्धाराच्या वेळीच असा उदासीन का होतोस?

**कह रैदास दास अपराधी।**
**जेहि तुम द्रवौ**[कृपावर्षाव]**सो भगति न साधि**[झाली.]**॥ ३॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १४९.

स्वतःस अपराधी समजून हा तुझा सेवक रोहिदास म्हणतो की, “तू कृपेचा वर्षाव करावास, अशी भक्तिच माझ्या हातून झाली नसावी.

(१११)

**रामराय का कहिये यह ऐसी, जन की जानत हो जैसी**[जशी]**तैसी**[तशी]**॥टेक॥**
**मीन**[मासा]**पकरि**[पकडणे]**काट्यो अरु काट्यो, बाँटि कियो बहु धानी**[अनेकांना]**।**
**खंड खंड करि भोजन कौन्हो, तहउ**[तरीही]**न विसऱ्यो पानी॥ १॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १५०.

**भावार्थ**—हे रामराया, सेवकाची स्थिति काय झाली आहे ते कसे सांगू?त्याची माहिती अशी तशीच (साधारण) आहे.

पकडलेला मासा कापून अनेकांना वाटावा, त्यांनी त्याचे तुकडे तुकडे करून भोजन करावे.तरीदेखील मासा पाण्यास विसरत नाही.(जेवणारास वरचेवर पाणी प्यावे लागते.)

**तै हमैं बाँधे मोह फॉसीसे**[फासांनी]**,हम तोको**[तुला]**प्रेम जेवरियाँ**[दागिने]**बाँधे।**
**अपने छुटन कै जतन**[यत्न]**हौ, हम छुटे तोको आ राधे**[आराधना]**॥ २॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १५०.

त्याप्रमाणे तू आम्हांला मोहमायेच्या फासांनी बंदिवान केलेस.परंतु आम्ही तुला प्रेम भक्तिरूपी दागिन्यांनी बांधले आहे.ह्या मोहमायाजाळांतून मुक्त होण्याकरिता आम्ही खूप प्रयत्न करतो.तुझी आराधना (भक्ती) करतो.

**कह रैदास भगति इक बाढी**[वाढणे, समर्थ होणे]**,अब का की डर डरिये।**
**जौ डरको हम तुमको सेवौ**[सेवा]**,सो दुख अजहु**[आजच]**मरिये॥ ३॥**

अनुक्रमणिका

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १५०.

संत रोहिदास म्हणतात की, "आता माझी भक्ती इतकी वाढली आहे की, आता मला कशाचीच भीति वाटत नाही.जर भीति बाळगून सेवा करू लागलो तर, भीतिचे दुःख सहन करण्यापेक्षा आजच मरण का न यावे?"

(११२)

**गोविंदे भवजल**[भवसागर]**व्याधि**[दुःख]**अपारा**[पारावार नसणे]**,ता मे सूझै**[सुचेनासे]**वार न पारा॥टेक॥**

**अगम घर दूर उरंतर, बोलि भरोस**[भरवसा]**न देहू**[देणे]**।**
**तेरी भगति अरोहन**[चढणे]**संत अरोहन, पोहिं चढाई न लेहू**[घेणे.]**॥ १॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १५४.

**भावार्थ**—हे गोविंदा, ह्या भवसागरातील दुःखास पारावर नाही.त्यामुळे मला त्यातील काही कळेनासे झाले आहे.

तुझे घर-ठिकाण अगम्य आहे.तेथे पोहचण्याचा तू मला भरवसा देत नाही.तुझ्या भक्तिची एकेक पायरी मी चढत आहे.परंतु तू मला आपल्या घरी घेत नाहीस.

**लोह की नाव परबा**[संभाळणे]**न बोझी, सुकिरित**[पुण्य]**भाव विहीना।**
**लोब तरंग मोह भयो काला, मीन भयो मन लीना॥ २॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१५४.

माझी लोखंडाची होडी पापाने अवजड झाली आहे.माझ्याकडे पुण्याचा संचय नाही.लोभरूपी लाटांनी व मोहरूपी अंधाराने मी भयभीत झालो आहे.माझे मन चंचल असल्यामुळे मी भवसागर कसा ओलांडू?

**दीनानाथ सुनहु मम विनती, कवने हेत**[कशासाठी]**विलंब करीजै।**
**रैदास दास संत चरमन, मोहि अब अवलंबन**[आश्रय]**दीजै॥ ३॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ. १५४.

हे दीनानाथा, माझी प्रार्थना ऐक, तू कशासाठी उशीर करीत आहेस?हा संताच्या चरणाचा दास, रोहिदास तुला विनवितो की, "तू मला आता आश्रय दे."

(११३)

**है सब आतम सुख**[आत्मज्ञानाचे]**परकास साँचो**[सत्य]**,निरंतर निराहार कल्पित थै पाँचो**[पांचतत्त्व]**॥टेक॥**

**आदि मध्य औसान एक रस, तार बन्यो हो भाई।**

अनुक्रमणिका

**थावर**[स्थावर]**जंगम कीट**[कीटक]**पतंगा, पुरी रह्यो हरिराई॥ १॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१५५.

**भावार्थ**—पंचविकार निंद्य आहेत.निरंतर, निराहार हे आत्मज्ञानाचे सुख खरे सत्य आहे.

सर्व जगात सर्वव्यापी असे ते दिव्य तत्त्व आहे.हे अलौकिक तत्त्व स्थावर, जंगम इत्यादी सर्व प्राणिमात्रांना व्यापून राहिले आहे.

**सर्वेस्वर सर्वांगी सब गति, करता हरता सोई।**
**सिव**[शिवशंकर]**न असिव न साध**[साधु]**अस सेवक, उनै भाव नहि होई॥ २॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१५५.

सर्व जनांचा वाली, सर्व जगाचा त्राता असा तोच एक परमेश्वर आहे.शिव व अशिव, साधु व सेवक असा कोणताच दुजाभाव त्याच्याजवळ नाही.

**धरम अधरम मोच्छ**[मोक्ष]**नहीं बंधन, जरा मरन भव नासा।**
**दृष्टि अदृष्टि गेय**[जय.]**अरु ज्ञाना, एक मेक कहै रैदासा॥ ३॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१५५.

धर्म व अधर्म, मोक्ष व बंधन त्याचप्रमाणे जरा-मरण इत्यादी सर्व गोष्टीचे अतीत असे ते तत्त्व आहे.रोहिदास म्हणतात की, "हे परम तत्त्व ज्ञानमार्गाने सर्वांना जाणण्यायोग्य आहे."

**राग धनाश्री**

(११४)

(आदि ग्रंथानुसार)—
**तोही मोही मोही तोही अंतरु कैसा, कनक कटिक जल तरंग जैसा।**
**जउ पै हम न पाप करंता अहे अनंता, पतित पावन नामु कैसे हुंता॥ १॥रहाउ॥**
**तुम्ह जु नाइक आछहु अंतरजामी, प्रभु ते जनु जानी जै जन तै सुआमी॥ २॥**
**सरीरु आराधै मो कउ वीचारु देहु, रविदास समदल समझावै कोउ॥ ३॥**

—संतगुरु रविदास-वाणी, पृ.८३.

**रूपांतर**—

**हम न पाप करता अहौ अनंता, पतित पावन तेरो बिडद**[ब्रीद]**क्यूं हुंता**[म्हणवितोस]**।**
**तोही**[तुझे]**मोही**[माझे]**मोही तोही अंतरू ऐसा, कनक कटक**[सोन्याचे दागिने]**जल तरंग**[लहरी]**जैसा॥**

अनुक्रमणिका

—संतगुरु रविदास-वाणी, पृ.८४.

**भावार्थ**—हे देवा अनंता, तू माझ्याजवळ कां येत नाहीस?तू स्वतःस पतितपावन म्हणवितोस!मग ते बीद्र तरी का बाळगतोस?

तुझ्यामाझ्यातील स्नेहबंध अतूट आहेत.सोन्याचा व त्याचेपासून बनविलेल्या दागिन्यांचा, पाण्याचा व त्याच्यावरील लहरींचा ज्याप्रमाणे संबंध आहे तसेच तुझे माझे नाते आहे.

**तुम्ह जु नाइक अंतरजामी**[अंतर्यामी]**,ठाकुर थै जनजाणी जे जन थै स्वामी।**
**तुम्ह सबहिन**[सर्वांस]**मंह तुम्ह सब मांहि, रविदास दास**[सेवक]**असमझिसि कहै कहांई॥ १॥**
—संतगुरु रविदास-वाणी, पृ.८४.

तू अंतर्यामी आहेस.माझ्यासारख्या सामान्य माणसाचा तू स्वामी आहेस.तू माझे सर्वस्व आहेस.रोहिदास म्हणतात की, “आता तूच सांग, यात माझी काय चूक आहे?तू सर्वांस व्यापून आहेस.अर्थात सर्व तुझ्यात अंतर्भूत आहेत.”

(११५)

**गाइ गाइ अब का कहि**[काय]**गाँऊ।**
**गावन हार**[ज्याचे गायन करावयाचे तो ईश्वर]**को निकट**[जवळ.]**बताउ॥टेक॥**
—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१५९.

**भावार्थ**—आता गायन करावे तर काय गाऊँ?कारण आता गायन करण्याची स्थितीच राहिली नाही.ज्याचे भजन-गायन करावयाचे तोच आता माझ्याजवळ आला आहे.तो मला भेटलेला आहे.

**जब लग**[जोपर्यंत]**है या तन की आसा, तब लग करै पुकारा।**
**जब मन मिल्यौ आस नहि तनकी, तब को गावनहारा॥ १॥**
—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१५९.

जोपर्यंत ह्या शरीराची आसक्ती असते तोपर्यंत आपण ईश्वराकडे मागत असतो.पण जेव्हा आपले मन त्या परमतत्त्वाशी एकरूप होऊन जाते.तेव्हा आसक्ती राहात नाही.तेव्हा ईश्वराकडे कोण गात मागत बसेल?

**जब लग**[मिळणे]**नदी न समुद्र समावै**[अहंकार]**,तब लग बढै हँकारा**[आराधना]**।**
**जब मन मिल्यौ रामसागर सॉ, तब यह मिटी पुकारा**[आराधना]**॥ २॥**
—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१५९.

जोपर्यंत नदी समुद्रास मिळत नाही तोपर्यंत तिचा अहंकार असतो.पण जेव्हा मनरूपी नदी रामरूपी समुद्रास मिळते तेव्हा आराधना संपते.कारण मागणेच उरत नाही.

अनुक्रमणिका

**जब लग भगति मुकति की आसा[आशा],पदमतत्त्व[परमतत्त्व]सुनि गावै॥**
**जहँ जहँ आस धरत है यह मन, तहँ तहँ कछु न पावै॥ ३॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१५९.

जोपर्यंत भक्ती-मुक्तिची आशा राहिलेली असते.तोपर्यंत परमतत्त्वाचा शोध घेत राहातो.आपण त्याचे स्मरण करीत राहातो.जेव्हा हे मन आाशा धरून राहाते, तेव्हा त्याला काही मिळत नाही.

**छाडै आस निरास परम पद, तब सुख सतिकर[सत्य]होई।**
**कह रैदास जासो[जो]और करत है, परम तत्त्व अब सोई॥ १॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१५९.

जेव्हा आपण निस्वार्थपणे त्या परमपदाची भक्ती करतो तेव्हाच खरे सुख मिळते.रोहिदास म्हणतात की, "परमतत्त्व एकच आहे.जे अन्य साधना करीत असतील, त्यांनी हे लक्षात ठेवावे."

(११६)

**त्राहि त्राहि त्रिभुवनपति पावन।**
**अतिसय[अतिशय]सूल[कष्ट]सकल बलि जावन[शरण जाणे]॥टेक॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१६२.

**भावार्थ**— हे त्रिभुवनापति ईश्वरा, सकल देवाधिदेवा, मी अत्यंत दुःखी, कष्टी झालो आहे.मी तुला शरण आलो आहे.तू माझे रक्षण कर.

**काम क्रोध लंपट मन मोर।**
**कैसे भजन करु मैं तोर[तुझे.]॥ १॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१६२.

माझे ओढाळ मन काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड्विकाराचे आहारी गेले आहे.अशा स्थितित मी तुझे भजन, चिंतन कसे करू?

**विषम[चंचल]विहंगम[पक्ष्याप्रमाणे]दुंद नकारी।**
**असरन सरन सरन भौहारी[भवसागरातून मुक्ती देणारा]॥ २॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१६२.

माझे मन पक्ष्याप्रमाणे चंचल आहे.अशा अतिचंचल आणि हीन वृत्तीच्या ह्या सेवकास तू दयाळू होऊन आश्रय दे.तू दीनानाथ त्राता आहेस.तसेच सांसारिक दुःखे नाहीशी करणारा आहेस.

**देव देव दरबार दुआरै[दारावर]।**

अनुक्रमणिका

**राम राम रैदास पुकार**[आराधना करणे]**॥ ३॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१६२.

संत रोहिदास तुझ्या दारावर 'राम राम' अशी हाक देत उभा आहे.त्याचेवर कृपादृष्टी होऊ दे.

(११७)

**तेरा जन काहे को बोलै, बोलि बोलि अपनी भगति को खोलै॥टेक॥**
**बोलत बोलत बढै वियाधी**[व्याधि, दुःख]**,बोल अबोलै जाई।**
**बोलौ बोल अबोल कोप**[क्रोध]**करै, बोले बोल को खाई॥ १॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१६३.

**भावार्थ**—तुझा भक्त का बरे बोलत राहाणार?तो आपली भक्ती काय म्हणून जाहीर करणार?

बोलून बोलून रोग-दुःख वाढत राहाते.त्यामुळे बोलणे कमी होते.तसेच बोलत राहिल्यास अबोल व्यक्तिंचा, सुज्ञ व्यक्तिंचा क्रोध होतो.कारण बोलणेच बोलण्याला खाऊन टाकते.

**बोले ज्ञान मान परि बोलै, बोले वेद बडाई।**
**उर में धरि जब ही बोलै, तब ही मूळ गँवाई**[गमविणे]**॥ २॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१६३.

बोलण्याने बोलणे वाढत राहाते.स्वतःच्या ज्ञानाविषयी लोक अहंकाराने सांगत असतात.आपण मनात काही तरी ठेवून वरवर बडबडत राहिलो आणि मूळ गोष्टी बाजूलाच राहातात.

**बोलि बोलि औरहि**[दुसऱ्यास कोणास.]**समजावै, तब लगि समजन भाई।**
**बोलि बोलि समझी जब बुझी, काल सहित सब खाई॥ ३॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१६३.

बोलत बोलत आपण दुसऱ्या कोणास समजावून सांगितले तरी त्याला समजतेच असे नाही.शिवाय वेळ फुकट गेल्यासारखे होते.

**बोले गुरु अरु**[आणि]**बोले चेला, बोल बोल की परतिति**[प्रचिती अनुभव]**आई।**
**कह रैदास मगन**[मग्न]**भयो जबहि, तबहि परमनिधी**[परमपद (तत्त्व)]**पाई॥ ४॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१६३.

गुरु बोलतो आणि शिष्य बोलतो.योग्य व्यक्तिच्या बोलण्यातून अनुभव येतो.संत रोहिदास म्हणतात की, "जेव्हा आपण एकाग्र-एकचित होतो, तेव्हाच परमपद (तत्त्व) प्राप्त होते."

(११८)

**जनको तारि**[उद्धार करणे]**बाप रमइया।**

अनुक्रमणिका

**कठिन फंद पऱ्यो**[फास पडणे]**पंच जमइया**[पंचविकार]**॥टेक॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१६५.

**भावार्थ**—संत रोहिदास ईश्वरास उद्देशून म्हणतात की, "तू ह्या सामान्य सेवकास उद्धरून घे.हे सृष्टिनिर्मात्या देवा, तू माझी ह्या कठोर पंचविकारांच्या तावडीतून सुटका कर."

**तुम बिन सकल देव मुनि ढुंढूँ**[शोधणे]**।**
**कहूँ न पाऊ जमपास**[जन्ममृत्यूचा फास]**छुड़इया॥ १॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१६५.

हे प्रभु, मी सगळे मुनी व देव शोधून थकलो.परंतु जन्ममृत्यूच्या फासातून मुक्त करील असा कोणीही भेटला नाही.म्हणून तू स्वतः येऊन माझा उद्धार कर.

**हम से दीन दयाल न तुमसे।**
**चरन सरन रैदास चमइया**[चांभार]**॥ २॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१६५.

माझ्यासारखा गरीब व तुझ्यासारखा दयाळू दुसरा कोणी नाही.म्हणून रोहिदास चांभार तुला शरण आला आहे.त्याची पंचविकारांच्या तावडीतून मुक्तता कर.

(११९)

**रथ को चतुर चलावनहारो**[सारथी]**।**
**खिन**[क्षण]**हाँके हित उभटै**[उभा]**राखै, नहीं आनको**[अन्य.]**सारो॥टेक॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१६७.

**भावार्थ**—हा जीवनरूपी रथ चालविणारा सारथी चतुर दिसतो.तो क्षणात रथ चालवितो तर क्षणात उभा करतो.तर कधी अन्य मार्गानेच चालवितो.

**जब रथ थकै**[थकणे]**सारथी थाकै, तब को रथहि चलावै।**
**नाद बिंद ये सबही थाके, मन मंगल नहिं गावै॥ १॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१६७.

जेव्हा जीवनरूपी रथ थकतो तेव्हा सारथीही थकतो.मग रथ कोण चालविणार?रथाची गती थांबली की सारथ्याचे मन खिन्न होते.

**पांच तत्त**[तत्त्व]**की यह रथ साज्यो, अरधै**[अंतरिक्ष]**उरध**[आकाश]**निवासा।**
**चरन कमल लव**[प्रेम]**लाइ रह्यो है, गुन गावै रैदासा॥ २॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१६७.

अनुक्रमणिका

हा जीवनरथ पंच तत्त्वांनी बनलेला आहे.या पंचतत्त्वांचा सर्वत्र निवास आहे.त्याने अंतरिक्ष व आकाश व्यापलेले आहे.संत रोहिदासांचे त्या दिव्य शक्तीच्या चरणकमलावर अनन्य निष्ठा, प्रेम आहे.म्हणून ते त्याच्या सर्व व्यापकत्वाचे गुणगायन करीत आहेत.

(१२०)

**राग सोरठ**

**पार गया चाहै सब कोई।**
**रहि उर वार पार नहि होई॥टेक॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१६९.

भावार्थ— आपला उद्धार व्हावा असे सर्वांना वाटते.परंतु, भौतिक सुखाचा त्याग केल्याशिवाय मोक्ष मिळत नाही.

**पार कहै उर वार से पारा।**
**बिन पद परचे**[परिचय]**भ्रमै**[भास होणे]**गँवारा**[अज्ञान.]**॥ १॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१६९.

ही ऐहिक सुखे भोगत असताना अज्ञान लोकांना ईश्वरप्राप्ती झाल्याचा भ्रम होतो.

**पार परम पद मंझ मुरारी।**
**ता में आप रमै बनवारी॥ २॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१६९.

परमतत्त्वाचा साक्षात्कार न होताच त्यास भ्रमातच राहावे लागते.परंतु ह्या भौतिक सुखदुःखाच्या पलीकडे प्रभुचे अस्तित्व आहे.प्रभु स्वतंत्र विश्वात रमलेला आहे.

**पूरन**[पूर्ण]**ब्रह्म बसै सब ठाई।**
**कह रैदास मिले सुख साई॥ ३॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१६९.

ईश्वर लौकिक जगात रमणारा नाही.त्याचे अस्तित्व 'पार' आहे.अर्थात पारलौकिक आहे.पूर्णब्रह्म परमशक्तीचा निवास सर्वत्र आहे.संत रोहिदास म्हणतो की, "पूर्ण ब्रह्माच्या प्राप्तीमध्येच खरे सुख मिळते."

(१२१)

**राग भैरव**

अनुक्रमणिका

**ऐसा ध्यान धरौं बरो बनवारी**[प्रभु]**,मन पवन दै सुखमन नारी**[नाडी]**॥टेक॥**
**सो जप जपौ जो बहुर**[पुन्हा]**न जपना।**
**सो तप तपौं जो बहुरि न तपना॥ १॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१७४.

**भावार्थ**— योग समाधीने मिळणाऱ्या अलौकिक आनंदाचे वर्णन करताना प्रभुचे (परमतत्त्वाचे), चिंतन करताना संत रोहिदास म्हणतात की, "हे प्रभु, मनाचा श्वास देऊन सुसमन नाडी द्वारा मी असे ध्यान करीन."

त्या जपाचे जप असे जपीत राहीन की, जप पुन्हा जपावा लागणार नाही.अर्थात माझी साधना यशस्वी होईल."

**सो गुरू करौं जी बहुरि न करना।**
**ऐसों मरौं जो बहुरि न मरना॥ २॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१७४.

मी असा यशस्वी गुरु करीन की, पुन्हा त्यास करावा लागणार नाही.तसेच मी अशा प्रकारे मरेन की, पुन्हा मरावे लागणार नाही.(परत मुक्ती मागावी लागणार नाही.)

**उलटी गंग**[गंगा]**जमुन**[यमुना]**में लावौं।**
**बिनही जल मंजन**[स्नान]**द्वै**[दोन]**पावौं॥ ३॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१७४.

गंगा नदीस उलटून यमुना नदीत घेऊन येईन (अर्थात इडा आणि पिंगळा या नाड्यांच्या यौगिक प्रक्रियेने संयोग जुळवून माझे द्वैत कायमचे विरून जाईल.) पाण्याशिवाय दोघींचेही स्नान करीन.

**लोचन**[नेत्र]**भरि भरि बिंब निहारौ**[परमतत्त्वाचे दर्शन घेणे]**।**
**ज्योति बिचारि न और बिचारौं**[चिंतन.]**॥ ४॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१७४.

डोळे भरभरून त्या बिंबास (परमतत्त्वास) पाहीन आणि त्या तेजाचा विचार केल्यावर पुन्हा विचार करावा लागणार नाही.एकचित होऊन मी महातत्त्वाचे चिंतन करीन.

**पिंड परे**[अलग, मुक्त]**जिव जिस घर जाता।**
**सबद अतीत**[आदि, पूर्वीचा]**अनाइद**[अनाहत]**राता॥ ५॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१७४.

जीव ह्या शरीर-पिंडातून मुक्त झाल्यावर जातो.शब्दापासून पार होऊन अनाहुत शब्दात विलिन होतो (अनाहुताचा स्वर कानी येताच जीवमुक्त होतो व प्रभुशी एकरूप पावतो).

अनुक्रमणिका

**जा पर कृपा सोई भल जानै।**
**गुँगो**[मुका]**साकर**[साखर]**कहा बखानै॥ ६॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१७४.

ज्याच्यावर तुझी कृपा होते तोच यास चांगल्या प्रकारे जाणतो.मुका मनुष्य साखरेच्या गोडीचे वर्णन कसा करणार?(साधक दिव्य आनंदाचा आस्वाद घेतो पण तो आनंद शब्दांत वर्णन करू शकत नाही.)

**सुन्न**[शून्य]**मंडल में मेरा बासा**[निवास]**।**
**ता ते जिव मे ररौं उदासा॥ ७॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१७४.

तुझ्या शून्यमंडलात माझा निवास आहे.त्यापासून जीव उदास राहातो.जीव-शिवाचे मिलन व्हावे म्हणून साधकाची सारी साधना सुरू असते.

**कह रैदास निरंजन**[निरंजन प्रभु.]**ध्यावौं।**
**जिस घर जावै सो बहुरि न आवौ॥ ८॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१७४.

रोहिदास म्हणतो की, "मी निरंजन प्रभुचे ध्यान करतो.ज्या घरात मला जावयाचे आहे तेथून मी परत येणार नाही."

**राग आसा**

(१२२)

**आदिग्रंथानुसार—**
**तुम चंदन हम इरंड बापुरै, संगी तुमारे बासा।**
**नीच रूख ते ऊंच भये हैं, गंध सुगंध निवासा॥ १॥**
**माधउ संत संगति सरनि तुमारी, हम अउगुन तुम्ह उपकारी॥रहाउ॥**
**तुम मखतूल सुपेद सपीअल, हम बपुरे जस कीरा।**
**संत संगति मिलि रही ऐ माधउ, जैसे मधुप मखीरा॥ २॥**
**जाती ओछा पाती ओछा, ओछा जनम हमारा।**
**राजा राम की सेव न कीनी, कहि 'रविदास' चमारा॥ ३॥**

—श्रीसंत रविदास (वाणी), पृ.८८.

**रूपांतर—**
**माधो, संगत सरति**[आवडणे]**तुमारी, जगजीवन कृस्न मुरारी॥टेक॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१८३.

**भावार्थ**— हे माधवा, तुझी सत्संगत मला खूप आवडते.हे कृष्णमुरारी, तू जगाला जीवन देणारा आहेस.

अनुक्रमणिका

**तुम मखतुल**[उत्कृष्ट]**चतुरभुज, मैं बपुरो**[वापुडा, दीन]**जस कीरा**[किडा]**।**
**पीवत डाल फूल रस अम्रित, सहज भई मति हीरा॥ १॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१८३.

तू सर्वश्रेष्ठ आहेस.मी तुझ्यासमोर जणू काय हीनदीन असा कीडा आहे.परंतु जेव्हा मी तुझा भक्तीरूपी अमृतरस प्यालो, तेव्हा माझी बुद्धी हिऱ्याप्रमाणे (सुस्थिर व वास्तव) झाली.

**तुम चंदन हम एरँड बापुरो, निकट तुमारी बासा।**
**नीच बिरिछ तै उँच भये हैं, तेरी बास सुबासन सुवासा॥ २॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१८३.

तू सुवास देणारा चंदन आहेस तर मी बापडा एरंड.पण मी तुझ्या सहवासाने (रंगरूप पालटून) सन्मार्गास लागलो.नीच वृक्ष उंच झाला.

**जाति भी ओछी जनम भी ओछा, ओछा करम हमारा।**
**हम रैदास रामराई कौ, कहे 'रैदास' चमारा॥ ३॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१८३.

संत रोहिदास नम्रतेने म्हणतो की, "माझी जात जन्महीन, कर्महीन आहे परंतु रामनामाच्या गोडीने रोहिदास रामरायाचा झाला असे मला वाटते."

(१२३)

**माधो भरम कैसेहु न बिलाई**[नाहीसे होणे]**ताते**[वृक्ष]**द्वैत दरसै**[सहवास]**आई॥टेक॥**
**कनक**[सोने]**कुंडल**[सोने-दागिना]**सूत पट**[वस्त्र]**जुदा**[वेगळे]**,रजु**[दोरी]**भुअंग**[भुजंग]**भ्रम जैसा।**
**जल तरंग पाहन**[पाषाण]**प्रतिमा**[मूर्ती]**ज्यों, ब्रह्म जीव द्वति**[दोन]**ऐसा॥ १॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१८४.

**भावार्थ**— हे माधवा, माझा हा भ्रम कसा नाहीसा होत नाही?तू आणि मी एकच आहे.परंतु, अज्ञानामुळे मला द्वैत दिसून येते.

सोने व सोन्याचे कुंडल (दागिना) सूत व सूताचे वस्त्र हे दोन्ही वेगळे दिसतात.पण वेगळे समजणे म्हणजे दोरीस भुजंग समजण्यासारखे आहे.

पाणी व त्याचेवरील तरंग, पाषाण व त्याची मूर्ती हे भ्रमामुळे वेगवेगळी वाटतात.परंतु ब्रह्म, आणि जीव हे दोन नाहीत.एकजीव आहेत.

**विमल एक रस**[एकरूप]**ऊपजे न विनसै**[नाश पावणे]**,उदय अस्त दोउ**[दोन्ही]**नाही।**
**बिगता बिगत**[अविशाल तत्त्व.]**घटै नहि कबहुँ, बसत बसै सब माहीं॥ २॥**

अनुक्रमणिका

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१८४.

परमतत्व विमल-पवित्र आहे, एकसंध आहे.ते कधी उत्पन्न होत नाही व कधी मरत नाही.त्यांचा उदय-अस्त नाही.अविगत तत्व कधी कमी होत नाही.ते सर्वत्र सामावलेले आहे.

**निश्चल**[अचल]**निराकार अज अनुपम**[अद्वितीय]**निरभय गति गोविंदा।**
**अगम अगोचर अच्छर**[नाश न होणारा]**अतरक**[अतर्क्य]**,निरगुन अंत**[अत्यंत]**अनंदा॥ ३॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१७४.

ते परमतत्त्व अचल, निराकार, अद्वितीय आहे.गोविंदाचे स्वरूप निर्भय, अगम, अतर्क्य, निर्गुण,आनंदी आहे.

**सदा अतीत**[आदि, पूर्वीचा]**ज्ञान घन बर्जित**[त्याग]**,निरविकार अविनासी।**
**कह रैंदास सहज सुन्न**[सहजसमाधी]**सत जिवन, मुक्त निधि**[संचित धन]**कासी॥ ४॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१८४.

ती पुर्वीची, अनुभवी, निर्विकार, अविनाशी परमशक्ती आहे.रोहिदास म्हणतात की, “ज्याने सहज समाधी यशस्वी केली त्याला परब्रह्म हे तत्त्व सापडते.जीवनमुक्तिचे संचित धन म्हणजेच परमतत्त्वाची प्रचीती, तीच जीवनमुक्ती देणारी परमतीर्थ काशी आहे.

(१२४)

**बंदे**[भगवान]**जानि साहिब**[ईश्वर]**गनी**[धनी]**।**
**समझि वेद कतेब**[वेद पुराण]**बोलै काबै में क्या मनी॥टेक॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१९०.

भावार्थ— हे साधका, तो ईश्वर धनिक माणसाप्रमाणे स्वतंत्र वृत्तीचा आहे.वेद पुराणावर विसंबू नको.काबा इत्यादी तीर्थक्षेत्रीच तो आहे असे नाही.

**स्याही सपेदी तुरँगी**[सप्तसंगी]**नाना रंग बिसाल**[विशाल]**बे।**
**ना पैद**[उत्पन्न न होणारे]**ते पैदा किया पैमाल**[पददलित]**करत न बार बे॥ १॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१९०.

तो काळा, पांढरा, सप्त रंगाचाच काय!तो नाना रंगाच्या पलिकडचा विशाल आहे.तो पददलितासाठी उत्पन्न न होणारे ते उत्पन्न करतो हे समज.

**ज्वानी जुमी**[संपणे]**जमाल**[सुंदर]**सूरत देखिये थिर नाहि बे।**
**दम**[श्वास]**छ सै सहस इकइस**[एकवीस सहस्त्रसहाशे.]**हरदिन खजाने थे जाहिबे॥ २॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१९०.

अनुक्रमणिका

यौवन किंवा सौंदर्य कायमचे टिकणारे नव्हे.तुझे जीवनही नश्वर.दरदिवशी एकवीस हजार सहाशे वेळा तू श्वासोच्छवास करतोस.हे श्वास तुझ्या जीवन खजिन्यातून नाहीसे होत असतात.असे असता, साधका, तू किती गर्वाने फुगतोस?

**मनी मारे गर्व गाफिल**[कठोर]**बेमेहेर**[निर्दय]**बेमीर**[अन्यायी]**बे।**
**दरी खाना**[ईश्वराचा दरबार]**पडै चौबा**[प्रवासासाठी बनविलेले खाद्यपदार्थ]**होइ नहीं तकसीर**[गुन्हा, दोष]**बे॥ ३॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१९०.

पण हा गर्व व्यर्थ आहे.गर्विष्ठपणाचा गुन्हा करू नकोस नाही तर ईश्वर दरबारी तुला छडीची सजा होईल.

**कुछ गाँठि खरची**[व्यभिचाराने मिळणारे धन]**मिहर तोसा**[प्रवासी जेवण]**,खैर खुबी**[खोटा धंदा, व्यापार]**हा थीर बे।**
**तजि बदवा**[खराब शब्द, शिव्या]**बेनजर**[दुर्लक्ष करणे]**कमदिल**[क्षुद्र हृदय]**,करि खसम**[शोध]**कान बे।**
**रैदास की अरदास**[विनंती]**सुनि, कछु हक हलाल**[वास्तविक स्वरूप]**पिछान**[परिचय]**बे॥ ४॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१९०.

हा खोटा धंदा सोडून पुण्य कर.रोहिदासाची प्रार्थना ऐक.ईश्वराचे सत्य स्वरूप समजून घे.

(१२५)

**राग धनाश्री**

**तेरे देव कमलापति**[विष्णु]**सरन आया।**
**मुझ जनम संदेह भ्रम छेदि**[त्रासणे]**माया॥टेक॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १९४.

**भावार्थ**– संसारातील अडचणींनी व मोह विकारांनी त्रासलेला जीव प्रभुस म्हणतो, "हे कमलापति विष्णू, मी तुला शरण आलो आहे.

**अति संसार अपार भवसागर,**
**जा में जनम मरना संदेह भारी**
**काम भ्रम क्रोध भ्रम लोभ भ्रम मोह भ्रम, ।**
**अनत भ्रम छेदि मम करसि यारी**[मित्र]**॥ १॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १९४.

हा संसार, भवसागर अपार आहे.येथें जन्ममृत्यूचा फेंरा आहे.काम क्रोध, लोभ, मोहादी विकार आहेत.या शत्रुंशी सहज मैत्री होते व भ्रमामुळे वाईट मार्गाकडे प्रवर्त होतो.

अनुक्रमणिका

**पंच संगी**[पंचेंद्रिये,]**मिली पीडीयो प्रान यों,**
**जाय न सक्यो बैराग**[वैराग्य]**भागा।**
**पुत्र बरग कुल बंधु ते भारजा**[भार्या, पत्नी.]**,।**
**बखै दसो दिसा सिर काल लागा॥ २॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १९४.

ह्या पंचेंद्रियांच्या त्रासामुळे मी दुर्बल झालो. आहे.मला विरक्ती प्राप्त होत नाही.पुत्र, बंधु, पत्नी इत्यादी पारिवारिकजनांच्या मोहमायेने मी बांधला गेलो आहे.काळ तर दाही दिशांनी मला खावयास तयार झाला आहे.

**भगति चितउँ तो मोह दुख व्याप ही,**
**मोह चितउँ तो मेरी भगति जाई।**
**उभय सँदेह मोहि रैन**[रात्र]**दिन व्यापही,**
**दीनदाता करुँ कवन उपाई॥ ३॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १९४.

भक्ती करावयास जावे तर हे मोहपाश आडवे येऊन मला भक्तिपासून परावृत्त करतात.मी ह्या संदेह ग्रंथींनी रात्रंदिवस अस्वस्थ होतो.दीनदाता प्रभु, माझी या संकटातून मुक्तता कर.

**चपल चेतो नही बहुत दुःख देखियो,**
**कामबस मोहि हो करम फंदा।**
**सक्ति संबंध कियो ज्ञान पद हरि लियो,**
**ह्रदय बिसरुप तजि भयो अंधा॥ ४॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १९४.

मी भ्रमपाशात, काममोहात, विषयविकारात गुरफटलो व मी ईश्वरप्राप्तिचे प्रयत्न केले नाहीत व मी खऱ्या ज्ञानापासून दूर राहिलो तरी माझी यातून मुक्तता कर.

**परम प्रकास अविनासी अधमोचना,**
**निरखी निजरुप विसराम पाया।**
**बंदत**[वंदन करणे]**रैदास बैराग पद चिंतना,**
**जपौ जगदीस गोविंद राया॥ ५॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १९४.

हे परमप्रकाशा, अविनाशी ईश्वरा, तू मला तुझे निजरूप दाखव.हा रोहिदास तुला वंदन करतो.विरक्ती लाभावी म्हणून तुझ्या चरणी वंदन करतो.मी गोविंदाचे नित्य स्मरण करीत आहे.मला मुक्ती दे.



अनुक्रमणिका

**राग गौडी**

**आदि गंथानुसार—**

**बेगमपुरा सहर**[दुःखरहित शहर]**कौ नांउ, दूखू अंदोहु**[चिंता]**नहीं तिहि ठांउ।**
**ना तसवीस**[घबराट]**खिराजु**[उपहार, कर]**न मालु, खउफु न खता न तरसु**[त्रास]**जवालु॥ १॥**
**अब मोहि खूब वतन गह पाई, ऊहां खैरि सदा मेरे भाई॥ २॥रहाऊ॥**
**काइमु दाइमु सदा पातिसाही, दोम**[दुसरा]**न सेम**[निराश]**एक सो आही।**
**आबादानु**[सुख-संपन्न]**सदा मसहूर, ऊहां गनी**[धनी]**बसहि मामूर**[पूर्णब्रह्म]**॥ ३॥**
**तिउ तिउ सैल करहि जिऊ भावै, महरम**[परिचित, रहस्य]**महल न को अटकावै।**
**कहि रविदास खलास**[सेवक]**चमारा जो हम सहरी**[सकाळचा.]**सू मीतु हमारा॥ ४॥**

—संतगुरु रविदास-वाणी, पृ ८४.

**रुपांतर—**

**अब हम खूब बतन घर पाया।**
**ऊंचा खेर**[चांगली]**सदा मेरे भाया॥टेक॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १९६.

**भावार्थ—** साधना सफल झाल्यावर साधक आनंदाने गाऊ लागला.आता आम्हांला खूप चांगले घर मिळाले आहे.मला उंचावरिल घर हवे होते ते मिळाले आणि ते घर मला आवडले.

**बेगमपूर**[दुःखरहित नगर]**सहर का नाम।**
**फिकर**[काळजी]**अँदेस**[संशय]**नहीं तेहि ग्राम॥ १॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १९६.

त्या शहराचे नाव बेगमपूर (दुःखरहित शहर), त्या गावी कोणाच्याही मनी शंका-संशय नाही.

**नहिं जहाँ साँसत**[त्रास]**लानत**[धिक्कार]**मार।**
**हैफ**[येथे]**न खता**[गुन्हा, चुक]**न तरस**[त्रास]**जवाल॥ २॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १९६.

येथे अपराध, अत्याचार किंवा संकटे नाहीत.तसेच त्रास किंवा भयही वाटत नाही.

**आव न जान रहम औजूद**[हजर]**।**
**जहाँ गनी आप बसै माबूद**[भगवान]**॥ ३॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १९६.

येथे जन्ममृत्यूचा फेरा नाही.येथे कुणाचे येणे जाणे नाही.या उच्च ठिकाणी साधक पोहचला आहे.त्याने पूजा बांधली आहे.

**जोई सैलि**[श्रद्धा]**करै सोई भावै**[आवडणे]**।**

अनुक्रमणिका

**महरम**[परिचित, रहस्य]**महल में को अटकावै॥ ४॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १९६.

त्यांच्या ह्या साधना मंदिरात फक्त अंतरंग मित्रांनाच प्रवेश आहे.त्यांना कोण अडविणार?त्या दिव्य नगरीतील अंतरंग मित्र म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वरच रोहिदासाला भेटत आहे.

**कह रैदास खलास**[सेवक]**चमारा।**
**जो उस सहर सो मीत**[मित्र]**हमारा॥ ५॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १९६.

भक्त रोहिदास म्हणतो, "मी आता चांभार उरलो नाही.त्या अलौकिक नगरीत त्या अलौकिक मित्राने मला सोबत केली आहे.योगमार्गाने साधना सफल केली.तेव्हा प्राप्त झालेल्या सिद्धावस्थेत ईश्वराची सोबत लाभली.

(१२७)

**हरि को टाँडो**[तांडा]**लादै जाई रे, मैं बनिजारो**[फेरीवाला, व्यापारी]**रामको।**
**रामनाम धन पाइयो**[मिळाला]**,ता ते सहज करूँ ब्योहार**[व्यवहार]**रे॥टेक॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १९८.

**भावार्थ**—भक्तीचे सामानसुमान लादून हरिभक्तांचा हा तांडा चालला आहे.ह्या तांड्यातील रामनामाचा मी व्यापारी आहे.रामनामाचे धन मला लाभलेले आहे.

**औघट**[अवघड]**घाट घनो घनारे, निरगुन बैल हमार रे।**
**राम नाम धन लादियो, ता ते विषय**[विषय, काम, विकार]**लाद्यो संसार**[जग]**रे॥ १॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १९८.

मार्गातील घाट अवघड आहे.निर्गुण ज्ञानाचे बैल त्या घाटातून व्यवस्थित घेऊन जातील.आम्ही रामनामाचे धन गाड्यामध्ये भरून चाललो आहोत.जगाने मात्र विषय विकाराचे ओझे घेतले आहे.

**अंतहि धन धऱ्यो रे, अंतेहि ढुँढन जाइ रे।**
**अनंत**[ईश्वर]**को धरो न पाईये, ता ते चाल्यो मूल गँवाइ**[हरवणे]**रे॥ २॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १९८.

विषय विकाराला धन समजून जग भलत्याच मार्गाने चालले आहे.ईश्वर धनापासून हे लोक दूर जात आहेत.जे मिळावावयास पाहिजे.ते रामनाम धन हे लोक विसरले आहेत.

**रैन गॅवाइ सोह**[झोपणे]**करि, दिवस गॅवायो खाइ रे।**
**हीरा**[आत्मज्ञान सुखाचा हीरा]**यह तन पाइ करि, कौड़ी वदले जाइ रे॥ ३॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १९८.

अनुक्रमणिका

हे लोक दिवसा खाण्यापिण्यात व रात्री झोपण्यात गढून गेले आहेत.आत्मज्ञानाचा सुखाचा हिरा जवळ असूनही हे भिकारी बनले आहेत, त्यांनी आत्मसुखास कवडीमोल केले आहे.

**साधु संगति पूंजी**[भांडवल]**भई रे, वस्तु भइ निर्मोल रे।**
**सहज बरवा लादि करि, चहुँ दिसि टाँडा मोल रे॥ ४॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १९८.

आमच्याजवळ साधूसंतांच्या सहवासाचे भांडवल आहे.हरिभक्तांचा हा तांडा सुखाने चालला आहे.

**जैसा रंग कुसुंभ**[मोहाच्या फुलापासून (अफू)]**का रे, तैसा यह संसार रे।**
**रमइया रंग मजीठ**[मजीठ नामक वेलीपासून केलेला लाल रंग.]**का, ता ते भन रैदास बिचार रे॥ ५॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ १९८.

मोहाच्या फुलापासून तयार केलेला कुसुमांचा रंग लाल आणि मादक आहे.जगाला हा रंग मोहविणारा आहे.रोहिदास म्हणतो की, “परमात्मा व ह्या मोह-मायावी जगाची सांगड कशी घालावी याचा मी विचार करीत आहे.

(१२८)

**मन मेरो सत्त सरुप विचारं।**
**आदि अंत अनंत परमपद, संसा**[संशय]**सकल निवारं॥टेक॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २००.

**भावार्थ**—माझ्या मनाने सत्यस्वरूपाचा विचार केला आहे.त्याला आदि व अंत नाही.हे समजून मी आपले सर्व संशय दूर केले आहेत.

**जस**[जसा]**हरि कहिये तस**[तसा]**हरि नाहीं, है अस**[असा]**जस कछु तैसा।**
**जानत जानत जान रह्यो सब, मरम**[भेद]**कहो निज कैसा॥ १॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २००.

जगात हरिला जसे म्हटले आहे, तसा वास्तविक हरी नाही.तो जसा काही आहे, तसाच आहे, अर्थात तो कसा आहे हे समजवून सांगता येत नाही.तो कसा आहे?त्याचे मर्म कोणी जाणलेच नाही.

**करत आन अनुभवत आन, रस मिलै न बेगर**[दोन मनं]**होई।**
**बाहर भीतर प्रगट गुप्त, घट घट प्रति और न कोई॥ २॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २००.

दाखवितोस एक ईश्वर आणि अनुभवतो दुसरा.यामुळे रस मिळत नाही.दोन मनांचा गोंधळ होतो.तो प्रभु बाहेर, आत, प्रगट, गुप्त, घटाघटात व्याप्त आहे.प्रभुशिवाय दुसरा कोणी नाही.

अनुक्रमणिका

**आदिहु एक अंत पुनि सोइ**[तोच.]**,मध्य उपाइ जु कैसे।**
**अहै एक पै भ्रम सूं दूजो, कनक अलंक्रित जैसे॥ ३॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २००.

आरंभी तो एक होता व शेवटी एकच राहाणार.मध्येच तो कसा उत्पन्न होईल?तो एकच आहे.परंतु भ्रमामुळे तो दुसरा वाटतो.जसे सोने व त्याचा अलंकार (दागिना) आकारात फक्त फरक असतो.

**कह रैदास प्रकास परमपद, का तप जप बिधि पूजा।**
**एक अनेक एक हरि, कहौ कौन बिधि दूजा॥ ४॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २००.

रोहिदास म्हणतो, "तो प्रभू परमपद प्रकाशरूप आहे.त्यासाठी जप, तप, पूजाविधिची काय जरूरी आहे?नाना रूपात तो एकच प्रभू आहे.त्यास मी दुसरा कसा म्हणू?

(१२९)

**राग भैरव**

**अविगति**[ज्याची गती जाणण्यायोग्य नाही तो]**नाथ निरंजन देवा। मै क्या जानूँ तुम्हरी सेवा॥टेक॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २०८.

**भावार्थ**—हे नाथ, निरंजन देवा, मी आपली गती जाणण्यायोग्य नाही.तुझी सेवा कशी करावी, हे मी कसे समजू?मी तुझी भक्ती कशी करू?

**बाँधू न बंधन छाँऊ न छाया। तुम हीं सेऊँ निरंजन राया॥ १॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २०८.

हे प्रभु, मी तुला कोणत्याही बंधनात बांधत नाही.अर्थात कोणत्याही मूर्तित मर्यादित करीत नाही.तुझ्यासारख्या असिमसाठी मंदिर इत्यादी बांधत नाही.पण हे निरंजनप्रभु,मी तुझी निरंतर सेवा करीन.

**चरन पताल सीस असमाना। सो ठाकूर कैसे सँपुट**[सीमित (मर्यादित)]**समाना॥ २॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २०८.

ज्यांचे चरण पाताळात व शिर आकाशात आहे (वेदात वर्णन केल्याप्रमाणे) जो प्रभु सर्व विश्वात भरून राहिला आहे, तो ईश्वर छोट्याशा बंदिस्त जागेत (मंदिर-देऊळात) कसा राहील?

**सिव सनकादिक अंत न पाये। ब्रह्मा खोजत जनम गँवाये॥ ३॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २०८.

अनुक्रमणिका

त्याचा शोध शिवासमान सनकादिक ऋषिमुनिही घेऊ शकले नाहीत.त्यांनी परब्रह्माचा शोध घेण्यात जन्म घालविला.परंतु त्यांना ते सत्य सापडले नाही.

**तोडू न पाती**[पान, पुष्पपात्र]**पूजू न देवा। सहज सामधि करूँ हरि सेवा॥ ४॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २०८.

हे प्रभु, मी तुझ्या भक्तिसाठी पाने, फुले इत्यादी वापरणार नाही.बाह्यांवडंबराचा स्वीकार करून, मी जगास माझी पूजा दाखविणार नाही, तर सहज समाधि लावून मी हरी सेवा करणार.

**नख**[भगिरथ प्रयत्न]**प्रसाद जाके सुरसरि**[गंगावतरण]**धारा। रोमावली**[रोमरोमात.]**अठारह भारा॥ ५॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २०८.

भगीरथाच्या दिव्य तपसाधनेमुळे गंगावतरण झाले.ज्याच्या नाभीच्या रोमरोमात अठरा लोक सामावलेत अशा विष्णुची मी पूजा करतो.

**चारो बेद**[ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, इतिहास-पुराण, उपनिषद विद्या......हे सर्व त्या महाब्रह्माच्या श्वासातून उत्पन्न झाल्याचे मानतात.–(सद्‌गुरु रविदासस्वामी, पृ.१०० टीप-२)]**जाके सुमिरत सांसा। भगति हेत गावै रैदासा॥ ६॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २०८.

चार वेद जिचे स्मरण करतात.त्या दिव्य शक्तिचे रोहिदास स्मरण करून भक्तिभावाने गातो.

(१३०)

**अब कछु मरम विचारा हो हरि।**
**आदि अंत औसान**[आधार]**रामबिन, कोई न करै निवारां सो हरि॥टेक॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २०९.

**भावार्थ**–हे ईश्वरा, तू केलेल्या प्रतिज्ञेप्रमाणे माजे रक्षण कर.रामाशिवाय मला कोणाचाही आधार उरलेला नाही.

**जब मैं पंक पंक अमृत जल जलहि सुद्ध होई जैसे।**
**ऐसे करम भरम जग बाँध्यो, छूटै तुम बिन कैसे हो हरि॥ १॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २०९.

चिखलास अमृत जलाचा संपर्क झाल्यास चिखलासही अमृत्व लाभते.मी कर्माच्या व भ्रमाच्या पसाऱ्यात बंदिवान बनलो आहे.हे हरी, तुझ्याशिवाय ह्या संकटातून मला कोण बरे सोडविणार?

**जप तप विधी निषेध नाम करँ, पाप पुन्न दंउ माया मन।**
**ऐसे मोहिं तन मन गति, बीमुख जनम जनम डंहकाया**[नुकसान]**हो हरि॥ २॥**

अनुक्रमणिका

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २०९.

मी जपतपाच्या मागे लागलो.विधीनिषेध मानले.पापपुण्याचा हिशेब लावीत बसलो.परंतु ही सर्व मायाच आहे.सर्व करूनही मला गती लाभली नाही.जन्माजन्मी मी फसतच राहिलो.

**ताडन**[तोडणे]**छेदन**[भोक पाडणे]**त्रायन**[जोडणे]**खेदन**[खोदणे]**,बहुविधी करले उपाई।**
**लोन खड़ि**[नवसागर]**संजोग**[योग]**बिना जस, कनक कलंकन जाई हो हरि॥ ३॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २०९.

तोड, भोके पाड, जोड, खोद, काही उपाय करून तू माझे रक्षण कर.नवसागराच्या योगाशिवाय सुवर्णाचा कलंक नाहीसा होत नाही.

**भन**[म्हणणे]**रैदास कठिन कलिके बल**[कलियुगाचे बळ, सामर्थ्य.]**,कहा उपाय अब कीजै।**
**भव बूडत भयभीत जगत जन, करि अवलंबन दीजै हो हरि॥ ४॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २०९.

रोहिदास म्हणतो, "भवसागरातील दुःखामुळे मी भयभीत झालो आहे.जगाच्या सर्व व्यवहारास पाहून मला भीति वाटू लागली आहे.तू आता काहीही उपाय करून मला आश्रय दे व माझा उद्धार कर.

(१३१)

**राग भैरव**

**परचे**[परिचय (साधक)]**राम रमै जो कोई।**
**पारस परसे दुविध**[दुविधा]**न होई॥टेके॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २१०.

**भावार्थ**—ज्यास राम नामाची गोडी लागली, तो तरून गेला.रामनामरूपी रस सेवन करणाऱ्या साधकास दुविधा वाटत नाही.त्याच्या मनातील संशय-भ्रम नाहीसे होतात.

**जे दीसे ते सकल विनास**[नाश]**।**
**अनदीठे**[न दिसणारे]**नाही बिसवास**[विश्वास]**॥ १॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २१०.

जे दिसते, ते सर्व नाश होणार असे वाटते व जे दिसत नाही, त्यावर विश्वास ठेवता येत नाही.

**बरन कहत कहैं जे राम।**
**सो भगता केवल निःकाम॥ २॥**
श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २१०.

जे रामनामाचा नित्य उच्चार करीत राहतात ते भक्त निष्काम बनून जातात.

अनुक्रमणिका

**फलकारन फूलै बनराई।**
**उपजै फल तब पहु[पुष्प]प बिलाई[नाहीसे होणे]॥ ३॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २१०.

फल धारणा व्हावी म्हणून बागेत फुलांचा बहर येतो व सुगंध दरवळतो.वृक्ष वेलीवर जेव्हा फळे येऊ लागतात, तेव्हा फुले गळून पडतात.तेथे फळे येऊ लागतात.

**ज्ञानहि कारण करम कराइ[करणे]।**
**उपजै ज्ञान त करम नसाई[नाश पावणे]॥ ४॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २१०.

ज्ञान लाभावे म्हणून कर्म करावयाचे व जेव्हा ज्ञान लाभते, तेव्हा कर्म नाश पावते.

**बट[वटवृक्ष]का बीज जैसा आकार।**
**पसऱ्यो तीन लोक पासार॥ ५॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २१०.

छोट्याशा बिजापासून मोठा वटवृक्ष पसरतो.पण तो वृक्ष निर्माण झाल्यावर बीज राहात नाही.

**जहँ का उपजा तहाँ बिलाई।**
**सहज सुन्नि[समाधी]मे रह्यो लुकाई[मग्न होणे]॥ ६॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २१०.

ज्यातून ते निर्माण झाले, त्याच्याशी ते एकरूप होऊन जाते.साधक सहज समाधीत परमतत्त्वाशी असाच एकरूप होतो.

**जल मे जैसे तूंबा[ओंडका]तिरै।**
**परिचैं पिंड जीव नहिं मरै॥ ७॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २१०.

पाण्यावर लाकडाचा ओंढका तरंगतो.त्याप्रमाणे आत्मसाक्षात्कार झालेला साधक संसारात राहून संकटापासून अलिप्त राहतो.यामुळे तो जीवनमुक्त झालेला असतो.

**सो मन कौन जो मन को रबाइ।**
**बिन छोरे[दुबळे]तिरलोक[तीन लोक]समाइै॥ ८॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २१०.

अनुक्रमणिका

जे स्वतःच स्वतःला खात असते, असे जे दुर्बल मन असते, त्याला मन तरी काय म्हणावे?असे दुबळे मन सर्व त्रिलोकी भरकटत राहाते.

**मन की महिमा सब कोइ कहै।**
**पंडित सो जो अनभ[निर्भय]रहै॥ ९॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २१०.

मनाचा महिमा सर्व काही सांगतात.परंतु साधक नेहमी निर्भय असावा.जो मनाने अचल राहातो.तोच खरा पंडित-ज्ञानी होय.

**कह रैदास यह परम बैराग।**
**राम नाम किन जपहु सभाग॥ १०॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २१०.

रोहिदास म्हणतो, "तू नितांत विरक्त बनून रामनामाचा जप का करीत नाहीस?तू त्वरित रामनामाचे स्मरण कर.

**धृत[लोणी]कारन दधि[दही.]मथै सयान[शहाणी माणसे]।**
**जीवन मुक्ति सदा निरबान[अमरनिर्वाण]॥ ११॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २१०.

शहाणी माणसे नवनीत (लोणी) मिळावे म्हणून दही घुसळतात.त्याप्रमाणे जीवनमुक्ती व अमर निर्वाण प्राप्त करावयाचे असेल तर हे मानवा, तू रामनामाचा उच्चार कर."

(१३२)

**अखिल खिलै नहिं का कहि पंडित, कोई न कहै समझाई।**
**अबरन[अवर्ण]बरन रुप नहिं जाके[ज्याला],कहँ लौ लाइ समाई॥टेक॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २१२.

**भावार्थ**—सर्व विश्वात भरून राहिलेल्या ईश्वराच्या व्यापक स्वरूपाची तुला कल्पना नाही.हे पंडिता, ज्याला वर्णावर्ण नाही, ज्याचे स्वतःचे निश्चित असे रूप नाही.त्या निर्गुण निराकार महाशक्तिला तू कुठे नेऊन पाहातोस?

**चंद सूर[चंद्रसूर्य]नहिं रात दिवस नहिं, धरनि[धरती]अकास[आकाश]न भाई।**
**करम[कर्म]अकरम नहिं सुभ[शुभ]आसुभ नहिं, का कहि देहु[देह]बडाई[महत्त्व]॥ १॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २१२.

अनुक्रमणिका

चंद्र आणि सूर्य, रात्र आणि दिवस, धरती व आकाश ह्या सर्व तुला ज्ञात असलेल्या गोष्टींच्या पलिकडे तो आहे.कर्म-अकर्माच्या आणि शुभ-अशुभाच्या गोष्टी काय सांगतोस?तुझ्या ह्या देहाचे तरी काय महत्व सांगतोस?

**सीत वायु ऊसन नहिं सखत, काम कुटिल नहिं होई।**
**जोग[योग]न भोग क्रिया नहिं जाके, कहो नाम सत होई॥ २॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २१२.

शीत वायु आणि उष्णता (चुण्यात पाणी ओतल्याबरोबरची) या सर्वापलीकडची ती अज्ञेय शक्ती होय.ती काम, कुटिल वासनाच्या पलीकडची आहे.योग व भोग जिला मंजूर नाही.ती परमशक्ती या सर्व ज्ञेय-ज्ञात गोष्टींच्या भोग्य वस्तूपेंक्षा खूप व्यापक आहे.

**निरंजन निराकार निरलेपी, निरबीकार[निर्विकार]निसासी[निःश्वासी]।**
**काम कुटिलता ही कहि गावैं, हर हर[हरघडी]आवै हांसी[हसू]॥ ३॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २१२.

अरे पंडिता, निरंजन, निराकार, निर्लेप, निर्विकार, निःश्वासी असे ह्या परमतत्त्वाचे स्वरूप आहे.परंतु तू मात्र काम व कुटिलतेच्या डोळ्यांनी त्या शक्तिकडे पाहतोस.तिची पूजा करतांना तू काम कुटिलतेचा त्याग करीत नाहीस.हे तुझे मूर्खपण पाहून मला हरघडी हसू येते.

**गगन धूर[पृथ्वी]धूप[तेज)अग्नी)]नहिं जा के, पवन पूर नहिं पानी।**
**गुन निर्गुण कहियत नहिं जाके, कर हो तुम बात सयानी[शहाणी.]॥ ४॥**

श्रीसंत रोहिदास (कामत), पृ २१२.

हे पंडिता, आकाश, पृथ्वी, तेज (अग्नी), वायू आणि पाणी ह्या पांच तत्त्वांच्या पलीकडचे असे त्या दिव्य शक्तिचे व्यापक स्वरूप आहे.गुण निर्गुणाच्या कसोटीवर ह्या महातत्त्वाचा विचार काय करतोस?त्यापलीकडची अशी ही शक्ती आहे.हे पंडिता, हे शहाण्या, तू जरा समजून घे व शहाण्यासारखे बोल.

**याही सौ तुम जोग कहत हौ,**
**जब लग आस[आशा]की पासी[पाश, फास]।**
**छुटै तबहि जब मिलै एक ही,**
**भन रैदास उदासी॥ ५॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२१२.

अनुक्रमणिका

रोहिदास म्हणतो की, "तुला परमेश्वराची प्राप्ती करावयाची असेल तर आशा, मोहाचा (मायेचा) पाश तोड.जोपर्यंत हा पाश तू तोडीत नाहीस, तोपर्यंत हे परमतत्व साध्य होणार नाही.मायेची बंधने तोडल्यावरच तुला त्या ईश्वराचा साक्षात्कार होईल."

(१३३)

**(राग आसावरी)**

**केसवे विकट माया तोर**[तुझा]**,ताते**[त्याचा]**विकल गति मति मोर॥टेक॥**

**भावार्थ**– हे केशवा, ह्या बिकट मायेच्या त्रासाने माझी मति व्याकूळ झाली आहे.

**सुविषंग**[विषारी]**सन करल अहिमुख**[सर्पाचे तोंड]**,प्रसति सुटल सुभेष**[स्वरूप]**।**
**निरखि माखी बकै व्याकुल, लोना कालर**[रूप]**देख॥ १॥**
–श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२१७.

कराल सर्पाप्रमाणे मायेचे भयंकर स्वरुप आहे.त्यामुळे मोठमोठेही तिला भयभीत होतात.त्यामुळे मला काही सुचत नाही.

**इंद्रियादिक दुःख दारुन, असंख्यादिक पाप।**
**तोहि भजन रघुनाथ अंतर, ताहि त्रास न ताप॥ २॥**
–श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२१७.

असंख्य पापे मजकडून घडली आहेत.घडत असतात.इंद्रियादिक दुःखे भयंकर आहेत.परंतु अंतःकरणापासून तुझे भजन, नामस्मरण केल्यास, भवताप, त्रास दूर होतील.

**प्रतिज्ञा प्रतिपाल प्रतिज्ञा चिन्ह, जुग भमति पूरन काम।**
**आस तोर भरोस है, रैदास जै**[जयजयकार.]**जै राम॥ ३॥**
–श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२१७.

प्रभु रामाचा जयजयकार करून रोहिदास विनवितो की, "हे ईश्वरा, आता मला तुझाच भरवसा आहे.तू तुझी प्रतिज्ञा पूर्ण कर.तुझ्या भक्ताची ईच्छा पूर्ण कर."

(१३४)

**नरहरि प्रगटसि ना हो प्रगटसि ना हो। दीनानाथ दयाल नरहरे॥टेक॥**
–श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२१८.

**भावार्थ**– हे दीनांच्या नाथा, तू प्रगट हो, हे दयाळा, तू मला दर्शन दे.

अनुक्रमणिका

[जनमत ही वै हैं विगरान.अस कहियत हूँ मैं अजान.

—संतगुरु रैदास वाणी (शारी), पृ.७७.]

**जनमेऊं तौही ते बिगरान। अहो कछु बुझै बहुरि सयान॥ १॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ. २१८.

मी जन्मल्यापासून तुझ्याशी वियोग झाला आहे.ह्या फार दिवसांची विरहाची व्यथा मी कशी सांगू?

**परिवारि विमुख**[ताटातूट]**मोहिं लागि। कछु समुझि परस्त नहिं जागि॥ २॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२१८.

मी परिवारापासून दूर झालो.ह्या जगात मला कळेनासे झाले आहे.

**यह भौ विदेश**[परदेश]**कलिकाल। अहो मैं आइ पऱ्यो जमजाल**[यमाचे जाळे]**॥ ३॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२१८.

मी परदेशी असल्याप्रमाणे मला वाटते.मी यमाच्या जाळ्यात गुंतल्याचे भय वाटते.

**कबहुक तोर भरोय। जो मैं न कहूँ तो मोर**[माझा]**दोस॥ ४॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२१८.

मी तुझ्या भरवशावर राहिलो आहे.हे सांगूनही तू माझे रक्षण केले नाहीस, तर मग तो माझा दोष नाही.

**अस कहिये तेऊ न जान। अहो प्रभु तुम सरबस**[सर्वकाही]**मैं सयान॥ ५॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२१८.

असे मी बोलतो याचे कारण आहे.हे भगवंता, तू माझा सर्वस्व आहेस.मी अज्ञानी आहे.

**सुत सेवक सदा असोच**[ध्यान देणे]**ठाकुर पित हि सब सोच॥ ६॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२१८.

हे देवा, तू माझा पिता आहेस, मी नेहमी तुझा पुत्र, सेवक आहे.

**रैदास बिनवै कर जोरि**[जोडून]**। अहो स्वामी तुम मोहिं न खोरि**[वाईट]**॥ ७॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२१८.

रोहिदास हात जोडून विनंती करीत आहे की, “हे स्वामी, तू माझे अपराध विसरून जा.”

**सु तौ पूरबला**[पूर्वकर्म]**अकरम मोर। वालि जाऊँ करौ जिन कोर**[कृपादृष्टी.]**॥ ८॥**

अनुक्रमणिका

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२१८.

"माझ्या पूर्वजन्माच्या कुकर्मास क्षमा कर.माझ्यावर दया कर."

(१३५)

**अब मेरी वुडी रे भाई, ताते चढी लोक बडाई॥टेक॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२०.

**भावार्थ**— लोकांच्या मोहजालात सापडून माझे पतन झाले.मी जगातील मायेच्या लोभामुळे पथभ्रष्ट झालो.

**अति अहंकार उरमा**[मनात]**सत रजतम, ता में रह्यो उरझाई**[गुरफटणे]**।**
**कर्मन बझि यऱ्यो कछू नहिं सूझै, स्वामी नावँ भुलाई॥ १॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२०.

मनात अति अहंकार वाढला.सत्व, रज, तम ह्या गुणांतच मी गुरफटलो.कर्म करीत राहिल्याने मुक्ती मिळाली नाही.स्वामी ईश्वराचे स्मरण विसरलो.

**हम मानौ मुनी जोग सुनि जुगना, महामुरूख**[महामुर्ख]**रे भाई।**
**हम मानो सून सकलविधि त्यागी, ममता नहिं मिटाई॥ २॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२०.

आम्ही गुणीजनांचे सद्‌विचार ऐकले नाहीत.उलट आम्हीच त्यांना दोष दिला, महामूर्खपणा केला.सर्व विधिनिषेध न जुमानणाऱ्यांना आम्ही जवळ केले.त्यामुळे मनातील ममता नाहीशी झाली नाही.

**हम मानो अखिल सुन्न**[शून्य]**मन सोध्यो**[शोध]**,सब चेतन सुधि पाई।**
**ज्ञान ध्यान सबही हम जान्यो, बूझौ कौन सों जाई॥ ३॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२०.

आम्ही अखिल शून्यांत मनाचा शोध घेतला.सृष्टिचे व निर्मात्याचे व्यापक स्वरूप जाणून घेतले.कोण कसा आहे ते आम्ही समजून घेतले.ज्ञान, ध्यान इत्यादी तप-तपस्येचे सर्व मार्ग आम्ही जाणून घेतले.कोण कसा आहे ते आम्ही समजून घेतले.

**हम जानौ प्रेम प्रेमरस जाने, नौ विधि**[नवविधि भक्ती]**भगति कराई।**
**स्वाँग**[सोंगे ढोंगे.]**देखि सबही जन लटक्यो, फिर यों आन बँधाई॥ ४॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२०.

आम्ही प्रेममार्गाचा (मधुरा भक्तिचा) विचार केला.नवविधि भक्तिही केली.आम्ही साधना मार्गातील सोंगे-ढोंगे पाहिली.आम्ही त्या सर्वांपासून दूर राहिलो.

अनुक्रमणिका

**यह तो सँग साच ना जानो, लोगन यह भरमाई।**
**स्वच्छरुप सेली जब पहरी, बोली तब सुधि आई॥ ५॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२०.

लोकांची फसगत पाहिल्यावर आम्ही त्यापासून दूर राहिलो.परंतु लोकांना मात्र खरेखोटे समजले नाही.त्यांना खऱ्याखोट्यातील फरक कळलाच नाही.ते भ्रमातच राहिले.

**ऐसि भगति हमारी संतो, प्रभुता इहइ बढाई।**
**आपन अनत और नहिं मानत, वाले मुल गँवाई॥ ६॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२०.

आम्ही जपमालेचे-नामस्मरणाचे महत्त्व जाणले.तेव्हा आम्हांस योग्यायोग्यतेचा निर्णय करता आला.सत्याची जाणीव झाली.इतरांना तुच्छ लेखल्याने खरी भक्ती होत नाही.त्यामुळे पथभ्रष्ट होतो.

**भन रैदास उदास ताहि ते, अब कछु मो पै करयौ न जाई।**
**आप खाए भगति होत है, तब रहै अंतर उरझाई॥ ७॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२०.

रोहिदास म्हणतो, "अहंकार सोडल्याने मनातील सर्व विचार नाहीसे होतात.ईश्वर स्मरणात माझे चित्त रंगून गेले.मला भक्तिचा खरा मार्ग सापडला.सर्वस्वाचे समर्पण करून ईश्वर स्मरणात मग्न होणे हीच खरी भक्ती होय."

(१३६)

**कहाँ सूते**[झोपणे]**मुग्ध नर काठ के मँझ**[संसाराचा मोह]**,सुख।**
**तजिय वस्तु राम चितवत अनेक सुख॥टेक॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२४.

**भावार्थ**— अरे मानवा!काळाच्या लाकडी जबड्यात राहून तू किती बेसावध झोपला आहेस?तू कोणत्या भ्रमात मुग्ध राहिला आहेस.रामरूपी परमतत्त्वाचा त्याग करून तू अनेक अन्य सांसारिक मोहसुखाच्यामागे लागला आहेस.अजून तरी जागा हो.

**असहज धीरज लोप कृस्न उधरंत**[येणे]**कोप, मदन भुवंग**[भुजंग]**नहि मंत्र जंता**[मंत्र-तंत्र]**।**
**विषय पावक ज्वाल**[अग्निज्वाला]**ताहि वार न पार, लोभ की अयनी**[येणे]**ज्ञात हंता**[नष्ट होणे]**॥ १॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२४.

**भावार्थ**— तुझी दृष्टी 'राम' सोडून भलत्याच सुखाकडे जात आहे.कामविकाराचा त्याग करण्याचा मंत्र तुला अजून सापडलेला नाही.कामविकाराच्या अग्निज्वाला भंयकर आहेत.त्याला शेवट नाही.

अनुक्रमणिका

**विषय संसार व्याल व्याकुल**[मायेने-ग्रस्त]**तवै, मोहगुल विषै संग बंध भूता**[होणे]**।**
**टेरि**[आवाज, पुकार.]**गुन गारुडी मंत्र स्त्रवना दियो, जागि रे राम कहि कहिं के सूता॥ २॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२४.

ह्या विषय संसाररूपी सापाने तुला व्याकूळ केलेले आहे.मोहगुणाचे विष-विकारही तुला बंधनात ठेवतो.तू रामनामाचा मंत्र म्हणत जागा हो.रामनामाच्या आधारे तू विषयविकारापासून मुक्त होशील.

**सकल सिम्रित**[स्मृति]**जिती**[जिंकणे]**सत मति कहै तिति**[त्यांची]**। है इनही परम गति परम बेता।**
**ब्रह्म ऋषि नारद संभु सनकादिक, राम राम रमत गये पार तेता**[त्रेतायुग]**॥ ३॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२४.

सगळ्या स्मृति, धर्मशास्त्रे आणि जेवढी म्हणून सद्‌बुद्धी आहे त्या परमशक्तिमध्ये ज्ञान आहे.ब्रह्मर्षि नारद, शंभो महादेव, सनक इत्यादी ऋषिमुनिदेखील रामनामाद्वारे त्रेतायुगापार झाले.उद्धरून गेले.

**जजन**[तीर्थव्रतयज्ञ]**जाजन**[तंत्र]**जाप रटन तीरथ दान, औषधी रसिक गद**[रोग]**मूल देता।**
**नागदवाने**[विषयज्वाला]**जरजरी राम सुमिरन बरी, भनत**[म्हणतो]**रैदास चेत निमेता**[नियमबंधने]**॥ ४॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२४.

हे तुझे यज्ञयाग काय कामाचे?तीर्थ-व्रत, वैकल्ये यामुळे रोगराई वाढते.या सर्व गोष्टी तुझ्या आजाराचे मूळ आहे.रोहिदास म्हणतो, रोहिदास म्हणतो, “हे नियम-बंधने बनविणाऱ्या माणसा, जागा हो.”

(१३७)

**खालिफ**[सृष्टिनिर्माता]**सिकस्ता**[सेवक]**मैं तेरा।**
**दे दीदार**[दर्शन]**उमेदगार**[उमेदवार]**,बेकरार**[बैचेन]**जिव मेरा॥टेक॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२६.

**भावार्थ**— हे सृष्टिनिर्मात्या, मी तुझ्यापासून दूर पडलेला एक दुर्दैवी सेवक आहे.माझा व्याकुळ झालेला जीव तुझ्या दर्शनासाठी बेचैन झाला आहे.मी तुझ्या दर्शनासाठी एक उमेदवार आहे.

**औवल**[ईश्वर]**आखिर इकाहै**[ईश्वर]**,आदम**[देवदूत]**फरिस्ता**[प्रेम]**बंदा**[सेवक]**।**
**जिसकी पनह**[शरण]**पीर**[भक्त]**पैगंबर**[पहिला पैगंबर]**,मैं गरीब क्या गंदा**[पापी]**॥ १॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२६.

हे प्रभु, तू सर्वप्रथम होतास आणि शेवटी तूच राहणार.मनुष्य ईश्वराचा भक्त पहिल्या पैगंबराप्रमाणे देवदूत बनेल.तरीही मनुष्य त्या परमशक्तिचा नोकर-सेवकच, ईश्वराची कृपा गुरु, ज्ञानी व देवाचा संदेश सांगणाऱ्या देवदूतास लाभते.पण मी तर दीनदुर्बल व पापी आहे.मी काय देणार?

अनुक्रमणिका

**तू हाजरा हजूर जोग इक, अवर नहीं है दुजा।**
**जिसके इसके**[प्रेम]**आसरा नाहीं, क्या निवाज**[नमाज.]**क्या पूजा॥ २॥**
—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२६.

हे ईश्वरा, मी तुझा सेवक.तुझा माझा संबंध एकत्वाचा.त्यात द्वैत नाही.तू एक असा हूजूर आहेस की ज्याच्या हजेरीमध्ये सर्व आहेत.आपला प्रेमाचा आसरा, मग कसला नमाज आणि कसली पूजा?आपले स्नेहाचे नाते आहे.

**जाली दोज**[नाल्यात पडलेला]**हनोज**[प्रत्यक्ष]**बेबखत**[अयोग्य वेळी]**,कभि खिजमतगार**[सेवक]**तुमारा।**
**दरमाँदा**[दरवाजावर]**दर ज्वाब**[उत्तर]**न पावै, कह रैदास बिचारा॥ ३॥**
—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२६.

रोहिदास नम्रपणे म्हणतो, "हे ईश्वरा, मी रोहिदास चांभार दूर नाल्यात पडलेल्याप्रमाणे दुर्दैवी सेवक तुझ्या दारावर येऊन प्रत्यक्ष उभा आहे.अजून तुझ्या जबाब-उत्तराची कृपा मला लाभलेली नाही."

(१३८)

**मरम कैसे पाइब**[पंडित, ज्ञानी]**रे।**
**पंडित कौन कहै समुझाई, जा ते मेरो आवागमन बिलाई**[समाप्त होणे]**॥टेक॥**
—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२७.

**भावार्थ**— अरे पंडिता, ज्ञानी पुरुषा, सृष्टी व्यापाराच्या मुळाशी जी महाशक्ती आहे.तिचे मर्म-रहस्य मला कोणी समजावून सांगेल का?ज्यायोगे माझी आवागमनाच्या (जन्म-मृत्युच्या) बंधनातून मुक्तता होईल, ते रहस्य मला कोणी सांगू शकेल?

**बहुविधि धरम निरुपिये**[निरुपण]**,करते देखै सब कोई।**
**जेहि धरमे भ्रम छूटि है, सो धरम न चीन्हे कीई**[कोणाला]**॥ १॥**
—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२७.

धर्माचे अनेक प्रकारे निरुपण करणारे बरेच भेटले.परंतु ज्यामुळे भ्रमजालातून जिवाची सुटका होईल, असा धर्म अजून कोणी ओळखलेला नाही.

**करम अकरम बिचोरये**[विचार सांगणे]**,सुनि सुनि बेद पुरान।**
**संसा**[संशय]**सदा हिरदै बसै, हरि बिन कौन हरै अभिमान॥ २॥**
—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२७.

कर्म-अकर्माचा विचार सांगताना, तसेच वेद पुराणाचे श्रवण करतांना संशय नेहमी मनातच राहतो.हृदयातील अभिमानाचे हरण ईश्वराशिवाय कोण करणार?

अनुक्रमणिका

**बाहर मूंदि[झांकणे, बंद करणे]के खोजिये, घट भीतर विविध बिकार।**
**सूची कौन विधि होहिंगे, जस कुंजर[हत्ती.]विधि ब्यौहार॥ ३॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२७.

हत्ती पाण्यात स्नान करून झाल्यावर धूळ अंगावर उडवून घेतो.त्याचप्रमाणे साधकाचेही होत आहे.आम्ही बाह्यावडंबर करतो पण मनातील विकार नष्ट करू शकत नाही, मग आम्ही शुचिर्भूत कसे होणार?

**सतजुग[सत्ययुग]सत त्रेता[त्रेतायुग]तप करते, द्वापर[द्वापारयुग]पुजा अचार।**
**तिहूँ जुगी तीनो दृष्टी, कलि केवल नाम अधार॥ ४॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२७.

सत्ययुगात सत्याची उपासना, त्रेतायुगात तपस्या व द्वापारयुगात ईश्वरभक्ती विविध प्रकारे केल्याचे दिसते.परंतु कलियुगात फक्त नामस्मरण केल्यानेच ईश्वरप्राप्ती होऊ शकते.

**रवि प्रकास रजन[रात्र]जथा[नष्ट होणे]यो गत दीसै संसार।**
**पारस मली ताँबौ छिपा, कनक होत होत नहिं बार॥ ५॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२७.

पारस मण्याच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते, परंतु तांब्याचे सोने होत नाही.सूर्यप्रकाशाने रात्र संपते.त्याप्रमाणे प्राणिमात्रांना सत्वाचा प्रकाश दिसला तरच ईश्वर प्राप्ती होऊ शकते.

**धन जोवन[यौवनसुख]हरि ना मिलै, दुख दारुन अधिक अपार।**
**एकै एक बियोगियाँ, ता को जानै सब संसार॥ ६॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२७.

धनदौलत व यौवनसुखात मग्न होण्याने ईश्वरप्राप्ती होत नाही.तर ह्या ऐहिक सुखामुळे दारुण दुःखेच निर्माण होतात.हे सर्व जग जाणते.

**अनेक जतन करि टारिये, टारे[टाळणे]न टरै भ्रमपास।**
**प्रेम भगति नहिं उपजै, ता ते जन रैदास उदास॥ ७॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२७.

रोहिदास म्हणतो, “अनेक प्रयत्न करूनही सांसारिक मायामोह टाळता येत नाही.भ्रमपाशातून मुक्त होता येत नाही.म्हणून नामस्मरणयुक्त प्रेमभक्ती केल्याशिवाय भवपाशातून सुटका होणार नाही.”

(१३९)

**रामभगतको जन न कहाऊँ, सेवा करूँ न दासा।**
**जोग[योग]जग्य[यज्ञ]मुन कछु न जानै,ताते रहूँ उदासा॥टेक॥**

अनुक्रमणिका

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२९.

**भावार्थ**— मी स्वतःस रामभक्त म्हणवून घेत नाही.मी त्या दशरथी रामाचा दास किंवा सेवेकरी नाही.मी योग, यज्ञ इत्यादी काही जाणत नाही.मी याबाबत मनात उदास राहातो.

**भगत हुवा तो चडै बढाई**[गर्व.]**,जोग करुँ जग माने।**
**गुन हुआ तो गुनी अन कहै, गुनी आपको आनै॥ १॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२९.

मी दशरथी रामाचा भक्त म्हणवून घेणे गर्वाचे होय.मी योग, सिद्धी संपादून चमत्कार दाखवू लागलो तर जग मला महत्त्व देईल, तसेच गुणी म्हणवून मला स्वतःचे माहात्म्य प्रस्थापित करावयाचे नाही.मी माया, ममता, मोहाच्या पलीकडे जाऊ इच्छितो.

**ना मैं ममता मोह न माहिया, ये सब जाहि बिलाई।**
**दोजख**[स्वर्ग]**भिस्त**[नरक]**दोऊ समकर जानौ, दुहुँ ते तरक**[तर्क, विवेक]**है भाई॥ २॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२९.

मी माया-ममता-मोहाच्या पलीकडे जाऊ इच्छितो.मला या सर्व विकारावर विजय मिळवायचा आहे.नरक आणि स्वर्ग यांना मी बरोबर समजतो.कारण या दोघांहून विवेक श्रेष्ठ आहे.

**मैं अरु ममता देखि सकल जग, मैं से मूल गँवाई।**
**जब मन ममता एक एक मन, तबहि एक है भाई॥ ३॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२९.

मी आणि माझे यामध्ये सर्व जग व्यग्र असल्यामुळे, त्यास सत्याचा शोध लागत नाही.मी अहंभाव मुळातच सोडलेला आहे.जेव्हा माया मोहातून मन मुक्त होते.तेव्हाच ईश्वर भेटतो.

**कृष्ण करीम राम हरि राघव, जब लग एक न पेखा**[समजणे]**।**
**वेद कतेब कुरान पुरान, सहज एक नहिं देखा॥ ४॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२९.

जोपर्यंत कृष्ण, करीम, राम, हरी, राघव यांस समजत नाही, तोपर्यंत ईश्वरप्राप्ती होत नाही.वेद, कुराण, इ.सर्व ग्रंथांमध्ये हेच शास्त्र सांगितले आहे.या सर्व ग्रंथांचे सार एकच जाणले पाहिजे.

**जोइ**[जे]**जोइ पूजिय सोइ**[ते]**सोइ काँची**[निरर्थक]**,सहज भावसत**[सत्य]**होई।**
**कह रैदास मैं ताहिको पूजूँ, जाके ठाव**[ठिकाण, स्थान.]**नावँ नहि होई॥ ५॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२२९.

अनुक्रमणिका

रोहिदास म्हणतो, “ईश्वर सर्वत्र आहे” जे-जे आम्ही पुजतो, ते-ते सर्व निरर्थक समजले पाहिजे.निर्गुण, निराकार परब्रह्माची मी पूजा करतो.

(१४०)
**आरती**

**आरती कहाँ लौ जोवै।**
**सेवक दास अचंभो होवै॥टेक॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२३१.

**भावार्थ**— प्रभूच्या आरतिची शोभा काय वर्णन करावी?आरतिचा दिव्य सोहळा पाहून सेवकास आश्चर्य वाटत आहे.

**बावन**[बावनकशी]**कंचन**[सोने]**दीप धरावै।**
**जड़ बैरागी दृष्टि न आवै॥ १॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२३१.

बावनकशी सुवर्णाच्या दीपांनी आरती ओवाळावी, आणि ती मंद बुद्धिच्या भक्तास कळून येऊ नये.

**कोटि भानु**[सूर्य]**जाकी सोभा रोमै।**
**कहा आरती अगनी होमै॥ २॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२३१.

कोटी कोटी सूर्य ह्या आरतिचे दीप उजळतात.अग्निनारायणाने आरतिसाठी होम सुसज्ञ केला आहे.

**पांच तत्त्व**[पंचमहाभूते]**तिरगुनी माया**[त्रिगुणात्मक माया]**।**
**जो देखे सो सकल समाया॥ ३॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२३१.

पंचमहाभूते आणि त्रिगुणात्मक मायेने ह्या आरतिचा पसारा मांडला आहे.ज्यांनी ही आरती पाहिली ते धन्य झाले.

**कह रैदास देखा हम माही।**
**सकल जोति रोम सम नाहीं॥ ४॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.२३१.

अनुक्रमणिका

रोहिदास म्हणतो, “अशाप्रकारे प्रभुच्या सर्व व्यापी रूपाचा साक्षात्कार घडला.सकल विश्वाला भरून राहिलेले परमतत्व आम्ही आमच्या अंतरंगात अनुभवले.”

(१४१)

**माधवै!पारसमनि लै जाउ, मोहि**[मला]**सोने का नहिं चाऊ**[इच्छा मोह]**।**
**जउ मो पै रामदयाळा, देऊ चून लून धिऊ**[गहू]**दाला**[डाळ]**॥**

—श्रीसंत रोहिदास (सत्यदेवशिंदे), पृ.१५०.

**भावार्थ**— माधवा, पारस मणी घेऊन जा.मला सोन्याची इच्छा (मोह) नाही.प्रभू, दयाळू रामा, तू मला गहू, डाळ देण्याची कृपा करतो.

**मै रुखी सुखी**[वाळली-सुकलेली]**खाऊं, औरन की भुक मिटाऊं।**
**कोई परे ना दुख की पासा**[फास.]**,सब सुखी बसै रविदासा॥**

—श्रीसंत रोहिदास (कामत), पृ.१५०.

रोहिदास म्हणतो की, तेव्हा मी सुखसमाधानाने वाळली सुकलेली मीठभाकरी खातो, तसेच दुसऱ्यांची भूकही नाहीशी करतो.मला दुःखाचा कसलाही फास (बंधन) नाही.तरी सर्वांच्या सुखामध्ये मला सुख मिळते.सर्व सुखी तर मी सुखी.

(१४२)

**काहे मन मारन**[मारण्यासाठी]**बन**[वन]**जाई, मन की मार कवन सिधि पाई**[मार्ग सांपडणे]**।**
**बन जाकरि इहि मनवा**[मन]**न मरहीं मन कौ मारि कहहु कस**[कर]**तरही**[तसे]**।**
**मन मारत का गुन मन माही**[मनातच]**मनु**[माणूस]**मूरख**[मूर्ख]**तिस**[तुला]**जानत नाहीं।**

—श्रीसंत रोहिदास (शिंदे), पृ.२१३.

**भावार्थ**— हे मानवा, मन मारण्यासाठी वनात का जातोस?मनाला मारून कोणाला (परमेश्वर प्राप्तिचा) मार्ग सापडला आहे?हे मानवा, वनात जाऊन मन मरत नाही.मनाला मारावयाचे असेल तर, मी सांगतो तसे कर.मूर्ख माणसा, तुला समजत नाही.मन मारण्याचा गुण (उपाय) मनातच आहे.

**पंच विकार जौ इहि मन त्यागै, तौ मन राम चरण मंहि लागै।**
**रिदै**[हृदय]**राम सुध**[शुद्ध]**करम कमावऊ तौ ‘रविदास’ मधुसूदन**[हरि, प्रभु]**पावऊ॥**

—श्रीसंत रोहिदास (शिंदे), पृ.२१३.

पंचविकाराचा ह्या मनातून त्याग कर आणि मन हे रामाचे चरणी लाव.रोहिदास म्हणतो की, मनापासून आचरण शुद्ध ठेव.पवित्र कर्म कर.म्हणजे तुला मधुसूदन (हरी) प्रसन्न होईल.

(१४३)

**हुसिआरी**[हुशार]**हुसिआरा रे। मन जपि लै राम पिआरा**[प्रिय, आवडता]**रे॥टेक॥**

अनुक्रमणिका

—श्रीसंत रोहिदास (शिंदे), पृ.२२५.

**भावार्थ**— हुशार, हुशार रहा, अरे, प्रिय रामाचे स्मरण कर.जप कर.

**गढि**[शरीररूपी गड (किल्ला)]**कांचा**[कच्चा, दुर्बल]**तसकर**[शत्रू]**लागारे, तूं काहे न जान अभागारे।**
**नेत्र पसरि न देखै रे, तेरा जनम मरण केहि लेखेरे**[कशासाठी]**कर॥**

—श्रीसंत रोहिदास (शिंदे), पृ.२२५.

हे अभाग्या, तुला समजत कसे नाही रे?अरे, शरीररूपी गड कच्चा, दुर्बल आहे आणि त्यात काम, क्रोध, लोभ, मद व मत्सर हे पंचविकारी शत्रू तुझ्यामागे लागले आहेत.तुझे जन्ममरण कशासाठी आहे?तू डोळे उघडून पाहात का नाहीस?

**पाऊ पसारि क्या सोयारे, तै जनम अकारथ**[विनाकारण, व्यर्थ]**खोयारे**[घालविलास (गमविणे)]**।**
**जन 'रविदास' राम मिलनै**[मिळेल.]**रे, कछु जागति पहारा कीजै रे॥**

—श्रीसंत रोहिदास (शिंदे), पृ.२२५.

तू पाय पसरून का झोपलास?तू आपला जन्म विनाकारण फुकट घालविलास.जनसेवक रोहिदास म्हणतो की, "तू (राम स्मरणाचा) जागता पहारा कर म्हणजे तुला राम मिळेल."

(१४४)

**रे मन चलु अब अमृत देस, जहाँ न मितु**[मृत्यु]**न सोग**[शोक]**कलेस**[क्लेश]**॥टेक॥**

—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु).पृ.१४६.

**भावार्थ**— अरे मना, जेथे मृत्यू नाही, शोक नाही व क्लेश दुःख नाही.त्या अमृत देशाला तू आता चल.

**गनिका**[वेश्या]**थी किस करमा**[कर्म, काम]**जोग**[योग्य, लायक]**,पर पुरुष सों रमती भोग।**
**निस वासर**[रात्रंदिवस]**दुष्करम कमाई, राम कहत वैकुंठ सिधाई॥**

—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु), पृ.१४६.

वेश्या कोणत्या कामास योग्य होती?परपुरुषाबरोबर संभोग करीत रात्रंदिवस पाप करीत होती.ती पोपटाला 'राम राम' म्हणावयास शिकविण्यात एवढी मग्न झाली की, शेवटी ती 'राम राम' म्हणत वैकुंठास गेली.

**नामदेव छीपी जाति के ओछ**[नीच]**,जिनको जस**[यश]**गावत है लोक।**
**भगत हेत भगती के चेले, अंकमाल**[पुष्पमाळ]**लै बीठल**[विठ्ठल]**मिलै॥**

—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु), पृ.१४६.

अनुक्रमणिका

नामदेव नीच जातीचे शिंपी, परंतु पांडुरंगावरील अनन्य भक्तिमुळे सर्व जग त्यांचे यश गात आहे.एके दिवशी विठ्ठलमाळीसुद्धा नामस्मरणात एवढे तल्लीन झाले की, ते राजाला हार पोहचविण्यासही विसरले.तेव्हा भगवानाने आपल्या प्रेरणेने त्यांचा हार पोहचविला.

**कोटि जन्य[यज्ञ]जो कोई करे, राम-नाम सभ सोउ न निस्तरे।**
**निर्गुम को गुन देखो भाई, देही-सहित कबीर सिधाई[निघून जाणे]॥**
—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु), पृ.१४६.

कोणी कोटी यज्ञ केले.तरीसुद्धा रामनामाप्रमाणे ते सफल होत नाही.ह्या निर्गुणाचे (रामाचे) गुण तर पाहा, यामुळे भक्त कबीर सदेह परधामी गेले.

**लोक वेद सब करि खंडौति[खंडन],आयो सरन करै दंडौति[दंडवत, नमस्कार]।**
**जन 'रैदास' निरंजन राई। तोही मो अब रहइ समाई[मिळणे, एकरूप होणे.]॥**
—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु), पृ.१४६.

रोहिदास म्हणतो की, "हे निरंजन प्रभु, मी तुझा आहे.मी लोक आणि वेद या सर्वांचे खंडन करून तुला शरण आलो आहे.मी तुला दंडवत-नमस्कार करीत आहे.माझ्यावर अशी कृपा कर की, मी तुझ्याशी एकरूप होऊन जाऊ दे."

(१४५)

**हौ तुम कारन केसवे, अन्तर लव[प्रेम]लागी।**
**एक अनुपम अनुभवी, किमि[आणखी]होई विभागी॥टेक॥**
—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु), पृ.२०४.

**भावार्थ**— हे प्रभु केशवा, तुझ्या कारणामुळेच माझ्या अंतःकरणात प्रेम निर्माण झाले.तुझ्यामध्ये अद्वितीय, अनुभवी प्रेम आहे.ते प्रेम दुसऱ्यात नाही.(तो चातक पक्षी स्वाती नक्षत्रातील पावसाचीच मार्गप्रतिक्षी करीत असतो.)

**इक अभिमानी चातक, विचरत[भ्रमण करणे, फिरणे]जग माही,**
**यद्यपि जल पूरन मही, कहूँ वा रुचि नाही॥**
—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु), पृ.२०४.

पृथ्वीवर पुष्कळ पाणी आहे.परंतु अभिमानी चातकास ते आवडत नाही.चातक पक्षी स्वाती नक्षत्रातील पावसाचीच मार्गप्रतिक्षा करीत असतो.

**जैसे कामि देखि कामिनी, हृदय सूल[काटा]उपजाई।**
**कोटि वैद विधि ऊचरै, बाकी विथा न जाई॥**
—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु), पृ.२०४.

अनुक्रमणिका

ज्याप्रमाणे एखादी सुंदर स्त्री पाहिल्यावर हृदयात विषयवासना उत्पन्न होते, परंतु ती पूर्ण करण्यासाठी करोडो वैद्यांनी अनेक औषधे केली, तरी विषयवासना नाहीशी होत नाही.

**जो तेहि चाहै सो मिलै, आरत**[करूण प्रार्थना]**गति होई।**
**कह 'रैदास' यह गोप**[गुप्त]**नहिं, जानै सब कोई॥**

—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु), पृ.२०४.

करुण प्रार्थनेने जे पाहिजे ते मिळण्याची इच्छा पूर्ण होते.रोहिदास म्हणतो की, "ही गोष्ट गुप्त नाही, हे सर्वजण जाणतात."

(१४६)

**साँची**[खरी]**प्रीति हम तुम सँग**[तुमच्या बरोबर]**जोरी**[जोडी]**।**
**तुम सँग जोरि अवर**[आणखी]**सों तोरी**[तोडणे.]**॥टेक॥**

—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु), पृ.२०५.

**भावार्थ**— हे प्रभु, आम्ही तुमच्याबरोबर खरी प्रेम भक्ती जोडतो.जेव्हा आम्ही तुमच्याबरोबर खरी प्रेम भक्ती जोडतो.तेव्हा इतर दुसऱ्याबरोबर असलेले प्रेम तोडतो.

**जो तुम बादल**[ढग]**तो हम मोरा, जो तुम चंद**[चंद्र]**हम भये चकोरा**[चातक]**।**
**जो तुम दीवा तो हम बाती, जो तुम तीर्थ तो हम याती**[यात्री]**॥**

—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु), पृ.२०५.

जर तुम्ही ढग तर आम्ही मोर.जर तुम्ही चंद्र तर आम्ही चातक, जर तुम्ही दिवा तर आम्ही त्याची वात, जर तुम्ही तीर्थ तर आम्ही यात्रेकरू असे तुमचे आमचे नाते आहे.आमची तुमच्यावर खरीखुरी प्रेम-भक्ती आहे.

**जहाँ जाऊँ वह तुम्हारी सेवा, तुमसा ठाकुर**[देव]**और न देवा।**
**तुम्हरे भजन कटे मय फाँसा, भक्ति हेतु गावै 'रैदासा' ॥**

—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु), पृ.२०५.

जेथे जेथे आम्ही जातो, तेथे तेथे आम्ही तुमची सेवा करतो.तुमच्याशिवाय आम्हास दुसरा देव नाही.रोहिदास म्हणतो, "हे प्रभु, तुमचे भजन केल्याने माया जंजाळ नष्ट होते.याच हेतूने मी तुमचे भजन करतो, गातो."

(१४७)

**माधवे, तुम तोरो, मैं नहिं तोरुँ।**
**तुम तें तोरि कवन तैं जोरुँ॥टेक॥**

अनुक्रमणिका

—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु), पृ.२२२.

**भावार्थ**— हे प्रभु माधवा, तुम्ही प्रेम तोडा, पण मी तोडणार नाही.तुम्ही प्रेम तोडल्यावर ते कोण जोडणार आहे?

**तरीथ**[तीर्थ]**व्रत न करूँ अन्देसा**[शंका-संशय]**,तुम्हारे चरन कमल का भरोसा।**
**जहँ-जहँ जाऊँ तुम्हरी पूजा, तुम सा**[तुझ्यासारखा]**देव और नहिं दुजा**[दुसरा]**॥**
—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु), पृ.२२२.

मी तीर्थ व्रत करणार नाही.माझा तुमच्या चरणकमलावर भरवसा (विश्वास) आहे.मी जेथे जेथे जाईन, तेथे तेथे मी तुमची पूजा करणार.तुमच्याशिवाय माझा दुसरा देव नाही.

**मैं अपनो मन हरि सों**[हरिबरोबर]**जोरयो हरि सों जोरि सबन सो तोरयो।**
**सब परिहरि**[परित्याग करणे]**तूम्हरी ही आसा, मन बच**[वाचा-बोलणे.]**कर्म कहै 'रैदासा' ॥**
—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु), पृ.२२२.

मी आपले मन हरिबरोबर जोडले आहे.हरिबरोबर जोडल्यामुळे इतर सर्वांशी माझे प्रेमसंबंध तुटले आहेत.रोहिदास म्हणतो की, "मी सर्वांचा त्याग केला आहे.मन, वाचा व कर्मापासून मला तुमचीच आशा आहे."

(१४८)

**सब कछु करत, कहौं कछु कैसे, गुन विधि बहुत रहत ससि**[शशि, चंद्र]**जैसे॥टेक॥**
—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु), पृ.२२९.

**भावार्थ**— मी सर्व काही प्रभू सेवा करतो.परंतु सर्व गुणसंपन्न चंद्राप्रमाणे गुणविधिनुसार मी पूजा करू शकत नाही.

**दरसन गगन अनिल**[सूर्यउष्णता]**अलेप जस, गंध जलधि प्रमिबिंब देखि तस।**
**सब आरंभ अकाम**[निष्काम]**अनेहा**[स्नेहाशिवाय]**,विधि-निषेध कीयौ अनेकहा॥**
—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु), पृ.२२९.

ज्याप्रमाणे आकाशात सूर्यदर्शन होताच चंद्र प्रकाश नष्ट होतो, त्याप्रमाणे स्वार्थ ठेवून पूजा केल्यास, ती पूजा सफल होत नाही.

**यह पद कहत सुनत नहि भावै, कहं 'रैदास' सुकृति को पावै॥**
—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु), पृ.२२९.

अनुक्रमणिका

रोहिदास म्हणतो की, “मनात प्रभुबद्दल श्रद्धा, भक्ती, प्रेम नसेल तर प्रभुभजन ऐकून किंवा म्हणून काही उपयोग नाही.म्हणून मनापासून भक्तिभावाने प्रभुसेवा केली तर पुण्य मिळेल.”

(१४९)

**मेरी प्रीती गोपाल सों मति घटै हो। मोलि**[खरेदी करणे]**महँगै**[महाग]**लई जिव सटै**[पाठांतर करणे]**हो॥टेक॥**

—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु), पृ.२२९.

**भावार्थ**—प्रभु गोपाळावरील माझे प्रेम कमी होणार नाही.कारण ते प्रेम अपार भक्तिने मिळविले आहे.ते मी कधीही कमी होऊ देणार नाही.

**हृदय सुमिरन**[स्मरण]**करुँ नैन**[डोळे]**अवलोकता, स्त्रवनों**[ऐकणे]**हरि कथा पूरि राखूँ।**
**मन मधुकर**[भुंगा]**करौं, चिन चरना धरौं, राम रसायन**[रामरस]**रसना चाखूँ॥**

—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु), पृ.२२९.

मी अंतःकरणपूर्वक हरिस्मरण करतो.डोळ्याने पाहतो.कानाने हरिकथा पूर्ण ऐकतो.मनापासून भुंगा बनून प्रभुचरण धरून रामनाम करतो.मनसा, वाचा आणि कर्मणाने मी सदैव भक्तिमध्ये डुंबत असतो.

**साधु संगत विन भाव न उपजै**[उत्पन्न होणे]**,भाव बिन भगति क्यों होइ तेरी।**
**बंदत**[वंदन]**रैदास रघुनाथ सुनु वीनती, गुरुप्रसाद कृपा करौ न देरी॥**

—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु), पृ.२२९.

मनात भक्तिभाव नसेल तर साधुसंगत होणार नाही.मनात भाव नसेल तर भक्ती कशी होईल?रोहिदास म्हणतो की, “प्रभु रामचंद्रास मी वंदनपूर्वक विनंती करतो की, “हे रघुनाथा, मला गुरुप्रसाद देण्याची कृपा करण्यास उशीर करू नकोस.”

(१५०)

**पाड़े**[भगवान]**कैसी पूजि**[जग]**रची रे।**
**सत्ति बोलै सोई सत्तिवादी, झूठी बात बची रे॥टेक॥**

—संत रैदास (योगेंद्रसिंह), पृ.१७८.

**भावार्थ**—हे प्रभु, तू जग कसे निर्माण केलेस?जो सत्य बोलतो, त्यास सत्यवादी म्हणतात.बाकी सगळे खोटे राहिले.

**जो अविनासी सब का करता, व्यापि रह्यो सब ठौर**[थांबणे]**रे।**
**पंच तत्त्व जिनि कीया पसारा, सो यों किछू**[काही]**और रे॥ १॥**

—संत रैदास (योगेंद्रसिंह), पृ.१७८.

अनुक्रमणिका

जो सर्वांना विनाशापासून वाचवितो, तोच ईश्वर सर्व ठिकाणी आहे.ज्यांनी पंचतत्त्वाने जग निर्माण केले, तो निराळाच आहे.

**तू जो कहैत हौ यौ ही करता, याकूं मानिख**[मनुष्य]**करै रे।**
**तारणि**[उद्धार करणे]**सकति सही जे या मैं, तौ आपण क्यूक न तिरै रे॥ २॥**
—संत रैदास (योगेंद्रसिंह), पृ.१७८.

ईश्वरा, तू जे म्हणतो, ते तू करतो.जर मनुष्याने केले, तर त्याचा उद्धार होईल.मग आपल्या सर्वांचा उद्धार का होणार नाही.

**अँही भरोसे सब जख**[जग]**बूडा, सुणि पण्डित की बात रे।**
**या कै दरसि कूण गुण छूटा सब जन आया जात रे॥ ३॥**
—संत रैदास (योगेंद्रसिंह), पृ.१७८.

पंडित असे म्हणतात की, "ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र मनापासून भक्ती-पूजा करीत नाहीत." तरी ती मनापासून पूजा करावयास पाहिजे."

**याकी-सेव**[ज्याची सेवा]**सूल**[कष्ट, दुःख, त्रास.]**नहि भाजै, कटै न संसे पास से।**
**सोचि विचारि देषि या मुरति, युँ छाँडी रैदास रे॥ ४॥**
—संत रैदास (योगेंद्रसिंह), पृ.१७८.

ते मायाजाळात गुंतले जातात.अशा कारणामुळे त्रास कमी होत नाही.रोहिदास म्हणतो, "मूर्तिपूजेने प्रभू प्रसन्न होत नाही, म्हणून मी मूर्तिपूजा सोडली व मी भक्तिभावाने पूजा करतो."

(१५१)

**ररंकार**[रां रामय नमः]**रहत सब हिन ते, अंतर मेल मिलावैगा॥टेक॥**
—संत रैदास (योगेंद्रसिंह), पृ.१९२.

**भावार्थ**—"रा रामाय नमः" या शिवाय सर्व हीन, कमी प्रतीचे असते.परंतु रामभक्तिने अंतर नाहीसे होऊन बरोबर होते.

**लोहा समकर कंचन समकर**[समान बरोबर]**,भेद अभेद समावैगा।**
**जे सुख होवै पारस परसे, सो सुख का कहि गावैगा॥**
—संत रैदास (योगेंद्रसिंह), पृ.१९२.

लोखंडासमान सोने बरोबर होऊन, भेद नाहीसा होऊन बरोबर होईल.परंतु परिसाचा स्पर्श झाल्याने लोखंडाचे सोने होते.ते सुख कुठे मिळणार आहे का?

अनुक्रमणिका

**गुरुप्रसाद भई अनुभौ-मति, विष अमृत सम घ्यावैगा।**
**कहै रैदास मेटि**[नष्ट करणे]**आपा**[अहंकार]**पर, तब वह**[सुखही]**ठौरहि**[थांबणे]**पावैगा॥**
—संत रैदास (योगेंद्रसिंह), पृ.१९२.

गुरुप्रसाद झाल्यावर अनुभव आणि बुद्धिने विष अमृत समान वाटेल.रोहिदास म्हणतो, “आपला अहंकार नाहीसा होऊन जे सुख मिळते, ते कायम स्वरूपाचे मिळते.”

(१५२)

**(कोई सुमार न देखूं ये सब उपल चोभा।**
**जाको जेता प्रकास ताको तेतिही सोभा॥टेक॥**
**हम हिये सीख सीखै हम जिय माड़े।**
**थोरे हि इतराइ चलै पतिसाही छाँडे॥**
**अति ही आतुर है काची ही तोरे।**
**पुड़े जल पैसे नहीं पडे रे खोरे॥**
**थोर-थोरे मूसियत परायो धना।**
**कह ‘रैदास’ सुनो सब संत जना॥)**
—संत प्रवर रैदास साहेब (जिज्ञासु), पृ.२१२.

**कोऊ सुमरन देखौ, ऐ सब उपली**[उत्पन्न होणे]**चोभा**[प्रदर्शन.]**।**
**जा कै जैसा सुमिरन, ताकै तैसी सोभा॥टेक॥**
—संतगुरु रविदास वाणी (डॉ.बी.पी.शर्मा), पृ.८१.

**भावार्थ**—काही लोक भक्ती केल्याचे ढोंग दाखवितात.पण ती खरी भक्ती नव्हे.ज्यांची जशी भक्ती होते, तसे त्यास फळ मिळते.

**हमरी ही सीष**[डोके]**सुनै, हमसौं ही मांडे**[मागणे]**रे।**
**थोड़े ही इतराई**[घमेंड करणे]**चालै, पातिवाहि**[बादशाही]**छांडेरे॥ १॥**
—संतगुरु रविदास वाणी (डॉ.बी.पी.शर्मा), पृ.८१.

काही लोक आमच्यापासून ज्ञान-भक्ती घेऊन, ते आम्हांस अत्यंत ज्ञानी असल्याचा आव दाखवितात.थोड्या ज्ञानात विद्वान असल्याचा बादशाही आव आणतात.

**अति ही आतुर है, कांचा**[कच्चा]**ही तौले रे।**
**ऊंडे**[उडणे]**जल पैसे नहीं, पांड**[जोडून, जमवून]**राषो**[सांभाळणे]**रे॥ २॥**
—संतगुरु रविदास वाणी (डॉ.बी.पी.शर्मा), पृ.८१.

काही लोक थोडीशी कच्ची भक्ती करून, आपण मोठे भक्त असल्याचा आव आणतात.स्वतःजवळ थोडेसे पैसे असतानाही मी मोठा धनवान आहे असे दाखवितात.

अनुक्रमणिका

**थोर**[थोडे]**ही थोरे मूसिए**[चोरणे]**परायो धना।**
**कहै रविदास सुनहु सन्त जनां॥ ३॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.बी.पी.शर्मा), पृ.८१.

संत रोहिदास संत जनांना सांगतात की, “थोडे ज्ञान प्राप्त करा.एकदम ज्ञान प्राप्त करू नका.”

(१५३)

**या रामा येक तू दाना**[बुद्धिमान]**,तेरा आदि भेष ना।**
**तूं सुलितान, सूलिताना बंदा सकिसता**[निर्बल]**अजाना॥टेक॥**

—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.८४.

**भावार्थ**—हे रामा, तुझे कोणतेही एक स्वरूप नाही.तसेच तुला आदि व अंतही नाही.जगात तूच एक मोठा दाता आहे.तूच बादशहांचा बादशहा आहे.दुर्बल, अशक्तांचा तू ईश्वर आहेस.

**मैं बेदियानत**[बेइमान]**वदनजर**[क्रूर दृष्टिचा]**,दरमंद**[बुद्धिमान]**बरखुरदार**[श्रीमान, महाशय, महोदय.]**।**
**बे अदब बदनखत वीरा**[नेहमी]**,बे अकिल बदकार**[बेकार]**॥**

—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.८४.

माझ्यामध्ये फार दुर्गुण आहेत.आणि तू सद्‌गुणाने संपन्न आणि श्रीमंत आहेस.

**मैं गुनहगार गुमराह**[वाट चुकलेला]**गाफिल, कमेदलां करतार**[दुष्ट]**।**
**तू दरकदार**[शरणागत वत्सल]**दरियाव**[दयाळू]**दिल, मैं हिरिसिया**[इर्षालू.]**हुसियार॥**

—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.८४.

मी गुन्हेगार, वाट चुकलेला व बेसावध आहे.तू दुर्गुणांना नाहीसा करणारा ईश्वर आहेस.तुझे हृदय समुद्राप्रमाणे विशाल आहे.तर माझे हृदय-मन फार संकुचित, लहान आहे.

**यहु तन हस्त खस्त**[खराब, बेकार]**खराब, खातिर अंदेसा बिसियार**[पुष्कळ]**।**
**‘रविदास’ दासहि बोलि साहिब, देहु अब दीदार**[दर्शन]**॥ १॥**

—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.८४.

माझे जीवन बेकार-खराब झाले आहे.तसेच मी नेहमी भ्रमात राहून तुलासुद्धा विसरलो आहे.तुझा दास रोहिदास म्हणतो की, “तू ईश्वर आहेस.मला दर्शन देऊन कृतार्थ कर.”

(१५४)

**ता थै**[माझ्यासारखा]**पतित नहीं कौ पावन, हरि तज आन न ध्याया**[थांबणे]**।**
**हम अपूजि पूजि भयैं हरि थे, नाव अनूपम गाया रे॥टेक॥**

अनुक्रमणिका

—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.१०३.

**भावार्थ**—हे ईश्वर, माझ्यासारखा कोणी पातकी नाही व तुझ्यासारखा कोणी पवित्र नाही.अशा हरिस प्राप्त केल्यावर मला दुसऱ्याचे चरणी जावयाचे नाही.मी अपूर्ण व अपवित्र आहे.तर तू पूज्य, अनुपम आणि अतुलनीय आहेस.

**अस्टादस**[अठरा]**व्याकरण वषानै**[पुराण]**तीनि काल पट जीत्या रे।**
**प्रेम भगति अंतर गति नाहीं, ताथै धांणक**[निवडणे, काढणे]**नीका रे**[बेकार]**॥ १॥**

—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.१०३.

तुझ्या नामाचे सर्व वेद, पुराण इत्यादी स्मरण करतात.रोहिदास म्हणतो की, "ज्याच्यामध्ये प्रेमभक्ती नाही, तो गुणसंपन्न असूनही त्याज्य आहे."

**ता थै भलौ स्वान कौ सत्रु**[कुत्र्याचे मांस खाणारा चांडाळ]**,हरि चरनां चित लाया रे।**
**मुवां मुकति**[मृतक]**बैकुंठह वासा, जीवत इहां जस पाया रे॥ २॥**

—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.१०३.

प्रेम-भक्ती नसणाऱ्यापेक्षा कुत्रा चांगला, कारण, तो आपल्या मालकाच्या चरणी राहून सेवा करतो.त्याचप्रमाणे जिवंतपणी मनुष्यास यशप्राप्ती होत नसते.व मेल्यानंतर तो वैकुंठात निवास करतो.ही कल्पना खोटी आहे.

**हम अपराधी नीच घरि जन मैं, कुटुंब लोग करैं हांसी रे।**
**कह 'रविदास' राम जपि रसना, काटै**[मुक्त होणे.]**जम की पासी रे॥ ३॥**

—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.१०३.

रोहिदास म्हणतो की, "माझा जन्म नीच कुळात झाला.तेव्हा मी भगवंताचे स्मरण करतो.तेव्हा माझेच लोक मजकडे पाहून हसतात.रामनाम जपल्याने मनुष्य यमराजाच्या आवागमनाच्या फेऱ्यातून मुक्त होऊ शकतो."

(१५५)
**राम गौडी**

**साधौ!का सारत्रन सुनि कीनौ।**
**अनपावनी**[अपवित्र]**भगति नहीं साधी, भुषै**[मला]**अंन न दीनौ॥टेक॥**

—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.११०.

अनुक्रमणिका

**भावार्थ**— संत रोहिदास म्हणतात की, "ह्या सांसारिक लोकांनी शास्त्र ऐकून काय केले?ह्या अपवित्र लोकांनी भक्तिरूपी साधना केली नाही आणि त्यांनी दानधर्मही केला नाही."

**काम न विसरयौ डयब न त्यागौ, लोभु न विसरयौ देवा।**
**पर निंदा मुष[मला]तै नहिं छांडि, निफल[निष्फल]भइ सबु सेवा॥ १॥**
—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.११०.

त्यांनी काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सरही सोडला नाही आणि दुसऱ्याची निंदा करण्याचेही सोडले नाही.त्यांची सेवा निष्फळ झाली आहे.

**वाट पाड़ि घर मुसि[चोरी]परायौ, उदरि भरयौ, अपराधी।**
**है अपराधी कैसौ न सिमरयौ, इहु अविद्या साधी॥ २॥**
—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.११०.

जे वाटमारी (वाटसरूंना लुटणारे) करून उदरनिर्वाह करतात ते भयंकर अपराधी आहेत.असे गुन्हेगार लोक परमेश्वराचे स्मरण कधीच करत नाहीत.

**हरि अरपन करि भोज न कीनौ, कथा कीरत नही जानी।**
**राम भगति बिन मुक्ति[मुक्ती]न पावै, अमर जवि गरावै[महाग, अधिक किमतीचा.]प्रांनीं॥ ३॥**
—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.११०.

हरिस समर्पण करून त्यांनी कधीही कथा-कीर्तन केले नाही.यासाठी अमर आत्म्यास कधीही भक्तिशिवाय मुक्ती मिळू शकत नाही.

**चरन कंवल अनरंग न उपज्यौ, भूत दया नही पाली।**
**रविदास पलु साध संगति मिली, पुर्न ब्रह्म सदा प्रति पाली॥ ४॥**
—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.११०.

ज्यांनी परमेश्वरचरणी कधी प्रेम केले नाही.ज्यांनी कधी भूतदया पाळली नाही, रोहिदास म्हणतात की, "मला सज्जनांच्या साधुसंगतीने परम पिता परमेश्वरचरणी पोहोचण्याचा आशीर्वाद मिळाला, पूर्ण ब्रह्माने (परमेश्वर) मला नेहमी मान दिला."

(१५६)
**राग बसंत**

**तुझहि सुझंता[दिसणे]कछू नाहि, पहिरावा[पोशाख]देखे ऊभि[महत्त्व, मोठेपणा]जांहि।**
**गरबबती[गर्व]का नांही ठांऊ, तेरी गरदनि ऊपरि लवै काऊ॥टेक॥**
—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.११८.

अनुक्रमणिका

**भावार्थ**– संत रोहिदास म्हणतात की, "हे मानवा, वेशभूषा (गाडीघोडा, नोकरचाकर) इत्यादी अवडंबरामुळे तू घमेंडीने स्वतःस फार मोठा समजतोस.तसेच घमेंडीने (छाती वर काढून) चालतोस.त्यामुळे तुला (गोरगरीब इत्यादी) काही दिसत नाही.

**तू काइं गरबहि बावली**[वेडी, मूर्ख] **।**
**जैसे भादउ**[भाद्रपद]**खूंब राजुतु**[अंधार होणे] **,तिस ते खरी उतावली॥रहउ॥**
—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.११८.

संत रोहिदास म्हणतात की, "हे वेडी, तुला कोणत्या गोष्टीचा गर्व आहे?भाद्रपद महिन्याच्या अंधाऱ्या रात्री तू कोणाची मार्गप्रतिक्षा करीत उभी असतेस?"

**जैसे कुरंग**[मृग]**नही पाइओ भेदु, तनि सुगंध ढूंढै प्रदेसु।**
**अपतन का जो करे बिचारु, तिस नहीं जम कंकरु**[मारणे]**करे खुआरु**[दुर्दशा]**॥ २॥**
—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.११८.

मृगाच्या बेंबीत कस्तुरी असते.परंतु तिचा सुवास त्यास मिळत नाही.त्यासाठी तो मृग सर्व प्रदेशात शोध घेतो.त्याप्रमाणे ज्याच्यामध्ये उच्च विचार आहेत, यमराज त्याची दुर्दशा करीत नाही.

**पुत्र कलत्र**[इत्यादी]**का करहि अहंकारु, ठाकरु लेखा मंगनहारु**[मागणारा] **।**
**फेड़े का दुखु सहै जीउ। पाछे किस हि पुकारहि पीउ पीउ॥ ३॥**
—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.११८.

या जगात पुत्र इत्यादीचा गर्व करता कामा नये.कारण ते दैवाधीन आहे.जे ईश्वरभक्ती करीत नाही.त्यांस दुःख भोगावे लागते.

**साधू की जउ लेहि**[घेणे]**ओट**[आश्रय]**,तेरे मिटहि पाप सभ कोटि कोटि**[करोडो.] **।**
**कहि रविदास जौ जपै नामु, तिसु जाति न जौनि काम॥ ४॥**
—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.११८.

जे साधु सत्संगाचा आश्रय घेतात, त्यांची कोटी–करोडो पापं नाहीशी होतात.रोहिदास म्हणतात की, "जे ईश्वरनामाचे स्मरण करतात, त्यांना चौऱ्याऐंशी योनी भ्रमणापासून मुक्ती मिळते."

(१५७)

**राग गोंड**

**मुकुंद मुकुंद जपहु संसार**[जग]**,बिन मुकंद तनु**[शरीर]**होई अउहार**[व्यर्थ, अव्यवहारी] **।**
**सोई**[तोच]**मुकंद मुकति का दाता, सोई मुकंद हमारा पित**[पिता]**माता॥ १॥**

अनुक्रमणिका

—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.१२०.

**भावार्थ**— संत रोहिदास म्हणतात की, "सर्व जग भगवानाचा जप करीत आहे.भगवानाशिवाय शरीरसुद्धा होऊ शकत नाही.भगवानच मुक्ती देणारा आहे.तो भगवानच माझा पितामाता आहे."

**जीवत मुंकंदे मरत मुकंदे ताक**[त्याचे]**सेवक कउ सदा अनंदे**[आनंदाने]**॥ २॥रहाऊ॥**
—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.१२०.

जीवन जगतांना व मरतानासुद्धा आम्ही भगवानाचे नाव घेतो.त्यामुळे त्याचे सेवक नेहमी आनंदी-सुखी राहातात.

**मुकंद मुकंद हमारे प्रानं, जमि मुकंद मसतकि नीसान**[उंच, श्रेष्ठ] **।**
**सेव**[तोच]**मुकंद करे बैरागी, सोई मुकंदु दुरबल धनु**[धन.]**लाधी॥ ३॥**
—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.१२०.

आमच्या प्राणात भगवान आहे आणि तोच भगवान आमचे मस्तक-शीर नेहमी उंच ठेवतो.तोच मुकुंद बैरागी बनवतो आणि तोच मुकुंद अनाथ-गरीबांना धनाची मदत करतो.

**एकु**[एक]**मुकंदु करे उपकारु, हमारा कहा करे संसारु।**
**मेटी**[नाहीसे करणे]**जाति हुए दरबारी**[आश्रम]**,तूही मुकंद जोग जुगतारि**[जगाचा उद्धार]**॥ ४॥**
—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.१२०.

एक मुकुंद उपकार करतो आणि तोच मुकुंद सर्व जगाचा उद्धार करतो.जातीपातिचे निर्मूलन करून भगवानाच्या आश्रमात जातो.भगवाना, तूच सर्व जगाचा उद्धार केलास.

**उपजिओ गिआनु हुआ परगास**[प्रकाश]**,करि किरपा लीने कीट दास**[गोरगरीब] **।**
**कहु रविदास अब तृसना चुकी, जपि मुकंद सेवा ताहू**[त्याचा.]**की॥ ४॥**
—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.१२०.

गोरगरिबांवर उपकार करून, तूच ज्ञानप्रकाश दिलास, रोहिदास म्हणतात की, "भगवानाची सेवा करण्यात चूक करू नका, त्यातच कल्याण आहे.म्हणून त्या मुकुंदाची सेवा करा."

(१५८)
**राग गोंड**

**जे उहु**[ते]**अठसठि**[अडोसष्ट]**तीरथ न्हावै, जे उहु दुआदस**[द्वादशी]**सिला**[दगडी मूर्ती]**पुजावै॥रहाउ॥**

अनुक्रमणिका

—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.१२२.

**भावार्थ**— संत रोहिदास म्हणतात की, “जे अडोसष्ट तीर्थांमध्ये स्नान करून द्वादशीस मूर्ती-पूजा करतात.”

**जो उहु कूप[विहीर]तटा देवावै, करै निंद सम बिरथा[व्यर्थ]जावै।**
**साथ[साधू]का निंकु कैसे तेरे, सर पर जानहु नरक ही परै॥ १॥**
—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.१२२.

जो त्या विहिरीचा किनारा देतो, त्याची निंदा करण्यात सर्व व्यर्थ होते.साधूची निंदा करणारांचा उद्धार कसा होणार?त्यास नरकातच जावे लागणार.म्हणून दुसऱ्याची निंदा करू नका.

**जे उहु ग्रहन करै कुल खेति, अतपै नारि सींगार समेती[बरोबर]।**
**सगली सिंम्रिति[नामस्मरण]स्त्रवनी सुनै। करै निंद कवनै नही गुनै[अधिक]॥ २॥**
—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.१२२.

जो चांगली योग्य शोती करतो, जो आपल्या शृंगारलेल्या पत्नीस प्रभुस अर्पण करतो, जो नामस्मरण करतो व नामस्मरण ऐकून, त्याची निंदा करतो, ती निंदा ऐकू नये.

**जे उहु अनिक प्रसाद करावै, भूमि दान सोभा मंडपि पावै।**
**अपना बिगारि बिरांना[दुसऱ्यांना]सांढे, करै निंद बहुजोनि[योनी]हांढे[भटकणे]॥ ३॥**
—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.१२२.

जो अनेक प्रसाद करतो, तोच भूदान मंडपात सन्मान प्राप्त करतो.जो आपले नुकसान सोसून दुसऱ्याची निंदा करतो, त्यास अनेक योनींत भटकावे लागते.

**निंदा कहा करहु संसारा, निंदक का परगटि पाहारा।**
**निंदक सोधि[शोधणे]साधि बीचारिआ, कहु ‘रविदास’ पापी नरकि सिधारिआ[जाणे.]॥ ४॥**
—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.१२२.

भगवान निंदा करणारावर बरोबर लक्ष देऊन त्यास नरकात पाठवितो.म्हणून कोणाचीही निंदा करू नये.

(१५९)

**राग सोरठि**

**आदिग्रंथ**—

अनुक्रमणिका

**चमरटा गांठि**[शिवणे]**न जनई**[जाणणे]**,लोगु गटावै**[बनविणे]**पनही**[जोडे]**॥टेक॥**
—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.१२२.

**भावार्थ**— चामडे शिवण्याचे माहीत नसतानाही लोक जोडे बनविण्यास अथवा दुरुस्त करण्यास माझ्याकडे येत.

**आर**[आरी]**नही जिंह तोपऊं**[जोडे शिवणे]**,नही रांबी**[रापी]**ठाऊ रोपऊं**[चामडे शिवणे]**।**
—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.१२३.

आरी व रापी कशी धरावयाची हे मला माहीत आहे, परंतु चांगल्या प्रकारे जोडे शिवणे अथवा दुरुस्त करण्याचे मला ज्ञान नाही.चर्मकार समाजात चांगले कारागीर असूनही लोक त्यांच्याकडे न जाता माझ्याकडे येत.

**लोगु गंठि गंठि खरा बिगूचा**[निंदा करणे]**,हउं बिनु गाँठे जाइ पहुंचा।**
**'रविदास' जपै राम नामा,'मोहि जम सिऊं नाही कामा॥ १॥**
—संतगुरु रविदास वाणी (शर्मा), पृ.१२३.

लोक चांगले म्हणो अथवा निंदा करो, आपण आपले काम मनापासून करावयाचे, काम करता करता भगवानाचे नाम घ्यावयाचे.मला यमराज व शंकर म्हणजेच नरक व स्वर्गाशी मला काही कर्तव्य नाही.मी मोठा विद्वान पंडित ज्ञानी नाही.तरी लोक माझ्याकडेच येत.

(१६०)

**धन**[धन्य]**हरि भक्ति त्रय लोक जस**[यश]**पावनी**[पसरणे.]**।**
**करौ संत संग इहिं विमल जस गावनी॥टेक॥**
—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा), पृ.१२३.

**भावार्थ**— रोहिदास म्हणतात की, "मानवी जीवनास पवित्र, निर्मळ बनविणारी (भागवतामध्ये वर्णन केलेली) हरिभक्ती धन्य आहे.अशा हरिभक्तिने तिन्ही लोकांत यश पसरते.संतसंगतिने शुद्ध, सात्विक मनापासून प्रभुचे पवित्र-निर्मळ यशोगान, कीर्तन करणे आवश्यक आहे."

**वेद तैं पुरान पुरान तैं भागवत, भागवत तैं भक्ति प्रगट कीनीं।**
**भक्ति तैं प्रेम प्रेम तैं लच्छना**[लक्षण]**,बिना सतसंग नहीं जाइ चीनी**[ओळखणे]**॥ १॥**
—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा), पृ.१२३.

ह्या पवित्र हरिभक्तिचे सर्वप्रथम वर्णन वेदात झाले.त्यामुळे हरिभक्तिचा प्रचार व प्रसार वाढला.ईश्वरभक्तिने प्रभुबद्दलचे प्रेम उत्पन्न होते.प्रेम, लक्षणा व दशधा भक्ती उपलब्ध होते.

**गंगा पाप हरैं ससि ताप, अरु कल्पतरु दीनता दूरि खोवैं।**

अनुक्रमणिका

**पाप अरु ताप सब तुच्छ मति दुरि करि, अमी दृष्टी[दिव्यदृष्टी]जब संत जोवै॥ २॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा), पृ.१२३.

गंगास्नानामुळे पाप-तापाचा नाश होतो.चंद्राची शीतल किरणे तर ताप-गर्मी शांत करतात आणि कल्पवृक्ष दरिद्रतेचा नाश करतो.परंतु हरिभक्ती पाप-ताप या दोघांनाही नष्ट करते.तसेच ती क्षुद्र बुद्धिस निर्मळ बनवून अमृतरस पूर्ण ब्रह्मास ओळखण्याची दिव्य दृष्टी देते.

**विष्णु भक्त जितैं चित पर धरति, ते मन बच करमकरि बिस्वासा।**
**संतधरनी धरी कीर्ति जग बिसतरी[विस्तृत],प्रनत[इज्जत, मानसन्मान]जन चरन 'रविदास' दासा॥ ३॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा), पृ.१२३.

वैष्णव जनमन, वचन, कर्म यांचेपासून हरिभक्तिद्वारा सर्व जगातील लोकांच्या मनावर विजय प्राप्त करतात.वैष्णव जणांनीच ह्या पृथ्वीस धारण केले आहे.मी ह्या वैष्णवजनांचा दास आहे.

(१६१)

**भगति न होई रे न होई, जब लग तन सुध न होई।**
**भगति नही नांचे अरु गावै, भगति न बहु तप कीन्हा[करणे]।**
**भगति नही स्वामी अरु सेवग[सेवक]जब लग परम तत नही चीन्हन्हा[ओळखणे.]॥ १॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा), पृ.१२३.

**भावार्थ**— जोपर्यंत आपले शरीर हे मनसा वाचा व कर्मण्यापासून शुद्ध नाही, तोपर्यंत तुमची भक्ती झाली नाही व होणार नाही.भगवानाचा जो चांगला भक्त आहे तो आपली भक्ती दाखवीत नाही.तसेच तो जास्त तपस्याही करीत नाही.जोपर्यंत भक्त भगवानाचे रूप ओळखत नाही, तोपर्यंत त्याची भक्ती पूर्ण नाही.

**भगति न ग्यान जोग बैरागै, भगति न कहै कहावै।**
**भगति न सुनि मण्डल घर सोधै, भगति न कछु दिखायै॥ २॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा), पृ.१२३.

भक्ती ही ज्ञान, योग किंवा वैराग्य नाही.भक्ती म्हणण्याची व म्हणवून घेण्याची चीज नाही.मन हे प्रेम, ध्यान व प्रभुभक्तिच्या महारसाला पिऊन मस्त होते.तेव्हा योगद्वारा जीवात्म्यास मस्तिष्कपर्यंत होणारा अमृतरस पितो.भक्ती ही पाहात नाही व दाखवीतसुद्धा नाही.

**जहाँ जहाँ जाइ तहां बंधन, त्रिविध ताप न जाई।**
**कहै 'रविदास' तवै सचु पावै, आपा उलट समाइ॥ ३॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा), पृ.१२३.

अनुक्रमणिका

आपण जेथे जेथे जाल तेथे तेथे दैविक, ऐहिक व भौतिक ह्या तीन प्रकारच्या तापांचे (त्रासांचे) बंधन सुटणार नाही.रोहिदास म्हणतात की, “ज्याच्याजवळ खरी भक्ती आहे, जो स्वतःला ओळखतो, तोच भगवानाचा खरा भक्त आहे.”

(१६२)

**नही विश्राम लहौ[मिळणे]धरनी धर, जाके सुरनर[ऋषी]संत सरन अभिअंतर[हृदयात]॥टेक॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा), पृ.१२४.

**भावार्थ**— ज्याच्यामध्ये संतसमागम, ऋषिंचे बोलणे नाही, त्यास ह्या पृथ्वीवर विश्राम मिळणार नाही.

**जहां जहां गयो नहां जनम काछै[कमर कसणे],त्रिविध ताप त्रिभुवनपति[ईश्वर]पाछै।**
**भये अति छींन[क्षीण]खेद माया बस, जस तिस ताप गरि[ग्रासणे]हैं ते तस[तसे]॥ १॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा), पृ.१२४.

ईश्वर भक्तिशिवाय कोणत्याही जन्मात आराम मिळणार नाही.जे तीन प्रकारच्या तापाने त्रस्त आहेत, ते रात्रंदिवस मायेमुळे अतिक्षीण होत असतात.

**द्वारे नंद सा बिकट विष कारन, भूली परयौ मन या विषिया वन।**
**कहै ‘रविदास’ सुमिरौं बड राजा[ईश्वर],काढि दियौं जन साहिब लाजा[लाज राखणारा.]॥ ३॥**

—संतगुरु रविदास वाणी (डॉ.शर्मा), पृ.१२४.

ज्याप्रमाणे भगवान कृष्ण पूतनामावशीचे विषपान करीत असता, अमृतासमान सर्व विष प्याले, तरीसुद्धा विषाचा काहीसुद्धा परिणाम झाला नाही.त्याप्रमाणे खऱ्या भक्तावर तीन प्रकारच्या तापांचा परिणाम होत नाही.रोहिदास म्हणतात की, “मी अशा भगवानाची भक्ती करतो की, जो विषाचे अमृत करू शकतो, तोच माझी लाज राखतो.”

(१६३)

**जयौ राम गोब्यंद वीठल वासदेव हरि विश्न, वैकुंठ मधु कैटभारी।**
**क्रिस्न कैसो रिषीकेस[ऋषिकेशी]कंवलाकंत[कमलापती]अहो भगवंत, त्रिविधि संताप हारी॥**
**अहो देव संसार तौ गहर[चाचपडत]गंभीर भीतरि, भ्रमत दिसि बिदिसि[चोहोकडे]दिष्य[दृश्य]कछु व सुझे[सुचणे]॥ठेक॥**
**देव बिकल व्याकुल षेद[पद]प्रणवत प्रेमहित, ग्रसित[ग्रासणे]मति मोहि मारग न सूझे॥**
**देव इहि औसरि[वेळी]कौन सक्या[शक्यता]समान, देव दीन उधरन चरन सरन तेरी।**
**नहीं आन[आणि]गति बिपति कौ हरन और**
**स्त्रीपति[श्रापती]सुनसि सिख संभार[ओझे]प्रभु करहु मेरी॥ १॥**

—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१२४.

अनुक्रमणिका

**भावार्थ**—संत रोहिदास म्हणतात की, "राम, गोविंद, विठ्ठल, वासुदेव, हरि, विष्णू, कृष्ण, केशव, ऋषिकेशी, कमलापती ह्या वैकुंठधारी देवांचा जप करा.यांचा जयजयकार असो.हे सर्व देव भौतिक, दैविक, आधिभौतिक कष्ट (त्रिविध ताप) नाहिसे करणारे आहेत.जे ह्या जगातील अज्ञान अंधकारात चाचपडत आहेत.त्यांना काही सुचत नाही.त्याप्रमाणे हे भगवाना, या प्रसंगी मी आपल्या चरणी आलो आहे.आपणच माझ्या संकटाचा किंवा मोह, मायाजाळाचा फास नष्ट कराल.श्रीपती प्रभू, माझा सांभाळ करा."

**अहो देव कांम केसरि काल भुजंग भामनी**[भामिनी]**भाल, लोभसुकर**[डुक्कर]**क्रोधवखारनु**[वेळोवेळी]**।**
**देव ग्रब**[गर्व]**गैंडा**[गेंडा]**महामोह टटनी**[शरीर]**निकट, बिकट तट निकट बस्त अहंकार आरनु**[नष्ट]**॥**
**देव जल मनोरथ ऊरमी**[लहर]**तरल**[तरंग]**त्रिरनां अपारं, मकर इंद्रि जीव जंत्र मांही।**
**भ्रमत व्याकुल नांथ सत्ति विष्यादिक**[विषयादिक]**पंथ, देव देव विश्रांम नाही॥**
**अहो देध**[देणे]**सवै असंगति मेर मधि**[मति]**फूटा भेर**[नष्ट]**,नाउं नौका बडे भाग पाई।**
**बिन गुर**[गुरू]**करणधीर डौले न लागैं तीर, विषै प्रवाह औगाह**[दुर्गुण.]**जाई॥ २॥**

—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१२४.

हे भगवाना, काम भुजंगाच्या कपाळाप्रमाणे आणि लोभ रानडुकराप्रमाणे आहे व शरीर मायारुपी मोहिनी आहे.तिच्या अहंकारात पडून व्यक्ती सर्व काही नष्ट होती.ह्या शरीररुपी जलतरंगावर इंद्रियेसुद्धा वशिभुत होऊन जातात.व्यक्ती विषय वासनेने व्याकुळ होऊन चोहोकडे फिरत राहाते.म्हणून ईश्वराशिवाय विश्राम (विसावा) मिळत नाही.हे भगवान, माझ्या सर्व कुसंगति नष्ट कर.नाही तर माझी जीवननौका प्रवाहामध्ये बुडून जाईल.गुरुशिवाय ही विषय वासना नष्ट होणे कठीण आहे.

**देव किहिं करौ पुकार कहां जाऊं कासौ**[कसे]**कहौं,**
**का करौ अनुग्रह**[कृपा]**दास की त्रास हारी।**
**इहि**[ह्या]**व्रत मानि अबरु अवलंबन नाहीं, तो बिन त्रिविधि नाइक मुरारी॥**
**अहो देव जेते कहियैं अचेत तूं सरबगि**[सर्वज्ञ]**,मै न जानौं ग्यांन ध्यान तेरौ।**
**देव सति मति सति प्रति सति मनअमल, मन बच क्रमन अरु अवलंबन नही मेरो॥**
**देव कठिण कलि काल जंजाल जुग जमनिका**[यमराज]**,ग्यांन बैराग द्रिढ भगति नांही।**
**मलिन मति 'रविदास' निरबल सेवा अभ्यास, प्रेम बिन सकल संसे**[संशय]**न जाही॥ ३॥**

—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१२४.

हे भगवान, मी कुठें जाऊ?मी कोणाची कृपा मिळवू?आपल्याशिवाय मला कोणाचाही आधार नाही.कारण मला ज्ञान, ध्यान व भक्तिसुद्धा माहित नाही.आपण सर्वज्ञ आहांत.सर्वांना जाणणारे आहांत.मी सद्विचाराने तसेच मनसा, वाचा आणि कर्मणाने आपणांस शरण आलो आहे.ह्या कलियुगाचे मायारुपी जंजाल यमराजा समान आहे.तीमध्ये ज्ञान, वेराग्य आणि भक्ती नाही.दुर्बुद्धीमुळे सेवा, अभ्यास दुबळा आहे.आपल्यामुळेच मायारुपी जंजाळाचा नाश होऊ शकतो.

**ऐसी जिन[नकोस]करी हो माहाराज।**
**दूरी मांही तुम बइठे देखो, बिगरन[विघडत]है यौं काज॥टेक॥**
—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१२५.

**भावार्थ**—एका शुद्राला ठाकूराची (देव) पूजा करण्याचा अधिकार होऊ शकतो?'तर ज्याच्या मांडीवर देवाचे सिंहासन उडून बसेल तोच खरा भक्त!'हा निर्णय पाहाण्यास काशी नरेशाच्या दरबारात खूप गर्दी झाली होती.तेव्हा संत रोहिदास द्वारकाधीश कृष्णाची करुण प्रार्थना करीत म्हणाले, "हे करुणानिधे, असं करू नकोस की, तू द्वारकेस दूर बसून माझी फजिती पाहात राहाणार आणि माझे काम बिघडून जाणार."

**द्रोपत सुता[द्रुपदराजाची मुलगी द्रौपदी]की तुम कूं देखत, खैच लई सब लाज।**
**बरस सहंस दस जुध करायो, जुगल उधारण[उद्धार]राज॥**
**प्रल्हाद भगति कू छिनि[क्षणोक्षणी]छिनि तारो, बोहारि[वारंवार.]सुधारै काज।**
**बाल सखा जल मांहि डुबोये, तार ये बिनि ही जिहाज॥ १॥**
—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१२५.

द्रौपदीची करुण प्रार्थना ऐकून तू तिची लाज वाचविली होतीस.मगरीच्या जबड्यातून गजराजाला वाचविले होते आणि यमलार्जुनाचा उद्धार केला होतास.प्रल्हाद भक्ताचे तर तू क्षणोक्षणी रक्षण केले होतेस आणि आपल्या बालमित्रांना इंद्र प्रकोपापासून वाचविले होतेस.

**उन भगतन कू छिनि तारये, ज्यू तार-ये त्यू साज।**
**काच कथीर पतित हमते हो, ननन[डोळे]देखो आज॥**
**खल हल कासी लंग बहु आये, देखन भगति समाज।**
**बिरद[प्रतिज्ञा]तजो कै बिरद संभारौ, कहै 'रविदास' चमराज॥ २॥**
—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१२५.

प्रभु, मी तर खोटे नाणे-काही कामास येऊ शकत नाही.परंतु आज माझी स्थिती तू आपल्या डोळ्यांनी पाहतोस.काशी नगरीत गडबड, गोंधळ माजला आहे.सर्व लोक मजा पाहण्यासाठी जमलेत, संत रोहिदास म्हणतात की, "माधवा, बघ मी चांभार आहे.तू आपली पतितोद्धाराची प्रतिज्ञा सोडून दिलीस कां?"

(१६५)

**राग सोरठ : तिपदा**

**तेरी चरनी सरनी परऊरामु राजा, बडो उपारी[उपकारी]क्रिपाला क्रिपा निधि[कृपेचा सागर]।**
**सगल[सर्व]संसार के करहि काजा[काम]॥टेक॥**
—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१२५.

**भावार्थ**—संत रोहिदास म्हणतात की, हे भगवान राम, आपण फार उपकारी, कृपाळू आणि कृपेचा सागर आहांत.मी आपल्या चरणी आलो आहे.आपण सर्व जगाचे काम केले आहे.

अनुक्रमणिका

**असूर हरनाकस**[हिरण्यकशिपु]**क्रोध ऐसे किओ, प्रल्हाद मारिवै कौ कियौ साजा**[विचार करणे]**।**
**भगत हेतु आपि**[आपण स्वतः]**हरि प्रगटिओ, होइ निरंकार नरसिंह गाजा**[गर्जना]**॥ १॥**
—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१२५.

**भावार्थ**—राक्षस हिरण्यकश्यपूने रागाने भक्त प्रल्हादास मारण्याचा विचार केला.हिरण्यकश्यपूने खांबास लाथ मारताच भक्ताच्या रक्षणासाठी प्रगट झालेल्या नरसिंहाने हिरण्यकश्यपूस ठार केले.

**करनु दुरजोधनि**[दुर्योधन]**दूसासन कपटु कूं, कैसो उधरि कियौ सब काजा।**
**सभा के बीच अराधिओ द्रोपती, बढ़ौ पट**[वस्त्र]**चीर**[फाडणे]**जग रषि**[रक्षण करणे.]**लाजा॥ २॥**
—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१२५.

कपटी दुर्योधन आणि दुःशासनाने द्रौपदीचे वस्त्रहरण करण्यासाठी अनेक प्रकारचे प्रयत्न केले.परंतु भरसभेत आपणच तिची लाज राखली.आपण पतिताचे उद्धारक आहांत.

**पतित उधारनि निज जन तारना, ऐहु तेरे नाम कौ वाजिवो बाजा।**
**कहि 'रविदास' बिस्वास मनि ऐहि है, सरनि आवै तोरि सोई निवाजा॥ ३॥**
—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१२५.

जे आतले रामनाम घेतात, त्यांचा आपण उद्धार करता.रोहिदास म्हणतात की, "जे श्रद्धेने व विश्वासाने भगवानाचे नामस्मरण करतात, त्यास शरण जातात, भगवान त्या सर्वांची संकटे नाहीशी करतात."

(१६६)

**जाकौ हरि जू आपु**[आपण]**निवाजत**[शहाणे]**,तिहि त्रिविध ताप नही वाधै**[पळणे]**।**
**जम कौ दूत छांडि करि भाजै, सांचा हरि किधु**[कधी]**न अराधै**[पूजा करणे]**॥टेक॥**
—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१२६.

**भावार्थ**—संत रोहिदास म्हणतात की, "जे भगवानाची सेवा करीत राहातात, त्यांचा तिन्ही प्रकारचा ताप नाहीसा होतो.जे मनापासून हरिची खरी सेवा करीत नाही, ते यमदूताच्या तडाख्यातून पळू शकत नाही."

**निसचर जात रिप बंधु बभीषण, अभै देहि सरन मंह राषै**[राखणे]**।**
**कनक कसिपह कुबुध पेषि प्रभ, षम्भ**[खांब]**फारि प्रल्हलादहु राषै॥ १॥**
—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१२६.

लंकेचा राक्षस राजा रावणाचा बंधु बिभिषण हे भगवान रामास शरण गेले, तेव्हा रामाने त्यास अभय दिले.हिरण्यकश्यपूने कुबुद्धिने भक्त प्रल्हादास मारण्याचा प्रयत्न केला.तेव्हा भगवानाने खांबातून नरसिंहाच्या रूपाने प्रगट होऊन प्रल्हादाचे रक्षण केले.

अनुक्रमणिका

**ध्रुव कूं अटलु पद हरि दीन्हौ, भगत सिरोमणि[श्रेष्ठ]नांम धरावै।**
**षट रस भोज सुयोधन त्यागी, दास विदुर कूं मानु बढावै॥ २॥**

—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१२६.

भक्त शिरोमणी ध्रुवास हरिने अढळपद दिले तर राजा दुर्योधनाचे षड्रस पक्वान्न भोजनाचा त्याग करून विदूरा घरची खिचडी खाऊन मान दिला.

**गज कूं फंद छुडायौ छिन[क्षणभरात]महं.,राम नामु इकु बार उचारै।**
**जन रविदास प्रभ सरनाई, उनमनि[मनास समाधि स्थितीमध्ये नेणे.]रह राम उर धारै॥ ३॥**

—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१२६.

मगराने पाणी पिण्यास आलेल्या हत्तीचा पाय पकडला असता, हत्तीने राम नाम घेताच भगवानाने क्षणभरात हत्तीस सोडवून रक्षण केले.रोहिदास म्हणतात की, “मनापासून रामनाम स्मरण केल्यास तसेच प्रभुस शरण गेल्यास, तो त्याच्या साहाय्यास धाऊन येतो.”

(१६७)

**माधौ!तू मम ठाकूर, हौ तुझ सेवगु,**
**जनम जनम तै हौ तुझ सेवानुग॥टेक॥**

—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१२७.

**भावार्थ**—संत रोहिदास म्हणतात की, “हे माधवा, तू माझा देव आहेस आणि मी तुझा जन्मजन्मांतरीचा सेवक आहे.”

**जहां तै रावणुलंकजराई[जाळली],तहां हौ तुझ लछिमन भाई।**
**जहां बिंदबनु[वृंदावन]तै वेनु[पावा मुरली]बजाई, हौ हलधर[नांगरधारी बलराम]होई धैन[गाई]चराई।**

—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१२८.

हे प्रभू, राजा रावणाच्या लंकेचा तू जाळून विध्वंस केलास, तेथे तुझा भाऊ लक्ष्मण तुझ्याबरोबर होता.हे कृष्णा, ज्या वृदांवनामध्ये तूं वेणु वाजवीत गाई चारीत होतास, तेथे तुझा मोठा भाऊ नांगरधारी बलरामही तुझ्याबरोबर होता.

**आदि अंत मधि संग तिहारे[तुझ्याबरोबर],अब काहे करतहु निनारे[अलग, दूर]।**
**कहि रविदास वेगु मिल ठाकुर, निज जन कू लेह उधारि॥ १॥**

—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१२८.

तुझा सेवक जगाच्या आरंभापासून जगाच्या अंतापर्यंत तुझ्याबरोबर राहाणार आहे.तेव्हा तू आता मला सोडून कुठे जातोस?रोहिदास म्हणतात की, “हे देवा, तू वेगाने येऊन मला भेट आणि तुझ्या भक्ताचा उद्धार कर.”

अनुक्रमणिका

(१६८)

**जा पै[ज्याच्यावर]दीना नाथु[गरिबांचा स्वामी भगवान]ढरै ढरै[कृपा होणे]।**
**दीन बंधु करुना मैं स्वामी, औगन[दुर्गुण]चित्त न धरै॥टेक॥**

—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१३०.

**भावार्थ**— संत रोहिदास म्हणतात की, "ज्याच्यावर भगवानाची कृपा झाली.हे स्वामी, आपण दीनांचे नाथ आहांत.आपण दयाळू आहांत.माझ्यामधील दुर्गुणाकडे दुर्लक्ष करा आणि माझ्यावर कृपा करा."

**निसचर फुनि बंधु बभीषण, तिहु[त्याच्या]सिर छत्र धरै।**
**बन बेरि[बोरे]बेरि भषै भीलनी[भिल्लीण]के, कछिमन[लक्ष्मण] पेषि[पाहून]प्रजरे[प्रसन्न होणे.]॥ १॥**

—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१३०.

हे रामा, राक्षसराजा रावणाचा बंधु विभिषणावर आपण छत्र धरले.तसेच नीच जातीच्या भिल्लीणीची उष्टी बोरेही आपण बंधु लक्ष्मणाबरोबर प्रसन्नतेने खाल्ली.

**दरिद सुदामा कियहु आपु सम, नैनन नीर ढरै।**
**कहि रविदास क्रिस्न करना मैं, नामलेत उबरै॥ २॥**

—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१३०.

हे कृष्ण भगवाना, गरीब सुदामाच्या घरची दरिद्री परिस्थिति पाहून आपल्या डोळ्यात अश्रूं आले. तेव्हा त्यास आपल्या समान संपन्न बनविले.रोहिदास म्हणतात की, "हे कृष्णा, आपण दयाळू आहांत.आपले नाम घेताच आपण माझा उद्धार करा."

(१६९)

**राग कल्याण**

**लज्जा[लाज]मोरि[माझी]राखो श्याम हरि।**
**हरि हरि कृपा द्रोपति उचरै, बिलमु[विलंब]न करौ हरि॥टेक॥**

—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१३०.

**भावार्थ**— संत रोहिदास म्हणतात की, "हे श्याम हरि, द्रौपदी वस्त्र हरणाचेवेळी तिने 'हरि' 'हरि' म्हणताच.तिला वस्त्र पुरविण्यात थोडाहि विलंब-उशीर केला नाही.त्याप्रमाणे माझीही लाज-अब्रू आपल्या हातात आहे.माझीही लाज राखा."

**कीनी करनु दुसासन मोसो[माझ्या],गहि[पकडणे]केसन पकरि।**

अनुक्रमणिका

**पापी सभा दुष्ट दुरजोधन**[दुर्योधन]**चाहत**[इच्छा करणे]**नगन करि॥ १॥**

—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१३०.

द्रौपदी कृष्णास म्हणते की, "दुःशासनाने माझ्या डोक्याचे केस पकडले.पापी, दुष्ट दुर्योधन तर भरसभेत मला नग्न करू इच्छित होता."

**ना सुत भ्रांति न मीत कुटंबहि, एको ओट**[सहाय्य]**तुमरि।**
**अरजन**[अर्जुन]**भीम महाबलि जोधे**[योद्धे]**,तिनसों किछु न सरि॥ २॥**

त्यावेळी कोणी मुलगा, मित्र किंवा परिवाराचे कोणीही तुमच्याशिवाय माझ्या मदतीस आले नाही.अर्जुन, भीमासारखे महाबलवान योद्धे असताना माझ्या साहाय्यास कोणीही पुढे सरसावले नाही.

**बसन**[वस्त्र]**प्रवाहित किओ करुणानिधि, तबहि धीर धरि।**
**कहि 'रविदास' सिंह सरनागति, स्याल**[कोल्हा.]**की कहा डरि॥ ३॥**

—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१३०.

रोहिदास म्हणतात की, "आपण द्रौपदीला वस्त्र देऊन तिची इज्जत राखली.तेव्हा तिला धीर आला.ज्याप्रमाणे कोल्हा सिंहाला भिऊन कुठे पळून जाणार?त्याप्रमाणे हे भगवाना.

माझ्यासारख्या भक्तास घाबरून तुम्ही दूर जाऊ शकत नाही."

(१७०)

**का गाऊँ कछु गाई न होई, गाऊ रूप सहजै सोई॥टेक॥**
**नहि अकास नहिं धर धरणी, पवन पुर**[नगर]**घट**[ढगं]**चंदा।**
**नहिं अब राम क्रिस्न गुण भाई, बोलत है सुछं छंदा॥ १॥**

—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१३१.

**भावार्थ**— संत रोहिदास म्हणतात की, "हे भगवान, मी काय गाऊ?गाण्याचे रूप सहज-सोपे आहे.राम कृष्णाचे गुण आकाश, पृथ्वी, हवा, ढग व चंद्र यामध्ये नाही.तसेच ते छंदातही नाही." एवढेच नव्हें तर अन्य कोणत्याही वस्तुमध्ये नाही."

**नहिं अब बेद कतेब**[कुराण]**तुराननि, सुनि सहज रे भाई।**
**नहिं अब मैं, तैं, मैं तैं नाही, का स्यौं**[तेव्हा]**कहौं बताई॥ २॥**

—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१३१.

अरे भाऊ, भगवानाचे नाम वेद, कुराण व पुराण यामध्ये नाही.हे सहज शांतपणे ऐका.आता मी नाही की तू नाही!भगवान कशा कशामध्ये दाखवू?

अनुक्रमणिका

**भणै**[म्हणतात]**'रविदास' का कहि गाऊँ, गाईण गाइ हरांणा**[हैराण]**।**
**समुझि**[समजून]**बिचारि बोलि कहां धौं, आपहि आप समांणा॥ ३॥**

—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१३१.

रोहिदास म्हणतात की, "गाऊन गाऊन मी काय आणि किती गाऊ?मी गाणे गाऊन हैराण झालो आहे.भगवान सर्वांत आहे हे समजून घ्या.तो आपल्या सर्वांना समान समजतो.मग कोणी निंदा करो किंवा प्रशंसा करो.आपण सर्व समान आहोत."

(१७१)

**अब का कहि कौन बताऊं।**
**अब का कहि देवलि**[देऊळ, मंदिर]**देव समाऊं॥टेक॥**

—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१३१.

**भावार्थ**—संत रोहिदास म्हणतात की, "आता मी आपणांला कुठं कोण दाखवू?आता मी कोणत्या देऊळात देवाला ठेवू?"

**का स्यौ राम कहौं सुनि भाई, का स्यौं क्रिस्न करीमां**[भगवान]**।**
**का स्यौं बेद कतेब कहूं अब, का स्यौं**[तेव्हा.]**कहूं ल्यो लीना॥**

—संतगुरु रविदासवाणी (डॉ.शर्मा), पृ.१३१.

'अरे भाऊ, भगवानाला 'राम' म्हणा किंवा 'कृष्ण' म्हणा, किंवा त्यास 'करिम' म्हणा, आता मी कोणता वेद-कुराण म्हणू?कोणाचे नाव घेऊ?

**का स्यौं तप तीरथ ब्रत पूजा, का स्यौं नाऊं कहाऊं॥ १॥**
**का स्यौं भिस्ति**[स्वर्ग]**दोजिगु**[नरक]**नर सति करि, का स्यौं कहू कहाई॥ २॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३१.

कशामध्ये प्रेम लावू?तीर्थ, व्रत, पूजा कुंठ आहे?काय सांगू?स्वर्गात जाऊ की नरकात?आपणच सांगा.

**का स्यौं जीव सीव कहौं माधौ, सूंनि सहजि धरि भाई।**
**का स्यौं गुंणी न गुंण कहू माधो का स्यौं कहू बताई॥ ३॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३१.

माधवा, जीवा-शीवाला मी काय म्हणू?अरे भाऊ, सहजासहजी ऐक.कोणत्या गुणवंताचे मी गुण गाऊ?मी कोणाला दाखवू?

**जल के तरंग जल मांहि समाई, कहि का कौ नाव धरियै।**

अनुक्रमणिका

**ऐसे तैं मैं येक-रुप है माधौ, आपण ही निरवरियै[निवडावे]॥ ४॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३१.

पाण्याच्या लाटा पाण्यातच मिळतात तर कोणाचे नाव धरणार?हे माधवा, अशा प्रकारे तुझं माझं एकरूप आहे.आपणच दाखवा.

**भणै 'रविदास' अब का कहि गाऊं, जउ कोई और हि होई।**
**जा स्यौं गाइहि गाइ कहत है, परम रुप हम सोई[आपणही.]॥ ५॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३१.

रोहिदास म्हणतात, की, "आता मी काय सांगून गाऊ?जे काही आहे ते आपणच आहे.तर कधी दुसरेच होते.आता मी गंभीरपणे सांगतो की, आपले परमरूप आहे.तेच सर्व काही आहे."

(१७२)

**संतो भगति न होइ रे, भगति न होइ।**
**जब लग तन मन सुध न जोइ॥टेक॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३१.

**भावार्थ**– संत रोहिदास म्हणतात की, "जोपर्यंत तन आणि मन एकाग्र होत नाही, तोपर्यंत भक्ती झाली नाही व होणार नाही.

**भगति न होइ नाचैं अरु गायैं, भगति न होइ बहु गुण कान्हैं।**
**भगति नहि स्वामी अरु सेवग, जब लग परम तत[तत्त्व]नहिं चीन्है[ओळखणे]॥ १॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३१.

भक्ती, नाचणे आणि गाण्याने होत नाही किंवा गुणगान करण्यानेही होत नाही.भक्ती जी आहे ती स्वामीकडून होत नाही किंवा भक्ती सेवकाकडूनही होत नाही.

**भगति न ग्यांन[ज्ञान]जोग[योग]बैरागे, भगति न कहै कहाऐ।**
**भगति न सूनि मंडल घर सोधे[शोधणे],भगति न कछु दिखाएं॥ २॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३१.

भक्ति जी आहे ती ज्ञान, योग आणि वैराग्यालाही म्हणत नाहीत.भक्ती जी आहे ती आकाश पृथ्वीवर कुठेहि सहज शोधा, ऐका आणि ऐकवा.भक्ती काही दिसणार नाही.

**जहां जहां जीव आप बंधावै, ता थै कछु कहयां न जाई।**
**कहै रविदास तबे सचु[खरे]पावै। आपा उलटि समाई॥ ३॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३१.

अनुक्रमणिका

जेथे जेथे आपला जीव आहे, तेथेही काही सांगितले जात नाही.रोहिदास म्हणतात की, “जेव्हा आपण त्यामध्ये मिळून मिसळून एक होऊन जाऊ, तेव्हाच ती खरी भक्ती होय.”

(१७३)

**संतो कुल पषी भगति द्वैसी कलिजुग मैं, निपष**[कोणी तरी]**विरला**[विरळा]**निव है सी**[निवविणे, पूर्ण करणे] **।**
**जांणि पिछाणि**[ओळखणे]**हरषि मन हुलस्यौ**[उल्हासीत होणे]**,बिन पिछांणि मिलतां मुरझासी**[कोमेजणे]**॥ १॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३२.

**भावार्थ**— रोहिदास म्हणतात की, “संतांनो, कलियुगात सर्वजण भक्ती करतात.परंतु कोणी तरी एकादा विरळाच भक्ती पूर्ण करतो.जे भगवानाला ओळखतात, ते मनामध्ये प्रसन्न होतात.परंतु जे ओळखत नाहीत, ते निराश होतात.”

**अप स्वारथ परमोधि दध्यादे**[देणे]**,परमारथ न दिढासी।**
**बिन विसतास बांझ**[बांझ]**सति जइसै, हरि कारनि क्यों रासी**[रास करणे, नाचणे.]**॥ २॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३२.

लोक आपल्या स्वार्थासाठी भक्ती करतात परंतु त्यामध्ये परमार्थ नाही.मूल न होणारी अविश्वासू बांझ स्त्री सतीप्रमाणे भगवान प्राप्त करण्यासाठी निरनिराळ्या प्रकारचे रास करीत नाचते.

**भाव भवति हिरदै नहि आसी, विषय लागी सुख पासी।**
**कहिं रविदास पूरा गुर पावै, स्वांग कौ स्वांग दुषासी**[दुःखाचे कारण]**॥ ३॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३२.

ज्या व्यक्तिच्या हृदयात भाव नाही, ती सूखासाठी विषयवासनेच्यामागे लागते.रोहिदास म्हणतात की, “भक्तिचे सोंग करणे हेच दुःखाचे कारण आहे.म्हणून खरी भक्ती करण्यासाठी भगवानास ओळखण्यासाठी गुरुस पूर्ण प्रसन्न करून घेतले पाहिजे.”

(१७४)

**आगे मंदा**[मन]**है रह्या, परकिरति**[प्रकृती, स्वभाव]**न जाई।**
**कुकर**[कुत्रा]**चौकी चहौडियै**[बसून]**,फिरि बहुसु**[वादविवाद]**भाई॥टेक॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३२.

**भावार्थ**— संत रोहीदास म्हणतात की, “आपले मन किती तरी पुढे जाते आणि विसरूनही जाते.परंतु आपला स्वभाव नेहमीच लक्षात राहातो.कुत्रा दरवाजासमोर बसून न भुंकता (वादविवाद न करता) प्रामाणिकपणे पाहारा करतो.”

अनुक्रमणिका

**सुरसरि**[सरस्वति नदी]**मै सुरा**[दारु]**परयौ**[पडली]**,को करै न विचार।**
**राम नाम हिरदै बसै, सब सुख निधि सार॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३२.

सरस्वति नदीमध्ये दारु पडली तर कोणी विचार करीत नाही.परंतु ज्यांचे हृदयात रामनाम राहिले आहे, त्यास सर्व सुख प्राप्त होते.

**कहै 'रविदास' सुनि केसवे, अंतहकरन विचार।**
**तुम्हरी भगति के कारने, फिरी है हौ चमार**[चांभार.]**॥ १॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३२.

रोहीदास म्हणतात की, "हे भगवान, माझ्या मनातील विचार ऐक, तुझी भक्ती करण्यासाठी मला पुन्हा चांभाराचेच घरी जन्म दे."

(१७५)

**राग धनाश्री, बिड़दा**

**अहो देव तेरो अमित**[अनंत]**महिमा, महादेव!।**
**माया मन जोवन**[जवानी, यौवन]**दहना कलिप**[पाप]**कलिरातम।**
**सकल संसै**[जग]**समान, नृवाण**[निर्वाण, मोक्ष]**पद भुवन, नाम बिघनो अद्य**[पाप]**पवनपात्**[वारा]
**अहो देव गुरु गौतम वामदेव विस्वामित्र व्यास,**
**जमदग्नि सिंगिरिसि**[शृंगऋषी]**द्रवासा**[दुर्वास]**मारकंडै वाल्मीक भिंग्री अंगिराह,**
**कपिल बगदालिस सुखमति मनसा अस्टावक्र,**
**गुर गजानन नानि अगस्ति पुलस्ति पारासर सिव विधाता।**
**जड भरथ सुभ रिषि च्यिवनि बसिस्ट**
**जिहनि जागिबलिक कितै वै ध्यान राता॥ १॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३३.

**भावार्थ**— संत रोहिदास म्हणतात की, "हे महादेवा, तुझी महिमा अनंत, अपार आहे.माया, मन, व जवानी (यौवन) ज्या व्यक्तिकडे आहे ती काळ रात्री प्रमाणे पापी आहे.तुझे नाम घेण्याने सर्व जग विघ्नमुक्त व पापमुक्त होते.हे देवा भगवाना, गुरू गौतम, वामदेव, विश्वामित्र, व्यास, जमदग्नि, शृंगऋषी, दुर्वास, मार्केडेय, वाल्मिक, भृंग, अंगिराह, कपिल, वगदालिम, सुखमति, मनसा, अष्टवक्र, गुरु गजानन, अगस्ति, पुलस्ति, पराशर, शिवशंकर, ब्रह्मदेव, जडभरत, सुभऋषि, च्यिवनी, वशिष्ट इत्यादी ऋषी तुझे ध्यान करण्यामुळे जग प्रसिद्ध झाले आहेत."

**अहो देव ध्रुव अंबरीष प्रल्हाद नारद,**
**विदुर द्रुवण अक्रूर पंडव सुदामा भीसम उधव।**
**बभीषण चंन्द्रहासि बलि कलि भगति जगती,**

अनुक्रमणिका

**जै देव नाम कबीर गरड हणवंत**[हनुमंत]**ग्रिसुता**[सुग्रिव] **।**
**आत्म साजा जै विजै द्रौपदी स्त्री प्रचेता**[परिचित]**,**
**रूकमांगद अंगद बसदेव देवकी अवर अगिवत**[अगणित.]**कहु भगत केता॥ २॥**
—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३४.

अहो देवा, ध्रुव, अंबरिष, प्रल्हाद, नारद, विदुर, द्रोण, अक्रूर, पांडव, सुदामा, भीष्म, उद्धव (कृष्ण), बिभिषण, चंद्रहासि, बलि यांची भक्ती कलियुगातही चालते.जगदेव, नाम कबीर, गरूड, हनुमंत, सुग्रीव हे सर्व देव झाले व द्रौपदी ह्या परिचित प्रसिद्ध अशा स्त्रीमुळे महाभारत रचले गेले.रूक्मानंद, अंगद, वसुदेव, देवकी आणि अगणित कितीतरी भक्त झाले.

**अहो देव!सब सनकादि सुरति भागवत, भरथ सतव्रत अणुव्रत गुण गावत।**
**तू अकल**[न कळणारे]**अ प्रच्छन्न व्यापक, ब्रहमैक रस सुध चेतनि पूर्णमानेवं।**
**तू स्त्रगुण**[सगुण]**निगुण**[निर्गुण]**निरामयी त्रिविकार। हरि अंजन निरंजन विमल अप्रयेवं**[अप्रेम] **।**
**तू प्रमात्मा परकिरती अविगति**[अगम्य ब्रह्म]**,सुचिदानन्द गुण ग्यान गेहं**[गाईन]**॥ ३॥**
—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३४.

अहो देवा, सनकादि सुरति भागवत, भरत, सत्य व्रत, अनुव्रत हे सर्व भगवानाचे गुण गातात.तू अकल व्यापक आहेत.तू ब्रह्म आहेस.तू चैतन्यपूर्ण मानव आहेस.तू सगुण व निर्गुण आहेस.तू निरामय व त्रिविकारी आहेस.हे हरि, तू अंजन व निरंजन आहेस.तू पवित्र व प्रेमात बांधून न घेणारा आहेस.तू परमात्मा, प्रकृतिस्वभाव, अगम्य ब्रह्म असे सर्व काही आहेस.तू सच्चिदानंद व ज्ञानसमृद्ध गुणवान आहेस.

**अहो देव,!पवन पावक अवनि जलधि जलधारा,**
**तू रण काल जम म्रिति गेहं, ग्रह व्याधि बाधा।**
**गज भुजंग भूपाल ससि सक्रा दिकपालं,**
**आज्ञा अनन्त न मुचिते भ्रजादा।**
**अभय वर प्रतंग्या**[प्रतिज्ञा]**,दुष्ट तारण**[तारणारा]**चरण सरणांह तेरे,**
**दास ‘रविदास’ यहु काल व्याकुल भयौ,**
**त्राहि त्राहि गुरु रामा आलंबन मोरे॥ ४॥**
—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३४.

अहो देवा, तू हवा, अग्नि, पृथ्वी, पाणी आणि जलधारा आहेस.तू लढाईचेवेळी संकट निवारण करणारा आहेस.तू हत्ती, भुजंग व पृथ्वीचे पालन करणारा आहेस.तू चंद्र व सर्वांचे रक्षण करणारा आहेस.तू आज्ञा देणारा, अनंत, मोक्ष देणारा व संकटातून तारणारा आहेस.तू अभय आहेस.तू आशिर्वाद देणारा व प्रतिज्ञा पूर्ण करणारा आहेस.तू दुष्टांचा संहार करणारा तसेच चरणी शरण आलेल्यास तारणाराही आहेस.रोहिदास म्हणतात की, “हे भगवान, हे सर्व जग जेव्हा व्याकुळ होते.त्राहि त्राहि भगवान होते.तेव्हा गुरु रामा, तू माझे व सर्वांचेही संरक्षण करतोस.”

**सोई**[तुम्हीच]**उबरो**[उद्धार करणे]**जिहिं आपु**[आपण]**निबाजत**[उद्धार करणे]**॥टेक॥**
**बारक**[लहान]**ध्रुव कूं अंक**[मांडी]**राखि हरि, षंभ**[खांब]**फारि**[फोडणे]**प्रल्हाद उबारत**[उद्धार करणे.]**॥ १॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३४.

**भावार्थ**— संत रोहिदास म्हणतात की, "हे भगवान, आपण ज्यांचा उद्धार करू इच्छिता;त्यांचा उद्धार होतोच.बारक्या ध्रुवास मांडीवर घेऊन आपण त्याचे रक्षण केले.तसेच फोडलेल्या खांबातून नरसिंह प्रगट करून आपण भक्त प्रल्हादाचा उद्धार केला."

**त्रास दई लंकेश अनुज**[छोटा भाऊ]**कहं, सरनि राषि प्रभ अभय उचारत।**
**षटरस तजिअ सुजोधन**[दुर्योधन]**के हरि, दास विदुरकौ मान बढावत॥ २॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३४.

लंकेचा राजा रावण हा आपल्या छोट्या भावास बिभिषणाला त्रास देऊ लागला.तेव्हा शरण आलेल्या बिभिषणाला आपण अभय दिले व आपण त्याचा उद्धार केला.हे हरि, दुर्योधनाचे षटरस पक्वान्नाचे ताट सोडून गरीब भक्त विदुराचे घरी प्रेमाने खिचडी खाल्ली व आपण त्याचा मान वाढविला.

**सबरी गीध**[गिधाड]**अजामिल सदना, राम क्रिपा गनका**[वेश्या]**तरि**[तारणे]**जवात।**
**कवन कवन पापी जन तरिओ, कहि रविदास गणइ**[गणती]**नहिं आवत॥ ३॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३५.

शबरी भिल्लीण, जटायु गीधड, अजामील, सदना कसाई, यांचेसह गणका वेश्येचाही रामकृपेने उद्धार केला.रोहिदास म्हणतात की, "हे हरि, आपण किती तरी पापी लोकांचा उद्धार केला, त्यांची गणतीच करता येत नाही."

(१७७)

**सत रज तम माया धनी, चेतन कौ प्रतिभास।**
**करता हरता जगत कौ, भजे ताहि**[त्याला]**रविदास॥ १॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३५.

**भावार्थ**— आत्मा परमात्म्याचा अंशांशी भाव आहे.ह्या पंचभौतिक देहात अपंचभौतिक (सत, रज, तम) पासून निर्मिलेला सूक्ष्म जीवात्मा त्या सत्तेचा एक अंश आहे.उदा : सूत व सूतापासून निर्माण होणारे वस्त्र, तसेच सोने व सोन्यापासून बनणारे अलंकार-दागिने, जगाचा कर्ता हर्ता जो परमेश्वर त्याचे संत रोहिदास भजन करतात.

**तत पददीन दयाल है, कहियनु विसव**[विश्व]**निवासु।**
**जासां आतम प्रगास**[प्रकाश]**है, भजै ताहि रविदास॥ २॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३५.

अनुक्रमणिका

संत रोहीदास म्हणतात की, “हे भगवान, सत्य (आकाश), कण (पृथ्वी), अहंकार, माया धनवान या सर्वांस आपण जाणता.हा सर्व चैतन्याचा आभास आहे.आपणच या सर्वांचे कर्ते धरते आहांत.मी या सर्वाचे भजन करतो.

**नेति**[नित्य]**नेति नित कहत हैं, स्त्रुति सुभरिती तासू**[तो]**।**
**संसा**[जग]**सिगरेउ**[नाहीशी करणे]**छांडि करि, भजै ताहि**[त्या.]**रविदास॥ ३॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३५.

ह्या जगात जे निवास करतात.ह्या सर्वांची काळजी आपणच करीत असता.त्यांच्या आत्म्यामध्ये आपण आहांत.त्यांची मी भक्ती करतो.मी नेहमी आपले स्मरण करतो.या जगातील सर्व काही सोडून मी आपले भजन करतो.

**जगु आपा समुझइ नहि, मिथ्या मंदे निदिधियास।**
**जह किरपा आपा**[दुःख, संकटे]**मिटयौ**[नाहीशी करणे]**भजै नाहि रविदास॥ ४॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.१३५.

आपण सर्व जगाला समजावीत आहांत.परंतु ज्याला असत्त्याचा रात्रंदिवस ध्यास लागला आहे.त्याला हे समजत नाही.आपल्या कृपेने दुःख, संकटे इत्यादी नाहीशी होतात.मी आपले भजन करतो.

(१७८)

**राग मल्हार**

**हरि जपत तेउ जनां पदम कंवलास पति, तास**[त्या]**समतुलि**[समान]**नही आनकोऊ।**
**एक ही एक अनेक होई बिसरिओ**[विसरणे]**आन रे, आन भरपूरि सोऊ॥ १॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.११७.

**भावार्थ**— संत रोहिदास म्हणतात की, “जे हरिला जपतात, ते कैलासपतीस प्राप्त करतात.त्यांच्याबरोबरचा-समान दुसरा कोणीही नाही.एकापासून अनेक होतात.ते परिपक्व होतात हे विसरू नका.”

**जाके भागवतु लेखीऐ**[लिहिणे]**अवरु नहीं पेखीऐ**[पाहाणे]**,तास की जाति आछोप छीपा**[लपणे]**॥रहाउ॥**
**बिआस**[व्यास]**महि लेखीए सनक महि पीखऐ, नाम की नामना**[प्रसिद्धी]**सपत दीपा॥ २॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.११७.

जो भागवत लिहितो, ते दुसरे काही पाहात नाही.त्याची जात ही लपविली जात नाही.मग तो कोणत्याही जातीचा असो.महर्षि व्यास व सनकाना पाहा.ते नामाचे नाम घेण्यामुळे दीप-दिव्याप्रमाणे प्रकाशमान सुप्रसिद्ध झाले.

**जाकै इदि बकरीदि कुल गऊरे**[गाय]**वधु**[वध]**करहिं, मानीअहि सेख सहीद पीरा।**
**जाकै बाप वैसी करी पूत ऐसी सरी, लिहुरे**[तीन]**लोक परसिध कबीरा॥ ३॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.११७.

जो इद, बकरी इद, सेख, सहीद, पीर हे गाईचा वध करुन साजरे करतात.बापाने चांगल्या वाईट केलेल्या कर्माचे फळ मुलास मिळते.बापाने चांगले कर्म केले असल्यास त्याचे फळ तो स्वतःही प्राप्त करू शकतो.असे तिन्ही लोकांत प्रसिद्ध असलेले भक्त कबीर म्हणतात.

**जाकै कुटुंब के ढेढ सभ ढौर**[गुरेढोरे]**ढोवंत**[वाहात]**फिरहि, अजहु बनारसी आस पासा।**
**आचार सहित विप्र**[ब्राह्मण]**कर हि डंडउति**[नमस्कार, दंडवत.]**,तिन तने रविदासानुदासा॥ ४॥**

—संतगुरु रविदास-वाणी (डॉ.शर्मा), पृ.११७.

रोहिदास म्हणतात की, बनारसचे आसपास ज्यांच्या कुटुंबातील लोक मेलेली गुरेढोरे ओढून दूर फेंकून देतात.अशा रोहिदासास ब्राह्मणसुद्धा मोठ्या आदराने दंडवत-नमस्कार घालतात.

अनुक्रमणिका

# २.ज्ञान-गोष्टी (पद्यमय)

(१७९)

**प्रिथम**[प्रथम]**हि सिमर**[स्मरण]**"रं राम भरतार",जिह क्रिपा जिव**[जीवात्मा]**उतरहि पार।**
**पूरन ब्रह्म सदा सुख रासीं, अमल**[निर्मळ, दिव्य]**अकल दिव ज्योति प्रकासी॥ १॥**
—संतगुरु रविदास की भक्ति साधना (डॉ.शर्मा), पृ.८३.

**भावार्थ**— संत रोहिदास म्हणतात की, "मी प्रथम रामाचे स्मरण करतो.कारण त्याच्या कृपेनेच सर्व लोक जगतात.त्याच्या कृपेनेच सर्वांचा उद्धार होतो.पूर्णब्रह्म नेहमी सुख देते.तसेच ते निर्मळ बुद्धिरूपी ज्योतिचा प्रकाश करते.

**कलिमल**[काळामळ, पापी]**हरण सुरसरि**[सरस्वती नदी]**सम जोइ, सगुन**[साकार]**निगुन**[निराकार]**सरनागत सोइ।**
**राम जपत मुकत भये अधमारी**[पाप नाशक]**कहइ ग्यान त्रिवेद**[तीन वेद]**विचारी॥ २॥**
—संतगुरु रविदास की भक्ति साधना (डॉ.शर्मा), पृ.८३.

जे कलियुगात सरस्वतिसमान आहेत.जो साकार व निराकार आहे.त्या भगवानास सर्वजण शरण जातात.रामाचा जप करता करता मोक्ष मार्गावर पोहचता येते.तीन वेदांचा (ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद) विचार करून ज्ञान प्राप्त केले आहे.

**संत समाज अतिसै बड़भागी**[मोठा भाग्यवान]**,नाम भगति चरचा नित**[नित्य]**लागी।**
**सहस भानु सम तिह जग ओभा**[चमक, दिव्य प्रकाश]**,जिह क्रिपा जग भगतनि सोभा॥ ३॥**
—संत रविदास की भक्ति साधना (डॉ.शर्मा), पृ.८३.

संताचा समाज मोठा भाग्यवान आहे.तो नेहमी भगवानाच्या भक्तिमध्ये राहातो.तसेच भगवानाचे स्मरण करीत असतो.ज्याच्या भक्तिमध्ये स्वर्ग, मृत्यु, पाताळ हे तीन लोक सूर्याप्रमाणे प्रकाशमान आहेत, तसेच ज्याच्या कृपेने जगात भक्तांची शोभा व कीर्ती वाढते.

**गुरु मोही**[मला]**दीनी ग्यान कर मूठी**[ज्ञानाची मूठ, भंडार]**,रहेउ अचेत समुझि नही सूठी**[सुष्ट, ठीक]**।**
**ग्यानु ध्यानु प्रभु चरनन पूजा, लषौ रुप धरम नहीं दूजा**[दुसरा]**॥ ४॥**
—संतगुरु रविदास की भक्ति साधना (डॉ.शर्मा), पृ.८३.

गुरुने मला मूठभर ज्ञानभंडार दिले, परंतु मी ते ठीक समजू शकलो नाही.हे भगवान, ज्ञानी व ध्यानी हे आपल्या चरणाची पूजा करतात.याशिवाय त्यांना दुसरा धर्म नाही.

**ग्यानह भगति इक रस जानहू, अंतर आतम राम पिछा नहुं।**

अनुक्रमणिका

**ग्यान रुप जग रह्यो समाइ, बरनत[वर्णन]हू किछु फुनि रहि जाइ॥ ५॥**

—संत रविदास की भक्ति साधना (डॉ.शर्मा), पृ.८३.

ज्ञानी व ध्यानी लोक हे भगवानाचे आत्मस्वरूप ओळखतात.याचे काही वर्णन राहून जाते.

**तेहि मरमु गुरु द्रिष्टि पिंछाना, जौ हरि किरति भनत[म्हणत]निदाना।**
**उपजत ग्यांन संतन करि संगा, हरि कीरतन प्रभु कथा प्रसंगा॥ ६॥**

—संत रविदास की भक्ति साधना (डॉ.शर्मा), पृ.८३.

जे हरिचे भजन करतात, तेच गुरुचा दृष्टिकोन मार्मिकपणे ओळखू शकतात.संतांची संगत केल्याने, प्रभुचे कथा-कीर्तन केल्याने अज्ञान नाहीसे होते व सहजपणे ज्ञापप्राप्ती होऊ शकते.तसेच ज्ञानभंडारही वाढते.

**नहि अग्यान[अज्ञान]रहइ ढिग ताके, चरन कमल हिय रहि हरी जा के।**
**जिस मन ग्यानु जोति परगासी, का मथुरा का से वै कासी॥ ७॥**

—संत रविदास की भक्ति साधना (डॉ.शर्मा), पृ.८३.

हरिची भक्ती उपासना केल्याने अज्ञान नाहिसे होऊन ज्ञानभंडार वाढते.ज्यांचे मनात ज्ञानज्योत जळत राहिली त्यास मथुरा व काशी समान आहे.

**ग्यानह कारनि रिपु[शत्रू (पाच मनोविकार)]बिलमाइ[भ्रम],कलिमल नसइ विमल बुधि पाइ।**
**धरम सुकरम सोभा अधिकाइ, ग्यान मूल कछु अवर न भाइ॥ ८॥**

—संत रविदास की भक्ति साधना (डॉ.शर्मा), पृ.८३.

ज्ञानामुळे शत्रू शरण येतो व पवित्र बुद्धी प्राप्त होताच मनाचा काळेपणा, क्लेश, दुःख नाहीसे होते.धर्माचे चांगले कार्य, शोभा जेवढी अधिक आहे याचे ज्ञान, हे मूळतत्त्व आहे.दुसरे काही नाही.

**दैहिक दैविक भौतिक तापा, अति अग्यान रहेऊ जग बापा[व्याप्त]।**
**प्रभु चरनां चित थिरेइ[स्थिर]न तौ लौ, रहइ अग्यानु हिरदै मंहि जौ लौ॥ ९॥**

—संत रविदास की भक्ति साधना (डॉ.शर्मा), पृ.८३.

शारीरिक, दैविक आणि भौतिक (निर्माण केलेले) ताप-त्रास, दुःख हे सर्व अज्ञानामुळे जगात पसरले आहे.जोपर्यंत आपण प्रभुचरणी चित्त लावणार नाही, तोपर्यंत अज्ञान मनात भरून राहणार.

**निज अरमानु[इच्छा]संपति बहु जोरी, अंत समै संग जाइ न कौरी।**
**ग्यान हेत बामन[वामन अवतार]वपु धारी, कीन्ही तीनि हंठ प्रथिमि सारी॥ १०॥**

—संत रविदास की भक्ति साधना (डॉ.शर्मा), पृ.८३.

अनुक्रमणिका

आपल्या इच्छेनुसार जेवढी संपत्ती, धन दौलत मिळवली ती अंतसमयी आपल्या बरोबर येत नाही.जेथल्यातेथेच राहाते.प्रभुने ज्ञानासाठी वामन अवतार धारण केला.त्यांने तिन्ही लोक (स्वर्ग, मृत्यु, पाताळ) व्यापले.

**हरयौ हंकार भगति जिसु थापी**[ठेव]**,भयौ सुजसु पताल**[पाताळ.]**प्रताप।**
**ग्यान परताप तरै सभ संता, वरनत शेष अनादि अनंता॥ ११॥**

—संत रविदास की भक्ति साधना (डॉ.शर्मा), पृ.८३.

ज्यांचे मनी भक्तिचा अहंकार आला.परंतु ज्ञानामुळे पाताळात यश मिळविले.ज्ञान हे अनादिकालापासून आले आहे.संत हे तुझ्या भक्तिने तरले.त्यांचा उद्धार झाला.

**सुवरन होत कुवरन**[गंज लागलेले लोखंड, अज्ञानी, मुर्ख]**कुधातु, पारस परस सुगिआन सुधातु**[गुरु ज्ञानरुपी परीसस्पर्शाने मूर्ख सोन्याप्रमाणे चमकतात.]**।**
**ग्यान जोति जग मांहि परगासी, संतन हेत सरब सुखरासी॥ १२॥**

—संत रविदास की भक्ति साधना (डॉ.शर्मा), पृ.८४.

अज्ञानी मूर्ख लोकास गुरु ज्ञानरुपी परिसाचा स्पर्श झाल्यास, तेसुद्धा सोन्याप्रमाणे चमकतात.संतानी ज्ञानज्योत प्राप्त केल्यास जगात नावलौकीक वाढण्याच्या दृष्टीने सर्व सुख आहे.

**सरग नरक अकास पाताला, कुरम मच्छ नरसिंग कराला।**
**विस्नु विरंचि**[ब्रह्मदेव]**राम भगवाना, ग्यान रुप प्रगटै जग नाना॥ १३॥**

—संत रविदास की भक्ति साधना (डॉ.शर्मा), पृ.८४.

स्वर्ग, नरक, आकाश, पाताळ, कासव, मासा, नरसिंह, कराला, विष्णू, ब्रह्मदेव, राम भगवान हे ज्ञानाचे अवतार जगात प्रगट झाले.

**थावर जगम जल नभवासी, जोगी जती विरती उदासी।**
**सबै ग्यान करि रुप अनेका, समुझहि सुबुध सुग्यान बमैका॥ १४॥**

—संत रविदास की भक्ति साधना (डॉ.शर्मा), पृ.८४.

स्थावर (स्थिर), जंगम (हालचाल करणारे), जल (पाण्यातील जीवजंतु), आकाशांत भ्रमण करणारे पक्षी, योगी, संन्यासी इत्यादी सर्व जाणतात की, सर्व लोक ज्ञानाचा निरनिराळा विचार करतात.

**उदै अस्त स्रिष्टि कर लेखा, जीव जोनि मंह भ्रमहिं अनेका।**
**तम हऊ**[अहंकार]**धसै न चित उह नीका, प्रतिपल ग्रसै न तिह रुप बमैका**[विवेक]**॥ १५॥**

—संत रविदास की भक्ति साधना (डॉ.शर्मा), पृ.८३.

अनुक्रमणिका

उदय, अस्त होणे हा सृष्टीचा नियम आहे.जीव, प्राणी हे अनेक योनींमध्ये भ्रमण करतात.हे अहंकारी लोकांच्या मनात येत नाही.ज्याप्रमाणे चंद्राला हळूहळू ग्रहण लागते.त्याप्रमाणे अज्ञान लोकांना हे कळतही नाही.

**करि कुपंथ मत रचहि अनेका, संकट उपजत एक तै एका।**
**नहिं समुझत निज बुधि अग्याना, एहु विदित सब जग वेद पुराना॥ १६॥**

—संत रविदास की भक्ति साधना (डॉ.शर्मा), पृ.८४.

अयोग्य, चुकीचे काम केल्यामुळे संकट निर्माण होते किंवा कष्ट करावे लागतात.हे प्राचीन वेदातील ज्ञान सर्व जग जाणते.पण अज्ञान लोक आपल्या अज्ञानामुळे समजू शकत नाहीत.

**जल थल**[जमीन.]**जीव चराचर जेते, राम रुप मानियहिं सब ते ते।**
**ग्यान रुप बिआपत जग मांहि, आतम राम समुझहि घट मांहि॥ १७॥**

—संत रविदास की भक्ति साधना (डॉ.शर्मा), पृ.८३.

पाण्यातील व जमिनीवरील सर्व प्राणिमात्र रामरूप मानले पाहिजेत.कारण त्यांच्यात आत्माराम असतो हे समजले पाहिजे.हे ज्ञान सर्व जगात व्यापले जात आहे.

**पर पीडा अति अधम वषानी**[देतात]**,परंहित सरिस धरम नहीं आनि।**
**पर निंदा सम नही अधमाइ, कहिं रैदास मुनि सब गाई॥ १८॥**

—संत रविदास की भक्ति साधना (डॉ.शर्मा), पृ.८४.

जे दुसऱ्यांना दुःख, त्रास देतात.त्यांचे मनात परहित करण्याचे ज्ञान नाही.दुसऱ्यांची निंदा करण्यासारखा दुसरा अधर्म नाही.हे सर्व मुनी, ऋषी व रोहिदास ही सांगतात.

**बाढ़ई**[अनेक योनी फिरून पुण्य कर्म केल्याने दुर्लभ मानव जन्म मिळतो.]**पुनं मिलइ नर देहा, करि लैं मुरिख राम सनेहा।**
**राम भगति संतन करि संगा, रेदास तरै निरमल मन गंगा॥ १९॥**

—संत रविदास की भक्ति साधना (डॉ.शर्मा), पृ.८४.

अनेक योनींत जन्म घेऊन, नंतर पुण्य केल्याने, दुर्लभ मानव जन्म प्राप्त होतो.यासाठी भगवानास शरण गेले पाहिजे.रामभक्ती करणाऱ्या संताबरोबर सत्संग केल्याने मन गंगाजलाप्रमाणे निर्मळ होते.

**ग्यान रु करम ते भगति उपजै, ग्यानह जोति परगासु।**
**कहि रैदास गुरु ग्यान थै, हिरदै कवल विगासु॥ २०॥**

—संत रविदास की भक्ति साधना (डॉ.शर्मा), पृ.८४.

अनुक्रमणिका

ज्ञान, कर्म हे भक्तिमुळे उत्पन्न होते.परमात्मा भक्ती केल्याने ज्ञानज्योतिचा ज्ञानप्रकाश होतो.रोहिदास म्हणतात की, “गुरुज्ञानामुळे आम्हांस सामर्थ्य मिळो आणि आमच्या हृदयात ज्ञानप्रकाश भरून दे.”

(संत रोहिदास संत समागमाच्यावेळी ज्ञान-गोष्टीवर प्रवचन करीत.त्यावेळी ते वरील“पदा” द्वारे ज्ञान, कर्म व भक्ती यांची व्याख्या करीत.ईश्वर भक्तिमध्ये ज्ञानाचे सर्वप्रथम स्थान, दुसरे स्थान कर्माचे.ह्या दोन शिड्या चढल्यावर उपासना मार्गाने त्रिवेद (ऋग्वेद, यजुर्वेद, सामदेव) मध्ये ज्ञान व कर्मद्वारा भक्तिमार्गाचे रूप स्पष्ट होते.)

□□□

अनुक्रमणिका

# ३.रोहिदास-कबीर संवाद

(१८०)

**रोहिदास-कबीर गोष्टीची संवादरचना संत रोहिदासांची नसून ती भक्त सेना न्हावी यांनी केली आहे.**स्वामी रामानंदांच्या प्रमुख बारा शिष्यापैकी पीपा, सेन, रोहिदास-कबीर हे त्या युगात नेहमी एकमेकास भेटत होते.संत मंडळीमध्ये रामभजन, कीर्तन व आध्यात्मिक गोष्टी होत.सन १५८८ (संवत १६४५) मध्ये अनंतदास वैष्णवने लिहिलेल्या"भक्त रत्नावली" च्या अध्ययनावरून अशी माहिती मिळते.परंतु डॉ.वी.पी.शर्मा यांच्या दृष्टिने ह्या गोष्टींचा लेखक अनंतदास वैष्णव आहे.बनारसमध्ये रोहिदासांच्या झोपडीवर विशेषतः गोपाळ मंदिरात संपूर्ण रात्र पखवाज, झांज, मृदुंगाच्या तालावर कीर्तन चालत होते.तेथे संत भक्त मंडळीत आध्यात्मिक विषयावर प्रवचन-गोष्टी होत होत्या.हेच रोहिदास-कबीर गोष्टी निर्मितीचे ठिकाण होय.कबीर निर्गुणी, मूर्तिपूजेचे निंदक तसेच अवतारवादाच्या विरोधी होते.या गोष्टीत शक्ति दुर्गाचा अवतारसुद्धा होता.दुर्गाचे तोंडी सगुण भक्तिचे समर्थन ऐकून कबीराने आदिशक्तिचीसुद्धा निंदा केली आहे.निर्गुणोपासनावर सगुणोपासनाचे स्थापनार्थ ह्या गोष्टीची योजना-कल्पना केली असावी.

—संतगुरू रविदास-वाणी, पृ.१४३.

अनंतदास वैष्णव म्हणतात की,—

**कबीर कौ मन निरगुन राचा**[आवडणे] **,अवरु मना सब दीसै काचा**[न आवडणे] **।**
**इतनी सुनी रविदास रिसाना**[नाराज] **,नृगन श्रगुन एक करि जाना॥**

—संतगुरू रविदास-वाणी, पृ.१४३.

**भावार्थ**— अनंतदास वैष्णव म्हणतात की, "कबीरास निर्गुण मत आवडत होते.दुसरे सगुण मत त्यांना आवडत नव्हते." हे ऐकून संत रोहिदास नाराज झाले व म्हणाले, "निर्गुण व सगुण हे दोन्ही एकच आहेत."

**श्रगुन थापै सेनि रैदासा, कबीर कौ मन नृगुण आसा।**
**पहक ऐक लग कथीयो ग्यानु, टिकै भयो कबीर कौ ध्यानुं॥**

संत सेना न्हावी व संत रोहिदास हे दोघे सगुण उपासक होते तर संत कबीरदास निर्गुणमध्ये गात होते.एवढेच नव्हे तर ते एकेक तास निर्गुणामध्ये ध्यानमग्न असत.

**निरगुन कथत भयौ मन थीरु, गुरु समानि करि थपै कबीरु।**
**करि बंदना सेनि रेदासा, पहुंचे अपने मंदर**[मंदिर]**पासा॥**

कबीराचे मन निर्गुणी माहात्म्यात स्थिर होत असे.ते गुरु स्वामी रामानंदांच्या उपदेशाप्रमाणे वागत होते.संत सेना व संत रोहिदास हे मंदिराजवळ भगवानाची प्रार्थना करीत असत.

**निरगुन श्रगुन एक बमेका**[समान]**,जिनि करै को अपनो टेका।**

अनुक्रमणिका

**निरगुन ब्रह्म निहालै चालै, श्रगुन फुनि भगतनि प्रतिपालै॥**
**श्रगुन कहीये माष**[नाराज.]**ने काई, नृगुन तत्त भी लियो धीताई॥**
—संत गुरु रविदास-वाणी, पृ.१४३.

रामानंदी वैष्णव भक्त संत रोहिदासासाठी निर्गुण व सगुण ब्रह्म एक समान त्यांचे उपास्य दैवत आहे.हा त्यांचा विवेकपूर्ण निर्णय आहे.याबद्दल कोणीही आपल्याच गोष्टीवर अडून बसले नाही पाहिजे.तसेच सगुणोपासनामुळे कोणी नाराजही झाले नाही पाहिजे.निगुर्ण तत्त्वास समजून गेणे हासुद्धा एक धीटपणा आहे.

अशा प्रकारच्या आध्यात्मिक गोष्टीत संत रोहिदास म्हणतात की,—

**रैदासजी कहै—**
**माधौ (साधौ) नृगुण नांहि हित मोरा, हौं कइसे दरसन पाऊं तोरा॥ १॥**
—संतगुरु रविदास-वाणी, पृ.१४४.

**भावार्थ—** रोहिदास म्हणतात, “हे माधवा, निर्गुण माझ्या हिताचे नाही.कारण मला तुझे दर्शन कसे होणार?

**कबीरजी कहै—**
**ब्रह्मग्यांन बिन भजन कीरतन, कभौ सुध न होई।**
**येक ब्रह्म सकल घट भीतरि, अवरु न दूजा कोई॥ २॥**

**भावार्थ—** कबीर म्हणतात की, “ब्रह्मज्ञानाशिवाय भजन, कीर्तन, कधीच शुद्ध होणार नाही.सर्व प्राणिमात्रांमध्ये एकच ब्रह्म आहे.तेथे दुसरे काही मिळणार नाही.”

**रैदासजी कहै—**
**येक येक कहा कहो स्वामी, दूजी प्रकीर्ति कित जाई।**
**ता प्रकीर्ति तू त्रिगुन कहत हौ, साधो सदा बताई॥ ३॥**

**भावार्थ—** संत रोहिदास म्हणतात की, “स्वामी कबीर, तुम्ही एक एक सांगा.भगवानाचे दुसरे रूप कोठे गेले?तुम्ही दुसरे रूप निर्गुण सांगता.ते कुठं आहे”?

**कबीरजी कहै—**
**जैता फूल तैती बात, जदि प्रकीर्ति तदि पांनी?।**
**उतपति प्रलौ कौण करत है, का मैं प्रकीर्ति समाणी॥ ४॥**

**भावार्थ—** कबीर म्हणतात की, “जसे फुल तशी गोष्ट, जशी प्रकृति तसे पाणी, उत्पत्ती किंवा प्रलय कोण करीत आहे?तो प्रभू सर्व ठिकाणी व्यापलेला आहे.”
**रैदासजी कहै—**

**स्वामी!प्रकीर्ति समामी[समान]रुब[रूप]है, सौ ब्रिंदावन आया।**
**ग्वालन संग गोपिन संगा, चिटकी देत नचाया॥ ५॥**

**भावार्थ**– संत रोहिदास म्हणतात की, "स्वामी प्रकृती सर्व ठिकाणी समान आहे.भगवान वृंदावनाला आला.त्याने गौळणी गोपींबरोबर खेळताना त्यांना चुटकी देत नाचविले."

**कबीरजी कहै**–
**साधौ!ना उ नाचै ना उ गावै, ताउ नाल बजावै।**
**पूर्ण ब्रह्म सकल थै न्यारा[निराळे]उहि बिरला कोड[कोण.]पावै॥ ६॥**
–वाणी, (डॉ.शर्मा), पृ.१४४.

**भावार्थ**– कबीर म्हणतात की, "साधु महाराज, भगवान नाचतो, गातो.तसेच ताल धरतो, वाजवितो.पूर्ण ब्रह्म सर्व ठिकाणी निराळे आहे.तोच विरळा झाल्यास कोण पावणार?"

**रैदासजी कहै**–
**स्वामी!जौ लीला औतार न होता, जीव कहाँ निसतरता[उद्धार]।**
**अंध धुंध कछु खबरि न होती, प्राणी नरक सब परता॥ ७॥**
–वाणी, (डॉ.शर्मा), पृ.१४४.

**भावार्थ**– संत रोहिदास म्हणतात की, "जर भगवानाचा लीला अवतार नसता तर जीवांचा उद्धार कसा झाला असता?सर्वत्र अंधाधुंदी झाली असती.चांगली वाईट बातमी नसती तर नरकात गेलेले सर्व प्राणी परत येतील."

**कबीरजी कहै**–
**कहां नरक है कहां सरण है, चलत कहऊं नहीं पेष्या[दिसणे]।**
**जा दिन हम पयाणा[प्रयाण]दीना, जात कहूं नही देष्या॥ ८॥**

**भावार्थ**– भक्त कबीर म्हणतात की, "नरक कोठे आहे आणि स्वर्गही कोठे आहे?कोठेही गेल्यास दिसत नाही.ज्या दिवशी आम्ही प्रयाण करू, जाताना म्हटले तरी दिसणार नाही."

**रैदासजी कहै**–
**स्वामी!कौ पांच मरै गोड को करै कौ हू करै पसारा।**
**बड़ी लूंटी (गूंठी) है राम षजीना[फसविणे],धरया क्रिस्न औतारा॥ ९॥**

**भावार्थ**– संत रोहिदास म्हणतात की, स्वामी, कोणी पांच गेले आणि त्यांचा विचार केला.अशा लहानमोठ्या गोष्टी केल्यास रामास फसविल्यासारखे होईल.त्यासाठी कृष्ण अवतारच धरला पाहिजे.

**कबीरजी कहै–**

**साधौ!कौने धरया क्रिस्न औतारा, किन औतार धराया।**
**पूरण ब्रह्म सकल थै न्यारा**[निराळा]**,नरक कुंडि नहि आया॥ १०॥**

**भावार्थ**– कबीर म्हणतात की, "साधुमहाराज, कृष्णा अवतार कोणी धरला?कोणता अवतार धरला?पूर्ण ब्रह्म सर्व ठिकाणी विविध रूपाने आहे.प्रभुभक्ती केल्याने नरककुंडीत आला नाही."

**रैदासजी कहै–**

**स्वामी ठाढ़ै देषै कदंब की छाया, कमल नील कर लीयै।**
**पीत वसन वैजन्ती माला, मोर मुकूट सिर दीयै॥ ११॥**

**भावार्थ**– संत रोहिदास म्हणतात की, "प्रभु हातात मिळेकमल घेऊन कदम्ब वृक्षाच्या छायेत राहातात, त्यांनी पिवळे वस्त्र नेसून, गळ्यात वैजयंती माळा घातल्या आहेत व डोक्यावर मोरपिसांचा मुकुट धारण केलेला आहे."

**कबीरजी कहै–**

**परचा अनंत गिनै को साधौ!जिन जिन जिहु उनमाना**[अनुमान.]**।**
**पूरण ब्रह्म परगट अर न्यारा, कोउ बिरलै जाना॥ १२॥**

–वाणी, (डॉ.शर्मा), पृ.१४४.

**भावार्थ**– कबीरजी म्हणतात की, "प्रभुची रूपे मोजता येणार नाहीत इतकी आहेत.त्यांची अनुमाने तर्क करता येणार नाहीत.पूर्ण ब्रह्म परमेश्वर जेव्हा निरनिराळ्या रूपांत प्रकट होतो.ते कोणी तरी एकादा विरळाच जाणू शकेल."

**रैदासजी कहै–**

**सुणौ हो स्वामी, हौ तो परचा पावा।**
**केवल कान्हां निहचै देष्या, चारो वेदां गावा॥ १३॥**

–वाणी, (डॉ.शर्मा), पृ.१४४.

**भावार्थ**– संत रोहिदास म्हणतात की, "अहो स्वामी, ऐका, जो प्रभुस ओळखतो, तो कृष्णास निश्चित पाहू शकतो.त्याचे गुणगान चारी वेद गातात."

**कबीरजी कहै–**

**अष्ट कमल दल भीतरि साधौ!कहां जु**[ज्याचे]**मन पतिआई**[विश्वास गुंतणे]**।**
**त्रिकुटि संगम जौ उनमानौ आवागमन नसाई॥ १४॥**

–वाणी, (डॉ.शर्मा), पृ.१४५.

अनुक्रमणिका

**भावार्थ**— कबीर म्हणतात की, “अष्ट कमल पाकळ्यांत ज्यांचे मन गुंतले आहे.त्रिकुटी संगमात प्रभुशी जो एकरूप झाला आहे, जे ध्यानीमनी प्रभुमय झाला आहे तो, भक्त आवा-गमनाच्या (जन्म-मृत्युच्या) फेऱ्यातून मुक्त झाला आहे.”

**रैदासजी कहै**—

**त्रिकुटि संगम रहन दे स्वामी!गावण दे गोपाला।**
**जा के रुप ठगी ब्रिज वनिता, मोहन नंद कूं लाला॥ १५॥**

**भावार्थ**— संत रोहिदास म्हणतात की, “त्रिकुटी संगम राहू द्या-गोकूळच्या नारींनी गाण्यानाचण्यामुळे कृष्ण भगवानास मोहून टाकले आहे.”

**कबीरजी कहै**—

**स्वामी!कौण नंद हे कौण जसोदा, कोण पूत**[पुत्र]**किण जाया**[बायको]**।**
**पूरण ब्रह्म सकल है, न्यारा, जोनि संकट नही आया॥ १६॥**

**भावार्थ**— कबीरजी म्हणतात की, “स्वामी, कोण नंद आणि कोण यशोदा?कोण पुत्र आणि बायको?सर्वांचा पूर्ण ब्रह्म प्रभु हा निराळाच आहे.तो प्रसन्न झाल्यामुळे, या योनीत कसलेच संकट आले नाही.”

**रैदासजी कहै**—

**स्वामी!चहुं दिसी नंदलाला, चहुं जुगि वेदां गावा।**
**जहां जहां पाप परगट भया, तहां तहां ऊ उठि धावा॥ १७॥**

**भावार्थ**— रोहिदास म्हणतात की, “प्रभु नंदलाल चोहोकडे आहे.तो सर्व युगात असल्याबद्दल वेदात ही त्याचे गुणगान केले आहे.जेथे जेथे पाप प्रगट झाले, तेथे तेथे अन्याय निवारणार्थ प्रभू धावून गेले.

**कबीरजी कहै**—

**साधौ!पाप पुंन्नि नहीं वाकै**[पाहणे.]**नहीं वेद नहीं बाणी।**
**रुप रेख कछु नहीं वाकौ, जोतिहि जौत समांणी॥ १८॥**

—वाणी, (डॉ.शर्मा), पृ.१४५.

**भावार्थ**— कबीर म्हणतात की, “पापपुण्य पाहावयाचे नाही.जगात वेद नाही व त्याची वाणीही नाही.त्याचे रूपरेख काही पाहायचं नाही.प्रभुज्योतिमध्ये प्राणज्योत एकरूप होऊन जाते.”

**रैदासजी कहै**—

**स्वामी!बूढे तुम हो ब्रह्म गिआंनी, हरि चरणा नहीं पावै।**
**अंध धुंध कछु खबरि न परई**[माहिती]**,मिथ्या जनमु गमावै॥ १९॥**

—वाणी, (डॉ.शर्मा), पृ.१४५.

अनुक्रमणिका

**भावार्थ**– संत रोहिदास म्हणतात की, “स्वामी कबीरजी, तुम्ही ब्रह्मज्ञानी म्हातारे आहांत.परंतु तुम्ही हरी चरणास भजत नाही.मग तो कसा पावणार?चांगली वाईट माहिती नाही तर आपला जन्म-आयुष्य फुकट जाणार.”

**कबीरजी कहै**–

**अंध धुंध मै विआपक रमिता, भ्रम का पटल नसावै।**
**ब्रह्मग्यान विना ही साधौ!केवल राम न पावै॥ २०॥**

**भावार्थ**– कबीर म्हणतात की, “माझी चांगली वाईट बातमी असली तरी माझा ईश्वराविषयीचा दृष्टिकोन व्यापक आहे.माझ्यापुढे भ्रमाचे पटल नाही.हे साधु केवळ भक्ती केल्याने राम पावणार नाही, त्यास ब्रह्मज्ञानाची जरुरी आहे.”

**रैदासजी कहै**–

**रमिना राम सोई हे स्वामी!हिदै**[हृदय]**करसै विचारा।**
**रावण मारी बभीषण थाप्या**[सोपविणे.]**,धरया रामचंद्र औतारा॥ २१॥**

**भावार्थ**– संत रोहिदास म्हणतात की, “हे स्वामी, हृदयापासून विचार केला तर तो रामच ध्यानीमनी रमतो आहे.प्रभू अवतारामध्ये त्या रामाने विभिषणच्या सहकार्याने लंकेचा राजा रावण यास मारले.व त्यास राज्य दिले.

**कबीरजी कहै**–

**जै ऊ रमिता राम कहावै, तौ मृग पीछे क्यूं डोल्या।**
**लाग्यौ बाण लषमण भाई, जड़ी दइ क्यूं बोल्या॥ २२॥**

**भावार्थ**– कबीर म्हणतात की, “दशरथी रामास प्रभू रामचंद्र म्हणावे.तो सुवर्ण मृगाच्या मागे कां धावत सुटला?लंकापतीबरोबर लढाई करतांना लक्ष्मणास जेव्हा बाण लागला, तेव्हा जड़ीबुटी औषधी पाला आणण्याबद्दल राम कां बोलला?”

**रैदासजी कहै**–

**भोली बात कहत हौ स्वामी!आपन परगट कीया।**
**बहुत अथाह समुंद्र पाटयौ, यौ लंका गढ लीया॥ २३॥**

**भावार्थ**– संत रोहिदास म्हणतात की, कबीर स्वामीजी, आपण भोळीभाबडी भाषा कशी काय बोलता?रामाच्या रूपाने प्रभू प्रगटले व अथांग महासागर ओलांडून लंकारूपी किल्ला जिंकला.”

**कबीरजी कहै**–

**बन मै फिरि फिरि सेंन्या जोड़ी, समुंद्र पाटि गढ लीया।**
**सौ अगम सति भी कहिये, तीन चुटला ही कीया॥ २४॥**

अनुक्रमणिका

—वाणी, (डॉ.शर्मा), पृ.१४५.

**भावार्थ**— कबीर म्हणतात की, रामाने वनात फिरफिरून अस्वल, वानराचे सैन्य जमविले व त्यांचेकडून रामसेतू बांधून घेतला.सुमद्रातील लंकारूपी गड़ जिंकला.यास रामपत्नी सीताचे (सतीचे) माहात्म्य म्हणा.ह्या तीन अघटित घटना चुटकीसारख्या केल्या."

**रैदास कहै— सकति कहै—**

**सिंध बाहणी बात कहत है, बोलै मधुरी वांणी।**
**सति भगति रैदास करत है, कबीरे भगति[भक्ती]न जाणी॥ २५॥**

—वाणी, (डॉ.शर्मा), पृ.१४५.

**भावार्थ**— संत रोहिदास म्हणतात की, शक्ति म्हणते की, "ही सिंध वाहणी गोष्ट आपण आपल्या मधुर वाणीत बोलता.हा रोहिदास सतिभक्ती करीत आहे.ही सतिभक्ती कबीर जाणू शकणार नाही."

**कबीरजी कहै—**

**आढै (आठै) ता तै गला कटावै, घरि घरि खाती डोलै।**
**जाह जाह चंडी आगै तैं, कुडि मारि नित बोलै॥ २६॥**

**भावार्थ**—कबीर म्हणतात की, "नवरात्र उत्सवात दुर्गाष्टमीस दरवर्षी देवी मंदिरापुढे बकऱ्याचे गळे कापतात व घरोघरी मोठ्या आनंदाने मटण खातात.जेथे जेथे काली माताऊ जयचंडी मंदिरे आहेत तेथे दुर्गा शक्तिसमोर प्राणी बळी देण्याबद्दल बोलतात.

**रैदासजी कहै—**

**सकति सति कहत है स्वामी!सति का सबद पिछानूं[ओळखणे]।**
**त्रिगुण सगुन ये काही कहिये, दूजी न धरिये कानू॥ २७॥**

—वाणी, (डॉ.शर्मा), पृ.१४६.

**भावार्थ**— संत रोहिदास म्हणतात की, "कबीर स्वामी, हिलाच सतिची शक्ती म्हणतात.सतिचा शब्द ओळखला पाहिजे.यासच निर्गुण-सगुण म्हणतात.यास दुसरा कायदा-नियम धरू नका."

**कबीरजी कहै—**

**सकति बहुत वियोगे साधौ, घरि घरि कीया पसारा।**
**विष अम्रित येके कयूं कहियै, दीसत है तत[तत्त्व.]न्यारा॥ २८॥**

**भावार्थ**—कबीर म्हणतात की, "साधु महाराज, आदिशक्ती पुष्कळ वियोगाने प्राप्त होते.ह्या माझ्या शक्तिने घराघरात पसारा (माया जंजाळ) केला आहे.दोघांची तत्त्वे निरनिराळी दिसत असतांना, विष व अमृतास एक कसे काय म्हणावयाचे?"

**रैदासजी कहै—**

अनुक्रमणिका

**तत तत कहा कहौ हो स्वामी, दूजा नांहि कोई।**
**राम क्रिस्न करता कहियै, अवरु न दूजा होई॥ २९॥**

—वाणी, (डॉ.शर्मा), पृ.१४६.

**भावार्थ**— संत रोहिदास म्हणतात की, "कबीर स्वामी, तत्त्व तत्त्व म्हणावयास सांगा.तत्त्व म्हणजे प्रभुशिवाय दुसरे काही नाही.ह्या जगाचा कर्ता-करविता राम कृष्ण आहे.त्यांचेशिवाय दुसरे कोणी नाही.

**कबीरजी कहै**—

**क्रिसन उपजै विनसै साधौ, सौ तौ करता नांही।**
**आदि अंति सौ निहचल रमिता, सो मेरा मन मांहि॥ ३०॥**

—वाणी, (डॉ.शर्मा), पृ.१४५.

**भावार्थ**—संत कबीर म्हणतात की, "कृष्ण तर वसुदेव देवकीपासून जन्मलेला आहे.पति पत्नीपासून जन्मलेला कृष्ण तर कर्ता नाही, जगाच्या आरंभापासून अंतापर्यंत जो प्रभू निश्चित रमला आहे.तो माझ्या मनात भरला आहे."

**रैदासजी कहै**—

**रामानंद कै क्रिस्न भगति है, तुम तो और बताया।**
**कहै रैदास सुणौं रे स्वामी, तत कहा थैं ल्याया॥ ३१॥**

—वाणी, (डॉ.शर्मा), पृ.१४५.

**भावार्थ**—संत रोहिदास म्हणतात की, "स्वामी, रामानंदाची तर कृष्णभक्ति पण तुम्ही तर दुसरेच काही सांगितले होते.स्वामी महाराज, ऐका, तुम्ही (निर्गुण-निराकार) तत्त्व सांगितले होते.मी मला हवे ते घेतले."

**कबीरजी कहै**—

**हम तो होते ध्यान सास्तरी, गोरखनाथ चलि आया।**
**स्वामी मिले सुधारस बरिसै, तत ही तत मिलाया॥ ३२॥**

**भावार्थ**—भक्त कबीर म्हणतात, "आमचं ध्यान शास्त्रामध्ये होते.तेव्हा गोरखनाथ आला.स्वामी भेटल्यावर अमृत रसाचा वर्षाव होऊ लागला आणि तत्त्वास तत्त्व मिळाले."

**रैदासजी कहै**—

**सो तत स्वामी!कहि समुझावौ, हौ तो नांहि जाना।**
**आपनो जानि करौ क्रिया अति, सो निहचै करि मानां॥ ३३॥**

**भावार्थ**—संत रोहिदास म्हणतात की, "स्वामी, प्रभू निर्गुण-निराकार आहे.हे तत्त्व आम्ही समजलो नाही.तरी ते आपण कृपा करून समजावून सांगा आम्ही ते निश्चयपूर्वक मानू."

अनुक्रमणिका

**कबीरजी कहै—**

**चचंल सूं निहचल करि राखौ, यहु मन उनमनि लावौ।**
**इंद्री पसरी निवारौ साधौ!तो निहचै करि पावौ॥ ३४॥**

—वाणी, (डॉ.शर्मा), पृ.१४५.

**भावार्थ**—कबीर म्हणतात की, “मन चंचल ऐवजी निश्चितपणे स्थिर ठेवा आणि मनापासून उनमनिपर्यंत प्रभुचिंतन करा.सैरावैरा धावणाऱ्या इंद्रियांना आवर घालून ताब्यात ठेवा.हे तुम्ही निश्चयाने करून पाहा.

**रैदासजी कहै—**

**धनी कबीर धनी वौ सतगुर, जिन परम तत सषावा**[जाणणे]**।**
**कहै रैदास सुणौं हौ स्वामी, पणै तुम्हारी आया॥ ३५॥**

—वाणी, (डॉ.शर्मा), पृ.१४६.

**भावार्थ**—संत रोहिदास म्हणतात की, “कबीर धनी, तो सद्‌गुरु धनी.जो प्रभुचे परमतत्त्व जाणतो.रोहिदास म्हणतात.ऐका हो स्वामी, मी तुमच्याजवळ आलो आहे.”

**कबीरजी कहै—**

**भर्म छांडि दै कर्म छांडि दै, चरित छांडि दै भाई।**
**आत्मा रामा करौ विश्रामा, कहै कबीर समुझाई॥ ३६॥**

—वाणी, (डॉ.शर्मा), पृ.१४९.

**भावार्थ**—कबीर म्हणतात, “अरे भाई, भ्रम सोडून दे.कर्म सोडून दे.एवढेच नव्हे तर जीवन चरित्र ही सोडून दे.कबीर समजावून सांगतात की, “आत्मारामाच्या ठिकाणी विश्राम घे.”

**रैदासजी कहै—**

**स्वामी!जौ तुम गावौ सौ हो गाऊं ‘तुम्हारा ग्यान विचारुं।**
**कहै रैदास सुणौ हो स्वामी, भर्मकर्म सब छाडू॥ ३७॥**

—वाणी, (डॉ.शर्मा), पृ.१४६.

**भावार्थ**—संत रोहिदास म्हणतात की, “तुम्ही जे ब्रह्मज्ञान सांगाल ते ऐकू.तुमचेकडील ज्ञानही विचारू.” रोहिदास म्हणतात की, “स्वामी, ऐका.त्यासाठी भ्रम आणि कर्मही सोडू.”

**कबीरजी कहै—**

**बहुत बमेकी**[विवेकी, विचारी]**साधु तम हौ, अकिलकंत मतिधीर।**

अनुक्रमणिका

**समुझि आपा आपु[आपण]जो उधरे, यौ कहै दास कबीर॥ ३८॥**

**भावार्थ**—भक्त कबीर म्हणतात की, “जे लोक बडबड करणारे आहेत ते अज्ञानी साधू होत पण तुम्ही बुद्धिवंत, विचारी व धैर्यवान आहांत.आपण आपल्या मनातील अज्ञानरूपी मनाचा उद्धार करा” असे कबीरदास म्हणतात.

**रैदासजी कहै—**

**नमो निराकार तोहि नमो, क्रिपाल कबीरा।**
**जन रैदास अस्नान करि, साध नदी हरि नीरा[पाणी]॥ ३९॥**
—वाणी, (डॉ.शर्मा), पृ.१४६.

**भावार्थ**—रोहिदास म्हणतात की, “कृपाळू कबीरा, निर्गुण, निराकार अशा त्या प्रभुला आमचा नमस्कार असो.साधूच्या ज्ञानगंगेच्या पाण्यात जनतेचा रोहिदास स्नान करतो.

“इति श्री.रामानंद कौ सिस रैदास-कबीर गोष्टी सम्पूर्ण समाप्त.”

गोष्टीचा शेवट कबीराबद्दल आदरभाव प्रकट करण्यासाठी रोहिदासांच्या ह्या विचारधाराबरोबर होतेकी,

**स्वामी जो तुम गावौ सो हौ गाऊं, तुम्हारा ग्यांन विचारु।**

ह्या गोष्टीत रोहिदासांनी आपले गुरु स्वामी रामानंदांच्या विशिष्ट द्वैतवादी भक्तिसही पाठिंबा दिला आहे.माझे अनुमान आहे की, या गोष्टींपुढे वल्लभाचार्याच्या पुष्टि संप्रदायात भ्रमरगीत परंपरा उद्धव-गोपी संवादाच्या आधार बनल्या.येथे“तुम्हारा ग्यांन विचारुं” वाक्याने रोहिदासांचा हाच आशय आहे की, निर्गुणी साधनासुद्धा विचार करण्यासारखी आहे.

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध विठ्ठल भक्त सेना नाव्ही उत्तर भारतात गेले व त्यांनी स्वामी रामानंदांचे शिष्यत्व स्वीकारले.उत्तरेत ते ‘संतसेन’ म्हणून प्रसिद्ध पावले.स्वामी रामानंदाच्या प्रमुख बारा शिष्यांमध्ये कबीर-रोहिदासा-प्रमाणे संत सेनांचा समावेश आहे.त्यांनी तिकडे हिंदी भाषेत काव्यरचना केली.ती रचना मराठी वळणाची असून त्यांच्या विचारसरणीवर कबीर-रोहिदासांचा प्रभाव पडलेला दिसतो.उत्तर भारतातील संतांची काव्यरचना बहुतेककरून पदे व दोहे याचेमध्ये आहे.**परंतु संत सेना नाव्ही यांनी कबीर-रोहिदास ही काल्पनिक चर्चा काव्यमय संवादामध्ये लिहिली आहे.**अर्थात छोटेसे संगीत काव्य!

संत सेन यांनी दोन्ही गुरुबंधूंचे श्रेष्ठत्व समान मानून दोघांबद्दलही आदरभाव दाखविलेला आहे.खरे पाहाता कबीर व संत रोहिदास दोघेही निर्गुण तत्त्ववादी होते.मग दोघात संघर्षमय संवाद होणार कसा?तेव्हा संत सेना नाव्ही यांनी संत रोहिदास यांना सगुणवादी ठरवून निर्गुणवादी कबीराबरोबर काव्यमय काल्पनिक रंजक संवाद रचला असावा

**संगुन भगत करे रोहिदासा। वैष्णव आप कव्हावे॥**

अनुक्रमणिका

**माला टिलक मुद्रा छापे, कबिरा सुनके आवे॥**
**सुन सुन साधु जी, राजाराम कहो जी॥ १॥**

—संत रोहिदास, जीवन आणि वाङ्मय, पृ.२३४.

**भावार्थ**—संत रोहिदास विष्णू मुर्तिची पूजा करीत म्हणजेच सगुण भक्ती करीत.म्हणून त्यांना वैष्णव भक्त म्हणत.ते गळ्यात माळा घालीत व कपाळास गंध लावीत.हे ऐकून कबीर आले.साधुजन ऐका ऐका.राजाराम म्हणा.

**पूजा जाकी कबिरा देखे चाम ही चाम पसारा॥**
**चाम कटोरा**[वाटी, पेला]**चाम कमलमो**[कुंड]**बाल मुकुंदा बिहारा॥**
**सुन सुन साधुजी, राजाराम कहो जी॥ २॥**

रोहिदासाकडे जाऊन कबीराने पूजा पाहिली.जिकडे तिकडे चामड्याचाच पसारा.चामड्याची वाटी व चामडे भिजविण्याचा चामड्याचाच कुंड तसेच चामड्यावरच प्रभु बाल-कृष्ण विहार करतो, साधुजन ऐका हो ऐका.राजाराम म्हणा.

**कबिरा मन पस्ताये गयो है। भक्त सुन रोहिदासा॥**
**निर्विकार परब्रह्मकु। चामकू दीन्हो बासा॥पद॥**
**चामन ही सो दिखावो कबिरा। चामको हाती चामकोरा**[चाबूक]**॥**
**ऊपर चाम करे झकझोरा॥ १॥**

—संत रोहिदास, (कामत-कदम), पृ.२३४-२३५.

**भावार्थ**—कबीराचे मन नाराज झालेले भक्त रोहिदासांनी ऐकले.तेव्हा निर्विकार परब्रह्माचे चामड्याचे उदाहरण देत रोहिदास म्हणाले, “हे कबीरा, ह्या जगात चामड्याशिवाय काय आहे?चामड्याचा हत्ती व चामड्याचाच चाबूक आणि हत्तीवर बसून तोंडाने ‘झकझक’ करणारा (बोलणारा) माणूसदेखील चामड्याचाच.

**चामको राजा चामको परजा। चामको लोक सकल बिहारा॥ २॥**

—संत रोहिदास, (कामत-कदम), पृ.२३५.

चामड्याचा राजा आणि चामड्याचीच प्रजा तसेच सगळीकडे चामड्याचीच त्वचा असलेले लोक विहार करताना दिसत आहेत.

**चाम के साध चामके सिध। चामके भक्त चाम आधारा॥ ३॥**

चामड्याचे साधु आणि चामड्याची सिद्धी, चामड्याचे भक्त चामड्याच्याच आधारावर आहेत.

**रोहिदासके प्रभु बाल गोविंदा। सोही लै चाम लिये अवतारा॥ ४॥**

—श्रीसंत रोहिदास, (कामत-कदम), पृ.२३४.

अनुक्रमणिका

रोहिदासांचे प्रभु बालगोविंदाने चामड्यामध्येच अवतार घेतलेला आहे.

**तोसी साधक कहते, चेमरा केते काल झोरे।**
**आतम ग्यान नही तुन्या**[तुला]**,नेजी गुन नाही मो बुरे॥ १॥**

—संत रोहिदास, (सत्यदेवशिंदे), पृ.२५५.

**भावार्थ**—संत रोहिदास म्हणतात की, "साधना करणारे साधक साधु आनंदित होतात.ते त्यांच्या चेहऱ्यावरील चामड्याच्या त्वचेमुळेच कळले.तुला आत्मज्ञान नाही.तुझ्यात दुर्गुण नसल्याचे डोळ्यातच दिसते."

**मा तुरकीन बाप जील्हाया**[कोष्टी (विणकाम करणारा)]**,पुत भये ब्रह्मग्यानी।**
**बेदकी बात कछु नही माने, बात अपनी थाणे॥ २॥**

—संत रोहिदास, (सत्यदेव शिंदे), पृ.२५६.

**भावार्थ**—संत रोहिदास म्हणतात की, "हे कबीरा, तुझी आई तुरकीन-मुसलमान तर बाप विणकाम करणारा (हिंदू) आणि त्यांचे पोटी मुलगा ब्रह्मज्ञानी झाला.वेदाची गोष्ट तू काही मानत नाही.आपलेच म्हणणे खरे असा मानणारा तू फार हट्टी आहेस.

**ब्रह्मपुरीसे ब्रह्मा आया, साकी वेद बुलाया।**
**साची भगत रोहिदास करतु है, कबीरा भक्त न पाया॥ ३॥**

**भावार्थ**—ब्रह्मपुरीहून ब्रह्मदेव आला.तो वेद बोलल्यावर म्हणाला, "हे रोहिदासा, तू खरी भक्ती करतोस, तर कबीराने खरी भक्ती प्राप्त केली नाही."

**झूटा ब्रह्मा झूटा वेद। भगत कहा पछानी।**
**ज्या ब्रह्मा आगे सेती। झूटी शासन ज्यानो॥ ४॥**

**भावार्थ**—कबीर म्हणाले, "अरे ब्रह्मदेवा, तू खोटा आणि वेदही खोटे आहेत.तू भक्त काय ओळखतोस?अरे ब्रह्मा, तू जा.पुढे पाखंडी-ढोंग्यांची शेती आहे.त्यांची पूजा-अर्चा ओळख.

**मुख कचेटे धुंडी जो आये, बोलत मधुरा बानी।**
**साध भगत रोहिदास करत है, कबीरा भक्त न जानी॥ ५॥**

—संत रोहिदास, (सत्यदेव शिंदे), पृ.२५६.

**भावार्थ**—ब्रह्मदेव तोंडे-चेहरे धुंडाळीत-पाहात आवडेल अशी गोड भाषा बोलत आला, तो म्हणाला" रोहिदास खरी भक्ती करीत आहे तर तो कबीरास भक्त म्हणून जाणत नाही.

अनुक्रमणिका

**झूटा मुखक[ढोंगी]झूटा धुंडी, भगत काहा पछानी।**
**ज्या धूंडी तुही झूटा झूटी, शाख[रहस्य]न ज्यानी॥ ६॥**

—श्रीसंत रोहिदास, (सत्यदेव शिंदे), पृ.२५६.

**भावार्थ**—कबीर म्हणाले, "लोकांना आवडेल असे भविष्य सांगणारे, गप्पागोष्टी किंवा थापा मारणारे ढोंगी खरी भक्ती ओळखत नाहीत.जे खोटे बोलतात ते प्रभुचे रहस्य ओळखू शकत नाहीत."

**सीव्हं[शिवभक्त]चढे सीव्ह ब्यान अवाइ[ढोंगी],बोलत मधुरा बानी।**
**साध भगत रोहिदास करत है, कबीरा भक्त न ज्यानी॥ ७॥**

**भावार्थ**—कपाळावर उभा गंध लावणारे शिवभक्त व आडवा गंध लावणारे विष्णुभक्त गोड भाषा बोलतात.साधु रोहिदास प्रभुभक्ती करतात तर कबीरास भक्त म्हणून जाणत नाहीत.

**आष्टम चौदस गले कटावे, घर घर खाती उले[भोगप्रसाद]।**
**आचेडी[स्वार्थ]दूर आधे सेती, झूटी भाखा बोले॥ ८॥**

**भावार्थ**—कबीर म्हणतात, "दुर्गाष्टमी देवीपुढे दहा चौदा बकऱ्यांचे गळे कापून, त्यांना बळी देतात व घरोघरचे लोक प्रसाद म्हणून पोटभर जेवतात.लोकांना खरे खोटे भाकित-भविष्य सांगून खूष करतात आणि स्वार्थ साधतात.पण ते स्वतः विचाराप्रमाणे आचरण करीत नाहीत."

**व्रशेभ[बैल]चढे शो ज्यो आये, बोलत मधुरा बानी।**
**साच भगतक रोहिदास करत है, कबिरा भक्त न ज्यानी॥ ९॥**

**भावार्थ**—बैलावर बसून शिव शंकराचे सोंग घेऊन जे येतात व गोड थापा मारून लोकांकडून भिक्षा गोळा करतात, खरी भक्ती रोहिदास करीत आहेत, पण ते कबीरास भक्त म्हणून जाणत नाहीत.

**शमशानी[स्मशान.]के ठाकूर भूत प्रेतके, भगत काहा पछयानी।**
**जगद्‌गुरु संकरसे कहिये, झूटी बाका बोले॥ १०॥**

**भावार्थ**—स्मशानातील भूताखेतास देव मानणारे खरी भक्ती काय ओळखणार?ते ढोंगी स्वतःस जगद्‌गुरु शंकराचार्य म्हणवितात व खोट्या गोष्टी सांगून लोकांना फसवितात.

**धने कबीरा धन्य रहीदासा, गावे शेना न्हाऊ।**
**गरुड चले वीष्णू जे आये, साच भगत मेरे दोउ॥ ११॥**

**भावार्थ**—गरुडावर बसून विष्णू भगवान आले व ते कबीर आणि रोहिदासांना म्हणाले, "तुम्ही दोघेही माझे खरे भक्त आहांत 'तुम्ही दोघेही धन्य आहांत.'असे संत सेना नाव्ही गुणगान गातात."

अनुक्रमणिका

**संत सेना नाव्ही यांनी लिहिलेल्या 'कबीर-रोहिदास संवाद' यावरून सिद्ध होत आहे की, संत रैदास, रायदासू, रुइदास, रविदास व रोहिदास एकच आहेत.हा सबळ पुरावा आहे.**

—श्रीसंत रोहिदास, (सत्यदेव शिंदे), पृ.२५६.

अनुक्रमणिका

# ४.प्रल्हाद लीला

(१८१)

**शहर बडो मुलतान, जहाँ एक कुलवंत राजा।**
**तहँ जन्मे प्रल्हाद, सरे सुरमुनि के काजा॥ १॥**

—श्रीसंत रोहिदास, (सत्यदेव शिंदे), पृ.२३८.

**भावार्थ**— मुलतान (सध्या पाकिस्तान मुझफ्फरगडाजवळ असलेले) ह्या मोठ्या शहरात पूर्वी एक कुलवंत राजा राज्य करीत होता.त्याच्यापोटी ऋषी मुनिच्या कार्यास्तव प्रल्हादाने जन्म घेतला.

**पूछो विप्र बुलाई कै—'जनम्यो राजकुमार।**
**या धौरे प्रल्हाद को गुण तैं पडै ये॥ २॥**

**भावार्थ**— तेव्हा राजाने ब्राह्मणास बोलावून घेतले व सांगितले की, "तुम्ही राजकुमारास विद्या शिकवा."

**मैं पढ्यौं राम को नाम और दूजा नहि जानौं।**
**र र्रा मं मा छाड़ि, तीसरो अंत न आनौं॥ ३॥**

**भावार्थ**— ते ऐकून प्रल्हाद म्हणाला, "मी रामाचे नाव शिकलो.'रा' आणि 'म' याशिवाय मला तिसरे अक्षर येत नाही."

**कहा पढावै नावरे, और सकल जंजार।**
**भौसागर जमलोक**[यमलोक]**ते, मोहि कौन उतारै पार॥ ४॥**

**भावार्थ**— प्रल्हाद म्हणाला, "हे पंडिता, ह्यापेक्षा तू मला आणखी काय शिकविणार?हा भवसागर पार करण्यास मला रामाशिवाय कोण सहाय्य करणार?

**तब राजा परचरयौ**[म्हणाला]**रोस, अति मन में कीन्हों**[केला]**।**
**"मेरो बैरी राम सोई तैं, चित्त धर लीन्हो॥ ५॥**

**भावार्थ**— हे ऐकून राजा क्रोधाने म्हणाला, "तुझ्या चित्तामध्ये असलेला राम माझा शत्रू आहे हे लक्षात ठेव."

—श्रीसंत रोहिदास, (सत्यदेव शिंदे), पृ.२३८.

**या पढ़िबो**[शिक्षण]**तू छाड़ि दे, कह्यो हमारी मान।**
**टूक टूक**[तुकडे]**करि डारि हौ, जब रे सुणो हरि कान॥ ६॥**

अनुक्रमणिका

**भावार्थ**– राजा म्हणाला, "तू हे निमित्त करून शिक्षण सोडलेस, तर याद राख.मी तुला बजावून ठेवतो की, तू हरिचे नांव घेतलेस तर तुझे तुकडे तुकडे करून टाकीन."

**जो बरजयो**[वर्ज करण्यास, सोडण्यास.]**सौ बार कह्यो, तेरो नहिं मानौ।**
**.......ख्याल मन कबहु, न आनौ॥ ७॥**

–श्रीसंत रोहिदास, (सत्यदेव शिंदे), पृ.२३८.

**भावार्थ**– प्रल्हाद म्हणाला, "हे राजा, हरी नाम सोडण्यास तू मला शंभर वेळां सांगितले, तरीसुद्धा मी ऐकणार नाही.मी तुझे ऐकेन, या भ्रमात राहू नकोस."

**पूर्ण ब्रह्म है सकलमें, जाकै यह विस्तार।**
**जाकै राम सहाय्य हैं, कौन सकैगो मार॥ ८॥**

–श्रीसंत रोहिदास, (सत्यदेव शिंदे), पृ.२३८.

**भावार्थ**–प्रल्हाद म्हणाला"सर्व जग पूर्ण ब्रह्म आहे, हे जग ब्रह्ममय आहे.ज्याला राम तारी त्याला कोण मारी?"

**राजा सबा**[सभा]**बुलाय बैठ एक मंत्र विचारौ।**
**लै देखी परतीत जाई, गिरदर**[डोंगरदऱ्याता]**ते डारी**[सोडून परत येणे.]**॥ ९॥**

–श्रीसंत रोहिदास, (सत्यदेव शिंदे), पृ.२३८.

**भावार्थ**–संतप्त होऊन राजाने सभा बोलाविली आणि त्या सभेत एक विचार पक्का ठरविला.तो विचार म्हणजे 'प्रल्हादास डोंगर दऱ्यात सोडून परत या.'

**सकल इति मिलि लै चले, दोन्हो सैल**[पर्वत]**चढाय।**
**जहँ पंछी की गंध नहीं, तहै तै दियौ गिराय॥ १०॥**

**भावार्थ**– सर्वांनी कट केला, जेथे पक्षांचे वास्तव्य नाही, अशा भयाण उंच पर्वतावर प्रल्हादास नेले व तेथून खोल दरीत त्यास लोटून दिले.

**वसुधा भई अधीन दीन है, दरसनकूं आई।**
**मस्तक चरन छूआय लियो, हदै**[हृदय]**सो लाई॥ ११॥**

**भावार्थ**–प्रल्हादाचा होत असलेला छळ ऐकून आई फार दुःखी झाली.ती प्रल्हादास भेटण्यास आली प्रल्हादाने आईच्या पायावर आपले डोके ठेवले तेव्हा आईने प्रल्हादास **हृदयाशी धरले.**

**कहा भगतकी त्रास है, आदि अंत नहिं औरे।**
**अब की सेवा चूक है, तौ तीन लोक नहि दौर॥ १२॥**

अनुक्रमणिका

**भावार्थ**—आई उद्‌गारली, "काय हा हरिभक्तास त्रास चालू आहे.असा छळ दुसऱ्या कोणाचा झाला नसेल, ह्या त्रासाला सीमा नाही.अशा परिस्थितीत प्रभुसेवा करणे चूक आहे.तरी असे उदाहरण तिन्ही लोकांत मिळणार नाही."

**मूरति अधिक अनूप देख, माता मुख हेरे।**
**देख करमके जोग**[भोग]**आज, प्रल्हादहि ढेरे॥ १३॥**

**भावार्थ**—आई प्रल्हादाचे सुंदर मुख न्याहाळून पाहू लागली,.प्रल्हादास कर्माचे भोग भोगावे लागतात म्हणून ती दुःखी झाली.

**हाथ जोर विनती सुण मेरे राजकुमार।**
**एक घडी हरि छाडि दे उबरे अबकी बार॥ १४॥**

—श्रीसंत रोहिदास, (सत्यदेव शिंदे), पृ.२३९.

**भावार्थ**—आई हात जोडून राजकुमार प्रल्हादास विनवू लागली की, "माझे ऐक.तू क्षणभर हरिचे नांव सोडून दे आणि ह्या छळातून सुटका करून घे."

**माता मेरी लाग, प्रीती अब तोरी नहि टूटै।**
**अंतर रही समाय, अंतर ही अंत न छूटै॥ १५॥**

—श्रीसंत रोहिदास, (सत्यदेव शिंदे), पृ.२३९.

**भावार्थ**—प्रल्हाद म्हणाला, "तू माझी आई आहेस, आईचे प्रेम तुटता तुटत नाही.आईच्या प्रेमाला जगात तोड नाही.आईचे प्रेम अनन्य आहे."

**माली सीचै केवडा, बिन सीचे कुम्हलाय।**
**एक घड़ि हरि छाड़ि, दूं तडपी तडणे मर जाय॥ १६॥**

**भावार्थ**—"माळी केवड्याच्या रोपास पाणी शिंपडतो, पण त्याने पाणी शिंपडले नाही तर ते केवड्याचे रोप कोमेजून जाईल.त्याप्रमाणे मी हरिचे नांव क्षणभरही सोडल्यास मी तडफडून तडफडून मरुन जाईन." असे प्रल्हादाने सांगताच आई नाइलाजास्तव परत निघून गेली.

**असुर भयो मति हीन जलै, हो पावक दीन्हो।**
**अगति**[समुद्र,]**क्षालपर**[मासा]**जरै, तहाँ डिढ आपण किन्हो॥ १७॥**

**भावार्थ**—प्रल्हादाचा दृढनिश्चय पाहून राक्षसराजा हिरण्यकश्यपुचा क्रोध अनावर झाला.तो मतिहीन बनला.तेल उकळत ठेवलेल्या कढईत त्याने प्रल्हादास बसावयास लावले.

अनुक्रमणिका

**सकळ देव रक्षा कहैं, तहाँ पावक नहिं जाई।**
**बैठी सीत समंद**[समुद्र]**मैं, जानौ मीन.**[मासा]**मकर**[मगर]**जल न्हाई॥ १८॥**

**भावार्थ**–तेव्हा सर्व देवांनी प्रल्हादाचे रक्षण केले.कढईतील तेल उष्ण न होता थंड राहिले.समुद्रातील थंड पाण्यात मासे व मगरी ज्याप्रमाणे विहार करतात.त्याप्रमाणे प्रल्हाद कढईतील तेलात आनंदाने पोहू लागला.स्नान करू लागला.

**ना जानै प्रल्हाद महा, कछु चेटक**[चेटूक]**कीन्हो।**
**असुर भयो मति- अंध जबै जल कूपहि दीन्हो॥ १९॥**

**भावार्थ**– नाना प्रकारे छळ करूनही प्रल्हाद देवावरची निष्ठा सोडीत नाही.त्यामुळे राक्षसराजाला सुचेनासे झाले.प्रल्हादाने चेटुक केले की काय अशी त्यास शंका आली.त्यामुळे त्याचा राग अधिकच भडकला.तेव्हा राजाने प्रल्हादाला खोल विहिरीत ढकलून दिले.

**सकल संत रिच्छा**[रक्षण]**करैं, ध्रुव नारदसे साख।**
**जाके राम सहाय्य है, तहाँ भावे कहा राख॥ २०॥**

**भावार्थ**– सर्व संतांचे तसेच ध्रुव-नारदाचे रक्षण केलेल्या परमेश्वराने प्रल्हादाचेही रक्षण केले.ज्याला राम तारी, त्यास कोण मारी?प्रल्हाद राम नाम घेऊ लागला.

**हस्त**[हसत.]**हस्त प्रल्हाद तबौ, चटसाल पधारे।**
**ररं मंमा दोउ अंक, औसर पर फाई उचारे॥ २१॥**

–श्रीसंत रोहिदास, (सत्यदेव शिंदे), पृ.२३९/४०.

**भावार्थ**– प्रल्हाद हसत हसत शाळेत आला आणि ‘रा’ आणि ‘म’ ही दोन अक्षरे उच्चारू लागला.

**लै परतीत परचै**[परिचय.]**भयो**[झाला]**,उपज्यो**[उत्पन्न]**मन विश्वास।**
**और सकल संसार ते, राजा भयो उदास॥ २२॥**

–श्रीसंत रोहिदास, (सत्यदेव शिंदे), पृ.२४०.

**भावार्थ**– प्रल्हादाच्या भक्तिभावाची सर्व जगास प्रचिती आली होती.परंतु यामुळेच राजा मात्र अधिकच दुःखी-उदास झाला.

**हाथ जोर**[जोडून]**प्रल्हाद जबै, देवत में आये।**
**खोजत**[शोधत]**खोजत असूर वहाँ, ही जाय सताये॥ २३॥**

**भावार्थ**– प्रल्हाद देवासमोर हात जोडून प्रार्थना करीत असता, राक्षसराजा त्यास शोधत तेथे आला.

**“जो तोहि राखै सो कहां, मैं ताहि छांड्यो नाहि” ।**

अनुक्रमणिका

**कोमल बचन कुंअर[कुमार]उठि बोले, "मो पति खंभा माहिं" ॥ २४॥**

**भावार्थ**– प्रल्हादास पाहाताच राजाने क्रोधाने विचारले, "तुझा रक्षणकर्ता कोठे आहे?मी त्याला आता सोडणार नाही, "तेव्हा राजकुमार मधुर शब्दांत म्हणाला, "माझा रक्षणकर्ता राम ह्या खांबातसुद्धा आहे."

**करि गहि लीन्हौ खड्ग, बांधि सन्मुख[समोर]है ठाड्यौ।**
**"जो तेरो है राम यहाँ, क्यों नहिं छडावहि तोहिं" ॥ २५॥**

**भावार्थ**– राजा हातामध्ये तलवार घेऊन समोर उभा राहिला व म्हणाला, "तुझा राम तुला सोडवायला आता का येत नाही?"

**"राजा गरव[गर्व]न बोल, राम है गरव-प्रहारी।**
**पूर्ण ब्रह्म हैं सकल मैं, देई मनके ईस॥**
**मोंमें[माझ्यात]तोंमें[तुझ्यात],खड्ग स्वंबमें, पूरि रहै जगदीस॥ २६॥**

**भावार्थ**– प्रल्हाद म्हणाला, "राजा, गर्व करू नकोस, माझा राम गर्वहरण करणारा आहे.राम पूर्णब्रह्म आहे.तो सर्व ठिकाणी आहे.तो जगदीश माझ्यात आहे.तुझ्यात आहे.ह्या खांबातसुद्धा आहे."

**निसिवासर नहि भेद बुद्धि, बल करौ उपाई[उपाय.]।**
**मारौ सोई मारि जो रन, सो बाहर माई॥ २७॥**

**भावार्थ**– प्रल्हाद म्हणाला"राजा, तू रात्रंदिवस उपाय केलेस.बुद्धी लढवून किती प्रयत्न केलेस, तरी प्रभू मरणार नाही.जो त्यास मारावयास जाईल, तोच मरेल."

**अंदर-बाहर न मेरे, क्यों कर आवै हाथ।**
**मति ब्रह्माकी का कहियो, सो तो दीनानाथ॥ २८॥**

–श्रीसंत रोहिदास, (सत्यदेव शिंदे), पृ.२४०.

**भावार्थ**– प्रल्हाद पुढे म्हणाला"तो प्रभू तुझ्या हाती कसा येईल?तू त्यास कसा काय मारणार?मी ब्रह्माचे वर्णन कसे काय करू?तो तर दीनांचा नाथ आहे."

**नरसिंह उठे पाल[रक्षणकर्ता]जग, गरब सब ही मिटि जाई।**
**धरि धरि रहे समाय, ठौर[शिवाय]खाली नही काई॥ २९॥**

–श्रीसंत रोहिदास, (सत्यदेव शिंदे), पृ.२४०.

**भावार्थ**– प्रल्हाद पुढे म्हणाला, "जगाचा रक्षणकर्ता नरसिंह प्रगट झाला तर तुम्हां विरोधकांचा सर्व गर्व नाहीसा होईल.प्रभुने सर्व जग व्यापले आहे.त्याच्याशिवाय काही रिकामे नाही."

अनुक्रमणिका

**वह पूरण सकलमें, कहा बताऊ दूर।**
**तिल धरिये को ठौर, नहीं रयो सकल भरपूर॥ ३०॥**

—श्रीसंत रोहिदास, (सत्यदेव शिंदे), पृ.२४०.

**भावार्थ**—"तो पूर्ण ब्रह्म परमेश्वर सर्व विश्वात भरलेला आहे.तो दूर असल्याचे कसे दाखवू?तो सर्वत्र भरलेला आहे.त्याच्याशिवाय तिळभरही जागा रिकामी नाही." असे प्रल्हादाने सांगितले.

**अस्त भयो है भान, उदै रजनीकर**[चंद्र]**कीन्हा।**
**खंभामें से निकस जाघ, जोधा**[मांडी]**को लीन्हा॥ ३१॥**

**भावार्थ**— इतक्यात खांबातून नरसिंह प्रगट झाला.सूर्यास्त झाला आहे व चंद्रोदय होत आहे.अशा वेळी नरसिंहाने हिरण्यकश्यपुला मारण्यासाठी आपल्या मांडीवर ओढले.

**नख सो उदर बिडारिया, तिलक दिया महाराज।**
**सहादीप नवखण्डमें, तीन लोक भई गाज**[प्रसिद्ध]**॥ ३२॥**

**भावार्थ**— नरसिंह अवतारी प्रभुने आपल्या नखांनी हिरण्यकश्यपुचे पोट फाडून टाकले.अर्थात त्याचा उद्धार केला.सप्तदीप नवखंडात आणि स्वर्ग, मृत्यु व पाताळ ह्या तीन लोकांत त्याची कीर्ती झाली.

**जहाँ जगत को भीर**[संकट]**,तहाँ सब कारज सारे।**
**हमसे अधम उधारि**[उद्धार.]**किये नरकनसे न्यारे॥ ३३॥**

—श्रीसंत रोहिदास, (सत्यदेव शिंदे), पृ.२४०/४१.

**भावार्थ**— जेव्हा जेव्हा जगावर संकट येते.त्या त्यावेळी प्रभु प्रकट होतो.आमच्यासारख्या नीचांचा नरकापासून त्यानेच उद्धार केला.

**सुर नर मुनि गंधर्व, पढै ब्रह्मनिवास।**
**मनसा वाचा कर्मणा, गावै जन रैदास॥ ३४॥**

—श्रीसंत रोहिदास, (सत्यदेव शिंदे), पृ.२४१.

**भावार्थ**— देव मानव आणि गंधर्व सर्व जण ब्रह्माचे गुणगान गातात.संत रोहिदास मन, वाचा व कर्माने त्या अगाध परमात्म्याची कीर्ती गातात.प्रल्हाद लीला ही संवादरचना संत रोहिदासांच्या नावावर पडली आहे.

अनुक्रमणिका

## ५.श्री भक्त रोहिदासांची आरती

आरती रोहिदासा।
प्रभु कनवाळू खासा॥
बोधूनी पुंडलिका।
मनी केला ऐसा॥आरती.॥धृ.॥
जगता ताराया।
पुंडलिका हाती राया॥
आणिला भू वरती।
देव वैकुंठिचा या॥आरती.॥ १॥
वसविली पंढरी।
आपण राहून दूरी॥
जड जीवा तारक तो।
वर देतसे हरी। आरती.॥ २॥
मातृ-पितृ भक्ति।
केली अद्‌भूत ख्याति॥
यास्तव लहरी तुम्हा।
सदा आठवितो चित्ती॥आरती.॥ ३॥

—श्रीभक्त रोहिदास चरित्र (ना.ता.महाजन), पृ.१५९.

अनुक्रमणिका

## आरती

आरती रोहिदासा।
गुरु कैवल्य तेजा॥
करीशी प्रेमभक्ती।
राम प्रसन्न झाला॥आरती.॥धृ.॥
उत्तरी जन्म झाला।
गुरु रविदास नामा॥
अवतार रोहिदासा।
रामानंदाचा प्यारा॥आरती.॥ १॥
भारती संत श्रेष्ठ।
बंधु कबीरा भाई॥
मीराच्या गुरु देवा।
जन संताच्या संता॥आरती.॥ २॥
अवमान पंड्ये करी।
मन विषपण्ण होई॥
बुडवी राम पाण्या।
तो कोदंड धारी॥आरती.॥ ३॥
साधूचे मन चंगा।
कटौती बाहे गंगा॥
पूजिली गंगामाई।
देई सुवर्ण कंगना॥आरती.॥ ४॥
शरण तव चरणी।
पीडा निवारी आता॥
हारी भवतापा।
दीन दयाळू देवा॥आरती.॥ ५॥

श्रीसंत रोहिदास (स.शिंदे) पृ.२५७.

अनुक्रमणिका

# ६.॥श्री रोहिदास वंदना॥

श्री.गणेशाय नमः॥श्री सरस्वत्यै नमः॥श्री रामचंद्राय नमः ।
दंडवत प्रणाम श्री रोहिदासा॥

ॐ नमोजी रघुनंदना। आराध्य दैवत रोहिदासा॥
कृपाळू भगवंत श्री राम। आशास्थान दीन दलितांचे॥ १॥
वंदू रोहिदास चरण। तपाने पावला जो पूर्णब्रह्म॥
द्वैत अद्वैत संपले जेथे। भक्त रोहिदास चरणी॥ २॥
रोहिदास सद्‌गुरू भेटले। आत्मज्ञान सकला लाभले॥
भवसागर तरून गेले। अज्ञानी या जगामाजी॥ ३॥
निर्गुणमय सगुण पूजिले। भक्तिसाठी सगुण व्हावे॥
तत्त्व चिंतनात निर्गुण बोले। रोहिदास ज्ञानीयासी॥ ४॥
धंदा नसे नीच कोणी। करावे सत्प्रवृत्तिने कर्म॥
प्रतिष्ठा राखावी कर्माची। शिकवण रोहिदासांची असे॥ ५॥
कर्म करावे नेटके। आसक्ति नसावी फलामध्ये॥
फल ईश्वराशी अर्पावे। ठेवूनी वृत्ति समाधानी॥ ६॥
प्रभु कृपा हाची ध्यास। कृपेवीन शून्य जीवन॥
भक्तिने प्रसन्न भगवंत। शुद्ध भाव राखावा॥ ७॥
राम नाम हाची मंत्र। रोहिदास दिसला समस्त।
संकटे विरून जातील। ध्यान घेता रामाचे॥ ८॥
रोहिदास जीवन गाथा। जीवन हेची तत्त्वबोधा॥
घडल्या गोष्टी प्रभुकृपेने। संदेश ध्यावा त्यामाजी॥ ९॥
चांभार मातापित्याचे पोटी। जन्मला हा जगजेठी॥
नीच जात हि उंचावली। त्यानी आपुल्या करणिने॥ १०॥
जन्मला आणि राहिला। काशी क्षेत्री आसपासा॥
चर्मावरील धंदा केला। पोट जगविण्यासाठी॥ ११॥
बालपणी लागला छंद। भक्ती आणि सत्संग॥
जनी राहिला उदास। कामधंदा काही करीना॥ १२॥
कमवीं जे संतसेवेत। जमवी जे साधुसेवेत॥
खर्चुनी मोकळा राही। घरी दारिद्र्य अमाप॥ १३॥
आईबाप संतापले। पोर बहुत बिघडला म्हणे॥
लग्न लावून दिले त्याचे। कोवळ्या वयात लोनाशी॥ १४॥
लग्न झाल्यावर पोराचे। संसार करील नेटका॥
अंदाज चुकले सर्व। ध्यान संसारी लागेना॥ १५॥
साधुसंत समागम। रात्रंदिन करी भ्रमण॥
आई बाप पत्नी कोण। क्षिति त्याला यांची नसे॥ १६॥
आला पैसा घालवी। घरी दारिद्र्य वाढवी॥

अनुक्रमणिका

क्रोध अनिवार बापा झाला। घराबाहेरी काढिला॥ १७॥
झोपडी दिली बांधून। शेजारी राहिला रोहिदास॥
मदत लोनादेवीची त्यास॥जुने पाने शिवण्यामाजी॥ १८॥
चांभार असून जातीचा। गंगास्नान चुकले नाही॥
पूजा पाठ प्रातःकाळी। नित्य पूजा चुकली नाही॥ १९॥
कथा किर्तनाचा आनंद। साधु संगे राहून घेई॥
पाय पीट अपार केली। ज्ञानार्जन करण्यासाठी॥ २०॥
जातीचा चांभार म्हणून। शिकविले नाही कुणी॥
जवळ घेऊन शिकविण्यासाठी। सद्‌गुरू भेटला नाही॥ २१॥
ब्रह्मज्ञान मिळविण्याची आस। रूजू लागली मनात॥
शास्त्रज्ञान शिकण्यासाठी। फिरे ज्ञानियांची दारे॥ २२॥
गुरूबीन ज्ञान नाही। सद्‌गुरूची ओढ लागे॥
कबीर भेटता सांगे त्यासी। रामानंद गुरू करावा॥ २३॥
ज्ञान यज्ञ झाला सुरू। रामानंद जवळी बसुनी॥
ब्रह्माची धरती वाट। भक्तिमार्गी जाता जाता॥ २४॥
गुरू रामानुजांचा शिष्य। रोहिदास परमभक्त॥
भक्तिने भेटला भगवंत। रोहिदास झाला ज्ञानी॥ २५॥
अनंतानंद कबीर सुखानंद। सुरसुरी पद्‌मापति नरहरी॥
पीपा भावानंद धन्ना। गुरूबंधू त्यासी भेटले॥ २६॥
जातीचा असुन चांभार। धर्मशास्त्र वदे पांडित्य॥
चर्मावरी करी काम। आवडीने प्रभुसाठी॥ २७॥
संत मीरा शिष्या झाली। राणी झालीस दीक्षा दिली॥
शिष्यगणांचा मेळा दाटे। रोहिदास चरणी सर्वदा॥ २८॥
ब्राह्मण पंडित ब्रह्मज्ञानी। रोहिदासासी वाद घाली॥
तृप्त होई वादाअंती। ब्रह्मज्ञान त्याचे पाहोनी॥ २९॥
काशीचे ब्राह्मण कर्मठ फार। सहावेना त्यांचे ब्रह्मज्ञान॥
अवमान करूनी क्षणोक्षणी। गुरू रोहिदासा छळियले॥ ३०॥
चांभार कसला ब्रह्मज्ञानी। आहे थोडे दाखवी भारी॥
धर्मशास्त्रात उमजे काय। ब्राह्मणास अधिकार तो असे॥ ३१॥

* * *

परीक्षा करण्या रोहिदासाची। ब्राह्मणांनी पण लविला॥
भक्तिमध्ये श्रेष्ठ कोण। विप्र पंडित की रोहिदास॥ ३२॥
मूर्ति भगवंताची मधे। आणील जो भक्तिने आपणाकडे॥
तोची समजावा भक्त श्रेष्ठ। कसोटी आता रोहिदासाची॥ ३३॥
काशी नरेशाचे दरबारी। विप्र पंडित आणि रोहिदास॥
प्रभूची आळवणी करी। हृदय जाई पिळवटुनी॥ ३४॥
भक्तिचा महिमा अगाध। रोहिदास मांडिवरी हरीं वसत॥
ब्राह्मण लाजले या भक्तिने। रोहिदास गहिवरला प्रेमाने॥ ३५॥

अनुक्रमणिका

रामानंद आणि शिष्यगण। जगन्नाथे दर्शनासाठी॥
एके दिवशी आले सर्व। पुरीच्या जगन्नाथे मंदिरी॥ ३६॥
ब्राह्मणांनी स्वागत केले। जगन्नाथे दर्शन दिधले॥
भोजन आयोजिले ब्राह्मणांनी। रामानंद स्वागतासाठी॥ ३७॥
ब्राह्मण नाराज झाले। शिष्यगणात चांभार पाहूनी॥
म्हणे पंक्तिमध्ये नसावा। चांभार रोहिदास हा॥ ३८॥
शिष्यांसह आम्ही जेवू। रामानंद दुःखाने म्हणाले॥
ब्राह्मणांनी जेवावे स्वतंत्र। पंक्ति घालूनी दुसरीकडे॥ ३९॥
शिष्यगण आणि रामानंद। रोहिदास समवे जेवत॥
ब्राह्मणांचे पंक्तिमध्ये गडबड सुरूजहाली॥ ४०॥
दोन ब्राह्मणामध्ये रोहिदास। अनेक रोहिदास जेवले॥
एक जेवतो रामानंदासह। ब्राह्मण पाहून लाजले॥ ४१॥

* * *

ज्ञान मिळविले अपार। दारिद्र्य आणि कष्ट भारी॥
दया येऊन भगवंतास। साधुवेषांत पातला॥ ४२॥
परीस दिला साधुने। रोहिदास म्हणू लागले॥
स्पर्शिता लोखंडास याने। सुवर्ण त्याचे होईल॥ ४३॥
रोहिदास म्हणे साधुस। नको परीस आणि पैसा॥
संतोष हीच संपत्ती। अमाप मजजवळी असे॥ ४४॥
साधुने आग्रह धरिला। परीस छपरी खोविला॥
म्हणे संकटकाळी याने। सुवर्ण करून घ्यावे॥ ४५॥
रोहिदास संतुष्ट साधक। परीस छपरी विसरला॥
प्रभु परत येऊनी पाही। परीस जैसाची तैसा॥ ४६॥
गरीबी घालविण्या रोहिदासाची। प्रभुला कळवळा भारी॥
पूजेच्या तबकात टाकी। मोहरा सुवर्ण पाच॥ ४७॥
तबकात सुवर्ण मोहरा। डोळे उघडिता पाहिल्या॥
रोहिदास घाबरला भारी। काय करावे सुचेना॥ ४८॥
दृष्टांत दिला प्रभुने। मोहरा प्रसाद म्हणून घे॥
आज्ञा प्रभूची मानून। मोहरा त्याने स्विकारल्या॥ ४९॥
मोहरा मोडूनी पाच। बांधले सत्संग भवन॥
मंदिर उभारले प्रभुचे। कथा कीर्तने करण्यासाठी॥ ५०॥

* * *

प्रयागला कुंभ पर्वणि। स्नानासी झाली दारी॥
रोहिदास शिष्य समवेत। गंगा स्नानाशी गेले असे॥ ५१॥
कुचकट ब्राह्मण जमले। रोहिदासासी म्हणू लागले॥
तू कसलारे भक्त। चांभार चालाख तू॥ ५२॥
जर असशील खरा भक्त। तरू दे पाण्यावर शालिग्राम॥
नाहीतर फुकाची वटवट। धर्म नावे करितोसी॥ ५३॥

अनुक्रमणिका

लाकडाचे शालीग्राम विप्रांचे। रोहिदासाचा असे दगडाचा॥
दगड का तरेल पाण्यावर। खोच उमगली रोहिदासा॥ ५४॥
नको म्हणे रोहिदास। नको असली शर्थ लावणे॥
प्रभुला दंड का देता। आमुच्या भक्तिसाठी॥ ५५॥
ब्राह्मण हट्टास पेटले। रोहिदासासी निंदु लागले॥
परिक्षा भक्ताची पहाण्या। लोक आतूर जहाले॥ ५६॥
रोहिदासे पूजिला शालिग्राम। भक्तिभावे पाण्यावरी सोडला॥
ब्राह्मणांचे बुडाले सर्व। रोहिदासांचा तो तरंगला॥ ५७॥

* * *

गंगाकाठी कीर्तन चाले। रोहिदास भजनी रंगले॥
राम नामाची महती सांगे। कथा निरुपण करोनी॥ ५८॥
माया असे अती दारुण। संसारात वाढवी ताप॥
भवसागर तरण्यासाठी। राम नाम हाची मंत्र॥ ५९॥
उद्धट ब्राह्मण जमले तेथे। किर्तनात विघ्न आणिले॥
म्हणे खोटारडा रोहिदास। कसले घेता राम नाम॥ ६०॥
भवसागर राहु द्या दूर। दगड तरू दे पाण्यावर॥
दाखव रामनामाची प्रचिती। सत्य असत्य प्रत्ययी॥ ६१॥
रोहिदासे दगड घेऊन। लिहविले त्यावरी रामनाम॥
पुण्यस्मरण करूनी रामाचे। सोडिला तो गंगेमाजी॥ ६२॥
लीला अगाध रामाची। तरंगला तो पाण्यावरी॥
झाले लोक आश्चर्यवत। पाहुनी रामनामाचा प्रताप॥ ६३॥

* * *

संत मीरा शिष्या मोठी। काशी येऊनी गुरुस भेटे॥
चितोड येण्यासाठी। निमंत्रिला गुरु रोहिदास॥ ६४॥
यात्रा करीत रोहिदास। चितोडी मीराप्रती आले॥
शिष्या प्रसन्न झाली। स्वागत केले गुरुचे॥ ६५॥
मीराने भोजन घातले। केला सन्मान गुरुचा॥
ब्राह्मणांनी अव्हेरिले भोजन। चांभार नको पंक्तिमाजी॥ ६६॥
मीरा दुखवली बहुत। ब्राह्मणांशी मग बोलली॥
विप्राने स्वतंत्र बसावे। आम्ही बसू एकिकडे॥ ६७॥
ब्राह्मणांची पंक्ति बसली। रोहिदास दुजा पंक्तिला॥
झाले वाढणे सुरू। रोहिदास ब्राह्मणा वाढले॥ ६८॥
चमत्कार प्रभुने केला। रोहिदास तर जेवत आहे॥
झाले चकित ब्राह्मण। कैसा वाढी रोहिदास॥ ६९॥
ब्राह्मण लाजले बहुत। रोहिदास चरणी लागत॥
मीरा संतोषली मनात। गुरुचे विविध रुप पाहुनी॥ ७०॥
भगवंते राखिली लाज। रोहिदास परी अती उदास॥
अवमान नशीबी आला। चांभार म्हणूनी अव्हेरती॥ ७१॥

अनुक्रमणिका

ज्ञान तप न पाहता। जाती पोटी होते निंदा॥
रोहिदास कोपले भारी। राग काढी रामावरी॥ ७२॥
घेऊनी मुर्ति रामाची। रागाने गंगेत फेकली॥
रामाशी बुडविले गंगेत। काय केले कळेना॥ ७३॥
पश्चाताप मनी जाहला। वाहु लागल्या आश्रुधारा॥
गंगाकाठी बसून उदास। रडू लागले रोहिदास॥ ७४॥
वृद्ध झालोतरी निंदा। अपमान आता सोसवेना॥
अपार सहन केला छळ। आता जीणे नको म्हणे॥ ७५॥
राम राम कष्टलो म्हणे। नाम घेऊनी रडू लागे॥
रामावाचून कोणी नाही। लाज राखण्या भक्ताची॥ ७६॥
शोक करीत गंगेकाठी। राममूर्ति तरंगत आली॥
राम पाहोनी साक्षात। कवटाळले हृदयाशी त्याने॥ ७७॥
रोहिदासे मुर्ति घेतली। चितौडी मंदिरी स्थापणेशी॥
कुम्भन शामजी मंदिरी। प्रतिष्ठेयिली गुरु शिष्येने॥ ७८॥

* * *

गंगा स्नान गंगा पूजा। नित्यनियम चुकला नाही॥
भक्ति मनोभावे केली। रोहिदासे गंगामाईची॥ ७९॥
मांडौगढी गेले रोहिदास। गंगेसाठी भोजन नियोजिले॥
आमंत्रिले गंगेस भोजना। गंगा स्वीकारी प्रेमाने॥ ८०॥
राजा सरदार मांडौगढचे। समस्त जन आणि पंडित॥
भोजना लागी निमंत्रिले सर्व। आग्रह भारी जाहला॥ ८१॥
पंक्ति बसल्या जेवणालागी। सुंदर युवती गंगा झाली॥
येऊनी बसे पंक्तिमाजी। जेवू लागली संतोषे॥ ८२॥
संपले भोजन सर्वांचे। युवती उठली जेवूनी॥
आज्ञा घेऊनी रोहिदासाची। नमस्कारोनी चालली॥ ८३॥
सौंदर्यवती युवती पाहून। राजा भुलला अपरिमित॥
रोहिदासास आज्ञा करून। चौकशी करू लागला॥ ८४॥
रोहिदास घाबरले बहुत। संकट ठाकले समोर॥
युवती आणूनी दे सत्वर। राजाज्ञा झाली रोहिदासा॥ ८५॥
जर अव्हेरली आज्ञा। राजा गर्जतो रोहिदासा॥
लग्न अव्हेरिले युवतीने। तर सजा तुला देहदंडाची॥ ८६॥
गंगाकाठी रोहिदास येत। झाला वृत्तांत कथिला तीस॥
देहदंड सोसतो म्हणे गंगेस। विटंबना गंगेची न व्हावी॥ ८७॥
चाणाक्ष गंगामाई बहुत। रोहिदासासी समजावीत॥
म्हणाली येते लग्नासाठी। सांगा राजालागी सत्वरा॥ ८८॥
राजा उतावीळ बहुत। वरात घेऊनी निघाली स्वारी॥
यजमान बनविले रोहिदासा। गंगेकडील लग्नासाठी॥ ८९॥
शृंगार करून गंगा आली। नृप हरपला सौंदर्याने॥

अनुक्रमणिका

आदराने विनवित गंगेला। पालखी माजी बैसण्यासी॥ ९०॥
कडाडली बिजली जैसी। उडी घेतली सरोवरी॥
गंगा लुप्त झाली जलामाजी। कळवंडले सर्व आकाश॥ ९१॥
प्रचंड प्रवाह वाहू लागे। नृपासह लोक नष्ट झाले॥
गंगेचा कोप विक्राळरूप। उरले एक रोहिदास॥ ९२॥

*            *            *

एक पर्वामाजी ब्राह्मण। गंगास्नानाशी चालला॥
तुटला जोडा चालताना। आला तो रोहिदासा घरी॥ ९३॥
रोहिदास भजनामाजी दंग। जोडा शिवता शिवता॥
संतोषला ब्राह्मण अपार। ऐकता भजन रोहिदासांचे॥ ९४॥
जोडा झाला शिवून। ब्राह्मण देइ दमडी काढून॥
मजुरी रोहिदासास देता। संतोष बहु जाहला॥ ९५॥
ब्राह्मण बोले चांभारास। दिसतोसी मोठा भक्त॥
चलावे गंगा स्नानास। पर्वणी मोठी आली असे॥ ९६॥
रोहिदास विनयाने सांगत। सत्कर्म हेच गंगास्नान॥
रोज अनुभवी गंगास्नान। घरी राहुनी मी येथे॥ ९७॥
स्वच्छ मनात गंगा वाहे। सत्कर्मात गंगा वाहे॥
अखंड गंगा वाहे। माझे घरी प्रेमाने॥ ९८॥
ब्राह्मण चालला गंगेप्रती। रोहिदास त्यासी वदला॥
दमडी माझी वहा गंगेला। तू स्नान केल्यावरी॥ ९९॥
रोहिदासाची दमडी घेऊन। ब्राह्मण पातला गंगेवर॥
स्नान करून झाल्यावरी। आठवण दमडीची झाली॥ १००॥
दमडी काढून रोहिदासाची। गंगेशी बोलला ब्राह्मण॥
घे चांभाराची दमडी। रोहिदासे प्रेमे दिली॥ १०१॥
हात उंचाऊनी गंगेने। दमडी झेलली हातात॥
स्तंभित झाला ब्राह्मण। गंगेचा दिव्य हात पाहूनी॥ १०२॥
गंगामाई संतोषे बोलली। हाती कंगन घेऊनी॥
रोहिदांसाप्रति दे कंगन। माझा प्रसाद म्हणुनी॥ १०३॥
सुवर्ण कंगन प्रकाशमय। ब्राह्मण सत्वरे घेत॥
रोहिदासा देण्यासाठी। नमस्कार करूनी निघाला॥ १०४॥
मन फिरले ब्राह्मणाचे। चांभरा का द्या कंगन॥
त्यास काय ठावू की। मार्ग बदलूनी चालिला॥ १०५॥
सराफा घरी जावून। ब्राह्मणाने विकला कंगन॥
पैसे घेऊनी निवांत। घरी आनंदे परतला॥ १०६॥
सराफ विचार करी। कंगन एवढा भारी॥
ग्राहक योग्य घेण्यास। राजाशिवाय दुजा नसे॥ १०७॥
सराफ राजगृहीजावूनी । कंगन राजास दाखवी॥
राजा संतोषला मनोमना। कंगन सुंदर पाहोनी॥ १०८॥

अनुक्रमणिका

राजाने घेऊन कंगन। राणी प्रति बोलला॥
अती सुंदर कंगन हा। तुझ्यासाठी घेतला असे॥ १०९॥
कंगन पाहाता राणीने। अति आनंदे बोलली॥
याचा जोडी हवा मज। घेऊनी यावी झडकरी॥ ११०॥
राजाशी पडला पेच। दरबारी बोलवी सराफ॥
दुसरा जोडी देण्यासाठी। फार्माविले त्यास राजाने॥ १११॥
राजाशी कथिले सराफाने। ब्राह्मणे कंगन आणियला॥
ब्राह्मण बोलवा तात्काळ। त्यासी कंगन मागावा॥ ११२॥
राजाने धाडिले शिपाई। आणिला पकडूनी ब्राह्मण॥
घाबरता ब्राह्मण भारी। अपराध काय केला म्हणोनी॥ ११३॥
राजाने फर्माविले ब्राह्मणा। आणावा जोड कंगनाचा॥
चोरला कोठूनी सांग त्वरी। सुळावर तुला चढवितो॥ ११४॥
कथिला वृत्तांत ब्राह्मणाने। गंगामाईची असे देणगी॥
मातेने दिधली रोहिदासा। चोरूनी मी आणली असे॥ ११५॥
राणीने धरला हट्ट। जोड हवा तीज सत्वरी॥
ध्यास कंगनाचा घेतला। अन्नपाणी वर्ज केले॥ ११६॥
विप्र रोहिदासाकडे पातला। पाय त्यांचे धरूनी कथिला॥
दमडिची किमया सांगून। वृत्तांत त्यासी सांगितला॥ ११७॥
शरण आला ब्राह्मण। पाय धरुनी राहिला॥
क्षमा मागे ब्राह्मण। कंगन देण्या विनवितसे॥ ११८॥
रोहिदास गुरु सर्वांचा। क्षमा शील गंगा भक्त॥
गंगाकाठी सत्वरी चला। ब्राह्मण बोले रोहिदासा॥ ११९॥
रोहिदास हंसून बोले। तुवा सत्य कथन केले॥
गंगेची प्रार्थना करून। कंगन मागू येथेची॥ १२०॥
रोहिदासे जोडिला हात। गंगेची प्रार्थना करीत॥
लोचने मिटूनी शांत। प्रतिक्षा करी गंगेची॥ १२१॥
रोहिदास जोडे शिवत। होता बसला पडवी माजे॥
लोना देवी होती शेजारी। कौतुके सर्व पाहे॥ १२२॥
कुंडामधून पाण्याच्या॥हात दिव्य गंगामाईचा॥
कंगन घेऊन ठाकला। पुढे पडला प्रकाश॥ १२३॥
कंगन गंगामाईने दिला। जोडी पहिल्या कंगनाचा॥
चर्म कुंडामधून गंगा प्रगटे। रोहिदास भक्तासाठी॥ १२४॥
राजा संतोषाला ऐकूनी। कंगन कुंडातून मिळाला॥
राणीसह दर्शनार्थ धावला। रोहिदास चरणी लागे॥ १२५॥

* * *

गुरुमंत्र रोहिदासे दिला। माता पित्याची सेवा करी॥
परमभक्त जाहला। काशी रामेश्वर येती घरी॥ १२६॥
पुंडलिके सेवा केली। पुंडलिका दीक्षा दिली॥

अनुक्रमणिका

आईबाप सेवे माजी। पांडुरंग उभा युगेयुगे॥ १२७॥
पांडुरंग पंढरी आहे। ठेवून कटीवरी हात॥
अजूनी तिष्टतो तेथे। पुंडलिका भेटीसाठी॥ १२८॥
धन्य रोहिदास गुरु। सर्व भक्ताते उद्धरू॥
चांभार जन्मूनी जगती। स्वंय परब्रह्म जाहला॥ १२९॥
* * *

ऐकला बहु सिकंदर लोदीने। रोहिदास महिमा लोकामाजी॥
दिल्लीपतीस राग भारी। हिंदू साधू आणि संतांचा॥ १३०॥
लोदी कशीस आला। फर्मान काढले स्वहस्ते॥
द्यावे हत्तीचे पायी। गुरु रोहिदासा लागी॥ १३१॥
रोहिदास मनी घाबरले। अपराध म्या काय केला॥
वृद्ध आणि कृशमूर्ति। उभी ठाकली रस्त्यावरी॥ १३२॥
हत्ती घातला माहुताने। अंगावरी रोहिदासाच्या॥
तेज पाहता गुरुचे। हत्ती क्षणभर थबकला॥ १३३॥
रोहिदास चरणी येऊनी। हत्तीने टेकिले मस्तक॥
दिल्लीपती सिकंदर लोदी। झाला खजिल बहु मनात॥ १३४॥
* * *

संत मीरा काशी आली। सद्‌गुरुशी प्रार्थना करी॥
लोना मातेसह यावे। चित्तोडी राहण्यासाठी॥ १३५॥
देह खंगला तपस्येने। जीवन मुक्ति लाभली तया॥
बनारस सोडिले आता। चित्तोडा सपत्निक आले॥ १३६॥
गुरु आले मीरा घरी। मीरा नाचे संतोषुनी॥
गुरु लाभे जन्मांतरी। गुरु असे परब्रह्म॥ १३७॥
रोज चाले पूजा पाठ। प्रार्थना आणि कीर्तन॥
बोल अमृताचे सांगे। गुरु सर्वा रोहिदास॥१३८॥
प्रार्थनेमाजी एकदा। ब्राह्मण झाले बहुक्षुब्ध॥
म्हणे नसे हा ब्राह्मण। धर्म ज्ञान देण्यायोग्य॥ १३९॥
जात पातीवरून जेव्हा॥ब्राह्मण हिणवी गुरुला॥
कडाडले रोहिदास। वीज जणू अंबरी॥ १४०॥
अवमान सहन होईना। ब्राह्मणत्व कसे काय॥
जन्माने कोणी असो। ज्ञानाने ब्राह्मण मी॥१४१॥
रोहिदास म्हणे विप्रासी। पहा स्वतः डोळ्यांनी॥
जानवे माझे पहावे। ब्रह्मज्ञानी ब्राह्मण मी॥ १४२॥
धारदार रापी घेऊनी। चिरली छाती उभी त्यांनी॥
चामडीखाली तळपले। दिव्य जानवे तेजाने॥ १४३॥
या तेजाच्या ज्योती। निघाल्या बहु दिगंतात॥
ज्योतीसवे रोहिदास। निघाले स्वयं दिगंतात॥ १४४॥
लोक डोळ्यांनी पाहती। ज्योती वैकुंठी चालती॥

अनुक्रमणिका

उरले धरिली ठसे। रोहिदास चरणांचे॥ १४५॥
लोक चरण खुणा पूजती। धन्य गुरु धन्य ब्रह्म॥
कोणी सांगावयास गेले। लोना देवीस ही स्थिती॥ १४६॥
लोना देवी पहाता पहाता। देह सोडूनी चालली॥
पतिसवे साध्वी लोना। दिगंतात विलिन झाली॥ १४७॥
उचनीचता संपली। रोहिदास उंचावले दिगंती॥
चर्म दिगंती निघाले। कर्म राहिले भूवरी॥ १४८॥
भगवंत भक्तिचा भुकेला। भक्ति रोहिदासाने केली॥
दिव्य ज्योती रुपाने। राम अलिंगी सत्वरी॥ १४९॥
आत्मा झाला विलिन। राम परमात्म्यात दृष्टीसमोर॥
राममय झाले दिगंत। रोहिदासा घेई उंचावूनी॥ १५०॥
सत्यदेव वंदन करी। गुरु रोहिदासा चरणी॥
भावे पूजा रोहिदास। मुक्ति लाभण्या जगामाजी॥ १५१॥

॥इति श्री रोहिदास वंदना समाप्त॥

* * *

श्रीसंत रोहिदास (सत्यदेव शिंदे), पृ.२५९.

* **टीप.**—क्रमांक १२७ ते १२८ रद्द समजावे; कारण संतरोहिदासाचा व पुंडलिकाचा काळ वेगवेगळा असल्यामुळे भेट होणे शक्य वाटत नाही.

## ७.समालोचन

संत रोहिदासाच्या काळी म्हणजेच चौदाव्या शतकात भारताची सामाजिक, धार्मिक, राजनैतिक व आर्थिक स्थिती अत्यंत बिकट होती.राजनैतिक अस्थिरतेमुळे गरिबी अंतिम सीमेस पोहचली होती.दलितांवर उच्च नीच तसेच जातीपातीच्या नावावर नाना प्रकारचे अत्याचार केले जात होते.अस्पृश्यांना प्रभुपूजा करण्याचा अधिकार नव्हता.वर्णाधिष्ठित समाजरचना व सुलतानी सैतानी यांच्या कात्रीत भारत देश सापडला होता.धर्मांध, जातीवादी, रुढीवादी, अंधविश्वासू व भोळ्याभाबड्या जनतेला कोणी तरी मार्गदर्शक हवा होता.अशा वेळी संत रोहिदासांचा जन्म विक्रम संवत १४३३ मध्ये (सन १३७६) माघी पौर्णिमेस रविवारी बनारसजवळ झाला, संत रोहिदासांच्या कुलवृत्तांताची कथा चँवर पुराणात आहे.तिचा सारांश ह्या ग्रंथामध्ये दिला आहे.

संत रोहिदासांच्या पदावरून त्यांचा जन्म मांडूर गावात झाला होता.आज बनारसनजिक मंडेसर, नावाचा सुकलेला तलाव दिसतो.तेथे पूर्वी मांडव ऋषीचा आश्रम होता.अनंतदासांच्या रैदास परिचर्या वरून याच जन्मस्थानास पुष्टी मिळते.'रैदास रामायण' मध्ये 'काशी ढिगमांडूर स्थाना' असा उल्लेख आहे.बऱ्याच विद्वानांनी संत रोहिदासांचे जन्मस्थान 'मंडू आडिह' अर्थात 'मांडूर' स्थानाचा उल्लेख केला आहे.तेथील लहरतारा तलावामागील मांडूर गावी लिंबाच्या झाडाखाली एका हातात कमंडल आणि दुसऱ्या हातात परशु घेतलेल्या वीर-देवतांच्या अनेक मूर्ती तसेच पडलेल्या मंदिराचे अवशेष दिसतात.

संत रोहिदास मंडुआडिह (मांडूर) येथे जन्मले असावे आणि त्यांनी काशी नरेशचे निवासस्थान राजघाटाजवळ धर्मपरीक्षा दिली.तेथेच सिकंदर लोदी या तुर्क बादशहाने तसेच काशीच्या पुरोहितांनी त्यांची परीक्षा घेतली होती.ग्रंथाधार व जनाधार तसेच कबीर संबंधांवरून संत रोहिदासाचा जन्म मांडूर येथेच झाला हे सिद्ध होते.संत कबीर व रोहिदासांचे जन्मस्थान मांडूर ऊर्फ मंडुअडिह येथे चामड्याचा धंदा करणारे 'ढोर ढोवंत' चर्मकारांची बरीच वस्ती होती.त्यामध्ये चमकटैया चर्मकार कापड विणणारे कोरी (चांभाराची उपजात) राहात होते.कबीर हे कोरी (मुस्लीम वंश) मध्ये व रोहिदास विख्यात चांभार वंशात जन्मले.या दोघा संतांनी एकाच आईचे दूध प्याले होते.

संत रोहिदास हे भक्त कबीर, संत सेना, संत धन्ना, सदना ह्या संतांबरोबर तसेच सिकंदर लोदी, बीरसिंह बंदोल या राजा-बादशहांचे समकालिन होते यात शंकाच नाही.विक्रम संवत १४३३ (इ. स. १३७६) मध्ये माघ पौर्णिमेस रोहिदासांचा जन्म चंद्रवंशीय चर्मकार कुटुंबात झाला.त्यांचा जन्म रविवारी झाला म्हणून त्यांचे नांव 'रविदास' ठेविले.तेथील लोक त्यांना 'रैदास' तर महाराष्ट्रातील लोक त्यांना 'रोहिदास' म्हणू लागले.

संत रोहिदास हे श्रमजीवी चांभार व कवी होते.त्यांना बालपणापासून प्रभुभक्तिचे वेड होते.बालपणी त्यांनी गंध लावणे.जपमाळांचा उपयोग करणे इत्यादी बाह्याचार केले असावेत.रोहिदास सात वर्षांचे असताना नवविधा भक्तिचे रहस्य त्यांना समजू लागले होते.त्यांच्या वडिलांचे नाव 'रघु' किंवा 'राघव' होते.त्यांच्या आईचे नाव 'करमा' किंवा 'घुरबिनिया' होते.त्यांच्या पत्नीचे नाव 'लोना' किंवा 'लोमा' होते.चर्मकार समाज पुरातनकाळापासून ज्या लोना देवीची पूजा करीत होता.त्या यक्षिणी अष्टमातांचे रूपांतर चंडी, चामुंडा, काळीमाता इत्यादींमध्ये झाले.रोहिदास पत्नी लोना ही दैवीकरण प्रक्रियेत लोकदेवी बनली.

अनुक्रमणिका

रोहिदास पत्नी लोना एक परम साध्वी स्त्री होती.रोहिदासांचे श्रमजीवी साधुत्व आणि काव्यरचनेत तिने दुःख सहन करून योगदान केले व ती देवी बनली.

रोहिदास अनवाणी साधुसंतांचे पायात फुकट जोडे घालू लागला.म्हणून त्यांचे वडिलाने दोघा पतिपत्नीस घरातून वेगळे काढले.तेव्हा रोहिदास वेगळी झोपडी बांधून पत्नीसह राहू लागला.तसेच चांभारकाम करीत उदरनिर्वाह करू लागला.

रोहिदासाच्या घरची गरिबी पाहून एका साधूने त्यास मोठ्या आग्रहाने परीस-दगड दिला.परंतु रोहिदासांनी लोखंडाचे सोने बनविण्यासाठी त्याचा उपयोग केला नाही.परंतु परिश्रम करून त्यांनी कपाळास आलेला घाम पुसण्यासाठी रापीचा उपयोग केला.तेव्हा ती रापीच सोन्याची बनल्याचे ऐकावयास मिळते.ती रापी सोन्याची बनली की नाही हे माहीत नाही.परंतु रोहिदासांची आर्थिक परिस्थिती थोड्याच दिवसांत चांगलीच सुधारली हे मात्र खरे.

संत रोहिदास निरंजन निर्विकार ब्रह्माचे उपासक होते.ते सत्य हाच नारायण मानीत होते.असत्यासारखे पाप नाही.जो ब्रह्म जाणतो तोच ब्राह्मण होय.जन्माने कोणीही उच्चनीच नसतो.तर तो कर्माने होतो.परमेश्वर एक आहे.निरनिराळ्या जातीधर्मांसाठी परमेश्वर निरनिराळा असू शकत नाही.सर्व माणसे एकाच परमेश्वराची लेकरे आहेत.अंतर्मुखी पूजा हीच परमेश्वराची खरी पूजा होय.नामभक्ती हीच खरी जीवन साधना अशी संत रोहिदासांची शिकवण होती.संत रोहिदास हे बनारसच्या गोपाळ मंदिराच्या पवित्र प्रांगणात बसून साधना करीत होते.गोपाळ मंदिरातील तुलसीगुंफा वास्तविक त्यांचीच आहे.करण रोहिदासांनी तेथे जोडे शिवत माधवास संबोधून दहा प्रसिद्ध पदे रचली.त्यामुळे त्यांना खूप प्रसिद्धी मिळाली.

संत रोहिदासांचे जीवन चरित्र अनेक चमत्कारांनी भरलेले आहे.त्यात कदाचित अतिशयोक्ति असू शकेल.कारण चमत्काराशिवाय कोणी नमस्कार करीत नाही.काही चमत्कार श्रद्धेमुळे खरे वाटतात.तर काही चमत्कार ईश्वरभक्तिमुळे.आता आपण उदाहरणादाखल एका चमत्काराचे विश्लेषण करू या.

एका श्रीमंत विधवेच्या एकुलत्या एक मृत मुलास संत रोहिदासांनी जिवंत केले.ह्या चमत्कारात मुलगा पूर्ण मेला नसून, मेल्याप्रमाणे बेशुद्ध पडला असावा.तो मेला असे समजून घाबरून आईने मुलास उचलून संत रोहिदासांकडे आणले व रोहिदासांनी त्यास पाणी पाजून शुद्धीवर आणला असावा.असे चमत्कार त्यांचे जीवनात बरेचसे झाले आहेत.तरीसुद्धा मी बुद्धिवादी शैलीने हा ग्रंथ लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

संत रोहिदासांच्या कथा कीर्तनात त्यांचा अपमान करणाऱ्या शेठला कोड भरणे, गंगामाईने रोहिदासांसाठी कंकण देणे, कुंडातून रोहिदासांसाठी गंगा उत्पन्न होणे (मन चंगा, तो कठौती में गंगा) संत रोहिदासांनी आपल्या सत्य वागणुकीने अनेक जलतीर्थांस गंगामाईची प्रतिष्ठा मिळवून दिली.संत रोहिदासांची गंगामाईवर अनन्य भक्ती होती.दस अनुश्रृतिमध्ये गंगापुत्राच्या रूपात रोहिदासांची प्रतिष्ठा केली आहे.राणासांगा, संत मीरा, झाली राणी, राणी योगवती, दयाबाई, सहजीबाई, सदनपीर, गरीबदास, कल्याणदास, हरिदास, सुंदरदास, दर्शनदास इत्यादी कितीतरी प्रसिद्ध अप्रसिद्ध व्यक्तिंनी संत रोहिदासांचे शिष्यत्व पत्करले.

अनुक्रमणिका

संत रोहिदासांनी गुरु रामानंदांबरोबर गांगरोन, जगन्नाथधाम, रामेश्वर इत्यादी ठिकाणी तीर्थयात्रा केली तर त्यांनी स्वतः मथुरा, वृंदावन, हरिद्वार, मुलतान, चित्तोड, तिरुपती इत्यादी ठिकाणी यात्रा केली आहे.संत रोहिदास पंजाब, गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र इत्यादी राज्यांत उपदेश करण्यास गेले होते.तेव्हा त्यांचेबरोबर गेलेले चर्मकार बांधव आजही रोहिदास गादी आणि डेरे बनवून रोहिदासांच्या साधुयात्रेस सुरक्षित राखले आहे.धार राजाची छत्री चित्तोडच्या कुंभश्याम मंदिरात आजही आहे.याप्रमाणेच तिरूपतीमध्ये बालाजी पर्वताखाली वैकुंठ कुल नामक ठिकाणी त्यांची गादी आहे.मथुरा, वृंदावन, आग्रा, दिल्ली इत्यादी किती तरी ठिकाणी रोहिदासांचे मठ, मंदिरे व आश्रम आहेत.संत रोहिदासांच्या महात्म्यामुळे रोहिदासांच्या चांभार जातीवर उच्च वर्णियांकडून होणारा अन्याय थोडा कमी होत चालला आहे.संत रोहिदासांना साधुत्व व साहित्यामध्ये प्रतिष्ठीत होण्यास केवढी मोठी लढाई लढावी लागली असेल.त्यांची कविताच त्यांच्या व्यक्तित्वाचे खरे प्रतिनिधित्व करीत आहे.

काही विद्वानांचे मते, संत रोहिदास काशीमध्ये राहून ब्राह्मण पंडितांबरोबर संघर्ष करीत ब्रह्मलीन झाले.तर काही विद्वानांचे मते शेवटची पंधरा वर्षे चित्तोडला राहून ब्राह्मणांशी टक्कर देत मानव धर्माचा प्रसार करीत होते.कुंभश्याम मंदिरात स्वतः रचलेली आरती म्हणत असता,तेथील सनातनी ब्राह्मणांनी त्यांचेवर घातक प्रहार केला आणि त्यातच त्यांचा अंत विक्रमी संवत १५८४ (सन १५२७) मध्ये झाला.त्यावेळी त्यांचे वय १५१ वर्षांचे होते.रोहिदास संप्रदायी रोहिदास पुण्यतिथि चैत्र वद्य चतुर्दशीस साजरी करतात.त्यांच्या पादुका जेथे पडल्या तेथेच त्यांची समाधी कुंभश्याम मंदिरासमोर बाजूस बांधली आहे.समाधीवर रोहिदासांची चरणचिन्हे आहेत.संत रोहिदासांनी शिष्यांकडून लिहून घेतलेले दोहे व पदांची हस्तलिखिते सनातनी ब्राह्मणांनी चित्तोडलाच नष्ट केली असावीत.कारण तेथील ब्राह्मण रोहिदासास राजाश्रय मिळाल्यामुळे त्यांचेवर फार जळत होते.

संत रोहिदासांचे दोहे व पदांची रचना उच्च कोटीची आहे.त्यांच्या रचनेत संस्कृत व फारशी शब्दांचा उपयोग केलेला आहे.संत रोहिदासांना लिहिता वाचता येत नव्हते.परंतु रोहिदासांच्या शिष्यांनी त्यांनी रचलेली पदे व दोहे स्मरणाने लिहिलेले असावेत.रोहिदासांनी आपल्या काव्यातून विविध विषयांवर सांगोपांग चर्चा केली आहे.त्यांची विचारधारा त्यांच्या काव्यातून दिसून येते.

मी ह्या ग्रंथामध्ये संत रोहिदासांचे जास्तीत जास्त दोहे २३० व १७९ पदांचा समावेश केला आहे.तसेच हिंदी दोहे व पदाखाली त्यांचा भावार्थ मराठीत सोप्या भाषेत लिहिला आहे.तसेच त्याच पृष्ठाखाली हिंदी कठिन शब्दांचे मराठीत शब्दार्थ दिले आहेत.त्यामुळे संत रोहिदासांचे दोहे व पदांचा अर्थ वाचकांना सहज समजेल.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध संत सेना नाव्ही यांनी संत रोहिदास-कबीर संवाद हिंदीमध्ये काव्यमय व काल्पनिक लिहिला आहे.दोघेही निर्गुणवादी संत असूनही, त्यांनी संत रोहिदासांना सगुणवादी ठरवून हिंदीत रंजक संवाद रचला आहे.त्याचा भावार्थ मी मराठीत लिहिला आहे.संत रोहिदास यांचे नावावर पडलेली 'प्रल्हाद-लीला' ३४ चरणे हिंदी असून, त्यांचाही भावार्थ मी मराठीत लिहिला आहे.

महाजन गुरुजीलिखित श्रीभक्त रोहिदास चरित्रातील श्रीभक्त रोहिदासांच्या आरतीचा यामध्ये समावेश केला आहे.तसेच प्रा.सत्यदेव शिंदे यांच्या श्री.संत रोहिदास पुस्तकातील आरतीचा व १५१ चरणी

अनुक्रमणिका

(काव्यमय) श्री.रोहिदास वंदनाचा समावेश ह्या ग्रंथामध्ये केला आहे.त्यामध्ये रोहिदासांचे संक्षिप्त चरित्र आले आहे.

ग्रंथाचे शेवटी दोहे व पदाची अनुक्रमणिका दिली आहे.त्यावरून कोणताही दोहा अगर पद कोणत्या पृष्ठावर आहे हे त्वरित शोधता येईल अशी मी योजना केली आहे.शेवटी पारिभाषिक शब्दकोश लिहिला आहे.त्यामध्ये आध्यात्मिक कठीण शब्दांचा भावार्थ दिला आहे.त्यामुळे हा ग्रंथ वाचकांना समजण्यास सोपा झालेला आहे.सर्वात शेवटी सहाय्यक ग्रंथांची सूचि दिलेली आहे.

अशा प्रकारे मी लिहिलेल्या ह्या"संत रोहिदास, चरित्र आणि वाङ्मय" या ग्रंथाचे मी थोडक्यात समालोचन केले आहे.

## अनुक्रमणिका

# भाग ३ रा

## संत रोहिदास चरित्र

## परिशिष्टे

अनुक्रमणिका

परिशिष्ट १

# (१) दोहे अनुक्रमणिका


| एकूण क्रमांक | मूळाक्षर क्रमांक | दोहारंभ | दोहा क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| | | **अ** | | |
| १ | १ | अमरित रस कइ बूंद कू, | ४५ | १८१ |
| २ | २ | अलख अलह खालीक खुदा, | ६३ | १८५ |
| ३ | ३ | अपनह गीव कटाइ हिं, | १८९ | २१८ |
| ४ | ४ | अन भावत नियरा बसे, | २१३ | २२३ |
| ५ | ५ | अंधला जो पाइ हि, | २०४ | २२१ |
| ६ | ६ | अंतर्मुखी भइ जउ करहि, | ३६ | १७७ |
| ७ | ७ | अंतहकरन अनभउ करहि, | ३१ | १७६ |
| ८ | ८ | अंग अंग कटवाइ हि, | १३९ | २०५ |
| ९ | ९ | अंतर गति रांचै नही, | १७९ | २१६ |
| | | **आ** | | |
| १० | १ | आद अंत जिहकर नहीं | ५८ | १८४ |
| ११ | २ | आनंद मूरत मिंत की, | २२० | २२४ |
| | | **इ** | | |
| १२ | १ | इक चिंता सत्त नाम की, | ३८ | १७९ |
| १३ | २ | इक बुंद सौ बुझि गई, | ४४ | १८१ |
| १४ | ३ | इक जोति से जउ सभ उपजै, | ४९ | १८२ |
| १५ | ४ | इक नजिर सों सभ कूं देखइ | ५४ | १८३ |
| १६ | ५ | इड़ा पिंगला सुसुम्णा, | ३७ | १७८ |
| १७ | ६ | इहु जग दुख की खेतरी. | २२८ | २२६ |
| | | **ऊ** | | |
| १८ | १ | ऊंचे कुलके कारणै, | १३४ | २०४ |
| | | **ए** | | |
| १९ | १ | एक भरोसो राम को, | १०२ | १९५ |
| २० | २ | एकै ब्रह्म हइ सकल मंहि, | ११ | १७१ |
| २१ | ३ | एकै माटि के सभ भांडे, | ४६ | १८१ |
| | | **ऐ** | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२ | १ | ऐसा चाहौं राज मैं, | १९४ | २१९ |
| २३ | १ | ओंकार को ध्यान मांहि, | ७९ | १८९ |
| २४ | २ | ओंकार है सत नाम, | २१ | १७४ |
| | | **क** | | |
| २५ | १ | करम बंधन मंह रमि रह्या, | १०३ | १९६ |
| २६ | २ | करम जोग की साध सो, | १११ | १९८ |
| २७ | ३ | करमन ही परभाउ तजि, | १०९ | १९८ |
| २८ | ४ | कहन सुनन कुं दुई करि थापे, | १५० | २०८ |
| २९ | ५ | कटुक वचन नहि बोलिए, | २२९ | २२६ |
| ३० | ६ | का मथुरा का द्वारिका, | ७२ | १८८ |
| ३१ | ७ | काम क्रोध मद लोभ तजि, | १३५ | २०४ |
| ३२ | ८ | काम धेनि पारस पोली. | २१६ | २२३ |
| ३३ | ९ | काबे अरू कैलास मंह, | १६ | १७३ |
| ३४ | १० | कायम दायम राग इक, | २८ | १७६ |
| ३५ | ११ | कुरमे भांति जउ रहा हि, | १६३ | २११ |
| ३६ | १२ | कोंइल तरसै अंब कू, | २२१ | २२४ |
| ३७ | १३ | कोटि कलप जीवन अलप, | २१९ | २२४ |
| | | **ग** | | |
| ३८ | १ | गगन मंडल पिअ रूप सो, | १२ | १७२ |
| ३९ | २ | ग्रहहि रहहु सतिकरम करहु | १०१ | १९५ |
| ४० | ३ | गुरू ग्यांन दीपक दिया, | २०३ | २२१ |
| | | **घ** | | |
| ४१ | १ | घट घट बिआपक राम है, | ७ | १७० |
| | | **च** | | |
| ४२ | १ | चलत हलत बैठत उठत, | २२३ | २२५ |
| | | **ज** | | |
| ४३ | १ | जउ नाही था सरिष्ठि मांहि, | ३४ | १७७ |
| ४४ | २ | जउ रे अल्लाह बसहिं मस्जिद मंह, | ७५ | १८८ |
| ४५ | ३ | जब जब फैलेइ जगत मंहि, | ६४ | १८६ |
| ४६ | ४ | जब सभ करि दोउ हाथ पग, | १४८ | २०७ |
| ४७ | ५ | जहं अंध विश्वास है, | ३२ | १७६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४८ | ६ | जन्म जात मत पूँछिये, | १२० | २०१ |
| ४९ | ७ | जन्म जात कूं छांडि करि, | १२२ | २०१ |
| ५० | ८ | जात पांत के फेर महि | १२१ | २०१ |
| ५१ | ९ | जात जातमें जात है, | १२८ | २०२ |
| ५२ | १० | जिन्ह नर सन्त तिआगिआ, | २६ | १७५ |
| ५३ | ११ | जिहवा सों ओंकार जप, | ९९ | १९५ |
| ५४ | १२ | जिवहा भजै हरिनाम नित, | ११४ | १९९ |
| ५५ | १३ | जिन्ह करि हिरदै सत वसई, | १३२ | २०३ |
| ५६ | १४ | जिह नित देषन चाहि हौ, | २१५ | २२३ |
| ५७ | १५ | जीवत जोति कइसंहि जगि, | ८२ | १९० |
| ५८ | १६ | जीवत कू मुरदा कर हिं, | १९१ | २१८ |
| ५९ | १७ | ज्यू सुधि आवत पीव की, | २१४ | २२३ |
| ६० | १८ | जैसा रंग सैबल करि, | १९८ | २२० |
| ६१ | १९ | जो देख्या धिन उपजै, | ४० | १८० |
| ६२ | २० | जो नर सत्य न भाषहि, | ३३ | १७७ |
| ६३ | २१ | जो खुदा पश्चिम बसै, | ७६ | १८९ |
| ६४ | २२ | जो वस राखे इंद्रिया, | १६० | २१० |
| ६५ | २३ | जो कोउ लोरै परम सुख, | १६४ | २१२ |
| ६६ | २४ | जो जन दुठ कुमारगी, | १७१ | २१३ |
| ६७ | २५ | जौ लौ घट मंहि परान हैं, | २२ | १७४ |
| | | **त** | | |
| ६८ | १ | तसवी फेरो प्रेम की, दिलमे करो तिवाज | १९५ | २१९ |
| ६९ | २ | तुरूक मसीति अल्लह दुंढइ, | ७३ | १८८ |
| ७० | ३ | तुहि मुहि हमु एक हैं, | २१७ | २२४ |
| | | **द** | | |
| ७१ | १ | दया धर्म जिन्ह मैं नहि, | १३१ | २०३ |
| ७२ | २ | दया भाव हिरदै नही, | १९० | २१८ |
| ७३ | ३ | दीन दुखी के हेत जउ, | १३८ | २०५ |
| ७४ | ४ | दीन दुखी करी सेव मंहि, | १७५ | २१५ |
| ७५ | ५ | देता रहे हजार बरस, | ७४ | १८८ |
| ७६ | ६ | देहरा अरू मसित मंहि, | ६७ | १८७ |

**ध**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७७ | १ | धन संचय दुख देत है, | १६५ | २१२ |
| ७८ | २ | धरम हेत हि कीजिए, | १०५ | १९६ |
| ७९ | ३ | धरम समुझि जो कार होई, | १०६ | १९७ |
| ८० | ४ | धरम करम दुइ एक है, | ११९ | २०० |
| ८१ | ५ | धरम करम जानै नहि, | १३७ | २०४ |
| ८२ | ६ | धरम हेत संग्राम मंह, | १५६ | २०९ |
| ८३ | ७ | धुआ तपन मंहि का धरा, | १७६ | २१५ |

**न**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८४ | १ | नाम मूल है ग्यान को, | २२७ | २२६ |
| ८५ | २ | निहचल आनंद निध गिलि, | २०६ | २२१ |
| ८६ | ३ | निसदिन हरिजु सिमरिये, | २१० | २२२ |
| ८७ | ४ | नीच नीच कह मार हिं, | १२५ | २०२ |
| ८८ | ५ | नेक कमाई जउ कर हि, | १०० | १९५ |

**प**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८९ | १ | पर किरती परभाऊ बस, | १०८ | १९७ |
| ९० | २ | परधीनता पाप है, | १९२ | २१८ |
| ९१ | ३ | पराधीन कौ दीन क्या? | १९३ | २१९ |
| ९२ | ४ | पलु पलु छिनु छिनु सिमरिये, | २०७ | २२२ |
| ९३ | ५ | पंचदोष तजि जो रहई, | १३३ | २०४ |
| ९४ | ६ | प्रभ भगति श्रम साधना, | ११८ | २०० |
| ९५ | ७ | प्रानी वध नहि कीजियहि, | १८६ | २१७ |
| ९६ | ८ | प्रेम पंथ की पालकी, | ७० | १८७ |

**ब**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९७ | १ | बचन गयो नंह आवर्त है, | १५७ | २०९ |
| ९८ | २ | बाहर खोजत का फिरइ, | १७ | १७३ |
| ९९ | ३ | ब्राह्मन अरू चंडाल महि, | ५३ | १८३ |
| १०० | ४ | ब्राह्मन खतरी बैस सूद, | १२३ | २०१ |
| १०१ | ५ | बुद्धि अरू विवेक हि, | १६१ | २१० |
| १०२ | ६ | वेद पढई पंडित बन्यो, | १२४ | २०२ |

**भ**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०३ | १ | भौसागर दुतर अति, | २०८ | २२२ |
| १०४ | २ | भौसागर रा तारना कूं, | १९९ | २२० |
| | | **म** | | |
| १०५ | १ | मन मंहि सत्त संतोष रखहु, | १७४ | २१५ |
| १०६ | २ | मसजिद सो कछु घिन नही, | १४६ | २०७ |
| १०७ | ३ | माइआ दीपकु पाप करि, | २०५ | २२१ |
| १०८ | ४ | माथै तिलक हाथ जप माला, | ६६ | १८६ |
| १०९ | ५ | मुकुर माह परछाई ज्यो, | ९ | १७१ |
| ११० | ६ | मुसलमान सो दोसती, | १४७ | २०७ |
| १११ | ७ | मूरिष मूष कमान है, | २२४ | २२५ |
| ११२ | ८ | मंदिर मसजिद दोउ एक है, | १४४ | २०६ |
| | | **र** | | |
| ११३ | १ | 'रविदास' हमारो रामजी, | १ | १६९ |
| ११४ | २ | 'रविदास' हमारो राम तो, | २ | १६९ |
| ११५ | ३ | 'रविदास' हौ खालिक देखिआ, | ८ | १७१ |
| ११६ | ४ | 'रविदास' पीव इक सकल घट, | १० | १७१ |
| ११७ | ५ | 'रविदास' पिअ बिनु जगत मंह, | १३ | १७२ |
| ११८ | ६ | 'रविदास' जगत मंह राम सम, | १५ | १७२ |
| ११९ | ७ | 'रविदास' सत्य इक नाम है, | २५ | १७५ |
| १२० | ८ | 'रविदास' सत्त मति तिआगिए, | २७ | १७५ |
| १२१ | ९ | 'रविदास' सत्त करि आसरे, | २९ | १७६ |
| १२२ | १० | 'रविदास' सत्त मति छांडिए, | ३० | १७६ |
| १२३ | ११ | 'रविदास' मदुरा का पीजियै, | ३५ | १७७ |
| १२४ | १२ | 'रविदास' अराधहु देव कुं | ३९ | १७९ |
| १२५ | १३ | 'रविदास' मानुष जन्म मंह, | ४२ | १८० |
| १२६ | १४ | 'रविदास' लौरे जिस बुंद कू, | ४३ | १८१ |
| १२७ | १५ | 'रविदास' उपजइ सभ इक बुंद ते, | ४७ | १८२ |
| १२८ | १६ | 'रविदास' इक बुंद सो, | ४८ | १८२ |
| १२९ | १७ | 'रविदास' एकै ब्रह्म का, | ५० | १८२ |
| १३० | १८ | 'रविदास' इक ही नूर ते, | ५१ | १८३ |
| १३१ | १९ | 'रविदास' इक ब्रह्म बुंद सो, | ५२ | १८३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३२ | २० | 'रविदास' जो करता सरिष्ठिका, | ५६ | १८४ |
| १३३ | २१ | 'रविदास' हौ देख्या सोधिकर, | ५७ | १८४ |
| १३४ | २२ | 'रविदास' इक जगदीस कर, | ५९ | १८५ |
| १३५ | २३ | 'रविदास' हमारो साइया, | ६० | १८५ |
| १३६ | २४ | 'रविदास' कोउ अल्लह कहइ, | ६१ | १८५ |
| १३७ | २५ | 'रविदास' आस इक राम की, | ६५ | १८६ |
| १३८ | २६ | 'रविदास' न पुजइ देहरा, | ६८ | १८७ |
| १३९ | २७ | 'रविदास' मोरे मन लागियो, | ७१ | १८७ |
| १४० | २८ | 'रविदास' सब्दह सह जब हि, | ७८ | १८९ |
| १४१ | २९ | 'रविदास' दिआ जगमग जरई, | ८० | १९० |
| १४२ | ३० | 'रविदास' सुरत कू साधिकर, | ८१ | १९० |
| १४३ | ३१ | 'रविदास' जन्मे कउ हरस का, | ८३ | १९० |
| १४४ | ३२ | 'रविदास' सोइ साधु भलो, जउ जग- | ८४ | १९१ |
| १४५ | ३३ | 'रविदास' सोइ साधु भलो, जउ मन- | ८५ | १९२ |
| १४६ | ३४ | 'रविदास' सोइ साधु भलो, जउ रहई- | ८६ | १९२ |
| १४७ | ३५ | 'रविदास' सोइ साधु भलो, जउ अपनह- | ८७ | १९२ |
| १४८ | ३६ | 'रविदास' सोइ साधु भलो, जिह मन निर्मल– | ८८ | १९२ |
| १४९ | ३७ | 'रविदास' सोइ साधु भलो, जउ जानहि– | ८९ | १९२ |
| १५० | ३८ | 'रविदास' सोइ साधु भलो, जो पर– | ९० | १९३ |
| १५१ | ३९ | 'रविदास' सोइ साधु भलो, जो निहकपट– | ९१ | १९३ |
| १५२ | ४० | 'रविदास' सोइ साधु भलो, निर्मल– | ९२ | १९३ |
| १५३ | ४१ | 'रविदास' सोइ साधु भलो, जउ हंसा– | ९३ | १९३ |
| १५४ | ४२ | 'रविदास' सोइ साधु भलो, जिह मन बसइ | ९४ | १९४ |
| १५५ | ४३ | 'रविदास' सोइ साधु भलो, जो मनह | ९५ | १९४ |
| १५६ | ४४ | 'रविदास' सोइ साधु भलो, जो साहिब | ९६ | १९४ |
| १५७ | ४५ | 'रविदास' सोइ साधु भलो, जिह मन नांहि | ९७ | १९४ |
| १५८ | ४६ | 'रविदास' मनुष कर धरम है, | १०७ | १९७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५९ | ४७ | 'रविदास' श्रमकरि खाइ हि, | ११५ | १९९ |
| १६० | ४८ | 'रविदास' हौ निज हत्थहि, | ११७ | १९९ |
| १६१ | ४९ | 'रविदास' जन्म के कारनै, | १२६ | २०२ |
| १६२ | ५० | 'रविदास' जाति मत पूछिइ, | १२७ | २०२ |
| १६३ | ५१ | 'रविदास' ब्राह्मन मति पूजिए | १२९ | २०३ |
| १६४ | ५२ | 'रविदास' सुकरमन करन सों, | १३० | २०३ |
| १६५ | ५३ | 'रविदास' जोउ वेत्ता ब्रह्मकर, | १३६ | २०४ |
| १६६ | ५४ | 'रविदास' बैस सोइ जानिये, | १४० | २०५ |
| १६७ | ५५ | 'रविदास' जउ अति पवित्त है, | १४२ | २०६ |
| १६८ | ५६ | 'रविदास' हमारो राम जोइ, | १४५ | २०६ |
| १६९ | ५७ | 'रविदास' पेखिया सोध करि, | १४९ | २०७ |
| १७० | ५८ | 'रविदास' कंगन अरु कनक महि, | १५१ | २०८ |
| १७१ | ५९ | 'रविदास' उपजइ सभ इक नूर तें— | १५४ | २०८ |
| १७२ | ६० | 'रविदास' सोइ सुरा भला, | १५५ | २०९ |
| १७३ | ६१ | 'रविदास' वचन जौ दे दिया, | १५८ | २०९ |
| १७४ | ६२ | 'रविदास' इच्छाएं आपुनी, | १६२ | २११ |
| १७५ | ६३ | 'रविदास' प्रेम नहि छिप सकइ, | १६९ | २१३ |
| १७६ | ६४ | 'रविदास' सदाही राखिए, | १७० | २१३ |
| १७७ | ६५ | 'रविदास' जु है बेगमपुरा, | १७२ | २१४ |
| १७८ | ६६ | 'रविदास' मनुष करि बसन कूं, | १७३ | २१४ |
| १७९ | ६७ | 'रविदास' रात न सोइये, | १७७ | २१५ |
| १८० | ६८ | 'रविदास' तू कांवच फली, | १७८ | २१६ |
| १८१ | ६९ | 'रविदास' जीव कू मारिकर, | १८२ | २१७ |
| १८२ | ७० | 'रविदास' जउ पोषणह हेत, | १८३ | २१७ |
| १८३ | ७१ | 'रविदास' मुंडह काटि करि, | १८४ | २१७ |
| १८४ | ७२ | 'रविदास' जो आपन हेत ही, | १८५ | २१७ |
| १८५ | ७३ | 'रविदास' जिभ्या स्वाद बस, | १८७ | २१८ |
| १८६ | ७४ | 'रविदास' जीव मत मार हिं, | १८८ | २१८ |
| १८७ | ७५ | 'रविदास' संसा जीव मंहं, | १९६ | २१९ |
| १८८ | ७६ | 'रविदास' कहे जाके रिदै, | ९८ | १९४ |
| १८९ | ७७ | 'रविदास' तनु पियरौ पातरा, | २३० | २२६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९० | ७८ | 'रविदास' पीतम इक तुहि, | २१८ | २२४ |
| १९१ | ७९ | 'रविदास' मूरिष समुझइ नहि, | २२५ | २२५ |
| १९२ | ८० | राम नाम जिहतन रम्यो, | २०१ | २२० |
| १९३ | ८१ | राम प्रेम हौ बरजि किमि, | २२६ | २२५ |
| १९४ | ८२ | रामानंद मोही गुरु मिल्यो, | २०२ | २२१ |
| १९५ | ८३ | राधो क्रिस्न करीम हरि, | २० | १७४ |
| १९६ | ८४ | राग द्वेष कूं छांडिकर, | ११३ | १९८ |
| | | **ल** | | |
| १९७ | १ | लोहा पारस मणि, | २११ | २२२ |
| | | **व** | | |
| १९८ | १ | वन खोजई पिअ न मिल हि, | १८ | १७३ |
| १९९ | २ | वन खोजन का जाइ रे, | १९ | १७३ |
| | | **स** | | |
| २०० | १ | सब निवासी राम जू, | ४ | १७० |
| २०१ | २ | सब घट मेरा सांइ या, | ५ | १७० |
| २०२ | ३ | सब घट मंहि रमि रह्यो, | ६ | १७० |
| २०३ | ४ | सब सुख पावै जासु तैं | १८० | २१६ |
| २०४ | ५ | सबज बिआपक राम हई, | ३ | १६९ |
| २०५ | ६ | सभ नूरन कर नूर जउ, | १४ | १७२ |
| २०६ | ७ | सभ मंहि एकु राम जोति, | ५५ | १८४ |
| २०७ | ८ | सत्त इश कहुं रुप है, | २३ | १७४ |
| २०८ | ९ | सत्त सक्ति सों होत है, | २४ | १७५ |
| २०९ | १० | सत्त संतोष अरू सदाचार, | १५९ | २१० |
| २१० | ११ | सच्चा सुख सत्त धरम मंहि, | १६६ | २१२ |
| २११ | १२ | समाधि थिति संत जन, | २१२ | २२३ |
| २१२ | १३ | ससि चकोर सूरज कंवल, | २२२ | २२५ |
| २१३ | १४ | श्रमकउ इसर जानि कै, | ११६ | १९९ |
| २१४ | १५ | सामी सिरजन हार है, | ६२ | १८५ |
| २१५ | १६ | साध संगति पुंजी भइ, | १९७ | २२० |
| २१६ | १७ | साधक भांति जोग जुकत, | ११२ | १९८ |
| २१७ | १८ | सांचि हाटी बैठकर, | १४१ | २०५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१८ | १९ | सुख दुख हानि लाभ कउ, | ११० | १९८ |
| २१९ | २० | सुख सरिता मह बुडि करि, | १६७ | २१२ |
| २२० | २१ | सुख दुख सम करि जानहु, | १६८ | २१३ |
| २२१ | २२ | सुरत शब्द जउ एक हों, | ७७ | १८९ |
| २२२ | २३ | सुमिरन कोटि अघन को, | २०० | २२० |
| २२३ | २४ | सोई तन कंचन जानई, | २०९ | २२२ |
| २२४ | २५ | सौ बरस लौ जगत मंहि, | १०४ | १९६ |
| | | **ह** | | |
| २२५ | १ | हरिसा हीरा छांडि कै, | ४१ | १८० |
| २२६ | २ | हरिजन न करि सेवा लागै, | १४३ | २०६ |
| २२७ | ३ | हरि गुर साधसमान चित्त, | १८१ | २१६ |
| २२८ | ४ | हिंदु पूजइ देहरा, | ६९ | १८७ |
| २२९ | ५ | हिंदु तूरक मंहि नहीं कछु भेदासभ, | १५२ | २०८ |
| २३० | ६ | हिंदु तुरक मंहि नही कछुभेदा | १५३ | २०८ |

* * *

परिशिष्ट २

# (२) पदे अनुक्रमणिका


| एकूण क्रमांक | मूळाक्षर क्रमांक | पदारंभ | पद क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| | | **अ** | | |
| १ | १ | अब मै हारयो रे भाई । | २४ | २४४ |
| २ | २ | अब कैसे छुटे नाम रट लागी ॥ | ५५ | २६८ |
| ३ | ३ | अब मेरी बुडी रे भाई, | १३५ | ३३९ |
| ४ | ४ | अब का कहि कौन बताऊं । | १७१ | ३६८ |
| ५ | ५ | अब कछु मरम बिचारो हो हरि । | १३० | ३३३ |
| ६ | ६ | अब हम खूब वतन घर पाया । (श्री अदिग्रंथानुसार) (बेगम पुरा सहर कौ नाऊ) (रुपांतर) | १२६ | ३२९ |
| ७ | ७ | अखिल खिले नहि का कहि पंडित. | १३२ | ३३६ |
| ८ | ८ | अमर भये हम काहे कू मरि है ॥ | ९१ | २९९ |
| ९ | ९ | अविगति नाथ निरंजन देवा । | १२९ | ३३२ |
| १० | १० | अहो देव तेरो अमित महिता, | १७५ | ३७२ |
| | | **आ** | | |
| ११ | १ | आगे मंदा है रह्या पर किरती न जाई । | १७४ | ३७१ |
| १२ | २ | आज दिवस लेउ बलिहारा | ४२ | २५८ |
| १३ | ३ | आयो आयो हौ देवाधिदेव | ५२ | २६६ |
| १४ | ४ | आरती करत हंसे मन मेरो । | ३३ | २५१ |
| १५ | ५ | आरती कहाँ लो जोवै | १४० | ३४४ |
| | | **इ** | | |
| १६ | १ | इस अंदेस सोच जिय मेरे | ११० | ३१५ |
| | | **उ** | | |
| १७ | १ | ऊँचे मंदर साल रसोई | १० | २३४ |
| | | **ऐ** | | |
| १८ | १ | ऐसा ध्यान धरौ बरो बनवारी | १२१ | ३२३ |
| १९ | २ | ऐसी जिन करि हो महाराज । | १६४ | ३६३ |
| २० | ३ | ऐसी भगति न होई रे भाई । | ६० | २७२ |
| २१ | ४ | ऐसी लाज तुझ बिनु कौन करे | २१ | २४२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२ | ५ | ऐसे जानि जपोरे जीव | ५७ | २६९ |
| २३ | ६ | ऐसो कछु अनभउ, कहत न आवे, | ३६ | २५३ |
| २४ | ७ | ऐसोई हिर क्यू पाइबो, | ८२ | २९० |
| | | **क** | | |
| २५ | १ | कहा भइओ जउ तनु<br>तुझहि चरन अरविंद भवन मनु (रूपांतर) | ६६ | २७७ |
| २६ | २ | कहाँ सूते मुग्ध नर काठके मँझ सुख। | १३६ | ३४० |
| २७ | ३ | कहु मन राम नाम सँभारी | १०२ | ३१० |
| २८ | ४ | का गाऊं कछु गाई न होई, | १७० | ३६८ |
| २९ | ५ | का तूं सौवे जागि दिवाना (आदिग्रंथ) | ८८ | २९६ |
| ३० | ६ | काल हु नाइ ताहि पद सीसा, | २९ | २४८ |
| ३१ | ७ | का हे मन मारन बन जाई, | १४२ | ३४६ |
| ३२ | ८ | किहि मन ठेढो ठेढो जात ॥ | १४ | २३७ |
| ३३ | ९ | किहि विधि अनसरो रे | ९२ | ३०१ |
| ३४ | १० | कुपू भरिओ जैसा दादिरा | १६ | २३९ |
| ३५ | ११ | केसवे बिकट माया तोर | १३३ | ३३७ |
| ३६ | १२ | कोऊ सुमरन देखो, | १५२ | ३५२ |
| | | **ख** | | |
| ३७ | १ | खटु करम कुल संजुगतु है, (आदिग्रंथ)<br>(रे चित चेति अचेत काहे) (रूपांतर) | ८७ | २९४ |
| ३८ | २ | खालिक सिकस्ता मैं तेरा, | १३७ | ३४१ |
| ३९ | ३ | खोजत किधु फिरै, | २५ | २४५ |
| | | **ग** | | |
| ४० | १ | गगनमंडल में आरती की जै, | ३२ | २५१ |
| ४१ | २ | गाई गाई अब का कहि गाऊँ, | ११५ | ३१८ |
| ४२ | ३ | गिरिवन का हे खोजन जाई, | २६ | २४६ |
| ४३ | ४ | गुरू सभु रहसि अगमहि जानै। | ३९ | २५६ |
| ४४ | ५ | गोविंदे तुम्हारे से समाधि लागी।<br>(राम के चरणारबिंद क्षिव समाधि लागी) | १०६ | ३१२ |
| ४५ | ६ | गोविंदे भवजल ब्याधि अपारा | ११२ | ३१६ |
| | | **घ** | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४६ | १ | घट अबघट डुगर घणा (आदिग्रंथ)<br>हौ बनजारौ राम कौ (रूपांतर) | ३ | २२९ |
| | | **च** | | |
| ४७ | १ | चल मन हरि चटसाल पढाऊ ॥ | १०३ | ३१० |
| ४८ | २ | चमरठा गाँठि न जनई (आदिग्रंथ) | १५९ | ३५९ |
| ४९ | ३ | चित्त सिमरनु करउ नैन अविलोकनो, | ४६ | २६१ |
| | | **ज** | | |
| ५० | १ | जगमे बेद बैद मानी जै। | ३५ | २५३ |
| ५१ | २ | जड हम बांधे मोह फास | ६५ | २७६ |
| ५२ | ३ | जन को तारि बाप रमइआ। | ११८ | ३२१ |
| ५३ | ४ | जनम अमोल अकारथ जात रे | ६ | २३१ |
| ५४ | ५ | जयो राम गोब्यंद बीठल वासदेव, | १६३ | ३६२ |
| ५५ | ६ | जब राम नाम कहि गावै गा। | ५६ | २६९ |
| ५६ | ७ | जल की भीति पवन का थंभा | ८ | २३२ |
| ५७ | ८ | जाके रामजो धनी | २३ | २४३ |
| ५८ | ९ | जाको हरि जू आपू निवाजत | १६६ | ३६५ |
| ५९ | १० | जा पै दीनानाथु ढरै। | १६८ | ३६६ |
| ६० | ११ | ज्यांहा देखो वाहा चाम ही चाम। | ९८ | ३०७ |
| ६१ | १२ | जिहि कुल साधु बैस नो होई। | ३८ | २५५ |
| ६२ | १३ | ज्यू तुम्ह कारनि केसवे, अन्तिरी | ६४ | २७५ |
| ६३ | १४ | जे उहू अठसठि तीरथ न्हावै, | १५८ | ३५८ |
| ६४ | १५ | जो जन उधौ! मोहि न विसारे, | २२ | २४३ |
| ६५ | १६ | जो तुम गोपालहि नहि गैहौ, | ५८ | २७० |
| ६६ | १७ | जौ दिन आव हि सौ दिन जा हि, (आदिग्रंथ) | ९ | २३३ |
| ६७ | १८ | जो मोहि वेदन का सनि आषौ, | ७१ | २८१ |
| ६८ | १९ | जो तुम तोरो राम मैं नहि तोरौं (आदिग्रंथ)<br>जउ तुम गिरिवर तउ हम भये मोरा (रूपांतर) | ६२ | २७४ |
| ६९ | २० | जो सुख होत साध कूं भेटे | ४३ | २५९ |
| | | **त** | | |
| ७० | १ | ता कौ जनम अकारथ कहिए | ४ | २२९ |
| ७१ | २ | ता थै पतित नहि कौ पावन | १५४ | ३५४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७२ | ३ | त्राहि त्राहि त्रिभुवन पति पावन | ११६ | ३१९ |
| ७३ | ४ | तुझहि सुझंता कछु नाहि, | १५६ | ३५६ |
| ७४ | ५ | तुम्ह करहु क्रिपा मुहि साई | ६९ | २७९ |
| ७५ | ६ | तेरा जन काहे को बोले। | ११७ | ३२० |
| ७६ | ७ | तेरी चरनी सरनी परऊ रामु राजा, | १६५ | ३६४ |
| ७७ | ८ | तेरे देव कमलापति सरन आया, | १२५ | ३२७ |
| ७८ | ९ | त्यो तुम्ह कारनि केसवै लालचि– | ६३ | २७५ |
| | | **थ** | | |
| ७९ | १ | थो थो जिनी पछारो रे कोई, | ४८ | २६२ |
| | | **द** | | |
| ८० | १ | दरसन दीजै राम दरसन दीजै, | ६८ | २७९ |
| ८१ | २ | दारिदु देखि सभ कौ हंस, | २० | २४२ |
| ८२ | ३ | दुखियारी दुखियारा जग मंह, | १ | २२७ |
| ८३ | ४ | दुर्लभ जनमु पुंन फल पाईओ | २ | २२८ |
| ८४ | ५ | देषि मुरिषता यहु मन की, | ८० | २८९ |
| ८५ | ६ | देहु कलाली येक पिआला | ७६ | २८५ |
| | | **ध** | | |
| ८६ | १ | धन हरि भक्ति त्रय लोक जस पावनी। | १६० | ३५९ |
| ८७ | २ | ध्रिगु ध्रिगु जीवणु राजे राम बिना ॥ | ५ | २३० |
| | | **न** | | |
| ८८ | १ | नरहरि, चंचल है मति मोरी, | २७ | २४७ |
| ८९ | २ | नरहरि, प्रगटसि ना हो, | १३४ | ३३८ |
| ९० | ३ | नहि विश्राम लहो धरनी धर, | १६२ | ३६१ |
| ९१ | ४ | नागर जना मेरि जाति विखआत चमार (आदिग्रंथ)ऐसी मेरी जाति विखिआत चमार (रूपांतर) | ४५ | २६० |
| ९२ | ५ | नाथ कछु अनजानो (आदिग्रंथ) | ९७ | ३०६ |
| ९३ | ६ | नामु तेरो आरती भजनु मुरारे | ५३ | २६६ |
| | | **प** | | |
| ९४ | १ | पढिऐ गुनीऐ नामु सभु सुनीऐ, (आदिग्रंथ) देव संसै गांठि व छुटै। (रूपांतर) | ३४ | २५२ |
| ९५ | २ | परचै राम रमै जो कोई। | १३१ | ३३४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९६ | ३ | पहले पहरै रैणि दे बाणिजारिया, | ११ | २३४ |
| ९७ | ४ | परीति सुधामति आव। | ७२ | २८२ |
| ९८ | ५ | प्रभुजी तुम औगन बकसनहार। | ७० | २८० |
| ९९ | ६ | प्रभुजी संगति सरनि तिहारी, | ४४ | २६० |
| १०० | ७ | पांडे कैसी पुजि रचि रे। | १५० | ३५१ |
| १०१ | ८ | पांडे! हरि विचि अंतर डाढा, | ९६ | ३०४ |
| १०२ | ९ | पावन जस माधो तेरा, | ५१ | २६५ |
| १०३ | १० | पार गया चाहे सब कोई, | १२० | ३२२ |
| १०४ | ११ | प्रिथम हिसिमर रं राम भरतार ॥ | १८० | ३७६ |
| १०५ | १२ | पीआ राम रसु पीआ रे ॥ | ७७ | २८६ |
| | | **ब** | | |
| १०६ | १ | बरजि हो बरजि बीठुले, | १७ | २३९ |
| १०७ | २ | बिनु देखे उपजे नहि आसा, | ५४ | २६७ |
| १०८ | ३ | बंदे जानि साहिब गनि। | १२४ | ३२६ |
| १०९ | ४ | बापुरौ सति रैदास कहे रे। | ५० | २६४ |
| ११० | ५ | बीति आउ भजनु नहीं कीन्हा, | १२ | २३६ |
| १११ | ६ | बौरि करिलै राम सनेहा, | ६१ | २७३ |
| | | **भ** | | |
| ११२ | १ | भगति न होइ रे न होई, | १६१ | ३६० |
| ११३ | २ | भगति ऐसी सुनहु रे भाई, | ९४ | ३०३ |
| ११४ | ३ | भाई रे! भ्रम भगति सूजांनि, | ९३ | ३०२ |
| ११५ | ४ | भाई रे! राम कहॉ है मोहि बताओ। | २८ | २४८ |
| ११६ | ५ | भाईरे सहज बंदो लोइ, | १०९ | ३१४ |
| ११७ | ६ | भेष लीयो भेद न जान्यो, | ९५ | ३०३ |
| | | **म** | | |
| ११८ | १ | मन मेरो सत सरूप विचार, | १२८ | ३३१ |
| ११९ | २ | मन मोरा माया मंह लपटानो ॥ | ८१ | २८९ |
| १२० | ३ | मन रे हरि भज साम सबेरे, | ८९ | २९७ |
| १२१ | ४ | मनु मेरो थिरू न रहाई, | ८५ | २९३ |
| १२२ | ५ | मरम कैसे पाइव रे, | १३८ | ३४२ |
| १२३ | ६ | माटीको पुतरा कैसे नचतु है। | १५ | २३८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२४ | ७ | माया मोहिला कान्हा, | १०४ | ३११ |
| १२५ | ८ | माधवे! पारस मनि ले जाऊ. | १४१ | ३४५ |
| १२६ | ९ | माधवे, तुम तोरो, मै नहि तोरूँ | १४७ | ३४९ |
| १२७ | १० | माधो का कहीऐ भ्रम ऐसा, (रूपांतर) जब हम होते तू नाही (आदिग्रंथ) | १३ | २३७ |
| १२८ | ११ | माधो! तू मम ठाकूर हौ तुझ सेवगु | १६७ | ३६६ |
| १२९ | १२ | माधो भरम कैसे हु न बिलाई। | १२३ | ३२५ |
| १३० | १३ | माधो! मुहि इकु सहारौ तोरा ॥ | ६७ | २७८ |
| १३१ | १४ | माधो, संगति सरनि तुम्हारी (रूपांतर) तुम चंदन हम इरंड बापुरे (आदिग्रंथ) | १२२ | ३२४ |
| १३२ | १५ | मिगृ मीन भ्रिंग्र पतंग कुंजरमाधो अविधा हित कीन्ह (रूपांतर) | ९० | २९८ |
| १३३ | १६ | मिलन पियारो प्राननाथ कवनि भगतिकवन भगति तै रहे पाहुतो रे (रूपांतर) | १०१ | ३०९ |
| १३४ | १७ | मुकुंद मुकुंद जपहु संसार, | १५७ | ३५७ |
| १३५ | १८ | मेरी संगति पोच सोच दिनुराती, | ७३ | २८३ |
| १३६ | १९ | मेरी प्रीति गोपाल सो मति घटै हो। | १४९ | ३५० |
| १३७ | २० | मै का जानौ देव मै का जानौ ग्रं. सा. (घट अवघट डूंगर घणा रे।) | ७९ | २८७ |
| | | **य** | | |
| १३८ | १ | या रामा येक तू दाना | १५३ | ३५३ |
| | | **र** | | |
| १३९ | १ | रथ को चतुर चलावन हारो | ११९ | ३२१ |
| १४० | २ | र रंकार रहत सब हिन ते, | १५१ | ३५२ |
| १४१ | ३ | राम बिन संसय गाँठि न छुटे। | ९९ | ३०७ |
| १४२ | ४ | राम भगत को जन न कहाउँ (राम जन होऊ न भगत कहाऊ) | १३९ | ३४३ |
| १४३ | ५ | राम हि पूजा कहाँ चढाऊ। ग्रंथ सा. (दुधु बछरे जु विधारिऔ।) | ३० | २४९ |
| १४४ | ६ | राम राय का कहिये यह ऐसी, | १११ | ३१६ |
| १४५ | ७ | रामा हो जगजीवन मोरा (कोहू हौ जगजीवन मोरा) | १०० | ३०८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४६ | ८ | रे मन! चेत मीचु दिन आया, | ७ | २३२ |
| १४७ | ९ | रे मन, राम नाम सँभारि | १८ | २४० |
| १४८ | १० | रे मन, माछला संसार समुदे | ८३ | २९१ |
| १४९ | ११ | रे मन चलु अब अमृत देश | १४४ | ३४७ |
| १५० | १२ | रे पायो रं राम अभीरस | १९ | २४१ |
| | | **ल** | | |
| १५१ | १ | लज्या मोरि राखो श्याम हरि | १६९ | ३६७ |
| | | **स** | | |
| १५२ | १ | सत गुर हमहु लषाई बाट। | ४० | २५६ |
| १५३ | २ | सत जुगि सतु तेता जुगी। | ४९ | २६३ |
| १५४ | ३ | सत रज तम माया धनी, | १७७ | ३७४ |
| १५५ | ४ | समुझि मन निरमल जस गाई, | ८४ | २९२ |
| १५६ | ५ | सह की सार सुहागनि जानै, (आदिग्रंथ)<br>सो कहा जानै पीर पराइ (रूपांतर) | ७४ | २८३ |
| १५७ | ६ | संत उतारे आरती देव सिरोमनिये। | ३१ | २५० |
| १५८ | ७ | संत तुझी तनु संगति प्रान, | ३७ | २५४ |
| १५९ | ८ | संतो! अनिन भक्ति यहु नाही, | ५९ | २७१ |
| १६० | ९ | संतो कुल पषी भगति हैसी कलिजुगमे, | १७३ | ३७० |
| १६१ | १० | संतो भगति न होइ रे | १७२ | ३६९ |
| १६२ | ११ | साँची प्रीति हम तुम सँग जोरी | १४६ | ३४८ |
| १६३ | १२ | साँधौ! का सास्त्रन सुनि कीनौ, | १५५ | ३५५ |
| १६४ | १३ | सु कछु विचार यौ, | ८६ | २९४ |
| १६५ | १४ | सुख सागरू सुर तर चिंतामनि, | ४७ | २६२ |
| १६६ | १५ | सोइ उबरो जिहि आपु निबाजत, | १७६ | ३७३ |
| १६७ | १६ | सो कहा जानै पीर पराई (आदिग्रंथ)<br>सह की सार सुहागनि जाने (रुपांतर) | १०५ | ३१२ |
| | | **ह** | | |
| १६८ | १ | हम घर आयहु राम भतारे, | ७८ | २८६ |
| १६९ | २ | हम न पाप करंता अहौ अनंता<br>तोहि मोहि मोहि तोहि अंतरू कैसा (आदिग्रंथ) | ११४ | ३१८ |
| १७० | ३ | हम सरि दीनु दइआलू न तुमसरि,<br>जन कु तारि तारि नाथ रमइआ (रूपांतर) | ७५ | २८४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७१ | ४ | हरि को टांडो लादे जाइ रे, | १२७ | ३३० |
| १७२ | ५ | हरि जपत तेउ जनां पदम कंवलासपति, | १७८ | ३७५ |
| १७३ | ६ | हरि बिन नहि कोइ पतित पावन, | १०७ | ३१३ |
| १७४ | ७ | हरि सुमिरे सोइ संत विचारौ। | ४१ | २५७ |
| १७५ | ८ | हरि हरि हरि हरि हरि हरि। | १०८ | ३१४ |
| १७६ | ९ | हुसिआरी हुसिआरा रे। | १४३ | ३४६ |
| १७७ | १० | है सब आतम सुख परकास साचौ, | ११३ | ३१७ |
| १७८ | ११ | हौ तुम कारन केसवे, अन्तर लव लागी। | १४५ | ३४८ |

# (३) पारिभाषिक शब्दकोश

### अ

**अनहदनाद.**—योगी जेव्हा संसारिक बंधनातून बहिर्मुख होऊन आपल्या अंतर्मुखी साधनेत लीन होतो तेव्हा त्याच्या मनस्थितीत अलौकिक शब्द"आहत" होतो.यासच 'अनाहत नाद' म्हणतात.संतांनी यासच"अनहत नाद" म्हटले आहे.अंबर-गगनात गुंजणाऱ्या शब्दास"अनहद नाद" किंवा"नादबिंदु" म्हणतात.

**अजपाजाप.**—"सुरती" अवस्थेत ब्रह्मस्मरणाची निशब्द प्रक्रिया चालते.तिला 'अजपा जाप' म्हणतात.(आत्म्याच्या शब्द ऐकण्याच्या शक्तिस सुरत म्हणतात.)

**असट दसा सिद्धी.**—अठरा सिद्धी खालीलप्रमाणे—

(१) अणिमा, (२) महिमा, (३) गरिमा, (४) लघिमा, (५) प्राप्ती, (६) प्राकाम्य, (७) ईशित्व, (८) वशित्व, (९) अनूर्मि (अनेतिक्रमणीयता), (१०) दूर-श्रवण, (११) दूरदर्शन, (१२) मनोवग, (१३) कामरूप, (१४) परकाय प्रवेश, (१५) स्वेच्छा, (१६) मृत्यू, (१७) सुरक्रीडासंकल्पसिद्धी, (१८) अप्रतिहत गती.

**अजान.**—मशिदीवर उभे राहून मोठ्या आवाजात अल्लास पुकारणे, हांक मारणे, बांग देणे.

### आ

**आसक्ति.**—नारद भक्तिमध्ये 'नवधा भक्तिसंच' आसक्ती म्हटले आहे.त्या ११ प्रकारच्या आहेत—

(१) गुणमहात्म्यासक्ती, (२) रूपासक्ती, (३) पूजासक्ती, (४) स्मरणासक्ती, (५) दास्यासक्ती, (६) सख्यासक्ती, (७) कांतासक्ती, (८) वाहाण्यासक्ती, (९) आत्मनिवेदनासक्ती, (१०) तन्मयतासक्ती, (११) परमविरहासक्ती.

### उ

**उनमनी (मनोन्मनी).**—आत्मा व परमात्मा हे दोन्ही एकाकार होऊन जातात.ध्यानास आत्मज्ञान राहात नाही.संतांनी ह्या अवस्थेस 'उनमनी' अथवा 'मनोमनी' म्हटले आहे.

**उन्मनी ध्यान.**—आंतरिक ध्यानाच्या अवस्थेपासून जेव्हा मन आत जाऊन वरच्या केंद्रात टिकते, तेव्हा त्यास 'उन्मनी ध्यान' म्हणतात.

अनुक्रमणिका

**कल्पवृक्ष.**—मागेल ती वस्तु देणाऱ्या वृक्षास 'कल्पवृक्ष' म्हणतात.

**कामधेनू.**—सर्व इच्छा पूर्ण करणाऱ्या स्वर्गातील गाईस 'कामधेनू' म्हणतात.

**काबा (मक्का शहर).**—मुसलमानांचे पवित्र तीर्थस्थान, मुसलमान येथे हज यात्रेस जातात.महंमद पैगंबर येथे राहात होते.एक धार्मिक इमारत.

**कुंडलिनी (इडा, पिंगला, सुषुम्ना).**—शरिराच्या हजारो नाड्यांमध्ये इडा, पिंगला आणि सुषुम्ना ह्या तीन नाड्या फार प्रसिद्ध आहेत.मूलाधारपासून प्रारंभ होऊन मेरू दंडाचे डाव्या-उजव्या आणि मध्यापासून मस्तकात ब्रह्मरंध्रापर्यंत जाणाऱ्या तीन नाड्यास"इडा, पिंगला, सुषुम्ना" म्हणतात.

**कैलास.**—हिंदु हिमालयाच्या एका शिखरास शिवाचे निवासस्थान मानतात.हिंदूचे एक पवित्र तीर्थस्थान.

### ग

**गगनमंडल.**—त्रिकुटी मंडलाच्या आकाशास 'गगन मंडल' म्हणतात.

**गाना.**—परमात्मारूनी शब्दधूनमध्ये आपणाला विलीन करणे.आंतरिक 'शब्दधुम' किंवा 'अनहदनाद' मध्ये स्वतः विसरणे.

### घ

**घट.**—मनुष्याचे डोके मटक्याच्या (मातीचे भांडे) आकृतीप्रमाणे असल्यामुळे त्यास 'घट' म्हटले आहे.शिर हे सर्व चेतनशक्तिचे केंद्र आहे.तसेच त्यामध्ये चैतन्यस्वरूप परमात्मा निवास करतो.

### च

**चार खानियाँ (चार योनियाँ).**—(१) **जरापुज**—मनुष्य किंवा पशु झिल्ली (बार) मध्ये लपटलेले असतात.(२) **अंडज.**—अंड्यातून जन्मणारे (उदाहरणार्थ—पक्षी, सर्प इत्यादी) (३) **स्वेदन**—उष्णतेने धाम किंवा बाष्पासून उत्पन्न होणारे—(डांस, ढेकूण इत्यादी) (४) **उद्भिज**—जमिनीतून वनस्पतीच्या रूपाने उत्पन्न होणारे (उदा.रोपे, वृक्ष इत्यादी),

**चिंतामणी.**—सर्व इच्छा पूर्ण करणारे रत्न.

### त

**त्रिकुटी.**—संतांच्या भाषेत दुसऱ्या आंतरिक मंडळास 'त्रिकुटी' म्हणतात.

अनुक्रमणिका

**त्रिविध दुःख.**–तीन प्रकारची दुःखे–

(१) **आध्यात्मिक दुःख**–ताप, क्रोध इत्यादी.
(२) **आदिभौतिक दुःख**–मार लागल्याने होणारे दुःख.
(३) **दैविक दुःख**–देवी-देवता किंवा प्रेत-भूत-पिशाच्यामुळे होणारे दुःख.

**तिसरा तीळ.**–डोळ्याच्या वर दोन्ही भुवयांच्या मधील केंद्रास संतांच्या भाषेत 'तिसरा तीळ',शिवनेत्र' किंवा 'हृदय' म्हणतात.

### न

**नवधा भक्ती.**–(१) श्रवण, (२) कीर्तन, (३) स्मरण, (४) पादसेवा, (५) अर्चना, (६) वंदना, (७) दास्य, (८) सख्य, (९) आत्मनिवेदन.

**नादबिंदू.**–समाधिस्त योगाचा परब्रह्माबरोबर संयोग झाल्यावर ब्रह्मरंध्रात एक"रुणुझुणी-कुणकुणी" प्रमाणे विक्षोभ होतो.तोच हा नाद होय.परब्रह्माच्या इच्छारुपास"नाद" आणि क्रियारुपास"बिंदू" म्हटले जाते.

**निरत.**–आत्म्याचा प्रकाश पाहणाऱ्या शक्तिस 'निरत' म्हणतात.

**नऊ दरवाजे.**–(शरिराचे)–दोन डोळे, दोन कान, नाकाची दोन भोके, एक तोंड, एकगुदद्वार, एक मुत्रद्वार (उगस्थ).

**नऊ निधी.**–पद्म, महापद्म, शंख, मकर, कच्छप, मुकुंद, कुंद, नील, खर्व.

### प

**पवनसाधना.**–थाळीत जळणाऱ्या दिव्याच्या ज्योतीस विषयवासनेच्या हवेच्या झोतापासून वाचवून स्थिर बनविण्याच्या अभ्यासास 'पवनसाधना' म्हणतात.

**पुससरात.**–इस्लाममतानुसार नरकावरुन जाणारा पूल (जो केसाहून बारीक आणि ज्याच्या दोन्ही बाजूस खाली नरककुंडे बनविलेली असतात.)

**पंचदोष (पंचविकार).**–काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार.

### भ

अनुक्रमणिका

**भक्तिउपाय.**—विवेक, विमोक, आभास, क्रिया, कल्याण, अनवसाद, अनुदधर्ष.

## श

**शिवनेत्र.**—डोळ्यांच्या वर दोन्ही भुवयांच्यामध्ये अंतरिक केंद्रास संतांच्या भाषेत 'शिवनेत्र' 'हृदय' किंवा 'तिसरा तीळ' म्हणतात.

**सैतान.**—सन्मार्गावरून बहकविण्याचे काम करणारा किंवा अजाजील नामक स्वर्गातून काढलेला फसविण्याचे काम करणारा दुष्ट.

## ष

**षटचक्र.**—(१) मूलाधारक, (२) स्वाधिष्ठानचक्र, (३) मणिपूरचक्र, (४) अनाहतचक्र, (५) विशुद्धचक्र, (६) आज्ञाचक्र.

**षटकर्म.**—खालीलप्रमाणे ३ प्रकारची आहेत—

(१) **तांत्रिक षटकर्म**—मारण, उच्चाटण, स्तंभन, वशीकरण, शांती विदुषण.
(२) **योगासंबंधी षटकर्म**—धौती, वस्ती, नेती, त्राटक, मौलिक, कमालभावी.
(३) **षटकर्म.**—स्नान, संध्या, पूजा, जप, तर्पण, होम.

**षटदर्शन.**—न्याय, वैशेषिक, साख्य, योग, मिमांसा आणि वेदांत यांना 'षटदर्शन' म्हणतात.

## स

**सुरती.**—आत्म्याच्या दोन आंतरिक शक्तिमुळे 'शब्दधून' ऐकू येते.हीस संतांच्या भाषेत 'सुरत' म्हणतात.आत्म्याच्या शब्द ऐकण्याच्या शक्तिस 'सुरत' म्हणतात.सुरतमुळे अनहननादाच्या अतिमधुर संजीवरस पिऊन आत्मा आनंदमग्न होऊन जातो.

**सुरती.**—योग्याचे सूक्ष्मतम मन आपले लक्ष्य उपास्य देवांबरोबर एकाकार होऊन जाते.अशा स्थितित ध्यानास आपल्या इष्ट देवाचा बोध तर होतोच, परंतु तो आपल्या ध्येयात"मैमता" होऊन उठतो.योग्यांनी या अवस्थेत 'सुरति' म्हटले आहे.

**सविकल्प समाधी.**—सुरती अवस्थेत ब्रह्मास आत्मरती तसेच आपली चेतना बनून राहते.आणि मनाचा उपास्य देवाशी सतत संबंध बनतो.योग दर्शनात त्या स्थितिस 'सविकल्प समाधी' म्हटले आहे.

**साधना.**—(१) पवित्र अन्न सेवनाने शरीरशुद्धी, (२) सदाचार, (३) अनतरत अभ्यास, (४) पंच महायज्ञाचे अनुष्ठान, (५) सत्य, दया, अहिंसा इत्यादींचे पालन, (६) आशावादिता, (७) अहंकार त्याग,

अनुक्रमणिका

**सुधामणी.**—प्रेमाच्या अमृताने युक्त असे सर्वश्रेष्ठ रत्न.

### ह

**हृदय.**—तिसरा तीळ, शिवनेत्र.

***

अनुक्रमणिका

**परिशिष्ट ४**

## (४) संदर्भ ग्रंथ


१. रविदास रामायण, लेखक बख्शी आतमनंद सोधि, काशी प्रेस मथुरा, (पहिली आवृत्ती).

२. श्री रविदास रामायण, प्रयागदत्त शर्मा, 'विचित्र' न्यू भारत प्रिंटिंग प्रेस, मथुरा, (तिसरी आवृत्ती, १९८०).

३. रैदास रामायण, पं. गिरिजाशंकर मिश्र, 'पूनम' गिरीश प्रिंटिंग प्रेस, (पहिली आवृत्ती, १९८१).

४. असली रैदास रामायण, महाकवि बख्शी दास, श्रीकृष्ण प्रिंटिंग प्रेस, हाथरस.

५. श्री चँवर पुराण तथा भक्त चेता, श्री माखनदास, श्री लोकनाथ पुस्तकालय, कलकत्ता.

६. गुरु रविदास, काशिनाथ उपाध्याय, अपेक्स प्रिंटिंग प्रेस, (पहिली आवृत्ती, १९८३).

७. रविदास (प्रवेशांक-१) सं. डॉ. शुकदेव सिंह, महावीर प्रेस, भेलपूर, (१९८६).

८. आग के फूल, आचार्य रजनीश, श्री रामलखन, वाराणसी.

९. भक्त मीरा, जी. एस. प्राचार्य, शिवा प्रिंटिंग प्रेस, बिकानेर, (१९८३).

१०. प्रेममयी मीरा, प्रकाशक एस. एल. सौधी, श्रीकांत प्रिंटिंग प्रेस, (१९८०).

११. संत कबीर, शांतिसेठी, अपेक्स प्रिंटिंग प्रेस, जालंदर, (१९८५).

१२. संत रविदास की जीवन कथा और अमर संदेश, एस. एल. लोखंडे, समता प्रिंटिंग प्रेस, पुणे.

१३. संत रविदास जीवन व संदेश, श्री भाऊसाहेब चीम, लक्ष्मी प्रिंटर्स, अकोला, (१९८५).

१४. श्री संत रोहिदास, जीवन आणि वाङ्मय, अशोक प्रभाकर कामत, पंढरीनाथ गोपाळ कदम, (प्रथमावृत्ती १९६८).

१५. श्री संत रोहिदास, श्री सत्यदेव शिंदे, ललित मुद्रणालय, कोल्हापूर, (प्रथमावृत्ती १९८३).

१६. श्री भक्त रोहिदास चरित्र, "ओविबद्ध" श्री. नागेंद्र तातोबा महाजन, श्री प्रिंटर्स, मिरज, (प्रथमावृत्ती १९८०).

१७. श्री भक्त रोहिदास (पुरवणी)"ओवीबद्ध" श्री. नागेंद्र तातोबा महाजन, श्री प्रिंटर्स, मिरज, (प्रथमावृत्ती १९८२).

१८. संत रोहिदास यांचे चरित्र (सातपुते घराण्याचा इतिहास, मिरज), लेखक शंकरराव गाडवे, जी. डी. कत्ते, (१९८२).

१९. थोर भारतीय संत, संत रोहिदास (रैदास) केशव पां. राजभोज, के. पो. राजभोज, (१९६८).

२०. श्री काशी माहात्म्य, श्री. रामचंद्र तिलवणकर, मुद्रक नारायण खुंटे.

२१. सचित्र भक्तिविजय कथासार, महिपती ताहराबादकर, (पहिली आवृत्ती १९८६).

२२. असली रविदास रामायण, पाँचो कांड, बाबू प्रसादसिंह, श्री लोकनाथ पुस्तकालय, कलकत्ता, (आवृत्ती ९ वी, १९८६).

२३. संत गुरू रविदास, डॉ. बी. पी. शर्मा, अमर प्रिंटिंग प्रेस, दिल्ली, (१९७२).

२४. रविदास दर्शन, आचार्य पृथ्वीसिंग आझाद, आई प्रेस, पंजाब, (दुसरी आवृत्ती, १९८४).


अनुक्रमणिका

२५. संत रैदास, डॉ. रामकृष्ण वर्मा, यू. पी. प्रिंटिंग प्रेस, (दुसरी आवृत्ती, १९८४).
२६. संत रविदास की भक्तिसाधना, डॉ. बी. पी. शर्मा, पी. के. प्रिंटर्स, जालंदर, (पहिली आवृत्ती, १९८०).
२७. भक्त रत्नावली, संपादक डॉ. बी. पी. शर्मा, लक्ष्मी प्रिंटिंग प्रेस, चंदीगड, (पहिली आवृत्ती, १९८२).
२८. संत गुरु रविदास वाणी, डॉ. बी. पी. शर्मा, अमर प्रिंटिंग प्रेस, दिल्ली, (पहिली आवृत्ती, १९७४)
२९. संत प्रवर रैदास साहेब, चंद्रिका प्रसाद जिज्ञासु, समाजसेवा प्रेस, लखनौ, (पहिली आवृत्ती, १९८४).
३०. श्री रविदास-सत्संग सागर, महर्षि बदल, समाजसेवा प्रेस, (दुसरी आवृत्ती, १९७५).
३१. भारतीय चर्मकारी व महारों की उत्पत्ति, स्थिति और जनसंख्या का तथा उनके संबंध में डॉ. बाबासाहेब आंबेडकर के विचार, लेखक चंद्रिका प्रसाद जिज्ञासु, समाजसेवक प्रेस, (१९८४).
३२. श्री नामदेव (चरित्र, काव्य आणि कार्य), कविटकर, कीर, इनामदार, रेळेकर, मिरजकर शासकीय मुद्रण, मुंबई, (दुसरी आवृत्ती, १९८१).
३३. गुरु नानक म्हणतात– मा. ओ. बासट वर्क्स, दिल्ली, (१९८२).
३४. संत मेळा (भाग ३ रा) रवि मुद्रणालय, बेळगाव, (१९८३).
३५. स्वामी रामानंद वैष्णव भक्ति आंदोलन, सेक्टर ३० सी, चंदीगड, (१९८५).
३६. संत रविदास, प्रा. धनश्याम डोंगरे, औरंगाबाद, (१९८७).
३७. श्री गुरु रविदास चरित्रम, सं. डॉ. बी. पी. शर्मा, देवनगरी प्रिंटर्स, लुधियाना, (१९८२).
३८. युग प्रवर्तक संत गुरु रविदास, सं. आचार्य पृथ्वीसिंग आझाद, हिंदी प्रेस, जालंदर, (१९८३).
३९. संत रविदास, रत्नचंद्र एम. ए. होशियारपूर.
४०. संत रैदास, संगमलाल पाण्डेय, धारा प्रेस, इलाहाबाद, (१९७०).
४१. संत रविदास (विचारक और कवि), डॉ. पदम गुरुचरणसिंह, भंबर्डा प्रिटिंग प्रेस, जालंधर, (१९७७).
४२. नीच ते ऊंच कीओ मेरे संत गुरु, डॉ. धर्मपाल सरीन, राजेंद्र रविंद्र प्रिंटर्स, नई दिल्ली.
४३. रोहिदास समाज पंचायत संघ, मुंबई, रौप्य महोत्सवी स्मरणिका, (१९७७).
४४. रोहिदास सुधारक मंडळ, मुंबई, सुवर्ण महोत्सवी स्मरणिका, (१९८३).
४५. समस्त हराळे वैष्णव समाज, पुणे, रौप्य महोत्सवी स्मरणिका, (१९८५).
४६. रोहिदास समाज सेवा संघ रत्नागिरी, स्मरणिका, (१९८८).

शासकीय मुद्रणालय, नागपूर.



**डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार विजेते**
**दलित मित्र श्री.मा.आ.कारंडे (गुरुजी)**

एखाद्या विषयाला वाहून घेणारे अनेक लेखक आढळतील परंतु विविध विषयांवर आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत लिहून मराठी माणसांच्या मनात आदराचे स्थान मिळविणारे म्हणून थोर लेखक दलित मित्र श्री.मा.आ.कारंडे गुरुजी यांचेच नाव डोळ्यासमोर येते.काव्य, कथा, लघुकथा, नाटक, नाट्यपरीक्षण, चरित्र, कादंबरी आणि वृत्तपत्रीय लिखाण इत्यादी सर्वच क्षेत्रात त्यांचा यशस्वी संचार झालेला आहे.तसेच अलौकिक समाजसेवेबद्दल त्यांना महाराष्ट्र शासनाने १९८२ साली 'दलित मित्र' पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला.तसेच भारतीय दलित साहित्य अकादमी (दिल्ली) तर्फे १९९१ मध्ये 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

हा थोर साहित्यिक सातार जिल्ह्यातील कलेदोण गावी गरीब चर्मकाराच्या घरात दिनांक १० सप्टेंबर १९१९ रोजी जन्मास आला.गावी प्रा.शिक्षण घेऊन लहानगा मारुती १९३६ मध्ये व्ह.फायनल परीक्षा पास झाला.पण त्यापूर्वीच वडिलांचे छायाछत्र डोक्यावरून नाहिसे झाले.त्यामुळे मारुती मुंबईस थोरल्या बंधुकडे नोकरीच्या शोधात आला.लवकरच त्याला मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत सन १९३७ मध्ये शिक्षकाची नोकरी मिळाली व ते मारुतीचा"कारंडे गुरुजी" झाले.मग त्यांनी मराठी व हिंदी भाषेचा अभ्यास करून अनेक परीक्षा पास केल्या.सुप्रसिद्ध 'ज्ञानदीप' या संस्थेचे ते एक अध्वर्यु आहेत.

साहित्य निर्मितीत व समाजसेवेत रममाण झालेल्या श्री.कारंडे गुरुजींचा नोकरीतही उत्कर्ष होत राहिला.१९७७ साली विभागीय 'शिक्षण निरीक्षक' म्हणून ते निवृत्त झाले.संत शिरोमणी रोहिदासावर संशोधन करून ग्रंथ लिहावा, यासाठी भारत सरकारने त्यांना तीन वर्षांसाठी खास शिष्यवृत्ती दिली आणि त्याचे फलित म्हणून आज"संत रोहिदास : चरित्र आणि वाङ्मय" हा ग्रंथराज प्रसिद्ध होत आहे.म्हणून या शुभप्रसंगी श्री.कारंडे गुरुजी यांचे हे कौतुक!

**विजय साबळे**
संपादक, पाक्षिक विधाता रोहिदास,
महाप्रमुख, राष्ट्रीय चर्मकार महासभा.

अनुक्रमणिका